७५३०६

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड

७५३०६
संदर्भ
015307

# शिवकालीन पत्रव्यवहार

पुणें मराठी ग्रंथालय
ग्र. क्रमांक इतिहास २१५
अनुक्रमांक २१३१

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड १५ वा.

# शिवकालीन पत्रव्यवहार

संशोधक

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें
' श्री आत्माराम ' छापखान्यांत छापून
प्रकाशित केला.

श्रावण १८३४

किंमत ३ रुपये

पुणे मराठ... ...य
१३७ ब, नारायण पेठ, .. २

श्री

# प्रकाशकाचा खुलासा

प्रस्तुतचा खंड प्रकाशित होत आहे हें महाराष्ट्रेतिहासाभिमानी **शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी** यांच्या साहाय्याचें फल होय.

या पुढील खंड इतिहाससंग्रहांत प्रकाशित करण्याचें रा. रा. **दत्तात्रय बळवंत पारसनीस** यांनीं कृपा करून कबूल केलें आहे.

अशा तीन चार खंडांची सामुग्री तयार आहे, ती सर्व प्रकाशित झाल्यावर विस्तृत प्रस्तावना लिहिण्याचा रा. **विश्वनाथ काशीनाथ राजवाडे** यांचा विचार आहे.

हीं सर्व पत्रें वगैरे फार च महत्त्वाचीं आहेत, हें वाचकांस सहज दिसून येणार आहे.

प्रस्तुत खंडांत


| | | | |
|---|---|---|---|
| **मसूर** | ... | **जगदळे** | **पृष्ठांक १-१२०** |
| **नींब** | ... | **सदानंद** | **१२१-२६७** |
| **रोहिडखोरें** | ... | **गुप्ते देशपांडे** | **२६९-३५६** |
| **रोहिडखोरें** | ... | **जेधे देशमुख** | **३५७-३९७** |
| **सातारा** | ... | **राजोपाध्ये** | **३९९-४६०** |
| **चाकण** | ... | **ब्रह्मे** | **४६१-४८८** |


अशा सहा घराण्यांतील कागदपत्रांचा समावेश झाला आहे.

पुढील खंड लवकर किंवा उशीरा प्रकाशित होणें महाराष्ट्रीयांच्या अभिरुचीवर अवलंबून आहे.

प्रकाशक

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

# मसूर-जगदळे

# मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

## खंड पंधरावा

**लेखांक १**

श्री माहादजी जगदळे देसमुख पा मसूर सा रायबाग सुभे विजापूर. आपली कदीम देसमुखी कराराबादेची होती. ते देसमुखी अमानत होऊन खालसा विजापुराचे वख्तीं सेभरी वरसें खाली साहोती विजापुरी याणीं शाहाजी भोसला यास तनखा दिल्ही. शाहाजी भोसलियानें माझा चुलता जिवें मारून पा मसूरची देसमुखी घेतली. माझा बाप पातशाहीमधें जाऊन देसमुखीची रदबदली करूं लागला. ह्मणौन शिवाजीनें भोसल्यानें धरून बाप हि जिवें मारिला. मग आपण लहाण होतों. का पटेलगी करून होतों. शिवाजीनें पातशाही मुलुक घेतला. पुंडावे करूं लागला. मग आपण त्यापासीं जाऊन रदबदल करून कीं, आपला बाप मारिला व आपला चुलता मारिला आणि आपलें वतन घेतलें. ऐसी रदबदली करून. त्तेव्हां भोसलियाणीं पा मसूरची देसमुखी आपले दुमाले केली. कराराबादेची देसमुखी दिल्ही नाहीं. कराराबादेची देसमुखी धना जाधव नासरदार यासी देसमुखी रामा मजकुरांनीं दिल्ही. त्यानें आपले तरवारेनें पदाजी यादव व पिराजी यादव यांच्या हवाला देसमुखी करून यांच्या हातें देसमुखीचा कारभार करीत आहेती. पातशाही फौजेमधें फौजा येताती. धनाजीचें नांव कळों न देतां, आपली देसमुखी ह्मणौन भेटताती. कराडाबादेचा देसपांडा याचा एक भाऊ रुद्राजी चंदो हा धनाजीस मिळोन पदाजी यादवास व पदमोजी यादवास घेऊन, लस्करांत एऊन फिरादी करवितो. तरी ऐन जिन्नस पदाजी यादवाचे दोघे बेटे एकोजी व कुसाजी गणिमाकडे आहेती. पाच पाच से स्वार बाळिगीता आहेती. आणि मुलुक लुटिताती. ते लुटीचे पैके आणून, पदाजी यादव व पदमोजी

यादव हे लस्करामधें खर्च करून मजसी वाद सांगताती. म्या तों पातशाही खजाना पेशकसी भरून सनद देविली ते सनद न देणें ह्मणौन फिरादी होताती, आणि गोतांत पाठऊन निवाडा करावा ह्मणताती. तरी त्याचा भाऊ गिरजोजी यादव हा राणियापासीं आहे. हा व धनाजी जाधव यानें मुलुकामधें आपले स्वार व प्यादे पाठविले आहेती कीं, कोण्ही जमीदार माहादजी देसमुख मसूरकर याची शाहादी द्याल ह्मणजे मारिले जाल. ह्मणौन धनाजीचा भाऊ रयतांस धरून नेऊन मुचलके घेताती. ऐसे मजवरी जुलूम करून, माझें कराडीचें वतन घेतलें व मसूरचें घेऊं ह्मणोन कराडीच्या देसपांडेयाचा भाऊ रुद्राजी चंदो यास धनाजीनें बाा देऊन प्रतक्ष गणीम मजवरी उभा केला आहे. हे गोष्ट लटकी जाली तरी पातशा मज सजा पोहचविते. माझ्या वतनाची हकीकती तो रुद्रो चिंमणाजी कानगो हे विजापूर व महमद एक अमीन सरकार रायबाग वाई व हक्कसिक्काकेनीस व फौजदार ऐसी हकीकती कचेरीस मोहरनसी लेहून दिल्ही असतां, धनाजीच्या बळें पैके खर्च करून मजवरी जोरावारी होते. मी नातवाण. कोठोन खर्च करावा ? हें तहकीक केलें पाहिजे. माझी सनद मज देविली पाहिजे. जरी कदीम देसमुख पदाजी, पिराजी, धनाजी व गिरजोजा यांची देसमुखी कदीम ह्मणताती, कांहीं कदीम सनद असल ते हुजूर आणून दाखवावी. त्यावरून तहकीक होईल. गनीम ऐसा कुल हालीमवालियांचे गुजारतीनें खरा करून देईन.

लेखांक २ श्री

## श्रीजटाशंकर कुळकथा

कराहाडचे देसाई जगदेराऊ राजगर्दल देसमुख. त्यांच्या बायका दोघी जणी. त्यांचे लेक चौघे जण. वडील बाइलेचा लेक बाबाजीराऊ. धाकटीचे तिघे जण; वडील रामोजीराऊ, मधला विठोजीराऊ, धाकटा दयाजीराऊ. ऐसे चौघे जण होते. तों बाप माहातारा जाहाला. आणिगे

झगडूं लागले. बाप ह्मणउन लागला कीं तुह्मीं झगडूं नका. तुमचें तुह्मास वाटणी करून देतों. ह्मणउन बोलिले. मग वडील बाबाजीराऊ यासी मसूरीची पटेलगी व देसमुखी व गांव त्याखाले ऐसें त्यास दिल्हें. मग रामोजीराऊ यासी कराड वा आउद व आणखी दोन गाव कराडाखाले ऐसे च्यार गाव त्यास दिल्हे. मग रामोजीराऊ यांनीं कारभार करावयासी दोघे नाहवी आउदचे मुतालीक कराहडामधें ठेविले व कारकून दोघे रघुनाथपंत व आणखी एक ऐसे ठेविले. व मोकासा हि दयाजी थोरातास जाहाला होता आणि दिवाणीची रस्त व्होन च्यारसे भरले. ते पैकेस दकात घालून ठेविले. ते पैके मुतालीक नाहवी यानीं दिवाणीच्या रस्ता चोरिल्या. ते वेळेस नाहवी व कारकून व मोकासी ऐसे तिघे जण एक जाहले होते. मग हे तिघे जण मिळोन रामोजीराऊ व विठोजीराऊ व दयाजीराऊ या तिघा भावांस मारावें ऐसें केलें. मग दोघे भाऊ रामोजी व दयाजीराऊ यांसि घरामधें कोंडून मारिलें. मग एक भाऊ विठोजीराऊ मसुरास पळोन आला. मग ते वेळेस बाबाजीराऊ बोलिले कीं तेथील गमाविलेस आणि येथील हि गमावयासि आलास. ह्मणऊन बोलिला. मग तेव्हां विठोजीराऊ ते वेळेस बेदरच्या पादछाकडे लाऊन दिल्हा, तो तेथें च चाकरीस लागला. मग पेडगावीची पटेलकी व मोकासा घेतला तो कारकून कराहाडची मुतालकी करीत होते ते मारून काढली. हणमंततटीस मुशारपण करून पोटें भरूं लागले. मग तेव्हां तारगावीची पटेलकी ते हि आमची च आहे. मग तेथें मुतालीक ब्राह्मण ठेविले. मग त्या ब्राह्मणांनीं चाकर ठेविले; काळीगडे आणि खोचरे हे दोघे जण ठेविले, आणि ते बापलेक काशीस दोघे चालिले. मग हे वाटेस कोळीगडा व खोचरे यांनीं मारिले. मग हे दोघे जण पटेलकीसाठीं भांडूं लागले. तेव्हां खोचऱ्यानें घोरपडे पाटिलासी मिळविले. मग हे दोघे जण खाऊं लागले. कुंडलचे पाटिलाच्या दोघी लेकी होत्या; कमळज्या व कुष्णा ऐशा होत्या. मग बाबाजीराऊ यासी दिल्हें कुष्णास आणि दुसरी जानोजी पिसळा

यासी कमळजा दिल्ही. मग जानोजी पिसळ्या हे शार बेदरीं पादछापासी चाकरीस होते. तेव्हां त्यानीं शिर्क्यावरी नामजात रवाना केली. ते रडतोंडच्या घाटापावेतों गेले. मग त्यामधें एक मुसुलमान होता त्यानें तफावती केली. मग तेथून च माघारे मुरडून पादछायापासीं गेले तों हक्कमुनसाबेनें जानोजी पिसळ्या मारावयासी उठला. मग जानोजी पिसळ्यानें कटार व तरवार उपसोन एका च कचक्यानें तुरकास मारिलें. ते वेळेस पादछाव धावून आले. सोनियाचे काठीनें वारावारी केली. पादछाव बोलिले कीं ऐसें कैसें केलें. मग जानोजी पिसळा बोलिला कीं, हक्कमुनसाबीनें मारिला, मी हि मुसुलमान होईन. मग ते वेळेस पादछानें विचारिलें कीं खरें च कीं काय ? ऐसें विचारिलें. मग ते वेळेस जानोजी पिसळा बोलिला कीं खरें च. मग तेव्हां पादछांनीं कंदरीस बैसाविलें आणि सुनता केली आणि तश्रिफा व हत्ती घोडा व पालखी दिल्ही. मग जानोजी पिसळा बोलिला कीं मी शिर्का कापून काढितों. ह्मणऊन बोलिला. त्यास पादछास बोलिला कीं, मी मेलों तरी माघारें चालवावें ह्मणऊन माहजर करून देणें कीं मराठ्याचा वीर आणि मुसुलमानाचा पीर आणि उजवे बाजूस मराठ्याची कंदुरी आणि डावे बाजूस मुसुलमानाची कंदुरी आणि त्याचा निमे हक्क व कराहाडबाजेमधें निमे हक्क व बिध्यास वराई उदबत्यास फकीरफकिराई आणि हक्क मेड्यामधें पांच चावर इनाम व मुजावर सेवेसी ठेवून ह्मणऊन ऐसा माहजर करून देणें. मग पादछानीं माहजर करून माहालदारापासी दिल्हा. मग ते वेळेस जानोजी पिसळा स्वार होऊन मेडास आला. तेथें येऊन मेडा रोविला. मग मेड्यास अंकुर फुटले आणि उउचळा जाऊन भांडूं लागला. तेव्हां शिर्क्यानें जमाव केला. हपसी आणिले, व श्रुवे आणिले, व फिरंगी आणिले, व पायदळ आणिलें. मग दिवसा च स्वार होऊन, जानोजी पिसळ्यावरी येऊन घातले. ते वेळीं तेथें बहुत च रणकदन जाहालें. आणि तरवारेची जुगली जानोजी पिसळ्या लागली. पोटला बाहेर निघाला. आणि तैसा च पोटला धरून मेडाच्या तहल्या

घेऊन बैसला आणि वरचील लस्कर वाईस गेलें आणि शिर्के हि फिरोन माघारे गेले. मग त्याची बाईल कमळज्या मसुरास बहिणीस भेटावयासी आली होती तिस तेथें स्वप्न पडलें आणि राम ठाकूर यासी स्वप्न पडलें कीं तुह्मीं गरीतोड भेटीस येणें, नाहींतरी बाबाजीराऊ यासी व राम ठाकूर हे दोघे जण धाडून घेऊन जाणें. ह्मणऊन ऐसें दोघांसी हें च स्वप्न पडलें. मग तेव्हां च बाबाजीराऊ व राम ठाकूर ऐसे दोघे जण दो घोडियावरी बैसोन स्वार होऊन साताराव‍रून गेले. दो प्रहरा दिवसा मेढ्याच्या रानांत गेले, तों जानोजी पिसळ्यानें हाक मारिली. मग ते जवळी आले. त्यांस बोलिला कीं, माझें शीर कांपून नेणें. मग त्यास ते बोलिले कीं आमच्यानें शिर कापवत नाहीं. तेव्हां राम ठाकरास बोलिला कीं, तूं तरी माझें शीर कापून नेणें. तेव्हां राम ठाकूर बोलिला कीं, तूं आन देणार आणि मी घेणार, हें मज होत नाहीं. ह्मणऊन बोलिला. मग ते वेळेस त्यापासी कागद माहजराचा होता तो कागद बाबाजीराऊ यापासी दिल्हा. मग जानोजी पिसळा बोलिला कीं, तुमच्या आंगावरील शेला खालीं पसरा. ह्मणऊन बोलिला. मग शेला खालीं पसरला. आणि जानोजी पिसळानें टकरा पसला हक घेऊन आपल्या हातें शिर कापून शेल्यावरी ठेविलें. मग बाबाजीराऊ व राम ठाकूर यानीं त्याच्या धडावरी शिळा रचिल्या आणि त्यावरी तुरपती बांधली. पूजानमस्कार केला. मग तेथून हे दोघे जण निघत होते तों शिर्क्यांची धावणी आली. मग ह्या दोघांची घोडीं हिरोन घेतलीं. कोण्हाचे कोण्ह ह्मणऊन विचारिलें. मग हे बोलिले कीं त्यांचे बाइलेनें सोधावयासी पाठविलें आहे. ह्मणऊन बोलिले. मग शिर्क्यांनीं आपल्या खवईपासीं घेऊन कुडाबादेस नेले. तेथें देवदरबार होते. तेथें शीळ होती. त्या शिळेवरी नेऊन त्याचें शीर ठेविलें. मग तें शीर त्याच्या स्वप्नामधें गेलें कीं, मी भांडोन जुजानें मेलों आहे आणि तें हि जुजोन भांडों न मिळे, तरी तुह्मी माझ्या शिरास खोळंबा करूं नका, लाऊन देणें. ह्मणऊन स्वप्न पडलें. मग दुसरे दिवशीं त्या शिरास रजा दिल्ही. मग तो तेथें च

पीर जाहाला. मग बाबाजीराऊ व राम ठाकूर यानीं खाद्यावरी घेऊन निघाले तों ठाईं ठाईं पीर च होत आला आणि साताऱ्याच्या खिंडीमधें च पीर जाहाला. आणि तेथून कोणेगांवच्या वांकणामधें आला. तेथें हि पीर जाहाला. मग त्याची बाईल मसुरीं होती तिज कळलें. मग ती पालखीमधें बैसोन शिरवड्याच्या गाडेउतरापासी आली आणि शीर तेथें च आलें. मग त्याचे बाइलेनें शिर धुतलें आणि तेथें च पीर जाहाला. मग ते वेळेस त्याची बाईल बोलिली कीं, मसुरास घेऊन चला, तेथें सुखसोहळे होतील. ह्मणऊन बोलिली. मग बाबाजीराऊ यानीं तिकडून च कराहाडास घेऊन गेले. तेथें बहुत जन लोक मिळाले. मग त्याची बाईल बोलिली कीं मीं पतिव्रता असलें तरी याचा कांहीं चमत्कार दाखविणें. ह्मणऊन बोलिली. मग तेव्हां त्या शिरानें डोळे उघडिले. मग बहुत च आनंद जाहाला. तेव्हां त्या शिरास घेऊन कोपर्डेयासी आली. तों तेथें च पीर जाहाला. मग तेथून मसुरास आणिला. मग त्याचे बाइलेनें त्याबराबर समाती घेतली. मग ते वेळेस बाबाजीराऊ यानीं बहुत च सुखसोहळे केले आणि बेदरचे सुतार आणिले आणि खनवडच्या माळावरी साव होता तो तोडून त्याचा गुमट बांधला आणि मुजावर तिघे जण चाकरीस ठेविले. तों ते वेळेस कराहाडामधें तुरकाचें राज्य होतें. त्यानें बहुत मुजावर बळावले. आणि बाबाजीराऊ बहुत माहातारा जाहाला. त्याचे पोटीं लेक दोघे जण; वडील विठोजी, धाकटा कुमाजी, ऐसे दोघे होते. त्याचे चाकरीस माळी होते. रोज पांच मण फुल बाबाजीराऊ याच्या पलंगावरी भोगवट्यास पडें. मग त्याचें बहुत च माहातारपण जाहालें. आणि गावामधें मुजावर बळावले. आणि माहातारपणचे लेक एक चौवरसाचा आणि एक दिडावरसाचा. ह्मणऊन घरच्या कारभारास माळी ठेविले. आणि धणगर मेंढरें राखत होता तो सेताच्या कारभारांत ठेविला. आणि त्याची आई मंगी धणगरीण ऐसी होती. मग मुजावर व माळी व धणगरीण ऐसे एक होऊन सूत केलें कीं बाबाजीराऊ मारावा आणि मुलें हि मारावी. ऐसें सूत

केलें. मग मंगी धणगरीण ईस पैके मुजावर यानीं दिल्हे कीं, हें काम करणें. मग मंगी धणगरीण त्यांचे पाळतीस लागली, आणि कुसवास कोपी बांधिली कीं लेकास निजावयासी बांधिली. आणि मग आंतोन सुरुंग कामाविला. आणि मंगी धणगरीण घरास आली कीं, लेकाचा विडा घालतें, कांहीं खर्चास देणें. मग बाबाजीराऊ बोलिले कीं कांहीं देतों. ह्मणऊन बोलिले. जे वेळेस धणगरीण पाळतीस गेली होती ते वेळेस बाबाजीराऊ पलंगावरी निद्रा केली होती आणि थोरला लेक पाळण्यांत निजला होता आणि धाकटा लेक बाइलेचे पुढें होता. ऐसें पाळून माघारी घरास गेली. तों मंगी धणगरीण ईस कोकणामधें पळविलें. आणिगे मग मारेकरी आले. तों धाकटा लेक पासोडीमधें गुंडाळून पलंगाखालीं टाकिला. आणि बाबाजीराऊ पलंगावरीच मारिला. मग थोरला लेक बोलिला कीं, म्या तुह्मास वळखिलें आहे, तुह्मीं मुजावर गांवातील आहां, तुह्मीं माझ्या बापास मारिलें. ह्मणऊन बोलिला. मग त्यांनीं त्यासी मारिलें. मग त्याची बाईल एके कोनीं लपाली होती ती मग धागटा मूल कुमाजीराव घेऊन चितळीस पळोन गेली. मग तेथें मूल दहा बारा वरसाचा जाहाला. मग त्यानें धणगरास धरून नेलें. तेव्हां तो धणगर बोलिला कीं, मुजावरानें मारिला. ह्मणऊन बोलिला. तेव्हां कुमाजीराऊ यानीं मागते पन्नास माणूस घेऊन परटिकींत आला आणि सुताराची थळी आणिली. आणि तिघा जणाच्या माना तोडिल्या. मग कराहाडच्या मुजावरांनीं पाळत लाऊन कुमाजीराऊ यासी धरून घेऊन गेले आणि परकोटांत नेऊन चिणला. तो तीन वरसें होता. मग त्यास सोइरीक माहादजी पाटील चरेगांवकर याची बहीण केली होती. त्यास माहादजी पाटील सोडवावयासी आला होता. मग त्यानें आपले हातीं घेतला. त्यास नागवाण बांधली व्होन साडे तीन हजार. त्याबद्दल देसमुखी अमानत ठेविली कीं, पैके द्यावे आणि वतन खावें, पैके न दे तरी देसमुखी व पटेलकी लेहून द्यावी. ऐसें जाहालें. मग त्यामागतें रस्त उचलावयासी इसाबखान देऊन

बाहेर घालविलें. ते कृष्णेचे कांठास आले. आणि कुमाजीराऊ बोलिला कीं, पैके कोठून द्यावे आणि वतन कोण्हाचें ध्यावें. ऐसें बोलिला. मग माहादजी पाटील बोलिला कीं, कैसें करावें ? ह्मणऊन बोलिला. मग तेऱ्हां माहादजी पाटील चरेगांऊकर कोंकणांत पळोन गेला. आणि कुमाजीराऊ चिगलीस पळोन गेला. मग तेऱ्हां इसाबखान मसुरास येऊन पैके उचलूं लागला. मग किलबुर्ग्यावरी व मुजूमबादेस पादछाव आले. तेथें त्यानीं तीन गुमट बांधिले. मग विजापुरास आले. तेथें हि कोट बांधूं लागले. तेऱ्हां देसमुखांसी व देसपांड्यांसी व पाटीलकुळकर्णीयांसी तलब केल्या कीं खोरीं कुदळीं घेऊन हुजूर विजापुरचा कोट बांधावयासी येणें. ह्मणऊन तलब केल्या. त्यास मग तेथें हुजूर गेले. मग तेथून मेरबानगी केली. पादछानीं देसमुखी व पटेलकीस हक्क चढविले. मग तेथून कुमाजीराऊ आले. ते बहुत अशक्त जाहाले. त्यांचा लेक नरसोजीराऊ दहा बारा वरसांचा होता. तो विजापुरास गेला. तेथें बापाचा मावळा हुजूर पादछायापासी चाकरीस होता त्यानें यासी हि चाकरीस प्याद्याच्या नाइकींत ठेविला. तीन वरसें होता. चौथे वरसीं बिबीस कळलें. तिनें विचारिलें कीं, कोण्ह जमीनघराचा आहेस ? मग नरसोजीराऊ बोलिला कीं, कुमाजीराऊ पटेल व देसमुख मसूरचे यांचा पुत्र आहे. ह्मणऊन सांगितलें. त्यास ते बोलिले कीं, तूं आण कां परागंदा जाहाला आहेस. ह्मणऊन विचारिलें. मग नरसोजीराऊ बोलिला कीं, तुरक दाप करून पटेलगी खातात. मग बिबीनें त्याचे मस्तकीं हात ठेविला कीं तूं कांहीं परागंदा होऊं नको. मग दुसरे दिवसीं माहालामधें पादछायापासीं नेऊन भेटविला. ते वेळेस पादछाव बोलिलें कीं, तुझें बरें करितों. मग ते च वेळेस त्यामागतें माहालदार देऊन त्यास बोलिला कीं, तुझी देसमुखी व पटेलकी खरी असली तरी गोताचा व देसमुखदेसपांडे व प्रगण्याचा माहजर करून घेऊन येणें. ह्मणऊन सांगातें एक चितळकर व आपले माहालदार ऐसे देऊन रवाना केले. तेऱ्हां पाटणास आले. पाटणकर बाबाजीराऊ यानीं माहाजर

करून दिल्हा कीं कराहाडची देसमुखी आणि मसूरची देसमुखी व पटेलकी नरसोजीराऊ जगदळे याची खरी. मग तेथून चरेगांवास आले. चरेगांवकर माहादजी पाटील यानें माहजर करून दिल्हा कीं, पटेलकी चेपरीकडे च देसमुखी आहे. तेथून कराहाडास गेले. कराहाडकरांनीं हि माहजर करून दिल्हा कीं जगदळ्याची च येथील देसमुखी खरी. तेथून मसुरास आले. नरसोजीराऊ बाहेर च राहिले आणि पादछाई माहालदार गावांत गेले. त्यांनीं बारा बलुते मिळवून माहजर केला कीं येथील जगदळ्याची देसमुखी व पटेलकी खरी. मग नरसोजीराव व माहालदार ऐसे माहाजर घेऊन विजापुरास गेले. माहाजर पादछायापासीं नेऊन दिल्हा. मग त्यानीं माहाजर पाहिल्यावरी बिबीस मसूर मोकासा करून दिल्हा. मग गांवाची खंडणी आधीं दिडासे व्होनाची केली होती. मोकासा जाहाल्यावरी दिडा हजारास गांव खंडला. त्याच्या रस्ता भरूं लागल्या. मग तुरकांनीं कोळविलांतील भुतें च्यार आणिलीं: एक रगतचंदन, एक चंदनाचें, आणि एक सिसव्याचें, आणखी एक. ऐसी च्यार आणिलीं होतीं. ते रस्तेमधीं घालून विजापुरास रस्त नेली. मग बिबीस वर्तमान कळलें कीं, तुमचे गांवीची रस्त आणिली आहे. मग ते बोलिली कीं, पागेंत ने ठेव. त्यास रस्त पागेंत घेऊन गेले तों पागेचा घोडा तेथें च मेला आणि खासदाराच्या आंगीं बोलूं लागलीं. तेव्हां पंचाक्षरी आणून, तो खासदार पंचाक्षरीक, तेव्हां तें भुतें बोलूं लागलीं कीं, आह्मीं कोळविलांतील आहों, आह्मास पानी देऊन आणिलें आहे, आह्मीं जातों, आह्मास माघारें लाऊन देणें. तेव्हां बिबी बोलिली कीं, एव्हढें केलें तुरकांनीं, जमीदाराच्या मुलाकारणें केलें. मग भुतांस कोंबडें व बकरें देऊन मजलेमजल घालविलीं. ते मसुरास आलीं. त्यामधलें एक खाल्या मळ्यांत राहिलें, आणि दुसरें ह्मसोबा होऊन लाडपासीं राहिलें, आणि तिसरें गाड्यांत बैसोन इनामाकडे कामेरखडास गेलें तें तेथें च राहिलें. आणि चौथें राहिलें तें गाडियांत घालून ठिकाणा घालविलें. मग विजापूरकरांनीं तुरकास तलब करून विजापु-

रास घेऊन गेले. तेथें तुरक बोलिले कीं, सोइऱ्याच्या नात्यानें माहाजर करून घेतले. तेव्हां नरसोजी बोलिले कीं, पडथळीस वेव्हारास लाऊन देणें. तेव्हां तुरकास व नरसोजीराऊ यांसी पाछायानीं मुंगीपैठणास लाऊन दिल्हें. जो खोटा होईल त्याची गर्दन मारूं, जो खरा होईल त्यासी वतनावरी नेऊन बैसवूं, ऐसें पाछाव बोलिले. त्यास ते दोघे जण थळास गेले तेथें साहा महिने राहिले. मग वेव्हारीं नरसोजीराऊ जगदळे खरे निघाले आणि तुरक खोटे जाहाले. मग तेथून तुरकास तलब करून पाछानीं गर्दना दोघा तुरकांच्या मारिल्या. मग विजापुरीं नरसोजीराऊ यांसी नागवाण साडे च्यारशे व्होन पडली. ते कबूल करून गावास आले. मग गावीं नागवाण फिटेनासी जाहाली. तेव्हां कुमठेकर मिळविले. तेव्हां देसमुखीचा कथळा तैसा च राहिला आणि पाटिलकीचा च कथळा वरला. तेव्हां साळसुध पाटेलकी खाऊं लागला. ते वेळेस बाजी घोरपडे पटेलकी लोकांच्या घ्यावयासी लागले. जे वेळेस भाडळेची पटेलकी घेतली ते वेळेस मसूरची पटेलकी चुखट ह्मणऊन घ्यावयासी उभे राहिले होते. आणि ते वेळेस जवळे कानोजी पिसळा होता तो बोलिला कीं, मज कुमक द्याल तरी मी पाटिलकी घेतों, माझा बाप भाऊ हि पडला आहे. ह्मणौन बाजी घोरपडे यापासी सांगितलें. तेव्हां तो बोलिला कीं तुह्मास मदत देतों, हें काम करणें. मग ते च वेळेस कानोजी पिसळ्याबराबरी कुमक देऊन स्वार जाहाला तो मसुरास येऊन त्याभोंवतें वेढे घालूं लागला. तेव्हां नरसोजीराऊ व कानोजी पिसळा ऐसे पायठणास गेले. तेथें दोघा जणांचा वेव्हार मांडला. तेथें रवा मांडला. तेव्हां कान्होजी पिसळा व नरसोजीराऊ हे दोघे जण आंघुळीस गेले. ते आंघुळ करून सभेस जातां च कानोजी पिसळा उलथून पडला. माघारे ठाणीं पडला. तेव्हां थळनाईक बोलिले कीं, खरा कीं खोटा? तेव्हां कानोजी पिसळा बोलिला कीं, खोटा. तेव्हां थळनाईक बोलिले कीं, तरी कैसा वेव्हारास उभा राहिला होतास? मग कानोजी पिसळा बोलिला कीं, मज बाजी घोरपडे यानीं वेव्हारास

उभें केलें होतें. सभेमधें लटके जाहाले. मग नरसोजीराऊ खरे होऊन गावास आले. त्यांचे पोटीं लेक दोघे जण जाहाले; तानाजीराऊ व सुलतानजीराऊ. तानाजीराऊ भोवानीच्या पाठीमाघे सेराच्या ताटव्यांत मारिला. मग सुलतानराऊ यापासून बहुत च बरें जाहालें. त्याचे पोटीं माहादजीराऊ जगदळे जाहाले. त्यानीं हि बरें च केलें.

---

लेखांक ३ श्री

हकीकत माहादजी वलद सुलतानजी जगदळे देसमूख परगणे मजकूर कदीम देसमुखी प्रा कऱ्हाडाबाद व पाा मसूर एथील देसमुखी कदीम होती. वडील भाऊ जगदेराऊ याचें वाटणी कऱ्हाड व धाकटा भाऊ रामोजी याचें वाटणीचें मसूर. दो हि परगणाची देसमुखी दोघे भाऊ करीत असतां वडील भाऊ जगदेराऊ यामधें व कऱ्हाडीचा नैबामधें कांहीं बोलीचाली होऊन कुसर पडला. त्यानें जगदेरायास दंड बांधला ते देवयास ताकती नाहीं. मग जगदेराऊ पळोन गेला. नैबानें कुल बिसादी लुटून खालसा केली. जगदेरायास हरामखोरी लावून देसमुखी अमानत केली. बखेर पादशाहास लेहून, अमानत करून, नेगोजी थोराता उंबराव याचे दुमाला केली. हा वजीर पादशाई चाकर होता. याच्या तनख्यांत दिल्ही. मसूर परगणाची देसमुखी देह सत्तावन आपले वडील करीत होते. जगदेराऊ बाहीर दावे करीतां मरोन गेला. त्याचें पोटीं संतान नाहीं. मग आपला वडील रामोजी व त्याचा लेक दयाजी हे बादूर पादशाहापासीं फिराद जाहाले. हजरत पादशाहानीं हकीकत मनास आणिली. तेव्हां पेसकसी दाहा हजार होन माथां ठेऊन कऱ्हाडीची देसमुखी कदीम होती ऐसें मनास आणून दुमाला केली. पेसकसीचे पैसे द्यावयास मौसर नाहीं. ह्मणऊन आऊंध तर्फेचे देहे २७ सत्तावीस लुखजी कुकजी यादव पादशाही मनसफदार होते त्यांस सत्तावीस गावीची देसमुखी देऊन, त्यापासी पैसे घेऊन, पेसकसी फेडिली. त्यावेरी थोरा-

तामधें व आपल्या वडिलामधें दावा लागला. तेव्हां मागती आपले वडील हजूर विज्यापुरास गेले. हुजूर नागोजी व बहिरजी नाहवी याचें अडिनांव यादव हे होते. यावेरी पादशाहाची मेहेरवानी होती. मग त्याची पाठी करून च्यारी गावींची त्यास देसमुखी दिल्ही. कडेगाऊ १ कोरेगाऊ १ टेंबू १ गोवारें १ ऐसे च्यारी गांव प्रा मजकुरीचे देऊन, त्याची पाठी करून, थोराताचा दावा दूर केला. त्याउपरी रताजी रूपाजी यादव यानीं आउंधीची देसमुखी करून पुंडावे केले. वणगोजी मुधोजीस मिळोन मुलखामधें राजीक केले. आणि वणगोजी मुधोजीस आणून कऱ्हाडीचा कोट त्यास घेऊन दिल्हा. मोठेमोठे सावकार लुटिले. पनाळापावेतों राजीक केलें. ते वख्तीं वणगोजी मुधोजी पुंड जाहाले होते. त्यांची सनद कऱ्हाडीचे देसमुखीची करून घेतली. तेव्हां यादवामधें व आमच्या वडिलामधें दावा पडला. मग आपला अजा बादूर पादशाहापासी फिराद जाहाला. पादशाहानीं रताजी रूपाजी बहूत तलब केला. ते हजूर न येत. मग त्यावेरी नामजादी करून रताजी रूपाजी जिवें मारिलें. ते वख्तीं देसमुखी अमानत करून रणदुल्लाखान याचे हवाला केली. मसूर परगणाची देसमुखी देहे सत्तावन गावींची चालत होती. याउपरी निजामशाहींतून शाहाजी राजे भोसले हे विज्यापुरास आले. पादशाहानीं मनसफ दिल्ही. ते वख्तीं यादवाचे भाऊबंद शाहाजीराजाकडे चाकर होते. त्यानीं शाहाजीराजास मिळोन देसमुखीचा करीना सांगितला जे, जगदळाच्या घरामधें कोणी नाहीं, जगदळाचें घर मोडिलें आहे, कऱ्हाडची देसमुखी आपल्याकडे केली पाहिजे, त्याचा आमचा दावा आहे. ऐसें सांगितलें. मग शाहाजीराजानीं पादशाहास अर्ज करून दौलतेचे भरीस देसमुखी कऱ्हाडची मागोन घेतली. मग आपला आजा नरसोजी हा मसूरपरगणाची देसमुखी व कसबाची पटेलगी आपला वडील करीत असतां, शाहाजीराजे भोसले यांस यादव मिळोन देसमुखी कऱ्हाडीची शाहाजीराजाकडे केला. हें वर्तमान आयकोन करनाटकामधें बेंगरुळास आपला आजा

नरसोजी जगदळा गेला. तेथें शाहाजीराजाची भेटी घेतली. त्यास कऱ्हाडीचे देसमुखीची हकीकती सांगितली. ते वख्तीं यादव व शाहाजीराजे यांनीं विचार करून दगा देऊन आपला अजा नरसोजी जगदळा मारिला. आपला बाप व आपला चुलता होता. त्याउपरि शाहाजीराजानीं पिसळे ह्मणून एक महराटे चाकरीस ठेविले होते त्यास लावून देऊन मसुरीचे मोकदमीवरी दावा करविला. आणि मसूर परगणा शाहाजीराजानें जाहागीर घेतली. आणि मसुरीच्या कोटामधें आपलें ठाणें ठेविलें. ते वख्तीं पिसळयास लावून देऊन मसुरीची पटेलगी व देसमुखी अमानत केली आणि दादाजी कोंडदेऊ शाहाजीराजाकडील सुभेदार त्यास सांगोन पिसळयास व आह्मास गोत लावून दिल्हें जे परगणे पाटणीचे स्थळीं खाने अजम लाडीखान हवालदार कऱ्हाडीचा व पाटणीचा एकच होता त्यानें मसूरपरगणाचे पाटील व हक्कजवारीचें गोत व कसबे मसूरीचे बैते बलूते ऐसे मेळवून पिसळे व आपला चुलता व आपला बाप यापासीं जमान घेऊन गोतानें निवाडा केला कीं जगदळेयाची मसूरपरगणाची देसमुखी व कसबाची पटेलगी खरी असे. ह्मणोन गोही दिल्ही. व कदीम भोगवट्याचे कागदपत्र फर्मान होते ते मनास आणून पिसळे खोटे केले. तेव्हां पिसळे बोलिले कीं, आह्मास भोसल्यांनीं व घोरपड्यांनीं स्थळीं उभें केलें, आपण भोसल्याचे चाकर असो, आपल्यास मोकदमीसी कांहीं समंध नाहीं. ऐसें यजितपत्र लेहून दिल्हें. तेणेप्रमाणें लाडीखान हवालदारानें हक्कजवारीचे साक्षीनसी माहजर करून दिल्हे. ते वख्तीं देसमुखी व पटेलगी पनाळा अमानत होती. मग आपला चुलता तानाजी हा सुलतान महमूद पादशाहा यासी जाऊन दुमाला फर्मान करून घेतले. पनाळाच्या किल्लेदारास ताकीद घेतली. त्याउपरि भोसल्यानीं ठाणांतील लोक काढून पिसळ्याचें नांव सारून आपला चुलता तानाजी जगदळा जिवें मारिला आणि मागती देसमुखी शाहाजीराजानीं आपल्याकडे घेतली. आपला बाप पटेलगी करून होता. आपला जीव वांचवून देसमुखीचें नांव काढिलें नाहीं.

त्याउपरी भोसल्याची जबरदस्ती देखोन आपला जीव वांचवून होते. त्याउपरि शाहाजीराजाचा लेक शिवाजीराजा जाहाला. त्यानें पुंडावा करून पादशाहासी बिघाड केला. ते वख्तीं आपला बाप पादशाही फौजास मिळोन देसमुखीचा मजकूर करून देसमुखीचा हक्क घेऊं लागला. अबदुलखान हा जाउलींत बुडविला, तेथें भोसल्याच्या सरदारांनीं पाळत करून वसंतगडीहून स्वारी जाऊन, तें ठाणें घेरून, आपला बाप दस्त करून, वसंतगडास आणिला, आणि त्याची गर्दन मारिली. ते समयीं आपलें नेणतपण होतें. आपण धाकुट होतों. मग आपली आई व आपण पळोन सातारास गेलों. तेथून आपली आई राजगडास जिजाई आवा, शिवाजीराजाची आई, तापासी गेली, कीं माझें च वतन घेऊन आपले तीन खून केले, आपले पोटीं एक मूल आहे, त्यास कौल दिल्हा पाहिजे. ते वख्तीं शिवाजीराजे बोलिले कीं, देसमुखी गोष्टी न करावी, कौल च आहे, देसमुखी गोष्टी न काढावी. ऐसें लिहिलें आपले आईपासून घेतलें कीं पटेलगी करून असावें. ऐसा कौल घेऊन, मग आपले आईनें नेऊन शिवाजीराजास भेटविलें. त्यांनीं वेंकाजी दत्तो याचे हातीं देऊन, पटेलगी दुमाला करून, मसुरास पाठविलें. मसुरीची पटेलगी करीत होतों. तों पुढें कितेक दिवसा शिवाजीराजे मृत्य पावले. त्यांचे लेक संभाजीराजे राज्य करूं लागले. त्यांस जाऊन भेटोन अर्ज केला कीं, साहेबीं कऱ्हाडची देसमुखी घेतली, मसूरींचें तरी देसमुखीचें वतन आपलें आपले दुमाला करणें, बाज गुन्हाई माझें वतन घेऊन माझे तीन खून केले आहेत, तरी त्या खुनांचा वाटा तरी मसूरीचें वतन तरी तेवडें दुमाला करणें, काऱ्हाडची नांवगोष्टी काढणार नाहीं. ऐसें लेहून दिल्हें. मग संभाजीराजे मेहरवान होऊन मसूरपरगणाची देसमुखी दुमाला करावी ऐसें केलें. काम होऊन यावें तों एसजी फर्जंद याचे हवाला देसमुखी केली. मग त्याचें आर्जव करून, मग एसजी फर्जंदानें अर्ज करून देसमुखी दुमाला करविली. तों सवें च संभाजीराजा धरून नेला. राजाराम पळोन चंदीस गेला. त्याचे

सरदार संताजी घोरपडा व धनाजी जाधव यानीं मागती इकडे ढोहणा केला. मग आपण वाईस जाऊन नवाब न्याहरखान साहेबास भेटलों. त्यापासून पन्नास स्वार व पन्नास प्यादे मागून घेतले व आपण कांहीं स्वार-प्यादे ठेविले आणि मसूरीचें ठाणें बळाविलें. ते वख्तीं हजरत शाहाजादे अजमशाहा पनाळेवरी मसलतीस चालिले. त्यांस भेटोन इलतमेस गुद-रोन अर्ज केला. त्यांनीं हि आपलें निशान-फर्मान करून दिल्हा. नवाब रोहिलाखान यांनीं हि आपला परवाना करून दिल्हा. तुळापुरीं ज्याहांपन्हास अर्ज करून जानसारखान फौजदार पा। खटाऊ यावरी हुकूम घेतला. याउपरि साताराचे मसलतीवरी सर्जाखान आले. त्यांनीं सातारास वेढा घातला. न्याहारखानाचे वाईंचें ठाणें तहगीर जाहालें. तेव्हां मसूरींचें हि व रहिमतपुरीं होतें तें हि उठोन गेलें. मग सर्जा-खानास जाऊन भेटोन, सर्जाखानाचे पन्नास स्वार व पन्नास प्यादे व त्यापासीं शेख अजमतुला ह्मणौन ठाणेदार मागोन घेतला. ते वख्तीं संताजी घोरपडा व धनाजी जाधव येऊन साताराचा वेढा उठविला. सर्जाखान सुटोन आले. गनीमानें मसुरास वेढा घातला. ठाणेदार राती करून निघोन गेला. वाई, बुध व खटाऊ ऐसी ठाणीं टाकून गेले. कोठें आसिरा नाहींसारिखा जाहाला. बिन आसिराविण आठ रोज गांव भांडविला. मग त्यांचा कौल घेऊन त्यांस भेटलों. त्यानीं धरून वसंतगडास नेलें. नागवण बांधिली. मग आपला लेक सुभानजी हा त्यांपासीं कैल ठेवून सुटोन आलों. पैका देवयास तारा नाहीं ह्मणोन चंदीस राजारामापासीं गेलों. त्याचें आर्जव करून लेकाची सुटका केली आणि देसमुखी दुमाला करून घेतली. फिरोन माघारा आलों. आपली देसमुखी करीत असतां, धनाजी जाधव याचे निसबतीचे पदाजी व पिराजी यादव याचे लेक व हे हजारी पंचहजारी चाकर होते यानीं व धनाजी जाधवानें मागती आपणासी कथळा केला. मग आपण नवाब हमीमुद्दीखान याकडे खटावास जाऊन अर्ज केला. त्यांनीं हजूर लेहून रा। मंबाजीपंत राजे याचें ठाणें दिल्हें. मग मसू-

रीची गढी तयार करून गनीम जेरजफत करून ठाणा होतों. मग हजरत अलमगीर साहेब मिरजेस आले. सातारावेरी मोहीम केली. ते वख्तीं मंचंद्रापलीकडे नवाब तरहतखान याचे मारफतीनीं भेटी घेतली. वसंतगडास येऊन दरवजानजीक मूर्चा लावून, गडकरी दबाबून, गड सलुयास आणून दिल्हा. तेथून लष्कर साताराखालें गेलें. तेथें हि मूर्चाखालें साहा माणूस आपलें कामास आलें. ते वख्तीं बशर्ते जमीदारी, सीसदी मनसफ, संभेरी स्वार, ऐसी मनसफ राजश्री बापोजीपंत याचे मारफतीनें दिल्ही, व जमेदारीचा परवाना आरसखान दिवाण याकरवे देविला. त्यानीं परवाना द्यावा तो ते ठिकाण पोहोचले. तें काम तैसेंच राहिलें. व रामराजाच्या लेकांनीं तजवीज करून धनाजी जाधव यास सांगितलें कीं, कऱ्हाडची देसमुखी भोसल्याची ऐसें कळलें ह्मणजे पादशाहा खालसा करितील, तरी पदाजी व पिराजी यादव यांसि पाठवून कऱ्हाडचे देसमुखीवरी ठेवणें, जे पैसे लागतील ते त्यास पुरवणें. ऐसी हुन्नरवंदी करून, पदाजी व पिराजी यादव हे कऱ्हाडीं ठेविले. जो टका लागतो तो धनाजी पुरवितो. याउपरि पिराजीचे दोघे लेक, एक सरूपजी व दुसरा सुभानजी, हे गनिमाकडे पंचहजारी करीत. यानीं आपलीं घोडीं धनाजीपासीं ठेवून कऱ्हाडाबादेस आले. व पदाजीचे दोघे लेक, डोंगरोजी एक व दुसरा अंबोजी यादव. डोंगरोजीनें आपलीं घोडीं व आपली पंचहजारी ऐसे आपल्या भावाचे हवाला करून, आपण हि एक महिना होईल, कऱ्हाडास आला आहे. व पदाजी यादव याचा भाऊ गिरजोजी यादव हा राजारामाच्या लेकापासी दिवाणगिरी करीत आहे. ऐसे गनिमाकडे राहोन, मोगलाई लुटोन आणून धनाजी व यादव मजसी दावा करीत आहेत. हमेशा चोर घालून, पादशाही लष्करांतून घोडीं सोडून नेऊन, गिरजोजी यादवापासी पाठवितातिं. हें कोणी पादशाहीमधें मनास आणितील तरी बजिन्नस चोर च धरून. हालीं धनाजी जाधव यास लावून देऊन माझ्या परगणाचे दोनी च्यारी गांव मारून नेले. पादशागडी जतन होवी ह्मणौन चाळीस

पन्नास स्वार से सवासे प्यादा हमेशा बाळगीत आहे. राणोजी घोरपडा त्यास लावून देऊन मसुरास वेढा घातला. तो हि वेढा राणोजी घोरपडयाचा मारून काढून दूर दफे केला. व राजश्री मंबाजी राजे हे ठिकाणीं पोहोचले. त्याचे तर्फेचे ठाण्यांमधें लोक होते ते कुल निघोन गेले. मग आणिखी लोक ठेवून व आपले पदरींचे स्वार व प्यादे होते ते ऐसे मिळोन तीन च्यारी से माणूस, त्यांच्या पोटाकारणें च्यारी हजार रुपये सावकाराचे कर्ज काढून अडीच महिने ठाणें जतन केलें. धनाजी जाधव याचा भाऊ शिवाजी जाधव व लिंगोजी माना ऐसे येऊन वेढा घातला. तो हि वेढा मारामारी करून उठविला. तों सवेंच धनाजी जाधव व यादव पदाजी व पिराजी ऐसे ठाणावेरी आले. तेव्हां जरूर जाहालें. लोकांस कांहीं द्यावयास नाहीं. मग मिर्जा यारअल्लीखा साहेबास टाकोटाक लिहिलें. त्यांनीं खाने अजम यासीनखान यासी हुकूम केला. मग त्याची मदती आली. त्यांनीं व आह्मीं धनाजी हि वाटे लाविला. ऐसी खस्त पादशाहीमधें केली. त्याचें नांवरूप जाहालें नाहीं. मजपासीं पैके नाहींत. पैके असते तरी अवघें च बरें होतें. गनीम असतां कऱ्हाडामधें देसमुखी करीत आहेत. त्यापासीं पैके आहेत. व जें लागेल तें धनाजी जाधव पुरावा करीत आहे. ऐसा अंधेर कारभार पादशाहीमधें. कोणी मनास आणीत नाहींत. पैके पावले ह्मणजे एकाचें वतन एकास देतील. आतां माझी देसमुखी घेऊन धनाजीस देणार आहेत. कऱ्हाडचा देसपांडे यास धनाजी जाधवानें पंधरा हजार रुपये देऊन मजसी भांडावयास लाविला आहे. माझी कोणी दाही देईल तरी इतकें खरें करून देईन. ऐसी हकीकती आहे. विदित जाहाली पाहिजे.

---

**लेखांक ४**

१ बएस तहरीर सीतूर आं की बतारीख ६ + + + + + + + +
२ वाला आं की छं मजकुरीं पाहिल्याया बारा बाो + + + + + + +
३ व सुलतान माने व संकरा यादव बिरादर + + + + + + + + +

४ पाा कराडाबाद व मल्हारी थोरात वगैरे + + + + + + + + +
५ हजार स्वार व पाचशे प्यादे बारकंदाज ठाणे म + + + + + + +
६ हरामखोर घेउनु जात होते. यावरी जमालखान व सी + + + + +
७ दस्तगाह कृष्णराऊ ठाणेदार व सुभानजी वाग + + + + + + +
८ देसमुखाचे फरजंद बजमीयतीनें बाहीर निघाले ए + + + + + +
९ सी मुकाबिला केला. लढाई करारवालाई जाली. ज + + + + +
१० थोडी होती याबद्दल पाहाडीचा आसरा धरून जगला तेथें
११ गनीमांहीं दोन फौजा केल्या. एक फौज नाइखा वगैरे कडे पाहाडीस घेरा
१२ घातला. व दुसरी फौज कसबेमजकुरावरी एउनु करूं लागली
१३ त्यावरी माहादजी देसमुख कसबियाबाहीर एउनु लडाईंत + + +
१४ व गोळी व शमशेर ऐसी जंग केली. यावरी मुफसदांहीं सी + +
१५ खाउनु निघाले. आनी दोन्ही फौजा एका ठाईं होउनु + + +
१६ गीर्द बगीर्द घेरा घातला. आनी लडाई थोर जाहाली + + + +
१७ गनीमाकडील मल्हार थोरात नासारदार जिवें च मारिला व कितेक
१८ गनीमाकडील लोक जायां जाले, जखमी जाले व मारले गेले सकाळ+
१९ पासून तों तिसरे पाहर पावेतों जंग करारवालाई जाली. यावरी
२० सुभानजी व संभाजी पिसर माहादजी देसमुख यासि
२१ गोळीची व भाले व तरवारचेया जखमा लागल्या होत्या. कामास
२२ आले. व कितेक स्वार बिरादरीचे व प्यादे बरकंदाज मारले गेले. व कितेक
२३ जखमी जाले. यावरी जमाल महमद व सीवराई नायबानें थानेदारमजकूर
२४ व एसोजी व शामजी पिसरानें माहादजी देसमुख पाडाऊ जाले. यावरी
२५ फौज नासरदार तेथून स्वार होउनु कसबेमजकुरानजीक एउनु राहिले.
२६ दुसरे रोजीं नासरदारांहीं ठाणें खालीं देखोन कसद ठाणी घे–

२७ याचा केला. तयार जाले. त्यावरी माहादजी देसमुखें विचार केला कीं
२८ ठाणें पातशाही हातींचें जातें. आपल्या लेकाच्या लोथावरी
२९ पाय देउनु, ठाणी बाहीर एउनु लडाई करारवालाई केली. अज एकबल
३० पातशाही मुफसद नासरदार यांसि तंबी केलें. ( करारवालाई केली ) यावरी नासर–
३१ दार रूयेशा होउनु कराडाबादेकडे कुच जाले. ठाणेमधें सुभान
३२ बिरादर सरूप व कृष्णा पिसर पदा देसमुख कराडाबाद
३३ मुफसदाजवळी एउनु भेटले व करू यादव नासरदार याचा
३४ भाऊ यासी सांगाता घेउनु, कराडाबादेस घेउनु गेले. आपल्या
३५ घरास नेउनु मेजवानी दिली. यावरी सरूप व पदाजी देसमुख
३६ याचे लेक नासरदारासी मसलत केली. माहादजीचे

( अपूर्ण )

---

**लेखांक ५** **श्री**

नवाब बहादूरखान
साहेब

६) सो॥ ताईजी व अनसाव व मानावा व साखराम यास प्रती क्षेम आलिंगण रामराम विनंति येथील क्षेम ता २२ रजब. तुह्मीं आपलें क्षेम लिहित जाणें. विशेश. तुह्मीं पत्र पाठविलें पावोन वर्तमान कळों आलें. तुह्मीं लिहिलें होतें त्यास आजी तागाईत दूर करनाटकांत होतों. हालीं नजदीक आलों असों. तुमचे कामास अर्ज करून फैसल देऊं. कांहीं फिकिर न करणें. तुह्मीं खातिरजमा असणें. एथें आलियावर हिंदळेचा लावसा जाहाला आहे, याकरितां यास

जवाब देऊन पाठविलें आहे. मोकरर ठिकाणें जालियावर तुमचें काम होईल. कांहीं चिंता न करणें. तुमचे भेटीची अपेक्षा आहे. तर एकदाचें भेटी घेणें. बहुत काय लिहिणें हें विनंति.

---

**लेखांक ६** **श्री** **१५३२ माघ शुद्ध १०**

तालीक

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥

॥ श्रीसिद्धेश्वर साक्ष ॥

॥ श्रीगोदावरी साक्ष ॥

बिहुजूर दावलखान
हवालदार

महजर स्वस्ति श्री शके १५३२ वर्षे सौम्यसंवत्सरे माघशुध दसमी सोमवार तद्दिनीं जाहाला माहाजर स्थल कसबे प्रतिष्ठान गोदावरीसन्निध वेव्हारप्रवीण धर्माधिकारिणी हरीपाठक व माणिकपाठक यानीं निर्णय महजर केला ऐसा जे: अग्रवादी नरसोजी जगदळे देशमुख तपे मसूर व पाटील कसबेमजकूर परगणे कऱ्हाड व पश्चमवादी बापाजी बिन याकुबजी मुसुलमान सेकीन यां उभयतांमध्यें कसबे मसूरचे पटेलगीचा गर्गशा देणियाबद्दल लागला होता. याबद्दल इदलशाही विलायतीमध्यें येकदोन थळें केलीं व हजूर हि पादशाहा जगद्गुरु यानीं मनास आणून फर्मान करून दिल्हा व हजरत आली पातशाहा विजयापुरीं होते त्यांचा फर्मान व बरीदपादशाहा याचें फर्मान ऐसे व थळींचे कागद ऐसे मलिकीनींस दिवाणअल्ला यांचे पत्र ऐसे लाखोटे करून बराबरी दावलभाई माहालदार देऊन व हवालदार दावलखान यांस मलिकिनिंस दिवाणआला यांचें पत्र ऐसे लाखोटे होते कीं उभयतांस

कसबे मसूरींचे पटेलकीसंमधें गर्गशा आहे कीं बापाजी मुसुलमान यानें अर्ज केला कीं आपणास दूरस्थळास पाठविणें, परस्थलीं निवाडा होईल त्यास आपण राजी, हक्कजवारीचा निवाडा जो जाहाला तेथें जगदलेयाची पाठी राखताति, आपल्यास दूरस्थल दिल्हें ह्मणजे तेथें निवाडा होईल त्यास आपण राजी. मग याकरितां उभयतांस तुमच्या स्थलास पाठविलें आहे. ये प्रांतीं निवाडे जाहाले व पुराणे कागद व फर्मान व निवाडेयाचे महजर जगदळेयापासीं होते ते हुजूर मनास आणून उभयतांचा निवाडा येथें च करावा. परंतु बापाजी मुसुलमान याणें थळ मागितलें याकरितां मोहिबांचें थळ दिल्हें आहे. प्रतिष्ठान थोर जागा आहे. हमेषा निवाडे होताआहेत. न्यायनीति बरी होते याजस्तव उभयतांस तुह्मांजवळी पाठविलें आहे. ऐसें पत्र मलिकइनिस मोकासाई यानीं खाने अजम दावलखान हवालदारांस उभयतांनीं पत्र आणिलें. मग तिहीं मनास आणून आपणांस बोलावून निरोप दिल्हा कीं कसबे मसूर परगणे कऱ्हाड तेथील वेव्हार आहे, विज्यापुरीहून पत्रें घेऊन आले आहेत. तरी तुह्मी धर्मतः निवाडा करणें. ह्मणऊन निरोप दिल्हा. यावरून मग यांस धर्मचौथरियावरी नेऊन सभा करून उभयतांची उत्तरें मनास आणितां अग्रवादी नरसोजी बिन कुमाजी जगदळे यानीं तकरीर केली कीं: आपला वडील आजा बाबाजी तपे मसूरची देसमुखी व कसबांची पटेलकी करीत असतां आपला अजा यास दोघे पुत्र वडील विठोजी धाकटा कुमाजी निपट लहान होता. ऐसे आपल्या वतनावरी असतां कसबे मजकुरीं पीर जलालुद्दीन आहे. याचा किताब कीं मुसुलमानाचा परि आणि हिंदूंचा वरि. तेथें उजवे बाजूस हिंदूंनीं खैरात करावी, डावे बाजूस मुसुलमानानीं कंदोरी करावी. ऐसा दंडक पुरातन चालिला आहे. व इनामती व बाजे जे मिळकत ते दो ठाईं घेऊन हिंदूनीं अतीत–अभ्यागतास खर्च करावा, मुसुलमानानीं फकीरफकरांना खर्च करावा. ऐसें असतां, तपांचे मुसुलमान मिळोन मुजावरास बळ देऊन ते पद्धति मोडिली. मग आपल्या

अज्यानें मुजावरास दटावून सांगितलें कीं महत् कदम जें चालिलें आहे तें चालों देणें. ऐसी ताकीद केली. तो च कुसूर धरून दोघ चौघ मारे-करी मेळवून आपला अजा व आपला चुलता यास मुजावरांनीं जिवें मारिलें. आपला बाप कुमाजी हा धाकटा होता. मग आपले अजीनें माहेरास नेऊन वाढविला. वतनास मुतालीक देऊन आपला बाप आपल्या अजीनें माहेरीं च ठेविला. पोरका होऊन वतनास आला. मुजावरांनीं आपले वडील दोघे जण बाजगुन्हाई मारिले ते तिघे मुजावर आपल्या बापानें मारून सूड घेतला. त्यावरी अबदल हुसेन यानें तलब केली. आपला बाप भेटला नाहीं. बापाजी मुसुलमान याचा बाप याकूब हा कऱ्हाडचा बागवान बख्तवार असे. आपले गांवीं देवघेव करीत असे. गैरहंगामी रयतांस पैके लावून मारामारी करूं लागला. मग आपल्या बापानें त्यास ताकीद केली कीं काय तुझें देणें असेल तें हंगामसीर घेणें. ऐसी दोघांसी बोलाबोली जाहाली. रयतांस निरोप दिल्हा. कऱ्हाडिचा नेब याच्या लेकास याकुबाची लेकी दिल्ही होती. त्याची पाठी करून, आपल्या बापाची पाळती करून, धरून कऱ्हाडास नेले. आपलें घरदार वस्त-भाव लुटिली. व मुजावरांस मारिलें तो हि कथळा माथां ठेविला. देश-मुखी व पटेलगी अमानत केली. आपला बाप तीन वरसें बंदखानीं होता. मग चरेगांवीचा माहादाजी पाटील यानें कऱ्हाडास जाऊन रदबदली केली. मग नेबानें आपल्या बापाचे माथां खंड होन साडेच्यार हजार करार ठेविला. तीन हजार होन द्यावे पटेलकी सोडवावी, ऐसा तह करून, जमान घेऊन, याकुबास बराबरी देऊन मसुरास रवाना केले. मग आपला बाप वाटेहून पळोन गेला. त्यावरी देशमुखी व पटे-लकी अमानत केली होती तिचे कमावीस याकुबाचे हवाली केली. त्यावरी याकुबानें कुफराना केला कीं आपले समंधी मुजावर मारिसे व आपलें देणें होतें तें देऊं दिल्हें नाहीं. ह्मणऊन नेबापासून पटेलकी दुमाला करून घेतली. देशमुखी अमानत राहिली. ऐसें सख्तीनें बख्त-वारीच्या बळें जोरावारी केली. त्यावरी आपला बाप वृध जाहाला होता

तो मरोन गेला. मग आपण जगद्गुरु पातशाहापासीं उभे राहिलों. पातशाहानें अंबरखानापासीं मुनसीफी दिल्ही. त्यानीं निवाडा केला कीं, साडेच्यार हजार होन दिवाणांत खंड बांधला, तुज काय समंध, ऐसा निवाडा करून दूर केला. मग आपल्या बापास रजा फर्माविली कीं, दिवाणांत खंडकतबे पडिले ते सुटत नाहींत, खंडाचे पैके देऊन आपलीं वतनें दुमाला करून घेणें, याकुबास समंध नाहीं. ऐसा निर्वाह जाहाला. मग आपण खंडाचे पैके कबूल करून, अर्धी पटेलगी दुसरियास विकत दिल्ही, आणि दीड हजार तीन वरसांनीं होन दिवाणांत द्यावे आणि पटेलकी सोडवावी ऐसें केलें. त्यावरी सातपांच मुसुलमान हुजूरचे अकारीब यांची पाठी करून आपल्यावरी जुलूम केला. मग मलिकइ-नीस मोकासाई यानीं कऱ्हाडचें थळ दिल्हें तेथें हि मुसुलमान खोटा जाहाला. ते हि मुनसफी मनास आणून निर्वाह करावा त्यावरी बापाजी बोलिला कीं, कऱ्हाडीची मुनसफी पाठी राखोन केली त्यास आपण कबूल नाहीं, आपल्यास दूर थळ द्यावें. त्याजवरून साहेबाच्या थळास पाठविलें आहे. नागवण बांधोन दोनी वतनास खलेल केलें. आणिं मज च वेव्हारास हिंडवितो. तरी देवाचे ठाईं गोत माय बाप आहां. जो निवाडा तुह्मीं कराल त्यास आपण राजी असें. ऐसी तकरीर लेहून दिल्ही.

त्याउपरी बापाजी मुसलमान पश्चम वादी यानें तकरीर केली ऐसी जे आपले बडे सवगिरी करीत होते त्याचा देवघेव मसुरी होता रयतांवरी कर्जवाम होतें त्यास आपला बाप याकुबजी हा मागत होता ते मागों नका ह्मणऊन आपल्या बापास दटाऊं बाहेर घातले व मसूरचे पीरजादे याचें घरीं आपल्या बड्यांची बेटी दिल्ही होती तिचे दोघे बेटे व तिचा मर्द नरसोजीचा बाप कुमाजी यानें जिवें मारिलें मग आपला बाप कऱ्हाडास जावून अबदल्ल हुसेन नैब यास सांगितलें त्यांनीं तलप केली कुमाजीस धरून नेलें आणि त्यास नाग-वण बांधिली आणि जमान देऊन पळोन गेला मग आपल्या बापानें आपले आफळादीचें खुन जाहले ह्मणऊन दिवाणांत पैके कबूल करून


पटेलगी सोडवीली व आपले गांव निसबतीचें देणेंही देऊं दिल्हे नाहीं ऐसे पैके आपले द्यावें व आपल्या खुनाचा जाब करावा ऐसें हिसाबी कितावी आसतां धिंगायी करून थलोथल हिंडिवितो तरी तुह्मी गोत माय बाप आहां आपले देणें रास्तिक आहे व आपला खूनही रास्तिक आहे तुमचें थल थोर आहे धर्मता निवाडा कराल ह्मणऊन हें स्थल मागोन घेतलें हिंदू अगर मुसलमान ऐस न ह्मणावें वर हक निवाडा कराल त्यास आपण राजी असे ऐसी तकरीर लेहून दिल्ही याउपरी धर्माधिकारी यांनीं निश्चय केला कीं साक्ष कागदपत्र पाहावें मग जगदळियापासील कागद पाहिले तपसील आंबरखानानें निवाडा केला तेथेही जगदलियाची देशमुखी व पटेलगी करार करून मुसलमान दूर केला व कऱ्हाडी हि बापाजी मुसलमान दूर जाहला ऐसी थलपत्रें मनासी आणिली बहुता दिवसांचें वतन देशमुखी व पटेलगी जगदले याची पुरातन कदिम फमानी जगदेव-राव जगदाळा ब्राह्मण कऱ्हाडी-चा देसायी यामध्ये व मसूरकर यामध्यें वतनदारीचा कथळा होता त्यांच्या निवाड्याचे फर्मान होते ते मनास आणितां कदीम देशमुखी पटेलगी जगदाले याची त्याउपरी बापाजी मुसलमान बोलला कीं पिर जलालदीन हा पहिले हिंदु होता त्याचेच आपण होतो या करितां आपली मूंजावरकी होती ऐसें असतां आपला खून केला त्यावरी नरसोजी जगदाळा बोलला कीं आपला बाप व आपला चुलता काय निमित्य मारिला ऐसें गोतानें विचारावें मग गोतानें बापाजीस विचारलें कीं जगदाळीयाचे खून मुंजावरनीं काय निमित्य केले त्यावरी बापाजी बोलला कीं मुंजावराचें वतन हिरोन घेतले याबदल मुंजावरांनीं दोनी केले जगदाली यांनीं मुंजावर तिघेंजण मारिलें बेबुन्याद केली जाजति आपला एक खून द्यावा आणि आपले देणें द्यावें ऐसें नाहीं ह्मणेल तरी दिव्य करावें त्याउपरी बापाजीस धर्माधिकारी यांनीं विचारिलें कीं तुझें देणें कोणीं द्यावें गाव निसबतीनें देणें दिल्हें तेव्हां कुमाजीस पुसोन दिल्हे असेल तरी तुजपासीं कांहीं कागदपत्रक तब्रे असतील

ते दाखवणें तुझें काय देणें असेल तें देववूं परस्परें तुवां लोकास कर्ज दिल्हें गैर-हंगामी मारामारी करूं लागलास ह्मणून तुज ताकीद करून सांगितलें त्याकरितां तूं गळा पडोन थळास नरसोजी जगदळे यांसी आणिलें आणि आपला आपला खुन द्यावा ह्मणतोसी तरी मुंजावरानीं जगदळे याचे निरपराधें दोनी खून केलें एकएका खुनास आकरा आकरा खून द्यावें तेंही न करितां जगदळे यांनीं तीन खून घेतले ऐसे धर्माधिकारी बोलले त्यावरि बापाजी मुसलमान बोलला जे आपलें पैके गाव-निसबतीनें यावें होते कुमाजीस धरून आणिलें तेऱ्हां जे गाव-निसबतीनें पैके राहिले असतील ते द्यावें ऐसा नेम करून कागद लेहून दिल्हा आहे त्याउपरी नरसोजी जगदाळा बोलला कीं माराच्या भ्यानें आपल्या बापानें काय कागद दिल्हें असतील ते आपणास ठाऊके नाहींत तीन वरसें आपला बाप बंदखानी होता ते समईं नेबाचि पाठी करून सारा गांव नागविला ऐसें असतां याचे काय देणें असेल ते रुजू करून दिल्हें ह्मणजे आपण देईन उगाच झोंडाई करून गळा पडतो त्या उपरी बापाजी मुसलमान बोलिला कीं आपण झोंडाई करून गळा पडतो ह्मणतोस तरी दिव्य करणें तेथें खरा जाहलास ह्मणजे तुज व आपणास समंध नाहीं ऐसें बोलिला त्यावरी धर्माधिकारी यांनीं निश्चय केला कीं गोही साक्ष कागद-पत्र असतां दिव्य कैसें द्यावें मग सभानायकीं नेम केला कीं थोर ग्रंथ विज्ञाने-स्वर आहे तेथें पाहून निवाडा करावा मग धर्माधिकारीणीयानीं विज्ञानेश्वर ग्रंथ आणून पाहातां तेथें निघालें कीं साक्ष असतां गोही असतां उगेंच एकाचे गळा पडेल त्यास देहांत प्रायचित्त असे यदर्थीं ग्रंथींचा श्लोक ॥ यद्योकोमानुषी ब्रुयात्त दन्यो ब्रुयास्तदैव कीं ॥ मानुषी तत्र गृण्हि यान तुदैवी क्रिया नृप ॥ १ ॥ रातेपत्रे मृते साक्षे देशाश्च प्रलयंततः ॥ त्रिभिः स्तत्र न विद्यंते चतुर्थ दिव्य साधनं ॥ २ ॥ यावरुनि जरी दिव्य द्यावें ऐसें कोण्हास हि नउमजे साक्ष उपसाक्ष असतां कागद--पत्र असतां गळा पडोन तुवांच नरसोजी जगदाळें याचा बाप धरून नेऊन नागवण बांधिली आणि

वतनासही भ्रष्ट केला आणि आतां झोंडपणें नरसोजी जगदले याचे गला पडोन त्यास कष्टी केलें वतनास विक्षेप केला ऐसा तूं गुन्हेगार तुज देहांत प्रायश्चित द्यावें परंतु मुसलमानाची पादशाही आणि तूंही मुसलमान याकरितां क्षमा जाली मग नरसोजी जगदाळा बोलला कीं शास्त्रीं अन्यत्र ग्रंथीं बोलाव--यास समंध नाहीं मग धर्माधिकारिणी यांन्हीं बापाजी मुसलमान यास आज्ञा केली कीं तुझा निवाडा जाहला तूं खोटा जाहालास नरसोजी जगदाला खरा जाहला तूं आपलें येजीतपत्र लेहोन देणें मग बापाजी मुसलमानें नरसोजी जगदळा यासी यजीत-पत्र लेहोन दिल्हें कीं मसूरचे पटेलगीसीं आपणास बोलावयासी समंध नाहीं व आपलें देणें व खुनाचे लिगाड तुह्मासी कांहीं नाहीं इत-कियाउपरी तुह्मासी कथळा करून तरी दिवाणचे खोटे गोताचें अन्याई ऐसें यजित-पत्र खाने अजम दावळखान याचे हुजूर लिहून दिल्हें ऐसें जय--पत्र दिल्हें व सभानायकीं धर्माधिकारिणीं धर्मनीति--प्रमाणें नर-सोजी जगदाळें देशमुख तपे मसूर व पाटील कसबे मजकूर यासी जयपत्र महजर करून दिल्हा मसूरचे वतन बापाजी मुसलमानास अर्थाअर्थी बोलावयास समंध नाहीं हा माहजर सहि लेखन संख्यावोळी.

---

**लेखांक ७** **१५४२ भाद्रपद वद्य १**




कौलनामा अज दिवाण ठाणा तपे मसूर ता नरसोजी जगदळे देसमुख व पटेल कसबेमजकूर अज पुजा श्री सरस्वती सुा इहिदे

असरीन अलफ कारणे दिला कौलनामा ऐसा जे बापाजी मुसनमान यानें हिमातीच्या बळें दरम्यान कथळा करून कसबेमजकुराचे पटेलगीस दखल जाहला यावरून तुह्मी हुजूर जाऊन दिवाण आला मलिकइनीस साहेब हुजूर याचे खिजमतीस उभे राहून आपली कुल कैफती दखल करून बापाजी मुसलमान यासी हुजुरून तलब करून हुजूर नेला कुल हक जवारी माहाल दर माहाल याचे गोहीसाक्षीनसी बापाजी मुसुलमान दूर जाहाला हुजुरून तुह्मास कौल मऱ्हामत करून तुमची पटेलगी तुमचे दुमाला करविली व तपेमजकुरीची देसमुखीचा कारभार तुमचे हातून घेत जाणें ऐसा हुकूम ठाणियास हुजुरून खुदखत सादर जाहालें तपेमजकुरीची देसमुख व कसबेमजकुरीची पटेलगी जगदळियाची गोही शाक्षी मोझा मोकाबला रुजू करून दुमाला केली असे बरहुकूम खुद खत कसबेमजकुरीची पटेलगी व तपेमजकुरीची देसमुखी दुमाला केली असे बापाजी मुसुलमान यासी दखलगिरी करावयास गरज नाहीं कसबेमजकुरीं पटेलगी पिढी दर पिढी चालत आली आहे तैसें चालऊन आपला खातीरजमा राखोन देसमुखीचा कारभार करून अमलप्रमाणें आपला हकलाजिमा खाऊन कीर्दी माहमुरी करून शक न धरितां आपलें वतन चालविणें दरीं बाब कौल असे

तेरीख छ १४ माहे सौवल

शिक्का फारसी

हा खुद खत पा हुजूर

जैदी माहालदार

**लेखांक ८** **१५४३ माघ वद्य २**

फारसीशिक्का
पुसट

ॐ अज रखतखाने राजश्री अंबाजी राजे घाटगे दामदौलतहू बजानबे कारकुनान्ये व मोकदमानी ताा मसूर बिदानद सुा सन इहिदे सलासीन अलफ. बदल इनाम मौजे शहापूर तानाजी जगदळे देसमुख ताा मजकूर व पटेल काा मजकूर यानीं येऊन हुजूर मालुम केलें कीं, आपली देसमुखीचा इनाम मौजे शाहापूर सालाबाद चालत असतां दरम्याने माहालीच्या कारकुनानीं अमानत केलें, आपण मिरासदार, आपल्यावरी मेहेरबान होऊन मौजे मजकूर आपले दुमाले करविलें पाहिजे, ह्मणजे आपण कुल गांवगन्ना फिरोन लावणीसंचणी करून. ह्मणऊन अर्ज केला. बराई अर्ज खातरेसी आणून मौजेमजकूर देसमुखास कुलकानू कुलबाब इनाम दिला असे. तेथें कोणी दखलगिरी करावयासी गरज नाहीं. देसमुख मजकुरापासीं हरकी होन २०० दोनीसे घेऊन इनामतीचा गाऊ दुमाले केले असे. तेथें कोण्ही बिलाहरकती करावयासी गरज नाहीं. दर साला ताजा खुद्द खता उजूर न कीजे. तालीक लेहून घेऊन अस्सल खुदा + + देसमुखापासीं परतोन दीजे. पाा हुजूर. राा गोपाळपंडित

तेरीख १५ रबिलावल

मोर्तब
सूद

पोा छ २८ रबिलोवल. आवर्दे अबाजी कृष्ण
अफराद ठाणें ताा मजकूर

लेखांक ९ १५५१ कार्तिक वद्य २

॥ अज रखतखाने राजश्री आंबाजी राजे घाटिगे दामदौलतहू बजानेब कारकुनानी पटेल व मोकदमानि व रयानी का। मसूर ता। मजकूर पा। कऱ्हाड बिदानद. सु॥ सलासैन अलफ. अर्जदास्त छ ७ माहे रबिलोवल पा। छ १४ मिनहू पा। होउनु माल्मम जाहाली आहाली नफराई व मशाखती व कसबे व गावगन्ना लावणीसंचणीची खबर बहुत बयानवार लिहिली. एक ब एक हुजूर माल्मम जाहाली. व माकोजी घाटिगे तेहीं सदहूप्रमाणें बयानवार खबर लिहिली, त्या हि वरून माल्मम जालें. तूं दिवाण न्याहाईम व हलालखोर साहेबकामास तकसीर नाहीं. आपले कुणबिकीमधें राहात असौनु लावणी व उगवणी करणार ऐसें आह्मास माल्मम आहे. हालीं तुवा कोण्हता बेताल्लुक आंदेसा न करितां बेशक होउनु कसबामधें एउनु कसबा व गांवगन्ना मोकदमांस कौलुबोल देउनु मामुल करून लावणी उगवणी करणें. एक जरी याचे शक न धरणें. तुज ह्माकोजी घाटिगे जैसा कौलुबोल भाक भरवसा देतील तैसा आह्मास आहे. आह्मापासिं हर कोण्ही सांगेली ते गोस्टी आह्मीं आईकणार नव्हों, रह रास मनास आणितों, हें हि तुज कळलें आहे. पुढें हि तुझे कामावरून व हालतीवरून बहुत सरफराजी होईल. हालीं कोण्हे गोस्टीचें गुमान न धरणें. व खातीरजमा करून दिवाणकाम चालवणें. कौलु असे. तुझे बाबे नरसो दाभोधरें हुजूर हलालखोरी बहुत वजा सांगितली, त्यावरून माल्मम जालें. तू दाईम हलालखोर आहेसी. देसगतीचे बाबें लिहिलें तरी देसगतीचे सालाबाद जैसें चाललें असेली तेणें प्रमाणें सरंजामी होईल. पहिलें जैसें आमचें खुद खत सादर आहे, त्यासि जैसें चालिलें असेली तेणे प्रमाणें सरंजामी करून. तुवां कोण्हे बाबे आंदेसा न करितां गावास एईनें. ह्माकोजी घाटिगे व माहालीचे कारकून जैसें

सांगतील तो आमचा आहे. दिल, जाब, सिरपाव, तोरण, भेटीची सिस्त व विलातीची सिस्त करून दिवाण नफराई करणें

तेरीख १५ माहे रबिलोवल
रबिलोवल

शिक्का
फारसी

पै॥ छ २८ रबिलोवल
आवर्दे + + जी दरोजी अफराद
ठाणा ता। मसूर

---

**लेखांक १०** **श्री** **१६०६ पौष शुद्ध १०**

छत्रपती + + +

स्वस्ति श्रीराज्या + + + + + + + रक्ताक्षीनामसंवछरे + + + + + दसमी बुधवासरे साक्षपत्र हाजीर मजालसी स्थळ किल्ले रायगड

हंबीरराऊ मोहिते सेनापती

० श्री ०
मछिवमाहानु
भाव सेनाधीश
हबीरराव

सिदोजी बिन तुकोजी पाटील पोळ मौजे
कविठें पा। वाल्हे अर्जनीस हुजराती

( निशाणी नांगराची )

| | |
|---|---|
| शेसो बापूजी देसकुळकर्णी | सेकोजी बिन मतनोजी काळे देसाई |
| किले सातारा निविस्ते | वस्टलमालकर क़ा कोळे |
| बिलालराऊ | ( निशाणी नांगराची ) |
| अबाजी बिन धारोजी | अंताजी लक्षुमण दिा सबनिसी |
| जाधव पाटील मौजे | लस्करी हुजराती |
| परिंचे पाा पुणे | |
| ( निशाणी नांगराची ) | |
| माऊजी बिन चांदजी | केदारजी जाधव पाटील मौजे |
| सोनवणी पटेल मौजे + + + | पाचुंद पाा कऱ्हाड |
| पाा पुण्हें | ( निशाणी नांगराची ) |
| लिंगोजी पाटील कालगे | |
| मौजे वर्जे पाा कऱ्हाड | |
| ( निशाणी नांगराची ) | |

( निशाणी कट्यारीची )

शालवान शक १६०६ या विदमाने सटवोजी बिन बाबाजी भोंसले यानी लेहून दिल्हे साक्षपत्र ऐसें जे माहादजी बिन सुलतानजी पाटील काा मसूर याच्या बापभावाचा गाऊ मौजे सिरवडें ताा उंबरज त्या गावामधें आपण सेतें केलीं होतीं व मिरासीचीं सेतें पटेलमजकुराचीं घेतलीं होतीं व पटेलगीस कटकट केली होती त्याबदल माहादजी पाटलामधें वा आह्मामधें कुसूर पडोन मौजे कोणेगावामधें माहादजी पाटिलावरी आपण चालोन जाऊन गदर केली त्याकारितां माहादजी पाटील हुजूर एउनु राजश्री साहेबांपासि वर्तमान विदित केलें कीं त्यावरून साहेबीं आपणास हुजूर बोलाउनु आणून वाजीपुसी केली आणि राजश्री कविकलश छंदोगामात्य व राजश्री सरकारकून ऐसे सदरेस बसोन बर हक्क मुनसफी केली तेथें निर्वाह जाहाला ऐसा जें माहादजी पाटील काा मजकूर यावरी आपण गदर केली ते निरर्थक केली त्याचे सेताचा आपण

आवारा केला व त्याची वैरणी काडी नेली व त्यांची माळीची लांकडें आपण नेली व त्याची बिसाती अंगावरील नेली ह्मणाउन माहादजी पाटिलानें हुजूर विदित केलें तरी आपल्यापासिं तरवार १ व कोचकी १ व सेला १ ऐसें आहे तें आपण देतों वरकड माहालीच्या कारकुनाच्या विदमानें साक्षपत्र लेहून येईल तें आपण देऊन व सिरवडें तेथील पाटिलकीसि व त्याच्या सेतासि आपण कथळा नसता च केला होता तेथें पेस्तर कथळा कराव्या गरज नाहीं ऐसा निवाडा जाहाला याउपारि आपण जरी पेस्तर तेथील पटेलगीचा अथवा सेतांभातांचा व माहादजी पाटिलांसि कथळा करून तरी दिवाणीचा गुन्हेगार व गोताचा अन्याई त्यास आपणास अर्थे अर्थ समंध नाहीं हें आपले वडिलांचें इमान सही साक्षपत्र पत्र सही सही*

तेरीख ५ रबिलोवल

सुा खमस समानीन अलफ

---

**लेखांक १०½** **१६०४**

( पहिल्या ओळी गहाळ )

मौजे बेलवडे खुर्द

मौजे खुडोली निळेश्वर

मौजे उंबरज. विसाजी पटेल

दत्ताजी पटेल. ( निशाणी नांगराची )

हरी लिंगोजी कुळकरणी.

मौजे कोरटी

सगाजी बिन कुसाजी पाा

( निशाणी नांगराची ) दाा हरी गोमाजी कुलकरणी

---

* हीं दोन अक्षरें सटवोजी बिन बाबाजी भोंसले याच्या खुद्द हातचीं आहेत.

मौजे सिवड

| | |
|---|---|
| रुपाजी घा पटेल. | रुपाजी भोसले पटेल |
| येडोजी घा पटेल. | अंतो विठ्ठल व हरी |
| | मुगाजी कुलकरणी |

मौजे वऱ्हाडे

सताजी पटेल घाटिगे.

त्रिंबक लिंगोजी कुलकरणी.

( निशाणी नांगराची )

कृष्णाजी भोसले पटेल

मौजे अतीत

लाहाजी पटेल बिन बाजी पटेल

( निशाणी नांगराची )

लखमोजी बिन भानजी पटेल

नागोजी हणमाजी कुलकरणी

मौजे इंदोली

रंभाजी बिन गागजी पटेल

( निशाणी नांगराची )

शिवाजी चौगला

तानजी बिन जैतोजी पटेल

परस्थळ

शिदप्पा पटेल बिन दत्ताजी पटेल

का। रहिमतपूर

( निशाणी नांगराची )

सुा सलास समानीन अलफ कारणें जाहाला महजर ऐसा जे सताजी बिन भिवजी चव्हाण पाटील मौजे कोणेगाऊ व माहादजी बिन सुलतानजी पटेल जगदळे का। मसूर हरदू जण राजमुद्रा व देसक व गोत यां पासी एऊनु उभे राहिले आणि संताजी बिन भिवजी

चव्हाण पटेल मौजे कोणेगाऊ बोलिला कीं आपण कोणे–गावीचा पटेल मिरासदार पिढी दरपिढी वडील नांगराचा धणी आहे ऐसीयास गांवीचे पटेलगीचे बयान गाव आज रकम

मशाती जमीन चावर १२८१४
गैर मोा ठिकणे ६

ऐसीयास पटेलगीस तकसीमा ३

| | |
|---|---|
| आपण वडील | मालोजी व बाळोजी पाटील |
| आपणास तकसीम | हसीली तकसीम |
| चावर ठिा वरिले | चावर ४ |
| ४८१४ ६ | बहिरोजी व नरसोजी |
| पान मान माहार नांगर तश्रीफ | हसीली तकसीम |
| वडीलपण आपलें | चावर ४ |

एणे प्रमाणे तकसिमा आहेत पैको वजा बापभाऊ तकसीमदार २ एा चावर ८ बाकी आपणास खाशाखाली उरले

| | | |
|---|---|---|
| जमीन चावर | ठीा | पान मान तश्रीफ माहार |
| ४८१४ | ६ | नांगर वडीलपण कलम १ |

एणें प्रमाणें आपली वृत्ति आहे ऐसीयास या पैकी वजा देसकुलकर्णी पाा माा यास तिसरी तकसीम दिली

| | |
|---|---|
| जमीन | ठीा गैरमोा |
| १।१४ | २ |

बाकी आपणा खाली उरलें आहे

| | | |
|---|---|---|
| जमीन चावर | ठीा गैरमोा | वडीलपण पान मान महार |
| २।।। | ४ | नांगर कलम १ |

एणे प्रमाणे आपल्या खाशा खालीं उरलें आहे यास आपला चुलता विठोजी पाटील पटेलगी वडीलपण करीत होता तो मरोन गेला त्याचा लेक तोही दुकाळामधे मरोनु गेला आपण एकटाच उरलों आपणास खावयास नाही सेतभात करून पांढरी वरी असावे तरी

बैलढोर नाही या करिता      नाही अन्नाउदका विणें सुजोनु फुगोनु मरो लागलों आपले तकसीमदार बापभाऊ आहेत त्यांस ही आपण हटकिले ते ही आपणास कांहीं अनकूळ होतीना निराश्री जाहालों मग जरूर शरीररक्षणार्थ उपाये केला पाहिजे ह्मणऊनु माहादजी पटेल जगदळे का। मसूर हे थोर नाईक आहेत त्याचे मुळें आपले शरीर-रक्षण होईल ह्मणऊनु का। मसुरास जाऊनु माहादजी पाटिलाची भेटी घेतली व आपलें वर्तमान सांगितलें परंतु त्यांनीं मन घातलें नाही आपण कार्यवादी आपलिया कार्यानिमित्य जरूर त्यांचे अनुवर्जन करावें लागलें ऐसियास सातपाच येरझारा केल्या या वरून माहाद-जी पाटील मसूरकर यास भार जाहाला. मग बोलिले कीं तुझे पटे-लगी विणे आपणास गरज नाही. तूं जरूर गळां पडतोस तरी तुझा काय मफसूद तो सांगणे. मग आपण बोलिलों कीं आपला चुलता विठोजी पाटील पाटीलगी करीत होता तो मेला. त्याचा लेकही मेला. आपला बापही मेला. आपणास आधार नाही व खावयास नाही काळ कठीण पडिला. आपण नेणता आपणास अन्न देऊनु रक्षणें आपली सदरहू मिरासी पैकीं चावर एक १ एकाची. पटेलगी खाशाखालीं ठेऊनु उरले जमीन चावर

| चावर | ठीा | वडीलपण |
|---|---|---|
| १॥। | ४ | कलम १ |

इतके तुह्मांस आपण देत असें आपणास अन्न देऊनु वाचवणे ह्मणऊनु बोलिलों. तरी बोलिले कीं तुझे तकासिमे मधे तकसीम घ्यावी हे गोष्टी काही मधे होत नाहीं. पा। मारचे देसक व तुझे बापभाऊ यां विदमानें त्यास राजी करून देत अससील तरो जरूर. तूं गळां पडतोस ह्मणऊनु अंगीकार करून. ह्मणऊनु बोलिले. बाजद आपण देसकास भेटोनु त्यास वर्तमान सांगितले. आपले बापभावास ही सां-गितलें. देसक व आपले बापभावांनीं निरोप दिल्हा कीं आपले रक्षणार्थ आपले त      मधे विकितोस तरी विकी ह्मणऊनु त्यांचा

निरोप घेतला. आणि आपली तकसीम पैकी एक चावर वजा करूनु उरले

| | | |
|---|---|---|
| चावर | ठीा गैरमोा | वडीलपण |
| १॥ | ४ | कलम १ |

सदरहू तकसीम वडीलपण माहादजी पाटील काा मसूर यास विकत किमती होनु २० विसास खंडून दिल्हे व याचे क्रयपत्र देसक व आपले बापभावांचे साक्षीनें करून दिल्हे असे व ठाणा राजमुद्रा व देसक व गोत यांचा महजर करून द्यावयाची शर्त आहे ह्मणऊनु साहेबसदर व देसक पाा माा व गोत यां पाशीं आलों आहें. महजर करून द्यावयास आज्ञा केली पाहिजे. ह्मणऊनु अर्ज केला. बाजदसदर व देसक व गोत यांनीं मादजी पाटील मसूरकर यास लिहिलें कीं संताजी चव्हाण पाटील कोणेगाऊकर बोलतो तें यथार्थ आहे किंवा विपरीत आहे. मग माहादजी पटेल बोलिला कीं, संताजी पटेल बोलतो हें यथार्थ आहे. साहेबीं महजर करून दिल्हा पाहिजे. ह्मणऊनु बोलिला. बाजद संताजी चव्हाणाचे बापभाऊ व गावींचे बारा बलुते यांस विचारिलें. तेही बोलिले कीं आपले शरीररक्षणार्थ विकितो. तरी सुखी विकीना कां ? साहेबीं महजर दिल्हा पाहिजे. ह्मणऊनु बोलिले. या वरून महजर केला असे. संता बिन भिवजी पटेल कोणेगाऊकर वडीलपण व गावीचे तिसरे तकसिमेचा पटेल

| | | |
|---|---|---|
| मशाती चावर | गैर मोा ठिकणे | वडीलपण कलम पान |
| ४८।१४ | ६ | मान व तश्रीफ व माहार |
| पैकी वजा | | नांगर कलम १ |
| मशाती चावर | गैर मोा ठिा वसले | |
| २।१४ | २ | |
| देसकुळकर्णी पाा माा यास पहिलेच विकत दिल्हे | | हाली खाशा संताजी भिवजीनें खाशाखाली ठेविली |
| मशाती चावर | ठिा गैरमोा | चावर |
| १।१४ | २ | १ |

बाकी विकिले किंमत होनु २० यास खंडून दिल्हे खत कर्दे महादजी बिन सुलतानजी पटेल जगदळे काा मसूर

| | | |
|---|---|---|
| मशाती जमीन | ठिकणे गैरमौ | वडीलपणं पानमान |
| चावर | वसले | तश्रीफ माहार नांगर |
| १॥। | ४ | कलम १ |

एणे प्रमाणे माहादजी पाटील याने खत केले असे. सदरहू जमीन व वडीलपण याचा धणी पटेल माहादजी बिन सुलतानजी जगदळे काा मसूरकर असे. आतां संताजी बिन भिवजी चव्हाण पटेल मौजे कोणेगाऊ व मादजी बिन सुलतानजी जगदळे मसूरकर या हरदुजणांनीं समाजुगतीनें असावें मादजी बिन सुलतानजी पटेल जगदळे मसूरकर यांनीं सदरहूचे हक खाऊनु वडीलपण दिवाण–चाकरी करावी. संताजी बिन भिवजी यानें एक चावराची हसली तकसीम खाऊनु सुखी असावें. वडीलपण पानमान तश्रीफ माहार नांगर संताजी भिवजीस अर्थे अर्थ समंध नाहीं. हा महजर सही/

मोर्तब
सूद

खासा रुद्राजीपंत देसकुळकर्णी यासि दिल्हे जमीन चावर .॥१४ वगैरे मोइनी ठिकाणे २ दोनी त्या पासून फिराऊन मागोन घेतले. त्यास घोडा एक बापूजी सलाबतखानियापासून घेऊन सारंगा घोडा किमती होन १५० दीडसेयाचा कागद रुद्राजीपंताच्या दस्तुरें आलाहिदा असे

मोर्तब
सूद

राजश्री कोनेर रंगनाथ सरसुभेदार यास हरकी बाा होन १०० सेंभर दिल्हेयाचे अलाहिदे जाब आहेती. देसमुख व सरदेसमुख होन पंनास व देसकुळकर्णी होन पंचवीस. या खेरीज गावकरीयास व परगणियाच्या पाटिलास तश्रिफा दिल्हा होन सेंभर. एणे प्रमाणें माहा-

जर जाहाला. संताजी चव्हाण पाटील याकडे चावर एक राहिला तो हि चावर आणीक तीस होन घेऊन घेतला. या खेरीज त्याचा पोटखर्च जाहाला असे. एणें प्रमाणें माहाजर जाहाला सही

मोर्तब
सूद

---

**लेखांक ११ श्री १६०६ माघ शुद्ध ७**

पांच बंद रास

स्वस्ति श्रीराज्याभिशेक शके ११ रक्ताक्षीनामसंवत्सरे माघ शुध सप्तमी मंदवासर सभा विदमान

श्रीशंभुनर
पतिहर्षनिदान मोरे
श्वरसुत नीलकंठ
मुख्य प्रधान

लक्ष्मीनृसिंहभ
क्तश्रीनीररायाब्धि
सन्मणेः ॥ प्रल्हादव
र्धिनीमुद्रा प्रल्हादस्य
विजयते

० श्री ~
मछिव माहानु
भाव सेनाधीश
हंबीरराव

कारणें जाला निवाडा ऐसा जे माहादजी पाा जगदळा कसबे मसूर ताा उंबरज व संताजी पाा घाडगा मौजे सिवडे व मौजे वराडे ताा मार यामधें व सितोजी व सटवोजी भोसले यामधें कसबे मसूर

व मौजे कोणेगव्हाण व मौजे सिरवडे व मौजे सिवडे व मौजे वराडे ताा माार या गावीचीं सितोजी व सटवोजी भोसले एहीं धामधूम करून सेतेंभातें हिरोन घेतलीं व आणीक हि कितेक आवाडाव केली. याच्या कलमाचे कलम राजश्री कविकलश छंदोगामात्य व राजश्री सरकारकून एहीं सदरेस बैसोन निर्वाह केला बितपसील

किाा कलम सेत माहादजी पाटेल दिाा वाटेकरी पिकलें सेत हराजिनसी बिघे

५० मौजे कोणेगव्हाणें खासा माहादजी पाा

५० मौजे सीवडे बाा वाटेकरी

१००

एाा बिघे एकसे पैकी बाा कोणेगव्हाणें येथील पन्नास बिघे सटवोजी भोसलियानीं गुरें व सेरडें घालोन चारिले व बाा सिरवडें बिघे पन्नास कांहीं मालिस्त करून नेल्हे व कांहीं गुराकडून चारिले ह्मणोन माहादजी पाा याणीं विदित केलें यास सटवोजी भोसले यास यास विचारितां विदित केलें कीं दहा वीस बिघे आपले गुरानीं खादलें असेल ह्मणोन तकरीर केली यासि निर्वाह केला कीं देशाधिकारी व पारपत्यगार ताा माार यांस

किाा कलम माहादजी पाा याची पाचा आकणीची माळिव्याचा आकणीचा सोफा मौजे कोणेगव्हाणेंचा सटवोजी भोसलियाणें रात्रीचें येऊन जोरावारीनें मोडोन घेऊन गेले ह्मणोन माहादजी पाा याणें विदित केलें बिताा

| तुळया | खांब |
|---|---|
| ६ माळीच्या | १८ माळी |
| १६ सोफा | १२ सोफा |
| २२ | ३० |

| कड्या | हसणी |
|---|---|
| ३५ सोफा | १८ माळी |
| ६५ माळी | २४ सोफा |
| १०० | ४२ |

यासि निर्वाह देशाधिकारी व पारपत्यगार ताा माार यांस आज्ञापत्र ल्याहावें कीं ज्या सुतारांनीं माहादजी पाटेलाचा सोफा व माळी बांधली त्यास व ते समयीं जे भले

आज्ञापत्र सादर करावें कीं सटवोजी भोसले याणीं माहादजी पाटेलाचे सेत देखील वाटेकरी सदर्हू सेंभरा बिघियामधें चारिलें किती व मालिस्त करून नेले किती हे देसमुख देसकुळकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार व भले लोक ग्वाही साक्ष असतील यांला सफतपूर्वक आळस व कोसासि न करितां बरें चौकस मनास आणोन गाहीसाक्षीनें सेंभरा बिघियांपैकीं सटवोजी भोसलियाकडे मोझ्या मुकाबलियानें शाबीत होईल याची बेरीज जे हक्कहिसाबी होईल ते तपसीलवार बखेर सिकियानसी व ग्वाहीदाराचे साक्षीनसी साक्षपत्र हुजूर पाठवणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होय आण बदलामी न ये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहिणें एकूण कलम १

किा कलम माहादजी पाटिलावर सटवोजी भोसलियानें गुल केली ते समयीं आपले आंगावरील वस्ता नेल्या ह्मणोन माहादजी लोक असतील त्यास हि व णो असल त्याची हि साक्ष मनास आणोन सफत घालोन ग्वाहीसाक्षीनसी व मौजेमजकूरचे वतनदार यांचे विदमानें बरे चौकस आकस व कोसीस न करितां परनिस्ट मनास आणोन साक्षपत्र व सिकियानसी बखेर हुजूर पाठवणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमांचा निर्वाह होय आण बदलामी नये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहिणें एा कलम १

.किा कलम माहादजी पाा याचें सटवोजी भोसलियानें नेलें ह्मणोन विदित केलें

कडबा मौजे कोणेगव्हाण व काा मसूर एा सुमार बारा हजार १२०००

तुरीचे कुटाची व बाजे हरजिनसी कूट व लदई एक १

शाकर घराचा पाउसाळियाचा भारे सुमार २०० काा मसूरपैकीं

यास सटवोजी भोसले यांला विचारितां ह्मणों लागले कीं सातपांचशें कडबा नेला असेल वर-

पाटलें विदित केलें बिताा

| | |
|---|---|
| होन | तरवार १ |
| ११ पाा | कोचकी १ |
| ॥ निाा | सेला १ |
| ११॥ | पासोडी तांबडी १ |

कुडकिया देखील मोतें किाा

होन पाा १९ एाा जोडा १

यापैकीं सटवोजी भोसले कबूल जाले ते माहादजी पाटेलास देविले तरवार १ कोचकी १ सेला १

बाकी नामुकरद

| | |
|---|---|
| होन | कुडकिया जोड |
| ११ पाा | देखील मोतें १ |
| ॥ निाा | पासोडी तांबडी १ |
| ११॥ | |

चील नेलें नाहीं ह्मणोन तकरीर केली यासि निर्वाह देशाधिकारी व पारपत्यगार यास आज्ञापत्र लिहिणें कीं सदर्हूमधें सटवोजी भोसले याणीं काय नेलें असेल तें देसमुख देसकुळकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार यांचे गाही-साक्षीनसी बरें चौकस सफतपूर्वक मनास आणोन हुजूर लिहिणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होय आणि बदलामी न ये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहिणें एाा कलम १

यास निर्वाह माहादजी पाटि-लावर गुल जाली ते समयीं माहा-दजी पाटेलाचे आंगावर पासोडी होती की नव्हती याची साक्ष व कुडकिया मोतें कानीं होती की नव्हती व मोतें खरीदी कोठें केलीं ते किमत व नख्त होन पाा अकरा व निाा प्रताप माहदजीजवळ होते कीं नव्हते ऐसी सदर्हूची गोही-साक्षीनसी बरी चौकस मनास आणोन माहालिहून सिकियनसी

लग ........................ ०

लग ........................ ०

लग ........................ ०

लग ........................ ०

लग ........................ ०

लग ........................ ०

| | |
|---|---|
| बखेर हुजूर पाठवणें सदर्हू कलमास | लग.......................... ० |
| ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी | |
| मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा | लग.......................... ० |
| निर्वाह होय आण बदलामी न ये | |
| ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणो- | लग.......................... ० |
| न हुजूर लिहिणें एकूण कलम १ | |

सताजी पाटील मौजे सिवडे व मौजे वराडे ता। मजकूर येथील आपला हरास करून सेतेंभातें सितोजी भोसले यानीं गुराकडून चारविलें व नेलें ह्मणोन सताजी मजकुरानें विदित केलें बितपसील

कि। कलम सताजी घाटगा पा। याचें पिकलें सेत मौजे वराडें बिघे हरजिनसी

३५ ऐन
२ परडे
४॥ पडपैकीं
४१॥

ए। साडेएकेताळीस बिघे सितोजी भोसलियानीं मालिस्त करून नेलें आहे ह्मणोन सताजी पा। विदित केलें यावर सितोजीचे भाऊ सटवोजी भोसले यास विचारितां तकरीर केली यास निर्वाह देशाधिकारी व पारपत्यगार ता। मार यांला आज्ञापत्र सादर करावें

कि। कलम सताजी पाटेल याच्या तिही तिही आकणीच्या माळया दोन सितोजी भोसलियानें नाइकजीफडतरा मुतालिक दि। माइले यास सांगोन जाळविल्या ह्मणोन सताजीनें विदित केलें यास सटवोजी भोसले यानें विदित केलें कीं सितोजीनें मुतालिकाकडून माळया जाळविल्या नाहीं यास निर्वाह तर्फमजकूरचे पारपत्यगार यांस आज्ञापत्र सादर करावें कीं देसमुख देसकुळकर्णी व मौजे वराडेचे वतनदार गोहीसाक्ष मनास आणनें कीं सितोजीनें मुतालिकास सांगोन माळया जाळविल्या कीं नाहीं व एकेके माळीस काय किंमत बैसली

कीं सताजी पाटेलाचें पिकलें सेत सितोजी भोसले याणीं सदर्हूपैकीं किती मालिस्त करून नेलें आहे हें देसमुख देसकुळकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार व गाहीसाक्ष असतील त्यास सफतपूर्वक आकस व कोसीस न करितां परनिस्ट मनास आणोन जितके सेत सितोजीकडे हक्कहिसाबी होईल त्याची बखेर

आहे हें बरें चौकस आकस कोसीस न कारितां परनिस्ट हुजूर लिहिणें सदर्हू कलमास जे साक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होय आण बदलामी न ये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहिणें एा कलम १

सिकियानसी वतनदाराचे साक्षपत्र हुजूर पाठवणें सदर्हू कलमास गाहसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणने की सदर्हू कलमाचा निर्वाह होय आण बदलामी न ये ऐसी परनिस्ट मनास आणोन साक्ष हुजूर लिहिणें एा कलम एक १

लग........................ ०

लग........................ ०

लग........................ ०

लग........................ ०

लग........................ ०

लग........................ ०

लग........................ ०

किा कलम सताजी पा याचे पेंवें गल्लियाचे राळे सोळुले नवसेरी खंडिया अडीच होते ते सितोजी भोसले रात्रीचे येऊन नेले ह्मणोन सताजी मार विदित केलें. यास सटवोजी भोसले यास विचारितां सितोजी भोसलियानें पेंव गल्ला राळे खंडी अडीच नेला नाहीं ह्मणोन नाकाबूल गेले यास निर्वाह की ता मारचे पारपत्यगार यास आज्ञापत्र ल्याहावें कीं सदर्हू अडीच खंडी गल्लियाचें पेंवें सताजीचें सितोजी भोसलियानें नेलें आहे कीं नाहीं हें मौजे मजकुरामधें ग्वाहीसाक्ष असतील यास सफत घाळून बरें चौकस देसमुख देसकुळकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार याचे गाहीसाक्षीनसी आकस व कोसीस न करितां परनिस्टें बखेर

लग.................... ०
लग.................... ०
लग.................... ०
लग.................... ०
लग.................... ०

सिकियानसी हुजूर लिहिणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होय आण बदलामी न ये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हूजूर लिहिणें एा कलम १

एकूण कलमे ७ सात रास याचा कलमाचे कलम सदर्हूप्रमाणें निर्वाह केला आहे ऐसियास माहालीं आकस व कोसीस कराल आणि हुजूर राजश्री स्वामि कलमाचा कलम मनास आणितील तेन्हां आकस व कोसीस दिसोन आली ह्मणजे स्वामि तुमचा मुलाहिजा करणार नाहीं ऐसें बरें समजोन परनिस्ट लिहिलेप्रमाणें चौकस मनास आणोन हुजूर राजश्री स्वामिंचे सेवेस लिहिणें ह्मणोन देशाधिकारी व पारपत्यगार ताा मजकूर यांसि आज्ञा हें निवाडपत्र सत्य निदेश समक्ष

रुजू*

लेखन
सीस्त समु
ह्सति

तेरीख ५ रबिलोवल सुा खमस समानीन अलफ

सुरू सूद बार

---

**लेखांक १२ श्री १६०७ ज्येष्ट वद्य १३**

तालीक बंद ६/४ च्यार

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके क्रोधनामसंवत्सर ज्येष्टबहुल त्रयोदशी भृगुवासर सुरसन सीत समानीन अलफ कारणें

* दोन कागद जोडले आहेत व जोडगिरीवर लेखनसीमेचा शिक्का पांच वेळ आला आहे.

जाहाला निवाडा ऐसा जे माणकोजी बिन राहूजी जगदळा पटेल मौजे शिराडे ता॥ उंबरज यामधें व शिवाजी नाईकडा व नरसोजी नाईकडा कुणबी मौजेमजकूर यामधें मौजेमजकूरचे निमे पटेलगीचा वेव्हार लागोन माणकोजी जगदळा पटेल याचा भाऊ माहादजी पटेल का॥ मसूर ता॥ मा॥र हुजूर येऊन विदित केलें कीं मौजेमजकूरची पटेलगी आह्मां जगदळियांची वृत्ति कदीम सालाबाद पहिलेपासून चालत असतां लाइणीं शिवाजी नाईकडा निमे पटेलकीसीं कथळा करितो तरीं स्वामींनीं त्याचा व आपला बरहक्क निवाडा केला पाहिजे ह्मणोन विदित केलें त्यावरून राजश्रीं कोनेर रंगनाथ मुख्य देशाधिकारी प्रा॥ कऱ्हाड यासि आज्ञापत्र सादर केलें कीं माणकोजी जगदळा पाटील याला तुह्माजवळीं पाठविला असे. शिवाजी नाईकडा यासि हि सुभा बोलाऊन घेऊन हरदोजणाचा जमान घेणें आणि देशमुख व देशकुळकरणी व हमशाही गावींचे मोकदम व मौजे मजकुरीचे बलुते ऐसे वृध वृध जमा करून श्रीचे देवालयीं नेऊन त्यास सत्य घालून विचारणें कीं मौजेमजकूरची पटेलकी कदीम वृत्ति कोणाची भोगवटा कोणाचा कैसा किती दिवस चालिला आहे हे सांग वर्तमान सत्यपूर्वक सांगतील त्यांचे साक्षपत्र व त्यांचा निशानानसी व त्यावरी तुह्मीं आपली मुद्रा करून साक्षपत्र व हरदो वादी ऐसे हुजूर पाठवणें. मनास आणून बरहक्क निवाडा करून निवाडपत्र व राजश्री स्वामींचें आज्ञापत्र सादर होईल तेणेंप्रा॥ वर्तवणें. एकाचा आकस व कोशीस सर्वथा न करणें परनिष्ठ जैसें असेल तैसें लिहिणें ह्मणोन पत्र सादर केलें होतें त्यावरून कोनेर रंगनाथ यानीं माहालीं हमशाही शिवधडे पाटील व मोख्तसर भले लोक व मौजेमजकुरी बारा बलुते ऐसे कसबे पेठ ता॥ कोडुली येथें जमा करून हरदोजणां वादियांचे राजीपणें राजीनामे लेहून घेऊन हमशाही पाटील व मोख्तसर भले लोक व बारा बलुते यांसी श्रीकृष्णेची क्रिया व सत्य घालून व आपले बेताळीस स्मरोन बरहक्क गोही

देणें ह्मणोन त्यांस सत्य घातलें त्यावरून त्यानीं साक्ष दीधली त्यांचें साक्षपत्र माहालींहून आलें बितपसील

**कुळकरणी व खोत व मोख्तसर कुणबी**
**व बारा बलुते मौजेमजकूर**
**कुळकर्णी व चौगुले व खोत व रयां**

| | |
|---|---|
| तिमाजी अनंत कुळकर्णी १ | सताजी रेवजी पवार खोत १ |
| भानजी थोटबेला कुणबी मौजेमजकूर १ | दुर्गोजी बिन बाजी चौगुला १ |

**बलूतियानी**

| | |
|---|---|
| केदारजी कानोजी सुतार मौजे बेलवडें १ | सोना बिन ह्मासा महार मौजेमजकूर १ |
| ह्मासा भाना चांभार मौजे मार १ | सावठाकूर बिन बहिर ठाकूर १ |
| फिरंगा बिन मोतजी कुंभार मौजेमार १ | दादजी हजाम मौजेमार १ |
| बहिरा बिन नारा गुरव मौजेमजकूर १ | लग.............. ० |

**शिवधडे पाटीलानी व बलूतियानी**

| | |
|---|---|
| कृष्णाजी मयाजी पा मौजे बेलवडे १ | सताजी भिवजी घाटिगे मौजे वराडे १ |
| भिवजी बिन नरसोजी जाधव पटेल मौजे तासवडे १ | संभाजी जेताजी घोलप मौजे निगडी १ |
| बाळोजी बिन दत्ताजी चव्हाण पा मौजे कोणेगाऊ १ | नाईकजी जाधव व जागोजी जाधव पटेल कसबे उंबरज १ |
| धारोजी बिन काळोजी सुतार मौजे कोणेगाऊ १ | लग................ ० |

## कसबे मसूर

| | |
|---|---|
| रुद्राजी नरसिंह कुळकर्णी का॥ मा॥र १ | रामजी बिन जनकोजी चौगुला मौजेमा॥र १ |
| बहिरजी जानोजी सुतार का॥ मा॥र १ | मोतनाक बिन जननाक होतरा का॥ मा॥र १ |

सदर्हू जणांनीं साक्ष दिल्ही तेथें लिहिलें कीं जगदळे पाटील मौजे शिरवडें खरे, नाईकवडा कुणबी मौजेमजकूर हा खरा लाइणी झोंडपणें पटेलगीस झोंबतो. परंतु आपणास पाटील ऐसे दखल नाहीं ह्मणऊन साक्षपत्रें छ २६ जमादिलोवल सु॥ सन खमस समानैन चें हुजूर रुजू केलीं व कोनेर रंगनाथ मुख्य देशाधिकारी प्रा॥ कऱ्हाड यांची बखेर छ २७ जमादिलोवल सु॥ सन खमस समानैन ची राजश्री छत्रपति स्वामींस आणिली आहे तेथें लिहिलें आहे कीं हमशाही शिवधडे पाटील मोख्तसर व भले लोक मौजेमजकुरीचे बारा बलुते ऐसे कसबे पेठ ता॥ कोडुली येथें आणिले आणि जगदळे व नाईकडे यांसि विचारिलें जे हमशाही शिवधडे पाटील व गावींचे बारा बलुते सांगतील त्यास तुह्मी राजी आहां कीं नाहीं ह्मणोन विचारिलें त्यास जगदळे व नाईकडे बोलिले जे त्यासि आह्मीं राजी आहों. ह्मणोन बोलिले. त्यांस सांगितलें जे तुह्मी राजी आहां तरी राजीनामे व जमानकतबे लेहून देणें ह्मणोन सांगितले. त्यावरून राजीनामे व जमानकतबे लेहून दिल्हे. त्यावरी हमशाही पाटील व मोख्तसर व भले लोक व बारा बलुते आणिले. त्यावरी श्रीकृष्णेची क्रिया घालून आपले बेताळीस स्मरोन बरहक गोही देणें ह्मणोन त्यांस सत्य घालून जगदळे व नाईकडे ऐसे उभे करून बहुजूर हमशाही पाटिलांस व मोख्तसर व बारा बलुते यांसि विचारिलें. तेहीं तक्रीरा लेहून दिल्ह्या. त्या तक्रीरास ऐसें जाहालें जे जगदळे पाटील खरे जाहाले, नाईकडा कुणबी खोटा जाहाला. तक्रीरा दफ्तरीं विले लाविल्या. यानी जगदळे व नाईकडे आपले बिराडीं गेले. ते च दिवशीं नाईकडा कुणबी

पळाला. मग नाईकाडियाच्या जमानदारास आणविले तो जमानदार हि गैरहजीर जाहाला. मग जगदळे व तकरीरा ऐसिया सेवेसी हुजूर पाठविले आहेत. त्यावरून सेवेसी श्रुत होईल. जगदळे पाटील खरे जाहाले असेती. निवाडपत्र द्यावया स्वामी धणी आहेती. ह्मणोन बखेर रुजू केली. सदर्हू साक्षपत्रावरून व बखेरीवरून हुजूर हि करीना व भोगवटा मनास आणितां दिसोन आलें कीं मौजेमजकुरीची पटेलगी कदीम मिरासी जगदळियांची. एसें खरें जाहालें. याकारितां मौजेमजकुरीची पटेलगी जगदळियांचे दुमाला केली असे. कदीम पहिलेपासून सालाबाद चालत आलें आहे तेणेंप्रमाणें पुढें हि अन्वळाद अफलाद पिढी दर पिढी चालवणें. नाईकडे कुणबी मौजेमजकूर हे लाइणी झोंडपणें समंध नसतां पटलगीसी कथळा करीत होते ते दूर केले असेती. याला मौजेमजकुरीच्या पटेलगीसी अर्थाअर्थीं समंध नाहीं. मौजेमजकुरीची पटेलगीस जगदळे खरे जाहाले. यासि हरकी होन पाा २५ पंचवीस. नाईकडे कुणबी खोटे जाहाले. यासि गुन्हेगारी होन पाा ५० पन्नास. रास येऊन होन पाा ७५ पावणासे रास देखील सरदेशमुखी करार केले असेती. हें निवाडपत्र सत्य

---

**लेखांक १३ श्रीगणाधीश १६१० भाद्रपद शुद्ध ७**

स्वस्तिश्रीनृपशालिवानशके १६१० वरशे प्रभवनामसंवत्सरे भाद्रपदमास सुद्धसप्तमी रविवासरे तद्दिनीं राजश्री माहादजी पाटील बिन सुलतानजी पाटील जगदळे गोसावी यासी स्नो बाबाजी बिन गंगाजी पाटील व माणकोजी पाटील बिन राऊजी पाटील जगदळे व माहादजी बिन नरसोजी पाटील व सूर्याजी बिन बापूजी पाा जगदळे पटेल मौजे शिरवडे यानीं लेहून दिल्हें क्रयपत्र ऐसें जे आपला मूळपुरूश व तुमचा मूळ पुरूश हे एक घराणें व तुमचे वाटणीस गेले मसूर व आपले वाटणीस आलें शिरवडें तुह्मीं मसूरीची पटेलगी करित आहां आह्मी शिरवडाची पटेलगी करीत आहों व तुह्मीं राजग-

डास गेलेती आणि मार्गे नांईकडे कुणबियानीं कथळा मौजेमजकूरचे पटेलगीसी करून हरवाजी अजजाहातीदेमुसखी याची पाठी करून पटेलगीसी कथळा केला त्यांसी व आपणांसी बहुत कटकट जाहाली काळादुकळाचे आपणासी शक्ति नाहीं ऐसी जाहाली याकरितां नाई-कडे आपल्यासी रेटेनात ऐसें जाहालें मग गोसावियापासी आपण उभे राहिलों नाईकडियासी वादवेवाद सांगावा आपण पाठी राखावी व आपलें वतन जतन करावें ह्मणऊन गोसावियासी विदित केलें दुस-रियांनीं येऊन पटेलगी जोरावारीनें घ्यावी याकरितां मसूरची पांढरी व शिरवडाची पांढरी हे एकाची याकरितां मौजेमजकूरची पटेलगी निमे तुह्मी खावी व निमे आह्मी खावी ऐसा तह करून नाईकडेयासी वादवेवाद सांगितला नाईकडे दूर केले हुजूर रा स्वामीपासीं निवाड-पत्रें जाहालीं नाईकडे खोटे त्यांसी गुन्हेगारी बांधली आह्मी जगदळे खरे आह्मासी हरखी बांधली ते हरखीचे पैके होन ५० तुह्मीं दिल्हे व याखेरीज आह्मासी हि काळादुकळाचे वांचविलें आपले वौंशीचे ह्मणौन जतन केलें व आपल्यासी खावयासी पोटाकरितां होन ५० दिल्हे याबद्दल आपल्यापासीं माहारनागर व पानतश्रीफ वडीलपणाची हदमहदूद पांढरीवरी जे उत्पन्न होईल ते निमे दोनी ठाईं तारोतार वाटून द्यावे व गांव समायीक लावावा ज्यासी फावेल त्यानें लावणी करावी एकाची मोडी एकावरी न घालावी व आपल्या भाऊपणामध्यें दुसरें दिसों नेदावें आपण आधीं पान घ्यावें व मागें तुह्मीं घ्यावी व नागर आधीं आपण करावा व मग तुह्मीं करावा ऐसें तारोतार पांढ-रीवरी उत्पन्न होईल तें दोनी ठाईं घ्यावें यासी कोणी बिलाहरकती करणार नाहीं बाबाजी पाटिलाची विल्हेच्यानीं हरकती केली तरी बाबाजी पाटिलानें सांभाळवें व माहादजी पाटिलाच्यानें आपलें सांभा-ळावें ऐसा निछयो करून तुह्मास हें पत्र लेहून दिल्हें असे यासी कोणी बिलाहरकत करणार नाहीं अवलाद अफलाद लेकराचे लेकरीं तजाऊफ होऊं तरी श्रीची आण असे व आपल्या वडिलाची आण

असे हें क्रयपत्र सही सुा समान समानीन अलफ छ ७ माहे जिलकाद व नाईकाडियाचे लिगाड जें पडेल तें तुह्मीं वारावें आपण पाठी राखावी हें लेहून दिल्हें क्रयपत्र सही वळी सुमार ६१ एकसस्टी रास

( निशाणी नांगराची )

बिकलम हणमाजी अनंत कुळकर्णी

मौजेमजकूर मौजे शिरवडें व मौजे तासवडें

गोही

बहिरोजी जाधव पाटील बिन लखमोजी पटेल काा उंबरज

( निशाणी नांगराची )

नागोजी बिन अप्पाजी पटेल का उंबरज

हणगोजी बिन करमोजी पटेल मौजे कविठें

( निशाणी नांगराची )

बाळोजी बिन दत्ताजी पाा मौजे कोणेगाऊ

( निशाणी नांगराची )

शिवाजी बिन कृष्णाजी पटेल जाधव मौजे तासवडे

( निशाणी नांगराची )

धारोजी बिन काळोजी सुतार मौजे कोणेगाऊं

( निशाणी वाकसाची )

ह्मसाजी बिन धनाजी पाटील मौजे वडूज पाा खटाव

( निशाणी नांगराची )

गावलोक व बलुते मौजेमजकूर

येमाजी बिन जनाजी चौगुला मौजे मजकूर काठी

दुर्गोजी बिन बाजी कारवेकर चौगुला काठी

शिवाजी बिन नाइकजी मालकर खोडीवाडी ( निशाणी नांगराची )

तुकोजी बिन भानजी थोरबळा

( निशाणी नांगराची )

१२ बैते मौजेमजकूर

१ गणोजी बिन कान्होजी सुतार मौजे शिरवडें

१ सोननाक बिन ह्मसनाक मेतरा

१ जननाक बिन मगनाक माहार मौजेमजकूर

१ नाइका बिन गणनाक माहार मौजेमा

१ साऊ ठाकूर बिन भैर ठाकूर मौजेमा

१ ह्मसनाक बिन भाननाक
चांभार मौजेमा जीगा
१ केदारजी बिन सूर्याजी
कुंभार मौजेमा
(निशाणी फड)
१ रेखू बिन मोतजी कुंभार
मौजेमा
( निशाणी चाकाची )
१ सिदोजी परीट बिन बापूजी
परीट मौजेमा सील
१ संभाजी गुरव बिन तुकोजी
गुरव मौजेमजकूर
१ मल्हारा बिन बापूजी हजाम
मौजेमजकूर
( निशाणी आरसा )
१ हणमंत बिन अनंतभट जोसी
मौजेमजकूरं पातडें

१२

लेखांक १४ श्री १६१३

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके + + + + + + + + + + + +
क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणीं राजमान्य राजश्री सुंदर तुकदेऊ दिा चिरंजीव राजश्री राजा कर्ण यासी आज्ञा केली ऐसी जे माहादजी जगदळे देशमुख ता मसूर सुभा कऱ्हाड याचे देशमुखीचा कथळा पूर्वी जाला होता त्यास स्वामीनें याचे कागदपत्र व फर्मान पूर्वील होतें तें मनास आणून माहादजी जगदळे देशमुख स्वामीचे पायांसि येकनिष्ठ स्वामिकार्याचा ह्मणून याजवरी कृपाळू होऊन

मसूर तर्फेची देशमुखी याची यासि करार करून दिल्ही ते विषइचीं पत्रें पूर्वीं राजश्री रामचंद्रपंतास व सुभेदारास सनदा तुह्मास आज्ञापत्र सादर जालें ऐशासी स्वामीचे पत्रा प्रमाणें राजश्री रामचंद्रपंतीं पत्रें करून दिधलीं. तेणे प्रमाणें व सुभाचे कागद प्रमाणें देशमुख मजकुराचे वतन चालत असतां सांप्रत तुह्मीं देशमुखमजकुराचे वतनास इसकील करून कथळा केला आहे ह्मणून विदित जालें व ताा मसूर माहालचे गांव ५७ सत्तावन फर्मानीं लिहिले आहेत त्या पैकीं गाव ३७ सततीस त्या माहालाकडे चालत आहेत बाकी २० गाव यादव देसमुख ताा उंबरज व ताा तारगाव व ताा आउंद याच्या कथळेयामुळें चालत नाहीं ह्मणून विदित जालें तरी माहादजी जगदळे देशमुख ताा मसूर याचें वतन स्वामीनें करार करून दिल्हें असतां तुह्मास कथळा करावया काय गरज आहे हालीं हें आज्ञापत्र सादर केलें आहे तरी माहादजी जगदळे देशमुख ताा मसूर याचे वतनासी कथळा न करितां सुरक्षित चाले तें करणें हक्कलाजिमा व इनाम देशमुखीस पूर्वींपासून चालत आला असेल तो चालविणें ह्मणून स्वामीने सनदा सादर केल्या आहेत त्या प्रमाणे चालविणें मसूर माहालपैकीं सततीस गांव मसूरेखाले चालताती वीस गाव चालत नाहीं त्यासी हमशाईगोत देशमुख मोकदम चौगले मेळऊन त्याजवरी मनसुफी टाकून गोतमुखें मसुरेखालील गांव यादव बळेंच खात असिले तरी मसुरेखालें च देऊन माहादजी जगदळे याची देशमुखी चालवणें येविषईं राजश्री रामचंद्रपंतास पत्र लिहिलें आहे ते निर्वाह करून देतील तुह्मीं त्यास येकजरा कथळा न करणें फिरोन बोभाटा येऊं न देणें जाणिजे बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

सुरू सूद बार संमत

लेखांक १५ श्री १६१२ चैत्र शुद्ध १०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १७ प्रजापतीनाम संवत्सरे दशमी सो(भौ)मवासरे क्षत्रियकलवतंस श्रीराजाराम छत्रपती याणीं समस्त-सेनाधुरंधर राजमान्य राजश्री संताजी घोरपडे सेनापती यांसि आज्ञा केली ऐसीजे तुह्मीं माहादजी जगदळे देसमुख रा हरी विनंतीपत्र पाठविले ते पावलें महादजी जगदळे देशमुख ताा मजकूर याचें वतन यांचे यास चालविण्याची आज्ञा केली पाहिजे ह्मणोन लिहिलें त्याव-रून व माहादजीच्या विनंतीवरून मनास आणिलें पुर्वी बेदरचे पाद-शाहांचे व विजापूरचे पादशाहांचे होते तेही पाहिले

हे मऱ्हाटे लोक त्या प्रांतीचे वतनदार होते त्यांस ही पुर्वी + + + जगदळे काा मजकूरचे देशमूख ऐसें नेमस्त जालें व

तुमच्या पत्रावरून विदित जाली ह्मणोन स्वामी यांच्यावरी

कृपाळू होउनु यांचे वतन यास चालवायाची आज्ञा करून पत्र दिल्हें असे व सुभियाचे नांवे सनदा सादीर केल्या असेती. त्या प्रमाणें चालेल कोण्ही बिलाहरकत करील त्यास तुह्मी ताकीत करून सुरक्षीत चालवणें. ये विशिं राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांस लिहिलें आहे. ते चालवीतील जाणिजे बहूत लिहीणे तरी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

बार सुरू सूद बार

प्रविष्ट श्रावण सुध गुरुवार छ ६

लेखांक १६ श्री १६१३ वैशाख वद्य १०

श्री राजाराम
नर पतिहर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्रीलक्ष्मि
नृहरिप्रीतेः
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
रामप्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक १७ प्रजापतिनाम संवत्सरे वैशाख बहुल दसमी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणीं राजश्री नागोजीराउ व चांदजीराउ पाटणकर देसमुख पा। पाटणयासि आज्ञा केली ऐसीजेः तुह्मीं माहादजी जगदळे देशमुख याबरोबरी विनंतिपत्र पाठविलें तें पावलें माहादजी देशमुख याचे देशमुखीचा भोगवटा कितेक दिवस तुटला आहे ऐशास हे पुरातन वतनदार यां पासीं बेदरचे पादशहाचें फर्मान व इभराईम आदलशाहाचें फर्मान व सुलतान माहमदशाहाचें फर्मान व वरकड कागदपत्र पूर्वील भोगवटियाचे आहेती तरी याचें वर्तमान स्वामीनें मनास आणून याजवरी कृपा करून याचें वतन देशमुखी यास चालविण्याची आज्ञा करून अभयपत्र करून देविलें पाहिजे ह्मणोन कितेक तपसिलें लिहिलें तें विदित जालें व माहादजी देशमूख याणे आपले वर्तमान जाहीर करून कागदपत्र रुजू केले ते सर्वही मनास आणिले आणि माहादजी जगदळे याची देशमुखी यास चालवायाची आज्ञा केली आहे व अभयपत्र दिल्हे आहे व सुभियाचे नावे सनद सादर केली आहे तेणेप्रमाणें याचे देशमुखीचे वतन याचे यांस चालेल कांहीं अंतर पडणार नाहीं व या उपरी याचे वतनास इस्कील व खलेल होणार नाहीं जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

बार सूद
सुरू सूद

---

लेखांक १७ श्री १६१३ ज्येष्ठ वद्य ७

छत्रपती

श्रीचरणारविं
दीं शरण महीमु
जी व्यंको सर्ह्दि
युधप्रवीण

राजश्री माहादजी देसमुख
पाा मसूर गोसावी यासि

॥ ६) अखंडितलक्ष्मीमंडित याविराजित राजश्री स्नेहपूर्वक विठोजीराजे सिंदे जोहार सुाा इसन्ने तिसैन अलफ तुह्मीं राजश्री

स्वामीपासीं चंजीस एउनु आपले देसमुखीची सनद असनादे करून घेतली आणि राजश्रीस हरकी कबूल केली त्यासि आपणापासीं एउनु वर्तमान सांगितलीयावर तुह्मीं वतनदार नाईक ह्मणौनु आपण तुह्मास होन पातशाही ३०० तीनसे दिधली ऐसियासि त्यापैकीं तुह्मीं आपणास खत बेजा २०० दिधलें बाकी सेभर होन उरले ते आपण तुह्मास बक्षीस दिधले असेती देशामधें आपला कदीम व भाऊ राा बावाजीराजे आहेती यासि पावते करून त्याचें उत्तर आह्मास पाठवणें वरकड बहुत काय लिहिणें सदर्हू दो शा होनास मुदत एका वरसाची केली असे कळलें पाहिजे राा छ २० रमजान *

मोर्तब
सुध

---

लेखांक १८ श्री १६१३ ज्येष्ठ वद्य ७

शके १६१३ प्रजापति नाम संवछरे जेष्ट वदि सप्तमी रविवासरे तद्दिनीं खरीदखत राजश्रीं जानराऊ वागमोडे गौउ मोकदम मौजे फोडशिरस काा दहीगाऊ प्राा माण यासि माहादजी विन सुलतानजी

---

* ह्या कर्जरोख्याऐवजी पत्राचें अक्षर चांगलें ठळठळीत वळणदार आहे. मराठा क्षत्रिय जें सींदे त्यांच्या कुळांतील एका वीरानें हा कागद लिहिवला आहे.

जगदळे देसमुख तर्फे मसूर व पटेल का। मजकूर याणीं लेहून दिल्हें ऐसें जे आपण आपले वतनाच्या कार्यां बद्दल चंदीस राजश्री स्वामी सन्निध आला आणि आपले वतन देसमुखीचे दुमाले करून घेतलें ते वख्तीं राजश्रीं स्वामीनीं आपणास हरकी मागितली. ते समईं आपणास टक्का पैका मिळेनासा जाहला मग आपण तुमची भेटी घेऊन तुह्मांस आपले देसमुखी पैकीं देह च्यार रास बी॥

मौजे आरवी १ मौजे नागझरी १ मौजे किरवली १ मौजे कोपर्डें १ एकून च्यार गाऊ चौसे ४०० होन पातशाही तुह्मांपासून घेऊन सदरहू गाव तुह्मांस ४ दिल्हे असेत याचा अलाहिदा माहजर करून दिल्हा असे व पैके चंदीचे मुक्कामीं सदरहू होन च्यारसें होन पा। आपणास पावले हें गांव दुसरियास दिल्हे असिले आणि दुसरियानें कथळा करावयास गरज कोणासी नाहीं आपण वारून सु॥ इसन्ने तिसैन अलफ हे खरीदखत सही छ १९ रमजान वली सुमार २९ एकोणतीस रास *हेषरीद षत सहीं

साक्ष पैके आह्मां हजूर पावले

राजेश्री नेमाजी राजे सिंदे.

श्री
सिद्धीविनाय
क दषमोजी
सुत नेमाजी
सींदे

राजश्री झुंजारराव देवकांते मोकदम मौजे मेखळी का॥ बारामती प्रांत सुपें

येमाजी पाटील मौजे लाहासुर्णे पा॥ इंदापूर

अजगरराव माडकर मोकदम मौजे व्याहाळें पा॥ कडेवळीत

बाजी मासाळ मोकदम मौजे आगोती पा॥ इंदापूर.

रामोजी पतंगराव सेडगे
तेरीख १९ रमजान

---

* हीं आठ अक्षरें खुद्द माहादजी जगदळे देशमुख याच्या हातचीं.

लेखांक १९ श्रीशंकर १६१३ ज्येष्ठ वद्य ६

छत्रपती

० श्री
जानरा
व वाग०
मोडे

राजश्री महादजी जगदाळे देशमूख ता। मसूर

-॥ॐ) गोसावी यास

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजश्री स्नो जानराऊ वागमोडे जोहार विनंती उपरी तुह्मी चंदीचे मोकामीं राजश्री स्वामी संनिध येऊन देशमुखीचीं पत्रें करून घेतलीं याबद्दल रा। स्वामींनीं तुह्मांस हरकी मागितली ऐसियास तुह्मापासीं पैके द्यावयास मौसर नाहीं या कारितां आह्मांपासीं येऊन घेतले होन ५०० पांचसे व तुह्मी एकले तुह्मांस पाठीराखा नाहीं याबद्दल आमची पाठी करून तुह्मी आपले आत्म-संतोशें आह्मांस आपलें वतन देसमुखी ता। मजकूर पैकीं च्यारी गाऊ आह्मांस मिरास करून दिल्हे आहेती बी।।

| | |
|---|---|
| मौजे आरवी | मौजे नागझरी |
| मौजे कोपरडे | मौजे किरोली |

एकूण गाऊ च्यारी येथील हक्क-लाजिमा व इनाम व धार सेव व पडिलें पान कुल बाजे बाबा जेणेप्रमाणें पुरातन चालत आलें आहे तेणेंप्रमाणें घेत जाणें ह्मणऊन सदरहू च्यारी गाऊ दिल्हे आहेती चौ गावीचा कारभार तुह्मीं कर्णे तेथें आह्मी दखलगिरी करणार नाहीं ऐसा तुमचे व आमचे तह जाला असे आह्मी तुमची पाठी राखावी तुह्मां कांहीं पैके याबद्दल गाऊ दिल्हे नाहींत आपली पाठी राखावी साह्या-धाव्यास पावावें ऐसा निर्व्हाव करून च्यारी गाऊ लेकराचेलेकरी चंद्र सूर्य आसने तोवरी दिल्हे आहेती तुह्मी आंतर पडों न देणें व आह्मीही पाठी राखावयास आंतर पडों देणार नाहीं दिला तर वतनाचेमुळें

टका भरी पडेली तो तकसीम बरहुकूम आह्मी देऊन हे आपले वाडिलाचे इमान सही तेरीख छ १९ रमजान सन इसन्ने तिसैन अलफ लिहिली वळी सुमार ४३ त्रेताळीस हें लिहिलें सही (मोर्तब सुध)

---

**लेखांक २०** **१६१३ ज्येष्ट वद्य ७**

(श्री जानराव वाघमोडे)

शके १६१३ प्रजापतिनाम संवछरे जेष्टवदि सप्तमी रविवासरे तद्दिनीं शर्तनामा राजश्री माहादजी जगदळे देसमुख तपे मसूर व पटेल का मजकूर यासि राजश्री जानराऊ वागमोडे गौउ मोकदम मौजे फोडशिरस का दहीगाऊ प्रा माण लेहून दिल्हें ऐसें जे तुह्मीं आपणास तपे मजकुरचे देसमुखी पैकीं गाव ४ च्यारी दिल्हे मौजे आरवी १ मौजे नागझरी १ मौजे किरवली १ व कोपर्डे १ एकूण च्यारी गाव दिल्हे यासि तुह्मास आह्मीं ४०० च्यारी से होन पादशाही दिल्हे असती ऐसियासि आह्मी तुमची पाठी राखावी वंशपरंपरेनें पाठी राखावी ऐसें वंसपरंपरेनें न करी तरी त्यासि वाराणसीस गोहत्या–ब्रह्महातेचें पातक असे व तुह्मीं आह्मास महजर व खरीदीखत करून दिल्हें असे त्याप्रमाणें तुह्मीं व आह्मीं वंसपरंपरेनें चालावें सुा इसन्ने तिसैन अलफ तेरीख १९ माहे रमजाण हा शर्तनामा सही वळी सुमार २६ सवीस रास (मोर्तब सुध)

साक्ष

रा नेमाजी राजे सींदे

रा झुंझारराव देवकांते मोकदम
मौजे मेखळी का बारामती पा सुपे
(शिक्का फर सी)

श्री
सिद्धीविनायक
दखमोजी
सुत नेमाजी
सींदे

रामोजी पतंगराव सेडगे
(शिक्का फारसी)
रा अजगरराव माडकर मोकदम
मौजे व्याहाळें पा कडेवळीत
(शिक्का फारसी)
बाजी मासाळ मोकदम
मौजे आगोती पा इंदापूर
रा तिमाजी कोकडे मोकदम
मौजे निसूतर व पागारे प्रा
पुर्णे निरथड

चार ओळी
मराठी

यमाजी बिन निंबाजी मोकदम
मौजे लाहासुर्णे पा इंदापूर
(निशाणी नांगराची)
आउजी तुकोजी कुळकर्णी
मौजे कोरुडी पा इंदापूर
बिकलम सेटियाजी बिन
मोणकोजी सोनार कुळकर्णी
मौजे पौडशिरस व उंबर

---

**लेखांक २१ श्री १६१३ मार्गशीर्ष शुद्ध ३**

मा अनाम माहादजी जगदळे देशमुख कर्यात मसूर सुभा प्रांत सातारा यासी रामचंद्र नीळकंठ अमात्य सुहुरसन इसन्ने तिसैन अलफ कर्यातमजकूरची देशमुखी पुरातन होती त्याचा भोगवटा बहुत दिवस राहिला या कारणें तुह्मीं राजश्री स्वामीचे सेवसी जाऊन विनंति

केली व त्रीतिपत्रें होतीं तीं विदित केलीं त्यावरून मनास आणून बहुत दिवस भोगवटा राहिला या कारणें सेरणी होन पा दोनी हजार ठेऊन तुमची देशमुखी तुमच्या दुमाला कराविली यावरी एथें मनास आणितां बहुत दिवस भोगवटा राहिला त्रीतीपत्रें करून द्यावी लागतात म्हणऊन तुमचे माथा आणिखी होन पा ७५० ^ साडे सात से सेरणी ठेऊन कर्यातमजकूरची देशमुखी दुमाला केली असे सदर्हू सेरणीपैकीं देणें होन पा

बा देणें खरीदी गल्ला बद्दल हुजूरपागा बराबरी स्वारी कारखानिसी किले सातारा याकडे ऐवज तकदमा होन पादशाही १९२

बद्दल मुशाहिरा परशराम त्र्यंबक मुतालीक दिमत मजमू सेवक राजमंडळ होन पा बा सिखीपरज ८

एकूण होन पा दोनी से रास देविले असेत आदा करणें पावल्याचा जाब घेणें त्याप्रमाणें मजुरा असे छ १ रबिलोवल निदेश समक्ष

(मुद्रा: लेखन सीमा समु ल्लसति)

बार सुरू सूद बार

---

**लेखांक २२** **श्री** **१६१३ पौष वद्य ९**

(मुद्रा: श्रीन रहरिचर णी शरण बा बाजीनारा यण)

कौलनामा अज सुभा राजश्री बाबाजी नारायण सुबेदार व कारकून प्रांत सातारा ताहां माहादजी बिन सुलतानजी जगदळे देश-

मुख तपे मसूर व पाटील कसबेमजकूर बिना बरा सुा सन इसन्ने तिसैन अलफ बादे कौलनामा + + + + + + + चे विशीं छत्रपती स्वामीचे व राजश्री पंत अमात्य यांचे आज्ञापत्र सादर जालें प्रजापतीनाम संवत्सरे वैशाख बहुल दशमी भौमवासरे पैा छ १० जिलकाद सालमजकूर तेथें अज्ञा कीं माहादजी जगदळे हुजूर एउनु चंजीचे मुकामीं विनंति केली कीं स्वामीच्या पायासी एकनिष्ठता धरून कितेक स्वामिसेवा केली आहे व स्वामीचें तर्फेचे कितेक लोकांचे कबिलियांस आपले ठिकाणीं ठाव देउनु कबिले राखिले स्वामीचे सेवेसी नष्टाई केली नाही हें परस्परें स्वामीस विदित होउनु मशारनिले स्वामिकार्याचा व एकनिष्ठ आहे या कारितां स्वामीनें याजवरी कृपाळू होउनु याचें वतन देशमुखी यास पुरातन चालत होती तेणें प्रमाणें चालवावयाची आज्ञा करून अभयपत्र दिल्हें असे व सुभियास सनद सादर केली असे तरी तुह्मी हि याची देशमुखी याचे स्वाधीन करणें भोगवटा बहुत दिवस उठला होता याकारितां यास सीरणी होनु पाा २००० दोनी हजार हुजूर वसूल घेउनु देशमुखी करार केली असे याणें औरंगजेबास भेटोन आपलें वतन मसुरेच्या देशमुखीचा फर्मान करून घेतला ह्मणून याजवरी दोष ठेवावा तरी वतनाचा मामला म्हणून कारकीर्दि जाली ते कारकीर्दीचे कागदपत्र करून घेतांती ते रीतीनें याणेंहि फर्मान घेतले ऐशियासि हा स्वामीच्या पायापासीं आला याकारितां स्वामीनें याजला मोगलास भेटला तो अन्याय क्षमा करून वतन मोकरर करून दिल्हे असे तुम्ही याजवर कांहीं दोष न ठेवणें आणि याचे चालवीत जाणें याच्या हातें स्वामिसेवा घ्यावयाची ते घेत जाणें याच्या वतनास इतकियाउपरि खलेल न करणें याचे देशमुखीविसीं बेदरचें पादशाहाचें फर्मान व इभ्राम अदल शहाचें फर्मान व सुलतान माहामद शाहाचें फर्मान व वरकड कितेक कागदपत्र होते ते स्वामीनें मनास आणिले व कितेक म्हराटे लोक होते त्यांस पुसिलें त्यावरून देशमुखी याची नेमस्त जाली त्याव-

रून व याचे एक निष्ठे वरून देशमुखीवतन मोकरर करून दिल्हें असे तरी याचे दुमाले करून देशमुखीचा मामला यापासून घेत जाणें म्हणून राजश्री छत्रपति स्वामीचे आज्ञा जाली त्यावरी राजश्री पंतअमात्य एहीं तुम्हास नेउनु बोलिले जे तुमचे देशमुखीचे बहुत दिवस भोगवटा उठिला होता एदंनिमित्य हुजूर राजश्री स्वामीने दोनी हजार सीर्णी तुम्हापासून घेउनु वतन दुमाले केले व हालीं एथें मनास आणितां तुमचें वतन बहुत दिवस चालिलें नाहीं याकारितां तुमचे माथां सीर्णी होन पा। ७५० साडे सातसे घेतले आणि तुम्हास दुमालपत्र आमचे नावें दिल्हें तरी तुम्ही आपली देशमुखी चालउनु सुखरूप असणें राजश्री स्वामीच्या पायापासीं एकनिष्ठता धरून वतनावरी सुखरूप असणें आणि पुत्रपौत्रीं वंशपरंपरेने चालवीत जाणें वतनाचा हक्कलाजिमा व इनाम पेषजी फर्मानी भोगवटा चालिला असेल त्याप्रमाणें हालीं लावणामाफिक हक्कलाजिमा खाउनु सुखरूप असणें कोणेविशीं शकअदेशा न धरणें बेशक होउनु आपलें देशमुखीचें प्रयोजन चालउनु सुखरूप असणें दरींबाब कौल असे रा। छ २२ रबिलाखर दरींबाब कौल असे मोर्तब सुद

लेखन
सीमा

---

**लेखांक २३ श्री १६१५ भाद्रपद वद्य १**

॰ श्री ॰
श्रीा राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ प्रधान

श्रीलक्ष्मि
नृहरिप्रीते
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
रामप्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २० श्रीमुखनामसंवत्सरे भाद्रपद बहुल प्रतिपदा भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजारामछत्रपति याणीं

रा खंडोजी वाग मुद्राधारी व कारकून किल्ले वसंतगड यासि आज्ञा केली ऐसीजे तुह्मी विनंती पत्र छ ७ रमजानचें पाठविलें तें छ २९ जिल्हेज प्रविष्ट जालें माहादजी जगदळे देशमुख तपे मसूर प्रा कराड हे पुर्वी स्वामीचे सेवेसी आला होता तेव्हां स्वामीनीं त्याची विनंती मनास आणून वृत्तिपत्रें दिल्हीं त्या प्रमाणें राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकमतपन्हा याणिं ही आपलीं पत्रें करून दिल्हीं याउपरि राजश्री सुंदर तुकदेऊ आले याणीं देशमुखीस खलेल केले ह्मणोन महादजी जगदला सेवेसी आला आहे याचें पारपत्य करून द्यावया आज्ञा केली पाहिजे ह्मणोन लिहिलें तें कळों आलें ऐशास माहादजी जगदला याणें स्वामीच्या पायांसी येकनिष्ठा धरून सेवा केली या करितां देशमुखमजकुरावरी कृपाळून याचे वतन यास बिलाकुसूर चालवावें ऐसा निर्वाह करून राजश्री रामचंद्रपंत यांस व राजश्री सुंदर तुकदेव यांस आज्ञा--पत्रें पाठविलीं आहे ते याचे वतन याचे स्वाधीन करून सुरक्षित चालवितील तुह्मीं एकनिष्ठेनें राहोन अलंगनोब्रत चौकस करून जागा स्वामीचा जतन करणें जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

संमत संमत
मंत्री सचिव

सुरू सूद बार

---

**लेखांक २४ श्री १६१५ भाद्रपद वद्य १**

स्वस्तिश्रीराज्याभिषेकशके २० श्रीमुखनामसंवत्सरे भाद्रपदबहुल प्रतिपदा भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणीं समस्तसेनाधुरंधर राजमान्य राजश्री धनाजी जाधवराऊ सेनापती यासि आज्ञा केली ऐसी जे तपे मसूर प्रा कराड येथील देशमुखीचें वतन सालाबाद माहादजी बिन सुलतानजी जगदळे याचे पिढी दर पिढी

चालत आलें आहे मधें काहींक दिवस भोगवटा उठला होता याक-
रितां माहादजी जगदळा चंजीचे मुकामीं हुजूर एऊन वर्तमान विदित
केलें व पूर्वील कागदपत्र व पादशाहाचें फर्मान होतें तें हि दाखविलें
त्यावरून स्वामीनें मनास आणून याचें वतन याचे दुमाला करून
प्रा मजकूरीच्या देशाधिकारियास आज्ञापत्र सादर केलें त्यास सांप्रत
राजश्री सुंदर तुकदेऊ दिा चिरंजीव राजश्री राजा कर्ण याणीं कथळा
केला कीं कराड परगणियाची देसमुखी राजश्री राजा कर्ण यास
दिल्ही त्यामध्यें मसूर तपियाची देसमुखी दिल्ही आहे ह्मणौन वतनासी
कथळा केला याकारितां माहादजी जगदळा मागती चंजीचे मुकामीं
हुजूर एऊन वर्तमान विदित केलें ऐशास पूर्वीं याचे कागदपत्र मनास
आणून निर्वाह करून याचें वतन खरें जालें याकरितां स्वामी कृपाळू
होऊन याचे स्वाधीन केलें कराडची देशमुखी चिरंजीव राजा कर्ण
याकडे दिल्ही आहे काहीं मसूर तपादेखील दिल्ही नाहीं ऐसें असतां सुं-
दर तुकदेऊ यास कथळा करावयास काय गरज होती हालीं स्वामीनें
मसूरतपियाची देशमुखी माहादजी जगदळे यास चालवावयासी आज्ञा
करून सुंदर तुकदेव यास आज्ञापत्र सादर केलें असे ते याउपारि क-
थळा करणार नाहीं तुह्मीं हें जाणोन तपेमसूरीची देशमुखी सालाबा-
दप्रमाणें माहादजी जगदळे याचे दुमाला करणें आणि याचे हातें स्वा-
मिकार्य घेत जाणें या वतनास खलेल करील त्यास ताकीद करणें
जाणिजे * बहुत लिहिणें तरी तुह्मीं सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

मा। सुरू सुद
पौा छ २८ रबिलोवल सन खमस

---

* येथून हस्ताक्षर राजारामाचें.

**लेखांक २५ श्री १६१५ भाद्रपद वद्य ११**

राजश्री सुंदर तुकदेऊ
गोसावी यासि

६) अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री राजा कर्ण दंडवत सुा सन अर्बा तिसैन अलफ तपे मसूर पाा कराड एथील देशमुखी पुरातन माहादजी बिन सुलतानजी जगदळे याचें वतन पुरातन चाललें आहे त्या वतनानिमित्य पूर्वीं चंदीच्या मुकामीं एऊन राजश्री स्वामिसंनिध आपलें वर्तमान सांगितलें आणि वतनानिमित्य सेरणी कबूल केली त्यावरी राजश्री स्वामीनें तपेमजकूरचें वतन यास मऱ्हामत करून वतनाचीं पत्रें करून दिल्हीं तें पत्रें घेऊन ते हि राा रामचंद्रपंतास जवळीं गेले तेहीं यापासून थोडेबहुत द्रव्य दिवाणांत घेऊन वतन यांचा यास दुंबाला केला त्यास तुह्मीं तपेमजकूर दो कराडप्रांतीची देसमुखी वतन आह्मास दिल्ही आहे ह्मणून याच्या वतनास इस्कील केलें याकारितां मशारनिले मागती चंजीस एऊन राजश्री स्वामीस वर्तमान विदित केलें त्यावरून आह्मास बोलाऊन राजश्री स्वामीनें आज्ञा केली कीं तपेमसूरची देशमुखी माहादजी जगदळे यास दिल्ही आहे एविशीं माा सुंदर तुकदेव यांस पत्र दिल्हें आहे तुह्मीं आपलीं पत्रें देऊन याचें वतन याचे स्वाधीन करणें तपेमजकुरीची देशमुखी यास दिल्ही आहे ह्मणून आज्ञा केली याकारितां तुह्मांस हें पत्र लिहिलें आहे तरी तपेमसूरची देशमुखी माहादजी जगदळे यास वौशपरंपरेनें चालवावे ऐसा निर्वाळूप राजश्री स्वामीनें पत्रें दिल्हीं आहेत तरी तुह्मीं तपेमजकूरचे वतनास इस्कील अथवा खलील न कारितां माहादजी जगदळे याचे स्वाधीन करून याचा मामला सुरक्षित चालवणें देशमुखीस हकलाजिमा व इनामती इसाफती जें आहे तें राजश्री स्वामीच्या पत्राप्रमाणें बिलाकुसूर चालवणें माहादजी जगदळे हे पुरातन सेवक एकनिष्ठ यांचें चालवणें राजश्री स्वामीस व आह्मास बहुत च अगत्य तरी तुह्मीं याउपरि कोणेविशीं उजूर न

कारितां याचें वतन यास सुरक्षित चाले ते गोष्टी करणें सर्वथा कथ-ळा न करणें या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र देशमुखास परतोन देणें छ २४ मोहरम

राजते
लेखना
वधिः

बालार्कभा
करोत्कृष्ठ बर्द्धि
ष्णुर्लोकपूजिता ॥
मुद्रा राम भुवा भा
ति कलि कर्णस्य
मर्दिनी

---

**लेखांक २६ श्री १६१५ आश्विन शुद्ध ११**

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके २० श्रीमुखनामसंवत्सरे आश्विनशुध एकादशी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजारामछत्रपति याणीं समस्त-राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्रपंडित अमात्य हुकमतपन्हा यांसि आज्ञा केली ऐसी जे माहादजी जगदळे देशमुख तपे मसूर प्रा कऱ्हाड याणें स्वामीचे सेवेसी विनंति केली कीं, ता मजकूरची देशमुखी आपलें पुरातन वतन तें स्वामीनें आपलें आपणास मोकरर करून दिल्हें पत्रें दिल्हीं त्यास रा सुंदर तुकदेऊ याणीं क-थळा केला होता तें हि वर्तमान स्वामीचे सेवेसी विदित केलियावरी स्वामी कृपाळू होऊन ताकीदपत्रें हि देविलीं आपण आपलें वतन अनभऊन असेन ऐशास मसूरतपांचे गांव पुरातन ५७ सत्तावन त्यास आदलशांचे कारकीर्दीस वीस गांव फूट गांव करून मोकासे दिधले होते मधें वतनाचे बाबें आदलशाहांचा फर्मान जाला तो वीस गांव देखील जाला नाहीं सततीस ३७ गांवांचा च फर्मान जाला परंतु आपणास सत्तावन गावींचा वतनाचा भोगवटा आहे पहिले इभराईम आदलशांचा फर्मान सत्तावन गांवांचा आहे परंतु स्वामीचे सेवेसी

एउनु वर्तमान विदित केलें तेव्हां पहिला फर्मान हाजीर नव्हता अली-कडीलचा फर्मान होता त्याप्रों आज्ञापत्र घेतलें परंतु पूर्वापर सत्तावन गांव आपले वतनाचे आहेती कैलासवासी स्वामीस देश हस्तगत जाला तेव्हां सदहू वीस गांव उंबरजेखालें व तारगांवाखालें वोढिले त्या गांवांस यादवांस स्वामीनें उंबरज--तारगांव---आउंद या माहालची देशमुखी दिल्ही आहे ह्मणून ते दखलगिरी कारिताती तरी आपले तपियाखालींल वीस गांव मोकाशांस निराळे करून दिधले होते ते आपले आपणाकडे देविले पाहिजेती म्हणौन बहुता प्रकारें विनंति केली. ते ऐकोन तुम्हांस हें आज्ञापत्र सादर केलें असे वृत्तिवतनाचा मामला बरहक्क करून जिकडील तिकडे देउनु सुरक्षित चालवावें ऐसें आहे याकारणें माहादजी जगदळे व यादव यांस गोतांत पाठऊनु हमशाही गोत मेळउनु पूर्वापर वृत्त मनास आणून वीस गांव मसूरतपियाचे ऐसें खरें होईल तरी मसूरतपियाखालें देवउनु तेथील देशमुखीचे वतन माहादजी जगदळे यास चालवणें जरी मसूर तपांचे गांव नव्हेत ऐसें असेल तरी ज्या माहालाखालें चालताती तैसे चालों देणें वृत्तीचा मामला आहे मनसुफी बरहक्क करवणें आणि जिकडील गांव तिकडे देणें लाइनी नसतां कथळा करील त्यास ताकीद करून कथळा नव्हे तें करणें जो काय निवाडा होईल तेणेप्रमाणें माहजर करउनु वर्तमान हुजूर लिहिणें तेणेंप्रमाणें स्वामीचीं पत्रें सादर होतील जाणिजे बहुत लिहिणें तरी तुम्हीं सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

बार

---

**लेखांक २७ श्री १६१५ आश्विन वद्य ९**

( शिक्का फारसी )

कौलनामा माहादजी जगदळे देसमुख पाा मसूर सरकार रायबाग बाा सुभे दारुलजफर बिजयापूर सन ११०५ कारणें दादे कौल-

नामा ऐसा जे तुझे देसमुखीवरी यादव उभे राहिले ते दूर करून तुझी देसमुखी पहिलेपासून चालत आली आहे तेणेंप्रमाणें तुझे दुमाला केली आहे देह ५७ सत्तावन गावीची देसमुखीचा कारभार करून रुजू राहाणें याउपरि तुझ्या वतनास कोणी खलेल करणार नाहीं कौल असे

गनीमासी सनद न पोहचावणें पोहोचवाल तर गुनेगार व्हाल मा सु॥ तेरीख २२ माहे सफर

---

लेखांक २८ श्री १६१६ चैत्र शुद्ध ३

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके २० भावसंवत्सरे चैत्र शुध तृतीया रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणीं समस्तराजकायधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्रपंडित अमात्य हुकमतपन्हां यांसि आज्ञा केली ऐसी जे माहादजी जगदळे देशमुख ता॥ मसूर परगणे कऱ्हाड याचे देशमुखीचे वतनाचा पूर्वीं कथळा जाला होता त्यास स्वामीनें याचे कागदपत्र फर्मान पूर्वील होते ते मनास आणून माहादजी जगदळे देशमुख स्वामींचे पायांसीं एकनिष्ट व स्वामिकार्याचा ह्मणून याजवरी कृपाळू होऊनु मसूरतरफेची देशमुखी याची यास मोकरर करून दिल्ही ते विशीं पूर्वीं तुह्मास पत्रें व सुभियास सनद व रा॥ सुंदर तुकदेऊ दि॥ चिरंजीव राजा कर्ण यास आज्ञापत्रें सादर केलीं ऐशास स्वामीचे पत्राप्रमाणें तुह्मीं पत्रें करून दिल्हीं तेणेंप्रमाणें व सुभांचे कागदप्रमाणें देशमुखमजकुराचे वतनाचा मामला चालत आहे रा॥ सुंदर तुकदेऊ याणीं वतनास इस्कील करून कथळा केला असे ह्मणौन विदित जालें व ता॥ मसूर माहालचे गांव ५७ सत्तावन फर्मानीं लिहिले आहेती त्यापैकीं गांव ३७ सततीस त्या माहालाखालें चालतांती बाकी २० वीस गांव यादव हे आपले ता॥ उंबरज व ता॥ तारगांव व ता॥ आउंद यांच्या कथळ्यामुळें चालत नाहीं ह्मणून विदित जालें तरी माहादजी जगदळे देसमुख ता॥ मसूर याचे देसमुखीचें वतन स्वामीनें करार करोन दिल्हें असतां रा॥ सुंदर तुकदेऊ यांस कथळा

करावया गरज काय हालीं स्वामीनें त्यांस ताकीद लेहून आज्ञापत्र पाठविलें असे तरी तुह्मी हि बरें दटाऊन ठांसोन माहादजी जगदळे याची देसमुखी ताा मसूर वतन बिलाकुसूर चाले तें करणें हक्कलाजिमा पूर्वीं देसमुखीस चालत आला असेल तो स्वामीनें सनदा सादर केल्या तेणेंप्रमाणें चालवणें व सत्तावन गांव पैकीं सततीस गांव मसुरे खाले चालताती वीस गांव चालत नाहीं त्यास हमशाही गोत देसमुख व मोकदम व मोख्तसर कुणबी चौगुले असतील ते एके जागा गोताईस मेळऊनु त्यांस करीना पुसऊनु त्यांचे साक्षीनें वीस गांव यादव मसुरेखालील नव्हेत ह्मणताती ते मसुरेखालीं न जाले तरी मसुरेखाले देऊनु माहादजी जगदळे याचें देसमुखीचें वतन चालवणें गोतमुखें ते वीस गांव मसुरेखालील नव्हेत ऐसें जालें तरी माहादजीस सततीस करोन देणें ज्या माहालचे गांव पूर्वीपासूनु चालिले असतील त्या माहालाखाले चालवणें यादवांस व माहादजी जगदळे यास कथळा होऊं न देणें स्वामीचे आज्ञेप्रमाणें ज्यांचें वतन त्यांस चालवीत जाणें जाणिजे बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

बार मांा

---

**लेखांक २९** **श्री** **१६१६ चैत्र शुद्ध ९**

० ✓
श्रीा राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नाळिकं
ठ मुख्य प्रधान

० श्री ✓
श्रीलक्ष्मी
नृहरिप्रीते
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके २० भावसंवत्सरे चैत्र शुध नवमी र-

विज्ञापना क्षत्रियकुलावतंस श्रीराजारामछत्रपति यांणीं माहादजी जगदळे देशमुख ताा मसूर परगणे कऱ्हाड यासि आज्ञा केली ऐसी जे विनंतिपत्र पाठविलें तें पावलें स्वामीच्या पत्राप्रमाणें राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याणीं आपलीं पत्रें करून दिल्ही आहेती परंतु राजश्री सुंदर तुकदेऊ देशमुखीचा मामला सुरळित चालों देत नाहींत तरी एविशीं त्यास ताकीद पाठविली पाहिजे ह्मणौन लिहिलें तें विदित जालें त्यावरून राजश्री रामचंद्रपंतास व सुंदर तुकदेऊ यांस पत्रें पाठविलीं आहेती तीं देणें ह्मणजे ते बिलाकुसूर देशमुखीचा मामला चालवितील इस्कील करणार नाहीं व स्वामीनें फर्मानप्रमाणें वीस गाऊ चालवायाची आज्ञा केली ते हि चालत नाहीं ह्मणोन लिहिलें तरी एविशीं हि उभयतांस लिहिलें आहे तें गोतमुखें मनास आणून चालवितील तुह्मीं गोताचे मुखें निवडून घेऊन देशमुखीचा मामला अनभवून सुखरूप असणें व माहामारीचा उपद्रव बहुत जाला आहे ह्मणून लिहिलें तें कळों आलें पुढें हि वरचेवरी त्या प्रांतींचें वर्तमान लिहीत जाणें जाणिजे निदेश समक्ष

(मर्या देयं विरा जते)

संमत मंत्री | संमत सचिव

सुरू सूद

---

**लेखांक ३०** **श्री** **१६१६ आषाढ शुद्ध २**

ठी ग्रंथा...
...नारायण

(श्रीरामचंद्र चरण नीळकंठ सोनदेव शरण)

आज्ञापत्र समस्त–राजकार्य–धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य ताा कमावीसदार दिा सुंदर तुकदेव सुा खमस तिसैन अलफ माहादजी जगदळे देसाई ताा मसूर याचे वतन

राजपत्राप्रमाणें यांचे दुमाला हुजरून केलें असतां तुह्मीं याकडील खेड्यास अजार देता याच्या वतनाचा मामला चालूं देत नाहीं ह्मणून कळों आलें तरी या लबाडीहून तुह्मास गरज नाहीं फिरोन बोभाट आला ह्मणजे आपले केलें पावाल हे नेमस्त समजणे छ १ जिलकाद निदेश समक्ष

लेखन
सीमा समु
ल्लसति

सुरू सूद

---

**लेखांक ३१ श्री १६१६ आषाढ शुद्ध २**

सकल-गुणालंकरण-अखंडित
लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य राजश्री
सुंदरपंत गोसावी यासी

सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार येथील कुशल जाणऊन स्वकीय लिहिणें विशेष रा माहादजी जगदळे देसाई ता मसूर याचे वतन राजपत्राप्रा याचे दुमाळा केलें असतां तुह्मीं यासी कटकट कारिता ह्मणून कळों आलें तरी तुह्मास याच्या वतनासी कटकट करावया प्रयोजन नाहीं तुह्माकडील कमावीसदार आहेत त्यांसही ताकीद करून सांगणें ये गोस्टीस अंतर पडों न देणें छ १ जिल्काद *बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा

लेखन
सीमा समु
ल्लसति

---

* येथून हस्ताक्षर रामचंद्र नीळकंठाचें.

लेखांक ३२ श्री १६१६ आषाढ वद्य १२

श्रीरामचं
द्रचरण नील
कंठ सोनदेव
शरण

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्रपंडित अमात्य ता मोकदमानी मौजे मुदरुल ता मसूर सुा खमस तिसैन अलफ राजश्री माहादजी जगदळे देसमुख यांचा देसमुखीचा मामला मौजेमजकुरीचा द्यावया तुह्मीं इस्कील करितां बिलाकुसूर मिळो देत नाहीं ह्मणौन विदित जालें तरी लबाडी कराल ह्मणजे तुमचा मुलाहिजा होणार नाहीं आपलें केलें पावाल हें नेमस्त समजोन त्याचा देसमुखीचा मामला बिलाकुसूर चालवणें छ २५ जिलकाद निदेश समक्ष

लेखन
सीमा समु
ल्लसति

---

लेखांक ३३ १६१६ श्रावण शुद्ध ९

माहाजर बतेरीख छ ७ जिल्हेज सुर्कवार शके १६१६ वर्शे भावानामसंवछरे श्रावण सुद नवमी ते दिनी थळ मौजे किवळ ता मसूर हाजीरमजालसी

बेहुजूर गाा

| | |
|---|---|
| निळोजी बिन भोजजी पटेल साळोके ( निशाणी नांगराची ) | एसजी बिन बाळोजी पटेल साळोके |
| रामोजी बिन अनाजी पटेल | बाबाजी नारायण कुलकर्णी |
| खंडोजी बिन अबाजी चौगला मौजेमजकूर | सिवाजी सखदेव कुलकर्णी |
| बहिरोजी सरकला रया मौजेमजकूर | जोतिषी मोा मार व मौजे केलवडे पा मरडी मौजे देगांव ता सातारा ( सदर दोनी गाव बाणजी |

तुळाजी बिन बहिरोजी सुतार

( निशाणी तासणी )

माहार

१ होना बिन तुकनाक

१ सता बिन सया

२

( निशान विळा दोर )

माणका बिन खवळा धरणा

( निशान धुपारीती )

नारा समंध नाहीं. )

धनसेटी रया मौजे मार

( निशाणी तागडी )

निंबा बिन तुकोजी परीट

( निशान बगणी )

रूपा बिन वाघा चांभार

( निशाणी रापी )

खत्रोजी बिन एमाजी मिरग

कोंडजी बिन हरजी माडिवा

मानाजी बिन चांगोजी काथवटे

खातेवाडी मौजे मजकूर

बिा विसाजी नरहरी कुळकर्णी निा रुद्राजी चंदो

या विदमानें लेहून दिल्हा माहाजर ऐसा जे माहादजी बिन सुलतानजी जगदळे देसमुख ता मजकूर याची देसमुखी अवलादी बुनादी होती ऐसें आपणास ठावकें आहे व आपले वडिलानीं सांगितलें आहे आतां कांहीं एक दिवस अमानत पडोन भोगवटा उठला होता त्यास राजश्री छत्रपतीसाहेबानीं कागदपत्र फर्मान व माहाजर मनास आणला याची देसमुखी याचे दुमाला केली ऐसियासी यादवानीं आपली देसमुखी ह्मणौन कथळा कारितात तर यादवांनीं जगदळियासी कथळा करावया गरज नाहीं आपले वडिलानीं हि कुल बुनादी सांगितली होती जे जगदळियाची देसमुखी खरी आहे व आह्मांस हि ठावकें आहे कीं पिडी दर पिडी जगदळियाची देसमुखी आहे यादवांनीं अगर कोणी कथळा करावया गरज नाहीं हा माहाजर सही वळी सुमार १८ अठरा

**लेखांक ३४** **१६१६ श्रावण शुद्ध ९**

दर बंदगी माहाराज राजश्री
साहेबाचे बंदगीस

जाब सूद

.॥ॐ॥ अर्दास अज बंदगी बादे कमीन कमतरीन बादेगान सेरीक निळोजी पटेल व एसजी पटेल व जानोजी पटेल मोकदम मौजे किवळ ता। मसूर सु॥ खमस तिसैन अलफ

अर्जे मीरसानद बा। ता। छ ७ माहे जिल्हेज साहेबाचे नेक नजर करून सेरीकराची बखेर सलायत असे

बा। साहेब सलामती माहादजी बिन सुलतानजी जगदळे देसमुख ता। मजकूर याची देसमुखी साहेबीं पूर्व प्रकारें कागद पत्र फर्मान माहाजर मनास आणून याची देसमुखी याचे दुमाला केली ऐसियासि यादवास साहेबीं उंबरज तरफ व तारगांव तरफ ह्मणऊन कागद करून दिल्हा तर उंबरज तरफ व तारगांव तरफ कदीम नव्हेत कदीम मसूर तरफ आहे ऐलेकडे साहेबाचे राज्यामधें धामधुमेच्या प्रसंगाकारितां जेथें ठाणें बैसल ह्मणौन त्या गावाची तरफ जाहाली मसूर उंबरज तारगांव हे कांहीं निराळे माहाल नव्हत एक मसूर तरफ जगदळियाची देसमुखी आहे यादवांनीं कथळा करावयास गरज नाहीं बंदगीस रोशन होय हे अर्दास*

( निशाणी नांगर )

---

* ह्या पत्राला श्रीकार नाहीं. मोर्तब नांगराचा आहे. अशीच आणीक एक बखेर मसूरच्या शेटेमहाजनांची आहे.

**लेखांक ३५** **१६१६ श्रावण शुद्ध ९**

दुरबंदगी महाराज राजश्री
साहेबाचे बादगीस

जाबसूद

॥ᘏ अर्दास अज बादगी बादेकमीन कमतरीन बादेगानी सेरीकर हणगोजी पाा व दादजी पटेल मोकदम मौजे रिसवड ताा मसूर सुाा खमस तिसैन अलफ

अर्ज मेरसानद बाा ताा छ ७ माहे जिल्हेजीं साहेबाचे नेक नजरे कडून सेरीकराचे बखेर सलायत असे

बाा साहेबसलामत माहादजी बिन सुलतानजी जगदळे देसमूख ताा मजकूर याची देसमुखी साहेबीं पूर्व प्रकारें कागदपत्र फर्मान माहजर मनास आणून याची देसमुखी याचे दुमाला दिली ऐसीयासी यादवास साहेबीं उंबरज तरफ तारगाऊ तरफ ह्मणऊन कागद करून दिला तरी उंबरज तरफ तारगाऊ तरफ कदीम नव्हता कदीम मसूर तरफ आहे ऐलेकडे साहेबाचे राज्यामधें धामधूमेच्या प्रसंगीं जेथें ठाणें बसले ह्मणवून त्या गावाची तरफ जाली मसूर उंबरज तारगाऊ हे काही नवीन महाल नव्हत एक मसूर तरफ हे जगदळे यांची देसमुखी आहे यादवानीं कथला करावया गरज नाहीं बादगी रोशन् होय हे अर्दास

( निशाणी नांगराची )

---

**लेखांक ३६** **श्री** **१६१६ श्रावण वद्य ४**

माहाराज राजश्री साहेबाचे
सेवेसी

विनंति सेवक चांदजीराऊ पाटणकर देसमुख प्राा दत+गीर पाठण सेवेसी प्रार्थना विनंति उपरि सेवकाचें वर्तमान तरी ताा छ १७

जिल्हेज सन खमस तिसैन अलफ पावे तों स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे

ऽ) राजश्री माहादजी बिन सुलतानजी जगदळे देसमुख ताा मसूर यांत व यादवांत देसमुखीचा गर्गशा लागला आहे ऐसियासि पूर्वीं वडिलाचे वडील सांगत आले आहेत कीं जगदळियाची देसमुखी आहे एविसीं हक्कजवांरीचे माहाजर आहेत व पाताशाई फर्मान आहेत ते साहेबीं मनास आणून देसमुखी दुमाला केली आहे मागती या प्रांतीं कोणी यादवाची पाठी राखोन यासि कटकट करिताती तरी स्वामीनें हक्कजवारीचे माहाजर मनास आणून याचें वतन याचे दुमाला करणार स्वामी धणी आहेत परंतु देसमुखी जगदळियाची खरी आहे हें वर्तमान वडिलाचे वडिलीं सांगितलें आहे व सेवकास विदित आहे साहेबीं यादवास पत्रें दिल्हीं आहेत कीं उंबरज तरफ व तारगाऊ तरफ येथील देसमुखी यादवाची ह्मणऊन पत्रें दिल्हीं आहेत ऐसियासि उंबरज व तारगांऊ या तरफा कदीम नव्हेत मसूर तरफ कदीम आहे अलीकडे या राज्यांत कबजगिरी आधीं जाली ते गावीं ठाणें बैसऊन तरफा केलिया आहेत सेवेसी श्रुत होय हे विनंति

श्री
चांदजी राऊ
पाटणकर

---

**लेखांक ३७** **१६१६ भाद्रपद शुद्ध १**

राजश्री हवालदार व कारकून ताा मसूर व तारगाऊ
साहेबाचे सेवेसी

॥ऽ) अर्दास शेरीकर मोकदमानी मौजे पाडळी भिवजी पटेल व जानोजी पटेल व गोपाळ त्रिमळ कुलकरणी मौजेमजकूर व ताा तारगाऊ सुाा खमस तिसैन अलफ इाा ताा छ माहे जिल्हेज पावेतों साहेबाचे नेक नजरेकरून शेरीकराची बखेर सलायत असे

माहे जिल्हेज रा। माहादजी बिन सुलतानजी जगदळे देसमुख ता। मसूर याची देसमुखी राजश्री साहेबानीं बुनादी कागद पत्र व फर्मान पाहून करार करून दुमाला केली ऐसियास यादवानीं कथळा केला आहे तरी यादवानीं कथळा करावयास गरज नाहीं आमचे वडिलानीं जगदळियाची देशमुखी बुनादी सांगितली आहे यावरून जगदळियासि आह्मी माहजर करून दिल्हा आहे आपले वडिलाचे वडील यानीं देसमुखी जगदळियाची ऐसें सांगितलें आहे हे गोष्ट खरी आहे यासि बखेर लेहून देणें हे अर्दास

---

**लेखांक ३८** **१६१६ भाद्रपद शुद्ध १**

बखेर सेवेसी सेवक मोरो जनार्दन कारकून ता। उंबरज व मसूर साहेबासी विनंति सु॥ खमस तिसैन अलफ ता। छ माहे स्वामीच्या कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान व माहालीचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीचें आज्ञापत्र सादर जाहालें छ २१ जिल्हेज पो। छ २९ मिनहू तेथें आज्ञा कीं मा। माहादजी जगदळे देसमुख ता। मसूर याचे देसमुखीवरी यादव उभे राहिले आहेती तरी तुह्मी तरफमजकुरीचे गावगन्ना वतनदार पाटीलकुलकर्णी चौगले मोख्तसर बोलाऊन आणून श्रीकृष्णातीरीं जमा करून त्यांसी शफत घालून विचारणें ते सांगतील तें करीना हुजूर लेहून पाठवणें ह्मणौन आज्ञाप्रमाणें ता।मजकूरीचे पाटील कुळकर्णी चौगले व सेटेमाहाजन व बारा बलुते मोख्तसर बोलाऊन आणून थळ कसबे उंबरज तेथें श्रीकृष्णासंगमीं छ १७ मिनहू बुधवारीं पाटील कुलकर्णी चौगले मोख्तसर ऐसे कृष्णेमधें घालून त्यांचे माथा शफत घालून विचारिलें कीं राजश्री पंतअमात्य स्वामीनीं आह्मास आज्ञापत्र सादर केलें आहे कीं माहादजी जगदळे देसमुख याचे देसमुखीवरी यादव उभे राहिले आहेती तरी तुह्मीं गांवगावीचे पाटील कुलकर्णी चौगले कृष्णातीरीं मिळऊन त्यास शफत घालून विचारणें ह्मणौन आज्ञा आहे

तरी तुह्मीं श्रीकृष्णेंत उभे राहून आपले पूर्वज स्मरोन तुह्मांस ठावकें असेल अगर तुमचे वडिलांनीं सांगितलें असेल तें सत्यपूर्वक सांगणें त्यावरी तरफमजकुरीचे पाटील कुलकर्णी चौगले यानीं आपले माथा शफथ घेऊन आपले पूर्वज स्मरोन श्रीकृष्णेंस रिघोन सांगितलें कीं माहादजी बिन सुलतानजी ( पुढें फाटलें )

---

**लेखांक ३९ श्री १६१६ कार्तिक शुद्ध ७**

माहाराज राजश्री छत्रपति

स्वामिंचे सेवेसी

सेवक संताजी घोरपडे सेनापति व लेखक कृतानेक सेवेसी विज्ञापना विनंति एथील वर्तमान ताा छ ५ रबिलोवल मुाा सातारा स्वामीच्या कृपादृष्टीकरून सेवकाचें व लस्करचें वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामींचें आज्ञापत्र छ २४ साबानचें सादर तें छ ६ जिलकादीं प्रविष्ट जाहालें तेथें आज्ञा कीं राा माहादजी जगदळे देशमुख ताा मसूर हे हुजूर येऊन विदित केलें कीं ताा मजकूरची देशमुखी आपली कदीम पुरातन आहे त्यास सांप्रत आपला भोगवटा उठला आहे तर स्वामी कृपाळू होऊनु आपली देशमुखी आपल्या स्वाधीन केली पाहिजे ह्मणौ-उनु त्याजवरून मशारनिलेच्या देशमुखीचें फर्मान बेदरपातशाहाचें व इदलशाही पातशाहीचें मनास आणून त्या प्रांतीचे वतनदार हमशाई गावींचे याप्रों स्वामीसंनिध आहेत त्याणीं याची देशमुखी पुरातन आहे ऐसी साक्ष दिली त्यावरून तर्फमजकूरची देशमुखी याचे दुमाला केली आहे तुह्मी याची हरबाबें मदत करून याची देशमुखी याचे दुमाला करून चालवीत जाणें ह्मणौउनु आज्ञा आज्ञेप्रमाणें राजश्री रामचंद्रपंत अमात्य व आह्मीं पुन्हा मागती कागदपत्र मनास आणून ताा मजकू-रची देशमुखी मशारनिलेच्या दुमाला केली आहे स्वामीच्या आज्ञेप्रमाणें चालऊन हक्कजवार हमशाई गावीच्या मोकदमांनी गोतपत्र करून दिल्हें

आहे माहादजीचें वतन पुरातन आहे हें आह्मीं हक्कजवारीच्या गुंती-मुळें व कागदपत्रामुळें चौकस मनास आणून दुमाला केलें असे तरीं स्वामीनें यांचा पुत्रपौत्रीं यांची देशमुखी तर्फमजकूरची चालवावया स्वामी धणी आहेत माहादजीनें स्वामीच्या पायांशीं बहुत च एकनिष्ठेनें वर्तणूक केली आहे पुढें हि यापासून अंतर पडणार नाहीं यासी कितेक लोक सुष्ट दुष्ट आहेत स्वामीपासीं कांहीं विपरीत करून सांगतील त्यावरून स्वामीस प्रमाण वाटेल याच्या वृत्तीस मामलियांत दुष्ट बहुत च आहेत हर कोणी सांगतील तें स्वामीनें मनावर न घेतलें पाहिजे *ए विसीचें वृत्त राजश्री रामचंद्र अमात्य एहीं सेवेसी लिहिलें आहे त्यावरून विदित होईल सेवेसी श्रुत होय

++++++
++++++
+ प्रभा ॥ संताजी घोर
पडे तस्य मुद्रा भा
ति जयप्रदा

---

**लेखांक ४० श्रीशंकर १६१६ कार्तिक शुद्ध ७**

राजश्री भानजी गोपाळ सरसुभेदार
व कारकून प्रा कऱ्हाड गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्नेहांकित संताजी घोरपडे सेनापती जफ्तनमुल्क दंडवत सुा खमस तिसैन अलफ विशेश यादवामधें व माहादजी जगदळे या उभयतांमधें मसूरचे देशमुखीचा गर्गशा आहे त्याकारणें रा पंतअमात्य यानीं माहालच्या कारकुनास लिहिलें होतें कीं हमशाही गोत पाटील मेळऊन कृष्णेमधें उभे करून बरहक्क असेल तें करणें त्यावरून माहालकरी यानीं रा पंताचे लिहिल्या-

---

* एथपासून हस्ताक्षर संताजी घोरपडे याचें.

प्रमाणें निर्वाह केला आहे याउपर रा पंत तुह्मांस लिहितील तेणेंप्रमाणें वर्तणूक केली पाहिजे बहुत काय लिहिणें कृपा असो दीजे रा छ ५ रबिलोवल हे विनंति

विराजते
लेखना
वधि

---

**लेखांक ४१** **१६१६ मार्गशीर्ष शुद्ध ९**

माहाराज राजश्री छत्रपती
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक सेवेसी सेवक मोरो रायाजी पारपत्यगार ता मसूर व उंबरज विज्ञाप्ति सुा खमस तिसैन अलफ छ ७ माहे रबिलाखर स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें व माहालीचें वर्तमान यथास्थित असे दाा माहादजी जगदळा देसमुख ता मसूर स्वामिसंनिध चंदीप्रांतें येऊनु स्वामीचें आज्ञापत्र राजश्री पंतअमात्य यांस सादर जाहालें तेथें आज्ञा कीं माहादजी जगदळा देसमुख ता मसूर देह ५७ याची करीना हमशाही गोत मिळवून करीना पाहून दुमाला करणें ह्मणऊन आज्ञा आज्ञेप्रमाणें अमात्य एहीं माहालीच्या कारकुनास आज्ञा केली आज्ञेप्रमाणें तरफमजकूरीचे पाटीलकुलकर्णी उंबरजेचे संगमीं समस्त गोत व हमशाही माहालीचे मिळोन कृष्णेमधें उभे राहून आपले इमानपूर्वक बेताळीस स्मरोन सांगितलें कीं जगदळियांची देसमुखी खरी व यादव लटिके त्यावरून साक्षपत्र जाहालें त्यावरी तमाम देसक व पाटील एहीं आपलीं निशानें करून दिल्हीं राजश्री अमात्य व राजश्री पंतसचिव व राजश्री संताजी घोरपडे सेनापती व राजश्री जाधवराऊ सरलस्कर एहीं पत्रें दिल्हीं देसमुखी दुमाला केली देसमुखी करीत असतां गिरजोजी यादव एहीं स्वामीचें पत्र व आपलें पत्र ऐसें पंत अमात्य यांस सादर जाहालें त्यावरून पुन्हां यांचे वृत्तीस अंतर जाहालें माहा-

दजी जगदळा देसमुख ता। मसूरास आला तव सुभेदार पा। सातारा स्वारीस या प्रांते आले गांवगन्ना पाटील तामाम मिळाले होते त्यांस पुसोन मनास सुभेदारीं आणिलें तव रुद्राजी चंदो देसकुळकर्णी व तमाम मोकदम व पाटील व कुळकर्णी यानीं साक्ष दिल्ही जे माहादजी जगदळा देसमुख देहाय ५७ खरा यादव लटिके ऐसी साक्ष दिल्ही व पुरातन पत्रें पाहिलीं जगदळियाची देसमुखी हें स्वामीचे सेवेसी विनंतिपत्र लेहून दिल्हें स्वामी अवतारी त्या अवतारे बिभीशणाची स्थापना जाहाली तो चिरंजीव जाहाला तो च हा अवतार दुष्टाचा संव्हार धर्माची स्थापना होत आहे पूर्वीं हि वृत्तीवर यांची स्थापना स्वामींनीं केली ते अनेथा होणार नाहीं माहादजी जगदळा देसमुख ता। मार खरा ऐसी साक्ष आहे त्याहिवरी देश यानें लाविला स्वामींच्या पायांसी एकनिष्ट दुसरा पदार्थ जाणत नाहीं कृपाळु होऊन स्थापना करणार स्वामी समर्थ आहेती जाहालें वर्तमान सेवेसी लिहिलें सेवेसी श्रुत होय हे विनंति*

श्री
सीवचरणीं
तत्पर रायाजी
सुत मोरो निरं
तर

---

**लेखांक ४२** श्री **१६१६ मार्गशीर्ष शुद्ध १३**

माहाराज राजाधीश राजश्री
छत्रपती स्वामीचे सेवेसी

विनंतिपत्र सेवक तिमाजी यमाजी सुभेदार व कारकून सुभा प्रात सातारा सेवेसी कृतानेक विज्ञापना विनंति एथील क्षेम ता। छ ११

---

* याच शब्दांत लिहिलेली दुसरी विज्ञप्ति मल्हारी जगन्नाथ पारपत्यगार ब्राह्मण याची आहे. तिचा मथळाः—माहाराज राजश्री सिंहासनाधीश्वर
छत्रपती स्वामीचे सेवेसी

रविलाखर पावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून सुभेमजकूरचे वर्तमान यथास्थित असे

दा। स्वामींनें माहादजी जगदळे यांवरी कृपाळू होऊन मसूर तर्फेची देसमुखी त्यांचे दुमाला करून आज्ञापत्रें पाठविलीं त्याप्रमाणें राजश्री पंतअमात्य एहीं दुमाला करून याचे हातें देसमुखीचें प्रयोजन घेत असतां त्याउपरि यादवांनीं हुजरून देसमुखीचीं पत्रें आणिलीं त्यावरून राजश्री पंतअमात्य याणीं व राजश्री संताजी घोरपडे सेनापती यानीं गोत मिळऊन मनास आणणें ह्मणून माहालकरी यास पत्र पाठविलें त्यावरून मसूर व तारगाव तर्फेचे हवालदार मजमदारी गावगन्नाचे पाटील चौगले गावगन्नाचे कुल गोत मिळऊन श्रीकृष्णेमध्यें घातलें जे मसूर तर्फेचे तुमचे कोण देसमुख देसमुखी जगदळेची कीं यादवाची त्यावरून गावगन्नाचे पाटील श्रीकृष्णेमध्यें रिघोन सत्य स्मरोन गोही दिल्ही ते स्थळीं साक्षपत्र करून दिलें तें व माहालचे हवालदारांची बखेर ऐसी घेऊन माहादजी जगदळे स्वामीचे सेवेसी आले आहेत मनास आणून पारपत्य करणार स्वामी धणी मायबाप आहेत सेवेसी विदित होय हे विनंति

श्री
श्रीमच्छंकरभ
क्तस्य यमाजीतनु
जस्य च यशोनिधि ति
माजस्य मुद्रेयं रा
जते शुभा

---

**लेखांक ४३** **श्री** **१६१७ ज्येष्ठ शुद्ध १३**

श्रीराम जय राम
जय जय राम

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २२ युवनाम संवत्सरे ज्येष्ट शुध त्रियोदशी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत सातारा

यासी आज्ञा केली ऐसी जे माहादजी बिन सुलतानजी जगदळे याणीं चंदीचे मुकामीं स्वामिसंनिध एऊन विनंति केली कीं आपले पाटेलगीचे गांव आहेत त्या गांवपैकीं इनाम चावर पांच दिल्हीयानें आपल्या गावींच्या देवांस व वतनदारांस व आपल्यास वाटून घेऊन वतनावरी सुखरूप असों ह्मणोन विदित केलें त्यावरून मनास आणिता माहादजी जगदळे स्वामीसेवेचे ठायीं वतनावरी तत्पर ऐसे जाणोन देवास व पाटिलास व कुलकर्णी यास व बाजे वतनदारास नूतन इनाम विसा पांडाचे बिघियानें जमीन चावर ५० बिा

देवस्तान श्री जटाशंकर व श्री भवानी काा मसूर या देवास
राजश्री कैलासवासी स्वामीनीं

( अपूर्ण )

सही छ १९ रमजान

---

**लेखांक ४४ श्री १६१७ ज्येष्ठ शुद्ध १४**

॰ ॅ
श्रीा राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्रीलक्ष्मि
नृहरिप्रीते
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके २२ युवनामसंवत्छरे जेष्ट शुध चतुर्दशी भृगुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणि राजश्री तिमाजी यमाजी देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत सातारा यांसि आज्ञा केली ऐसी जे माहादजी बिन सुलतानजी जगदळा पाटील

देहाय तीन याणें वतनावरी राहोन स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली व पुढें हि करीत आहे यास्तव याजवरी चंदीचे मुकामीं स्वामी कृपाळू होऊन यास + + + इनाम जिरात चावर ५ पांच देविलें ते समयीं माहादजी पाटील याणें विनंति केली कीं स्वामींनीं आपणास पांच चावर इनाम देविला त्याजपैकीं कसबा मसुरामध्यें देवस्थान आहे त्यास कांहीं व कसबे मजकुरीचे वतनदारांस कांहीं व खासा आपणास कांहीं ऐसें वाटून देविलें पाहिजे अव्वल दुम सीम बितपसील

देवस्थान कसबा मसूर श्रीजटाशंकर
व श्रीभवानी यांसि राजश्री कैलास-
वासी स्वामींनीं पुजाउछाहास पूर्वीं
मोईन करून दिल्ही आहे तेणेप्रमाणें
हा काल पावेतों चालत आहे त्याखे-
रीज सांप्रत जाजती भूमी बिघे .।१०

खासा मजला व वतनदारांस

| खासा मजला माझे पाटिलकीचे गांव आहेत त्याजपैकीं | बाजे वतनदार कसबामसूरचे यांस कसबामजकूरपैकीं भूमी |
|---|---|
| २।।।· कसबा मसूरपैकीं देखील माझे वाहतीचे ठिकाण बिघे ·।२० पन्नास एकूण | ८१० खोत पंडियाचें यासि वाडीपैकीं |
| | ८५ खोत हणमंतवाडी |
| ·।।· मौ शिरवडेपैकीं | ८५ खोत वजरवाडी |
| ८२० मौ कोणगव्हाण | ८१० |
| ३।२० | ८१५ चौगुला |
| रामाजी त्रिमळ कुलकरणी | ८१५ सुतार |
| व जोतिषी कसबा मसूर | ८५ सेटियास |
| याचे वाहातीचे ठिकाण | ८५ चौधरी |

| | | | |
|---|---|---|---|
| बिघे १० बाबा देखील | | ८३ | ठाकूर |
| भूमि | | ८७ | न्हावी |
| ·।२० | कुलकर्णास | ८५ | परीट |
| ८१० | जोतिषपणास | ८२ | कुंभार |
| -॥· | | ८१५ | माहार |
| | | ८५ | तराळ |
| | | ८३ | चांभार |
| | | -।॥- | |

एकूण पांच चावर सदर्हूप्रमाणें देविलीयानें वतनावरी स्वामिसेवा करून सुखरूप असोन ह्मणौन विनंति केली त्याजवरून पाटिलमजकुरावरी स्वामी संतोषी होऊन सदर्हूप्रमाणें नावनिसीवार इनाम भूमी चावर ५ पांच रास कुलबाब कुलकानू देखील हालीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार करून विसा पांडाच्या बिघियानें भूमि इनाम दिल्हा असे तर याचे स्वाधीन करून यासि व याच्या पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें व देवस्थानास उत्तरोत्तर चालवणें प्रतिवर्षी नवीन पत्राची अपेक्षा न करणें या पत्राची प्रति लेहून घेऊन मुख्य पत्र पाटिलमजकुरापासीं परतोन देणें जाणिजे निदेश समक्ष

संमत रुजू रुजू
मंत्री सुमंत

मर्या
देयं विरा
जते

तेरीख १३ सौवाल
सुा खमस तिसैन अलफ
बार सूद सुरू सूद बार बार बार

लेखन
सीमा समु
ल्लसति

लेखांक ४५ श्री १६१७ ज्येष्ठ वद्य ६

जाब सूद

माहाराज राजश्री छत्रपती
स्वामीचे सेवसी

सेवक आज्ञाधारक संताजी घोरपडे सेनापती जफ्तन–मुल्ख व लेखक कृतानेक विज्ञापना विनंति स्वामीचे कृपाद्रिष्टीकडून ता। छ १९ सौवाल मुकाम कटापूर सा। कोरेगाऊ परयंत वर्तमान सेवकाचे व सेनेचे यथास्थित असे विशेष रा। माहादजी जगदळे हे स्वामीचे सेवेसी पुर्वी आले होते त्यावरून महाराज कृपाळू होऊन मसूर तर्फेची देशमुखी करार करून आज्ञा दिल्ही त्यावरून देशास येऊन वतनाची लावणी सांचणी करून स्वामीकार्य करीत होते त्यास सांप्रत पदाजी यादव व आणिखी त्याचे भाऊबंद यास देसमुखीच्या सनदा दिल्या ते देशास येऊन खटपट करितात यावरून वतनाचा व मुलुकाचा डोहणा होतो सांप्रत माहादजी जगदळे स्वामीचें पायापासीं आले आहेत पुर्वीपासून स्वामीच्या राज्यांत एकनिष्टपणें सेवा केली स्वामी दयाळू होऊन देशमुखी करार केली त्याप्रमाणें यादव यास मागती पत्र करून दिल्हें पाहिजे दया पूर्ण केली पाहिजे

---

लेखांक ४६ श्रीराम १६१८ वैशाख वद्य १२

राजश्री तिमाजी यमाजी + + + + +
व कारकून प्रा। सातारा गोसावी यांसि

॥ ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य राजश्री केदारजी सुरवैसी सरनौबत सरकार रा। मुरारजी घोरपडे वजारतमाब दंडवत सुहुरसन सीत तिसैन अलफ रा। पंतअमात्य यानीं माहलीचे कारकून बैसउनु पाटिलांस कृष्णेमधें घाळून रा। माहादजी देसाई याचे कागदपत्र करून दिल्हे होते कागद व तुमचे बखेर घेउनु हुजूर रा। स्वामीजवळी

आले होते एथें गिरजोजी यादव यानीं कटकट केली होती त्यास रा हिंदूरायानीं नाना प्रकारें माहादजी देसाई याचे अभिमान धरून कागदपत्र करून पाठविलें असे एथें च कागदपत्र करून देत होतों त्यास गिरजोजी यादव ह्मणों लागले जे मागुती जाउनु तेथें निवाड करून घेऊं ह्मणउनु विनंति केली त्यावरून उभयतांस हि तुह्माकडे पाठविलें असे जे पाटील कृष्णेमधें निघोन निवाडा करून दिल्हे होते ते च आणून मागुती एकदा निवाडा करून देणें पहिलियानें एकदा कृष्णेमधें निघोन एक सांगितलें दुसरेयानें दुसरें सांगितले यानें त्यांचे मुलाहिजा कोणी करणार नाहीं ज्याचे अभिमान रा हिंदूरायानीं धरिले असतील त्याचे व्रित्तीस नास होईल हे तों गोष्टी कालत्रई घडणार कळलें पाहिजे तुह्मीं देसाइयाचे जैसे जैसें चालवाल तैसे तैसें रा रामाची कृपा तुह्मावरी विशेष होईल कळलें पाहिजे जाणिजे छ २५ माहे सौवाल

लेखन सीमा

० ✓
श्रीमार्तंडचरणी तत्प
र बहिरजीसुत मुरा
रजी घोरपडे नबक
सं तस्य सेवक केदार
जी सुर्येवौसी निरंतर

---

**लेखांक ४७ श्री १६१८ आश्विन वद्य ५**

माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी

जाबसूद

सेवक धनाजी जाधवराऊ सरलस्कर कृतानेकविज्ञापना एथील क्षेम ता। छ १८ रबिलाखर परियंत सेवकाचें व ए प्रांतींचें वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनीं आज्ञापत्रें पाठविलीं तेथें आज्ञा कीं माहादजी जगदळे यास स्वामीनें कृपाळू होऊन देसमुखी दिल्ही आहे

तर सुरळितपणें वतन चाले तें करणें ह्मणून आज्ञा केली आज्ञेप्रमाणें त्याचे वतनाचा मामला चाली लागला असे सांप्रत स्वामीची आज्ञा यादवाचे देशमुखीचे गाव आहेत ते यादवाचे स्वाधीन करणें ऐसी हि आज्ञा जाली असे राजश्री पंतअमात्य एहीं हमशाही गोत मिळऊन गोतमुखें माहाजर करून विनंतिपत्र सेवेसीं लिहिलें व माहाजर घेऊन माहादजी जगदळा हि आला आहे तरी स्वामीनें चित्तास आणून पारपत्य करावयास स्वामी धणी आहेत माहादजी जगदळे एकनिष्टपणें वतनदारीची सेवा करावते स्वामीनें हि वृत्तीची स्थापना करून दिली आहे हालीं मशारनिले सेवेसी विनंति करितां विदित होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापि

श्री
राजारामचरणी दृढभा
व सेनापति ध
नाजो जाधवराव

---

**लेखांक ४८ श्रीराम १६१८ कार्तिक शुद्ध १**

० श्री ०
राजाराम
चरणीं दृढभा
व सेनापति ध
नाजी जाध
वराव

समस्तसेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री धनाजी जाधवराऊ तहां मोकदमानी व रयानी देहाय सत्तावन व खोत जकाती का। मसूर प्रा। कऱ्हाड

मौजे चिखली
,, किवळ
,, रिसवड
,, चरेगाऊ
,, नागठाणें
,, वाघेरी
,, पाचुंद
,, शाहापूर
,, शिरवडें
,, तासवडें
,, नाडोली
,, इंदोरी
,, वराडें
,, तारगाऊं
,, सिरगाऊं
,, मरळी
,, चोरें
,, कोर्टी
,, इंदोली
,, इंगनोळें
,, पेरलें
,, मारुल
,, मुदरूळ डोणीचें
,, सांगवड
,, केर

मौजे डेरवण
,, काशीळ
,, शिवडें
,, वडोली भिकेश्वर
,, खराडें
,, कालगाऊं
,, पाडळी
,, हेळगाऊ
,, नागझरी
,, वाटार
,, वरणें
,, कोपडें खुर्द
,, निगडी घोलप
,, अतीत
,, एणेगाऊ
,, उंबरज
,, गारवडे*

पथके जकाती

---

* बाकीच्या पंधरा गांवांचीं नांवें फाटून गेलीं आहेत.

सुा सन खमस तिसैन तरफ मजकूरची देशमुखी माहादजी जगदळे याची पुरातन + + + त्यास यादव विसा गावांची देशमुखी आपली ह्मणून कथळा करीत आहेती हमशाईस सत्तावन गावींचे पाटील मिळोन कृष्णातीरीं सत्य स्मरोन देसमुखी जगदळेयाची कीं यादवाची हें सांगणें ह्मणौन तुह्मांस राजश्री रामचंद्रपंडित अमात्य याणीं आज्ञा केली त्यावरून तुह्मीं सत्तावन गांवीचे पाटील कृष्णातीरीं उभे राहून सत्तावन गावीची देशमुखी माहादजी जगदळे याची भोगवटियाची चालत आहे यादवासी संमंध नाहीं ह्मणून महजर करून दिल्हा तो महजर मशारनिले + + + + + + + ह्मणोन विदित केलें त्यावरून आज्ञापत्र तुह्मास सादर केलें आहे राजश्री छत्रपतीस्वामी माहादजी जगदळेवरी कृपाळू होऊन मसूरतर्फेची देसमुखी त्याचे दुमाला केली आहे गोतमुखें निर्वाह जाला आहे तरी तुह्मी देसमुखीचा हक्कलाजिमा व इनाम पुरातन चालत असेल त्याप्रमाणें माहादजी जगदळे यासी देत जाणें देशमुखीस यादवास खलेल करावया प्रयोजन नाहीं एविषईं त्यास ताकीद केली आहे गोतमुखें निवाडा महजर जाला आहे या प्रमाणें बिलाकुसूर चालणें निवाड्याप्रमाणें जो वर्तेना खलेल करील त्यास ताकीद होईल जाणिजे एविशीं पंतअमात्य यांची आज्ञापत्रें सादर आहेत त्याप्रमाणें वर्तणूक करणें तेरीख छ २९ रबिलोवल मोर्तब सूद

(विलसति लेखना वधि:)

---

**लेखांक ४९** **१६२०।१६२१**

तुमार जमाबंदी मालपाय बाकी
पा मसूर सरकार रायबाग सुभे
दारुलजफर बिजापूर फसली
खरीफ पारसाईल व रबी

फसली सन ११०८ अज देह ५७ बिा

ऐन देह इनाम देसक

५४ १ देसमुख शाहापूर

२ देसपांडे

१ पाचूद

१ वडगाऊ

२

३

पैकीं वजा अलाहिदा तुमार बाा सालाबाद देह ३७ बाकी देह पाा कऱ्हाडाखालीं गेले होते ते कसबेमजकुरीं पातशाही ठाणें बैसलियावरी पाामजकुराखालीं चालों लागले देह २० पैकीं वजा आबाद देह तसरूफ रामचंद्र नारोजी फौजदार ठाणें पाा खटाऊ देह २ बिा

अभेडी १ आंगापूर खुर्द १

बाकीं देह १८ पैकीं वैरान बेचिराख देह १३ बिा

| | | | |
|---|---|---|---|
| उंबरज १ | पाली १ | खोडद १ | डेरवणें १ |
| इंदोली १ | चोंडे १ | नाडोली १ | |
| हिंगनाळ १ | मरळी १ | गारवडे १ | |
| वडगाऊ १ | सासपडे १ | तासवडे १ | |

बाकीं आबाद देह मोकरर रुपये १०० ताा

तारगाऊ रुा ५० एणेंगाऊ रुा २०

कोर्टी रुा २० मौजे पेरळे रुा ५

वडोली भिकेश्वर रुा ५

दाा आनंद अंताजी गुमास्ते रुद्राजी चंदो

देसपांडे पाा मार मोाा एकसे रुपये रास

**लेखांक ५०** **१६२२ आश्विन वद्य २**

( शिक्का फारसी )

माहाजर बतेरीख १५ माहे जमादिलोवल थळ

कसबे मसूर सुरसन ११०९ हजीर मजालस

राजमुद्रा

रुद्राजी त्रिमळ
देसपांडे ता। तारळें
रुजू

कृष्णाजी ताठे पटेल
मौजे तासगाऊ ता।
सातारा
( निशाणी नांगर )

रामसेटी विभूते
का। भालवणी
( निशाणी तागडी )

सताजी पटेल
मौजे चिखली
मकाजी ढोग्या

बाळनाक बिन राण-
नाक मांग मौजे पुळज
पा। मोहळ

तिमाजी पाटील व
सेखोजी पाटील जाधव
का। उंबरज
( निशाणी नांगर )

मलोजी पटेल मुळीक
कसबे सेळगाऊ

अलीखान

पिलाजी बल्लाळ
कुळकर्णी मौजे
कोर्टी

सुभान नाईक बेरड

लखमनाक बिन बाळ-
नाक मांग मौजे वाह-
गाऊ

सेख ईभराईम
मुल्ला का। मसूर
(निशाणी फारसी)

रेखोजी पटेल करंडे
का। सेळगाऊ

बापूजी पटेल
मौजे आरवी

त्रिंबकजी पटेल मौजे
वडोली निळेश्वर

केरनाक मांग बिन
निंबनाक मौजे वरकुटें
का। मलेवाड

माहालनाक बिन
बुबनाक मांग का।
मजकूर व सेळगाऊ

या विदमानें केला माहाजर ऐसा जे होननाक बिन आबनाक मांग मौजे खोडसी प्रा। कऱ्हाड लेहून दिल्हा माहाजर ऐसा जे पदाजी यादव याचा भाऊ गिरजोजी यादव हा चाकर दि॥ राजश्री राजाराम

याकडे दरुनीमाहालीचा हवाला करून आहे तो सातारियावरी मुकामीं असतां त्यानें आपणास विठोजी जाधव नाईकवाडी प्रा कऱ्हाड या हातीं बोलाऊं आपणास पाठविलें त्यावरून आपण सातारियास गेलों गिरजोजी यादवास भेटलों यानें सांगितलें कीं तुह्मीं आणखी मांग मेळऊन माहादजी जगदळा देसमुख पा मसूर यासि जिवें मारणें तुह्मास आपण एक हजार रुपये व दोनी चावर इनाम देईन ह्मणऊन बोलोन आह्मास तुर्त खर्चाबद्दल रुपये २०० दोनी से दिल्हे आणि आह्मास निरोप दिल्हा त्यावरी आपण कसबेमजकुरास आलों माहादजी देसाई यासि मारावें तरी हें आपलें मनीं नव्हतें ह्मणऊन हईगईवरी होतो परंतु जाहालें वर्तमान आपण माहादजी देसाई यासि सांगितलें नाहीं त्यास परस्परें च कळलें त्यावरून त्यानीं आपणासी दस्त करून धरून आणून आदबखाना ठेविलें आहे एणेंप्रमाणें जाहाला अमल लिहिला आहे याउपरि आपण ए गोष्टीस मन घाळून तरी दिवाणीचा गुन्हेगार असे व सदर्हू दोनी से रुपयाखेरीज कांहीं घेतलें नाहीं हा केला माहाजर सही वळी सुमार ३४ चवतीस रास

---

**लेखांक ५१** **१६२४ वैशाख शुद्ध ११**

सही

फारखती माहादजी वलद सुलतानजी जगदळे देसमुख पा मसूर यास रतनोजी सेलार मनसबदार किलेनसीन वसंतगड सुा सन ११११ लिहून दिधले फारखती एसी जे वसंतगड फते जाला ते वख्तीं आमची वस्तभाव व रुपये बाकी तुह्माकडे राहिले होते त्यास तुह्मासी दावा केला यावरी पांच जण ग्रहस्त व राजश्री साबाजी मलारी वकील राजश्री खंडोजी वलद तुकोजी निंबाळकर देसमुख ता गांजिभोयरे सा जुन्नर व राजश्री माणकोजी रघुनाथ वकील आपले एहीं तुमचा लेख सुभानजी जगदळे व बहिरोजी वलद विठोजी सेठगे खेत वाडी हणवत का मसूर याचे मारफतीनें कुल खंड करून दोनी से एक

२०१ रुपया खंड करून लेगाड वारिलें सदरहू पैके दोनी से एक रुप-या आपणास पावले पेशजीचे वस्तभाव व नख्त रुपयाचे लिगाड वारिले पेशतर तुह्मासी अर्थाअर्थी समंध नाहीं हें लिहिले आपले पुरवजाचे पुण्य ही लिहिली फारखती सही मूर तह सूद दर जागा गजावळी नाा खेळणा मूरतब सूद

छ ९ माहे जिल्हेज सन ४५

(१) गाही साबाजी मलारी
वकील खंडोजी निंबाळकर
देसमुख गांजीभोयरें
( शिक्का फारसी )

(२) ब्रिा कलम माणकोजी रघुनाथ
वकील रतनोजी सेलार

(३) अमृतराव रघुनाथ देसपांडे
व गांवकुळकर्णी ताा परेळी

(४)पत्रप्रमाणें साक्ष शिवाजी नरहरी
वकील अबदुल लाउस +++

(५) गोही श्रीपत गोविंद वकील
यमाजी हणबोजी

(६) साक्ष शिवाजी मल्हार दिवाण
राा यमाजी राजे निंबाळकर

(७) गोही यशवंतराऊ सावंत*
( शिक्का फारसी )

---

**लेखांक ५२** **१६२४ ज्येष्ठ वद्य ४**

( फारसी मजकूर )

मशरुल अनाम कदीमल खिजमत शामराऊ सेकदार पाा मसूर सुाा सन ११११२ मालूम दानद दरीविला माहादजी जगदळे देसमुख पाा मजकूर एउनु जाहीर केलें कीं आपन हजूरपुरनूर जाउनु बशोर्त देसमुखी पाामाार देह ५७ मोबलक माझीम जाबीत पेसकस भरून फर्मान व सनद दीवान बमोहर अमीरलउमराव हासील केली अज राह इनामत पातशाह इनाम बिताा

मौजे हेळगाउ १ मौजे निगडी १

---

* ह्या सात हि साक्षीदारांचे शिक्के फारसी आहेत. कांहीं फाटले आहेत. हे सर्व अलमगीराचे मनसबदार होते.

दोन मवाजात व रुसूम माझीम जाबिते बा। सनद दीवानी सेरीकरास मरहमत जाले आहेत ऐसियासी अमील पा। मा।र देह इनाम व रुसूम वगैरेस मुजाहिमत पोहचावितात ए बाबे एदम मुजाहिमताचा परवाना व मुताबिकाची सनद एनायत होय हसहुल इलतमास देसमुख मजकूर फर्मान वालाशान व दरवाजे खिजमत देसमुखी बमोहर अमीरलउमराव मनास आनउनु मुताहीमची सनद अलाहिदा भरून दिल्ही आहे व ताकीद परवाना इनाम आं कदीमल खिजमत ( पुढें फाटलें आहे )

तेरीख १७ माहे मोहरमु

पै। छ ७ माहे सफर सु। १११३ सन ४७ जुलुसवाला

---

**लेखांक ५३** **१६२४।१६२५**

तकरीर कर्दे बतारीख छ माहे रजब सु। सन १११२ बो। महादजी जगदळे वा। सुलतानजी जगदळे देशमुख प्रा। मसूर यानीं तकरीर केली ऐसी जे आपला वडील जगदेवराऊ जगदळे त्यास लेक चौघे वडील रामोजी त्याहून दुसरा बाबाजी तिसरा दयाजी चौथा विठोजी ऐसे चौघे लेक एका ठाईं असोन परगणे कराडचे व प्रा। मसूरची देशमुखी करीत होते व का। मसूरची पटेलगी व शिरवडची पाटिलगी व आउंध का। आंबीकची पाटिलगी ऐसें करीत असतां भावाभावांच्या वाटणिया जाहालिया ते समयीं बाबाजी जगदळे आपले वडील यांस प्रा। मसूरचे देहे ५७ व का। मसूरची पाटिलगी वाटणीस आली मसूरची देसमुखी व पाटिलगी वडील खात आले त्याचे लेक कुमाजी आपला पणजा अलीअदलशाहाचे वेळेस खात आला रामोजी व दयाजी व विठोजी यांचे वांटणीस पा। कराडची देसमुखी व शिरवडी व आंबिकची पाटिलगी व देसमुखी आली ती ते करीत होते ते वख्ती मेघोजी थोरात पातशाही वजीर होता त्यास प्रा। मजकूर मोकासा होता ते

वस्ती प्रा मजकूरची रस्त होन साडे च्यार हजार जमा रामोजी व दयाजीचे घरीं जाहाली तों रामोजी व दयाजी देसमुख प्रा मजकुरांत गेले होते मार्गे खावंद नाहीं ऐसें देखोन चोरांनीं दरवडा घालोन पैका रस्त नेली तों रामोजी व दयाजी प्रा मजकुराहून आलेयावरी मोकासाई यांनीं नैब प्रा मजकुरीं होता त्यास सामील करून रामोजी व दयाजीस कैद करून रस्तेचा तगादा लाविला मुनसिफी मनास आणितां तुह्मीं च रस्त तोडाविली ह्मणऊन दोघांस नेऊन जिवें मारिलें विठोजी पळोन मसुरास आला थोरातांनीं प्रा मजकूरची देसमुखी नैबची आगंत ( अगत्य ) पातशाहास गैरवाका मालूम करून जारा———

( अपूर्ण )

---

**लेखांक ५४ श्री १६२५ वैशाख वद्य १२**

आज्ञापत्र राजमान्य राजश्री नीळकंठ मोरेस्वर ता मोकदमानी व रयानी व बाजे वतनदारानी तपे मसूर व उंबरज व तारगांऊ व हमशाही गोत यास आज्ञा जे सुा सीत तिसैन अलफ माहादजी जगदळे व यादव या उभयतामध्यें मसूरचे देसमुखीचा कथळा एऊन पडला आहे त्यास पूर्वीं तुह्मीं ए गोष्टीचा निवाडा करून साक्षपत्र जगदळियास दिल्हें तें पत्र घेऊन जगदळा हुजूर स्वामीचे सेवेसी आला येथें यादवानीं स्वामीचे सेवेसी अर्ज केला कीं निवाडा बरहक्क नाहीं जाला याउपारि उभयतांस स्थळ नेमून देऊन राजश्री अमात्यपंतांस पत्र देविलियां उभयता जाऊन निवाडा करून त्यामुळें वतन ज्याचें खरेंखुरे होऊन चौघा वतनदारांचे साक्षीनें पत्र घेऊन स्वामीचे सेवेसी येऊन त्याउपरि ज्याचें वतन त्यास देविलें पाहिजे ह्मणौन अर्ज केला त्यावरून उभयतांस पाठविलें असे तरी तुह्मीं पहिले कृष्णेमध्यें साक्षी दिल्ही आहे त्यास सांप्रत उभयतांचा निवाडा आपलें सत्य स्मरोन

बरहक्क निवाडा कृष्णातीरीं उभें राहून व बेताळीस स्मरोन निर्वाह करणें छ २५ शौवाल आज्ञा प्रमाण

लेखन
सीमा समु
ल्लसति

---

**लेखांक ५५** **१६२५ पौष शुद्ध ३**

दरबंदगी नबाबसाहेब

॥ श्री ॥ अर्जदास्त बंदे कमतरीन सेरीकर स्वरूपजी यादव पदाजी यादव देसमुख पा कऱ्हाराबाद सुा हजार १११३ अर्ज मेरसानद बाा ताा छ १ रमजान साहेबाचे नेक नजरे करून बखेर सलाबीत असे

बाा साहेब कबिले मेहेरबान सलामत साहेबी हुजूर बोलाऊन हुकूम केला जे माहादजीने अर्ज लिहिला तो हकीकत खातिरेस आणून तेथें लिहिलें की तेथें लिहिला की थळास पाठवणें ह्मणऊन लिहिले तरी आह्मी कोणेवख्ती स्थळास गेलो नाही माा सेनापती यानी व विठोजी पाटेल रहिमतपूर याकडे स्थल नेऊन त्यास त्यानें पाा माा चे देसपांडिये व मोकदमानी संगमी कृष्णा तेथें मिळोन वादे दोघे नदीमधें घालावे जो ताा मसूरीचा देसमूख असेल तो हाती धरून काढावा ऐसे लेहून दिल्हे त्यास संगमास न आले चुकाऊन गेला ऐसा बाजागारी हुजूर वंदी करून करून चुकावितो त्यास आधी मसूरीचे पटेलगी समंध नाहीं बाजगारीही गाचा मुसलमान पाटलानीं याचा वडील टांगिला होता त्यास मुतालिक ठेविले होते तुरुक मारून घरे त्याची लुटून माल बिसात मोबलग लागला त्या बळें पाटिलगी खातो हे गिर्दनमईचे परगणेस देसमुखास व मोकदमास ठाऊके असे हाली आह्मी संगमी निवाडियास राजी असो विठोजी पाटेलाचा लिहिता प्राा व गीर्दनवाईच्या परगणेचे देसकास पाा माा रीचे मोकदमास राजी असो हा सत्तावन अपुले ह्मणतो तरी त्याचे सत्तावन गावानीं संगमी अमचे

हाती पुर्वज बेतालिस स्मरोन जे घालितील त्यास राजी माहादजीस देसमुखीस मसुरीचे तालीक नाहीं बंदगीस रोसन् होय हे अर्जदास

---

**लेखांक ५६** **श्री** **१६२५**

कौलनामा देसमुखानि पा मसूर सुा १११३ तुह्मास लिहिला गेला ऐसा जे माहाराज धिराज राजश्रीस जागीर सरंजामी आलियावर तुह्मास रयायत पांच हजाराची परगणाचे पैकीं करार होईल सही

---

**लेखांक ५७** **१६२६ ज्येष्ठ शुद्ध ७**

( शिक्का फारसी )

तां मोकदमानी प्रा मसूर इदा ५७ सरकार रायबाग सुबे दारुलजफर ब्रिज्यापुर सुा सन १११३ मालूम दानद की माहादजी वलद सुलतानजी जगदळे देसमुख प्रा मार हे मोख्तसर जमीदार व कामाचे व पातशाही सनदी जमीदार आहेत याकरितां याजवर मेहरवान होऊन यांसि पालखी हजरूनी मरहमत करून यांसि सरकारांतून पालखीचा ऐवज देविला आहे ते आमील देतील परगन्यांत सादिलवारपैकीं रुा ७०० सातसे देविले असेती तरी दरसाल रुपये सातसे देसमुखमशारनिलेस पाववीस जानें दरसालास उजूर न करने परवानियाची नकल लेहून घेऊन असल फिराऊन देने दरीं बाब ताकीद तमाम दानद मोर्तब सूद

तां छ ५ सफर सन ४७ जुलूसवाला

---

**लेखांक ५८** **श्री** **१६२९ माघ वद्य ७**

स्वस्तिश्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वजित नामसंवत्सरे माघवधी सप्तमी रविवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं माहादजी जगदळे ( देशमुख ) व रुद्राजी चंदो देशपांडे ता

मसूर सुभा प्रांत सातारा यासि आज्ञा केली ऐसी जे तर्फमजकूरची नजरपट्टीची खंडणी क रुा १५००ᴗ— पंधरासे पैकीं बद्दलदेणें रा परसोजीराजे भोसले रुा ७००ᴗ— बाकीं रसद हुजूर रुा ८००ᴗ— आठसे पैकीं रवासूदगी सेटी खाटक हुजूर बाजार लस्कर रुा १०० बाकी रुा ७०० सातसे पैकीं हुजूर रसद घेतली रुा २००ᴗ— दोनसे बाकी रुपये ५००ᴗ— हुजूर रसद पाठवणें या कामास लोक दिा हाय रुपये

हरवाजी अंबीकर बारगीर रुा ६

लखमाजी बिरामण जाधव रुा ५

एकूण रुा ११ अकरा रास देविले असे आदा करणें जाणिजे

तेरीख १९ जिल्काद
सुा सन समान

मर्या
देयं विरा
जते

बार सुरू सूद बार

पैा छ २२ जिल्काद

ᴗ श्री ०
+ + +
शिवनरपति ह
र्षनीधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
+ प्रधान +

---

**लेखांक ५९** **श्री चैत्र शुद्ध ७ गुरुवार शक १६३०**

छ ६ मोहरम सन १११७ फसली ११२० हिजरी
सुहुरसन समान मया अलफ ११०८
१८ मार्च १७०८

राजश्री शाहूराजे

साक्षपत्र मुकाम कसबा पाटगाऊ शके १६३० सर्वधारी संवछरे चैत्रशुध सतमी सुहुरसन समान मया अलफ छ ६ मोहरम हाजीर मजालसी

राजश्री रायभानजीराजे भोसले पत्रप्रमाणें साक्ष

( शिक्का फारसी )

मातुश्री म + + + + + +
परसोजीराजे भोसले

श्रीशंकर
सुत परसो
जी राजे भोसले

रा हणमंतराव निंबाळकर

श्रीसीवचरणि
तत्पर बापुजी
सुत हणमंतरा
व नींबळक
र

रा रुस्तुमराऊ जाधवराऊ देसमुख पाा सिंदखेड

ष मुहंमद सिघ बाहादर खत + + × × नजतार

सिक्का फारसी

राजश्री कानोजीराजे प्रभावळकर साक्ष ऐसी जे जगदळियांचा व यादवांचा वतनाचा निवाडा गोतामध्यें आह्मा हुजूर जाला नाहीं.

( शिक्का फारसी )

परसोजी भोसले पत्रप्रमाणें साक्ष शाहिदी ऐसी जे माहादजी जगदळे व यादव यांचा निवाडा आह्मा हुजूर जाला नाहीं

० श्री
मछिव प्र
सन्न परसोजी

साबाजी भोसले शाहीद ऐसी जे +++ मसूर प्रा देसमुखी चालत असतां राजश्री छत्रपतीनीं जाधवराऊ याचे भिडेनें यादवास सनद करून दिली पंचाईत जाहाली नाहीं

श्री साबा
जी भोस
ले

ब्रजाजीनाईक देसमुख पा
फलटण शाहिदी ऐसी जे
माहादजी जगदळे देसमुख
+ + + मसूर याचा व + + + +
यादव यांचा वतनाचा कथळा
पंचाईतींत निवडलें नाहीं व इनसाफ
जाला नाहीं सेनापतीचे भिडेनें
राजश्रीनीं यास सनद दिल्ही परंतु
पाचगत जालीयाचे वर्तमान
आपणास दखल नाहीं

रंभाजी निंबाळकर

श्रीमल्लारि
चरणीं तत्प
र रंभाजी निं
बाळकर

साक्ष राजश्री केरोजी पवार
विश्वासराव मोकदम कसबे
नासीक प्रा मजकूर

श्रीराजारा
म चरणीं
त पर + + +
+ + + + सुत
केदारजी पवार

देवाजी मंब्राजी कुळकरणी
का राहू पा पुणें

खंडेराऊ दाभाडे देसमुख प्रा
कोल्हापूर शाहिदी दिल्ही ऐसी जे
माहादजी जगदळे याचा व यादवा
चा कथळा वतनाचा त्यास पंचाई-
तनिर्वाह जाला नाहीं इनसाफ हि
न जाला सेनापतीचे भिडेनें माहा-
राज राजश्री स्वामींनीं सेना-
पतीस + + + + + + + दिल्ही परंतु
+ + + + + + + + + + +

श्री
+ + + + तोजीसु
त खंडेराव दाभाड
स्य मुद्रिका

नरसोजी मोरे

श्रीराम
चरण नरसोजी
मोर + + + + +
+ + गणेश
शरण

माहादजी बाबर देशमुख
का नाणें घोळ


(शिका फारसी)

बिा अंतो कृष्ण देसकुलकर्णी
का मजकूर

धारराऊ निंबाळकर मोकदम
मौजे निंबळक

( निशाणी नांगर )

बिा सूर्यराऊ पिसाळ देसमुख
पा वाई



धारोजी बिन पदमोजी पा
मोकदम कसबे पाचवड पा कर्‍हाड

( निशाणी नांगर )

बापूजी सोनाजी देसपांडिये
पा मुठेंखोरें प्रा बारामावळ
हें साक्षपत्र लिहिलें सही बिकलमु

दताजी रघुनाथ पाचवडकर
कुलकर्णी साहीद ऐसी जे माहादजी जगदळे देसमुख प्रांत मसूर याची व यादवांची पंचाईत न होता रा सेनापतीच्या भिडेनें राजश्री छत्रपतींनीं सनद दिली इनसाफ जाहाला नाहीं १

बा ॐ

रा बहिरो हरी दिा गारदरे बारा-पत्रप्रमाण साक्ष माणाजी व बहिरजी फडतरे देसमुख व विठोजी कासी व विठ्ठल बापाजी देसपांडे पा खटाऊ

( शिक्का फारसी )

मलारजी जाचक मोकदम
मौ निसोडी प्रा सुपें

( निशाणी नांगर )

बिा बाणाजी देवकांते मोकदम
मौ पिपळी प्रा बारामती

( निशाणी नांगर )

गौरोजी बिन धर्मोजी पा जाधव
मौजे पाडे पा हवेली वाई

( निशाणी नांगर )

हणगोजी काटे देसमुख
ता तारळे




बाळाजी विठ्ठल व काको व्यंकटेश
देशकुलकर्णी ता तारळें

सकरूजी बिन तुळाजी बरगे
पटेल कसबे कोरेगाऊ समेत

( निशाणी नांगर )

बहिराटजी घारगे देसमुख

हजारी दिा रा फतेसिंग भोसले पा निंबसोड माइणी

श्रीफतेसींग
चरणीं दृढ भा
व बहीरो हरी
++++++

बराटजी
बीन चंदजी
घारगे
देसाई

गोरखोजी मोहिते मोकदम मौजे टण्णू पा इंदापूर आपल्या हुजूर पाच्याईत जाहाली नाहीं हा क-रीना सही

( निशाणी नांगर )

नेताजी मोहिते देसमुख पा वांगी व तलबीड व कलेढोण

नेताजी मो
हिते देसमु
ख

या विद्यमानें जाहालें साक्षपत्र ऐसें जे प्रा मसूर देह सत्तावन गावींची देशमुखी माहादजी बिन सुलतानजी जगदळे देशमुख पा मजकूर याची देशमुखी पुरातन पिडी दर पिडी पूर्वापार चालत आली आहे ऐसियासि माहाराज राजश्री छत्रपती स्वामी यांचें आ-गमन या प्रांतें जाहालें त्यासि राजश्री स्वामी आळंदेच्या तळावरी आले इकडून राजश्री जाधवराऊ सेनापती हे भेटीस गेले बराबरी यादव हि घेऊन गेले त्याउपरि जाधवराऊ राजश्री स भेटले ते समयीं यादवानीं जाधवरायासी मसलत दिल्ही कीं कऱ्हाडची देश-मुखी आपली आहे आपण तुह्मांस चौथी तकसीम देऊं तुह्मी राजश्री

पासीं सनद करून घेणें समय हा च आहे त्याउपरि जाधव-रायानीं रदबदली केली कीं कऱ्हाडची देसमुखी यादवास देणें याद-

वाची आहे मग राजश्री बोलिले कीं कऱ्हाडची देशमुखी आमची आहे यादव कोण होताती तेव्हां रदबदली तैसी च राहिली मागती दुसरे दिवसीं यादवास भेटावयासि घेऊन गेले राजश्री ची यादवाची भेट केली त्यासि राजश्री छत्रपतीनीं पुसिलें कीं हे कोण आहेत जाधवरायांनीं सांगितलें कीं कऱ्हाडचे देशमुख यादव आहेत त्यासि राजश्री बोलिले कीं कऱ्हाडची देशमुखी आपली आहे हे आपणास ठाउके नाहींत व आपण ऐकिले हि नाहींत तरी यासि देशमुख न ह्मणनें कोण्ही ह्मणीं ह्मणतील त्यासि साहेब इतराज होतील इतकें जाहालियावरी तो मजकूर तैसा च राहिला मग दुसऱ्या तळावरी जाधवरायांनीं रदबदली केली कीं कऱ्हाडची देशमुखीची सनद करून दिल्ही पाहिजे राजश्रीं नीं हि मान्य केलें कीं आह्मीं तुह्मास खुद्द सनद करून देऊं परंतु यादवास देणार नाहीं मग जाधवरायांनीं उत्तर दिल्हें कीं आपण आहे तोंवरी आपणास भोगवटा होईल मग आपणास कोण खाऊं देईल ह्मणोन उत्तर दिल्हें त्याउपरि रदबदली तैसी च राहिली मग लस्कर कुच होऊन एऊन शिरवळावरी राहिलें तों हिंदूराऊ घोरपडे हे चिकोडीकडून भेटीस जावयासि कसबे मसुरास आले त्याबराबरी माहादजी जगदळे देशमुख याचा पुत्र यशवंतराऊ आला मग हिंदूरायांनीं राज्याचें दर्शन घेतलें मग हिंदूरायांनीं यशवंतराऊ जगदळे देशमुख व नारो रुद्र देशपांडिये पा। मसूर यांची हि भेटी केली ते समयीं राजेयानीं विचारिलें कीं हे कोण आहेत हिंदूरायांनीं सांगितलें कीं माहादजी जगदळे देशमुख पा। मसूर याचा पुत्र आहे व ते दुसरे देशपांडे आहेत ह्मणौन सांगितलें त्यावरून बरें ह्मणौन निरोप दिल्हा इतकें जाहालियावरी लस्कर कुच होऊन सातारियाखालें एऊन मोकाम जाहाले तेथें जाधवरायांनीं अर्ज केला कीं कऱ्हाडची देशमुखी यादवाची आहे यादवाच्या नावें सनद करून देणें जाधवरायाची भीड फार यासाठीं राजश्री नीं मान्य केलें मग जाधवरायांनीं मसुदा करून आणिला त्यांत मसूरपरगणियाचे गांव सत्तावन कऱ्हाडाखाले भिडवले

भग हें वर्तमान यशवंतराऊ यासि कळलें त्यानें कचेरीस येऊन दोही दिल्ही आणि राजश्री छत्रपती स्वामीस अर्ज केला कीं आपणापासीं पूर्वील पत्रें इभराईम इदलशा व सुलतान महमूदशाहा व हुसैन अंबरखान याचीं आहेत व अलीकडे माहाराज राजश्री कैलासवासी राजाराम यांचीं हि पत्रें आहेत व गोताचीं पत्रें आहेत मसूरपरगणियाची देशमुखी आपली अलाहिदी आहे इतकें असतां सेनापती गैरन्यायें करून जोरावारीनें कऱ्हाडाखालें गांव आपले बळें च लिहितातीं ह्मणौन अर्ज केला त्यासि राजश्री बोलिले कीं जें खरें असेल तें च करून एकाचें वतन एकास आपल्याच्यानें देवत नाहीं तूं आपली खातीरजमा असो देणें जाधवरायानीं सनदा लिहिल्या होत्या त्या तैशा च राहिल्या इतका मजकूर जाहालियावरी यशवंतराऊ देशमुख यांनीं छत्रपतीस विनंति केली कीं लस्करच्या धामधुमीकारितां आपला परगणा खराब जाहाला आहे कौल सादर केलिया परगणा आबाद होईल मंग राजश्री नीं आज्ञा केली कीं आपलिया परगणियाची नजरपट्टी चुकवणें ह्मणौन आज्ञा केली आज्ञेवरून यशवंतराऊ जगदळे देशमुख व नारो रुद्र देशपांडिये पा। मजकूर यानीं परगणियाची नजरपट्टी खंडून सिरपांव व कौल नांवनिसीवार घेतला त्यावरी जाधवरायांनीं मागती मजकूर करावा तरी सातारा हस्तगत जाहाला रांगणियासी जायाची त्वरा जाहाली लस्कर कुच दर कुच करून कसबे पाटेगावांवरी आलें तेथें जाधवरायांनीं रा। गदाधरभट्ट यासि मजकूर केला कीं माहादजी देशमुखाच्या लेकानें आपल्या सनदांस दोही दिल्ही हे कोण गोष्टी आहे भटगोसावी यांनीं मान्य केलें कीं संवत्सरप्रतिपदेच्या दिवसीं सनदेवरी शिक्के करून देऊं ह्मणौन मान्य केलें मग प्रतिपदेचे दिवसीं सनदेवरी शिक्के करावयासी आले ते वेळेस माहादजी जगदळे देशमुख पा। मजकूर याचा पुत्र यशवंतराऊ यानें दोही दिल्ही व राजश्रीस अर्ज केला कीं आपला इनसाफ होत नाहीं आणि आपणापासीं सनदा आहेत त्या हि कोण्ही मनास आणीत नाहींत आपलें वतन मसूरपरगणियाचे

पूर्वापार चालत आलें आहे आणि आतां जाधवराऊ गैरन्यायें जोरावारीनें यादव पाठीसी घालून सनदा करून घेताती आपणास कोणाचा आसिरा नाहीं आपले वडील तो भोसल्याचे नवाजीस आणि भोसल्यांचे घरीं वडिलावडिलांच्या खस्ता जाहाल्या आहेत इतकें असतां जोरावारी आपलियावरी होती आपली बंदी कोण्ही देत नाहीं त्यासि राजे बोलिले कीं कऱ्हाडची देशमुखी आपली आहे यादवास देत नाहीं मसूरीची तर तुझी आहे हे हि आपल्याच्यानें देवत नाहीं तूं कांहीं चिंता न करणें ह्मणौन सांगितलें आणि भागीरथ चोपदार बोलाविला त्यासि सांगितलें कीं बाळाजी विश्वनाथ मुतालिक पंत अमात्य व पंताजीपंत मुतालीक पंत सचिव यासि जाऊन सांगणें कीं जाधवरायाच्या देशमुखीच्या सनदा लिहिल्या आहेत त्या आपणास विचारिल्याविरहित न देणें ह्मणौन सांगितलें व यादव गोपाळ हस्तक गदाधर भट्ट गोसावी याचे त्यासी सांगितलें कीं तुह्मीं जाऊन भट्टगोसावी यासी सांगणें कीं तुह्मीं सनदा सिक्के करावयासि आणाल तरी आपण सिक्के न करी सिक्के तैसे च ठेवणें ह्मणौन सांगूं पाठविलें परंतु त्यानीं गै कैली इतकें जाहालियावरी हें वर्तमान जाधवरायासि कळलें मग जाधवराऊ खुद्द कचेरीस आले कचेरीहून रा। गदाधरभट्ट व नारसेणवी व राघो काकाजी राजश्रीकडे खलबतखानियांत पाठविले कीं आजी प्रतिपदेचा मुहूर्त आहे सनदेवरी सिक्के करून देणें त्यासि राजश्री बोलिले कीं तुह्मी यादवाच्या नांवें सनदा लिहिल्या आहेत तरी आपण सिक्के करीत नाहीं यादव पुरातन जाहाले तेव्हां आह्मीं त्याचे मुतालीक कीं काय कऱ्हाडची देशमुखी आपली आहे मसूरची देशमुखी तर जगदळियाची आहे आणि तुह्मीं अतिशय करितां तरी तुह्मीं खुद्द आपल्या नावें सनदा करून घेणें त्यावरी सिक्के करून देतों या सनदेवरी सिक्के करून देत नाहीं तुह्मी च आपले मनीं समजणें जें देणें तें न्यायेकरून द्यावें लागतें आपली भाकरी आहे तुह्मी जैसी मागता तैसी जगदळियासि देवणें तरी तुह्मीं जाऊन जाधवरायासि सम-

जाऊन सांगणें आणि त्याची भीड आहे ऐसें न होय कीं रागावरी नव जात ऐसे तजविजीनें सांगणें ह्मणौन सांगितलें मग नारसेणवी व राघो काकाजी यानीं जाऊन जाधवरायासि वर्तमान सागितलें त्यावरून जाधवराऊ रागें आण घेऊन बोलिले कीं आपलें एवढें काम होत नाहीं तेव्हां आपण चाकरी करीत नाहीं ह्मणौन उठोन आपल्या डेऱ्यासि गेले त्याउपारि रुसून घरीं बैसले कारभार अवघा तटला मग जाधवरायाच्या डेरियासि राजश्री गेले जाधवरायाची समजावीस केली घोडा १ दिल्हा मग जेवावयासि सांगून आले ते दिवसीं कांहीं मजकूर जाहाला नाहीं मंग दुसरे दिवसीं मागती सिक्के करावयासि सनदा आणिल्या त्यासी राजश्री बोलिले कीं इतका अतिशय काय आहे आणि कितेक सरदारांनीं हि जाधवरायासी सागितलें तें हि ऐकिलें नाहीं अंड घातला कीं जरी सनदा करून द्याल तरी आपण चाकरी करीन ह्मणौन अंड घातला त्यासि राजश्री बोलिले कीं आपणास संकट प्राप्त जाहाले आजी सनदा करून देत नाहीं तेव्हां हा मूरख जैसा गेला तैसे च हे निघोन जातील ह्मणजे अवघें काम दरकम होईल ऐसें जाणोन वेळावरी नजर देऊन जाधवरायाच्या भिडेनें सनद करून जाधवरायासी दिल्ही हें काम अडून जाहालें कांहीं पंचायत अगर इनासाफ जाहाला नाहीं हें अवघें मतलबी आहे जैशा मोकाशाच्या सनदा करून उग्याच देताती तैसी च हे सनद करून दिल्ही पांचाईतमुळें इनसाफ होऊन खरेंखोटें करून सनद दिल्ही नाहीं हें आपणास दखल आहे यादव कांहीं फडीं प्रसंगीं कोठें आपणास आढळले नाहींत माहादजी जगदळे देसमुख पाा मसूर याची सत्तावन गावींची देशमुखी खरी आहे पूर्वीं जगदळियासि व यादवास वाद जाहाला वादामुळें यादव खोटे जाहाले आहेत जगदळे देशमुख खरे आहेत हे आपणास ठावकें आहे आणि माहादजी देशमुख याचा पुत्र यशवंतराऊ येऊन उभा राहिला आणि हा करीना सांगितला आणि ह्मणों लागला कीं एणेंप्रमाणें करीना जाहाला आहे

हा खरा असिला तरी तुह्मीं समस्त मिळोन एक साक्षपत्र करून त्यावरी मोहरा करून देणें ह्मणौन करीना जाहीर केला त्यासि आह्मीं समस्तांनीं मनास आणितां हा करीना खरा आहे मग समस्तांनीं आह्मीं साक्षपत्र करून त्यावरी मोहरा करून दिल्हा हें साक्षपत्र सही वळी सुमार २१२ दोनी से बारा मोर्तब सूद

(शिक्का फारसी)


सदर्हूप्रमाणें गोत मिळोन साक्षपत्र लेहून दिल्हें ऐसे जे माहादजी देसमुख पाा मसूर याचे पुत्र यशवंतराऊ जगदळे हे रा हिंदूराऊ घोरपडे याबराबरी राजश्री छत्रपति स्वामीस भेटीस गेले ह्मणौऊन राजश्री जाधवराऊ सेनापती यानीं राग केला कीं आपला दावेदार घोरपडा याची पाठी करून माहादजी जगदळे देसमुख याचा लेक आला तेव्हां कैसी देसमुखी खाऊ पाहातो ह्मणौऊन राजश्री जाधवराऊ सेनापती यानीं निकस करून जोरावारीनें माहादजी देसमुखाची देसमुखी देह ५७ सत्तावन पुरातन चालत असतां हालीं राजश्री छत्रपतिसाहेबास संकट घालून अतिशय करून पाटगावींचे मोकामीं रुसवा करून सनद करून घेतली तेव्हां देसमुखाचे पुत्र यशवंतराऊ देसमुख यानीं पाटगावीचे मोकामीं थोरथोर सरदार मऱ्हाटे व देसमुख वतनदार यापासीं उभे राहिले कीं तुह्मीं गोत मायबाप आहां आपण न्यास व जेथें खलास पाठवाल तेथें जावयास राजी आहे अगर एथें तुह्मीं गोत मनसुफी कराल त्यासी राजी असे ऐसें ऐकोन राजश्री सेनापती सत्तेच्या बळें जोरावारीनें सनद करून घेतली हा आदि अंत गोतसभेस ठाउकें आहे ह्मणौन हूजूर पाटगावींचे मोकामीं सर्व गोतास विनंति केली त्यावरून समस्तानी पुरातन माहादजी जगदळे देसमुख याची देसमुखी पाा मसूर येथील खरी आहे ऐसें मनास आणून जैसा करीना हूजूर जाहाला तो लेहून साक्षपत्र करून दिल्हें त्यावरी आपले साक्षीसी निशानें करून दिल्हीं तें पत्र घेऊन यशवंतराऊ देसमुख मसुरास आले तेथें माहादजी जगदळे देसमुख व परगणाचे मोकदम व समस्त गोतापासीं उभे राहिले कीं राा जाधवराऊ

सेनापती यांनीं यादवाची पाठी राखोन त्यापासून कऱ्हाडीची देसमुखीची तकसीम घेऊन आपलियावरी जोरावारी केली आपण न्यास व खलास व गोतास राजी असतां बळें च सनद करून घेतली तरी हा करीना आह्मां समस्त गोतास हि विदित आहे माहादजी जगदळे देसमुख याची मसूरपरगणाची देसमुखी देह ५७ सत्तावन एथील खरी असे राजश्री जाधवराऊ सेनापती यानीं न्याय न करितां जोरावारीनें सत्तेच्या बळें राजश्री छत्रपति स्वामीसी हट्ट निग्रह करून रुसवा करून कऱ्हाडीची सनद करून घेतली त्यामधें मसूरपरगणाचे गांव भिडवून दिल्हे ऐसें आह्मां गोतास विदित जालें तरी मसूरपरगणाची देसमुखी जगदळेची खरी असे रा जाधवराऊ सेनापति व यादव यांस मसूरपरगणाचे देसमुखीस समंध नाहीं जगदळेचे देसमुखी पूर्वापार खरी आहे आपण साक्षपत्र करून दिल्हें असे सन १११७ सुा समान मया अलफ छ 1 माहे सफर वैशाखसुद त्रितीया वळी सुमार ५३ त्रिपन

साक्ष देह पाा मसूर

राजजी पाा व तानाजी पाा
मोकदम मौजे वाटार
( निशाणी नांगर )

निळोजी पटेल मौजे किवळ



शिवाजी पटेल मौजे कालगांव
( निशाणी नांगर )
बिा भगवंत नारायण कुळकर्णी
मौजे मजकूर

मौजे रिसवड

बाबाजी पटेल (निा नांगर)
तुकोजी पटेल ( निा नांगर )

बापूजी पाा जाधव
मौजे आरवी

मौजे चिखली

रायाजी पटेल
मौजे मजकूर
विरोजी चौगुला

भीमाजी भास्कर
कुळकर्णी मौजे
दहीवली

मौजे नागसरी

खंडोजी पटेल (निा नांगर)
केदारजी पटेल ( निा नांगर )
शिवाजी बापूजी कुळकर्णी

दुलबाजी पाा व जागोजी पाा
मौजे कोणेगाऊ साक्ष
( निशाणी नांगर )

अबाजी रायाजी कुळकर्णी

मौजे शिरवडें

संताजी पाा मोकदम मौजे

मजकूर साक्ष सही

( निशाणी नांगर )

हणमाजी अनंत कुळकर्णी

सबाजी चौगुला मौजेमजकूर

नाईकवाडी प्राा कऱ्हाड

यमाजी धारराऊ नाईकवाडी

नरसोजी धारराऊ नाईकवाडी

मौजे हेळगाऊ

चंदाई पाटलीण व माहादजी

पाटील मौजे मजकूर

रवळोजी पाटील मौजे मजकूर

( निशाणी नांगर )

मौजे खराडे

अंतोजी पाा व रंभाजी पाा

मौजे मजकूर

( निशाणी नांगर )

मानाजी पाा कसबे तारगाऊ

( निशाणी नांगर )

जोत्याजी पाा मोकदम

मौजे तासवडें साक्ष

( निशाणी नांगर )

मौजे निगडी

सुभानजी पाटील

चांगोजी पाटील

( निशाणी नांगर )

रुद्रोजी खोतवाडी

नारो विश्वनाथ कुळकर्णी मौजे-

मजकूर

रवळोजी पाा मौजे किरोली

( निशाणी नांगर )

मानाजी पाा व केदारजी पाा

मौजे पाडळी

( निशाणी नांगर )

---

**लेखांक ६०** **१६३३ कार्तिक वद्य १४**

( फारसी मजकूर )

जुब्रादतुल एकरान माहादजी जगदळे देशमुख पाा मसूर सुा सन ११२० बिदानद की पाा मजकूरची देशमुखी तुमचें वतन तुम-

---

( लेखांक ५९ ) या साक्षपत्राच्या मूळ प्रतीच्या पाठीवर कांहीं फारसी अक्षरें लिहिलीं आहेत.

चे दुमाला केलें असे तर तुह्मीं मौजेमजकुरास जाऊन पामजकुर-च्या मोकदमांस व कसबेमजकुरच्या सेटे व महाजनांस कौल देऊन आबादी व इस्तमालतीस कोसीस करून किफायत सरकार व रफायत रायां अमळांत आणोन व हरएक असामीस तुह्मीं आपला कौल देऊन आणाल त्याप्रमाणें चालविलें जाईल कोण्हे बाबें वसवास न धरितां सरकारचें काम बवजे अहसन सरंजाम करीत जाणें मोर्तब शुद

रुजू दफ्तर दिवानी

रुजू दफ्तर मुस्तोफी

तेरीख २७ सौवल

---

**लेखांक ६१** **श्री** **१६५३**

तालिक 

भगवंतराव बिन सुभानराव जगदाले पाटिल कसबे मसूर सुर सन इसन्ने सलासिन मया व अलफ कारणें लिहुन दिल्ही तक्रीम ऐसिजे आपले वडिलांनीं कुमाजीबावाचें वर्तमान सांगितलें कराडकर बागवानयाचें कर्ज पांढरीवर होतें गैरहंगामाचे दिवस बागवान येऊन दंगा करूं लागला त्यास कुमाजीबावा बोलल कीं गैरहंगामाचे दिवस आहेत हंगामावर येऊन मागण आतां हाणामारी करूं नये इतकियावर न ऐकतां बागवान जंगीस ऐऊन बेआदबी बोलला त्यावर कुमाजीबावांनीं पायाचा पायपोस काढून त्यावर टाकिला बागवानानें तैसाच पायपोस काढून त्यावर टाकिला बागवानानें तैसाच पायपोस घेऊन कराडास गेले तेथ नायबास आपली लेक देऊन फिर्याद त्यापासीं केली कीं मसूरचे पांढरीवर कर्ज होतें आपण मागावयासी गेलों त्यास कुमाजी पाटिल यांनीं आपणासी पायपोस मारिला ह्मणोन फिर्याद केली बागवानाचे आत्म्य धरून कुमाजी पाटिलास तलब करून कराडास नेहले मनोरियांत कैदेंत ठेविलें त्याजवर जबरदस्ती करून पैका व्याजसुध्धां देणें अगर वतन

लिहून देणें पैका द्यावयासी गांठ पडे ना जीवावरील गोष्टी येऊन पडली नाइलाजे मग वतनाचा कागद करून दिल्हा त्या उपरि हि कैदेतून बाहेर काढीनात तीन वर्षे मनोरियांत ठेविलें त्यावर म्हादजी पाटील चेरगांवकर हे आपले दिवाणकामास नायबाचे भेटीस आले भेट घेऊन निरोप घेऊन माघारे आपले गांवास मनोरियावरून जात होते तों कुमाजी-बावा बंदीखानेंतून निघोन बाहेर बैसले होते तों यांची व म्हादजी पाटील यांची द्रिष्टी जाहाली कुमाजीबावानीं रामराम केला त्यावर त्याणीं विचारिलें कीं तुमचें वर्तमान काय आहे त्यास त्याणीं आपलें सकल वर्तमान सांगितलें वतन हि घेऊन आपलेसी सोडीत नाहीं तुह्मीं सिवधडे पाटील आह्मीं तीन वर्षे बंदखाना सोसिला आतां आपण कांहीं वाचत नाहीं तुमचें हातून कांहीं इलाज जाहला तर करून पाहणें एतकें ऐकून माघारा फिरोन नायबास अर्ज के-ला कीं त्यांचे वतन घेऊन त्यास कां सोडाना त्यावर नायब बोलला जे त्याजपासून आपण जबरदस्तीनें वतनाचा कागद घेतला आहे जर तो आपले रजावंदीनें देईल तर त्यास सोडूं त्यावर म्हादजी पाटिलांनीं अर्ज केला कीं त्यास बाहीर काढून ते आपण बोलून विचार करून आपणास अर्ज करूं त्यावर कुमाजीबावास कैदेंतून काढून म्हादजी पा याचे हातीं दिल्हा म्हादजी पाटिलांनीं कुमाजीबावास विचारलें कीं रजा-वंदीनें वतन दिल्यास तुह्मास सोडतील त्याजवरून कुमाजीबावा बो-लला कीं आपण कांहीं वाचत नाहीं निमे वतन देतों हें वर्तमान नाय-बास म्हादजी पाटील यांनीं सांगितलें त्यावरून त्यांणीं मान्य केलें निमें वतनाचा कागद करून घेतला आणि हजीर जामिन मागितला त्याव-रून कुमाजीबावांनीं म्हादजी पाटिलास दिलें भारी करून दिवाणांत जामिन दिलें त्यांवर नायबानें बागवानास बोलावून आणोन त्यास सां-गितलें कीं कुमाजी पाटिलास नाहून धू घाल्लन त्यास वस्त्रें देणें असें नायबानें सांगितलें त्यावर त्याणें त्यास वस्त्रें देऊन म्हादजी पाटलास सांगितलें कीं कुमाजी पाटलास मसुरास घेऊन जाणें असे निर्वाह

करून म्हादजी पाटलास सागितलें पाठीमागें आह्मीं मसूरास येतों त्यावरून कुमाजीबावा व म्हादजी पाटिल मिळून शाहापूरचे डोंगरापावतो आले तेथ उभे राहून कुमाजीबावा यांणीं म्हादजी पाटलास सांगितल जे आपण गांवास येत नाहीं तुरका बराबर आपण पाटिलकी करीत नाहीं निरोप द्याल तर आपण जाईन म्हादजी पाटील बोलिले जे आपणास जामीन दिलें आणि तुह्मी जाऊं ह्मणतां याचा विचार काय कुमाजी बावा बोलले जे तुह्मास जामिनकीचा तगादा लागला तर अवघेच वतन त्याचे हावाल करणें आपण निश्चयरूप राहात नाहीं मग म्हादजी पाटिलांनीं निरोप देऊन चरेगांवास गेले मग कुमाजीबावांनीं आपली बायको गांवात होती व लेक नरसोजी पांच वर्षांचा होता हे उभयता गांवांतून काढून समागम घेऊन घाटावर मौजे आंबेकींत जावून राहिले तेथें असतां कुमाजीबावा मृत्यु पावले त्याउपर त्यांचे बायकोन आपला लेक नरसोजी समागमें घेऊन निदुतास माहेरास गेली तेथें नरसोजीबावा विसा वर्षांचा जाहला लोक मसूरकराचें मूल ह्मणून पाचारूं लागले मातोश्रीस नरसोजीबावांनीं विचारिलें आपणास मसूरकर ह्मणून पाचारताती हे वर्तमान आपणास सांगणे आपले ठिकाणा वतन सागणें मातोश्रीनें मसूर वतन सांगितलें आणि पहिलें पासून जाहलेलें वर्तमान तेंही सांगितलें तें चित्तामध्यें धरून तेच रात्रीं मातोश्री स्नानास उठली गळ्यांतील ताईत काढून घरामध्यें ठेविला त्यांत पंधरा व्होन होते नरसोजी बावांनीं ताइतांतील पंधरा व्होन घेऊन न पुसतां विजापुरास गेले तेथें जाऊन मसूरचा मोकासा मालिकइनीस पाछाचा सुरतचा जावई त्यास भेटले त्याणीं नरसोजी बावास हालीचालींत शाहाणा पाहून देवडीस ठेविला कांहीं एक दिवसा राहून मलिकइनिसाचे बायकोस अर्ज केला कीं आपण मसूरचे पाटलाचा लेक आपले वतन जबरदस्तीनें बागवान कराडकर यांनीं घेतले आपलें वर्तमान वडिलाची हकेकत सागितली त्यावर बायको बोलिली जे मालिकइनीस दिवाणांतून आलेवर त्यांस वर्तमान सांगतें दुसरे दिवसीं

मलिकइनिस यांनीं नरसोजी बावास बोलावून हकिकत विचारली त्यास त्यावरून नरसोजी बावानीं आपलें वडिलाचे वतनाचा करिना सांगितला व बागवानाचे कर्ज पांढरीवर थोडकेंच होतें परंतु मनसूबी न करीतां बागवानांनीं नायबाचे पाठी करून वतन घेतलें आपला बाप कैदेंत घालून त्याचें मरण केलें आणि आपण परागांदा जाहालों त्यावर आपण मायबाप धणी आहेत माझी मनसुबी करून आपणास वतनावर बैसवावें एतकियावरून मलिकइनिसानें अभय दिल्हें कीं तुझी मनसुबी करून तुझें वतन तुझे दुमाला करूं पोटाची वस्त्राची बेजमी करून दिली घरामध्यें ही बायकास सांगितलें कीं वतनदाराचें मूल आहे त्याची खबर घेत जाणें इतकिया उपर कांहीं दिवस असतां तुरकांनीं कसबे मजकूरची रसद भरून रसदबा कोळविलातीची भुतें रवाना केली कसबे मजकूरचा माहार बाबनाक पलसिकर रसद घेऊन विजापुरास मलिकइनीस मोकासी याचे घरास घेऊन गेला तेथें नरसोजीबावा याची गांठी न पडतां देवडीच्या लोकांनीं म्हारास खासपागेस ठाव दिल्हा म्हार जाऊन पागेस राहताच घोडा मेला व बायकोस तें च भूत लागलें हें वर्तमान मलिकइनीस दरबारीं आयकून घरास आले शाहारांतून पंचेक्षरी आणोन बायको सावध केली इतकियांत म्हार कसबेमजकूर याचे आंगीं भूत बोलूं लागलें कीं आपणांस बागवानांनीं कोळविलातींतील आणोन रसद बरोबर पाठवून पाटलांचें मूल मारावें आपणास पानी देऊन माघारी लावून दिल्यानें आपण माघारीं जाऊं याउपरीं मलिकइनीसांनीं पानीचा खर्च देऊन माघारीं रवाना केली ते कसबेमजकूरास येऊन पोंचलीं त्याजपैकीं बागवान कसबेमजकूरीं राहिले ते गावांतून बाहिर गेले मग मलिकइनीसांनीं बागवानास तलब करून हुजूर आपणापाशीं नेहलें हुजूर करीना मनास आणितां तुरक बागवान बोलला जे आपणासी स्थल देणें इनिसानीं त्याजवरून स्थळ कराडचें उभयतास दिल्हें उभयतां कराडास आले कराडीं पंचाईत होऊन बागवान खोटा केला कराडची सडी घेऊन

नरसोजीबावा विजापुरास गेले समागमें तुरक ही गेला तेथें गेलेयावर तुरकांनीं अर्ज केला कीं जातिभाऊ आपली मनसोभी जाहली नाहीं याउपरीं इनिसानीं पैट्टणचें स्थळ उभयतांस नेमून बरोबर आपला हुजूरचा म्हालदार देऊन हरदो वादेयांस पैट्टणास रवाना केलें तेथें बाबाजीराव पैठणकर याणीं पचाइती करून तुरक खोटा केला तेथून सडी घेऊन विजापुरास इनिसापासी गेले याउपर कराडची व पैठणची सडी मनास आणितां म्हालदार याणीं जबानी सागितलें कीं तुरक जबरदस्तीनें वतन खाताती वतन जगदळे याचें खरें नरसोजी खरा आहे मग इनिसानीं हरदोजणास हरकी गुन्हेगारी बांधोन तुरक कैद केला नरसोजीबावास हुकूम केला कीं पाछायांस अर्ज करून तुज निरोप देतो त्याजवर नरसोजीबावास सांगितलें कीं चोवीस व्होन हरकी तुजवर करार केली नरसोजीबावानीं अर्ज केला कीं चोवीस व्हन आपणासी फिटत नाहीं मेहरबानीं करून सोड दिल्यानें पैका फिटेल इनिसा बोलला जे पाछांचे हुकुमानें करार जाहले तें दरम्यान आपल्याच्यानें सोडवत नाहीं तुझा पैका फिटेना तर आपण हावाला घेतो तुजला फिटतील तैसे फेडणें आणि आपले वादे मारून काढणें त्याजवरोन नरसोजीबावा याणीं अर्ज केला कीं साहेबाचा हुंबर कसबे मजकूर आहे त्यास हुकूम दिल्हा पाहिजे त्यावरून हुंबर यास कागद दिल्हा कीं नरसोजी आपला मुदाई दावा करून मारून काढील त्यास मुजाहीम तुह्मीं न होणें ह्मणऊन कागद दिल्हा नरसोजीबावांनीं कागद घेऊन व इनिसाचा निरोप घेऊन कसबे मसूरचे रानांत आले गावांत पवसती होयना माग किवळास गेले नावजी पाटील किवळकर यांसी भेटून वर्तमान सांगितलें कीं आपली तक्षीम निमी देतों चोविस व्होन द्यावे आणि तुरक मारून काडावे आणि आपली पाठ राखावी त्यास नावजी पाटील बोलले कीं आपणा आठोप होत नाहीं मंग रिसवडास गेले तेथील ही पाटलास वर्तमान हें च सांगितलें त्याणीं उत्तर दिल्हें कीं आपलेयाचेनही आटपत नाहीं तेथून नेत्ररीस भालेराव

याचे येथें गेले त्यास हें वर्तमान सांगितलें त्याणीं ही उत्तर दिल्हें जे आपलेचेन आटपत नाहीं मग त्याचा निरोप घेऊन कुमठेस गेले तेथें हाणगोजी पा। जगदळे याची भेट घेतली त्यास सांगितल जे आपलें वतन तुह्मास देतों चोवीस ल्होन द्यावे आपली पाठी राखावी आपले मुद्राई मारून काडावे येतकी बोली शरूतपूर्वक जाहली हणगोजी पाटिलानीं कबूल केलें त्यास भानजीपंत कुलकर्णी कुमठेकर यांसी हाणगोजी पाटीलानीं वर्तमान सांगितलें त्याणीं उत्तर दिल्हें जे रजावंदीनें दिल्हें आहे याचे प्रमाण काय तुह्मास घेणें असल तर यांस घेऊन मसूरास जाणें तेथें याचे भाऊबंद व बयतेबलुते असतील त्यांचे विदमान हा जें वतन देईल तें घेणें इतकीयाउपरी नरसोजीबावा व हाणगोजी पा। उभयता निगडीचा डोंगरास आले तेथें राहून रावजी खोत हणमंतवाडीकर यांस बोलाऊ पा। तो ही वाडीहून निघोन डोंगरास गेला उभयतांची भेट घेतली नरसोजी बावानीं रावजी मजकुरास सांगितलें जे गावांत जाऊन बयतेबलुते आमचे कोणीहि असेल तर त्यास वर्तमान सांगा जे भेटीस येणें याउपरी रावजी ब्रह्मपुरीस येऊन नाहावियास वर्तमान सांगितलें आपण माघारा वाडीस गेला नाहावी गावात येवून सुतार यास वर्तमान सांगितलें सुतारानें ठाकूर वगैरे यास वर्तमान सांगितलें चवघांनीं चित्तीं गोष्ट धरून कोणास नकळतां वाडीचें रानांत गेले तेथें रावजी खोतानें उभयता पाटिलांच्या व चवघांच्या भेटी केल्या हणगोजी पाटलानीं चवघा बयतेसी विचारल कीं नरसोजी पाटील आपणासी वतन देतों तुमचें विदमान देईल तर आपण घेईन चवघाजणानीं उतर दिल्हें जे आपणास विचारितां तर आह्मी नरसोजीबावास विचारतों कीं तुह्मी यांस वतन किती देतां नरसोजीबावा बोलले जे निमें वतन आपण देतों चोवीस ल्होन याणीं द्यावे आणि आपली पाठी राखावी मुद्राई मारून काडावा असें बोलले मग चवघाबयतांनीं हाणगोजी पाटलास सांगितलें जे वडीलपणाचा मान व पांढरीखालीं जे कायदे असतील ते खेरीज करून

निमी तक्षीमी तक्षिमीचा विभाग निमीचा तारोतार घेणें त्यावरून त्याणीं मान्य केलें तूं जातीभाऊ आहेस नरसोजीस जतन करून मुदाई मारून काडणें आणि उभयतां भाऊ देणें वतन अनभवणें त्यावर हाणगोजी पाटीळ बोलल जे बोलीप्रमाणें सनदपत्र पाहिजे इतकी बोली करार जाहली त्यावर बयस्यांनीं कमळाकर भटास बोलाऊन नेहले त्याचें हातून बोलीप्रमाणें कागद दिल्हा व हाणगोजी पाटलाचे बोलीप्रमाणें इमानपत्र लिहून घेतले त्याउपरी तुरक मारून काडावे या विचारास गेले तुरक मारिले तो मुंजावरानीं पाठिंलाग केला तिथे मुंजावर मारीले तों हुबरानीं कुमक केली याउपरी मलिकइनीसाचा कागद नरसोजीबावापासीं होता तो हुंबरास दिल्हा हुंबर फिरोन माघारा गावास आला मग दुसरे दिवसीं हुबरानीं नरसोजी पाटील व हाणगोजी पाा यांस आणावें असी तरतूद केली उभयता ते वेळस गेले नाहींत गांवांतील तुरकाचा झाडा जाहलियाउपर मग उभयता गावास आले एक वाडींत राहीले बोली प्रमाणें आपले वडील विभाग निमी तक्षीम व वडीलपणा कानू कायदा वडीलपणाचा खात आले आणि तेही निमी तक्षीम निमी तक्षिमेचा विभाग खात आले असे उभयता चालत आले किती एक दिवसा पिसाळ वादास उठले आपले वतन ह्मणऊन त्यास नरसोजीबावा अशक्त जाला होता त्याचे लेक उभयता तानाजी बावा व धाकटा सुलतानजी बावा फुडे पिसाल चावदास तानाजीबावा पाटणास गेले तेथें पाटणचे स्थली पिसाल खोटे करून आले गावास येऊन आपला विभाग व वडिलपणा खात आले आणखी फुडे पिसालानी दावा करून तानाजीबावास मारिलें त्या वेळेस पाठीराखे होते तेही पळून गेले कुमठेकर हीं गावांत होते त्याणीं ही कुमक केली नाहीं कोणाचे अनुसंधें मारिल हे हि कळलें नाहीं पुढें मागती कुरबावीचे स्थलास आपल वडील जावयास कोणी नाहीं सुलतानजी बावा शाहाजी राजे यांचे अमलामध्यें मारीले गेले सुलतानजीबावाची बायको कासिगावीं होती आपले आजे म्हादजीबावा रायगडी होते त्या

उपरी तिमाजीपंत कुळकर्णी यांणीं म्हासाजी पाटलास बोलाऊन आणोन त्यास सांगितलें जे कुरबवीस तुह्मी जाणें कासावा बायकोस पाठवितो येंत नाहीं मग म्हासाजी पाटील बोलला जे वादाचे कर्जा पैका दंडला तर कोणी द्यावा आणि खर्चास काय करावें तिमाजीपंत कुलकर्णी बोलले जे पैका दंडला तर आपण देईन व खर्चास ही आपण देतों तेव्हां चोवीस व्होन म्हासाजीबावास खर्चास देऊन कुरबावीस रवाना केलें कुरबावीस्थली तुरक व पिसल खोटे करून त्यांचे पत्र म्हासाजीबावा-पासीं राहिले त्या पासून कुमठेकर आपले पूर्व पद्धती प्रमाणें चालत आले फुडें कासाई पाटलीण व सुलतानजी पाटील हे उभयता पाटील-कीचा कारभार करित आले ते वेलेस वडीलपणाचे कायदे नागरा-खाली अनभवींत आले त्या आलीकड आपले आजे म्हादजीबावा हे ही नागर नागरा खालीं कानूकायदे अनभवीत आले त्या अलीकडे आपले चुलते शामराव यांनीं व सुभानजी पाटील हे उभयता गावकी करीत असतां कानूकायदे वडीलपणा नागर अनभवीत आले त्या अलीकडे आपण कारभारास उभे राहीलों त्यापासून आजपर्यंत वडीलपणा नागर नागराखालीं कानूकायदे अनभवींत आलों आणि हणगोजीबावाचे इमान-पत्र वडिलापाशीं होते ते गेलें त्याचा कागदपत्र आपणापासी नाहीं प्रस्तूत कुमठेकर यानीं वडिलपणाची कायदेसीर खटखट मांडली तर आपल्या वडिलावडिलांनीं कांहीं सांगत आले नाहींत आगर कायदेचे दाखला आडलला नाहीं ही तकरीर लिहून दिल्ही ताजा कलम हारकी बाबत चवदासई व्होन कुमठेकरांनीं द्यावी त्याजपैकीं सवासे व्होन दिल्हे बाकी पावणे तेरासे राहीले असे वडिलांनीं सांगितलें

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

# नींब–सदानंद

**लेखांक ६२** **१४६३ चैत्र शुद्ध ७**

श्री स्वस्ती श्री सकु १४६३ वरीखे प्लवंग सवछरे चैत्र सूध सप्तमी रवीदीने तदींनि श्री सदानंद गोसावीयाचे मठ मैजे निंब परगणें वाई तेथ अन्नदान प्रतीदिनि चालावेया वृतीपत्र कंठगीरी गोसावीयासी + + + + + + + + लीहुनि भीवोजी ++जी देसाई व माया पाटेलु व सेटीया बसवसेटी कसबे मजकुर : व प्रसोजी आषाडा मैजे आखाडें व माळ पाटेलु मूरुकुटा मैजे राहागौ हे मूक्ष करुनि समस्त देसक परगणे कुडाळ लीहुनी दीलें अैसें जे प्रतीवरुसी देणें बीतपसीलु गला कैली खंडी

| जोझळ | गहू | तुरी |
|---|---|---|
| २\|\|\|४\|\|\|॰ | \|\|३\|॰ | \|\|३\|॰ |

( फारसी सिक्का ) ( निशाणी नांगर ) ( निशाणी तागडी ) ( निा नांगर )

( निशाणी नांगर ) ( निशाणी नांगर )

कसबा ॰\|१

जोझळ
॰\|॰

६) तुरी *६॰\|\|॰ गहू ६॰\|\|॰

माळ पाटेलु मुरकटा
राहागौ ६३

जोझळ ६२

६) तुरी ८॰\|\|. गहू ६॰\|\|॰

ळीगो पाटेलु आनेवाडी
.६२

जोझळ .८१\|\|॰

६) तुरी ८॰\|॰ गहू ८॰\|॰

गांगो पाटेलु खरसी
बुा ८.२

तुकसेटी सायेगौ
.६२

---

* मुळांत सर्वत्र ‿— असें चिन्ह आहे, छापण्यांत ६ असें दिलें आहे.

जोझळ ऽ) ——
८१॥ तुरी गहू
८।· ८।·

जोंझळ ऽ) ——
·८१॥ तुरी गहू
·८।· ·८।.

भोज पाटेलु दरें खुा
.८१॥

जोझळ ऽ) ——
.८१ तुरी गहू
.८।· .८।·

मैंजे मोरघर मुरुकट माळ पाटेलु
८१॥

जोझळ ऽ) ——
.८१ गहू तुरी
.८।· .८।·

जाउजी बाळवडे
.८१॥

जोझळ ऽ) ——
.८१ तुरी गहू
.८।· .८।-

सांगीवी हातगुडा
८१॥

जोझळ ऽ) ——
.८।॥· गहू तुरी
.८॥· .८।.

जाखोजी दरें बुा
.८२

जोझळ ऽ) ——
.८१॥ तुरी गहू
·८।· .८।.

मौंजे किणै भीउजी काटीकर
.८२

जोझळ ऽ) ——
८१॥ गहू तुरी
.८॥· .८॥·

जैदी पाटेलु आरड
८२

जोझळ ऽ) ——
.८१॥ तुरी गहू
.८॥· .८॥·

सोनगौ जैतोजी
८१॥

जोझळ ऽ) ——
.८१ तुरी गहू
.८।· .८।.

करनोसी ळखम जाखोजी
.८२

जोझळ ऽ) ——
.८१॥ तुरी गहू
.८।· .८।.

आळोडि बाळोजी
.८१।.

जोझळ ऽ) ——
.८।॥· तुरी गहू
.७।· .९।.

मैजे करदी काउजी दादाजी

८१।।

जोझळ ३ ——

.८१ .८।।.

तुरी गहू

.८। .८।

मारुळी बाकोजी

.८१।

जोझळे ३ ——

.८।।। तुरी गहू

.८। .८।

सनपने भालेघरा दादाजी

.८२

जोझळ ३ ——

.८१।। तुरी गहू

.८। .८।

ब्राह्मणवली कान्हो पाटेलु

.८३

जोझळ ३ ——

.८२ तुरी गहू

.८।। .८।।

भोगवली राणोजी

.८१।

जोझळ ३ ——

.८।।। तुरी गहू

.८।. .८।

साईघर हणुवाडा

.८१

मैजे राणीघेघर काळोजी

.८१।

जोझळ ३ ——

.८।।। तुरी गहू

.८। .८।

इदवली मालोजी मा +

८१।

जोझळ ३ ——

८।।। तुरी गहू

८। ८।

आखाडे प्रसोजी

८३

जोझळ ३ ——

८२ गहू तुरी

८।।. ८।।

आबेघर बोदुला

८१।।

जोझळ ३ ——

८१ तुरी गहू

८। ८।

भालेघर हरी पाटेलु

८१

जोझळ ३ ——

८।। तुरी गहू

८। ८।

हातीगेघर गोलाभाई पाटेलु

८१

जोझळ
०॥· तुरी गहू
०।· ०।·

पानई खेलोजी गुजर
०२

जोझळ
.०१॥ तुरी गहू
.०।· .०।·

आहार्गणी गाउडा हरी
.०१।·

जोझळ
.०॥।· तुरी गहू
·०।· .०।·

काटवली भीउजी बेळसे
.०१॥·

जोझळ
.०१ तुरी गहू
.०।· ·०।·

वाहागौ हुदोजी
.०१॥

जोझळ
०१ तुरी गहू
.०।· ·०।·

बारा मुन्हे बाबूजी
·।·

जोझळ तुरी गहू
०४ ,०॥ ,०॥

जोझळ
०॥· तुरी गहू
०।· ०।·

विवर रमदेऊ
.०१

जोझळ
.०॥· तुरी गहू
.०।· .०।·

रोहीघर सोनोजी
०१॥

जोझळ
.०१ तुरी गहू
.०।· .०।·

राजाणी जाउजी
.०१॥

जोझळ
.०१ तुरी गहू
.०।· .०।.

माहू तरडा कानो पाटेल
.०१॥

जोझळ
·०१ तुरी गहू
.०।· .०।·

दापोडी जानोजी + + +
.०१।·

जोझळ तुरी गहू
.०॥। .०।· .०।·

| | |
|---|---|
| पीपळी तेटला नगोजी<br>८१।'<br>जोझळ तुरी गहू<br>८।।।' ८।' ८।' | वाळुनु पोफळिया तुक पाटेलु<br>८३<br>जोझळ तुरी गहू<br>८२ ~।।' ~।।. |
| बहुगो कळोजी बादल<br>~३<br>जोझळ गहू तुरी<br>८२ ~।।' ~।।' | सोबनवडी अडबोजी<br>~२<br>जोझळ गहू तुरी<br>८१।। ८।' ~।' |
| खरसी खुा गावडा<br>~२<br>जोझळ तुरी गहू<br>८१।। ८।' ८।' | हैसवें बानो पाटेलु<br>८२<br>जोझळ तुरी गहू<br>~१।।' ~।।' ~।।. |
| सेते गोई सेटी<br>८१।।<br>जोझळ तुरी गहू<br>८१ ८।' ८।' | सरतळे नगो पाटेलु<br>८३<br>जोझळ गहू तुरी<br>८२ ८।।. ~।।' |
| वीरमोरा मोकदमानी<br>गला जोरी तुरी<br>८१ ८८।।' ८।।' | कलमा मोकदमानी<br>जोरी तुरी गहू<br>८१ ~।' ८।' |
| उरतरा मोकदमानी<br>जोरी गहू तुरी<br>८१ ८८।।' ~~।।' | |
| तेरी मेहतारिया तेल*<br>~१ | |

---

* हें सर्व पत्र बालबोधींत आहे.

लेखांक ६३ १४७९ माघ शुद्ध १३

स्वस्ति श्री के १४७९ पीगळ संवत्सरे माघु सुधु त्रयोदसि वारु मंगळु तदीनी त्रीतीपत्र ईनाम लीहीलें लीखीते चांगो पाटैलु बीन ठोब्या पाटैलु मोकदम व कळसेटी बीन रामसेटी गुठाळा चौगुला व एळहो पाटैलु सुपगुडा बीन दामा पाटैलु खेळ पाटैलु बीन राघो पाटेलु नेळेकी बाबसेटी बीन एकसेटी वीमोवी आपो पाटैलु बीन पाको पटैलु सुपगुडा हीरो पाटैलु बीन भोया पाटैलु हागवणा खुळुमसेटी बीन हरीसेटी साळोखा कोयाजी बीन आळोजी मोरीया जान पाटैलु जाधव व काळो पाटैलु सुपडा व माद सेटी सेटिया व वणगो माळी मेहतरी व चांगो मेहतरी साळी व समस्त मुजेरी प्रजा व बाजे मोहतर्फा व बलुते व आडाण मौजे नींब पाा वाई आत्मसुखें सदानंद गोसावियाचे सेवेस त्रीतीपत्र ईनाम लीहुनु दील्हे ऐसें जें नीम चावराचा फाळा व पायपोसी व कारकुनु सारा व दमामा व उटआदा व तकदम व बाजे नकदयाती बीाा

ऐनु आवठु व साणेपाळु

व बीनेफीरी व वेसळी व गांवखंडी व दाणीपासोडी वा तकसीमा ११ बाद ताा ३ बीाा दळे आंबोडी फर्साटे बाकी तकसीमा ८ ताल्लुके रयानी ८ बीताा सूत तूप नमदळोह गवत कडब्री सीरडी बकरा व आर्गतनिर्गत वेटी व जेवी व बीऱ्हाड दीळ्हें असे हें पारेपार चालउनु लेकुरांचा लेकरी अवलादी व अफवादी चालउनु हें सत्य यास जो चुके तो सदानंद गोसाव्याचा द्रोही चंद्रसूर्यो तपे तववरीः रवरवी पचे हा नीमु करुनु सर्मर्पिले हे कायावाचा मान्य सत्य

---


लेखांक ६४ १५२६

श्रीसदानं

द गोसावी

.॥ श्री स्वस्ती श्रीसके १५२६ क्रुधी संवछरे राजश्री मोकदमानी वा खोतानी वा पटेलानी परगणे कुडाल यासी तुलजोजी वा

सोनजी वा एसजी देसाई परगणे मजकूर ल्हावया ारण ऐसे उपरी गोसावीयाच्या मठासी अनछत्राकारणे गला पूर्वी आमचे वडीळानी चाळविळे ते तैसे चि आता तुह्मी चाळवीजे तुमचें थोडें ठाई




वेचतें हे ठाई दीधळ्या सुकृत असे यासि कोन्ही काही उजूर कराळ तरी तुम्हासी आपळें वडिळाच्या सुकृताची आण वा सदानंद गोसावीयाची आण आसे सर्वप्रकारे अनछत्र चाळते केळे पाहिजे पूर्वीचे पत्र सकु १४६३ वरीखे प्लवग सवछरे लिहिले असे तैसे चाळवीजे हे विनंती

| | जोरी | गहू | तुरी |
|---|---|---|---|
| | २।।।४।। | ॱ।।३।ॱ | ॱ।।३।ॱ |

| | | | |
|---|---|---|---|
| का कुडाल | मौजे महीगाउ | आनेवाडी | खरसी बुा |
| ॱ।१। | ०२ | ०२ | ०२ |
| जोरी गहू तुरी | जोरी गहू तुरी | जोरी गहू तुरी | जोरी गहू तुरी |
| ॱ।ॱ ०।।। ०।।ॱ | ०१।। ०। ०। | ०१।। ०। ०।ॱ | ०१।। ०। ०।ॱ |
| सायगाउ | रायगाउ | दरेखुर्द | मोरघर |
| ०२ | ०३ | ०१।।ॱ | ०१।।ॱ |
| जोरी गहू तुरी | जोरी गहू तुरी | जोरी गहू तुरी | जोरी तुरी गहू |
| ०१।। ०।ॱ ०। | ०२ ०।। ०।। | ०१ ०।ॱ ०।ॱ | ०१ ०।ॱ ०।ॱ |
| अरंडे | बेलवडे | भिवडी | सरजापूरु |
| ०२ | ०१।। | ०२ | ०२ |
| जोरी तुरी गहू | जोरी गहू तुरी | जोरी तुरी गहू | जोरी गहू तुरी |
| ०१।। ०। ०। | ०१ ०। ०। | ०१।। ०। ०।ॱ | ०१।। ०। ०। |
| सागवी | करनोसी | दरेबुा | आळेवाडी |
| ०१। | ०२ | ०२ | ०२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जोरी तुरी गहू | जोरी गहू तुरी | जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | |
| ७॥ ७। ७। | ᵒ१॥ ᵒ। ७। | ᵒ१॥ ᵒ। ᵒ। | ७१॥ ७। ᵒ। | |
| करदी | सोनगाउ | राणीगेघर | मारुली | |
| ᵒ२ | ७२ | ७१। | ᵒ१ | |
| जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | जोरी गहू तुरी | जोरी तुरी | |
| ᵒ१॥ ७। ७। | ᵒ१॥ ᵒ। ᵒ। | ७॥ ७। ७। | ७॥ ७॥ | |
| इंदोली | बम्हणोली | आखाडे | सनदने | |
| ७२ | ७३ | ᵒ३ | ᵒ२ | |
| जोरी तुरी गहू | जोरी गहू तुरी | जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | |
| ᵒ१॥ ७। ᵒ। | ७२ ᵒ॥ ७॥ | ७२ ७॥ ᵒ॥ | ७१॥ ᵒ।· ७।· | |
| आंबेघर | भोगोली | भालेघर गला | साईघर गला | |
| ७१॥ | ᵒ१॥ | ᵒ१ | ७१ | |
| जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | बातीगेघर ७१॥ | पानस ७२ | |
| ᵒ१ ᵒ। ᵒ।· | ᵒ१ ७। ७।· | जोरी गल | जोरी तुरी गहू | |
| | | ᵒ॥ ᵒ१ | ७१॥ ७। ७।· | |
| वीवर गला | आखेगणी | रोहीघर | काटोली | बेलोटी |
| ७१ | ᵒ१ | ᵒ१॥ | ᵒ१॥ | ᵒ१॥ |
| राजाणी | वाहागाउ | महू | बात मुऱ्हे | |
| ७१॥ | ७२ | ७१॥ | ·।· | |
| दापोडी | पिंपली ७१॥ | वालत ७३ | करहर ᵒ१।· | |
| ७१ | जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | | |
| | ७॥ ७। ७।· | ७२ ७॥ ᵒ॥ | | |
| हुंबगाउ | सोबान वाडी | सेते | म्हैसवे | |
| ७३ | ७३ | ᵒ१॥ | ७२ | |
| जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | जोरी तुरी गहू | |
| ७२ ᵒ॥ ७॥ | ७२ ᵒ॥ ᵒ॥ | ᵒ१ ᵒ।· ᵒ।· | ᵒ१॥ ७। ᵒ।· | |
| खरसी खुर्द | सरताले | मरडमुऱ्हे | मौजे वीरमोडा | |
| ७२ | ᵒ३ | ᵒ१ | | |

जोरी तुरी गहू जोरी तुरी गहू गेहू जारी
ॅ१॥ ॅ। ॅ। ॅ२ ॅ॥ ॅ॥ ॅ१॥ ॅ॥
उरतरा मोकदमानि कलमा मोकदमानी
जोरी गेहू तुरी जोरी गेहू तुरी
ॅ१ ॅ॥ ॅ। ॅ१ ॅॅ॥ ॅ॥
तूप तेल मेहतरीयानी
ॅ॥ ॅ१

---

लेखांक ६५ १५३६ आश्विन वद्य १२

सदर दिन मठ सदानंद मुकाम मौजे निंब पाा वाई अजरख्तखाने मसुरल हजरत खंडेस्वरी सदायसवंत महामेरू राजमान्य राजश्री हिरोजी राजे मोहिते साहेबु दामदौलतहू बजानेब कारकुनानी हाल वं इस्तकबाल व देशमुखानी मौजे इडमिडे पाा कऱ्हाड सुाा सन सीत अशर अलफ कमलनयन गोसावी यासि इनाम जमीन अवल चावर ·।· दरसवाद मौजे मजकूर देविले असे देखील महसूल नख्तयाती व बाजेपटीया देखील कुलबाब व गला व तूप व वेठबेगारी व फर्मासी देखील पेस्तरपटीया कुलबाब कुलकानू देविले असे दुमाले करणें दरहर साल खुर्दखताचा उजूर न करणें तालिक लेहोन घेऊनु असल खुर्दखत इनामदार मजकुरापाशीं फिराउनु देणें गजशरायणीप्रमाणें हदमहदूद घालुनु देणें परवानगी हुजुरु हिंदु होऊनु मोडील त्यासी गोहत्या मुसलमान होऊनु मोडील त्यासी सोराचे सत्रगद असे सदरहूप्रमाणें चालवणें सालाबाद चालवणें कारकीर्दी दर कारकार्दी फकिराणा चालिला असे सदरहूप्रमाणें चालवणें मोर्तबु

तेरीख २५ माहे रमजानु

---

लेखांक ६६ श्री १५३७ कार्तिक वद्य ७

( शिक्का ) तालिक

अज दिवाण ठाणे प्राा कराड ताा हुदेदारानी व मोकदमानी

मौजे उडतरे प्रा मजकूर बिदानंद सुा सीत अशर अलफ प्रों खुर्द-खत रवाना छ २५ रमजान पौा छ २८ सवाल तेथें रजा जे कमळ-नयन गोसावी यासी इनाम जमीन अवल चावर पाईण ·।· दर सवाद मौजे मजकूर देविले असे देखील महसूल नख्तयाती बाजेपटीया व गला व तूप व वेठबिगार फरमासी देविले असे दुमाले करणें दर हर-साल खुर्दखताचा उजूर न करणें तालिक लिहून घेऊन असल खुर्द-खत फिराऊन देणें गजशरायणी प्रा दिल्हा खुर्द घालून देणें देखील कुलबाबवां देणें हिंदू होऊन मोडील त्यास गोहत्या व मुसलमान होऊन मोडील त्यास सोराची सौगद असे सदरहू प्रों चालवणें ह्मणोन रजा जे बरहुकूम सदरहू प्रों दुमाल केले असे दुमाल कीजे असल मिसली इनामदार मजकुरापासीं फिराऊन देणें मोर्तबसुद तेरीख छ २० सौवाल

---

**लेखांक ६७** **१५५४ भाद्रपद वद्य ९**

(फारसी मजकूर)

अज रखूतखाने खुदायवंद खान अलीशान खान अजम रणदुला फरादखान खुलीदयामदौळतहू बजानीब काग्कुनानि हाळ व इस्तक-बाळ व देसमुखानि पाा वाई बिदानद सुा सलास सलासैन अलफ बदळ इनाम कमळनयन गोसावी मुकाम सदानंदाचा मठ मौजे नींब पाा मजकूर जमीन चावर १८ कीर्दी जमीन दर सवाद मौजे नींब अवळ जमीन सेत बाा पंचाळे जमीन अजरामऱ्हामती केळे असे देखीळ नखत व खरीदी गला व तूप व बाजे ऐनजिनस व वेठी बिगारी व बिलेकटी व मोहीमखर्च व ईदसुभराती व हेर्जीब मुा व पेस्तरपटीया व बाज बाबा देखीळ कुळबाब कुळकानूसी जमीन चावर एक दीधला असे साळ दरसाळ सदानंदाचे मठास चालवीत जाइजे दर हर साळ ताज खुर्दखताचा उजूर न कीजे ताळिक लेहोनु घेउनु असेर्ला खुर्द-खत कमळनयन यानजदीक परतोनु दीजे पाा हुजूर कारकून मोर्तब

तेरीख २२ माहे सफर रुजु शुरुनिवीस
मुा काा वाई

**लेखांक ६८** **१५५६ मार्गशीर्ष शुद्ध १**

अज रख्तखाने राजश्री खेलोजी राजे दामदौलतहू बजानीबु कारकुनानि व देसमुखानि पाा आकळकोट बिदानद सुाासन खमस सलासीन अलफ हिंगलागीर गोसावी सदानंद सेाो नींब यासि बाा धर्मादाउ व भंडारा माहाळी दर गावासि निसबती रयती सादिळवारी अजरामऱ्हामती दीधले असे

गला कैली मण एक   नख्त टका एक

८१   १८

सदरहूप्रमाणे साल दरसाल आदा करीत जाइजे दर हरसाल खुर्दखता उजूर न कीजे दर गावासि सदरहू प्रमाणे आदा करीत जाइजे ताळिक घेउनु असेल फिराउनु दीजे मोर्तब

सुरु सूद रुजु सरखेल   रुजु सुरनिवीस

तेरीख छ ३० जमादिलौव्ल

पौा छ १० जमादिलाखर

---

**लेखांक ६९** **१५५६ फाल्गुन शुद्ध १४**

अज रख्तखाने राजश्री खेलोजी राजे दामदौलतहू बजानेबु कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पाा सुपे बिदानंद सुाा खमस सलासीन अलफ दाा बाा इनाम कमलनयनगीर व हिंगलागीर गोसावी यासि मौजे मुजेवाडी पाा मजकूर अजरामऱ्हामती मुकासा कुलबाब कुलकानू देाा नख्तयाती व बाजेपटीया खर्चपटी व मोहीमपटी तेजी भेटी उलुकापटी महसूल कडबा व वेठी बेगारी फर्मासी व झाडझाडोरा व आंबे व बाग बागाईत व बारगुजार देाा बाजे बाब हाल व पेस्तरपटी होईल ते ऐसे दीधले असे अवलाद अफलाद चालवीजे दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे तालीक घेउनु असेली इनामदार मजकुरापासी दीजे पाा हुजूर

तेरीख १२ रमजानु

बार सुदु

---

**लेखांक ७०** **१५५७ श्रावण शुद्ध ५**

( फारसी मजकूर )

अज दिवाण पा वांई ता मोकदमानि मौजे गोवे सा नींब पा मा सुासन सीत सलासैन अलफु बा खुा रा छ ४ माहे मोहरम सादर जाहाले तेथे रजा जे दरीविले गोविंदगिरी मुरीद कमलनैयान हुजूर येउनु माळूम केले जे आपुले इनामत मळे मौजे गोवे सा नींबसी सालाबाद धरण कलवायत असे तरी हाली ताजा खुर्दखताचे उजूर करून इस्कील करीत असे साहेबी नजर इनायत फर्माउनु सालाबाद अपुले कलवा कैसे चालत होते त्याणेप्रमाणे दुंबाला करून चालवेया रजा होय ह्मणौउनु माळूम जाहाले मेबायंद के गोविंदगीर मुरीद कमलनयान त्याचे वेलेसी सालाबाद ता सालगुा कैसे कलवा पाणी चालत असे त्याणेप्रमाणे दुंबाले करून चालवीजे दर हर साल खुर्दखताचे उजूर न कीजे तालीक लेहून घेउनु असे(ली) परतून दीजे पा हुजरू अतीताचे फिरियाद येऊ ने दीजे ह्मणउनु रजा रजेबरहुकूम खुा रा प्रमाणे इनाम दुंबाले केला असे दुमाला कीजे तालीक लेहून घेउनु असल परतून दीजे कालवा जैसे सालाबाद चालिले आहे तेणेप्रमाणे चालवणे ता सालगुा जैसे चालिले असेल तेणेप्रमाणे दुंबाला कीजे मोर्तब

तेरीख ३ माहे सफर

---

**लखांक ७१** **१५५७ अधिक भाद्रपद वद्य २**

अज रखतखाने मसुरुल हजरत राजश्री जगदेराऊ मुधोजी नाईक तुलीदयामदौलतहू बजानेब कारकुनानि वा मोकदमान मौजे निगुडी किले सातारे सुा सीत सलासीन अलफ दरवज बदल इनाम बाो कमलनयन मानभाव सेकीन नींब पा वाई बदल धर्मादाऊ अजरामऱ्हामत बिघे ८१५ देखील मळा बिघा ८१ नजीक समाध आनंदगिरी देखील नख्-

तयात वा माहासूल कुलबाब कुल मक्षिमल कानू ताा देहाय वा तालुक ठाणे दीला असे दुमाला कीजे अवलयाद अफलाद चालवीजे दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे हद महमद घाल्हनु देणे मुसलमांन होऊनु इस्कल करील त्यास सौगंद असे वा सौवरची सौगंद आसे वा हिंदू होउनु इस्केल करील त्यास गाईब्राह्मणहत्येचे पाप आसे तालीक घेउनु असल इनांमदार मजकुरास परतऊनु दीजे बदल + + + + + + + + + दिल्हा असे

तेरीख १५ माहे रबिळोवल

+ + सलासीन अलफ

---

**लेखांक ७२ श्रीसदानंद १५५८ आषाढ शुद्ध ७**

ॐ अज रख्तखाने मा हा राजश्री सोमाजी दिनकरराउ

( शिक्का ) राजे काकडे दामदौलतहू बजानब कारकुनानि व मोकदमानि मौजे देगाउ किले सातारा सूासन सबा सलासीन अलफ

मौजे मजकुरी बो कमलनयन गोसावी मोकाम मौजे नींब पाा वाई यासि इनाम अवल बिघे ८१० दाहा दोा माहासूल वाजे नख्तयाती वा बाजे उजुहाती व बेठ बेगारी फर्मायसी देखील ठाणेपटी कुलबाब कुलकानू दिल्हे असे दुमाले कीजे अवलादी वा अफलादी दिल्हे असे मऱ्हाटा होऊन मोडील त्यासी गाईचे आण असे मुसलमान होऊनु मोडील त्या सोराचे आण असे तालीक घेउनु असल परतोनु दीजे मोर्तबु सूदु हद महदूद घाल्हन दीजे

( शिक्का )

ताजाकलम एक आंबा इरसाल दिल्हे असे दुमाले कीजे उजूर न कीजे

( शिक्का )

तेरीख ५ माहे सफर

पाौ छ ९ माहे सफर

---

लेखांक ७३ १५५ पौष वद्य ८

( शिक्का ) ( फारसी मजकूर ) ( शिक्का )

अज दिवाण किले सातारा वा देह सदर ताा हुदेदारानि वा मोकदमानि मौजे देगाउ किले मजकूरु सुाासन सबा सलासीन अलफ कमलनयन गोसावी मोकाम मौजे नींब पाा वाई मालूम केले जे राजश्री सोमाजी दिनकरराऊ काकडा मोकाम मौजे मजकूर आपणासी इनाम बिघे १० दाहा देखील माहासूल वा नकदयात वा बाजे उजुहात वा बेठ बेगारी फर्मायसी देखील ठाणापटी कुलबाब कुलकानू खुर्दखत होउनु सदरहू जमीन देविले असे ठाणेचे मिसेली सादीर होणे ह्मणौऊन तरी सदरहू इनाम जमीन बिघे १० दाहा बरहुकूम खुर्दखत मोकासाई मौजे मजकूरु दुंबाला केले असे कमलनयन गोसावीयाचे दुंबाला कीजे ताकीदी असे मोर्तब तालीक लिहून घेऊन असल मिसाल परतून दीजे तेरीख २१ माहे शाबान सन सीत अर्बईन अलफ

( शिक्का )

---

लेखांक ७४ १५५८ माघ शुद्ध ११

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज दिवाण पाा वाई ताा मोकदमान मौजे गोवे पाा माा सुाा सबा सलासैन अलफ कमलनयनाचे बागातील झाडे तोडूनु लाकुडे तुह्मी नेली ह्मणौनु मालूम जाले तरी त्याचे काय लाकडे नेली असतील ती नींबमधे सदानंदाचे मठी आणून देणे फरार जाहालेया पेस्तर तुह्मास संर्गान जाईल दरीबाब ताकीद आहे

( शिक्का )

तेरीख ९ रमजान

---

लेखांक ७५ १५५८

( शिक्का )

अज रख्तखाने राजश्री खेलोजीराजे दामदौलतहू बजानेब कारकुनान व देसमुखान पा। सोपे व बारामती बिदानंद सु॥ सबा सलासैन व अलफ कमलनयनगिरी व हिंगलागिरी गुसावी हुजूर माल्हम केले जे आपणासि इनाम मौजे मुजेवाडी पा। मजकूर बा। खु॥ सालगु॥ आहे साल मजकुरी माहालीचे कारकुने ताजे खुर्दखताचा उजूर करितात दरीबाब खु॥ होय माल्हम जाले तरी कमळनयनगिरी हिंगुळागिरी गुसावियासि इनाम मौजे मुजेवाडी पा। मजकूर बा। खु॥ रा। मोअजम ता। सालगुदस्ता जैसे दुमाले असेली ते बरनिसबती साल मजकुरी दुमाला कीजे तुह्मी तालीक घेऊन असेली खु॥ इनामदारापासी . परतोन दीजे पा। हुजूर रसानीद व माल्हम केले जे आपले हकापैकी सालगु॥ नख्त बा। गला व आंबराईचे नख्त बाकी राहिले आहे ते कारकून देत नाही व आपले हकापैकी ठाणामधे उचापती केली आहे आपणासी इनाम असोन माहाली कारकून इस्कील करून उचापती करिता सकोवतीचा माल आहे दरीबाब सरंजाम होय माल्हम जाले तरी गोसावियास इनाम कुलबाब कुलकानू बादे हाल जाने हाल देखील आंबराई व दुमाहीपटी व तरकारी व जमीये लवाजिमाती कुलबाब दिले असोनु सकोवतीचा माल तुह्मी नेणे हे काय माना आहे आता जे काय तुह्मी नेले असेल ते व गावी बाकी असेल ते कुलबाब दुमाला कीजे याचे गावास ठाणाहून एकजरा तसवीस दिलीया खैरत नाही पेस्तर तकरार फिर्यादी आलिया तुह्मी जाणा तुह्मी गोसावियाचे पैके देऊन व आणीक होन ६ व खुर्दा टके १८ इतके ठाणा नेले व आंबराईचे हद ऐसे जाणिजे ह्मणौन गोसावी माल्हम केले तरी सदरहू पैके तुह्मी नेले असतील ते सिताब फिराऊन दीजे पेस्तर ऐसे अमल केलिया खैरत नाही

( शिक्का )

**लेखांक ७६** **१५५८**

( शिक्का )

अज रख्तखाने राजश्री खेलोजीराजे दामदौलतहू यासि बजानेबु कारकुनानि व देशमुखानि पा सुपे बारामती बिदानद सु॥ सबा सलासीन अलफ कमलनयनगीर व हींगलाजगीर गुसावी हुजूर माॡम केले जे आपणासि इनाम मौजे मुजेवाडी पा मा बा खु॥ सालगु॥ आहे सालमा माहालीचे कारकून ताजे खु॥ उजूर करितातो दरीबाब खु॥ होय माॡम जाले तरी कमलनयनगीर हिंगलाजगीर गुसावीयासि इनाम मौजे मुजेवाडी पा मा बा खु॥ रा मोअजम ता सालगु॥ जैसे दुमाले असेली ते बर निसबती सालमा दुमाला कीजे तुह्मी तालिक घेउनु असेली इनामदारापासी परतोन दीजे पा हुजूर मोर्तब

( शिक्का )

---

**लेखांक ७७** **१५५९ पौष शुद्ध ७**

१/२ ( शिक्का )

अज रख्तखाने राजश्री कृष्णाजी राजे दामदौलतहू कारकुनानि हाळ व इस्तकबाळ कर्याती बालाघाट बिदीनद सु॥ समान सलासीन अलफ मधुकीर गोसावी साकिन अंबोडे का मा हुजूर माॡम केले जे आपणास इनाम बिघे ८४॥ साडेचारी

ठिकणाती बिघे ८३ बाग बिघा ८१॥

दर सवाद मौजे मा कारकीर्दी धाउजी नाईकवाडी किले तातवडा साळे वीस चाळिळे त्याचा भोगवट्याचा कागद गळबलेयात गेला त्यावरी मौजे मजकूर प्राणजी साठेयास मुकासा जाला ते हि भोगवटे खु॥ दीधले तेणेंप्रमाणें भोगवटा व तसरुफाती चाळिली आहे हाली साहेब पेसजी कारकीर्द धाउजी व साठे याचे भोगवटेयाचे कागद मानित नाहीत तरी आपण फिकीर आपला इनामती बहुत साले चालिली आहे तरी साहेबी नजर एनायत फर्माउनु अजरामऱ्हामती

करून खुर्दखत दीधलिया साहेबासी द्वा देउनु खुर्दखत देवावया रजा होय मालूम जाले तरी मधुकीर गोसावी सो आंबोडे यासि इनाम बिघे ८४॥ साडेच्यारी सदरहूप्रमाणे दर सवाद मौजे आंबोडे कर्याती मा अजराम्‍हामती दीधले असे पेसजी कारकीर्दीस चालिले असेली तेणेप्रमाणे दुमाले कीजे तालीक घेउनु असली इनामदारास फिराउनु दीजे मोर्तबू सूद (शिक्का) रुजू सुरुनिवीस

तेरीख ५ माहे साबान

---

**लेखांक ७८** **१५५९ फाल्गुन वद्य ६**

(शिक्का) रुजु निगावान

अज दिवाण ठाणे कर्याती बालाघाट किले पनाला ता मोकदमानी मौजे आंबोडे कर्यात मा बिदानद सुा समान सलासीन अलफ खुर्दखत रा छ ५ साबान पाौ छ १९ सौवाल सादर जाले तेथे रजा जे मधुगीर गोसावी सो आंबोडे कर्याती मा हुजूर मालूम केले जे आपणास इनाम बिघे ८४॥ ता ठिकणाती बिघे ८३ बाग बिघे ८१॥ दर सवाद मौजे मा कारकीर्दी धाउजी नाईकवाडी किले तातवडा साल वीस चालिले त्याचे भोगवटियाचे कागद गलबल्यात गेले त्यावरी मौजे मजकूर प्राणजी साठेयास मुकासा जाला तेही भोगवटे खुर्दखत दीधले तेणेप्रमाणे भोगवटा व तसुरुफाती चालिली आहे हाली साहेबी पेसजी कारकीर्दी धाउजी व साठे याचे भोगवटेयाचे कागद मानीत नाहीत तरी आपण फकीर आपली इनामती बहुत साल चालिली आहे तरी साहेबी नजर एनायत फर्माउनु अजराम्‍हामती करुनु खुर्दखत दीधलिया साहेबास द्वा देउनु खुर्दखत देवावया रजा होय मालूम जालेती मधुगीर गोसावी सेकीन आंबोडे यास इनाम बिघे ८४॥ साडे च्यारी सदरहू प्रमाणे दर सवाद मौजे आंबोडे कर्याती मा अजमऱ्हामती दीधले असे पेसजी कारकीर्दीस चालिले असेली तेणेप्रमाणे दुमाले कीजे

तालीक घेउनु असेली इनामदारास फिराउनु दीजे ह्मणौनु रजा रजेहुकूम अमल करणे मोर्तब

( शिक्का )

तेरीख १९ माहे सौवाल

---

**लेखांक ७९** **१५६० श्रावण वद्य ७**

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज रख्तखाने खुदायवंत खान अलीशान खा। अजम रणदुलाखान खुलीदयामदौलतहू बजानेबु कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पा। वाई बिदानंद सु॥ तिसा सलासैन अलफ जोगिंदरगिरी मठ सदानंद सा। मौजे नींब पा। मा। हुजूर येउनु मालूम केले जे मठ बा। कमलनयनगीर मानभाव याही समाधी घेतली ते वख्ती आपले हवाला मठ व इनाम केला + रु मोकदमा व कुलकर्णी व सेटे माहाजन बाजे लोक मौजे नींब त्यावरी मठ व इनाम आपले हवाला असे गरीबगुरब फकीर जे येतील त्यास अनउदक देऊन असे ऐसे सालबसाल चालत आले आहे हाली हिगुलगिरी मानभाव येउनु हरकती करून आपणास बाहीर घातले आहे याबदल साहेबानजीक आलो आहे नजर एनायत फर्माउनु सरंजामी करून खुर्दखत मऱ्हामती केल पाहिजे ह्मणउनु मालूम केले तरी मठ व इनाम जे असेल तो जोगिंदरगिरीच्या हवाला केला आहे दुमाला कीजे जोगिंदरगिरीस कमलनयनगिरी मानभाव सादूयास कागद लिहून दीधला आहे आणि हिगुलगिरी मानभाव येऊनु हरकती करून यास बाहीर घालवयास त्यास काय निसबती आहे आता ऐसे न कीजे जोगींदरगिरीचे हवाला मठ व इनाम दुमाला केले असे त्यासि काही इलाखा नाही मठ व इनाम जोगिंदरगिरीच्या हवाला केल असे दुमाला कीजे पा। खा। अफजलखान तालीक घेउनु असल फिराउनु दीजे जो कोण्ही लायणी हरकती कारितो त्यास ताकीद करून बाहीर

घालणे मोर्तब पहिले हवाले केले आहे त्या खुर्दखताप्रमाणे दुमाले कीजे मो ( शिक्का )

रुजु सबनिवीस रुजु दफतरखास रुजु शुरुनिवीस

तेरीख २० माहे रबिलाखर

रबिलाखर बार सूदु

---

**लेखांक ८०** **१५६१ वैशाख शुद्ध १३**

( शिक्का ) श्री भानजी रंगना ( फारसी मजकूर )

अज दिवाण पाा वांई ताा मोकदमानी मौजे गोवे पाा मजकूर सुाा तिसा सलासीन अलफ हिंगुलगिरी गोसावीयानीं मालूम केले जे आपला कालवे फोडले असे ह्मणौऊन तरी हे कायमाना असे कालवा फोडाविया त्याच काय अबजा आहे सालाबादप्रमाणे चालिले असेल तैसे च चालिवीजे उजूर असे तरी हुजूर येइजे तलब आहे खातिरेसी आणौनु सरंजाम होईल मोर्तब सूद ( शिक्का )

तेरीख ११ माहे मोहरम

मोहरम

---

**लेखांक ८१** **१५६६ चैत्र वद्य १०**

श्रीगुरुपादुका नमस्तुते

स्वस्तिश्री नृपशालीवाहन शके १५६६ वरुसे तारण संवत्सरे चैत्र वदी दशमी वार सोमवार तदिनी तपोनिधी दसनामा संन्यासी ***** शंकरगीरी ॥ १ ॥ गगा मोहनि ॥ २ ॥ मकुंद भारथी ॥ ३ ॥ सहजपुरी ॥ ४ ॥ आचळगिरी ॥ ५ ॥ सहजगिरी अनंतसागर ऐसे

समस्त दसनाम श्रीसंभुहून मौजे निंब मठ श्रीतपोधन सदानंद मठ मानभाव हिंगलगिरी सामावले मग त्याचे सीश्य गोविंदगिरी यासी तेथें स्तापना करून पट दिले असे यासी कोणी कांहीं ज्ञानीया कुसूर करील तरी श्री गुरुद्रोह घडेल व दसनामद्रोह घडेल गोविंदगिरीचे मठ करून दिले दुसरेस नाही सत्यापासीं कोणी कांहीं कुसूर करील तरी त्यासी श्री दतचे आज्ञा असे हस्त

राजेश्री दत्ताजीराजे देसाई — मोकदम मौजे मजकूर

बीजी पटेल — कृष्णोजी पटेल

( निशाणी नांगर ) ( निशाणी नांगर )

---

**लेखांक ८२** — **१५६६**

श्रीदताजी
बीन गगाजी
देसाई पा
वाई

॥ॐ॥ मोकदमानी मौजे निंब प्रती दत्ताजी नाइक देसाई पा वांई लेहावया कारणें ऐसे जे सुा खमस अबैन अलफ जोगींद्रगीर गोसावी हुजूर जाऊन खुर्दखत आणिलें कीं मठ व इनाम आपले दुमाला करणें त्याप्रमाणें ठाणाचे ही मिसेली सादर जाली असे तरी बाा खुा व मिसेली मठ व इनाम जोगींद्रगिरीचे दुमाला करणें हरकोणी सोदाई करील त्यास ताकीद करीत जाणें जोगींद्रगिरीचे मदत करीत जाणें व पटेलाचे घरीं कागद व वस्तभाऊ मठीचे असेल ते देणें उजूर न कीजे मो

---

**लेखांक ८३** — **१५६६**

॥ॐ॥ सदानंद गोसावी मुा मौजे नींब प्रती दताजी नाईक देसाई पा वाई निा सुासन खमस अबैन अलफ तुह्मास इनाम ज-

मीन चावर १ एक दर सवाद बिा

मौजे नींब चा मौजे गोवें चावर

·।।· ·।।·

येणेप्रमाणे सालाबाद चालिला आसे हाली साल मजकुरी हुजूरून खुर्दखत सादर जाहाले की पेसकसीबदल इनाम निमे हक घेणे त्यावरून गोविंदगीर हुजूर जाऊन मालुमाती करून खुर्दखत आणिले की सदरहू इनामासी पेसकसी माफ केली असे यास तसीस न लावणे इनाम बाा भोगवटा सालाबादप्रमाणे दुमाला करणे ह्मणौऊन खुा आणिले त्यावरून ठाणासी मिसेली बाा खुा प्रमाणे सादर जाहाली असे आता सदरहू पेसकसी हुजरून माफ केली असे तुह्मी आपला इनाम सालाबाद बाा खाऊन सुखे असणे जाणिजे

(श्री दत्ताजी बिन गंगाजी देसाई पाा वाई)

हे विनंती

---

**लेखांक ८४** **१५६७ ज्येष्ठ वद्य २**

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज रख्तखाने खुदायवंद खान अलीशान खाने अजम रुस्तुमजमा खुलीदयामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पाा वाई बिदानद सुा सीत अरबैन अलफ जोगींद्रगिरी व गोविंदगिरी मुरीद कमलनयनगिरी सन्यासी मठ सदानंद साो मौजे नींब पाा मजकूर हुजूर मालूम केले जे आपला गुरु कमलनयनगिरीस इनाम बाा खुा बडेखान साहेब जमीन चावर १८ एक दोा नख्तयाती व खाा गला व बेलकटी व मोहीमखर्च व बेठी बेगारी व बाजे बाब कुलबाब कुलकानु भोगवटा तसरुफाती चालत होता गोसावी समवले त्यामधे कोण्ही चालवणार नव्हता आपण यात्रेस गेलो होते याबदल भोगवटा तुटला साहेबी नजर एनायती

( शिक्का )

फर्माउनु आपला इनाम सदरहू मऱ्हामती होय बराय मालुमाती खातिरेस आणौउनु इनाम दर सवाद मौजे नींब चावर १८ थल पवाळा खुर्द दो मा ना व खा गला व बेलकटी व मोहीमपटी व बाजे बाब कुलबाब जमीन हद महदूद घालून दीजे बा खुा पेसजी बडेखान कमलनयनगिरीस चालत आले आहे तेणेप्रमाणे दुमाला कीजे दरम्यान भोगवटा जाला नाही त्याचा उजूर न कीजे बा खुा बडेखान साहेब प्रमाणे हुजुरून देविले आहे दुमाला कीजे इस्कील न कीजे औलाद अफलाद चालवींत जाणे तालीक घेउनु असल खुर्दखत फिराउनु दीजे पा हुजूर मोर्तब सूद ( शिक्का )

रुजू दफतरखास रुजू सुरुनिवीस

तेरीख १५ माहे रबिलाखर

रबिलाखर

---

**लेखांक ८५** **१५६९ पौष शुद्ध १**

अज रख्तखाने खुदायवंद सिदी अजम सिदी मुझार खुलीदयामदौलतहू बजानेब कारकुनानि सा नींब पा वाई बिदानंद सुासन समान अरबैन अलफ गोविंदगीर मुरीद कमलनयन गोसावीयासि इनाम जमीन चावर १८ एक दर सवाद मौजे नींबमधे असे बा खुर्दखत चालत आहे त्याप्रमाणे चालवीजे बिमोजीब बरहुकुम फर्मान व खुर्दखत कारकीर्दी दर कारकीर्दी ता सालगुा भोगवटा व तसरुपत पाहून सालाबादप्रमाणे दुमाला कीजे तालीक लिहून घेऊन असल खुर्दखत परतून दीजे दर हर साल खुर्दखतचा उजूर न कीजे छ २९ माहे जिलकाद ( शिक्का )

( शिक्का )

---

**लेखांक ८६** **१५७० मार्गशीर्ष वद्य ३**

( शिक्का ) ( शिक्का )

अज दिवाण पा वाई ता मोकदमानी दुदेहे मौजे निंब मौजे गोत्रें सा निंब पा मजकूर बिदानंद सुा इहिदे खमसैन अलफ

बा। खु।। रा। छ ९ रबिलोवल दरसाल सन तिसा अर्बैन अलफ सादर जाहले जे दरीविले गोविंदगिरी गोसावी मुरीद कमलनयन गोसावी हुजूर येऊन माल्म केले जे आपणास इनाम जमीन चावर १ एक दर सवाद मौजे निंब निम ·।।· चावर मौजे गोवें निम ·।।· चावर कारकीर्दी दर कारकीर्दी मोकासाईयानीं माजी मुतैन रवा अस्त सालाबाद भोगवटा व तसरुफाती चालत आहे हालीं पा। मा। साहेबास मोकासा अर्जानी जाहले आहे महाली कारकुनानी ताजा खुर्दखताचा उजूर कारिताती तरी साहेब नजर इनायत फर्माऊनु बरहुकूम भोगवटा व तसरुफाती सालाबाद दुंबाली फर्मावया रजा होय ह्मणून तरी बराय मालुमाती इनामदार मजकूर खातीरेस आणून सदरहू इनाम दुंबाला केलें असे बरहुकूम भोगवटा व तसरुफाती सालाबाद तागाइत सालगु।। कैसे चालिले असेल त्याणेंप्रमाणें रुजू पाहौन दुंबाला कीजे दर हर साला खु।।चे उजूर न कीजे तालिक लेहोन घेऊनु असल परतौनु खुर्दखत दीजे परवानगी हुजूर इनाम गोवासी फुलाचे झाडासी पाट सालाबादप्रमाणें चालवणें ह्मणौनु रजा बा। रजा सदरहू इनाम दुमाला केलें असे भोगवटा व तसरुफातीप्रमाणें दुमाला कीजे तालिक लेहोन घेऊनु असल परतौनु दीजे तेरीख १६ जिलकाद

मोर्तब सुद

---

**लेखांक ८७** **१५७१ ज्येष्ठ वद्य १३**

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज रखतखाने खोदायवंद खाने अलीशान खा। अफजलखान महमदशाही खुलीदयामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल वा इस्तकबाल व देसमुखान पा। वाई बिदानंद सु।।सन खमसैन अलफ दरीविले गोविंदगीर मुरीद कमलनयन हुजरु येउनु माल्म केले जे अपुले इना-

मत मळे मौजे गोवा सा नींबासी सालाबाद धरण कलवायत असे तरी हाली महिमाजी पटेल मौजे मजकूर जाजती करून पणीर्सा खलील करून दर हफ्तेसी दोनी रोज घेणे ह्मणुनु बोलत असे साहेबी नजर इनायत फर्माउनु सालाबाद अपुले कलवा कैसे चालत होते त्याणेप्रमाणे दुंबाला करून चालवावया रजा होय ह्मणुनु मालूम जाहले मेबायद के गोविंदगीर मुरीद कमलनयनयाचे मलेसी सालाबाद तागाईत साल गुदस्ता कलवा पाणी कैसे आलाहिदा चालत होते त्याणेप्रमाणे चालवीजे नवे जिकीर करणे निसबत नाही दरी बाब फरीयाद येऊ ने दीजे बऔलाद वा अहफाद चालवीजे दर हर साला खुर्दखताचे उजूर न कीजे तालीक लेहून घेउनु असल खुर्दखत परतुनु दीजे पा हुजरु रा देवीदास मोर्तब सुदु सालगुा इस्कील जाली आहे त्याचा उजूर न करणे मोर्तब सूद ( शिक्का )

रुजु सुरनिवीस

तेरीख २६ जमादिलोवल सुरु सूद

---

**लेखांक ८८** **१५७१ माघ वद्य १०**

( शिक्का ) ( फारसी मजकूर ) ( शिक्का )

अज दिवाण पा वाई ता मोकदमानि मौजे गोवें सा नीब्र पा मजकूर बिदानंद सुा खमसैन अलफ मौजे मजकुरी कालवा पाणीयाचा धरिला आहे त्यास आठ रोजास सारोन पाणी तुह्मी घेणे व दोनी + + + + + + + + + + + + देणे एणेप्रमाणे मोईन केली आहे तेणेप्रमाणे चालवणे उजूर न कीजे मोर्तब ( शिक्का )

तेरीख २३ माहे सफर

---

**लेखांक ८९** **१५७२**

आनंदगीर गोसावी

त्रिा बो एसाजी कोकाटा प्रा नींब्र यास भीमाजी कदम यास

जमान जबानी पा। मौजे अरले सा। नींब पा। वाई सु। इहिदे खमस-ईन अलफ तुह्मास कागद लेहून दिधले जे वणिवे रीती गहू ·।२ एकून दुणी ·।।।१ देऊन यास मुदती माहे सिमगामधे देऊन जरी ने दु तरी दुणीप्रमाणे देऊन हा कतबा सेहे

---

**लेखांक ९०** **१५७५ मार्गशीर्ष शुद्ध १३**

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज दिवाण किले चंदन ता। मोकदमानि देहाय पा। कुडाल मु। किले मजकूर सु। अर्बा खमसैन व अलफ दरीविला जोगीइंद्र गोसावी मोकाम मौजे नींब पा। वाई मालूम केले जे वज्ञ भंडारा श्री मोकाम मौजे मजकूर दर गावगाना व्रीतीपत्र चालिले असे ते ताकीद करून देवणे ह्मणौऊन वृतीपत्रे दाखविली तरी बा। वृतीपत्र साबिका प्रमाणे वज्ञ भडारा देव सदरहू आदा कीजे फिर्यादी येऊ ने दीजे

मो। ( शिक्का )

तेरीख ११ माहे मोहरम

---

**लेखांक ९१** **१५७५ मार्गशीर्ष शुद्ध १४**

( शिक्का ) ( फारसी मजकूर ) ( शिक्का )

अज दिवाण किले चंदन ता। मोकदमानि वा रयानी देहाय पा। कुडाल मु। किले मजकूर सु। अर्बा खमसैन व अलफ दरीविला जोगींद्र चेला कमळनयन गोसावी मोकाम मौजे नींब पा। वाई मालूम केले जे वज्ञ भंडारा श्री देव मोकाम मौजे मजकूर दर गावगाना व्रितीपत्र गला गेहू वा तुरी तालुक देहाय किले मजकूर चालिले असे ते ताकीद करून देविले पाहिजे ह्मणौउनु व्रितीपत्र दाखविले तरी बा। व्रिरीतीपत्र साबिकाप्रमाणे वज्ञ भंडारा देव श्री मोकाम मौजे

नींब यासि आदा कीजे

कसबे कुडाल

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८। | ८।।। | ८।। |

सायगाउ

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

मौजे अरडे

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१।। | ०। | ८। |

मौजे अनेवाडी ८२

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

मौजे दरे खुर्द ८१।।

| जोरी | तुरी | गेहू |
|---|---|---|
| ०१ | ८। | ८। |

मौजे भिवडी ८२

| जोरी | तुरी | गेहू |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

मौजे वागवी ८१।

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८।।। | ८। | ८। |

मौजे करंदी ८२

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

मौजे महीगाउ ८२

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ०। |

मौजे रायगाउ ८३

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ०२ | ८।। | ०।। |

मौजे बेलवडे ८१।।

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

मौजे खरसी बुा ८२

| गेहू | जोरी | तुरी |
|---|---|---|
| ८। | ८१।। | ८। |

मौजे मोरघर ८१।।

| जोरी | तुरी | गेहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

मौजे सर्जापूर ८२

| गेहू | तुरी | जोरी |
|---|---|---|
| ८। | ०। | ८१।। |

मौजे करनोसी ८२

| जोरी | गेहू | तुरी |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

मौजे सोनगाउ ८२

| जोरी | तुरी | गेहू |
|---|---|---|
| ८१।। | ०। | ०। |

मौजे इंदाली ८२

| | | |
|---|---|---|
| जोरी | गेहू | तुरी |
| ८१॥ | ०। | ०। |

मौजे आंबेघर ८१॥

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ८१ | ८। | ८। |

मौजे वीवर गला ८१

मौजे रांजाणी गला ८१॥

दापोडी ०१

मौजे हुंब्रगाव ८३

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ८२ | ०॥ | ८॥ |

मौजे खरसी खुर्द ८२

| | | |
|---|---|---|
| गेहू | जोरी | तुरी |
| ०। | ०१॥ | ०। |

मौजे असेगणी गला ८१

मौजे वाहागाउ गला ८२

मौजे पिंपळी ८१।

| | | |
|---|---|---|
| जोरी | गेहू | तुरी |
| ८।। | ८। | ८। |

मौजे भालेघर गला ०१

माजे बातगेघर ०१॥

| | |
|---|---|
| जोरी | गला |
| ८॥ | ८१ |

मौजे रोहीघर गला ८१॥

मौजे महू गला ८१॥

मौजे वाळूत ८३

मौजे ब्रह्मणोली ८३

| | | |
|---|---|---|
| जोरी | गेहू | तुरी |
| ८२ | ०॥ | ८॥ |

मौजे भोगोली ८१॥

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ०१ | ०। | ८। |

मौजे सोबानवाडी ८३

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ०२ | ८॥ | ०॥ |

मौजे सरताळे ८३

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ८२ | ८॥ | ८॥ |

मौजे दरे बुाा ०२

| | | |
|---|---|---|
| जोरी | गेहू | तुरी |
| ८१॥ | ०। | ०। |

मौजे राणिगेघर ८१।

| | | |
|---|---|---|
| जोरी | गेहू | तुरी |
| ०।। | ८। | ०। |

मौजे आखाडे ८३

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ८२ | ०॥ | ०॥ |

मौजे मरडी दुऱ्होळा ०१

मौजे आनेवाडी ८२

| | | |
|---|---|---|
| जोरी | तुरी | गेहू |
| ०१॥ | ८। | ८। |

मारुली ८१

जोरी तुरी गेहू
८२ ०॥ ०॥

मौजे साते ८१॥

जोरी तुरी गेहू
०१ ८। ०।

मौजे बारव खुर्द गला ८।

मौजे करबर गला ८१

मौजे ह्मैसगाउ ८२

जोरी तुरी गेहू
८१॥ ८। ८।

जोरी तुरी
०॥ ८॥

मौजे सापन ८२

जोरी तुरी गेहू
८१॥ ८। ८।

मौजे साइखेड गला ०१

मौजे पानस ८२

जोरी गेहू तुरी
०१॥ ८। ०।

एणेप्रमाणे आदा कीजे फिर्यादी येऊ ने दीजे मो ( शिक्का ) तेरीख १२ माहे मोहरम

---

**लेखांक ९२** **१५७६ चैत्र वद्य १२**

( शिक्का )

अज रख्तखाने राजश्री संभाजी राजे दामदौलतहू बजानेबु ( शिक्का ) कारकुनानि हाल व इस्तकबाल का बालाघाट किले पनाला बिदानंद सुा अर्बा खमसैन अलफ बाो मधुकरगिरी गोसावी हुजूर येऊन मालूम केले जे आपला मठ मौजे आंबोडे का मजकूर तेथे आहे यास इनाम जमीन बिघे साडेच्यारी आहे यासि माहाली कारकून इनामपटी मागताती ह्मणोनु मालूम केले तरी गोसावियास इनामपटी माफ केली असे यासि एकजरा हली व पेस्तर तसवीस लागो ने देणे फिर्यादी येऊ ने देवणे तालीक लेहोनु घेऊन असेली खुर्दखत फिराऊन देणे दर हर साला ताजा खुर्दखताचा उजूर न करणे पा हुजूर रा गोविंद माहादेऊ मजमूदार मोर्तबु ता सन इसने चालत

असेली त्याणेप्रमाणे चालवणे ( शिक्का )
तेरीख २५ रुजु सुरुनिवीस
जमादिळोवल सुरू सूद

---

**लेखांक ९३** **१५७९ चैत्र वद्य १**

(श्री) रा वेंकाजी नरसीह हुदेदार व मोकदमानि मौजे नींब पा वाई सुा सन्ना खमसैन अलफ दरीविले जोगींद्र गोसावी सदानंदाचे मठपतीयाचे फर्जंद गोविदगीरी मालूम केले जे मौजे मा ( शिक्का ) लग्ना मुहूर्त होते तेथे जंगम आह्मासी कुसूर करिताती पान- ( शिक्का ) मान लग्न मोहूर्त यास आपणास टाकून जंगम जातो ह्मणौऊन मालूम केले तरी सालाबाद चालिले अमलास नवी जिकीर करावया जंगमाचे काय अबजा आहे आता ताकीद पाहाताच जंगमास ताकीद करून हाल खुद ठेऊन सालाबादप्रमाणे त्याचे पानमान औलाद अफलाद जैसे चालिले असेल त्याप्रमाणे चालवणे तालीक घेऊन असल परतून दीजे मोर्तब सूद ( शिक्का )
तेरीख १४ माहे जमादिलाखर
जमादिलाखर

---

**लेखांक ९४** **१५७९ भाद्रपद शुद्ध १**

(श्री) कमलनयनगिरी सन्यासी मठ श्री मो मौजे नींब पा वाई सुा समान खमसैन अलफ कागद पाठविले मनास आले इनाम मौजे गोवे व नींबमधे आहे त्यास पैकेचे तगादा लाविला आहे ह्मणौ- ( शिक्का ) ऊन लिहिले तर या वकतास ताकीद लिहिले आहे ते ( शिक्का ) तसवीस ने दीजे मोर्तब सूद ( शिक्का )
तेरीख २९ माहे जिलकाद
जिलकाद

---

**लेखांक ९५** **१५७९ भाद्रपद वद्य १०**

सदानंद

(शिका) ॥ अज रखतखाने मा। अनाम राजश्री अंबाजी राजे घाटे साहेब दामदौलतहू ता। हुदेदारानि हाल व इस्तकबाल व मोकदमानि चिंचणेर किले ताथोटे बिदानद सु॥ समान खमसैन व अलफ दरवज बदल धर्मादाउ कमलनयनगिरी सन्यासी मठ मुकाम मौजे नींब पा। वाई यासि गहू केली ·।· पाच कुडो देविले असे आदा कीजे पेस्तर साल दर साल देत जाणे दर हर साला ताजा खुर्दखताचे उजूर न करणे तालीक लेहून घेउनु असल परतोन देणे मो (शिका)

तेरीख २३ माहे जिल्हेज

---

**लेखांक ९६** **१५७९ आश्विन शुद्ध ३**

(फारसी शिका)

अज दिवाण ठाणा देहाय ता। पाली ता। हुदेदारानी व मोकदमानी मौजे उडतरे सु॥ समान खमसैन अलफ दरी वख्त खुर्दखत छ २७ माहे जिल्हेज पैवस्ती छ २५ माहे मोहारम तेथें रजा जे सदानंद गोसावी साकीन निंब यासी मौजे मजकुरीं इनाम जमीन बिघे ·।· तीस दिल्हे आहे बा। भोगवटा कारकीर्दी पेशजी दस्तीबाद आहे त्याणेंप्रमाणें दिल्हे असे दुंबाला करणें मणून बा। खुर्दखत इनाम जमीन ·।· बिघे तीस दिल्हे असे जेणेप्रों भोगवटा सालाबादप्रमाणें दिल्हे असे दुंबाला करणें तालिक लेहून घेऊनु असल मिसेली परंतूनु दीजे मोर्तब

तेरीख २ माहे मोहरम

---

**लेखांक ९७** **सदानंद** **१५८२ आश्विन वद्य १४**

(चिन्ह) अजरख्तखान मशरुल अनाम राजश्री अंबाजी राजे घोरपडे साहेब दामदौलतहू ता हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे चिंचणारे किले ताथोडे बिदानंद सुा इहिदे सितैन अलफ कमलनयनगिरी सन्यासी मठ मा मौजे निंब हुजूर येऊन माळूम केलें जे आपणास धर्मादाऊ गला गहू कैली कुडो ।। पांच मौजे मा प्रा नख्त खरीदपैकीं साल दरसाल देविले होते ते पावत गेले सालमजकुराकारणें महाली कारकून ताजे खुर्दखताचे उजूर करितात ह्मणौन माळूम केलें तरी सन्यासी मजकुरास धर्मादाऊ देविले असे त्यास साल दरसाल ताजा खुर्दखताचे उजूर करणें काय माना आतां बा खुा धर्मादाऊ गहू कुडो पांच दो साला प्रा ना खरीद किापैकीं देत जाणें दरसाल ताजा खुर्दखताचे उजूर न कीजे तालिक लेहून घेऊन असल परतोन दीजे (शिक्का)

तेरीख २७ माहे सफर

---

**लेखांक ९८** **१५८३ माघ शुद्ध ३**

(शिक्का)

अज रख्तखाने खुदायवंद खा शर्जाखान साहेब खुलीदयामदौलतहू बजानेब कारकुनानि व हाल व इस्तकबाल देशमुखानि पा वाई बिदानद सुा इसने सितैन अलफ दरीविला (शिक्का) कमलनयन गोसावी मोकाम मठ सदानंद मौजे नींब पा मा हुजूर येऊन माळूम केले जे आपणास इनाम जमीन बिघे ।। तीस दर सवाद मौजे इडमिडे ता कारवे पा कऱ्हाड जहाती भंडारा बा खुा धारोजी राजे मोहिते व मुकासाइयानि माजी भोगवटा तसरुफात सालाबाद ता सालगुा चालिले आहे हाली मौजे मा किले खा सरंबजखान पणीयासि साहेबी मुकासा दीधला आहे व साहेबास मुकासा नवा अर्जानी जाला आहे माहाली कारकून ताजा खुा उजूर करूनु दुमाले करीत

नाहीत फकीरांचा इनाम आहे नजर एनायती फर्माऊन दुमाले खुा मऱ्हामत केले पाहिजे बराय मालुमाती गोसावीमजकूर खातिरेसी आणऊन सदरहू इनाम दोा माहासूल नख्तयाती व बाजेपटीया व वेठी बेगारी व फर्मायसी कुलबाब कुलकानू बाा खुा मोकासाइयानि माजी भोगवटा व तसरुफाती ताा सालगुाा चालिले असेल तेणेप्रमाणे दुमाले केले असे दुमाले करून चालवीजे दर हर साला ताजा खुा उजूर न कीजे तालीक घेऊन असल खुा परतून दीजे हिंदू अगर मुसलमान होऊन इस्कील करील त्यास आपले महजदाची सौगंद असे पाा हुजूर

तेरीख १ माहे जमादिलाखर (शिक्का)

जमादिलाखर रुजु शुरुनिवीस

पौ छ १ रजब

---

**लेखांक ९९** **१५८४ आषाढ वद्य ६**

आज दिवाण ठाणा ताा तारगाऊ ताहा हुदेदारानी व मोकद-

(शिक्का) दमानी मौजे निगडी किले सतारा सुहूर सन सलास सितैन अलफ दरीविले खुर्दखत बतेरीख १९ जिलकाद दरवज्ञबदल इनाम बाो कमलनयन गोसावी मानभाव सेाा संमत निंब पाा वाई यास बदल धर्मादाऊ जमीन बिघे ०१५ दर सवाद मौजे मजकूर पैकीं देखील मळा बिघे ०२ नजीक समाधी अजरामऱ्हामत करून दिल्हे असे देखील महसूल व नख्तयाती व बाजे उजूहाती कुलबाब व कुलकानूनांत दिल्हे असे दुमाला कीजे हद महदूद घालून देणें दरसाला ताजा खुर्दखताचे उजूर न करणें या इनामास हिंदू अगर मुसलमान इस्कील करील त्यास महजब बाा सौगद असे तालिक लिहून घेऊन असल खुा इनामदारमजकुरास परतोन देणें ह्मणौन मौजे माा खुा रवा असे बाा खुर्दखतप्रमाणें गोसावी यास देखील मळा बिघे दोनी व इनाम जमीन बिघे ०१३ + + + + बिघे ०१५ दिल्हे असे हद महदूद घालून दुमाला कीजे तालिक लिहून घेऊन असल

खुर्दखत मिसेली परतोन देणें दरसाला ताजा मिसलीचे उजूर न करणें मोर्तब ( शिक्का )

तेरीख ९ माहे जिल्हेज

---

**लेखांक १०० १५८४ श्रावण वद्य १४**

०॥ऽ) अज रख्तखाने मो अनाम राजश्री रायाजी राजे घोरपडे साहेबु दामदौलतहू ता हुदेदारानि मोकदमानि मौजे एरोले पा कऱ्हाड सुा सलास सितैन अलफ कमलनयन गोसावी मठ सदानंद (मौजे) नींब यासी पेसजीचे इनाम +दे जमीन बिघे ०५ आहेत ते त्याचे दुमाला करणे दरीबाब ताकीद असे मो ( शिक्का )

( शिक्का )

तेरीख २७ जिल्हेज

---

**लेखांक १०१ १५८४ माघ वद्य ७**

आज दिवाण ठाणे ता देगाव किले सातारा ता हुदेदारानी व मोकदमानी मौजे अनेवाडी पा कुडाल किले चंदन सुा सलास सितैन अलफ बा खुा पा छ ९ जमादिलाखर पौ छ १५ मिनहू सादर जाले तेथें रजा जे दरवज बदल इनाम बो कमलनयन महानभाव सो सां निंब पा वाई बदल धर्मादाऊ जमीन बिघे ०२ दोनी अजरामऱ्हामत करून दिल्हे असे देखील मा नख्तयाती व खा गला कुलबाब कुलकानू दिल्हे असे हदमहदूद घाळून दुमाले कीजे दस्तीदाद जाणून दीजे इनामास मुसलमान व हिंदु होऊनु इस्किल करील त्यासी त्याच्या महजबाची सौगंद असे दर हरसाल ताजा खुा उजूर न कीजे तालिक घेऊनु असल इनामदारमजकुरासि परतोनी दीजे ह्मणौन रजा रजेबरहुकूम इनाम दुमाला कीजे ( शिक्का )

तेरीख २० जमादिलाखर

---

लेखांक १०२ १५८४ माघ वद्य ९

( शिक्का ) शके १५८४

( शिक्का ) अज दिवाण किले चंदन ता मोकदमानि वा रयानी

| | | |
|---|---|---|
| कसबे कुडाल | मौजे आरडे | मौजे महीगाउ |
| मौजे मरडी | मौजे सोनगाउ | मौजे करणोसी |
| मौजे दरे बुा | मौजे करदी | मौजे सोपन |
| मौजे साते | मौजे सांगवी | मौजे हैसव |
| मौजे सातारे | मौजे रायगाउ | मौजे सेरगाउ |

सुा सलास सितैन व अलफ दरीविला जोगींद्र गोसावी मौजे नींब माळूम केले जे आपले विलातीवरी भात कुडो असे ते मागितलेया देत नाहीत हे काय माना असे आता रसीदन मिसेली देखता चि जोगींद्र गोसावियास गला वा बाजे हक सालाबादप्रमाणे आदा कीजे मो छ २२ जमादिलाखर ( शिक्का )

---

लेखांक १०३ १५८४

( शिक्का )

तां हुदेदारानि व मोकदमानि मौजे नींब पा वाई बिदानं(द) सुासन सलास सितैन अलफ मौजे मजकुरी कमलनैन गोसावी राहाताती तरी त्याचे इनाम व मठ तेथे असे त्यास एक जरेचे तशवीश व आजार लागो न देणे एकजरेचे आजार तुमचे तर्फेने जाहले ऐसे खबर माळूम जाहालिया बवाजीबी ताकीद होईल हे एकीन समजोन ब्रहुतवजा गोसावियाचे बरदास्त चालवणे दरीबाब तकीद असे (शिक्का)

---

लेखांक १०४ १५८५ चैत्र वद्य १

सदानंद

(मोर्तब) खान अजम सिताबखान नाइकवाडी किले सतारा ता हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानीं मौजे वरीये किलेमजकूर

सुा सलास सितैन अलफ वा सन अर्बा सितैन अलफ जोगिंद्रगिरी गोसावी मुकाम मौजे निंब प्राा वाई नजीक यास इनाम बिघे ८५ बदल खैराती देखील माहसूल व नख्तयाती व बाजे उजूहात व बेठबेगार कुलबाब कुलकानू दुंबाले केले असे दुंबाला कीजे यास अगर कोण्ही इस्कील करील त्यास सौगद महजबप्रमाणें असे तालीक लेहून घेऊन असल मिसली परतून दीजे इनामास हदमहदूद घाल्लून दीजे मो (शिक्का)

तेरीख १५ रमजान

---

**लेखांक १०५** **१५८५ वैशाख वद्य ३**

सदानंद (शिक्का)

अज दिवाण किले सतारे साहेब सदर तांा हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी व रयानी मौजे वरीया किले मजकूर बिदानद के हर्ची सुहुर सन सलास सितैन अलफ दरींविला अजराम्हामत इनाम जोगींद्रगोसावी मोकाम मौजे निंब परगणे वाई दर नजीक यास इनाम बदल खैराती बिघे ८५ पांच देखील महसूल व नख्तयाती व जमे लवाजिमात व अखदुलबदिवानी व पटी सिके हुमायून व कारइमारती व बाजेपटे मुबारका व मुतखरका माखनलअमान महीअलसुरूर व कानू व कानूनात इस्मी व रसमी व कलमी व कदमी व नकदी व जिनस खाा गला व रोगन व लवाजिमा वर्तना हकदार ठाणा देह मजकूर व पटी सादिलवार व फर्मायसी बेठबेगार मोकुलबाब कुल खुर्दखत दुंबाले केले असे दुंबाला कीजे यास अगर कोण्ही इस्कील करील त्यास महजबप्राो सौगद असे तालीक लेहून घेऊन असल मिसेली परतून दीजे इनामास हदमहदूद घाल्लून दीजे मिसेलीचे उजूर हर साला न कीजे (शिक्का)

तेरीख १६ माहे रमजान

---

**लेखांक १०६** **१५८५ ज्येष्ठ वद्य ६**

श्रीसदानंद गोसावियाचे मठ

( शिक्का ) ॥ अज रख्तखाने मा। अनाम राजश्री अंबाजी राजे घाटे साहेब दामदौलतहू ता। हुदेदारानि हाल व इस्तकबाल व मोकदमानि मौजे निगडी किले सातारे सु॥ अर्बा सितैन व अलफ दरीविला जोगींद्रगिरी सन्यासी नि॥ हुजूर मालूम केले आपणास मौजे मजकुरी इनाम बिघे ८१५ आहे अनछेत्र चालीस पनास सन्यासी जेविताती त्यास पटेल व कुलकरणी इस्केल कारिताती सुरलीत चालवीत नाही त्यास साहेबी ताकीद देविले पाहिजे ह्मणौनु तरी याचे इनामास खलल करणे तुमचे काय अंदाजा आहे आता त्याचे इनाम जैसे सालाबाद भोगवटा चालते तेणेप्रमाणे चालवणे इस्कील व खलल न करणे सदरहू जमीन हद महदूद घालून दुमाला करणे त्यानी च लावणी करून घेतील दुसरेयानी फिर्यादी येऊ ने दणे तालीक लेहून घेउनु असल खुर्दखत परतोन देणे मोर्तब ( शिक्का )

तेरीख १९ माहे जिलकाद

---

**लेखांक १०७** **१५८६ वैशाख वद्य १**

शनिवार

राजश्री सदानंद गुरुराज मठ नींब

कमलनयन गोसावी

०॥ सौजनसागर इस्टजनमनोहर श्री मोकदमानि मौजे अंबवडे का। बालाघाट किले पनाला सु॥सन अर्बा सितैन अलफ प्रती नरसो रामाजी देसकुलकर्णी किले पनाळे आसीर्वाद उपरी आमचे हक मौजे मजकुरी असे त्यापैकी बदल नंदादीप व भंडारा राजाधिराज माहाराज पा। वाई स्वामीयासि होन २८ दोनी देविले असेती ते राजाधिराज श्री यापासी हर साला देत गेले पाहिजे दुसरे उजूर न कीजे साल दर साल कागदाचे उजूर न कीजे औलियाद व अफ-

वाद देविले असे गोसावियासि देणे काही अनमान न करणे हे विनंती या कामासि जो कोणी इसिकील करील त्यासि श्री स्वामीची आण असे तालीक लिहून घेऊन असल परतून देणे जाणिजे हे मो

तेरीख १४ माहे सौवाल क्रोधीनाम संवछरे

वैशाख *शुधी प्रतीपदा शनिवार

विनती

---

**लेखांक १०८** **१५८६ कार्तिक वद्य २**

( शिक्का )

आज दिवाण पाा वांई ताा मोकदमानी मौजे निंब पाा मजकूर सुाा (शिक्का) सन खमस सितैन अलफ मौजे मजकूरीं सदानंद गोसावी याचे मठ आहे त्यानजीक कुंभार नवी जिकीर करून माती खाणताती आणि तुह्मी त्यास ताकीद करीत नाहींस यावरून मालुम होतें कीं तुह्मी कुंभारास सांगोन ऐसें अमल करविता तरी ऐसें न करणें आतां सालाबाद कुंभार जे जागा माती खाण(त) होते ते जागा माती खाणवणें नवी जिकीर होऊं न देणें नवी जिकीर जाहाली तुह्मी जाणा मोर्तब ( शिक्का )

तेरीख १५ माहे रबिलाखर

---

**लेखांक १०९** **१५८६ कार्तिक वद्य २**

( शिक्का )

अज दिवाण पाा वाई ताा कुंभारानी मौजे निंब पाा मजकूर ( शिक्का ) सुाा सन खमस सितैन अलफ हुजूर माल्मम जाहले कीं तुह्मी मठ सदानंद त्यानजीक माती खाणौन तसवीस देता तरी नवी जिकीर करून मठानजीक माती खाणावया तुमचे काय अबाजा आहे सालाबाद जे जागा माती खाणत होतेस तेथें माती खाणें मठानजीक मातीसाठीं खाटिलिया ताकीद होईल उजूर असेल तरी हुजूर एणें मोर्तब

तेरीख १५ माहे रबिलाखर

रबिलाखर

---

* 'शुधी' बद्दल 'वद्य' पाहिजे.

**लेखांक ११०** **१५८६ मार्गशीर्ष वद्य ४**

अज दिवाण ठाणे ताा तारगाउ ताा हुदेदारानि व मोकदमानि मौजे निगडी किले सतारा सुाा खमस सितैन अलफ (शिक्का) मौजे मजकुरी कमलनयन गोसावी मोो नींब याचे इनाम बिघे ०१५ पंधरा आहे त्यास हरएकविसी तसवीस ने दणे गोसावियाचे इनाम आहे जरा तसवीस ने दणे उजूर न करणे मोो कुलास लाविले आहे त्यास तोसीस ने दणे मोो (शिक्का)

तेरीख १७ माहे जमादिलोवल

---

**लेखांक १११** **१५८६ फाल्गुन शुद्ध ५**

गोसावी सदानंद

मसुरल हजरती राजश्री कारकुनानि पाा कुडाल प्रति वीरो राम सुभेदार ताा जाउली सुाा खमस सितैन अलफ सदानंद गोसावियाचे धर्मादाउ रयती निाा दर गावास गला मण एक आहे ह्मणौउनु गोसावियानी सुभा येउनु माह्लम केले तरी सालाबाद भोगवटा पाहोन सालाबादप्रमाणे ताकीद करून देविजे धर्मकृत्य आहे उजूर न करणे छ ३ साबान मोर्तब सूद (शिक्का)

शके १६८६

---

**लेखांक ११२** **१५८६ फाल्गुन शुद्ध ६**

श्रीसदानंद




अज सुभा राजश्री परसोजी माहाडिक सुभेदार नामजाद महालानिहाय ताा मोकदमानी मौजे निगडी किले सातारे ब्रिदानद खमस सितैन अलफ मौजे मजकुरीं श्री याचा इनाम आहे त्यास पैके ला-

विले आहेत तरी तुमची खंडणी केली आहे ते इनाम खेरीज करून केली आहे तरी तुह्मी याच्या इनामास एक जरीयाची तसवीस न देणें तसवीस दिल्ही अगर कांहीं अजार दिल्हीया तुह्मी जाणा ऐसे समजोन अमल करणें पेस्तर फिर्यादी येऊं न देणें मोर्तब सुद (शिक्का)

तेरीख ४ साबान

---

**लेखांक ११३** **१५८७ कार्तिक वद्य २**

(शिक्का)

(शिक्का) अज रखतखाने खुदायवंद खा। शर्जाखान खलदयामदौलतहू (बजानेबु) कारकुनानि पा। वाई बिदानंद सु॥ सीत सितैन अलफ दरीविले गोविंदगिरी मुरीद कमळनयन + + हुजूर येउनु मालूम केले जे आपला इनामतीचा मळा मौजे गोवें सा। नींब पा। मजकूर तेथें धरण कालवा सालाबाद अज महतकदम पाणी मळियासि येत असोन हाली मोकदम हरकत करून मळियासि पाणी मिळो देत नाही मळा इनाम निसबती मठ सदानंद आहे जागा रवा नेक आहे आपण दुवागीर फकीर आहों साहेबी मेहेरबान होउनु धरण पाणी सालाबाद जैसे आहे तेणेप्रमाणे चाले ऐसा सरंजाम फर्माविला पाहिजे ह्मणौउनु ता। हुजूर मालूम केले तरी तुह्मी माहाली कारकून आतां फकीरांचे इनामास तसवे पाणियास तसवीस होणे अजब आहे हाली रसीदन मिसाल गोविंदगिरी मुरीद कमलनयण याचे इनाम मळा जागा रवानेक दर जागा गोवें सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी यास पाणी जैसे होते तेणेप्रमाणे देवीत जाणे मोकदम तकरार पाणियासि करितो तरी त्यासि ताकीद होय हे काम सहाबाचे आहे बिलाकसूर सालाबाद दरण पाणी देउनु रवानेक जागा जैसा पेसजी होता त्याहून ज्यादा होय ऐसे करून देवणे उजूर न करणे अवलियाद अफवाद चालवणे दर हर साला ताजा खुर्दखताचा उजूर न करणे तालीक लेहोनु घेउनु

असेली खुद इनामदार मजकुरास परतूनु देवणे पाा हुजूर मोर्तब सूद

( शिक्का )

तेरीख १५ माहे जमादिलोवल रुजु शुरुनिवीस

जमादिलोंवल पौ छ ७ माहे जमादिलाखर

---

**लेखांक ११४** **१५८७ कार्तिक वद्य ३**

(शिक्का) अज रख्तखाने माा अनाम राजश्री नरसोजी अंबाजी राजे घोरपडे साहेबु दामदौलतहू ताा हुदेदारानि व मोकदमानि मौजे चिंचणी किले ताथोडा बिदानद सुाा सीत सितैन अलफ दरवज बदल धर्मादाउ कमलनयनागिरी सन्यासी मठ मुकाम मौजे नींब पाा वाई यासी गहू कैली ·।· पाच कुडो देविले असेती आदा कीजे पेस्तर दर हर सालास ताजा खुर्दखताचे उजूर न कीजे तालीक लेहून घेउनु असल परतून दीजे माजी खुर्दखत सन समान छ २३ जिल्हेजी दुमाले केले असे त्याप्रमाणे दुमाले कीजे मो ( शिक्का )

तेरीख १६ माहे जमादिलोवल

जमादिलोवल

---

**लेखांक ११५** **१५८७ फाल्गुन वद्य २**

ताा मोकदमानि मौजे इरमडे ताा कऱ्हाड सुाा सीत सितैन अलफ जोगींदर गोसावीयासि मौजे माा इनाम बिघे तीस आहे सालाबाद चालिले आहे ह्मणोन मालूम केले तरी सालाबाद भोगवटा चालिला तागाईत सालगुाा चालिले असेल तेणेप्रमाणे सालमजकुरी चालवणे उजूर न करणे छ १५ रमजान ( शिक्का )

---

**लेखांक ११६** **१५८७ फाल्गुन वद्य २**

मोकदमानी मौजे गोवे पाा वाई सुाा सीत सितैन अलफ जो- गींदरनाथ गोसावी याचा इनाम मौजे माा चावर ·॥· निम आहे

हे सालाबाद ता। सालगु॥ चालिले असेल तेणेंप्रमाणें सालमजकुरीं चालवणें उजूर न करणें छ १५ रमजान

मोर्तब
सुद

**लेखांक ११७** **१५८७ फाल्गुन वद्य २**

मोकदमान मौजे निंब पा। वाई सु॥ सीत सितैन अलफ जोगींदर गोसावी यासि मौजे मजकुरीं इनाम चावर ·।।· निम चालत आले आहे ह्मणौन मालूम केलें तरी सालाबाद ता। सालगु॥ चालत आले असेल तेणेप्रमाणें सालमजकुरीं चालवणे उजूर न करणें छ १५ रमजान मोर्तब

फारसी

**लेखांक ११८** **१५८९ पौष वद्य ७**

रुजू + + + ( शिक्का )

अज दिवाण ठाणें पा। कऱ्हाड ता। मोकदमानी मौजे इडमिडे पा। मजकूर सु॥ समान सितैन अलफ मौजेमजकूर कमलनयन सदानंद गोसावी याचे इनाम चावर पाऊण मदतकदम चालत आले आहे तरी गोसावी मशारनुलेचे इनामपैकीं उचापती न करणें ते हुजूरन खुर्दखत आणितील तेणेंप्रमाणें मिसेल सादर होईल मोर्तब ( शिक्का )

तेरीख २० माहे रजब

**लेखांक ११९** **१५९१ श्रावण वद्य १०**

सदानंद मठी

॥ खान अजम सिताबखान सरनाइकवाडी किले सतारा व किलेनहाय ता। बाजी पटेल मोकदम व मोकदमानी मौजे निगडी किले

मजकूर सुाा सबैन अलफ चे इनाम मौजे मजाा बिघे ८१५ असें-ती याबाबें तुह्मास साल दरसाल मिसली सादीर होत असेती कीं इना-माचे जरा बजरा पावते कीजे आणि तुह्मी हरकत करून इनामाचे जरा बजरा हिसेबुप्रमाणें आदा करीत नाहीं ऐसें बरें नव्हे इनाम खैरातीचे तुकडा असे व याचे इनामावरी काय पैका कोण बाब कैसे कैसे घेतां दखल होत नाहीं आतां जरा बजरा पावते कीजे फिर्याद येऊं न दीजे फिर्याद आलीया तुह्मी आपले केले पावाल खैरत नव्हे जाणिजे ताकी-द असे मोर्तब ( शिक्का )

तेरीख २३ माहे रबिलावल

---

**लेखांक १२०** **१५९१ आश्विन वद्य ११**

( शिक्का )

अज सुभा पाा वाई ताा मोकदमानि मौजे नींब साा माा सुाा-सन सबैन अलफ फकीर मठ सदानंद माह्लुम केले जे आपले इना-मतीपैकी उचापती कारिताती ह्मणउनु तरी याचे इनामतीपैकें उचापती करणे बाजीत नाही याचे इनामास तसवीस न देणे याची फिर्यादी येऊ ने दणे सालाबादप्रमाणे दुमाला केले असे दुमाला करणे पेस्तर दफ्तर रुजू मिसेली घेणे मोर्तब ( शिक्का )

तेरीख २४ जमादिलोवल

---

**लेखांक १२१** **१५९१ कार्तिक शुद्ध ३**

सदानंद

श्री खान अजम सिताबखान सरनाईकवाडी किले सतारा व
(शिक्का) किलेनहाय ताा मोकदमानि मौजे निगडी किले मजकूर सुाा
सन सबैन अलफ जोगींद्रगिरी गोसावी मोकाम मठ

मौजे नींब याचे इनामास हर एक बाबे आजार देतां ह्मणे हे काय माना असे हे खैरातीचे टूकडा असे बाजे इनामाबराबरी गोसावीचे

इनामास तोसीस न दणे ताकीद असे घडीघडी फिरयाद येऊ न दीजे व सरनाइकीचे पैके जैसे हिसेबी असेल तैसे कीजे बाजे तोसीस लागो न देणे दरीबाब फिरयाद येऊ न दीजे मो बाजे पटी अगर हर एक पटी आपले गावताफ पाहून घेणे मठाचे इनामास एकजरा तसवीश ने दीजे व फिर्याद येऊ ने दीजे ( शिक्का )

तेरीख १ जमादिलाखर

---

**लेखांक १२२** **१५९१ कार्तिक वद्य १४**

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज दिवाण पाा वाई ताा मोकदमानि दुदेह

मौजे नींब मौजे गोवे

साा नीब पाा माा सुाासन सबैन अलफ बाा खुाा छ जमादिलाखर पौ छ २७ जमादिलाखर सादर जाहाले तेथे रजा जे दरीविला गोविंदगिरी गोसावी मुरीद कमलनयन गोसावी हुजूर येऊन मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर १८ एक दर सवाद दुदेह मजकूर बिताा

मौजे नींब चावर नीम मौजे गोवे चावर नीम

·॥· ·॥·

बमोजीब खुर्दखते मोकासाइयानि माजी व कारकीर्दी दर कारकीर्दी भोगवटा व तसरुफाती सालाबाद चालत आहे हाली कारकून पाा मजकूर नसती इस्कील करून चौथाई बाा पैके घेऊन जातात साहबी मेहरवान होऊन ताकीद खुर्दखत मऱ्हामत केले पाहिजे ह्मणौऊन तरी गोसावी मााइलेस बदल खैरात इनाम दीधला आहे त्यास चौथाईची तोसीस देणे काय माना आहे सदरहू इनामास चौथाई माफ केली असे तो + + + + भोगवटा व तसरुफाती सालाबाद ताा सालगुाा जैसे चालिले असेल तेणे (प्र)माणे चालवणे दर हर साल खुर्दखताचा उजूर न करणे तालीक लेहून घेऊन (असल) खुाा परतून दीजे पाा

हुजूर ह्मणऊन रजा रजेबा अमल कीजे तालीक लेहून घेऊन असल मिसेली इनामदार मा परतऊन दीजे मोरतब (शिक्का)

तेरीख २७ माहे जमादिलाखर

जमादिलाखर

---

**लेखांक १२३** **१५९१ माघ शुद्ध १**

सदानंद

खान अजम सिताबखान सरनाइकवाडी किले सतारा व किले-

(शिक्का) नहाय ताा बालाजी अनंत हुदेदार व मोकदमानी मौजे इडमिडे पाा कऱ्हाड सुाा सबैन अलफ मठ मोकाम मौजे निंब पाा वाई याचे इनाम मौजे मजकुरीं तीस बिघे इनाम असे सालाबाद चालत असे तुह्मी मिसलीचे उजूर करिता ह्मणे त्याचे इनाम त्यास दुंबाले करविले असे दुंबाले कीजे याचे फिर्याद येऊ न दीजे जाणिजे मो (शिक्का)

तेरीख २९ शाबान

---

**लेखांक १२४** **१५९२ कार्तिक शुद्ध ७**

सदानंद

(शिक्का) खोदायवंद खान अलीशान सिताबखान सरनाइकवाडी कि-

(शिक्का) ले सतारा व किलेनहाय ताा हुदेदार व मोकदमानी मौजे चिंचणारे किले ताथोडा सुाा सन इहिदे सबैन अल-फ जोगिंद्रगिरी बावा मोकाम मौजे निंब मठ यास मौजे मजकुरीं साल दरसाल गहू कुडो ।' देत असा तरी जैसे सालाबाद चालिले असे तेणेंप्रमाणें चालवीजे नवी जिकीर न कीजे सालाबाद चालिले असेल त्यास इस्कील न कीजे ताकीद असे फिर्याद येऊं न दीजे ताकीद असे मोर्तब (शिक्का)

तेरीख ५ माहे जमादिलाखर

---

**लेखांक १२५** **१५९२ कार्तिक शुद्ध ७**

सदानंद

ॐ खान अलीशान सिताबखान सरनाईकवाडी किले सतारा
(शिक्का) व किलेनहाय ताा हुदेदार व मोकदमानी मौजे वरीये
किले मजकूर सुा सन इहिदे सबैन अलफ जोगिंद्रगिरी
मोकाम मौजे निंब पाा वाई मठ याचे इनाम ताा मौजे मजकूर बिघे
०५ असे तरी ऐसीयास जैसे सालाबाद साल दरसाल चालिले असे
त्याप्रमाणें चालो दीजे या बाबे पेशजी भिस्त रोजी खानमशारनिलेचेही
ताकीद असे त्या मवाफीक चालविजे सालाबाद चालिले असेल त्यास
नवी जिकीर न कीजे व इस्काल न कीजे दरी बाब ताकीद असे (शिक्का)
तेरीख ५ माहे जमादिलाखर

---

**लेखांक १२६** **१५९२ पौष वद्य ८**

॰ श्रीतामाजी गणेश पंडित (शिक्का)

अज दिवांण पाा वांई ताहा मोकदमांनि देहाय
मौजे नींब मौजे गोवे
साा नींब पाा मजकूर सुाासन इहिदे सबैन अलफ दाा बदल इनाम
मोहनगिरी गोसांवी मुरीद आनंदगिरी बाा खुाा राा छ २७ जमादिला-
खर पौा छ २१ माहे साबान सादर जाहाले तेथे रजा जे दरीविला
मोहंनगिरी गोसावी मुरीद आनंदगिरी गोसावी हुजूर येउनु मालूम केले जे
आपणास इनाम जमीन चावर १० एक दर सवाद दुदेह मजकूर
मौजे नींब चावर नीम मौजे गोवे चावर नीम
॥ ॥

ब्रिमोजीब खुर्दखत मुकासाइयानि माजी व जिनत असांवी + + साहेब भोगवटा व तसरुफती चालत आले आहे माहाली कारकून ताजा खुर्दखताचे उजूर कारिताती ह्मणऊन तरी मेबायंद के खातिरेसी आणून मोहंनगिरी गोसांवी मुरीद आनंदगिरी गोसांवी इनांम जमीनं चावर १॰ एक दर सवाद

मौजे नींब चावर मौजे गोवे चावर नीम

·॥· ·॥·

दुमाले करून दीधले असे दुमाले करणे सालाबाद ताा सालगुदस्ता भोगवटा व तसरुफाती जैसे चालिले आहे तेणेप्राा अवलियाद व अफ-वाद चालवीजे दर हर साला ताजा खुाचे उजूर न कीजे तालीक लेहून घेऊन असल खुा फिराऊन दीजे ह्मणऊन रजा रजेबाा सदरहू इनांम जमीन चावर १॰ दर सवाद दुदेह

मौजे नींब चावर मौजे गोवे चावर

·॥· ·॥·

बाा भोगवटा व तसरुफाती सालाबाद ताा सालगुदस्ता बाा भोगवटा मिसेली ठाणा छ २७ जमांदिलाखर दर सालगुदस्ता सन सबैन अलफ जैसे चालिले असेल तेणे तेणे दुमाला कीजे तालीक लेहून घेऊन अ-सल मिसली इनामदारमारासी परतून दीजे मोर्तबू सूद ( शिक्का )

तेरीख २१ माहे साबान

शाबांन

---

**लेखांक १२७** **१५९३ ज्येष्ठ शुद्ध १५**

ॐ खान अलीशान फतेखान व मिराखान नामजाद किले सतारा ताा मोकदमानी मौजे निगडी किले मजकूर सुहूर सन इसने सबैन अलफ मौजेमजकुरीं इनाम सदानंद बिघे ॰१५ असेत मधें आबचे झाडें आहेत तुवा त्याचे दुमाले केले असे फर्याद येऊं न दीजे मोर्तब

तेरीख १३ सफर

---

पुणे ... ८१७ प, नारायण पेठ

लेखांक १२८ १५९३ आश्विन शुद्ध ७

सदानंद

अजरख्तखान खोदायवंद खान अलीशान सिताबखान सरनाइ-
( शिक्का ) कवाडी किले सतारा व किलेनहाय तां हुदेदारानी व मोकदमानी मौजे निगडी किलेमजकूर सुा सन इहिदे सबैन अलफ जोगींद्रगिरीबावा मोकाम मठ मौजे निंब पाा वाई याचे इनाम मौजे मजकुरी बिघे ८१५ असेती ऐसीयास त्याचे जैसे सालाबाद साल दरसाल चालत असे त्या मवाफीक चालो दिजे व पेशजी भिस्त रोजी खानमशारनुलेचे ताकीद होती तैसेच चालो दीजे नवी जिकीर न कीजे दरीबाब ताकीद असे बादज फिरयाद येऊं न दीजे जाणिजे सालाबाद चालिलेप्रमाणें दीजे इस्कील न कीजे ताकीद असे

तेरीख ५ माहे जमादिलाखर ( शिक्का )

---

लेखांक १२९ १५९३ कार्तिक शुद्ध १०

श्री सदानंद गोसावी

मसुरुल हजरती राजश्री गोविंदराऊ नामजाद व कारकून मौजे उझर्डे यास विठल दतो सुभेदार व कारकून सुभा ताा जाउली नमस्कार सुा इसने सबैन अलफ मौजे माा श्री मो निंब पाा वाई याचा इनाम आहे ह्मणऊन माल्हूम जाहले तरी सालाबाद ताा सालगुाा श्री यास इनाम व तसरुफती चालिले असेल त्याप्रमाणें हालीं सालमजकुरीं चालवणें उजूर न करणें छ ८ रजबु

---

लेखांक १३० १५९३

श्रीदत

॥ श्री दसनाम मानभावा

बहिरवगीर दिगांबर राजेंद्रपुरी दिगंबर

| | |
|---|---|
| रामेस्वरगिरी दिगंबर | गोविंद भारती दिगांबर निर्बाणी |
| पोकरपुरी मंडीलीक | दोरकागीर बोधले |
| भोवानगीर मंडीलीक | शाम परवंत दिगांबर |
| गंगाबन मलीक | मणकंठगीर मेघनाथी |
| गरीबपुरी दिगंबर | दयाहरीपुरी बडे आखाडे |
| | निर्बाण निरंजनी |

येणेप्रमाण दसनाम बालगोपाल मिलोन मठ राश्री मो मौजे नींबगोवे पा वाई सुा इसने सबैन अलफ येथे आलेयावरी मठामधे मठधारी गोसावी होते ता

| | |
|---|---|
| मोहनगीर | मनसागीर |
| आनंदगीर | रामचंद्रगीर |

येणेप्रमाणे होते तेथे त्यामधे बोलीचाली पाहाता मठीचे कुणबीण बुली होती थिने आपले जीव दिल्हे ऐसे समाचार कलला त्यावरी दसनाम गुरूने मनास आणून भांडारा घेउनु मठपतीयास सेले देउनु मोकलीक केले आता कुणबिणीचे जीव दिल्हे त्याचे काही लिगाडी नाही दसनामानी येउनु अनपाणी घ्यावे यास फुडे कोणी बोलेल त्यास दसनामाचे आण व राजश्री चे आण असे यास बिला हरकत करावयास कोणासी निसबत नाही दसनामाचे हे गोस्टी माफ केले असे पेस्तर जो कोणी बिला हरकत करील तो दसनामाचे गुनेगार वमली कागद सही मठधारी मोहनगीर आहेत त्याचे सेवा मठामधे जे बालगोपाल आहे त्यानी करावी येणे

गोही

| | |
|---|---|
| तुलोजी पाा | सुरियाजी बसराऊ वा |
| मलजी पाा व | माहादजी अभगीराउ |
| अंताजी पाा | नाइकवाडी |
| ( निशाणी नांगर ) | ( निशाणी कट्यार ) |
| भिकोवा कुलकर्णी | |

७ ब, [illegible] पेठ, पुणे

**लेखांक १३१** **१५९४ वैशाख शुद्ध ११**

अज रखूतखाने खुदायवंद खा वालाकदर बुलंद मकान फतेसिताबखान व मीराखान सरनाईक किले सातारा व जमीये किलेहाय ता हुदेदार हाल व इस्तकबाल व मोकदमानि व रयानि मौजे वरिये किले राजा सुा।सन इसने सबैन अलफ इनाम दर सवाद मौजे मजकूर मठ सर्पुदीन पीर मो नींब पा वाई जमीन ८५ बमोर्जीब साल गुदस्ता सा साही चालत आहे सालमजकुरी हि ते च दुंबाले केले असे तालीक लेहून घेऊन असल मिसाल आनंदगीर गोसावी यानजीक परतोन दीजे ( शिक्का )

( शिक्का )

तेरीख ९ मोहरम

---

**लेखांक १३२** **१५९४ मार्गशीर्ष वद्य १**

मा अनाम राजश्री कारकुनान का हुमगाउ यासि विठल दतो सुभेदार व कारकून सुभा जाउली सुा सलास सबैन अलफ रेवागीर गोसावी जटाधारी याचे इनामात झाडे आहेत ऐसीयास गोसावियाचे जैसे सालाबाद चालिले असेल तैसा हाली चालवणे उजूर न करणे छ १४ साबान ( शिक्का )

गोसावियास गावातून घरोघरीहून भाकरी देवीत जाणे

मोर्तब
सुद

---

**लेखांक १३३** **१५९६ ज्येष्ठ शुद्ध ३**

( शिक्का )

आज दिवाण ठाणा ता सातारे ता मोकदमानी मौजे वरये ता मजकूर सुा खमस सबैन अलफ छ ७ सफर पैवस्ता छ १ रबि-

लवल सुभाहून रजा सादर जाली तेथें रजा जे जोगींद्रगीर मानभाऊ जाब्रती कमलानयन सेकीन साा निंब यास इनामती जमीन बिघे ८१५ मौजे मजकुरीं सालाबाद भोगवटा चालिला आहे ऐसीयास सालगुदस्ता सदरहू जमीन पडी पडिली होती सालमजकूर इनाम कीर्दीस लावितील तरी लाऊ देणें कीर्दी जालियावरी पेस्तर सनद सादर होईल त्याप्रमाणें आदा करणें तालिक लिहून घेऊन असल परतोन देणें ह्मणऊन रजा सनदेबाा इनाम लावणीस दुमाले केले असे लावणी जालियावरी पेस्तर सनद सादर होईल त्याप्रमाणें अमल करणें तालीक घेऊन असल मिसेल परतोन दीजे मोर्तबु सुद रा

तेरीख १ माहे रबिलावल माहे रबिलावल (मोर्तं बशुद)

---

**लेखांक १३४ श्री १५९७ वैशाख वद्य ९**

तालिक बाा असल

राजश्री कुकाजी बयाजी हवालदार व कारकून
ताा सातारा गोसावी यासि

ॐ अखंडितलक्ष्मीराजमान्य स्नेहांकित कृष्णाजी भास्कर सुभेदार व कारकून सुभा महालहाय पाा वाई व सातारा आशिर्वाद व नमस्कार सुाा खमस सबैन अलफ रो जोगेंद्रगीर मानभाउ जावती कमळनैन सेकीन संमत निंब यास इनामती जमीन बिघे ८१५ पंधरा आहे ती त्यास सालाबाद याचे भोगवटा चालत आला आहे त्यास सालगुदस्त जमीन पड पडली होती साल मजकूर इनाम मजकूर कीर्दीस लावितील तर लाऊ देणें पेस्तर तुह्मास सनद सादर होईल तेणेंप्रमाणें अंमल करणें तालिक घेऊन असल परतोन देणें रवाना छ ७ सफर मोर्तब ( शिक्का ) मौजे वरये कीर्द होऊं देणें उजूर न करणें मोर्तब असे ( शिक्का )

( शिक्का )

---

**लेखांक १३५** **१५९७ कार्तिक शुद्ध ७**

( शिक्का )

( फारसी मजकूर )

अज रखूत मसुरल हजरती राजश्री जगदेराऊ नाईक साहेब खुलीदामदौलतहू बजानेब हुदेदारानि वा मोकदमानि मौजे पापरडे ता। मोरगीर मरली बिदानद सु॥ सीत सबैन अलफ अजरामऱ्हामती इनाम कमलनयनगिरी मानभान भाऊ मठाधिपती श्रीसदानंद मुकाम मौजे नींब पा। वाई यास मौजे मा। इनाम जमीन चावर नीम ·।।· दीधले असे नख्तयाती महसूल व बाजे बाब कुलबाब कुलकानू कदीमपटी व पेस्तरपटी व वेठ बेगारी व फर्मासी व बाजे उजुहाती इनाम फकीराणा अनछत लंगर इनाम दीधला असे दुमाले कीजे यासि उजूर न कीजे सदरहू मुसलमान व हिंदू भले सदरहू आपले महजदाची सौगद असे असल खुर्दखत इनामदार मजकुरापासी दीजे तालीक लेहोनु घेउनु इनाम फकीराणा देणे मोर्तब

तेरीख ५ माहे शाबान

---

**लेखांक १३६** **१५९७ माघ वद्य ६**

श्रीसीव
राज शंकर मु
कुंद धोंडदेव
आज्ञाधारक

अज दिवाण सुभा पा। वाई ता। मोकदमानी मौजे गोवें तान्हा-जी (पा)टील सां। निंब सु॥ सीत सबैन अलफ मौजे मजकूरपैकीं गोसावी यास एक बिघा दिधला आहे आणि तूं कथळा करितोस तरी आतां त्याचा बिघा त्यास देणें गांवपैकीं दिधला आहे ऐसें असतां क-

थला कारितोस तरी आजीपासून गोसावी याचे वाटें नव जाणें छ १९ जिलकाद

(मोर्तब सुद)

---

**लेखांक १३७** श्री १५९८ आषाढ वद्य ३०

श्रीसदानंतगोसावी
अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य राजश्री
माहादाजी आनंत सुबेदार व कारकून सुभा
ताा सातारा गोसावियासि

सेवक दताजी त्रिमल नमस्कार सूरसन सबा सबैन अलफ श्री गोसावियाचा इनाम ताा मजकूर तर्फेस सालाबाद जैसा चालिला आसळ तेणे च प्रमाणे चालवीत जाणे आपले तर्फेन आगर दुसर तर्फेन सर्वथा तसवीस लागो ने दणे बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा रा छ २७ रबिलाखर

(मोर्तब सुद)

---

**लेखांक १३८** १५९८ अधिक श्रावण शुद्ध १४

( शिक्का )

अज दिवाण ताा सातारा ताा मोकदम देहाय ताा मजकूर सुा सबा सबैन अलफ रा सदानंद गोसावी याचा इनाम गांवगला बिा

८१५ मौजे निगडी
८१० मौजे देगांऊ
८५ मौजे वरये

---

·।·

एकूण तीस बिघे आहे तो दुमाले करविला आहे बाा सनद सुभा छ २६ रबिलाखर पौ छ १२ जमादिलवल रजे बाा दुमाले करून दर-साला सनदेचा उजूर न करणें तालिक घेऊन असल परतोन दीजे छ १२ माहे जमादिलवल मोर्तबु

मोर्त
बशुद

---

**लेखांक १३९** **१५९८ भाद्रपद वद्य १**

( शिक्का )

आज दिवाण किले सातारा ताा मोकदमानीं मौजे निगडी ताा सातारा सुाा सबा सबैन अलफ मौजेमाा आनंदगरी गोसावी याचा इनाम आहे तो चालतच आहे त्यासी कोणी रजपूत येऊन तोसीस देत आहेती तरी त्यासी कोणेविशीं तोसीस न लगे तें करणें छ १५ रबि-लाखर मोर्तब सुद ( शिक्का )

---

**लेखांक १४०** **श्री** **१५९८ पौष वद्य १२**

राजमान्य राजश्री आनंदगिरी गोसावी यासि सेवक सीऊजी बिन तुकोजी पवार वस्ती डोणिजे सरणाई सुाा सबा सबैन अलफ लेहोनु दिधलें ऐसें जे तुमचे टके ३४ आपणाकडे होते त्यापैकीं चाकरीमधें फिटले टके ११ बाकी राहिले टके २३ तेवीस येपैकीं उगवणी करून देउनु छ २५ जिल्काद लिहिलें सही

कोयाजी पाटील    रखमाजी पाटील
मौजे बलवडे    मौजे बलवडे

---

**लेखांक १४१** **श्री** **१५९९ ज्येष्ठ वद्य १३**

राजश्री तुकाजी प्रभु हवालदार व कारकून ताा
सातारा गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महादाजी

अनंत सुभेदार व कारकून सुभा ता सातारा आसीर्वाद अनुक्रमे नमस्कार सुा सबा सबैन अलफ ता मा सदानंद स्वामीचा इनाम गावगना आहे बिघे

८१५ निगडी पवाराची
८१० देगाव
८५ वरयें
·।·

एकूण पाव चावर आहे तो कुल रा पंतानीं दुमाले करविला आहे तरी तुह्मी कुल इनाम दुमाले करणें दर हर साला ताजे सनदेचा उजूर न करणें तालिक लेहोन घेऊन असल कागद फिराऊन देणें रा छ २६ रबिलाखर ( शिक्का ) ( शिक्का )

---

**लेखांक १४२** **श्री** **१६०० कार्तिक वद्य १४**

मशुहुरल हजरती राजमान्य राजश्री अनाजीपंत सचीव यासी प्रती राजश्री संभाजी राजे दंडवत उपरी रा सदानंद गोसावी यांस निंबमधें इनाम होता तो सांप्रत मना केला आहे त्यावरून गोसावी यानीं आह्मास सांगोन पाठविलें कीं आमचा इनाम जैसा चालत होता तैसा चालता केला पाहिजे ऐसीयास हा मामला काही आह्मास दखल नाहीं याकरितां तुह्मास लिहिलें असे तुह्मास कळेल तें यांचें पारपत्य केलें पाहिजे बहुत लिहिणें तरी तुह्मी सुज्ञ असा छ २७ रमजान सुा तिसा सबैन अलफ सही*

---

**लेखांक १४३** **१६०३ श्रावण शुक्ल १३**

श्रीसदानंद

वृतीपत्र शके १६०३ वरुषे दुर्मती नाम संवत्छेरे श्रावण मासे सुकलपक्षे त्रियोदसी वार तदीनि श्री गोसावी मठ सो

---

* हीं दोन अक्षरें संभाजीचीं आहेत.

नींब पाा वाई यासि धर्मात कारणे वरसासन करून दिल्हे काा मले-
वाडी पाा माण सुाा इसने समानीन अलफ बिहुजूर हाजीरून मजालसी

| | |
|---|---|
| राजश्री साबाजी मालोजी | देसकुलकर्णी |
| घाटिगे देसाई काा मजकूर | राघो कोनेरी व |
| साबाजी<br>मालोजी<br>घाटिगे | कृस्णाजी कोनेरी |
| | कृस्णाजी पटेल |
| | कसबे मजकूर |
| ह्याकोजी पटेल सरमोकदम | विठोजी पटेल |
| काा मजकूर | मौजे आंधली |
| जाउजी पटेल | रंभाजी पटेल |
| मौजे निंडोल | मौजे हिवरे |
| साबाजी पटेल | मानाजी पटेल |
| मौजे पालवडी | मौजे मोहे |
| तुलाजी बीन सुभानजी पोल | दताजी पटेल |
| मौजे दहीवाडी | नरवणे |
| ह्यसाजी व चाहुजी इंगले मोक- | माहातजी पटेल |
| दम मौजे सिदीं बुाा | व बालोजी पटेल |
| संभाजी बिन पदमाजी पटेल | मौजे गोंदवले |
| मौजे पिंपरी | खुर्द |

नाईकवाडियानि

जखोजी बिन रुद्रोजी नाईक
पदमोजी बिन संबाजी नाईक
धारोजी बिन कृस्णाजी नाईक
खासू बिन आहिरजी नाईक

सदरहू हाजीर मज्यालसी विदमाने वरसासन करून दिल्हे प्रतिवरुसी भंडाराबदल मठास द्यावे गला कैली खंडी बेरीज १॥२॥०

| | |
|---|---|
| ६॥· कसबा | ८।२ सिरवली |
| ८॥· हिंदाळा | ७॥।· कुळ माराए |
| ६॥ बेथे | ८॥ कुकरडे |
| ७।२ सिदी खुर्द | ७॥ पिंगळी बुा |
| ७१ दडिवडी | ८।२ किरकसाल |
| ७।· पिंगळी खुर्द | ६॥ गोंदोले खुर्द |
| ७॥ गोंदवले बुा | ८॥ कोदवडी |
| ८१ आंधली | ७१ निडळ |
| ६। बोडिके | ६॥ धामणी |
| ६॥। पालवण | ६। चानवाज |
| ६॥ सिदी बुा | ६। वडजलवाडी |
| ६। पागरी | ८। कुमारडी |
| ६॥ बिजवडी | ७॥ काळवाडी |
| ७। मोगराळे | ६॥ सोनवडी |
| ७॥। वोवरहिरे | ७१ पळसी |
| ७॥ हिवरे | ६॥ ढाकरगाव |
| ६। भाडिवली | ६॥ वाल्हे |
| ६। खोकडें | ६॥ जांबुळपाड |
| ७॥ वडगाव | ७१ विरली |
| ६॥ राजेवाडी | ६॥। वळीखुर्द |
| ७।२ तोंडिले | ६॥ सिंगणापूर |
| ६॥ पाचवडी | ८॥। मारडी |
| ६॥ थांबाळे | ७॥ सोवरी |
| ६१ नरवणे | ७।२ जासी |
| ७॥।· मोहे | ६॥ खुटबावी |
| ६॥ सोकासन | ७॥। परयतर |

| | |
|---|---|
| ८॥ राणंद | ८॥ संभुखेड |
| ८॥। भालेवाडी | ८॥। विजबावी |
| | ८॥ कारखेल |
| | ८॥ धुळदेव |

१३८२
१३॥।
१३८
१२॥२

लेखांक १४४ १६०३ कार्तिक वद्य १३

सदानंद

॥ श्री मा अनाम कारकुनानीं व मोकदमानीं मौजे तुसरवीरें

| साबाजि राजे घा टिगे |
|---|


इनाम का मळेवाडी यासि राजश्री साबाजी राजे घाटिगे देसाई का मजकूर सुा इसन्ने समानीन अलफ दरीविला गोसावी आखाडा श्रीमोकाम मौजे निंब पा वाई यासि इनाम आजरा मऱ्हामत बा ठिकाण पेशजी गोसावी यांचे मळा देवपुल व बाजे जमीन जे काय सालाबाद असेल ते सदरहू मळा देखील झाडें व बाजे जमीन असेल ते निंबकर गोसावी यास देविले असे याचे दिमती करणें मळा व बाजे जमीन असेल ते कीर्दी कारितील हदमहदूद असेल ते दाखऊन देऊन हर दरसाला ताजा खुर्दखताचे उजूर न करणें मा पा हुजूर

मोर्तब सुद (फारसी)

तेरीख २६ माहे जिलकाद

**लेखांक १४५** **१६०४ आश्विन वद्य २**

सदानंद




रो मोकदमानी मौजे उझर्डे साा हवेली ताा वाई सुाा सलास समानीन अलफ तीर्थस्वरूप राजश्री अनंतगिरी गोसावी मठ श्री मुाा नींब यास पेसजी तुह्मी काय देत होतेस ते काही दिवाणातून नाही आता हि जे दणे असेल ते देत जाण त्यास काही दिवाणातून आइला होणार नाही गाउ गुााचा मामला आहे जैसी समजावीस करणे ते करी(त) जाणे दुसरियाने फिर्यादी येऊ न दणे छ १५ माहे सौवाल




---

**लेखांक १४६** **१६०५ कार्तिक ३०**

श्रीसदानंद




रोखा मोकदमानि मौजे कवीठे साा हवेली पाा वाई सूाासन आर्बा समानीन अलफु मौजे नींब याचा इनाम मौजे मजकुरी

आहे ऐसीयासी सालगुदस्ता चालिले आहे तेणेप्रमाणे चालवणे एकजरा उजूर न करणे छ २७ जिलकाद ( शिक्का )

---

**लेखांक १४७** श्री **१६०६**

राजश्री आनंदगिरी महंत साहेबाचे
सेवेसी

दा दा दत्ताजी पाटील मौजे देगाऊ ता सातारा सुा खमस समानी अलफ कताबा लेहूण दीा ऐसे जस दाहा साल मुदल मण ८२ घेतो त्याची वाडीसकट मण ८३ तीन देऊन कलवा पाहिजे ऐसा कतबा लेहून दिा के बिघे ८१० खरीदीचे राहाली असे कलल पाहिजे हा कताबा सही ( निशाणी नांगर )

---

**लेखांक १४८** **१६०८ मार्गशीर्ष शुद्ध २**

( शिक्का )

कौलनामा ताहा आनंदगिरी गोसावी मठ सदानंद मुा का निंब सां मजकूर पा वाई सुहूरसन १०९६ बाबे कौलनामा ऐसा जे तुमचे बाबे तुळाजी पाटील मोकदम का मजकूर माळूम केलें ऐसा जे गोसावी याचे सुदामत चालत आले आहे तैसेच तुह्मी चालविलें पाहिजे ह्मणौऊनु अर्ज केला बराय अर्ज खातिरेस आणउनु तुज कौल सादर केला असे तुझें सुदामत चालत आलें आहे तैसे चालेल सुखें मठीं राहणें कोण्हे बाबें शक न धरणें दरींबाब कौल असे

तेरीख ३० जिल्हेज ( शिक्का )

---

**लेखांक १४९** श्री **१६०९ श्रावण वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक १४ प्रभवनाम संवत्सरे श्रावण बहुल दशमी सोमवासरे क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधीश्वर श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणीं राजश्री येसाजी मलार देशाधिकारी व देश-

श्री ॥ शंभु
भजनोत्कंठ मो
रेश्वरसुत नी
ळकंठ

लेखक प्रांत वाई यांसि आज्ञा केली ऐसी जे मठ श्री सदानंद गोसावी मो। कसबे निंब प्रा। वाई यासि मठमजकुरीं अनछत्राबदल ऐवज पेशजीं कैलासवासी स्वामीच्या वेळेपासून चालिला आहे स्वामीनेंही तेण्हेंप्रों ऐवज द्यावयाची आज्ञा केली होती परंतु सांप्रत कारकून पाववावयास हैगै कारितात ह्मणून राजश्री आनंदगिरी गोसावी मो। मठमजकूर याणीं लिहिलें त्यावरून कळों आलें तरी पहिलेपासून अनछत्र चालिलें असतां मधें ऐवजाबाबें कुसूर करावया काय गरज याउपरी तऱ्ही ऐवज पाववावया बाबें सुस्ती न करणें पहिलेपासून द्यावयाचा मोईन असेल तेण्हेप्रों पाववींत जाऊन अनछत्र चाळो देणें धर्मकार्यास खलेल न करणें जाणिजे अनछत्राचा मामला पूर्वींपासून ता। सालगुदस्ता चालिला असेल ते मनास आणून त्याप्रमाणें चालवणें उजूर न करणें लेखनालंकार

मर्या
देयं विज
यते

सुरुसुद बार

---

**लेखांक १५०** **श्री** **१६०९ भाद्रपद**

तपोनिधी राजमान्य राजश्री आनंदगिरी गोसावी मो। मठ का। निंब प्रांत वाई प्रती राजश्री संभाजी राजे उपरी तुह्मीं पत्र पाठविलें पावोन अभिप्राय कळों आला अनछत्रास ऐवज पहिलेपासून हा कालपर्यंत पावत आला परंतु सांप्रत देशाधिकारी ऐवज पाववावयास हैगै कारितात तरी ऐवज पावेसा केला पाहिजे ह्मणून लिहिलें त्यावरून देशाधिकारी प्रांत वाई यास आज्ञापत्र सादर केलें असे तें पाववणें याउपरी ते तुह्मास पहिलेपासून पावत आले असेली तेण्हेंप्रों पावते कारितील धर्माच्या कार्यास अंतर पडणार नाहीं तुह्मी भुवनगिरी गोसावी याजवळी श्रीचा प्रसाद देऊन पाठविला तो स्वामीस पावोन वंदिला

निरंतर आपणाकडील कुशल वर्तमान लिहीत जाणें बहुत काय लिहिणें

मर्या
देयं विज
यते

---

**लेखांक १५१** **श्री** **१६०९ पौष वद्य ३**

सदानंद

श्री सकल तीर्थस्वरूप राजश्री आनंदगिरी बावा स्वामीचे सेवेसी सेवक खेमाजी घोरपडे मोकदम मौजे सायगांऊ ता मेढे सुभा जावली स्यापाद डोई ठेऊन नारायणीं विनंती उपरी स्वामीचे श्री स्वामी याचे अणछत्र आपले वडिलाचे संकल्प आहे जे प्रती व्रसी भात बारीक ८१ एक देयावें तें आपणापासून राहिलें होतें ऐसीयासी याचे स्वामीचे आज्ञा जाहली आज्ञाप्रमाणे प्रती व्रसी भात सदरहू मठी अणून देत जाणाईन हे आपले व तुमचे इनाम सुा रा १७ रबिलावल

सुा समान समानीन ( निशाणी नांगर )

---

**लेखांक १५२** **१६१०**

सदानंद

·॥ॐ॥ स्वती श्री सखे १५ विजय संवछरे राजश्री तुबाजी नाईक वा रतनोजी नाईक + + + नाईक देसमुख वा माहाभलो अनंत देसकुलकरणी पाा कुडाल

( शिक्का ) ( शिक्का ) ( शिक्का )

ताहा मोकदमानि वा खोतानि वा सेटे माहाजन वा बाजे खुमानी तालुक देहाय पाा मजकूर सुा आर्बा खमसैन अलफ कारणे देहाय मजकुरी आमचे वडीलानी व्रीतीपत्र राजश्री स्वामीचे मठ मो नींब पाा वाई तेथे आनछत्रासी व्रीतीपत्र करून दिल्हे पहिले पत्र सके १४६३

पळवग संवछरेस एक पत्र दिल्हे होते त्यावरी भोगोटा चालत आला ते जीर्णपत्र जाहाले ह्मणउनु आमचे वडिलानी दुसरे व्रीतीपत्र करून दिल्हे सके १५२६ संवछरे क्रोधी नाम संवछरी पहिलेप्रमाणे करून दिल्हे की लेकराचे लेकरी हे अनछत्र मठी चाले ऐसे करणे ह्मणऊन सौसंक्रुत घालून पत्र दिल्हे त्यावरी हाली आमचे कारकीर्दीस लिहिलेप्रमाणे चालवावेयाचे व्रीतीपत्र त्यानेप्रमाणे जैसे पाहिजे ह्मणऊनु मठीचे गोसावी येऊन त्यानी दोनी पत्रे दाखऊन सदर साहेबाचे मिसेली करून घेतले मग आह्मी पत्र करून दिल्हे असे सदरहूप्रमाणे गावगना केली खंडी बितपसील

ऐनजिनस खंडी ४।१

| | | |
|---|---|---|
| जोरी खंडी | गहू | तुरी |
| २।।।४।। | ॰।।३। | ॰।।३। |
| अरा बितपसील | | |
| का। कुडाल | सायगाउ | आरडे |
| ॰।१। | ०२ | ०२ |
| आ। बि। | आ। बि। | |
| ॰।॰ जोरी | ०१।। जोरी | ०१।। जोरी |
| ०।। तुरी | ०।॰ गहू | ०।॰ गहू |
| ०।।।॰ गहू | ०।॰ तुरी | ०। तुरी |
| | ०२ | ०२ |
| सांगवी ०१। | करदी | इंदोली |
| ०।।।॰ जोरी | ०२ | ०२ |
| ०। तुरी | विवर | |
| ०।॰ गहू | ०१ | ०१ |
| आंबेघर | रांजाणी | हुंबगाउ |
| ०१।। | ०१।। | ०३ |

| | | |
|---|---|---|
| ८१ जोरी | | आा बिा |
| ८।॰ तुरी | | ८२ जोरी |
| ८।॰ गहू | | ०-॥ गहू |
| | | ८॥ तुरी |
| दरीखुर्द | महीगाउ | रायगाउ |
| ०-१॥ जोरी | ८१॥ जोरी | ८३ |
| ८। तुरी | ८।॰ तुरी | आा बिा |
| ८।॰ गहू | ८।॰ गहू | ०-२ जोरी |
| | | ०-॥ तुरी |
| | | ८॥ गहू |
| बेलवडे | सोनगाउ | |
| ८१॥ | ०-२ | |
| बह्मणोली | अरडे | भोगोली |
| ८३ | ८३ | ८१॥ |
| सनपने | आखेगणी | वाहागाउ |
| ०-२ | ८१ | ०-२ |
| पिपली | सौबनवाडी | सरताले |
| ०-१॥ | ८३ | ०-३ |
| अनेवाडी | दरेखुर्द | भिवडी |
| ०-२ | ०-१॥ | ०-२ |
| दरेबुा | राणीगेघर | अखोडे |
| ०-२ | ०-१। | ०-३ |
| भालेघर | बातगेघर | रोहीघर |
| ०-१ | ०-१॥ | ०-१॥ |
| महू | वाह्वत | सेते |
| ८१॥ | ०-३ | ०-१॥ |

२४

| | | |
|---|---|---|
| मरडमुऱ्हे | खरसी बुा | मोरघर |
| ०१ | ०२ | ०१॥ |
| सरजापूर | अलेवाडी | मारुली |
| ०२ | ०२ | ०१ |
| सनपने | साईघर | पानस |
| ०२ | ०१ | ०२ |
| काटोली | बेलोसी | बारामुऱ्हे |
| ०१॥ | ०१॥ | ।' |
| करदी | ह्मसवे | |
| ०१। | ०२ | |

येणेप्रमाणे करून वडीलानी दिल्हे हे चालवावे जो इस्कील करील त्यास देवाची आण असे वा आपले वडी(ला)ची आण असे हे त्रीतीपत्र सही

---

लेखांक १५३ १६११

॥श्री॥ सौजन्यें समस्त मोकदमानी व शेटे महाजन देहाय समतानिहाय

| | |
|---|---|
| सा। हवेली | समत निंब |
| सा। वाघोली | सा। कोरेगाव |
| सा। मुरे जोरखोरें व जांबुळ खोरें | |

प्रती दताजी केशवजी नाइक देशमुख व देशपांडीये प्रा। वाई त्याहावया कारणें सुा। सन १०९९ तिसैन अलफ बदल भंडारा व नंदादीप म० श्री सदानंद गोसावी मुा। मौजे निंब बा। सालाबाद रुजूपत्र तीर्थरूप रा। नरसोजी नाइक पत्र बहुत जीर्ण जालें नूतन पत्र करून देणें ह्मणोन राजश्री आनंदगीर गोसावी येहीं येऊन रदबदली केली त्यावरून तमाम मोकदम बैसोन पूर्वील सनद मनास आणोन हालीं त्याप्रा। सनद

करून दिल्ही दर मुकाम लष्कर हजरती जिलसुभांनी मोकाम मौजे तुळापूर प्रा पुणा गाव कुडो वृती करून दिल्ही ती पिढी दरपिढी चालवणें हिंदू अगर मुसलमान हरकती करील त्यासी आण असे मोडुन दर गांवास बिा

सा कोरेगाऊ गला कुडो ४॥२

तपसील

बाजी पटेल व बाबाजी पटेल मौजे कोरेगाऊ गला कैली ०३

ता

जोरी ०२ गहू ०१

मौजे खेड बाो चंचली व धुमाळवाडी गला कैली सा मण ·।१

ता

मौजे मार चंचली धुमाळवाडी

०३ ०२ ०१

ह्मसाजी पटेल मौजे कुमठें खुर्द गला कुडो ०३

जोरी ०२ गहू ०१

जाउजी पटेल मौजे हिवरे गला कुडो ०२

मलजी महातोजी पटेल मौजे तडवळे बुाा गला कैली ०२॥

तानाजी पटेल मौजे शेंदूरजने खुर्द गला कैली कुडो ०२

धनाजी पटेल मौजे भोसें गला ०१॥

हरजी पटेल मौजे शिरंबें गला कैली कुडो ०१

विठोजी पटेल मौजे कुमठे बुदरुक काा रहिमतापूर गला कैली ०४ ताा

गहू ०२ जोरी ०२

मौजे भाडळे गला कैली ०३

जोरी ०२ कुसुंबे ०१

मौजे चिमणगाव येसजी पाटील गला कैली ०३

जोरी ०२ गहू ०१

येकोजी पाा मौजे किणई गला कुडो ०२

लिंबाजी पाा नेटका मौजे अंबोड गला ०२

उदाजी पाा मौजे चोरजांब गला कुडो ०२

दताजी पटेल मौजे रुवी गला कुडो ०२

संताजी घोरपडे पाा मौजे नाहावी खुर्द गला कुडो ०१॥

गोंदजी पाा अलगुडा मौजे सांगवी गला कुडो ०२

बाबजी पटेल मौजे एकंबे गला कुडो ८३
सिवजी पाा मौजे निगडी गला ८१॥
भिकाजी पाा मौजे जायगांव गला कैली ८१॥
मो मौजे अंभेरी गला कैली ८२
धोंडजी पाा मौजे वसू गला ८२
कमळोजी पाा मौजे पिंपरी गला ८३
पिराजी पाा मौजे टकलें गला कैली ८२
कडतोजी पाा मौजे धामणेरे गला कुडो ८२
राजजी पाा मौजे कमळापूर ८१॥
सिवजी पटेल मौजे ल्हासुरणें गला कुडो ८३
नाइकजी व संताजी पटेल मौजे जांब बुाा गला कैली ८२
बकाजी पाा मौजे जळगाव गला कुडो ८२ ताा
जोरी ८१ गहू ८१
ह्मसाजी पाा मौजे पाडळी गला कुडो ८३
संताजी पाा मौजे सासुरवें गला कुडो ८२
जानोजी पाा मौजे येकसळ गला कुडो ८२
खळोजी पाा मौजे कनेरखेड गला कुडो ८२
जानोजी पाा व होनाजी पाा मौजे अपसिंगे गला कैली ८२
ह्मालोजी पाा मौजे साप गला कुडो ८२
तुळाजी पाा मौजे नाहवी बुा गला कुडो ८२॥
सुभानजी पाा मौजे सुरली गला कैली ८१॥
डोंगरोजी पाा मौजे बोरगाव गला कैली ८२
गुंडोजी पाा मौजे कटापूर ८३
रामजी पाा मौजे सिराढोण गला कुडो ८२
दयाजी पाा मौजे तांदुळवाडी गला ८२
कृष्णोजी वाा सोनजी पाा मौजे त्रिपुटी गला कैली ८१॥
मोकदम मौजे दुघी गला ८२

लेखांक १५४ श्री १६११

तालिक

(मुद्रा) सौजन्य समस्त मोकदमानीं व शेटे महाजन देहाय समतानिहाय

सांा हवेली सांा निंब

सांा वाघोली सांा कोरेगाउ

सांा मुरे दोा जोरखोरें

व जांबुळखोरें

प्रती दताजी केशजी नाईक देशमुख व देशपांडीये पाा वाई त्याहावया कारणें सुाा सन हजार १०९९ तिसैन अलफ बदल भंडारा व नंदादीप मठ श्री सदानंद गोसावी मुकाम मौजे निंब बाा सालाबाद रुजूपत्र तीर्थरूप राजश्री नरसोजी नाईक पत्र बहुत जीर्ण जालें नूतन पत्र करून देणें ह्मणून राजश्री आनंदगीर गोसावी येहीं येऊन रदबदली केली त्यावरून तमाम मोकदम बैसून पूर्वील सनद मनास आणोन हालीं त्याप्रों सनद करून दिल्ही दर मुकाम लष्कर हजरती जिलसुभानी माा मौजे तुळापूर प्राा पुणा गाव कुडो वृती करून दिल्ही ते पिढी दर पिढी चालवणें हिंदू अगर मुसलमान हरकती करील त्यास आण असे मोईन दर गांवास बितपसील

साा हवेली बेरीज

नख्त टके ६८ गला कैली खंडी १५।४॥

यासी तपसील

काा वाई नख्त टके ६० मौजे सेंदूरजन बाा गला कुडो ०२

काा बावधन मोकदम व शेटे महाजन गला कैली ०३ मौजे लोहारें मोा गला कुडो ०२

मौजे बोपलवाडी हरजी पाटील गाढवे ०२ मौजे परखंदी अंबाजी पाा मायगुडा कैली ०२

गंगाजी पाा मौजे चांदक गला कुडो ०१॥ शिवजी पाा व बहिरोजी पाा मौजे गुळीब गला कुडो ०२

मौजे वेळेजोरी कैली ०२

नरसो पाा व दताजी पाटील मौजे केंजळ कैली ٥२

मोकदम मौजे वाहागाव गला कुडो ٥२

माणकोजी पाा खंडेराव तुकोजी पाा व संभाजी पाा मौजे कविटे कैली ०२

बहिरो पाा मौजे पांडिये गला कैली ٥२

जोरी ٥१ गहू ٥१

मोकदम मौजे आनेवाडी गला कुडो ٥१॥

मो मौजे कडेगाव गला कुडो ٥२

जोरी ٥१ गहू ٥१

मौजे कणूर रतो पाा गला कैली ٥१॥

मोकदम मौजे सोनगीरवाडी गला कैली ०२

मौजे जांभुळणे गला कुडो ٥॥.

पदाजी व दताजी पाटील मौजे खानापूर गला कैली ٥१॥

मोकदम मौजे मेणोली गला कैली ٥२

सा हवेली

दावजी पाा मौजे सुरूर गला कुडो ٥२

मोकदम मौजे बोपेगाउ गला कुडो ०२

गहू ٥१ जोरी ٥१

मौजे उझर्डे गला कुडो ٥२

गहू ०१ जोरी ٥१

साबाजी पाा वाग मौजे असले गला ٥२

गहू ٥१ जोरी ٥१

मोकदम मौजे वहेनवाडी गला कैली ०१॥

सुभानजी पाा मौजे सिधनाथ-वाडी गला ٥१

मोकदम मौजे पसरणी गला कैली ٥१॥

किता

०१ मौजे पाचवड राजजी पाटील हगवणे

०१ मौजे उडतरे सुभानजी पाा पोवार व देवजी पाा दोड गहू

٥१ मौजे विरमाडे सोनवणी

०१ मौजे कळंबे

٥४

लेखांक १५५ श्री १६११

तालिक

ꣳ सौजन्ये समस्त मोकदमानी व शेटे महाजन देहाय समतानिहाय

सा। हवेली सां। निंब

सा। वाघोली सां। कोरेगांऊ

सा। मुरे दो। जोरखोरें व जांबुळखोरे

प्रती दताजी केशवजी नाइक देशमुख व देशपांडीये पा। वाई त्याहावया कारणें सु॥ सन हजार १०९९ तिसैन अलफ बदल भंडारा व नंदादीप मठ श्री सदानंद गोसावी मुकाम मौजे निंब बा। सालाबाद रुजुपत्र तीर्थरूप राजश्री नरसोजी नाईक पत्र बहुत जीर्ण जालें नूतन पत्र करून देणें ह्मणोन राजश्री आनंदगीर गोसावी येहीं येऊन रदबदली केली त्यावरून तमाम मोकदम बैसोन पूर्वील सनद मनास आणौन हालीं त्याप्रों सनद करून दिल्ही दर मुकाम लष्कर हजरती जिलसुभानी मो मौजे तुलापूर प्रा पुणा गाव कुडोवृत्ती करून दिल्ही ते पिढी दरपिढी चालवणें हिंदु अगर मुसलमान हरकती करील त्यास आण असे मोईन दर गांवास बितपसील

सां। वाघोली गला खंडी २।१॥'

तपसील

भुलाजी पटेल व खंडोजी पटेल मौजे वाघोली गला कैली ४३

जोरी ४२ गहू ०१

तुलाजी पटेल लेंभा मौजे पिंपोडें बु॥ गला कैली ४३

जोरी ४२ गहू ४१

मौजे तर्लीये जोगोजी पटेल

जोरी ४२

मौजे करजखोप दो। रणदुला बाद गला कैली ४३ ता।

मौजे मजकूर ४२ रणदुलाबाद ०१

रामजी पटेल मौजे मदवाहाल गला ०२ ता।

जोरी ०१ गहू ०१

दताजी पाटील मौजे तडवळें खुर्द गला ४२ ता।

जोरी ४१ गहू ४१

बकाजी पटेल मौजे बिचकुले
जोरी ८२
नरसोजी पटेल मौजे देऊर
गला कुडो ८२
वरवाजी पटेल मौजे सोळसी
गला कुडो ८२
गवरोजी पटेल मौजे नायगांव
गला कुडो ८१॥·
मानाजी मोळकर व मलजी
माळुखा मोकदम मौजे वाठार
गला कुडो ८२
तुको पाटील मतकर व
संभाजी पा। अहिरेकर
मौजे विखळे गला ८१॥·
बाबजी पटेल मौजे पिंपोडें
खुर्द गला ८२
रखमाजी पटेल मौजे आंबोड
गला कैली ०२
रतोजी व सुभानजी पटेल
मौजे रेवडी गला कुडो ८१॥·
संताजी पटेल मौजे परटवडी
गला कैली ८१॥·

बो। रायाजी पाटील पिसळा व
हासाजी पटेल गायकवाड मौजे
पळसी गला ०१॥·
लखमोजी पटेल मौजे चाणेश्वर
गला कैली ८१
दताजी पटेल व सोनजी पटेल
मौजे सोनके गला कुडो ८१॥·
दताजी पटेल मौजे दहिगांव
गला ०२
मलोजी पटेल मौजे आसनगांव
गला कैली ८२
संताजी पटेल मौजे आनेवाडी
दे। इभरांपूर गला कुडो ८२ ता।
ऐन मौजे मा। इभरांपूर
०१॥ ८॥·
बापोजी पटेल मौजे भोपवाडी
गला कुडो ०२
अर्जोजी पटेल मौजे कोळेवाडी
गला कुडो ८१॥·

लेखांक १५६ श्री १६११

ताळीक

ॐ सौजन्य समस्त मोकदमानि व सेटे माहाजन देहाय समतानिहाय

साा हवेली साा नींब
साा मुरे बाो जोरखोर साा कोरेगाव
व जाबुलखोर

प्रती दत्ताजी केशवजी नाईक देशमूख व देशपांडिये प्राा वांई ल्याहावया कारणे सुाा हजार १०९९ तिसैन अलफ बाा भंडारा व नंदादीप मठ श्री सदानंद गोसांवी मुाा मौजे नींब बाा सालाबाद रुजूपत्र तीर्थरूप राजश्री नरसोजी नाईक पत्र बहुत जीर्ण जाले नूतन पत्र करून देणे ह्मणोन राजश्री आनंदगीर गोसावी येही येऊन रदबदली केली त्यावरून तमाम मोकदम बैसोन पूर्वील सनद मनास आणोन हाली या प्राा सनद करून दिल्ही दर मुकाम लस्कर हजरती जिल सुभांनी मोा मौजे तुलपूर प्राा पुणां गाव कुडो वृत्ती करून दिल्ही ते पिढी दर पिढी चालवणे हिंदु अगर मुसलमान हरकती करील त्यास आण असे मोईन दर गावास बितपसील

साा नींब प्राा वांई गावगना तपसील

गला कैली खंडी २॥ तपसील

तुलाजी पाा व संभाजी पाा मौजे नींब गला कुडो ८३

मौजे गोवे मानाजी पटल गला कैली ८२ ताा
गहू ८१ जोरी ८१

मोकदम मौजे वणगल गला कुडो ८१॥

मो मौजे खोलवाडी गला कैली ८१॥

कान्होजी पटेल मौजे भोईज गला कुडो ८३

गंगाजी पाा मौजे मरढे गला ८२

केदारजी पाा मौजे किडगाव गला ८२

गोपालजी पटेल मौजे अचोळे गला कैली ८२

कोंडजी पाटील मौजे माहागाव गला कुडो ۶२

मोकदम मौजे चिंधोली गला कैली ۶२

तुकोजी पाा मौजे कुसी गला कैली ۶१॥

सिवाजी पाटील मौजे अरफल गला कैली ۶२

नाइकजी पाटील मौजे सोनगाव गला ۶२

मोकदम मौजे चिंचणै गला ۶२

सिवाजी पाटील मौजे सिरगांव गला ۶२

मौजे किकली दो वाडी कालगा गला कुडो ۶२॥ ताा

गाव ۶१॥ वाडी ۶१

अंकुस पटेल व येसजी पटेल मौजे जांब वंदन गला कुडो ۶२ जांब

कृष्णाजी पटेल मौजे बोरखल गला ۶२ ताा

गहू ۶१ जोरी ۶१

संक्राजी पटेल मौजे खडकी गला ۶१॥

सिवाजी पटेल मौजे नेरले गला ۶२

मोकदम मौजे वडूथ गला कुडो ۶१॥

बहिरोजी व सितोजी पटेल मौजे माहुली गला कुडो ۶२

बाबाजी पटेल मौजे मालगाव गला कुडो ۶२ ताा

गहू ۶१ जोरी ۶१

अंबाजी पटेल मौजे देगाव गला कुडो ۶२

मोकदम मौजे सिवथर गला कुडो ۶२

किता

۶२ मोकदम मौजे पाठखल

۶१ मोकदम मौजे खेड

۶१ मोकदम मौजे वांडे

۶४

---

लेखांक १५७ श्रीशंकर १६११ फाल्गुन वद्य १२

श्रीकृष्णा

नकल

॥ ॥ सौजन्यें समस्त मोकदमानीं देहाय व शेट महाजन प्रांत गुंजण मावळ प्रती संताजी हैबतराव व हैबतराव नागोजी नाइक देशमुख व मल्हार गोमाजी देशपांडिये प्रांत मजकूर

( शिक्का )

सुा हजार १०९९ तिसैन व अलफ बदल भंडारा व नंदादीप श्री सदानंद गोसावी स्वामी याचा मठ व समाधीथाळ मुा मौजे निंब प्रांत वाई श्री तीरीं आहे ते थळीं महिमा पाहातां अगाध अनुपम्य व ते थळीं त्याचे शिष्य परंपरागत आहेत व गोसावी अतीत अभ्यागत येऊन वास्तव्य करितात प्रतिदिनीं मोहछाव होतो ते जाणोन वृत्ती समाधान जाली यास्तव मनोदयें करून आपली वंशपरंपरा भंडारा व नंदादीप चालवावा ऐसा नियेत करून प्रांत मारीहून दर गांवास मोईन करून दिल्ही असे बितपसील

नख्त खुर्दा टके ३२।· गला कैली छसेरी बारुले खंडी २॥३॥

एकूण बतीस टके बारा रुके एकूण दोन खंडी साडे तेरा मण

तपसील देह बिदेही

मौजे तलवडी

नख्त रुके गला कैली

·।६ ८॥।

मौजे कासुरडी

गला कैली खुर्दा

८॥।· ·।६

मौजे मोहरी खुर्द

नख्त रुके गला कैली

·॥· ८॥।

मौजे मोहरी बुदरुख

नख्त रुके गला कैली

·॥। ८१

हातवे बुदरुख

नख्त रुके गला कैली

·॥। ८१

हातवे खुर्द

नख्त रुके गला कैली

·॥· ८॥।

मौजे ताभाड

नख्त रुके गला कैली

१ ८१

मौजे सांड हिरोजी

नख्त रुके गला कैली

·।६ ८॥।

मौजे सोडसर फला

नख्त रुके गला कैली

·।६ ८॥।

मौजे सांड कारले

नख्त रुके गला कैली

·।६ ८॥।

मौजे सोड माथणा
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे वडगांव
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे असीनी बनागुडा
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे भांगीलघर गला कैली ८।।
मौजे फणसी
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे घावर
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे दादवडी
नख्त रुके गला कैली
·।· ८।।
मौजे पिंपरी
नख्त रुके गला कैली
·।· ८।।
मौजे पाली बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।· ८।।।
मौजे वाजेघर खुर्द
नख्त रुके गला कैली
·।· ८।।

मौजे सुरवाड गला कैला ८।।·
मौजे कोदवडी
नख्त रुके गला कैली
·।। ८१
मौजे आसीनी मडभर
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे चिरमोडी
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।
मौजे गुंजवणे
नख्त रुके गला कैली
·।६ ८१
मौजे ल्व्ही खुर्द
नख्त रुके गला कैली
·।· ८।।
मौजे पाली खुर्द
नख्त रुके गला कैली
·।· ८।।
मौजे वाजेघर बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।· ८।।
मौजे ल्व्हे बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।
मौजे निरवणे
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।

मौजे पाली बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।। · ८१

मौजे साखर
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।·

मौजे असकवडी
नख्त रुके गला कैली
·।।· ८।।।·

मौजे करजवड
नख्त रुके गला कैली
·।।६ ८।।।·

सागवी बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।।· ८।।।

मौजे सोनवडी
नख्त रुके गला कैली
·।। ८।।·

मौजे वोराले
नख्त रुके गला कैली
·।।६ ८।।।·

मौजे मांगदरी
नख्त रुके गला कैली
·।।· ८।।

मौजे इसानदेव गला कैली ८।।·

मौजे असिनि मार्ग
नख्त रुके गला कैली
·।।· ८।।।

मौजे अडोली
नख्त रुके गला कैली
·।।· ८।।।

मौजे चिचले बुदरुख
·।।६ रुके नख्त गला कैल८।।।

मौजे आंबोणे
नख्त रुके गला कैली
·।।· ८।।।

मौजे पारवडी
नख्त रुके गला कैली
·।।६ ८।।।

मौजे निगड बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।।६ ८।।·

मौजे केतकवणे बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।। ८।।।

मौजे वागिणी
नख्त रुके गला कैली
·।।।६ ८१

मौजे निधान
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।·

मौजे कोलवडी
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।·
मौजे सांगवी खुर्द
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।।
मौजे केतकवणे निमे
नख्त रुके गला कैली
·।।· ऽ।।।·
मौजे दिंडघर गला कैली ऽ।।·
मौजे कावरे बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।।·
मौजे उतरंजी
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।।·
मौजे भांडरवडी गला कैली ऽ।।·
मौजे भुतोंडे
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।
मौजे गुहिणी
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।·
मौजे बालवडी
नख्त रुके गला कैली
·।· ऽ।।·
मौजे हाडनूर
नख्त रुके गला कैली
·।· ऽ।।·

मौजे जांबली
नख्त रुके गला कैली
·।।· ऽ१
मौजे कुरंगवडी
नख्त रुके गला कैली
·।।· ऽ१
मौजे चिचले खुर्द गला कैली ऽ।।·
मौजे कामरे खुर्द
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।·
मौजे मळे
नख्त रुके गला कैली
·।।· ऽ।।।
मौजे डरे
नख्त रुके गला कैली
·।६ ऽ।।·
मौजे खुलसी
नख्त रुके गला कैली
·।· ऽ।।
मौजे चादवणे
नख्त रुके गला कैली
·।· ऽ।।
मौजे माणगाव
नख्त रुके गला कैली
·।· ऽ।१
मौजे सिगळूर
नख्त रुके गला कैली
·।· ऽ।।२

मौजे वरोती बुदरुख
नख्त रुके गला कैली
·।।।६ ८१

मौजे यमलगांव
नख्त रुके गला कैली
·।· ८।१

मौजे पिसिवी
नख्त रुके गला कैली
·।· ८।।

मौजे पांगारी
नख्त रुके गला कैली
·।· ८।।

मौजे केळद
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।·

मौजे कुमले
नख्त रुके गला कैली
·।· ८।

वरोती खुर्द
नख्त रुके गला कैली
·।· ८।१

मौजे भोरडी
नख्त रुके गला कैली
·।।।· ८१

मौजे गुगळसी
नख्त रुके गला कैली
·।· ८।१

मौजे करनवडी
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।

मौजे निगडखुर्द
नख्त रुके गला कैली
·।· ८।।

मौजे बोपे
नख्त रुके गला कैली
·।६ ८।।।

एकूण नख्त खुर्दा बतीस टके बारा रुके व गला कैली हर जिनसी बारुले दसेरी मापें दोन खंडी साडे तेरा मण रास देविले असेत आदा करणें हर दरसाल लेकराचे लेकरी धर्मार्थ बुद्धीनें द्यावयाचा नियेत केला आहे कोण्ही अनमान न करितां सदरहूप्रमाणें आदा करीत जाणें ताज्या पत्राचा उजूर न करणें रा छ २५ जावल मोर्तबसुद

लेखांक १५८ श्री १६१२ ज्येष्ठ वद्य ३०

राजश्री येसाजी मल्हार देशाधिकारी व देशलेखक
प्रांत वाई गोसावी यासि

६ï अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सुा इहिदे तिसैन अलफ श्री सदानंद गोसावी याचा मठ काा निंब प्रांत मजकूर ए जागा आहे ते स्थलीं आनंदगिरी गोसावी राहत आहेत याचे शिष्य भोवनगिरी हुजूर आले याणीं विदित केले कीं अदलशाहाचे कारकीर्दीस इनाम मठास चावर २ दोनी चालत होता त्याउपरी हिंगलागिरी व जोगिंद्रगिरी हे दोघे गुरुबंधु मठीं होते त्यामध्यें कथळा लागोन यदलशाहाचे कारकीर्दीस दिवाणांत भांडत गेले तेव्हां त्याणीं एक चावर इनाम हिगलागिरी भांडतो यानिमित्य दूर केला आणि एक चावर इनाम काा मजकुरीं करार केला होता तेणेंप्रमाणें राजश्री कैलासवासी छत्रपतीचे वेळेस चालिला अलीकडे हा कालवरी चालतो ऐसीयासि गोसावी याचा मठ थोर आहे ते स्थलीं तडीतापडी वरकड अतीत अभ्यागत येताती त्यास अन्न द्यावें लागतें त्यास एक चावर इनाम आहे त्याणें पुरवल्यास येत नाहीं तरी पहिले दोनी चावर इनाम चालत होते तैसेच चालविले पाहिजे सदानंद गोसावी बहुत थोर होते त्याचे इनाम चालविलीयानें या राज्याची अभिवृद्धी होईल ह्मणोन कितेक तपसील विदित केले त्यावरून हें पत्र तुह्मास सादर केलें असे तरी अदलशाहाचे कारकीर्दीस दोनी चावर इनाम चालत होता कीं नाहीं हे दस्तामली रुजू पाहणें देशमुख देशकुलकर्णी वतनदार आहेत त्याजवेळीं मनास आणणें जरी पहिले दोनी चावर इनाम चालत असतील ऐसे असिले हे खरे असेल आणि हिगलागिरी याचे कथलीयाकारितां येदीलशाहाचे कारकीर्दीस एक चावर दूर जाला त्यास हिगलागिरीचे निसबतीचा कोण्ही कथला करणार नसेल ऐसे पुर्ते मनास आणून जरी त्याचे कोण्ही नसली तरी पहिले

दोनी चावर चालत होते हें खरें असिलें तरी दोनी चावर हालींही इनाम चालवणें ये गोष्टीची बरी चौकसी करून दस्तामली वतनदाराजवेळी दोनी चावर चालवणें ताजा सनदेचा उजूर न करणें छ २८ रमजान पाा हुजूर

लेखन
सीमासमु
लसती

बार सुरुसुद बार

---

**लेखांक १५९** **१६१३ ज्येष्ठ शुद्ध १०**

सदानंद
राजश्री आनंदगिरी गोसावी महंत मठ

( शिक्का ) समापत्रे मोकाम मठ श्रीगुरु राजश्री
या विदमाने लेहून दिल्हे समापत्रे

तुळाजी पाा सबजी तुकोजी पाा बहिरोजी नागोजी
( निशाणी नांगर ) ( निशाणी नांगर ) ( निशाणी नांगर )

या विदमाने लेहून दिल्हे मौजे नींब पाा वाई सुाा इसने तिसैन अलफ कारणे लेहून दिल्हे कागद ऐसा जे तुह्मी मौजे कुडालीचे पटलगीस जावयास एक जण जाईल त्या जे पैका पडल ते तीघानी द्यावा आपण वाटारियाबरावरी जावे जे कोण भाऊ जाईल त्यास तीघानी जो काय खरचेस लागेल ते द्यावे जो काय तेथे पडिला ते तकसीमप्रमाणे ती ठाई देणे बरोवाइटास आहे त्यास पाठी राखावी हे लिहिले समापत्रे सही हेबदल वडिलाचे इमान असेती श्रीकृष्णाची आण असे हे विनंति

तेरीख ८
रमजान

---

**लेखांक १६०** **श्री** **१६१७ अधिक आषाढ शुद्ध १४**

छत्रपती

अज सरसुभा राजमान्य राजश्री मुरारजी घोरपडे वजारतमाब ता। मोकदमानी मौजे इडिमडे संमत हवेली सुभा वाई सुा। सीत तिसैन अलफ राजश्री आनंदगिरीबावा गोसावी यासि राजश्री छत्रपती स्वामीनीं अनछत्राकारणें गांऊ दिला आहे ऐसेयासि तुह्मावर सरदेशमुखीचे कारकून तुह्मावर रोखा करितात नसता अजार देता ह्मणऊनु वर्तमान कळों आलें तर त्यास सरदेशमुखीच्या कारकुनास मना रोखा लिहिला आहे तुह्मी एक रुका न देणें जो वसूल देणें तो गोसावीबावाकडे देणें रोखा केला तर हाच कागद त्यास दाखवणें एक रुका न देणें जाणिजे छ १२ जिलकाद

लेखन
सीमा

श्रीमाताचरणी त
त्पर भैरजीसुत मु
रारजी घोरपडे नीरं
तर। तस्ये सेवक
केशरजी सुभेदार

---

**लेखांक १६१** **श्री** **१६१८ श्रावण शुद्ध १४**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २३ धात्रुनाम संवत्सरे श्रावण शुध चतुर्दशी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचीव मदारुलमाहाम यासि आज्ञा केली ऐसी जे सदानंद समाधिस्थल कसबा निंब याचे पूजा नै(वे)द्य उत्सवानिमित्य स्वामीनें मौजे इडमिडे सा। निंब पा। वाई हा गांऊ पेशजी इनाम दिल्हा आहे तो तुह्मी त्याचे शिष्य भवानगिरी गोसावी याचे स्वाधीन केला तेथें त्याणी कीर्द मामुरी केली ऐसे असतां राजश्री परशराम त्र्यंबक याणीं त्या गांवास उपद्रव देऊन तेथील गुरें नेली ह्मणून विदित जालें त्यावरून तुह्मास हें

पत्र लिहिलें आहे व त्यांसही आज्ञापत्र पाठविलें तरी तुह्मी येविशीं रा परशरामपंतास सांगणें व त्याकडील लस्करच्या लोकांस ताकीद करून त्या गांवास उपसर्ग नव्हे इनाम सुरक्षित चाले आणि त्या समाधिस्थलीं पूजानैवेद्य उत्सव सांग चाले ऐसे करणें जाणिजे बहुत काय लिहिणें तरी तुह्मी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

बार

---

**लेखांक १६२ श्री १६१८ माघ वद्य १३**

श्रीमत् तपोनिधी राजश्री भवानगिरी बावा गोसावी यासि स्नेहांकित परशराम त्र्यंबक नमो नारायण उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे यानंतर तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें लिाो वृत्त कळों आलें गावाचे विशीं राजश्री स्वामीचें पत्र पाठविलें पाहिजे ह्मणून लिा व त्रिंबकपंताबाा जबान सांगोन पाठविलें तें त्याणीं सांगितलें त्यावरून पत्र राजश्रीचें पाठविलें आहे तें घेतलें पाहिजे आपल्या कार्यास आह्मापासून अंतर पडणार नाहीं कळलें पाहिजे छ २६ रजब

राजते
लेखना
वधी

---

**लेखांक १६३ श्री १६१८ आश्विन वद्य १**

श्रीरामचं
द्रचरण नील
कंठ सोनदे
व शरण

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री

रामचंद्र पंडित अमात्य ताहा मोकदमानी मौजे इडमिडे सा। निंब सुहूर सन सबा तिसैन अलफ मौजे मजकूर हा गांव श्री सदानंद समाधिस्थल कसबा निंब याचे पूजा नैवेद्य उत्साबानिमित्य पेशजी इनाम दिल्हा आहे त्याप्रमाणें करार आहे त्याचे शिष्य भवानीगिरी गोसावी आहत त्याचे रजा तलब वर्तोन मौजे मजकूरची कीर्द मामुरी करून उसूल त्याकडे देणें दुसरीयाकडे न देणें कोणेविशीं चिंता न करणें रहदारी सरदारास ताकीद दिल्ही असे तुह्मीं खुशबाल असत जाणें छ १४ रबिलोवल निदेश समक्ष

बार सुरु सुद बार

लेखन
सीमा समु
ल्लसती

---

**लेखांक १६४ श्री १६१९ चैत्र वद्य १२**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २३ ईश्वर संवत्सरे चैत्र बहुल द्वादसी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसीजे भवानगिरी गोसावी हे बहुत थोर अनुष्ठानी यांच्या मठी अतीत अभ्यागतास अन्नउदक पडते धर्म होतो ह्मणून स्वामीने धर्मार्थ मौजे इरमडे संमत निंब पा। वाई हा गांव कुलबाब कुलकानू इनाम दिल्हा आहे तो त्याच्या स्वाधीन जाला याणीं रयतीस कौलबोल देऊन गावीची कीर्द केली त्यास सरदेशमुखी व देशमुखी व सरदेशकुलकर्ण व बाजे वतने याचा उपद्रव लागला राजश्री परशराम त्र्यंबक याणीं सदरहू वतनीयाचा ऐवज दोनशे रुपये पावेतों घेतला ह्मणून हें वर्तमान गोसावीयास कळोन गोसावी बहुत दिलगीर जाले आणि स्वामीस विदित केलें तरी तो गांव गोसावी यास कुलबाब कुलकानू इनाम दिल्हा असतां सरदेशमुखी व वरकड वतने ध्यावयास गरज काय हे गोसावी महंत लोक याचे सर्व प्रकारें समाधान

रक्षिलीयाने राज्यास कल्याण आहे ऐसें जाणून स्वामीनें सरदेशमुखी व देशमुखी व सरदेशकुलकर्ण व बाजे वतने कुल मना केले आहेती तरी तुह्मी सदरहू वतनदारास ताकीद करून मौजे इडमडे या गांवास कोणाचा उपद्रव लागो न देणें परशरामपंतीं जो उसूल वतनीयाचा घेतला असेल तो परतोन देववणें येविसीं अनमान न करणें मागती याचा बोभाट न ये इनामाचा गाव गोसावी सुरक्षित अनभऊन राहेत ते करणें जाणिजे बहुत लिहिणें तरी तुह्मी सूज्ञ असा

बार बार

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १६५ श्री १६१९ भाद्रपद वद्य ७**

राजश्री सरदारानीं लस्कर गोसावी यांसि

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ शंकराजी नारायण सचिव सुहूरसन समान तिसैन अलफ मौजे इडमिडे सा॥ हवेली हा गांव सदानंद यांचे समाधी खाले निंबांत आहे यासी अनछत्राबदल इनाम पहिलेपासून चालत आला आहे तेथें तुह्मी कितेक उपद्रव देत आहा ह्मणून कळों आलें तर तुह्मास त्या गांवास उपद्रव द्यावयास काय प्रयोजन आहे ताकीद समजोन एकंदर त्या गांवास उपद्रव न देणें जाणिजे छ २० सफर संदेश समक्ष

सुरुसुद

पत्रा
वधिरियं
भा[illegible]त

**लेखांक १६६ श्रीरामसमर्थ १६१९ कार्तिक शुद्ध १२**

मा वरातदार मौजे इरमिडे यासि अनाजी जनार्दन सुभेदार व कारकून प्रांत वाई सुा समान तिसैन अलफ मौजे मजकूर रा भवानगीर गोसावी यासि इनाम राजश्री पंत उभयता यानीं दिल्हा आहे तेथील वराता देखील हकदार होतील त्या कुल मना हुजरून करविल्या आहेत त्यावरून तुह्मास रोखा सादर केले असे तरी मौजे मजकुरास उपद्रव न देणें उठोन जाणें गावीचे वाटे जाल आणि गोसावी याचा बोभाट आला ह्मणजे आह्मास बोल नाहीं छ १० राखर

मोर्तबसुद

---

**लेखांक १६७ श्री १६१९ कार्तिक वद्य ७**

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री अनाजी जनार्दन देशाधिकारी व देशलेखक प्रांा वाई गोसावी यासि

सेवक शंकराजी नारायण सचीव नमस्कार सुा समान तिसैन अलफ मौजे इडमिडे संमत निंब प्राा मार हा गांव भवानगीर गोसावी यास इनाम सर्वमान्य दिल्हा आहे ऐसीयास मौजे मारीं सरदेशमुखी व देशमुखी व सरदेशकुलकर्ण व बाजे वतन एकंदर गोसावी याचे गांवीं उसूल न ध्यावा येविशीं छत्रपती स्वामीनीं कमाविसदारास आज्ञापत्र सादर केलें आहे तर मौजे मजकुरावर सरदेशकुलकर्णाचा हकाचा रोखा तुह्मी एकंदर न करणें मौजे मजकूर गोसावीयाकडे आहे

तेथील बोभाट हुजूर येऊं न देणें जाणिजे छ २० रबिलाखर संदेश समक्ष

पत्रा
वधिरयं
भीात

सुरू सूद

---

लेखांक १६८ श्री १६२० भाद्रपद शुद्ध ७

लक्ष्मीकांत प
दांभोज भजनास
क्तचेतसः॥प्रमोदव
र्धिनी मुद्रा श्रीकर
स्य विराजते

श्री सकलगुणमंडित अखंडितलक्षुमीअलंक्रत राजमान्य राजश्री विठल लक्षुमण देशाधिकारी व लेखकवर्तमानभावी सुभा प्रांत वाई गोसावीयाप्रती श्रीकराच्यार्य पंडितराऊ असीर्वाद राजाभिषेक शक २५ बहुधान्य संवत्सरे भाद्रपद शुद्ध सप्तमी गुरुवार कृष्णागिरी गोसावी याणें सातारेयाचे मुकामीं येऊन विदित केलें कीं आपला गुरु ह्मैस-गिरी याचे मठ धांडेघर येथें आहे ते स्थलीं अती(त) अभ्यागत बहुत येताती त्यास अनउदक द्यावें लागतें ह्मणून विदित केलें त्यावरून मनास आणतां गोसावी महंत आहे ते स्थलीं अतीत बहुत येताती ह्मणून भू-मि एकसर ताा हवेली प्राा मजकूर येथें जिराईत जमीन अवल दूम सीम बिघे ८४ चार बिघे नेमून देविले असे यास सिसपराम्पर सुरि-क्षित चाळवीत जाणें प्रतिवर्षी नूतन पत्राचे आक्षेप न करणें प्रती लिहोन घेऊन असल पत्र भोगवटीयास गोसावीयाचे स्वाधीन करणें जाणिजे छ ५ रबिलावल सुाा तिसा तिसैन अलफ पाा हुजूर हे आ-सीर्वाद मोर्तब

शुभंभ
वतु

बार सूद
छ १६ रबिलोवल

---

**लेखांक १६९** **श्री** **१६२० भाद्रपद शुद्ध १५**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २५ बहुधान्य संवत्सरे भाद्रपद शुध पौर्णिमा भृगुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणीं

श्री राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं-
ठ मुख्य प्रधान

कारकुनानीं व लोकानीं सुभे लष्कर व किले-हाय यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे इड-मिडे सां निंब प्रां मार हा गाऊ सदानंद गोसावी यास इनाम आहे तेथें तुह्मी येतां जातां धामधुम करितां रयतेस उपसर्ग देतां ह्मणोन कळों आलें तरी गोसावी यास इनाम गांव दिल्हा असतां तेथें तुह्मास उपद्रव द्यावया काय गरज आहे याउ-पर तरी त्या गांवाचे वाटें नव जाणें घासदाणीयाविसीं व हरएक बिसीं उपसर्ग न देणें ताकीद असे लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

सुरुनिवीस
सुद

---

**लेखांक १७०** **१६२० भाद्रपद वद्य १०**

श्री सदानंद कृष्णातीर

श्री सकलगुणपरिपूर्ण इश्वरी आधिष्टान श्री भुवानगिरी गोसावी

० ॅ
बावाजी
बिन सुर्याजी
देशमुष प्रग
णे कुडाल
( निा नांगर )

स्थल श्री आदिमुहुर्तीं मौजे निंब प्रा वाई स्वामीचे सेवेसी

विनंति शिष्यवर्ग बावाजी बिन सुर्याजी देसाई ता कुडाळ सुा मया अलफ शके १६२० प्रमादिनाम संवछ्रे भाद्रपद कृष्ण पक्ष दशमी गुरुवारे ते दिनीं वतन गुरुदक्षणापत्र सेवेसी लेहून दिल्हें कीं आपली वासनी अतर निष्टे नेकी सेवा करावी त्यास आपले शक्ती सेवा करितों परंतु नैवेद पाहिजे त्यास आपले मनापासून

गुरुदक्षणेस आपण आपले इनाम मौजे आखोड ता कुल आहे त्यापैकीं जमीन बिघे ८१० दाहा बिघे साहाटकाचे चावर पैकीं स्वामीस दहा बिघे दिल्हे पाटस्थल आहे त्यास सुखरूप शिष्यपरंपरेनें कीर्दी करून खाणें आपण तुह्मास गुरुदक्षणेस दिल्हे आहे त्यास कोणी हिकहरकती करणार नाहीं आपले वौशीचे कोन्ही इष्केल करील त्यास श्रीगुरुचे पायाची आण जाणिजे हे विनंती छ २२ माहे रबिलावल

गोही

| | | |
|---|---|---|
| तुळाजी मोऱ्ये पाा प्रभावली | बनोजी तैगल सांा निंब पाा वाई | मौजे चिखली प्राा कऱ्हाड रायाजी पाा सावत, भिमाजी भास्कर कुलकर्णी ( निशाणी नांगर ) |

---

**लेखांक १७१** **श्री** **१६२० आश्विन शुद्ध १३**

सदानंदस्वामी

राजश्री सुभेदार व कारकून सरदेसमुखी प्रांा वाई गोसावियासि

॥ अखंडितलक्षमी अलक्कृत राजमान्य स्नेंा हिंदुराउ घोरपडे दडवंत तिसा तिसैन अलफ मौजे इटमडे साा नींब हा गांव

गोसावियास इनाम आहे तेथील सरदेसमुखीचा दाहिजा ऐवजे जो आकार होईळ तो त्याचे दुमाले करणे उपद्रव एकंदर न देणे जाणिजे छ ११ रबिलाखर

लेखन मर्यादा

---

**लेखांक १७२** **श्री** **१६२० आश्विन वद्य ८**

लक्ष्मीकांतप
दांभोज भजनास
क्तचेतसः ॥ प्रमोद
र्धिनी मुद्रा श्रीकर
स्य विराजते

श्री सकलगुणमंडित अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री अनाजी जनार्दन देशाधिकारी व देशलेख(क) वर्तमान व भावी सुभा प्रांत वाई गोसावी याप्रती श्रीकराचार्य पंडितराउ आसीर्वाद राज्याभिषेक शके २५ बहुधान्य संवत्सरे आश्विन बहुल अस्टमी रविवासरे ह्मैशागिरी गोसावी याणी सिधनाथवाडीस समाधी घेतली आहे ह्मणोन सागरागिरी याणे हुजूर सातारेयाचे मुकामीं येऊन विदित केले जे तेथे समाधीस अतीतअभ्यागत येतात त्यास अन उदक द्यावे लागते आणि आपण अतीत आहे तरी स्वामीने काही इनामभुमि दिलीयाने अतीत अभ्यागतास अनउदक देऊन स्वामीच्या राज्यास कल्याण इछून राहून ह्मणोन श्रुत केले त्यावरून मनास आणिता अतीत अभ्यागत येतात त्यास अनउदक द्यावे लागते यानिमित्य यास इनाम जमीन नूतन मौजेमजकूर ता प्रामजकूर पैकी जमीन बिघे ५ पांच रास दिले असे सदरहू पड जमीन विसा पांडाचे मोइननें नेमून + + तीन प्रतीनें नेमून देणे कुलबाब कुलकानू हालीपटी पेस्तरपटी खेरीज हकदार करून दिल्हे असे याचे शिष्यपरंपरेने चालवीत जाणे प्रतिवरस नूतन पत्राचा आक्षेप करीत नव जाणें तालिक लिहोन घेऊन मुख्य पत्र परतोन देणे जाणिजे छ २० रबिलाखर सुहूर सन तिसा तिसैन अलफ पा हुजूर

*हे आशीर्वाद

शुभंभ
वतु

छ ६ रमजान मुकाम सिधनाथवाडी

बार

---

* हीं अक्षरें श्रीकराच्यार्यांच्या हातचीं आहेत.

**लेखांक १७३ श्री १६२१ वैशाख शुद्ध ६**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २५ प्रमाथीनाम संवत्सरे वैशाख शुध शष्टी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणीं समस्त-राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा यांसि आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे प्रांा वाई हा गांव सदाशिव गोसावी याचे सिष आनंदगिरी यास इनाम आहे तेथें तुह्मी धामधुम करून सें दोनसें रुपयेपावेतों उसूल घेतला पुन्हा आ-णखी उपद्रव देतच आहा ह्मणौन हें वर्तमान विदित जालें तरी गोसा-वीयाच्या इनामगांवास उपद्रव द्यावा हे कोण गोष्ट आहे याउपरी तऱ्हीं गोसावीयाच्या गांवास एकजरा उपद्रव ने दणें महालच्या कारकुनास ताकीद करून हाल खुद वर्तवणें जाणिजे बहुत लिहिणें तरी तुह्मी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

बार

---

**लेखांक १७४ श्री १६२१ वैशाख शुद्ध ६**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २५ प्रमाथीनाम संवत्सरे वैशाख शुध शष्टी भोमवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणीं राजश्री अनाजी जनार्दन देशाधिकारी प्रांा वाई यासि आज्ञा केली

श्री
राजारा
म भजनो
त्कंठ मोरेश्व
र सुत नील
कंठ

श्री अ:इ
आदिपुरु प्रस
न्न ॥ श्रीराजाराम
स्वामिकृपानिधि ॥
परशराम त्र्यंबक
प्रतिनिधी

ऐसी जे सदानं-द गोसावी या-चे शिष आनं-दगिरी गोसावी यास मौजे इ-डमिडे प्रांा म-जकूर हा गांऊ यास इनाम आ-हे तेथील तुह्मी शंभर रुपयेपावेतों वसूल घेतला पुढेंही उपद्रव देतां

राहत नाहीं ह्मणोन कळों आलें तरी मौजे माार गोसावी यास इनाम दिल्हा असतां तुह्मा वसूल घ्यावया व उपद्रव द्यावया काय गरज आहे याउपरी तऱ्ही ऐसी गोष्टी न करणें इतकीयाउपरी तुह्मी त्या गांवास वसुलाविषीं व हरएकविषीं तगादा लावितां ऐसा हुजूर बोभाट आलीया तुमचा मुलाहिजा होणार नाहीं जाणिजे निदेश समक्ष

मर्यादेयं
विराजते

रुजू सुरनिवीस
सुरु सुद

---

**लेखांक १७५ श्री १६२१ आश्विन वद्य ५**

तालीक

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २६ प्रमाथी नाम संवत्सरे आश्विन बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी तिमाजी एमाजी देशाधिकारी पांा सातारा यांसि आज्ञां केली ऐसी जे सदानंद गोसावीयाणीं हुजूर येऊन विदित केले कीं आपला मठ मौजे नींब प्रांत वांई येथें आहे त्यास पूर्वापर इनाम आहे बितपसील जमीन बिघे

निगडी पवांराची येथें बिघे ८१५ वरिये पैकी बिघे ८५
मौजे सेंबरे पैकी बिघे ८५ मौजे वेचवले पैकी बिघे ८५

येणेंप्रमाणे तीस बिघे जमीन पूर्वापर आदलशाहाचे कारकीर्दीपासून इनाम चालत आहे आलाकडे धांमधुमीच्या प्रसंगाकारितां बिलाकुसूर इनाम चालत नांही तरी स्वामीनें आज्ञां करून सदरहू इनाम बिलाकुसूर चाले ऐसी गोष्ट केली पाहिजे ह्मणून विदित केले त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुह्मी हे जाणून सदरहू इनाम गोसावियांच्या मठास आदलशाहाचे कारकीर्दीस चालत आला असेल त्याप्राा हांली पड जमीन यांचे स्वाधीन करून इनाम बिलाकुसूर चालवणे

या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्यपत्र गोसावियांजवळी परतोन देणे जाणिजे लेखनालंकार मोर्तब

रुजु सुरुनिवीस

सुरु सूद बार

---

**लेखांक १७६** **१६२१ आश्विन वद्य ५**

श्री दत्तात्रय सदानंद तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषक शके २६ प्रमाथीनाम संवत्सरे अश्विन बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी याणीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी प्रा वाई यास आज्ञा केली ऐसी जे तपोनिधी सदानंद गोसावी मठ श्री सदानंद वास्तव्य (शिक्का) (शिक्का) का निंब याणीं हुजूर येऊन विदित श्रीचा इनाम पूर्वापार मौजे उडतर प्रा कऱ्हाड येथें जमीन चावर ·।· पाव चावर चालत आला आहे त्यास त्याचे परंपरेचे शिष तपोनिधी भवानगीर महंत आपण आहों त्यावरून मनास आणिता समाधि स्थल जगविख्यात परम रमणी जागा अन्नछत्र भंडारे पुण्यतिथी धूपदीप नैवेद्य चालावयाबदल इनाम दिल्हा व भवानगीर महत याणीं जिवंत समाधी चंदीचे मुकामीं नवरात्रांत नऊ दिवस घेतली परम अनुष्ठानी जाणोन मौजे मारीं पूर्वापार चालत आली जमीन सदरहू प्रा करार करून दिल्ही तरी या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र परतोन भोगवटीयास गोसावी यास देणें प्रतिवर्षी नूतन पत्राचा अक्षेप न करणें जाणिजे लेखन अलंकार मोर्तब

रुजु सुरनिसी सुरुसुद बार

---

**लेखांक १७७** **श्री** **१६२१ आश्विन वद्य ५**

तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २६ प्रमाथीनाम संवत्सरे आश्विन बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणीं राजश्री तिमाजी यमाजी देशाधि(कारी) पा। सातारा यासी आज्ञा केली ( शिक्का ) ऐसी जे सदानंद गोसावी याणीं हुजूर येऊन विदित केलें कीं आपला मठ मौजे निंब प्रा। वाई येथें आहे त्यास पूर्वापर इनाम आहे बितपसील बिघे

निगडी पवाराची बिघे ८१५ वरीये पौ बिघे ८५

मौजे शेंदरे पौ बिघे ८५ मौजे वेचले पौ बिघे ८५

येणेप्रों तीस बिघे जमीन पूर्वापर आदलशाहाचे कारकीर्दीपासून इनाम चालत आहे आलाकडे धामधुमेच्या प्रसंगाकरितां बिलाकुसूर इनाम चालत नाहीं तरी स्वामीनें आज्ञा करून सदरहू इनाम बिलाकुसूर चाले ऐसी गोष्ट केली पाहिजे ह्मणून विदित केलें त्यावरून हें आज्ञापत्र सादर केलें असे तरी तुह्मी हें जाणून सदरहू इनाम गोसावी याच्या मठास अदलशाहाचे कारकीर्दीस चालत आला असेल त्याप्रों हलीं पड जम याचे स्वाधीन करून इनाम बिलाकुसूर चालवणें या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र गोसावी याजवळ परतोन देणें जाणिजे लेखन अलंकार मोर्तब

रुजू सुरनिविसी सुरु सुद बार

---

**लेखांक १७८** **श्री** **१६२१ आश्विन वद्य ५**

तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २६ प्रमाथी नाम संवत्सरे आश्विन बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणीं राजश्री ( शिक्का ) तिमाजी येसाजी देशाधिकारी पा। सातारा यासी आज्ञा केली ऐसी जे सदानंद गोसावी याणीं हुजूर येऊन विदित केलें

कीं आपला मठ मौजे निंब प्रांत वाई येथें आहे त्यास फुटक दर इनाम आहे बिा जमीन बिघे

निगडी पवाराची येथें ८१५ वरीये पैकीं बिघे ८५

मौजे शेंदरें पौ बिघे ८५ मौजे वेचले पौ बिघे ८५

येणेंप्रो तीस बिघे जमीन पूर्वापार आदलशाहाचे कारकीर्दीपासून इनाम चालत आला आहे आलीकडे धामधुमीचे प्रसंगाकरितां बिलाकुसूर इनाम चालत नाहीं तरी स्वामीनीं आज्ञा करून सदरहू इनाम बिलाकुसूर चाले ऐसी गोष्ट केली पाहिजे ह्मणोन विदित केलें त्याजवरून आज्ञापत्र सादर केलें असे तरी तुह्मी हें जाणोन सदरहू इनाम गोसावी याचे मठास आहे आदलशाहाचे कारकीर्दीस चालत आला असेल त्याप्रमाणें हलीं पड जमीन यांचे स्वाधीन करून इनाम बिलाकुसूर चालवणें या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र गोसावी याजवळ देणें जाणिजे लेखन अलंकार मोर्तब

रुजू सुरनिवीस
सुरु सुद बार

---

**लेखांक १७९ श्री १६२१ आश्विन वद्य ५**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २६ प्रमाथीनाम संवत्सरे आश्विन बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणीं

श्री आइ आदि
पुरुष प्रसन्न श्री
राजाराम नरपति
हर्षनिधान परशु
राम त्र्यंबक मु
ख्य प्रधान +

राजश्री तिमाजी यमाजी देशाधिकारी पा सातारा यासि आज्ञा केली ऐसी जे सदानंद गोसावी यांणीं हुजूर येऊन विदित केलें कीं आपला मठ मौजे निंब प्रांत वाई येथें आहे त्यास पुर्वापर इनाम आहे बितपसील जमीन बिघे

निगडी पवारांची येथें बिघे ८१५ वरीयेपैकीं बिघे ८५

मौजे सेंदरें पैकीं बिघे ८५ मौजे वेचलें पैकीं बिघे ८५

येणेंप्रमाणें तीस बिघे जमीन पुर्वापर अदलशाहाचे कारकीर्दीपा-सून इनाम चालत आहे आलाकडे धामधुमीच्या प्रसंगाकरितां बिला-कुसूर इनाम चालत नाहीं तरी स्वामीनें आज्ञा करून सदरहू इनाम बिलाकुसूर चाले ऐसी गोष्ट केली पाहिजे ह्मणून विदित केलें त्याव-रून हें आज्ञापत्र सादर केलें असे तरी तुह्मी हें जाणून सदरहू इनाम गोसावी यांच्या मठास अदलशाहाचे कारकीर्दीस चालत आला असेल त्याप्रमाणें हालीं पडजमीन यांचे स्वाधीन करून इनाम बिलाकुसूर चा-लवणें या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र गोसावीयांजवळी एर-तोन देणें जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयं
विराजते

रुजु सुरुनिवीस

---

**लेखांक १८०** **श्री** **१६२३ वैशाख वद्य प्रारंभ**

तपोनिधी राजश्री भवानगिरी गोसावी यांस प्रती राजश्री राजा शिव छत्रपती उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें मौजे इडमिडे पा। वाई हा गांव रा। सदानंद गोसावी यांस या मठास इनाम आहे परंतु अनाजी जनार्दन माणको गोविंद व चंदनकरी उपसर्ग देतात कितेक वसूल नेला तरी स्वामीनीं पारपत्य करावें ह्मणून लिहिलें तें सविस्तर विदित जालें ऐशास त्यास हाली ताकीदपत्रें सादर केलीं आहेत तीं पावतीं करणी ह्मणजे ते या उपरी उपसर्ग देणार नाहीं जाणिजे बहुत काय लिहिणें

मर्या
देयं विरा
जते

बार
सुरु सुद बार

---

**लेखांक १८१** **श्री** **१६२३ वैशाख वद्य १३**

तपोनिधी राजश्री भवानगीर बावा गोसावी मठ श्री सदानंद बावा स्वामीचे सेवेसी

सेवक गिरजोजी यादव दंडवत येथील कुशल जाणऊन आशिर्वादपत्र पाठवावें उपर तुह्मी लिहिलें कीं मौजे इडमिडे हा गांव रो कैलासवासी स्वामीनीं चंदीचे मुकामीं अनछत्राबदल दिला हा कालपावेतों चालिला आहे त्यास महालचे कारकून नाना दंड ताजे ठेऊन रो माणको गोविंद व रो आणाजी जनार्दन सुभेदार रोखा करून उपसर्ग देताती ह्मणून लिहिलें त्यावरून मातुश्री आईसाहेब्रास विदित करून राजश्री स्वामीची आज्ञापत्रें आणणार आहेत त्यावरून कळों येईल वरकड तुमच्या कार्यास अंतर पडणार नाहीं बहुत लिहिणें नलगे छ २६ जिल्हेज हे विनंती

इरमाडे जमीन चावर ।

---

**लेखांक १८२** **१६२३ मार्गशीर्ष वद्य ३**

( फारसी मजकूर ) ( शिक्का )

जबदतुल एकरान तुळाजी पाटील मोकदम मौजे नीम पाा वाई सुाासन ११११२ अलम अमीरा सिखतपन्हा सेख आा जबर आं खी जमीन काा नींबची मोजिली तेव्हा जमीन गोसावियाची अलाहिदी केली आनी तुह्मी आता गोसावियासि ताकीद पैसियाची किरता हे मुनासीब नाही आता गोसावियासि मुजाहीम न होने देसमुख देसपांडये व सेख जबरने ते जमीन वेगली केली आता ता हरगीज मुजाहीम न होने जमाबंदीत ते जमीन आली नाही नाहक गोसावियासि आजार न देने दरीबाब ताकीद दानद मो सूद

ताा छ १६ रजबू

---

**लेखांक १८३ श्री १६२३ मार्गशीर्ष वद्य ७**

श्री शिवभक्तीपरायण तपोनिधी भवानगिरी गोसावी वाा निंब यास प्रती राजश्री राजा शिव छत्रपती उपरी तुह्मीं पत्र पाठविलें ते पावले लिहिलें वर्तमान कळों आलें आपणावरी कैलासवासी राजश्री स्वामीनें दया करून चालविले अन्नछत्राकारणें इनाम दिल्हा त्यास हालीं महालचे कारकून व लष्करचे लोक उपसर्ग देताती तरी निरोपद्रव इनाम चाले ऐसें केले पाहिजे ह्मणून लिहिलें ऐसीयास तुह्मी ह्मणिजे सत्पुरुष तुमचें सर्व प्रकारें चालवावें हें उचित त्यास स्वामीसही तुमचें चालवणें अवश्यक आहे कैलासवासी स्वामीनें तुमचें चालविलें तैसें स्वामीही चालवितील प्रस्तु(त) तुमच्या इनामास उपसर्ग न द्यावा ह्मणून ताकीदपत्रें पाठविली आहेती तें देणें याउपरी कोण्ही तोसीस देणार नाहीं तुह्मी इनाम अनभऊन स्वामीचें व स्वामीच्या राज्याचें कल्याण चिंतून सुखरूप असणें छ २१ माहे रजब जाणिजे बहुत काय लिहिणे

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १८४ श्री १६२३ मार्गशीर्ष वद्य**

श्रीशि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई
आदि पुरुष श्री
राजा शिव छत्रपति
स्वाभिकृपानिधि त
स्य परशुराम त्र्यंब
कं प्रतिनिधि

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २८ वृष नाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती

याणीं राजश्री देशाधिकारी व कारकून प्रांत वांई यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे व निंब पैकीं जमीन श्री सदानंद याचे मठास अन्नछत्राकारणें भवानगिरी गोसावी यांसी इनाम दिल्हा आहे ऐसें असतां तुह्मी वेटबेगारीचा व हरएक विशींचा उपसर्ग देता ह्मणून विदित जालें तरी कैलासवासी स्वामीनें गोसावी सत्पुरुष याकारितां इनाम देऊन चालविला असतां तुह्मास उपसर्ग द्यावया गरज काय हे रीत स्वामीस मानत नाहीं याउपरी पहिलेपासून गोसावी यास इनाम चालत आलीयाप्रमाणें पुढेंही बिलाकुसूर चालवणें उपद्रव द्याल कीं कथळा कराल ह्मणिजे मुलाहिजा होणार नाहीं जाणिजे निदेशसमक्ष

रुजु
सुरु सुद

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १८५** **श्री** **१६२३ मार्गशीर्ष वद्य ७**

तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २८ वृषा नाम संवत्सर मार्गशीर्ष बहुळ सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती या-

शिका शिका
प्रधान परशराम
मोरेश्वरसुत त्र्यंबक
निलकंठ प्रतिनिधी
प्रधान

णीं सुभेदार व कारकून सुभे लस्कर व पागा शिलेदार व किले हाय व बाजे यासी आज्ञा केली ऐसी जे श्री सदानंद याचे मठास अन्नछत्राकरणें भवानगीर गोसावी यास मौजे इडमिडे व निंब पौ जमीन कैलासवासी स्वामींनीं इनाम दिल्हा आहे तेणेंप्रों स्वामी चालवीत असतां तुह्मी उपद्रव देता ह्मणून विदीत जालें तरी गोसावी याचे इनामतीस उपद्रव द्यावा ही कोण रवेश याउपरी गोसावी याचे इनामास एकजरा तोसीस न देणें बोभाट आलीया मुलाहिजा होणार नाहीं हें जाणून लिा प्रों वर्तणूक करणें जाणिजे निदेश समक्ष मोर्तब रुजू सुरुसुद

---

**लेखांक १८६ श्री १६२३ मार्गशीर्ष वद्य ७**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २८ वृषनाम संवत्सर मार्गशीर्ष बहुल सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं सुभेदार व कारकून सुभे लष्कर पागा व शिलेदार व किलेहाय व बाजे

श्री शिव
नरपति हर्ष
निदान मोरे
श्वरसुत नीळ
कंठ प्रधान

श्री आई
आदि पुरुष श्री
राजा शिव छत्रपति
स्वामी कृपानिधी त
स्य परशुराम त्र्यंबक
प्रतिनिधि

यासि आज्ञा केली ऐसी जे श्री सदानंद याचे मठास अनछत्राकारणें भवानगिरी गोसावी यास मौजे इडमिडे व निंब पैकीं जमीन कैलासवासी स्वामीनीं इनाम दिल्हा आहे तेणेंप्रमाणें स्वामी चालवीत असतां तुह्मी उपद्रव देता ह्मणून विदित जालें तरी गोसावी याचे इनामतीस उपसर्ग द्यावा हे कोण रवेश याउपरी गोसावी याचे इनामास येकजरा तोसीस न देणें बोभाट आलीया मुलाहिजा होणार नाहीं हें जाणून लिहिलेप्रमाणें वर्तणूक करणें जाणिजे निदेश समक्ष

रुजू
सुरुसुद

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १८७ श्री १६२४ ज्येष्ठ शुद्ध १२**

श्री सदानंद

राजश्री सरदार पागा व सिलेदार व कारकून लष्कर
गोसावी यास

७) अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य स्नो जयसिंग जाधवराउ सेनापती दंडवत व जोहार सुा सलास मया अलफ मौजे इडमेडे सां हवेली वाई हा गाऊ स्वामीकडे इनामगाऊ साल दरसाल चालत आहे तरी तुह्मी कोणही या गावास हरगीस तोसीस न देणें बोभाट सर्वथी

कोण्हेविसीं येऊं न देणें जो कोण्ही गावास अजार देईल ह्मणजे आह्मास बोल नाहीं ऐसें समजोन गांवाचे वाटे नव जाणें छ १० मोहरम हे विनंती

विजयते
लेखनाव
धि मुद्रा

श्री
राजाराम
चरणी दृढ भा-
व सेनापति ध-
नाजी जाध-
वराव

---

**लेखांक १८८ श्री १६२४ मार्गशीर्ष वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानु संवत्सरे मार्गसीर्ष बहुल दशमी गुरुवासर क्षात्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्रीराजा
शिव छत्रपती स्वामी
कृपानिधी तस्य पर
शराम त्र्यंबक
प्रतिनिधि

राजश्री तुकोजी भोसले मुद्राधारी किले पांडवगड यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे ता हवेली वाई हा गाव सदानंद गोसावी यास इनाम आहे तेथें तुह्मी लोक पाठऊन मन मानेसी धामधुम करितां ह्मणोन हुजूर विदित जालें तरी गोसावी यास मौजे मार इनाम असतां तुह्मास उपसर्ग द्यावया गरज काय आहे याउपरी तऱ्ही यांच्या गावास येकजरा उपसर्ग न देणें बोभाट आलीयावर जोर ताकीद होईल जाणिजे निर्देश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु
निवीस
सुरुसुद बार

---

**लेखांक १८९** **श्री** **१६२४ मार्गशीर्ष वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानु संवत्सरे मार्गशीर्ष बहुल दशमी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं मुकादमानी व रयानी मौजे इडामिडे हवेली वाई यासि आज्ञा केली ऐसी

श्री शिव
छत्रपती हर्ष
निदान मोरे
श्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई
आदि पुरुष
श्री राजा शिव
छत्रपती स्वामी
कृपानिधी तस्य

जे मौजे मार सदानंद गोसावी यास इनाम आहे तेथील कमाविशीस भवानगिरी गोसावी यानीं त्रिंबक जिवाजी यास ठेविलें आहे ऐसें असतां तुह्मी सुरळीत वसूल देत नाहीं ह्मणोन गोसावी यानीं हुजूर लिहिलें होतें तरी ऐसी लबाडी करावया तुह्मास गरज काय याउपरी गांवीचे खंडणीप्रमाणें कुलबाब कुलकानू सारा वसूल गोसावी याकडे देत जाणें उजूर व दिरंग केलीया मुलाहिजा होणार नाहीं ताकीद असे जाणिजे निदेश समक्ष

रुजू सुरुनिवीस
सुरुसुद बार

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १९०** **श्री** **१६२४ मार्गशीर्ष वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानु संवत्सरे मार्गशीर्ष बहुल दशमी गुरुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपती याणी राजश्री रंगोजी गुंड व रा संभाजी लगड यांसि आज्ञा केली ऐसी जे

मौजे इडमिडे ता। हवेली वाई हा गाव सदानंद गोसावी यास इनाम आहे ऐसी- यासि भवा- नगिरी गोसा-

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामि
कृपानिधी ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

वी तुह्मास लिहितील त्याप्रमाणे त्याची मदत करून गावीचा ऐवज सुरळीत त्यास पावे कोण्हाचा उपसर्ग न लागे ते गोष्ट करणे जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरनिवीस
सुरुसुद बार

---

**लेखांक १९१ श्री १६२४ मार्गशीर्ष वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानू संवत्सरे मार्गशीर्ष बहुल दशमी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं राजश्री सुभेदारानीं व कारकुनानीं सुभे लष्कर यांसि आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे ता। हवेली वाई हा गांव सदानंद

श्री शिव
नरपती हर्ष
निदान मोरेश्वर
सुत नीलकंठ
प्रधान

श्री आई
आदिपुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामी
कृपानिधी तस्य पर
शुराम त्र्यंबक प्रतिनि
धी

गोसावी यास पहिलेपासून इनाम आहे ऐसीयास तुह्मी येतां जातां स्वारीशिकारीमुळें उपसर्ग देतां ह्मणोन विदित जालें तरी याच्या गां-

वास इनामतीस उपसर्ग द्यावयास गरज काय याउपरी जो कोण्ही उपसर्ग देईल त्याचा मुलाहिजा होणार नाहीं जाणिजे निदेश समक्ष

रुजु सुरुनिवीस

सुरुसुद बार

मर्यादेयं
विराजते

---

**लेखांक १९२ श्री १६२५ चैत्र वद्य ११**

छत्रपती

राजश्री नारो राम हवालदार व कारकून वर्तमान व भावी साा बारामुऱ्हे गोसावी यांसि

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक विठल गोपाळ सुभेदार व कारकून सुभा जाउली नमस्कार सुाा सलास मया अलफ बाा सनद राजश्री स्वामी शक २९ सुभानुनाम संवत्सरे चैत्र बहुल सप्तमी रविवासर पौ छ २४ जिलकाद सादर जालें तेथें आज्ञा कीं कृष्णागिरी गोसावी लदेसगिरी गोसावी याचे शिष्य वस्ती मौजे धांडेघर याणीं हुजूर स्वामीसंनिध येऊनु विनंती केली कीं लदेसगिरी गोसावी आपले गुरु यास थोरले राजश्री कैलासवासी स्वामी याणीं तांदुळ कैली कोठी मापें ।। पांच मण धर्मादाऊ दिल्हा होता तेणेंप्रमाणें ताा राजश्री संभाजी राजे याचे कारकीर्दी पावेतों चालत आले त्याउपरी सन तिसा मधें लदेसगिरी आपले गुरु याणीं समाधी घेतली अशास आपण मठीं वास्तव्य करून आहे तरी स्वामीनें कृपाळू होऊनु लदेसगिरी यास पांच मण तांदूळ धर्मादाऊ दिल्हा होता तो आपणास चाले ऐसा करून सनद द्यावयास आज्ञा केली पाहिजे ह्मणौन विदित केलें व देशमुख ताा मार याची बखैर आणिली त्यावरून मनास आणितां कृष्णागिरी गोसावी भले महताचे शिष्य मठीं वास्तव्य करीत आहेत याची स्वस्तता जाली पाहिजे याकरितां स्वामीनें कृपाळु होऊनु यास तांदूळ कैली कोठी मापे ।। पांच मण सालीना द्यावयाची आज्ञा

केली आहे तरी तुह्मी गोसावी याचे प्रतिवरषीं परामर्ष करून पांच मण तांदूळ कोठी मापें साल दरसाल स्वस्ती क्षेम असतील तोंवरी पावीत जाणें प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप करीत नव जाणें या पत्राची प्रती लिहून घेऊनु असलपत्र भोगवटीयास गोसावी याजपाशीं परतोन देणें ह्मणौन येणेंप्रमाणें हुजरून आज्ञापत्र सादर जालें त्यावरून सुभाहून तुह्मास सनद सादर केली असे तरी जोवरी गोसावी स्वस्तीक्षेम असेल तोवरी परामर्ष करून साल दरसाल सदरहूप्रमाणें पावीत जाणें प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राचे तालिक लिहून घेऊनु असलपत्र भोगवटीयास कृष्णगिरी गोसावी याजपाशीं देणें जाणिजे छ २४ जिलकाद मोर्तब सुद

(मोर्तब सुद)

(श्री गंगेव व र्द्धिता प्राप्ता जन्हुसा गरनंदिनी विठल स्य महांबुद्धेर्मुद्रा भद्राय राजते)

---

**लेखांक १९३ श्री १६२५ चैत्र वद्य १२**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २९ सुभानु संवत्सरे चैत्र बहुल द्वादशी मंदवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं मोकदमानीं मौजे इडमिडे तर्फ हवेली प्रांा वाई यासि आज्ञा

(श्री शिव नरपति हर्ष निदान मोरेश्वर सुत नीलकंठ प्रधान)

(श्री आई आदि पुरुष श्री राजा छत्रपती स्वामी कृपानिधी तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी)

केली ऐसी जे मौ मजकूर राजश्री भवानगिरी गोसावी यांस इनाम

आहे त्यास गोसावी यानीं गुदस्ताची बाकी नस्ती काहाडून वसुलाचे तोष्ट लाविलें आहे तरी स्वामीनीं पारपत्य करावया आज्ञा जाली पाहिजे ह्मणून तुह्मी येऊन हुजूर विदित केलें त्यावरून मौजेमजकुरचा हिशेब मनास आणावयाविशीं स्वामीनीं राजश्री जगजीवन नारायण देशाधिकारी प्रा वाई यास आज्ञा केली आहे ते रास्ती हिशेब तुमचा मनास आणून हिशेबी जे बाकी निघेल तो ऐवज झाडीयानसी गोसावी याकडे पाववणें व सालमजकूरचे खंडणीचा ऐवज सारा गोसावी याकडे पावता करणें पुढें गोसावी याचे रजा तलब वर्तोन कीर्दी मामुरी करून रास्ती गांवीचा ऐवज त्याकडे पाववीत जाणें खलेल एकजरा न करणें तुह्मास जाजती कांहीं आजार लागणार नाहीं जाणिजे निदेश समक्ष

मर्यादेयं
विराजते

सुरुसुद बार
रुजु

---

**लेखांक १९४ श्री १६२५ कार्तिक शुद्ध ७**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३० सुभानु संवत्सरे कार्तिक सुध सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शिव छत्रपती याणीं राजश्री

श्री शिव
नरपति हर्ष
निदान मोरे
श्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई
आदि पुरुष श्री
राजा शिव छत्र-
पति कृपा-
निधी तस्य पर-
शुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

सुभेदारानी व कारकुनानी सुभेलष्कर यासी आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे प्रांत वाई हा गांव सदानंद गोसावी याचे मठास इनाम आहे तेथें तुह्मी स्वारीशिकारींमुळें येऊन गांवास उपसर्ग देता धामधुम करिता ह्मणून हुजूर विदित जालें तरी गोसावी याचे गांवास उपसर्ग

धावया तुह्मास गरज काय याउपरी जो कोण्ही उपसर्ग देईल त्याचा परिछिन मुलाहिजा होणार नाहीं निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरनिवीस

सुरुसुद बार

---

**लेखांक १९५ श्री १६२५ कार्तिक शुद्ध ७**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३० सुभानु संवत्सरे कार्तिक शुध सप्तमी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं मुकादम व चौघला व रयान मौजे इडमिडे संमत निंब प्रांत वाई यासी आज्ञा

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामि
कृपानिधि ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधि

केली ऐसी जे मौजेमजकूर सदानंद गोसावी याचे मठास इनाम आहे ऐसें असतां तुह्मी वसुलास खलेल करिता ह्मणून हुजूर विदित जालें तरी ऐसी बदराहा वर्तणूक करावया तुह्मास गरज काय याउपरी तुह्मी हुशार होणें आणि मौजे मजकुरचा उसूल सुरळीत देत जाणें निदेश समक्ष

रुजु सुरुनिवीस
सुरुसुद बार

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १९६** **श्री** **१६२५ मार्गशीर्ष वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २९ चित्रभानु संवत्सरे मार्गशीर्ष बहुल दशमी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं

श्री शिव
नरपति हर्ष
निदान मोरेश्वर
सुत नीलकंठ
प्रधान

श्री आई
आदि पुरुष श्री
राजा शिव छत्र
पती स्वामी कृपा
निधि ॥ तस्य पर
शुराम त्र्यंबक प्रति
निधि

राजश्री जगजीवन नारायण देशाधिकारी प्रांत वाई यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे ताा हवेली वांई हा गांव सदानंद स्वामी गोसावी यास इनाम आहे ऐसें असतां तुह्मी मन मानेसे रोखे करून गांवास उपसर्ग देता मिरासपटीचा वसूल मागता ह्मणोन हुजूर विदित जालें तरी गोसावी यास मौजे मजकूर कुलबाब कुलकानू गांव इनाम दिल्हा असतां तुह्मी नसते कथले करावे हे कोण गोष्ट आहे याउपरी तऱ्ही त्या गांवास एकजरा उपसर्ग न देणें भवानगिरी गोसावी त्या गांवीची लावणी संचणी करून वसूल घेतील तो घेऊं देणें तुह्मी उपसर्ग कांहीं नेदणें तिजाईचे उपसर्ग नेदणें निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू सुरनिवीस
सुरु सुद बार

---

**लेखांक १९७** **श्री** **१६२५ पौष वद्य ३**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३० सुभानु संवत्सरे पौष बहुल त्रितीया गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं मो-

कदमानीं मौजे इडमिडे सा॥ निंब प्रां॥ वाई यांस आज्ञा केली ऐसी जे

श्री शिव
नरपति हर्ष
निदान मोरे-
श्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आइ आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामि
कृपानिधी ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

मौजे
मज-
कूर
सदा-
नंद

गोसावी याचे मठास इनाम आहे तेथील पारपत्य मनास आणणें तें भुवनागिरी गोसावी आणितील तरी तुह्मी गोसावीचा ऐवज त्याकडे उसूल देत जाणें खलेल न करणें निदेश समक्ष

रुजु सुरुनिवीस
सुरुसुद बार

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक १९८ श्री १६२५ पौष वद्य ३**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३० सुभानु संवत्सरे पौष बहुल त्रितीया गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं राजश्री अनाजी जनार्दन देशाधिकारी प्रांत वाई यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे

श्री शिव
नरपती हर्ष
निदान मोरे
श्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई
आदि पुरुष श्री
राजा शिव छत्र
पती स्वामी कृपा
निधी तस्य पर
शुराम त्र्यंबक
प्रतिनिधि

इडमिडे सा॥
निंब प्रांत
मजकूर हा
गांव सदा-
नंद गोसावी
याच्या मठा-

स इनाम सर्व आहे ऐसीयास तुह्मी हरएकविशीं त्यास उपसर्ग द्याल तरी सत्पुरुषाचे मठास इनाम आहे तें चालवणें स्वामीस अगत्य आहे

यानिमित्य मौजे मजकुरास येकजरा अजार न देणें सुरक्षित इनाम चालवणें निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरुनिवीस
सुरुसुद बार

---

लेखांक १९९ श्री १६२६ आश्विन शुद्ध ४

राजश्री सरदार लष्कर गोसावी यासि

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नों परशराम त्र्यंबक प्रतिनिधी आशिर्वाद सुा खमस मया अलफ मौजे इडमिडे पा हवेली वाई हा गाऊ श्रीसदानंद गोसावी याकडे आहे यास तुह्मी कोणी एकंदर उपसर्ग न लावणें ते जागा सुखरूप राहो देणें मार्गीं येतां जातां आमदरफ्तीचा उपसर्ग न लावणें जाणिजे छ २ जमादिलाखर पा हुजूर

राजते
लेखना
वधी

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामि
कृपानिधी ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

---

लेखांक २०० श्री १६२७ चैत्र वद्य १०

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३१ पार्थिवनाम संवत्सरे चैत्र बहुल दशमी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं

राजश्री मुद्राधारी किले चंदनगड यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपति स्वामि
कृपानिधि ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधि

इडमिडे पा॥ वांई हा गांव राजश्री सदानंद गोसांवी यांच्या मठास इनाम आहे त्यास तुह्मी उपसर्ग देतां ह्मणून हुजूर विदित जालें तरी ऐसी बदराहा वर्तणूक करावया तुह्मास गरज काय हे रीत स्वामींस मानत नाहीं हें जाणून याउपरी मौजे मजकुरास येकजरा उपसर्ग न देणें रोखापोखा कांहीं न करणें फिरोन हुजूर बोभाट येऊं न देणें जाणिजे लेखनालंकार

मर्या
देय विरा
जते

रुजु सुरुनिवीस
सुरुसुद बार

---

**लेखांक २०१ श्री १६२७ चैत्र वद्य १०**

तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३१ पार्थिवनाम संवत्सरे चैत्र बहुल दशमी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी याणीं राजश्री मुद्राधारी किले वंदनगड यासि आज्ञा केली ऐसी जे (शिक्का) (शिक्का) मौजे उडतर प्रांत कऱ्हाड येथें श्री सदानंद गोसावी यांचा इनाम चावर ·|· पाव चार आहे त्यास तुह्मी उपसर्ग देतां ह्मणोन हुजूर विदित जालें तरी ऐसी बदराहा वर्तणूक करावयास तुह्मास गरज काय हे रीत स्वामीस मानत नाहीं हें जाणून याउपरी मौजे मजारास एकंदर उपसर्ग न देणें रोखापोखा एकंदर कांहीं न करणें फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजे लेखनअलंकार मोर्तब

रुजू सुरनिसी सुरुसुद बार

---

**लेखांक २०२ श्री १६२७ चैत्र वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३१ पार्थिवनाम संवत्सरे चैत्र बहुल दशमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं

श्री शिव
नरपति हर्ष-
निदान मोरे-
श्वरसुत नील-
कंठ प्रधान

श्री आई
आदिपुरुष श्री
राजा शिव छत्र-
पती स्वामी कृपा-
निधी तस्य परशु-
राम त्र्यंबक प्रति
निधी

माणको गोविंद यांसि आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे पा। वाई हा गांव राजश्री सदानंद गोसावी याच्या मठास इनाम आहे त्यास तुह्मी उपसर्ग देता ह्मणून हुजूर विदित जालें तरी ऐसी बदराहा वर्तणूक करावया तुह्मास गरज काय याउपरी मौजे मजकुरास एक जरा उपसर्ग न देणें व तेथील एक रुका उसूल न घेणें फिरोन हुजूर बोभाट आलीया स्वामीस मानणार नाहीं हें जाणून गावाचे वाटेस नव जाणें जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयं
विराजते

रुजू सुरनिवीस
सुरु सुद बार

---

**लेखांक २०३ श्री १६२७ चैत्र वद्य १०**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३१ पार्थिवनाम संवत्सरे चैत्र बहुल दशमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणीं राजश्री अनाजी जनार्दन देशाधिकारी पा। वाई यासि आज्ञा केली ऐसी

श्री शिव
नरपती हर्ष
निदान मोरे
श्वरसुत नील
कंठ प्रधा[न]

श्री आई
आदिपुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामी
कृपानिधी ॥ तस्य
परशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

जे मौजे इडमिडे पा। मजकूर हा गांव राजश्री सदानंद गोसावी यांच्या मठास इनाम आहे त्यास तुह्मी उपसर्ग देता ह्मणून हुजूर विदित जालें

तरी हे बदराहा वर्तणूक स्वामीस मानत नाहीं हें जाणून याउपरी मौजे मजकुरास एकजरा उपसर्ग न देणें मठाकडे इनाम सुरळीत चालो देणें फिरोन हुजूर बोभाट आलीया स्वामीस मानणार नाहीं जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयं
विराजते

रुजु सुरनिवीस
सुरुसुद बार

---

**लेखांक २०४ श्री १६२७ श्रावण वद्य ९**

सदानंद

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री अनाजी जनार्दन सुभेदार प्रा वाई गोसावी यासी

सेवक परसराम त्र्यंबक प्रतिनिधी नमस्कार सुा सन सीत मया अलफ श्री मुा निंब बहुत जागृत स्थल आहे त्यास नैवेद्य व दीपास जमीन नेमून देविली पाहिजे ह्मणून रा रंगोजी गुंड यांहीं विनंतीपत्र पाठविलें त्यावरून काा मजकूर पैकीं जिराईत जमीन पड पैकीं अवल दूम सीम या प्रतीची बिघे चार देविली आहे तरी तुह्मी नेमून देऊन प्रतिवरुसी चालवणें ताजा सनदेचा उजूर न करणें तालिक लिहून घेऊन असल पत्र भोगवटीयास देवाचे पूजकापासी देणें जाणिजे छ २२ रबिलाखर निदेश समक्ष

राजते
लेखना
वधी

सुरुसुद बार

---

**लेखांक २०५ श्री १६२७ मार्गशीर्ष वद्य १**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल प्रतिपदा भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती

याणीं राजश्री माणको गोविंद यासी आज्ञा केली ऐसी जे मौजे इडमिडे

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो-
रेश्वरसुत नील-
कंठ प्रधान

श्री आइ आ-
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामि
कृपानिधि ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधि

प्रांत वाई हा गांव श्री सदानंद गोसावी याचे मठास इनाम आहे त्यास तुह्मी उपसर्ग देतां ह्मणून विदित जालें तरी गोसावीयांचे (इ)नाम गांवास उपद्रव द्यावा ह्मणजे काय याउपरी त्या गांवाचे वाटे नव जाणें बोभाट आलीया ताकीद होईल जाणिजे लेखनालंकार

रुजु
सुरुसुद बार

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक २०६ श्री १६२७ मार्गशीर्ष वद्य १**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल प्रतिपदा भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती

श्री शिव
नरपति हर्ष
निदान मोरे
श्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्री
राजा शिव छ-
त्रपती स्वामी
कृपानिधी ॥
तस्य परशरा-
म त्र्यंबक प्रति-
निधि

याणीं मोकदमानी व रयानी मौजे इडमिडे प्रांत वाई यासि आज्ञा केली ऐसी जे मौजे मजकूर श्रीसदानंद गोसावी याचे मठास इनाम आहे ऐसें असतां तुह्मी त्याकडे उसूल देत नाहीं वरकडाकडे उसूल देता ह्मणून विदित जालें तरी हे लबाडीचे ढंग स्वामीस मानत नाहीं याउपरी गांवीचा उसूल

भवानगिरी गोसावी याकडे बिलाकुसूर वसूल देत जाणें दुसरीयाकडे एक रुका द्याल तरी मुलाहिजा होणार नाहीं हें जाणून राहाटी करणें जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयं विराजते

रुजू

सुरू सुद बार

---

**लेखांक २०७ श्री १६२७ मार्गशीर्ष वद्य २**

तपोनिधी भवानगिरी गोसावी मठ श्रीसदानंद यासि प्रती राजश्री राजा शिव छत्रपती उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला मौजे इडमिडे स्वामीनीं अन्नछत्रानिमित्य इनाम दिल्हें आहे त्यास उपसर्ग लागतो व गावकरीही उसुलास खलेल करि-ताती ह्मणून लिहिलें त्यावरून ताकीदपत्रें सादर केलीं आहेती अत:पर कोण्ही उपद्रव देणार नाहीं तुह्मी गांवीचा उसूल घेऊन अन्नछत्र चा-लऊन सुखरूप असणें छ १५ साबान सुहूरसन सीत मया अलफ जाणिजे बहुत काय लिहिणें

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक २०८ श्रीशंकर १६२९ पौष वद्य १२**

सदानंद

श्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजितनाम संवत्सरे पौष्य बहुल द्वादशी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती

श्री
\+ \+ \+
शिवनरपति ह
र्षनिधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

स्वामी यानीं राजश्री देशाधिकारी व दे-शलेखक वर्तमान भावी प्रांत वाई यांसि आज्ञा केली ऐसी जे भवानगिरी गोसावी वास्तव्य कसबे निंब प्रा मजकूर हे हु-जूर येऊन विदित केलें कीं आपण चं-दीचे मुकामीं राजश्री राजाराम कैलास-वासी याजपाशीं चंदीस जाऊनु विदित केलें कीं श्री गोसावी स्थल कसबे निंब प्रा मजकूर येथें याची समाधी

आहे अनादि बहुत पुण्य स्थल जागृत जगप्रख्यात आहे त्याचे परंपरेचे आपण शिष्यवर्ग या स्थलीं राहतों श्री स्वामीची समाधीची सेवा करितों समाधिस्थानीं धूपदीपपूजानैव्यद्यपुण्यतिथीचा उत्साह चालवयास इनामगाव दिल्हा पाहिजे त्यावरून तेंही मौजे इडेमिडे सा निंब हा गांव इनाम दिल्हा आहे तेणेंप्रमाणें महाराजें आपलें पत्र करून दिल्हें पाहिजे ह्मणऊनु विदित केलें त्यावरून पेशजीची सनद आणून पाहौनु तेणेंप्रमाणें हालीं मौजे इडमिडे सा निंब प्रा मजकूर हा गांव करार करून इनाम दिल्हा असे देह १ एकरास कुलकानू कुलबाब देखील हाली पटी व पेस्तरपटी झाडझाडोरा पडिले पानसहित खेरीज हकदार व इनामती करून गाव दिल्हा असे तर चतुसीमा भूमीसहित गांव याचे दुमाले करणें या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र समाधीचे अधिपत्यकर्ता गोसावी यासि परतोन देणें
तेरीख २५ सौवाल सुा समान मया अलफ

सुरुसूद बार

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक २०९ श्रीशंकर १६२९ माघ शुद्ध १**

सदानंदस्वामी

राजश्री सुभेदार व कारकून मा सरदेशमुखी
प्रा वाई गोसावी यासि

६) अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो हिंदुराव घोरपडे सरदेशमुख दंडवत सुा समान मया अलफ मौजे इरमडे सा निंब हा गांव गोसावी यास इनाम आहे तेथील सरदेशमुखी बाहिजा ऐवज जो आकारेल तो त्याचे दुमाला करणे गांवास उपसर्ग एकंदर न देणें जाणिजे छ २९ शौवाल

लेखण
मर्यादा

बारसुद

---

**लेखांक २१०** **श्री** **१६२९ माघ वद्य ९**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित संवत्सरे माघ बहुल नवमी भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी यानीं

श्री
शिव नरपति ह
र्षनिधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

देशाधिकारी व कारकून वर्तमानभावी सुभा प्रांत जाउली यास आज्ञा केली ऐसी जे कृष्णगिरी गोसावी हैसगिरी गोसावी याचे शिष्य वस्ती मौजे धांडेघर ताा बारामुरे हुजूर येऊनु विदित केलें कीं आपले गुरु यांसि थोरले राजश्री कैलासवासी स्वामी यानीं तांदुळ कोठी मापे मण पाच धर्मादाय दिल्हा होता तो चालत होता त्यावरी हैसगिरी यानीं समाधी घेतली आपण मठीं वास्तव्य करून आहों त्यावर आपण राजश्री शिवाजी राजे याजवळी जाऊनु पूर्वील वर्तमान विदित करून पहिले प्रो पाच ·।· मणाची धर्मादायाची सनद घेतली आहे तेणेंप्रमाणें चालत आलें आहे तर महाराजेंहीं चालविलें पाहिजे ह्मणऊनु विनंति केली त्यावरून चिरंजीव राजश्री शिवाजी राजे याचें पत्र आणून पाहोनु तेणेंप्रमाणें गोसावी यांचा धर्मादाय तांदूळ कोठी मापें मण ·।· पाचा करार करून तुह्मास आज्ञा केली असे तर तुह्मी सालगुाा ताा चालत आले असेली तेणेंप्रमाणें गोसावी जोवर वर्तमान असेली तोंवर चालवीत जाणें प्रतिवरशी नूतन पत्राचा अक्षेप न करणें या पत्राची प्रती घेऊनु असल पत्र भोगवटीयासी गोसावी यापाशीं फिराऊनु देणें

मया
देय विर
जते

तेरीख २१ जिल्काद सुाा समान मया अलफ
बार सुरुसुद बार

---

**लेखांक २११** **श्री** **१६३० चैत्र शुद्ध ४**
तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारीनाम संवत्सरे चैत्र

शुध चतुर्थी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहु छत्रपती स्वामी याणीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमानभावी प्रांत वाई यासी (शिक्का) आज्ञा केली ऐसी जे भवानगीर गोसावी वास्तव कसबे निंब प्रांत मार याणीं हुजूर येऊन विदित केलें कीं श्री सदानंद जागृत स्थल मठ कसबेमजकुरीं आहे तेथें अन्नछत्राबदल राजश्री राजाराम कैलासवासी स्वामीनीं गांवगना इनामभूमि दिल्ही आहे चावर १ एक ता। कसबे निंब चावर ·।।· मौजे गोवें सां। निंब चावर ·।।· येणेंप्रों एक चावर इनाम चालत आहे तेणेंप्रों स्वामीनीं चालविलें पाहिजे ह्मणोन विनंती केली त्या(व)रून मनास आणितां श्रीसदानंद गोसावी जाग्रत स्थल तेथें अन्नछत्र चालिलें पाहिजे याकरितां पेशजीप्रों एक चावर जमीन सदरहू करार करून तुह्मास हें आज्ञापत्र सादर केलें तरी सदरहू एक चावर जमीन पेशजी इनाम चालिला असेल तेणेंप्रों चालवीत जाणें नवीन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लेहोन घेऊन मुख्य पत्र भोगवटीयाबदल गोसावीयाजवळ देणें निदेश समक्ष

मोर्तब

---

**लेखांक २१२ श्री १६३० आषाढ वद्य ६**

सदानंद

राजमान्य राजश्री नारो पिलाजी दि॥ साहोत्रा प्रां॥ वाई यासि

सेवक नारो शंकर सचीव नमस्कार सु॥ तिसा.मया अलफ मौजे इडमिडे सां॥ निंब हा गांव राजश्री याकडे इनाम आहे त्यास तेथील साहोत्रीयाचा ऐवज तीर्थरूप राजश्री पंताजी गोसावी याकडे देविला आहे ह्मणून गोसावी यानीं विदित केलें ऐशास पहिले तीर्थरूप राजश्री पंताची सनद तुह्मास असिली तरी मौजे मारास साहोत्रीयाचा तगादा न लावणें सनदेप्रमाणें पुढें चालवणें छ २९ रबिलाखर जरी पहिली सनद असिली तरी हालीं रोखा केला आहे तो मना करणें

सुरुसूद

---

**लेखांक २१३ श्री १६३१ कार्तिक शुद्ध १४**

श्रीसाबा
जी भोंस
ळ

आज्ञापत्र राजश्री साबाजी भोसले ता मोकदमानीं मौजे उडी-तर प्रा वाई सुा अशर मया अलफ मौजे मजकुरी राजश्री सदानंद-बावा सो मठ का निंब याचा इनाम बि ·।· तीस आहे महत्कदम चालत आला आहे त्याप्रमाणें चालवणें जाणिजे छ १२ रमजान

मोर्तब
सुद

---

**लेखांक २१४ श्री १६२८ भाद्रपद शुद्ध ३**

श्रीराजा शा
हुचरणीं तत्पर
मादाजी गणे
श अ ॥ देसमु
ख निरंतर

ꣻ सो मोकदमानी मौजे सिधनाथवाडी सा हवेली यासी माहादाजी गणेश अजहत देशमुख व विसाजी नीलकंठ व गिरमाजी झुंगो देशपांडे पा वाई सुा ११२७ बायाबाई श्री चे समाधीची व श्री सिधेश्वर देव मौजे मार येथें राहून सेवा श्रीची करून आहे योगक्षेम

चालोन श्रीचे सेवा चालावीयाकारितां दोनी बिघे जमीन बाा सनद सुभा दिली आहे त्याप्रोा देणें दुतर्फा चालऊन छ १ रमजान

(मोर्तब सुद)

---

**लेखांक २१५ श्री १६४१ कार्तिक शुद्ध १२**

तपोनिध राजमान्य राजश्री भोवानगीर गोसावी प्रती महादाजी गणेश अजहत देशमुख पाा वाई नारायण सुाा अशरन मया अलफ गोसावी यांत व तुह्मांत खटखट जाहली त्याचा बोभाट हुजूर आला त्यावरून राा स्वामीनीं मल्हारजी पाटील निंबकर यासी बोलाऊन जें सांगितलें आहे त्याप्रमाणें तुह्मी व गोसावी चालणें गांवकरी व मानाजी पाटील व गंगाजीपंत ऐसे बैसोन जें सांगितील त्याप्रों तुह्मी वर्तणूक करणें जरी कांहीं न माना ह्मणजे विचार बरा नाहीं ऐसें समजोन सांगितील प्रमाणें समजोन राहणें बहुत काय लिहिणें राा छ १० मोहरम हे विनंती (शिक्का)

---

**लेखांक २१६ श्री १६४२ आषाढ शुद्ध ५**

सदानंद (शिक्का)

अज दिवाण महाल खालसा प्राा वाई ताा मोकदम मौजे इडमिडे साा हवेली सुाा इहिदे अशरीन मया अलफ राा भवानगीर बावा महंत यानीं विदित केलें कीं मौजे मजकुरी श्री स्वामीचा इनाम तीस बिघे जमीन सालाबाज आहे त्यामध्यें थोडी बहुत कीर्दी जाली आहे वरकड पडिला आहे त्याचें ताकीदपत्र दिल्हें पाहिजे ह्मणून विदित केलें त्यावरून सालाबाज प्राा इनाम दुमाला केला असे गोसावी लावणी संचणी कारितील कोणी कथला न करणें छ ३ माहे रमजान

(मोर्तब सुद)

---

**लेखांक २१७** **श्री** **१६४२ कार्तिक शुद्ध १०**

तालिक

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४७ शार्वरीनाम संवत्सरे कार्तिक शुध दशमी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणीं राजश्री देशाधिकारी व कारकून पा मावळ यासी आज्ञा केली. (शिक्का) (शिक्का) ऐसी जे श्री सदानंद बावा वास्तव्य का निंब प्रा वाई यासी ता शिरवळ पा मार पैकीं इनाम जमीन आहे बिघे बितपसील

मौजे आणदुरी ।· मौजे खेड ८१०

एकूण चाळीस बिघे पेशजीपासून इनाम चालत असतां सालमारीं खलेल जाले आहे इनाम मठाकडे सुरळीत चालत नाहीं ह्मणोन हुजूर विदित जालें त्यावरून आज्ञापत्र सादर केलें आहे तर तुह्मी गावकरास ताकीद करून पेशजीप्रा इनाम जमीन मठाकडे सुरळीत चालवणें लेखन अलंकार मोर्तब

रुजु सुरुनिवीसी बार सुरुसुद सा मत्री बार बार

---

**लेखांक २१८** **श्री** **१६४६ कार्तिक वद्य १२**

सदानंद

श्री राजा
शाहुचरणी त
त्पर अ॥ देशमु
ख प्रा वाई माहा
दाजी गणेश
नीरंतर

॥ सो मोकदमानी मौजे देहाय सा निंब पा वाई यास माहादाजी गणेश आ देशमुख पा वाई सुहूरसन खमस अशरीन मया अलफ तपोनिधी भवानगिरी गोसावी महंत यानी विदित केले की प्रांतमजकुरीं श्री मठ का निंब याची झोळीभिक्षा दर गांवास साला-

बाद चालत आहे त्याप्रों सुरळीत देणें ह्मणून गावगन्ना ताकीद दिल्ही पाहिजे ह्मणून विदित केलें तर दर गांवास सालाबाद झोळीभिक्षा जे देत असाल त्याप्रों देणें कोणी खलेल न करणें जाणिजे छ २५ सफर

मो
र्तब
सुद

---

**लेखांक २१९ श्री १६५१ मार्गशीर्ष वद्य ४**

तपोनिधी राजश्री भवानगिरी बावा महंत गोसावी यासि

॥ स्नेो॥ माहदाजी बाजी घाटगे दंडवत विनंती उपरी येथील क्षेम जाणौन स्वकीय कुशल लेखन सदैव केलें पाहिजे यानंतर पत्र पाठविलें पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कळों आलें मठाचे वर्सासनाविशीं लिहिलें ऐसीयासी आह्माकडून चालवावया किमपीहि अंतर होत नाहीं तेथें आपला अतीत राहिलिया अवघेच चालेल सदैव आसिर्वादपत्र पाठऊन परामर्शासी अंतर न कीजे विशेष काय लिहिणें हे विनंति (शिक्का फारसी)

माहादा
जी बाजी
घाटिगे

पौ॥ तेरीख छ १७ जमादिलावल सु॥ सलासीन मया अलफ मु॥ ललगुण

---

**लेखांक २२० श्री १६५२ मार्गशीर्ष शुद्ध ९**

श्रीसदानंद

श्री भवानि
शंकर प्रसन श्री
राजा शाहु चरणी
तत्पर आ॥ देसमुख
पा वा + + जी + +
जी ॥निरंतर

॥ सौ मोकदमानी देहाय सा॥ मुऱ्हे यासि हरी मोरेस्वर अ-

जहत देशमूख व भगवंत सामराज व गिरमाजी झुंगो देसपांडे पाा वाई सुाा इसने सलासीन मया अलफ तपोनिधी भवानगीर गोसावी महंत वास्तव्य मठ श्री स्वामी काा नींब येथील मठचे भंडारा दिवाबती सरफरात नगा व टका व कीव कुडो देविला आहे त्या साा ताा सालगुाा चालत आले आहे त्याप्राा चालवीत जाणे उजूर न करणे छ ७ माहे जमादिलाखर मो मोर्तब सुद

---

**लेखांक २२१ श्री १६५३ मार्गशीर्ष शुद्ध ९**

श्रीसदानंद

सो मोकदमानी देहाय साा हवेली यासि हरी मोरेश्वर अजहत देशमुख व भगवंत सामराज व गिरमाजी झुंगो देशपांडे पाा वाई सुाा इसन्ने सलासीन मया व अलफ तपोनिधी भवानगीर गोसावी महंत वास्तव्य मठ श्री स्वामी काा निंब येथील मठचे भंडारा व दिवाबत्तीस

(श्री भवानि शंकर प्रसन्न श्री राजा शाहूचरणी तत्पर आा देशमुख पाा वाा मोराजी हरि जी नीरंतर)

पुरातन गांवगना टका एक व गला कुडो एक देविला आहे तरी तांा साल गुाा चालत आले असेल त्याप्राा देणें हालीं कितेक गाव उजूर करिताती ह्मणून मठचे गोसावीयानि जाहीर केले त्यावरून ताकीद एकंदर लिाा असे तरी सालाबादप्राा मठचे गोसावी येतील त्यास गाव टका व गाव कुडो देत जाणें याखेाा जे गांवीं साळी कोष्टी धणगर असतील तेथें कांबळा व पासोडी सालाबादप्राा देणें अचला व कोपीनेचे बेगमीस पुरातन देत आला आहा त्याप्राा देणें धर्मकृत्य आहे श्री देवस्थान अनादासिध आहे तेथील जे चालत आहे त्याप्रों देत जा उजूर न करणें छ ७ माहे जमादिलाखर मोर्तब

(मोर्तब सुद)

---

लेखांक २२२ श्री १६७१ चैत्र वद्य ६

सहस्रायु चिरंजीव कृष्णगिरी यास प्रती तपोनिधी भवानगिरी बावा महंत मठ श्री सदानंद वास्तव्य का। निंब आशीर्वाद उपरी तुह्मी नरसिंह भारथी याबराबरी रुपये पाठविले ते पावले रा। बाळकृष्ण भट यास रुपये ५९ एकूणसाठी देऊन कतबा फाडून टाकिला तुह्मास कळावें ह्मणोन लिहिलें असे बहुत काय लिहिणें छ २० रबिलाखर चैत्र वद्य शष्टी मंगळवार हे आशीर्वाद

---

लेखांक २२३ श्री १६७१ ज्येष्ठ वद्य २

श्रीमत महाराज मातुश्री आइसाहेब याणीं मोकदमानीं मौजे गोवे सा। निंब प्रां। वाई यासी आज्ञा केली ऐसी जे तपोनिधी आनंदगीर गोसावी मठ सदानंद यास पाटाचें पाणी पूर्वीपासून चालत आहे येविशीं तुह्मी आपला महजर करून दिल्हा आहे त्याप्रां। गोसावीमजकूर याचा पाट याचा याजकडे चालो देणें कोण्ही हिक हरकत एकंदर न करणें जाणिजे छ १ जमादिलाखर सुहूरसन खमसैन मया अलफ

रुजू

(लखन)

---

लेखांक २२४ श्री १६७२ ज्येष्ठ वद्य १

तपोनिधी राजश्री समस्त गोसावी मठ वास्तव्य निंब यासी श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब दंडवत उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें पाऊन लिहिलें वर्तमान विदित जाहलें जेष्ठ शुध दशमीस तपोनिधी भवानगिरी गोसावी समाधिस्त जाले ह्मणोन लिहिलें त्यास हा मृत्यलोकच आहे तुह्मी संपूर्ण शिष्यसमुदाय संनिध असतां ते समाधिस्त जाले येणेंकरून त्याचें सार्थकच जालें भंडाऱ्याकरितां हालीं सुरजगिरी

व हैबतगीर याजबराबर रुपये २५ पंचवीस पाठविले असेत हे घेणें जाणिजे रा छ १५ माहे रजब बहुत काय लिहिणें

मोर्तब सुद

रुजु बार

---

**लेखांक २२५ श्री १६७३ आश्विन वद्य ११**

सदानंद तालिक

श्रीमत् महाराज मातुश्री आईसाहेब याणीं मौकदमानीं मौजे गोवें पाा वाई सुहूरसन इसने खमसैन मया अलफ कृष्णगिरी गोसावी मठ काा निंब याचे इनाम मौजे मजकुरी आहे त्यांत बोरी व बाभळा वगैरे झाडें आहेत त्यापैकीं झाडें वाळलीं आहेत तो विकीत आहे त्यास तुह्मी अडथळा न करणें वगैरे झाडास काडीमात्र अडथळा न करणें जाणिजे छ २४ जिलकाद

---

**लेखांक २२६ श्री १६७३ आश्विन वद्य ११**

सदानंद

श्रीमत् महाराज मातुश्री आईसाहेब याणीं मोकदमानी मौजे गोवें प्राा वाई सुहूरसन इसन्ने खमसैन मया व अलफ कृष्णगीर गोसावी मठ मौजे निंब याचे इनाम मौजे मजकुरी आहे त्यांत बोरी व बाभळ वगैरे झाडें आहेत त्यापैकीं झाडें वठलीं आहेत तो विकत आहे त्यास तुह्मी अडथळा न करणें वगैरे झाडास काडीमात्र अडथळा न करणें जाणिजे छ २४ जिलकाद लेखनावधी

मोर्तबसूद

---

**लेखांक २२७ श्री १६७४ वैशाख शुद्ध ९**

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याणीं ताा मोकदमानी मौजे इरमाडे प्राा कराड यासि आज्ञा केली ऐसी जे सुाा इसने खमसैन मया व अलफ मौजे मजकुरीं कृष्णगिरी महंत याची जमीन ।॰ तीस बिघे इनाम सदानंद गोसावी याचा आहे त्यास मौजे मारी इनामघरवटा करितील अगर वाटेकरी यास कळेल तैसा लावितील तुह्मी गांवकरी इनामासी हिक हरकत न करणें फिरोन बोभाट हुजूर आलीया कार्यास येणार नाहीं ऐसें पष्ट समजणें जाणिजे छ ७ माहे जमादिलाखर सुाा इसने खमसैन मया व अलफ मोर्तब

बार

---

**लेखांक २२८ श्री १६७५ आश्विन शुद्ध ३**

श्री
राजा शा
हु चरणी तत्प
र बऱ्हानजी मो
हीते नीरंतर

अज दिवाण किले वंदनगड ताा मोकदमानी मौजे गोवे सांा निंब प्रांत वाई सुाा अर्बा खमसैन मया अलफ मौजे मजकुरी किला निाा जमीनपैकीं तपोनिधी राजश्री भवानगिरी बावा महंत वास्तव्य काा निंब याकडे जमीन ॥५ पांच बिघे ठेविले आहेत यास गड निाा जमिनीची पाहणी जाहली ते समईं याकडे पांच बिघे ५ चालिले असतां गोसावी यास ऐवज पावत नाहीं ह्मणून कळों आलें तरी सदरहू पांचा बिघ्याचा दळा दुमाला करणें तेथील जो ऐवज येईल तो घेतील याउपरी फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजे राा छ १ जिल्हेज मोर्तब

---

लेखांक २२९ श्री १६९२ भाद्रपद वद्य ७

तालिक

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री माणको
भानजी स्वामी गोसावी यासि

सेवक कृष्णराव बल्लाळ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें यानंतर श्री सदानंद वास्तव्य का निंब प्रा वाई यास मौजे अंदोरी प्रा शिरवळ येथें राजपत्री इनाम जमीन बिघे ३० एकूण चावर पाव चावर ·।· गांवपैकीं चालत आहे त्यास गांवकरी इनाम तिजाईचा तगादा करून सन सबैनांत माल अटकाविला आहे ह्मणोन विदित जालें त्याजवरून हें पत्र तुह्मास लिहिलें आहे तरी धर्माची जमीन पूर्वापासून चालत आहे त्यास इनाम तिजाईचा तगादा गांवकरी करितात त्यास ताकीद करणें कीं धर्माची जमीन आहे इनाम तिजाईचा तगादा न करणें माल अटकाविला असेल तो ताकीद करून देववणें आजपावेतों घेत नसेल इनाम तिजाई तरी नवीन न घेणें ह्मणोन ताकीद करणें जाणिजे छ २१ जमादिलावल सुा इहिदे सबैन हे विनंती

---

लेखांक २३० श्री १६९५ मार्गशीर्ष वद्य ९

तालिक

राजश्री हवालदार व कारकून किले वंदनगड गोसावी यांसि

(शिक्का) अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो सखाराम भगवंत आशिर्वाद व नमस्कार सुा अर्बा सबैन मया व अलफ सयापर्वत गोसावी मठ मौजे देगांव याणें येऊन विदित केलें कीं आपल्या गुरूस मौजे भोईंज येथील पाटलानीं जमीन बिघे ८१० दहा बिघे कृष्णार्पण करून दिल्ही त्याजपासोन सात डोया आपले गुरूची परंपरात जमीन अनभवीत आलों आहो सांप्रत सालमा भवानजी आपाजी भोसले पाा तिसरी तक्षीम मौजे माा याणीं जमीन अडथळा केला आहे तीनशें

रुपये मागतात येविषई मनास आणून सुदामत चालतेयाची चवकसी मनास आणून जमीन चालत आली आहे त्याप्रों चालवावें ह्मणून विदित केलें त्याजवरून पत्र लिा आहे तरी तिन्ही तक्षिमाचे पाटील व कुलकर्णी आणून चौकसी करून गोसावी याणें सांगितल्याप्रों सात डोया जमीन याजकडे चालत आली आहे ऐसे असल्यास भवानजी आपाजीस ताकीद करून जमीन गोसावी यासी देणें ऐवजाचा तगादा न करणें याप्रों विल्हेस लावणें गोसावी याचा बोभाट होऊं न देणें जाणिजे छ २३ रमजान बहुत काय लिहिणें

---

### लेखांक २३१

सदानंद

॥ श्री ॥ मोकदमानि मौजे गोवे प्रती दताजी नाईक देसाई पाा वांई लेहवया कारणे श्री गोसावियाचे मठासी तुह्मी कुसूर करिता

श्री दताजी
बिन गंगाजी
देसाई पाा
वाई

ह्मणौऊन तुह्मास आह्मी आपणाहुजूर सांगीतले असोन मागते कुसूर करिता हे तरी काही बरवे नव्हे बोवाचे मठासी कुसूर करणे हें कांहीं तुह्मास बरवे नव्हे आतां मठासी कुसूर केला ह्मणिजे तुह्मास जड जाईल आमचे सांगीतले नाइकले आणि गोसावियाचे मठासी कुसूर करणे वाजीब तवं नव्हे अजीपासून कूसूर न कीजे

---

### लेखांक २३२

देसमुखानि व देसपांडिया पाा वाई सरकार पनाला सुबे दारुलजफर बिजापूर बिदानद्र अहमद पटेल कसबे वाई ( शिक्का) याचे हकीकत तुह्मी जाहीर केले कीं कबील हरएक कामाचा आहे पादशाही काम त्याचे हातीने होईल बीलफैल नातवान पोटास नाही हैंरान हे रोशन आहे त्याचे पोटाचे फिकीर केल्या पादशाही काम करी-

पुणे मराठी ग्रंथालय
१६७ क नारायण पेठ पुणे

ल त्यास आदलखानीयाचे वखती एक चावर इनाम जमीन होते हाली त्याचे इनाम चालविल्या खातिरेजमासी गावीचे आबादी करून किफायत सरकारचे करील ह्मणोन जाहीर केले बनजर किफायत पादशाही आबादी कसबे मजकूर पटेल मजकुरास खेरीज काबील जिरायत अत्फादे जमीन बिघे ४२० वीस बिघे दिले असे जे जमीन मजकूरचे अनाज कुत करून गावीचे आबादी करून जमा कामील कसबे मजकूर पोचाऊन दौलतखाही जाहीर करी सदरहू जमीन चालवणे तारीख १५ माहे रबिलोवल सन ४१ जुलूसवाला (फारसी शिक्का)

---

**लेखांक २३३**

श्रीगुरुमूर्तिप्रसन

सकलतीर्थस्वरूपअखंडितगुरुराज प्रसन माहाराज राजश्री जोगींद्रगिरी स्वामी गोसावियासि

बालके नरसो रामाजी देसकुलकर्णी किले पनाले सिरसाष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम जाणुनु गोसावियानी स्वक्षेम कळ्याण पाठविले पाहिजे त्यावरी माहाराजानी राजश्री हाती आसीर्वाद सागोन पाठविला तेणेकरितां बहुत संतोश पावलो ते श्री स्वामी जाणे व गोसावियानी निरोप सांगोन पाठविला की श्री स्वामीचे नंदादीपाकारणे मौजे अंबवडे का। बाळाघाट हकपैकी ऐवज करून दिला होता त्यासी गावकरानी अजनु काही दिल्हे नाही ह्मणे तरी त्यासी ताकीद करून रोखा पाठिविला असे गावासी पाठऊन बेमुलाहिजा पैका त्यापासी घेतला पाहिजे व येविसी आमचे मुतालीक अंतो संबाजी का। दावरघाट त्यासी कागद पाठिविला असे तो पावता करणे आह्मी मागुते त्यास लिहून पाठवितो व स्वामीयानी चौकाल आमचेविसी श्री स्वामीस विनंती करून बालकावरी कृपाद्रिस्टी पूर्ण करविले पाहिजे स्वामीचे व गोसावियाचे आधारे असो आमचे आठवणेसी अंतर पडो ने दीजे कृपा निरंतर असो दीजे हे विनंति

हे चि समस्त गुरुबालक गोसावियासि नमस्कार व कइलासगिरीस नमस्कार कृपा असो दीजे हे विनंति

हे चि भागीर्थीबाई गोसाविणीस नमस्कार कृपा असो दीजे विनंति

हे चि राजश्री मनसागीर गोसावियासी नमस्कार कृपा असो दीजे विनंति

विनंति लक्ष

---

**लेखांक २३४**

जोगींद्रगिरी गोसावी मो। नीब दाममो।

श्री मुरवतशारी माहदतअसारी अजी मोहीद सिताबखान नाईकवाडी किले सतारा सलाम मकसूद ऊ की तुह्मी मौजे सेखरमधे इनाम पहिले होते त्याविशी व मठ सेखरेमधे केशवगिरीस बांधोन देणे व पसकी इजार करू न देणे ह्मणे तरी बरे दसरा दिवाली जाहलिया हरएक विले करून देऊन तुमचे हातरोखे होऊन सांडिले व सांडिता आह्मी काही मना केले नाही जानिजे व वरियाचे इनामविखी लिहिले तरी आह्मी तरी इनाम दिल्हा स्वये कस (शिका) सांगण ह्मणे तरी ते आलिया सांगोन जाणिजे तुह्मी अमील असा जाणिजे आह्माकरिता तुमचे कामास तकसीर न व्हे ऐसे जाणिजे सवाईचे अमल आपणाकरिता तकसीर करणार नाही (शिका)

---

**लेखांक २३५**

जवाब आनंदगीर बावा गोसावी साहेब सलामत

॥ श्री मोहीदानपन्हाई मुखलिसान दस्तगाही अजी बुऱ्हानखान सेखदार सलाम बादज सलाम येथील खैरसला जाणोन तुह्मी आपली खैरसला दरवखूत लिहीत जाणे गावास तुह्मास साहेबी कौल

दिल्हा त्याप्रमाणे तुह्मी झाडा केला त्यावरी देसमुख देसपांडे याणी आणीख रुा ५० घातले ऐसीयास आह्मी साहेबासी रदबदली बहुत केली आणि रुा २० आणीख करार केले बाकी रुा ३० तुह्मास सोडविले आह्मास ऐसे जाले कीं इकडे साहेब राखावा इकडे यांस राखावे इकडे तुह्मास राखावे ऐसे जाले ह्मणौन ऐसा करार केला तरी आंता तुह्मी मागे दिल्हे समेत करोडी रुा २५ दिल्हे व हाली रुा २० ऐसे रुा ४५ जाले इतक्यावरी हे साल वारलें आता पुढे पुढले सालास तुह्मी येथे येणे आणि हजरती साहेबाची भेटी घेऊन आपला खंड करून जाणे मालूम होय ( फारसी शिक्का )

---

**लेखांक २३६**

तीर्थस्वरूप माहाराज राजश्री भवानगीर

बावा माहाराज स्वामी गो

अखंडितलक्षुमी सदाप्रसन सेवेसी मोकदम मौजे अणजुरी दोन्ही कर जोडून नमो नारायग विनंती उपरि येथोल क्षेम जाणून आपले क्षेम लिहीत आज्ञा केली पाहिजे विशेश दया करून कृस्णगीर पाठविले त्यास येथे इनाम बदल जाणउनु लिहिले तरी पूर्वापार तुमचा इनाम आहे व तुमचे वडिली चालत आहे त्यासि येथे ठीकी गुंतली आहे ती रिकामी जाहलीवरी तुमच्या अतीताचे हवाले करून काही संधेत्र नाही तूर्त करणगिरीचे हावाला दाणे मण ।८। पाच मण करितो कळले पाहिजे येथे मठ घातलियावरी अवघा धंदा चालिला आहे इनाम हि लागल इनाम हि लावितो कलल पाहिजे माहाराजे दया करून पत्र पावीत गेले पाहिजे वडीलाचे चालविले तैसे च दया करीत जाणे बहुत काय लिहीन कृपा निरंतर असो देणे हे विनंति

---

**लेखांक २३७** श्री

श्री सकलतीर्थामाजी कासी वर्तामाजी एकादसी देवामाजी रुसीकेसी पुस्पामाजी श्रीतुलसी तैसेच आणंदगिरी गोसावी बावा स्वामि आह्मासी स्वामिचे

सेवेसी बालके राहुजी पाटील वाघोजी पाटील व कमळोजी पाटील व समस्त दाहीजन मौजे खेड बुा पाा सिरवळ दोन्ही कर जोडून सिरसा दंडवत विनंति उपेरी कृपा करून पत्र पाठविले ते सिरी वंदिले ते पत्रीची आज्ञा की धर्मादाउ इनाम बिघे ८५ आहेत ते कीर्दी करणे ह्मणौन आज्ञा तरी गावी नवी लावगी होती येथे स्वामीच्या सेतास सरीक पाहातो सरीक मिळलावरी लावणी करून याखेरीज स्वामिने ते प्रांतीहून एक कुनबी पाठवावा आपले भुगतीचे सेती कीर्दी करवगे ह्मणजे आह्मी मोक्षास लागोन बहुत ल्याहावे तरी स्वामि सर्वज्ञ आहेत बालकावरी अखंडित कृपादृष्टी करीत जाणे मी सेवक असे हे विनंति

---

लेखांक २३८

राजश्री आनंदगीर गोसावी मठ सदानंद गोसावी यासि

॥ श्री ॥ अखांडितलक्षुमीअलंकृत राजमान्य सेवक महिमाजी पाा व तानाजी पा व विठोजी पाा व परसोजी पाा व कृष्णाजी कोनोजी व विसजी पाा व बाजे बापभाऊ समस्त मोकदम मौजे गोवे साा नीब पाा वाई दंडवत विनंति उपरी आपले आत्मसंतोसे दसनामाचे भंडारियाबदल जमीन ८१॥ दीड नजीक नदी बागाचे खाली टुकडा दीधला असे लेकराचे लेकरी चालऊन जो हिक हरकत करील त्यास श्री व आपले वडिलाचे इमान असे हे लिहिले सही व आमचे पाटाचे पाणियासी निसबत नाही तुह्मी आपले धरणी पाणी धरणे कलजे पाहिजे हे विनंती ( निशाणी नांगर )

---

लेखांक २३९

हुवलकादीर

शफकतमाह सुज्याअतअयाद मोहीदीन मलाजी खान अजम निजामखान मोकासाई कसबे नींब पाा वाई दामएखलासहू

ॐ) अजी मोहीद फते सिताबखान व मीराखान सिताबखान सरनाईक किले सतारा व जमिये किलेहाय सलाम तुजस्ते फरजाम माहुवल मुतला आके दर सवाद मौजे मजकूर इनाम हजरत पीर सदर दर्वेज बरहुकूम फर्मान अशरफ कदीमुलअयाम माकुल बाब खैर सरवावत चालिले आहे व ते जागा लिजाहन खिजमतेस मशगुल आहे फकीरांचे नानकतां आहे त्यावरी नौपटी आजार तसवसि होत आहे ह्मणोन फकीर दिलगीर जाहले आहेत ते जागा मोहीदाचे अशराफ व पीरांचे खनेक चालत आहे हे च बेहतर आहे बहुतेरा पैसा करावि-
( शिक्का ) याचे जागा आहेत व मोहीबास ऐसे वाजीब आहे की सरीक जियादती लंगर घालावा बेरून आहद आखद नामोशं आहे फकीरावरी जाजते करू नये नीम जाने गुरदुरद मरदेह दुयाबदल दरुवेशा न कुनंद नीमे दीगर शफकत असार नेकलोकी असाफकी तसवजीस न कीजे अगर केले तरी ते खिंतीस येतील देणें पादशाही + + + दीद आकी हे किताबत ( शिक्का )

---

**लेखांक २४०**

बदरदीन साहबासी
दरबंदगी हजरत आज दिवाण पा॥ वाई
साहेब सदर दाईमदौलतहू

॥ॐ) आर्दास अज बंदगी बादे कमीन कमतरीन बंदेगानी वदेसनीकर मुलाजी पा॥ व आताजी पा॥ मोकदम मौजे नींब पा॥ मा॥ जमेपाशे अर्दास इा॥ ता॥ छ १ माहे जमादिलाखर साहेबाचे नेकनजरे करून कमीनाचे बखैर सलाबत असे इा॥ मौजे मजकुरी इनाम चावर नीम आहे व मौजे गोवे चावर नीम आहे हा लंगरखाना दसनामाचा आहे यास महतकदम सालाबाद कोण्ही वजीरानी अगर हर कोन्ही येत होते त्यानी या इनामास जराचे तसवीस दिल्हे नाही व रुका घेतला नाही व वाकडे नजरेने पाहिले नाही हा थोर जागा आहे थोरले खान साहेब होते ते एं जागा दोनी च्यारी मोर्तब

---

लेखांक २४१ श्री

श्रीशिवभक्तीपरायण तपोनिधी भवानगिरी गोसावी यांस प्रती राजश्री राजा शिव छत्रपती उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें मौजे इडमिडे प्रांत वाई हा गांव अन्नछत्रास स्वामी चालवितात ऐसें असतां गांवाकडे सात पांचा वर्षाची बाकी १८ खंडी पावेतों आहे त्याचा निर्वाह गांवकरी करून देत नाहींत चौ खंडीचे पेव चोरानीं नेले त्याची निसबत चौगल्याकडे लागली आहे परंतु तो कथळा करितो बोलाउं पाठविल्यानें आपणाकडे येत नाहीं सांप्रत हुजूर गेले आहेत ऐशीयास आह्मी स्वामीसंनिध दतगिरी गोसावी व त्र्यंबक जिवाजी पाठविले आहेत हे वर्तमान विदित करितील तें मनास आणून पारपत्य केलें पाहिजे ह्मणून लिहिलें तें कळों आलें व दतगिरी गोसावी व त्र्यंबक जिवाजी हुजूर आले याणींही निवेदन केलें ऐशीयास मौजे मजकुरचे पाटील कुलकर्णी हुजूर आलेयाचें वर्तमान मनास आणितां गांवींचा हिशेब कितेब मनास आणून निर्वाह करावा लागतो याकरितां पाटील कुलकर्णी व चौगला यास राजश्री जगजीवन नारायण देशाधिकारी प्रांत वाई याकडे पाठविलें आहे तरी तुह्मीही त्याजकडे जाणें ह्मणीजे ते मौजे माारचा हिशेब कितेब मनास आणितील व बाकी कोण्हे बाबेची कैसी वोढते हे रुजु मोझ्यानें खरेंखुरें करितील आणि तुह्मास मागतील तेणेंप्रमाणें तुह्मी उसूल घेणें जाजती तगादा येकजरा न लावणें पेव चोरानीं नेलें याचा करीना मनास आणितां चौगला ह्मणतो कीं आपण चोर दाऊन देतों त्यास चौगला ज्याणें पेव काहाडून नेलें आहे त्यास दाऊन देईल त्याजपासून तुह्मी आपल्या गल्याचा निर्वाह करून घेणें चौगल्यास उपसर्ग न लावणें पेवाच्या कथळ्यामुळें त्याजपासून जें घेतलें असेल तें मजुरा देणें वरकडी मठाकडे बाकी वोढते त्याचा निर्वाह जगजीवन नारायण रुजू मोझ्या हिशेबकितेब पाहोन विलायतशर्तप्रोा विल्हे करून देतील ते खाणें जाजती तगादा गावास एकंदर

( पुढें लिहिलें नाहीं )

लेखांक २४२ श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री माणको गोविंद गोसावी यासि ताा राा आणाजी जनार्दन सुभेदार प्राा वाई गोसावी यासि

सेवक परशराम त्र्यंबक नमस्कार उपर मौजे इडमिडे सुभा वाई हा गांव राा सदानंद गोसावी यास इनाम आहे त्यास पेशजी वैराटगड घेतला ते समई मौजे माारीहून रुपये दोनीसे घेतले व त्याउपरी सिलेमानखानास भेटावयास गेला ह्मणून निमीत्य ठेऊन दोनीसे रुपये घेतले पुढेंही सांप्रत उपद्रव देतां ह्मणून कळों आलें तरी ऐसी गोष्टी न करणें गांव गोसावी यास इनाम आहे त्यास सर्वथीव उपद्रव न देणें येविशींचा बोभाट येऊं न देणें जाणिजे छ २७ मोहरम निदेश समक्ष

सुरुसुद

राजते
लेखना
वधी

---

लेखांक २४३ श्री

राजश्री आनंदगीर गोसावियाचे सेवेसी

॥ ६ उतमगुणपरिपूर्ण धर्मपरायण प्रति विठल यबाजी कुलकर्णी वा माहारोजी फालका वा गुराई वा कनकोजी साहता मौजे गोवे नारायण विनंति उपरी आह्मी साळवणात कीर्दी केली आहे त्यावरते देवाचे बागाचे धरण आहे ते नस्टाईने कोणीतरी धरण फोडून पाणी नास करितात त्यावरून तुह्मी आह्मास कीर्दीकरास आणून बुधीसी लाविता तरी अजी पासून जोवरी आमचे कीर्दी आहे तोवरी चैत्र वैशाख जेस्ट पावेतो धरण जतन करून

| विठल यबाजी | कनकोजी साहता |
|---|---|
| १ ब्रहस्पतवार | १ सनवार |
| १ सुक्रवार | १ आदितवार |
| २ | २ |

माहारोजी
  १ सोमवार
  १ मंगलवार
  ―――
  २

गुसाईजी
  १ बुधवार

येणेप्रमाणे धरण जतन करून ज्याचे दिवसात फुटेल त्याने गोसाविंयाचे राहा करून गुन्हेगारी द्यावी हे पत्र सही

---

**लेखांक २४४** **श्रीमार्तंडप्रसन**

तीर्थरूप राजश्री बावा गोसावी वस्ती का। नीब वडीलाचे सेवेसी

अपत्ये खेलोजी गाडवे देसाई ता। सातारा पायावरी डोई ठेऊन दंडवत विनंति उपेरी आमचे विसि सांगोन पाठविले तरी स्वामीनी हर एकविसी आमचे धोका न धरिजे आज्ञापासून सहसा चाकरीस अंतर पडणार नाही परत फौज ये प्रांती आहे तो तुह्मी गावावरी न राहाणे गुरे थाटे न ठेवणे खाबरदार राहाणे विशेश लेहू तरी स्वामी वडील आहेत हे विनंति मोर्तब सूद

---

**लेखांक २४५**

ॐ जिवाजीने व अकोबाने चरणावर मस्तक ठेऊन सिरसा। नमस्कार विनंति उपरी बावानी दया करून आंबे पाठविले पाच ते पावले तरी सदानद आणि कृस्णा व रा। अवधूतराव जसे दिसे बावा आह्मास मी काय बालक आहे जे गोस्टीस अंतर पडील ते वडीलानी संभालीत गेले पाहिजे जैसे जे घडीस बावा सांगतील ते घडीस हाजीर च आहे बहुत काय लिहिणे मी बालक असे

---

लेखांक २४६

श्रीसकलतीर्थरूप राजश्री आनंदगीर बावा मोकाम नींब यासि
बाळके नरसोजी नाईक व राणोजी नाईक पिसाळ देसमुख प्रा वाई चरणा मस्तक ठेऊन सिरसाा दंडवत उपरी कृपा करून आंबे पाठविले परंतु बावाचा भंडारा कधी जेवला नाही तुह्मी आह्मास जैसे सदानंद आणि कृस्णा असे तुह्मी आह्मास जे गोस्टीस अंतर पडेल ते चालवीत गेले पाहिजे आमचे मायबाप आहा मी काय माहाराजाचे चरणराज आहे जे घडीस चाकरी फर्मावाल ते घडी हाजीर आहे अ-वंदा आंबे काही मजला खायास मिलाले च नाही बावाजीने जेव्हडे दाहावीस पाठविले ते च तरी बालकास आणखी पाठविले पाहिजे मा-यबाप आहा ह्मणून नेणतपणे लिहितो कळले पाहिजे बहुत काय लि-हिणे मी बालक आहे

— —

लेखांक २४७ श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री देशमुख व देशपांडीये
पा सुपे गोसावी यासि

स्नेहांकित दत्ताजी राम वकील व माणकोजी गोविंद आशि-र्वादपूर्वक नमस्कार विनंती उपरी येथें आनंदगीर गोसावी याचा एक सिस्य रा खंडोजी राजे भोसले याचे खुर्दखत निजामशाहचे वेळचे घेऊन आला आहे त्याचे विशईं आह्मास रा रौद्रराव यानींही सांगि-तले आहे तरी आनंदगीर याचा इनाम मौजे मुजेवाडी पा मजकूर येथें चार चावर तहकीक आहे भोगवटा पडिला आहे ऐसे तुह्मास तहकीक ठाऊक असलें तुह्मी वतनदार आहा तहकीक करून एक अर्जदास्ती रा राऊसाहेबास पाठवणें व एक पत्र आह्मास लेहून पाठ-वणें आपणही रा राऊसाहेबास लिहिलें आहे त्याचें आज्ञापत्र येइल तेणेंप्रमाणें वर्तणूक करणें तोंवरी गोसावी गावावरी लावणी करील तरी सुखें करूं देणें जरी इनाम चालवा ह्मणऊन आज्ञा आली तरी चाल-

वणें पत्र नये तरी लावणीप्रमाणें वसूल घेणें जैसी हकीकत असल तैसी बयानवार लेहून पाठवणें रा छ १३ माहे रमजान

---

**लेखांक २४८** **श्री**

श्रीमत् महाराज मातुश्री आईसाहेब याणीं मल्हारजी सावंत पाटील कसबे निंब प्रां। वाई यासी आज्ञा केली ऐसी जे का। मजकुरीं भवानगीर गोसावी याचा मठ आहे त्यास त्याच्या शिष्यशाखा आहेत त्यासी नसते पेच कुपेच करितोस याकरितां पेशजी आज्ञापत्र सादर केलें असतां मागती लबाडी करावयास चुकत नाहींस हे गोष्ट कामाची नाहीं याउपरी सदरहू मठच्या कजीयांत तुवा लबाडी करून पेच केली(या) मुलाहिजा होणार नाहीं जाणिजे रा छ २३ रमजान लेखनावधी

रुजु

मोर्तब सुद

---

**लेखांक २४९** **श्रीशंकर प्रसन्न**

तपोनिधी राजश्री भवानगिरी महंत स्वामीचे सेवेसी स्नो मोरो जिवाजी देशपांडे पा। वाई नमो नारायण विनंती उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें मौजे उडतरी यांत इनाम आहे त्याविसीं लिहिलें तरी आपला इनाम पुरातन चालत आला असेल त्यप्रमाणें कीर्द केली पाहिजे आह्माकडून इनामास तगादा लागणार नाहीं सुखरूप इनामाची लावणी केली पाहिजे बहुत काय लिहिणें आपलें समाधान असो दीजे हे विनंती

---

**लेखांक २५०** **श्री**

श्रीगणेशायनमा

श्रीमंत तपोनिधी माहाराज राजश्री भवानगीर बावा
महंत स्वामीचे सेवेसी

सेवक शंकराजी कृष्ण दिा। देशमुखी का। मलेवडी नमो नारा-

यण विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विषेश आपणाकडील आशीर्वादपत्र येत नाही ऐसे उचित नव्हे आह्मी तुमचे स्थापित असो कितेक वर्तमान यादोजी तावरे यानी स्वामीचे सांगितले त्यावरून समाधान जाहलें आमचे चित्ती आहे की तुमची स्थापना होवी हे विशी राजश्री बाजीसाहेब स्वारीस जातां आह्मास सांगोन गेले आहेत ऐसीयासि स्वामींनी श्रीचे यात्रेस येणें भेटी होईल भेटी अंतीं अवघे वर्तमान कळो येईल कितेक वर्तमान यादोजी तावरे यास सांगितलें आहे तो सेवेसी निवेदन करील चित्तावरी घेऊन अगत्य करून यात्रेस आले पाहिजे बहुत काय लिहिणें कृपा निरंतर असो दीजे हे विनंती

---

**लेखांक २५१**

देऊ

श्री रामजी साहाय

रामराम

तीर्थस्वरूप राजश्री आनंदगीर महंत गोसावी यासी

॥ ६ ॥ सिधी महाराजा स्नेहांकि(त) दुर्गादासजी व समस्त ठाकूर उपरी येथील क्षेम तो धर्म स्वामीचा स्वामीनें आपले स्वानंद लेहावया आशीर्वादपत्रीं लेखकास आज्ञा दीजे विशेषु गोसावी यानीं दया करून श्रीहरदेवगीर व ता रामगीर याबराबरी आशीर्वाद पत्र पाठविलें तें उत्तम समई आह्मापासीं प्रविष्ट जालें बहुत संतोष जाला तेथें आज्ञा कीं ताम्र येऊन मठास उपद्रो केला धर्मशाळेस उपद्रो केला परंतु श्री स्वामी आपण येथें आहों मठही जाला पाहिजे व देवाचा नैवेद्य चालला पाहिजे अनछत्र चालिलें पाहि(जे) त्यावरी गोदावरींचा मेळा आला आहे येथेंही येणार आहेत तरी त्याचें चाललें पाहिजे ह्मणून आज्ञा केली तरीं मठाचें काय आहे श्रीस्वामी तुह्मी अभंग आहां तुह्मी ते ठाईं आहां तोंवरी श्री चालवील हा भरवसा आहे परंतु आ-

ह्मी तुमचीं लाविलीं झाडें आहों आह्मास आज्ञा करावी तरी आह्मी सेवेस अंतर पडों देणार नाहीं या समयांत खरचाची तुंबडी आहे यानिमत्य पत्र लिहिलें आहे देव करील तरी तुमचे कृपेनें खरचाची आबादानी होईल आणि आज्ञप्रमाणें सेवेस उभे ठाकोन या समयाची गोष्टी ऐसी आहे कळलें पाहिजे कृपा असो दीजे पगे लागणा

---

**लेखांक २५२** श्री

तपोनिधी आनंदगिरी महंत यास प्रति राजश्री राजा शिव छत्रपती उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें भवानगिरी याणीं मौजे इडमिडे येथें बाकीचा तगादा लाविला आहे परंतु बाकीचा बयान पाहातां गयाल मयत जलीत आहे याकरितां स्वामीनीं गांवास कौल देऊन रयत सुखरूप राहे उपसर्ग न लागे ऐसें केलें पाहिजे ह्मणून लिहिलें तें विदित जालें ऐसीयास भवानगिरी याचे मतें गांवाकडे बाकी आहे आणि तुमचे मतें त्याणीं बाकी काहाडिली आहे गलथ आहे ऐसें तुमच्या लिहिल्यावरून कळो आलें याकरितां ये गोष्टीचें वर्तमान मनास आणायानिमित्य भवानगिरी याचा शिष्य हुजूर आणविला आहे तुह्मी आपला शिष्य पाठऊन देणें स्वामी मनास आणून जे आज्ञा करणें ते करितील हालीं तुमच्या लिहिल्यावरून गांवास कौल सादर केला आहे तो देऊन कीर्द करवणें बहुत काय लिहिणें

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक २५३**

श्री गणपती

नकल

तपोनिधी राजश्री दौलतगीर बावा मठ निंब गोसावी यासी

स्नो विसाजी राम नमो नारायण विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष तुह्मीं पत्र पाठविलें तें पा-

वलें ता जोरखोरें व जांबुलखोरे सुभा जावली येथील अन्नछत्राकडे सालाबाद गला आहे ह्मणोन लि॥ त्यावरून जांबुळखोरें आह्माकडे नाहीं जोरखोरे येथील अमलावर कारकून आहे त्यास सालाबादप्रों वर्षासन गला आहे तो देणेविशीं रुबरू ताकीद करून तेथील कारकुनास पत्र देविलें आहे सालाबादप्रा॥ वर्षासन चालवणें वरकड मजकूर विठलगीर यांसि बोलण्यांत आला आहे ते सांगतील त्यावरून सर्व कळेल रा॥ छ ५ सफर हे विनंती

---

लेखांक २५४ श्री

श्रीमत् महाराज मातुश्री आईसाहेब याणीं राजश्री समस्त गोसावी मठ वास्तव्य निंब प्रां॥ वाई यासी आज्ञा केली ऐसी जे तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें पाऊन लिहिलें वर्तमान विदित जालें इडमिडे हा गांव पूर्वीं श्रीस होता त्याप्रों करार करून द्यावा ह्मणोन लिहिलें ऐशियास सातारीयास आगमन जाल्यावर येविसींची जे आज्ञा करणें ते केली जाईल जाणिजे रा॥ छ ३ जिल्काद बहुत काय लिहिणें

रुजूबार

(मोर्तब सुद)

---

लेखांक २५५ श्री

सदानंद मठ निंब

राजश्री बसवतराउ खासखेल हुजराती यासि

प्रती भवानगीर गोसावी आसिर्वाद उपर येथील क्षेम जाणून ता॥ कार्तिक वद्य सप्तमीपावेतों वर्तमान यथास्थित असे विशश श्री स्वामीची झोळी हक पुर्वापार प्रा॥ वाई व प्रांत कुडाळ येथें श्री स्वामीचा हक आहे ऐसीयासि सांप्रांत कोणी पाटील खलेल करितात तरी आपण प्रांत वाई व प्रांत कुडाळ यांस ताकीदपत्रें हुजुरचीं व आपलीं दिलीं पाहिजे पूर्वापार हक दर गांवास एक टका व एक मण गला व तेली याच्या घाण्यास तेल पांच सेर व साळी याच्या मागास कापड

तीन हात व धणगरास मागास घोंगडी व चांभाराच्या दुकानास जोडा व सोनाराच्या दुकानास रुपें एक मासा येणेंप्रमाणें आहे तरी आपण प्रांत वाई येथील संमत वाघोली व निंब व कोरगाव संमत व कुडास देश यास ताकीदपत्रें दिलीयानें तुमच्या राज्यास व तुह्मास कल्याण चिंतून आपणाकडे संतोशगीर गोसावी पाठविला आहे याजपाशीं पत्रें दिलीं पाहिजेत बहुत ल्याहावें तरी आपण सूज्ञ असेत हे आसिर्वाद

---

**लेखांक २५६** **श्री**

सदानंदाचे तालिक

राजश्री अनंदगिरी गोसावी मठ सदानंद गोसावी यासि

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक महिमाजी पाटील व तान्हाजी पाटील व विठोजी पाटील व परसोजी पाटील व कृष्णाजी कानोजी व विठोजी पाा व बाजे बाप भाऊ समस्त मोकदम मौजे गोवें साां निंब पाा वाई दंडवत विनंती उपरी आपले आत्मसंतोषें दसनामाचे भंडारीयाबदल जमीन ८१॥ दीड नजीक बागाचे खालीं तुकडा दिधला असे लेकराचे लेकरी चालऊन जो हिकहरकत करील त्यास श्री व आपले वडिलाचें इमान असे हें लिहिलें सही व आमचे पाटाचें पाणीयासी निसबत नाहीं तुह्मी आपले धरणी पाणी धरणें कळलें पाहिजे हे विनंती

निशान नांगर

---

**लेखांक २५७** **श्रीसंकरप्रसन**

तीर्थस्वरूपमुहुर्ती महामेरू देवमाने याविराजित राजमान्या राजश्री कमलनयन गोसावी मोकाम निंब स्वामी गोसावी याचे सेवेसी

॥ ॥ विनंती विद्यार्थी शंकराजी राजे मोहिते देशमुख काा बालाघाट सास्टांगी दंडवत विनंती उपरी स्वामी यानीं आशीर्वादपत्र केशवगिरी गोसावी हातीं पाठविले ते उत्तम समईं पावोन परम संतोष

पावलो कितेक वर्तमान इनामाचे विसी लिहिलें तरी आह्मी राजश्री सुभेदार साहेबास लिहिले असे तेही भले धर्मप्रायन आहेती त्यापासून धर्मकार्यास अंतर पडणार नाहीं व आह्मीही जैसा प्रयत्न करू ए तैसा करून देवाचे कार्यास अंतर न पडे व नंदादीपाविशी लिहिलें तरी तो विवेक बरें च होईल कितेक वर्तमान केशवगिरी गोसावी सागता सेवेसी विदित होईल आह्मी विद्यार्थी असोत घडीघडी निरोप जो असेल तो लिहित गेले पाहिजे आह्मी सेवक असो सेवेसी अंतर पडणार नाहीं सेवकासी आशीर्वादपत्र पाठवीत गेले पाहिजे

(श्रीमत)

---

**लेखांक २५८**

तेथें सदानंद पादुका मठ आहे    दस नामकि छाप

श्री त्र्यंबकराज नीळपर्वनिवासी दस नाम सन्यासी लेहावया कारण ऐसा जे देसाई व देशकुळकरणी व मोकदम व समस्त ग्रहस्त मौजे निंब पाा वांई समस्तास आसीर्वाद उपरी तेथें मठाची व पादुका आहे त्याची लजा तुह्मास आहे ते स्थलीं तुह्मी भले आहा तरी पांच जण मिळोनु त्याचा प्रतिपाळ करणें जो कोण्ही जो वैरागी मठांत राहेल त्यास मठांत ठेवणें जो संयोगी होय त्यास मठांत राहों नेदणें मठाचे बाहेर राहेल व मठासी दावा न करे वैरागी कोई न हो व जगनाथ बालक आहे हा भला आहे तरी तुमचा चित्तास मानत असेल तरी याचें संस्थापन करणें याचा सांभाळ कराल तो आह्मास पावेल कमळनयन तुमचे वडिलीं बैसविला हा कालपर्यंत तुह्मीं चालविलें पुढें ही याचा प्रतिपाळ करणें हें तुमचें यश आहे बहुत लेहणें नलगे तुह्मी भले आहा या कारणें तुह्मास लिहिलें आहे जागाची प्रतिष्ठा राहेल तें करणें व दताजी नाइक देशमुख ॥ आशीर्वाद तेथें मठांत जगनाथ बरवा आपले स्वधर्म रक्षून असेल तरी याचें बरवें चालवणें याची कोण्ही खास्ती करील त्यास तुह्मी ताकीद करणें मठ तुमचा आहे याची पाठी

राखोनु मठाचें संरक्षण करणें तुह्मी देसाई आहेस व मिरासी आहे व भला आहेस याजकारणें मागुत्यानें दुबारा तुह्मास लेहिलें आहे जगनाथगिरीचा बहुत सांभाळ करणें याची खास्ती करील त्यास ताकीद करणें येविशीं आमची आज्ञा आहे यास जतन करणें हे आशीर्वाद

---

**लेखांक २५९** श्री

राजश्री निळोपंत स्वामी यासि

विनंती उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें श्री सदानंद स्वामी यास गावगनापैकीं देशमुखानीं वर्षासन करून दिल्हें आहे त्याविशीं त्याजकडील गोसावी कोरेगावीं वर्षीका बा आले आहेत त्यास काय सांगावें ह्मणून लिा त्यास आह्मी कोरेगावीं आलीयावर जें करणें तें करावयास येईल तूर्त गोसावी यास जावयासी सांगणें छ ३० मोहरम हे विनंती

---

**लेखांक २६०**

ॐ सकल गुणसंपन गुभसेवनीं तत्पर सदाचार श्री कमलनयन गोसावी मठाधिपती मुकाम मौजे निंब पो वाई गोसावी याप्रती प्रीती पूर्वक बाजी राजे घोरपडे दंडवत विनंती उपरी गोसावी कृपा करून पत्रिका पाठविली पावोन परम विश्रांती जाहली उडतरेच्या इनामाचे विशीं लिहिलें तरी रा गंगाजीराम पंडितास व मेलगिरी हुदेदारास ताकीद लेहून पाठविली असे गला व नख्त घेऊन येऊन अतीतमुखें सार्थक करणें बहुत लिहिणें तरी तुह्मी निरापेक्षित असा कृपा दुणाविजे हे विनंती

| + राम + + + |
| --- |
| + बाजी राउ |
| जी घोरपडे |
| + + + + + |

( शिक्का )

---

**लेखांक २६१**

श्री कृष्ण केशव

ॐ मोकदमानि मौजे निंब व मौजे गोवे बेसमी दताजी नाइक देसाई पा वाई निंब सुा समान मौजे मा चे मठ आहे तो मठ आम-

श्रीदताजी
बीन गंगाजी
देसमुख पा
वाई

चा असे तेथें हर कोण्ही तसवीस देईल त्यास ताकीद करणें तेथें आह्मी जोगिंद्रगिरी गोसावी ठेविले असेत हरएक बाबे त्याची पाठी राखणें यास कोणाचे तसवीस न लाविजे व गोसावी-याचे इनामास वेचिये देऊन मालिस्त करिता तैसेच करीत जाणें उजूर न कीजे हरएक बाबे त्याचे पाठी राखत जाणें मोर्तब

छ २ रमजान

एसजी दुरठा करवे सेत नागरविणें नव खलें माहामूरी करविजे नाही तरी + + + +

---

**लेखांक २६२** श्री

तीर्थरूप राजमान्य देवमान्य श्री महंत आनंदगिरी गोसावी मठ श्री सदानंद मो निंब यांप्रती

पूर्वक सूर्याराउ देशमुख व गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशपांडे पा वाई कृतानेक विज्ञापना नमो नारायण ता छ २४ जमादिलावल मो बीदरी सुखे असो महाराजाचे गोसावी रा हरी देवगीर सनद बदल आह्माबरोबर आले आहेत त्यांस धर्मादायाचें पत्र दुरूस कयास करून दिल्हें इनामतीचे सनदपरवाना दिवाणी करून घेत्रा आहे त्यास फुरसती आहे गोसावी बहुत श्रम करितो विदित असावें हरी देवगीर श्री महादेवाचे यात्रेस जावया बहुत उत:कंठित जाले आहेत रुणानुबांधे यात्रेस रवाना करून सेवेसी श्रुत असावे कृपा असो दीजे हे विनंती राजगडतरफेस आपले धर्मादाउ आपले नांवें करून घेतला त्यास वीस पंचवीस सुभ्रे खर्च जाले ते हरदेवगिरीस ठावके त्याचेच हातें जाले विदित असावे हे विनंती

---

लेखांक २६३ श्री

तीर्थरूप माहाराज राजश्री आनंदगिरी गोसावी महंत मठ श्री मुा निंब स्वामीचे सेवेसी विनंती गुरूचे बालक हरी देवगीर गोसावी नमो नारायण ओंनमो नारायण विनंती आह्मी आपले आज्ञा घेऊन सुखरूप लष्करास छ ५ रजबीं पावलों आमचें कार्य पैकीयाकरितां अटकोन राहिलें मग सूर्याराऊ देसमुख यासी विनंती करून बोलिले कीं जो टका पडेल तो कर्ज काढून देणें कर्ज संमेत पैकीं देऊनु ऐसे बोलोन मुचलका दिल्हा मग त्यानीं कार्याचे मागती मनीं धरून कामें चालीं लाविलें कळलें पाहिजे आमचे घोडी आहेत तरी हरएक धामधुमे हलाली हरामी येतात बहुत सावध असणें मठास माणूस पाठऊन सेताभाताचे समाचार घेत जाणें आह्मी तों लौकर येत नाहीं जधीं देसमुख देशपांडे येतील तधीं येऊनु तुह्मी आमचे वाडी करणें काम जालें तरी हें तोंड दाखउनु नाही दश लघून फकीर होउनु जाउनु कांहीं हजार दोनीशें रुपये पाठवणें ह्मणजे काम सरभरा होईल घरीं मुलामाणसाचे परामर्ष करीत जाणें वाकोजी पाटील येथें आहे हरकोणी माणूस येईल तेव्हां स्मरण करून रामजी पाटील नादवाबालकर याचा कागद पाठवीत जाणें बहुत काय लिहणें कृपा असो दिजे नारायण

( निशाणी त्रिशूळ )

लेखांक २६४ श्री

( शिक्का ) सदानंद

अज सुभा प्रा वांई ता मो मौजे सिधनाथवाडी मुा सबा अलफ मौजे मजकुरीं पेशजी श्री स्वामीचे इनाम दिल्हा होता गोसावी मठी होता तो किर्दी करीत होता ऐसीयासी गोसावी तीर्थें करावयासी गेला मठी श्रीची पूजा करावेयासी बाइको निस्पृही राहिली आहे तरी इनाम ठिकाण आहे त्यापैकीं श्रीस जमीन ८२ दोन बिघे देविली आहे ते देणें ह्मणजे बाइकोचा योगक्षेम चालेल आणि श्रीची पूजा होईल जाणिजे छ १६ रबिलाखर मोर्तबसुद ( शिक्का )

**लेखांक २६५** श्री

महाराज राजश्री आनंदगिरी बावा महंत मुा का निंब
स्वामीचे सेवेसी

सेवेसी सेवक सुर्याराउ पिसाळ देशमुख पा वाई चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विनंती उपरी गोसावी धरून नेले ह्मणौन गाउकरानीं लिहिलें होतें त्यावरून रदबदल केली यासी हरदोजणापासून मातबर जमान घ्यावे आणि दसनामात पाठऊन द्यावे तेथें जो इनसाप होईल त्याप्रा जमानानें आणून हजीर करून द्यावे ऐसा तह केला आहे तरी स्वामीनीं भोइज अगर हवेली मध्यें कोणी एके जागा गांवीचा पाटील जामीन करून पाठऊन देणें व घासदाणाही मागतात तरी याचा कैसा विचार तो लेहून पाठवणें व जमानकतबाही पाठवणें अतीत मोईन पाठऊन हालीं दिसगत न लावणें आह्मासही धंदा उदंड आहे त्वरेनें कार्य करून पाठवणें बहुत ल्याहावें तरी स्वामी देव आहेत हे विनंती

मोर्तब सुद

श्रीपदमा सुर्या राऊ ध्याईपदम बा + पीसाळ देशमु ख परगणे वाई

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

# रोहिडखोरें–गुप्ते देशपांडे

**लेखांक २६६** **१५६४ ज्येष्ट शुद्ध ७**

( नकल )

(सिका) मा। अनाम दादाजी नरस प्रभु देशपांडे व गावकुलकर्णी ता। रोहिडखोरे यास किले रोहिडे सु॥ सलास अर्बैन अलफ रोहिरेश्वरचे गाव साडेतीन से टके मलकंबरी आहद पुर्वकडील कडा तहद कोकण सरहद शेंहद्रीचा कडा दक्षण जोरखोरे कडा उत्तर हिरडसमावळ कडा या बमोजीब तिन सरहदीस तुझें खारीतील गाव श्रीस इनामती अज रखतखाने वजारत सीवाजीराजे याणी दिल्हा देवाचे पुजेस तुमचे व देशमुखाचे वडिली वेंका व नावरटा कोळी ठेविला त्यास हाली राजे मारनिल्हे व तुह्मी सिवा जंगम नोकरीस ठेविला तो ही खबर कालि मार किला येऊन मालूम केले या बाबे तू देशमुख जाब देणेस सिताब येणे छ ५ रबिलावल ( मोर्तब पारसी )

---

**लेखांक २६७** **श्री** **१५६७ चैत्र शुद्ध १३**

( सिका ) नकल

इजतअसार दादाजी नरस प्रभु देशपांडे कुलकर्णी ता। रोहिडखोरे व वेलवंडखोरे यासि सु॥ खमस अर्बैन अलफ वजारतमाहब सीवाजीराजे फरजंद शाहाजीराजे याणे शाहाजीसी बेमानगी करून तुझे खोरियात रोहिरेश्वरचे डोंगराचे असराण पुंडावेयाने मावले वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्यावरील ठाणे उठऊन आपण किल्यात सिरला हाली राजगड किला नाव करून बलकावला तो हि वेलवंडखोऱ्यालगत त्यास लोकाचा वगैरे जमाव तू सामील असून फिसात करून रसिद राजे मजकूरनिल्हेस देतोस व ठाणे सिरवली आमिनासी रुजु राहत नाहीस व जमाव बितरजुमा करीत नाहीस व तनखा हि हरदु तपियाचा दिवाणात देत नाहीस मगरुरीचे जबाब ठाणगे व नाइकवाडियासि देतोस हे जाहिरात आले त्यास हे नामाकुल गोष्ट तुझे जमेदारीचे इजतीस आहे तरी ठाणेमजकुरी आमिनासी रुजू राहणे आणि तनखा साह करोन देणे हे न जालियास खुदावंत शाह

तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानु चालणार नाही हे मनी समजणे आणि याउपरी दिवाणात रुजू राहणे छ ११ सफर ( मोर्तब पारसी सफैल कलम लिा आहे सदरहू पत्र पादशाई वजिराचे पारसी .... सिका मोर्तबसहित दफ्तरी आहेत )

---

**लेखांक २६८** **श्री** **१५६७ वैशाख शुद्ध १**

( सिका ) नकल

राजश्री दादाजी नरस प्रभु देशपांडे व कुलकर्णी ताा रोहिरखोरे व वेलवंडखोरे यासि प्रति सीवाजीराजे सुा खमस अर्बैन अलफ

( सिका ) तुह्मास मेहरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणे सिरवलाहून अभिनानी तुह्माकडे पाठविला त्याजवरून तुमचे बाप नरसिबावा हवालदिल जाले वगैरे कितेक बहुतेक लिाो त्यास शाहासी बेमानगिरी तुह्मी व आह्मी करीत नाही श्रीरोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे त्याणी आह्मास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे त्यास बावास हवाल होऊ नये खामाखा सांगावा आणि तुह्मी तो कागद घेऊन सिताब हुजूर येणे राजश्री श्रीदादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इनाम जाले तें कायम वज्रप्राय आहे त्यात अंतर आह्मी व आमचे वंशज लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही हे राज्य व्हावे हे श्रीचे मनात फार आहे यांप्रमाणे बावाचे मनाची खातरी करून तुह्मी येणे राा छ २९ सफर बहुत काय लिहिणे ( मोहोर )

रुजू सुरनीस माहे सफर बार

---

**लेखांक २६९** **श्री** **१५६७ ज्येष्ठ वद्य २**

नकल

ॐ ॥ माा अनाम दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी व गाउकुलकर्णी ताा रोहिडखोरे व वेलवंडखोरे यासि किले रोहिडा

( सिका ) सुा सीत अर्बैन अलफ साल गुा छ ११ सफर खुदा-

वंत शाह गाजी हुकमतपन्हा याचे हुकूमाने मेहेरबां वजिराचा हाकाम तुमचे नावे आला त्यात मजमून अज रखतखाने मेहरबां सीवाजीराजे यासि पुंडावास तुह्मी मिळतात्र होऊन रोहिरेश्वरचे पाहाडी तुमचे खोरीत हाजार बारासे जमाव तुह्मी लोकी केला ये बाब राजे मारनिल्हे याणी तुह्मास खत पाा त्यात इमानभाक जाल्याचा फिसाती मतलब छ २९ सफर कलमी केला आहे हे खबर बांदल देशमुख व खोपडे व जेधे देशमुखी ठाणे सिरवली जाहीर केली हे कळून फरारी जालास हरदु सेरीची विलायत वैराण जाली मोकदमे हाली हुजूरचे मेहरबानगी वरून कौलनामा फरमाविला असे तरी तुह्मी रयान व पटवारी व बाजे वतनदार याजला कचेबचेनसी आपले मकानी हरदु तपियात येऊन हजर होणे आणि दो हि खोरीची विलायतची संचणी आबादानी करून दिवाण देणे व तुमची जमिदारी हककानु इनामति इसाफातिसी हक बमोजीब घेणे दरबाब हरएक मतलब तकसीर केली ती तुह्मास मुबाहक याचे हुकुमावरून जाली असे दर बाब हरगीज दिवाणातून इजा होणार नाही छ १५ रबिलाखर मोर्तब पारसी

( चिरंजीव रावजीस आशिर्वाद विशेष सदरहू कागद असल सिक्यानसी घरी आहे तो तुह्मास माहीत आहे तरी पाठवावा याप्रमाणे मार त्या पत्रात आहे ते च पत्र पाहिजे हे आसिर्वाद )*

---

**लेखांक २७०** **श्री** **१५७४ मार्गशीर्ष वद्य ६**

तालिक असली बमोजीब

सिका राजमुद्रा

अज रखतखाने राजश्री सीवाजीराजे साहेब दामदौलतहू बजानेबु कारकुनानी हाल व इस्तकबाल व सरदेशमुख व देशमुख व देशकुलकर्णीयानि व मोकदमानी व खोतानि व देसकानी व समस्त मिरा-

---

* **अज रखतखाने** हे शब्द शिवाजीचा किताब आहे असें स्मृतीनें लिहिणार समजतो त्या अर्थी पत्र अविश्वसनीय दिसेल परंतु मतलब खरा असावा.

( प्रधान सिका ) सदारानी ता। मोसेखोरे बिदानद सु॥ सलास खमसैन अलफ बो। आमराजी निलकंठ करंजकर सेकीन हिवरे नागेश हुजूर येउनु मामूल केले की ता। मजकुरीचे देहे ७ बि॥

किता एक देहे ६ बि॥ रंगो त्रिमल वाकडा गावकुलकर्णी दे॥ मजरे देहे ६

| | |
|---|---|
| मौजे मोसे बु॥ देखील मजरे ३ | मौजे मोसे खु॥ देह १ |
| १ मौजा | मौजे वरसगौ देह १ |
| २ मजरे | मौजे सिरकोली देह १ |
| १ साडवघर | मौजे साइवे बु॥ देह १ |
| १ पाखरसेत | मौजे साइवे खु॥ देह १ |
| २ | |
| ३ ए॥ देह १ | |

येणेप्रमाणे पेशजी रंगोबा मजकूर देहाये मजकूरचें गावकुलकर्णे चालउनु आपला हकलाजिमा व मुशाहिरा व इनाम सेत व आबे पडे व फणस व चिचा व बाजे उत्पन्न जे जे होत होते ते खाउनु सदरहू देहाये मजकुरीचे गावकुलकर्ण चालवीत होता यावरी हावाई ब्राह्मणी रांडकी ता। मजकुरी होती तिसी त्याणे सिंदलकीचा अमल केला ते खबर जाहिरा होउनु दिवाणात खबर जाहीर जालियावरी यास दिवाणे दस्त करावे तो इतकियामध्ये रंगोबा मजकूर अगोधर च पळाला तो जाउनु जावलीस चंदररायाच्या आसरियाने तेथें राहिला यावरी तो तेथे च देवकरणीने मयत जाला तो निपुत्रिक च होता व भाऊबंद हि कोण्ही होते ते कालेदुकाले करून मेले यावरी त्याचे बुडाले दुसरे देहाये मजकुरीची कुलकर्णे चालवावयास कोण्ही नाही ऐसे जाले सदरहू देहाये मजकुरीच्या गावकुलकर्णाचे फार बरे चालिले पाहिजे याबदल साबाजी यशवंतराऊ देशमुख व माल प्रभु व गोज प्रभु व जान प्रभु व भान प्रभु देशकुलकरणी ता। मजकूर व देहाये मजकूरचे मोकदम आपणास ह्मणो लागले जे सदरहू देहाये मजकुरीचा गावकुलकर्णी

रंगोबामजकूर होता त्याचे कुल बुडाले आहे भाऊबंद हि कोण्ही नाही ह्मणौनु त्या गावीची गावकुलकर्णे तुह्मासी मिरासी करुनु देतो ते तुह्मी मिरासी करुनु सुखे लेकराचे लेकरी खाणे आणि सदरहू गावीचे गावकुलकर्णाचे काम चालवीत जाणे एकूण देहे ६

किता एक मौजे तोव देह १ या गावास कुलकर्णी मिरासीदार अजबाद नाही तरी ते हि गावीचे कुलकर्ण तुह्मास मिरासी करुनु हि दिले असे हे हि लेकराचें लेकरी सुखे खाणें एकूण देहे १

सदरहू साता गावीची कुलकर्णे तुह्मासि मिरासी करून देतो ते तुह्मी मिरासी करुनु घेउनु सुखे लेकराचे लेकरी खाणे ह्मणौनु ताा मारीचे देशमुख व देशकुलकरणी व देहाये मजकुरीचे मोकदम ऐसे बोलिले आणि आपणास सदरहू सात गावच्या गावकुलकर्णाची मिरासीचा कागद शफतपूर्व करुनु दिल्हा आहे त्यावरून सदरहू देहाये मजकुरीची गावकुलकर्णे आपण चालवितो ऐसियास ताा मजकुरीचे हवलदार ह्मणताती जे आता गावीची कुलकर्णे देशमुखीं व देशकुलकरणी यास व देहाये मजकुरीच्या मोकदमानी जे मिरासी करुनु दिली आहे ते तुह्मी सुखे खाणे परंतु दिवाणामध्ये सेरणी कबूल करुनु देउनु माहालास खुर्दखत घेऊन येणे ऐसे ह्मणताती तरी साहेब सेरणी जीवनासारिखी आपले माथा ठेउनु ताा मजकुरीच्या कारकुनास खुर्दखत हि आले पाहिजे ह्मणौनु नफरमजकुर हुजूर येउनु मामूल केले व ताा मजकुरीच्या देशमुख व देशकुलकर्णी यास देहाये मजकुरीचे मोकदमी सदरहू साता गावीच्या मिरासीचा सदरहू लिहिलेप्रमाणे कागद करुनु दिल्हा आहे तो हुजूर दाखविला त्यावरून नफर मजकुरास सेरगी होनु ५०८ पनास बाधौनु यास उगवणी हुजूर घेतली असे तरी तुह्मी यास माहाली ठाणाहून महजर करुनु देणे आणि सदरहू साता गावीच्या गावकुलकरणाचे काम यापासुनु घेत जाणे आणि याचा हक व मुशाहिरा व लाजिमा व मौजे मोसे बुाा तेथे इनाम सेत व आंबे पडे ६ व चिंच पडे १ एक व फणस पडे १ एक आहेत दुमाले करणे व याची अजाबाद गावगना जो हक असेल तो दुमाले करणे व साता गावकुलकरणाचे मिरासी

घरे असतील ते घरवाडे याचे दुमाले करणे तेथे घरवाडा बांधोनु सुखे नांदणे खुर्दखताची तालिक तुह्मी लेहुनु असल खुर्दखत नफर मजकुरासी फिराउनु देणे मोर्तब सुद

तेरीख १९ मोहरम

---

**लेखांक २७१** **श्री** **१५७४ पौष वद्य २**

महजर ब तारिख १५ सफर हजरमजालसी किले रोहिडा सुहूर सन सलास खमसैन अलफ

हवलदार व मुदसदियान

नरसो धोंडदेऊजी हवलदार




नरसो नारायण सरगुरो

साउजी राऊजी सबनीस

रा नारो त्रिमल मजमुदार

कृष्णाजी अनाजी हेजिब

कमिया बिन बहिर

जानो विठल चिटनीस कारखानीस

सरगुरो बाजी नाइक वाडियान

नकलखान आतरीखान सरगुरो

रामराऊ त्रिमलराऊ नाइकवाडी

विश्वासराऊ धोंडजी नाइकवाडी

अनाजी नरसिंगराऊ नाइकवाडी

देसकानी

केदारजी नाइक फरजंद नरसोजी नाइक देशमुख ता उत्रोली
१

दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी दुतर्फा किले मजकूर व गाऊकुलकर्णी किले मार दुतर्फा
१

हिरोजी मो का भोर
१

कान्होजी नाइक देशमुख ता भोर
१

बाबाजी सिवदेऊ गुा खासा निा दाद प्रभु देशकुलकर्णी
१

येसजी खोपडा मो मौजे अंबे
१

रामजी पा। मो मौजे चिखलगाऊ
१
बापोजी बीन कृष्णाजी मो
१
लखजी बीन अपाजी सावले मो मौजे
१
राघोजी व कोंडजी पा मौजे चिखलवड
१
तुळाजी पा। मो मौजे खानापूर
१
राघोजी पा। मौजे वाडी ता। मजकूर
१
येसजी मोकदम मौजे वडगाऊ
१

बलुते

मोरभट बिन रुद्रभट जोसी ह्मसवड ता। उत्रोली
१
तावजी व जावजी कुंभार मौजे उत्रोली
१
ताननाक वरगणा ना। मजकूर
१

अज महजर ऐसा जे बाजी बिन बाबजी येवी बिन बनाजी व सोनजी बिन दादाजी येवी बिन बाळोजी पाटील मो कसबे उत्रोली किले मजकूर याणी किले मजकुरी येऊन अर्ज केला जे आह्मी कसबे मजकूरचे पुरातन मो चे वतनदार कसबे मजकूरची मो अनभवित असता दरम्यान सिरले याणी तंटा करून अटकाव केला त्याजवरून आह्मापासी दिव्य घेतले आह्मी खरे जालो त्याजवरून सिराले रात्रीस पळोन गेला खोटा जाला त्यास आह्मी दिवाणाकडे आलो आहो आह्मास भोगवटियास पत्र करून दिल्हे पाहिजे त्याजवरून मनास आणिता तुह्मी मो कसबे मजकूरचे खरे पेशजी तुझे वडिलापासोन मोकदमीची वहिवाट इनाम पासोडी होळी पोळी घटवात वगैरेसुधा कुल मो मानापानसुधा

अनभवित आलो हे खरे त्याजवरून तुह्मावर मेहरवान होऊन तुमचा अर्ज खातरेस आणून कसबे मजकुरची मो तुह्मास बाहाल करून मो बदल इनाम टके ५ पाच व पासोडी टके २ व मानपान होळीस पोली व घटवात वगैरे मानपान हकलाजिमा मासमधे जो पुरातन-पासून चालत असेल तेणेप्रमाणे माचे वतन अनभऊन तुझे फरजंदाचे फरजंद अवलाद अफलाद दिवाणचाकरी करून गाऊची अबाधी करून सुखे असणे जाला महजर सही ( शिका )

---

लेखांक २७२ श्री १५७५ श्रावण शुद्ध ३

फारशी

अज रख्तखाने नरसो धोंडदेउर्जी हवालदार व मुदसदियान किले रोहिडा बीा दौलतहू बजानेबू ताा बालोर्जी पटेल कुढले मोकदम व नाइकजी पटेल कुढले मोकदम मौजे करंजीये तर्फ मजकूर सुाा सन सलास खमसैन अलफ तुह्मी हर दोजण किला येउनु अर्ज केला जे गोंदनाक माहार मह्नुडेकर किलेमजकूर हा दिवाणचा चाकर असता अमचे बराबर ठाण्याहुनु दिवाणची सदरी ठाणगावर मारिला सबब येउनु कसाला गुजरला आमचे बाप भाऊ वडील व बिरादरभाऊ धरुनु स्वारीचे लोकानी खाना मागितला त्याप्रमाणे लोकास बकरी माजूम वगैरे खाना देउनु नीट बंदोबस्त करुनी खुसी केले त्याउपरी काही लोक निजले काही लोक रखवालीस बसले त्याणी गाऊमाहारास ताकीद केली जे दो पटेल मोकदम भाऊ बिरादर फरजंद नफर सारे चीजबस्त घर तुह्मा महाराचे हवाला केले असे यातील अफरातफरा हिलाहरकत जाल्यास तुमचे सारे गाऊमाहाराच्या गरदना मारू याप्रमाणे ताकीद करुनु सारे लोक निजले त्याउपरी अह्मी व आमचे बाप भाऊ बिरादर फरजंद याणी विच्यार केला जे दिवाणचा ठाणगा आपले वडिलानी मारिला याबाबे आपल्या गरदाना मारितील

हे खास दिसते आता आपल्यास जाण्यास वाट आपले माहारापासी मागावी असा मनसुबा करुनु गाउमाहारास सला पुसिली तो गाउमाहार बोलिले जे आह्मी तुमचे जिवासाठी दिवाणचे गुनेगार होऊनु आपल्या लेकराफरजंदासुद्धा गरदना मारुनु घ्यावया हा हिया आमचे हातुनु होत नाही असे सर्वांनी सांगितले त्याउपरी आमचे बाप व बिरादर भाऊ व फरजंद यास जरब पडुनु गोंदनाक माहार महुडेकर किलेमजकूरचा चाकर याजला भाकेत गवसुनु वचन घेतले जे आमचे सारे जीऊ वाचवणे त्याजवरुनु गोंदनाक बोलिला जे माझी तर गरदान तुह्मा बाबती मारितील त्यास मी कबूल आहे परंतु माझा फरजंद अरजनाक यास काय तुह्मी आपले वतनापैकी वतन देता ते तुह्मी आपले पूर्वज स्मरुनु कबूल केल्यास पार करुनु देतो त्याजवरुनु ते वेळी गोंदनाकास वचन दिल्हे की आह्मी आपले इनामपैकी रुो ८३८ तीन येक पैस व खालिसापैकी वहाण कांबळे वरकस रान व खाचरसुधा देऊ व गाऊमहाराचे इनामपैकी हिसा अठवा रकम टका ·।· रुके बारा व हडकी हडवळ्यात हिसा अठवा व बइत्यात हिसा अठवा व घर गाऊमहाराचे वेळी बारा घरटका व वणहैस पालक व गाऊमाहाराची तरालकी दरोबस्त तुजला व तुझे भाऊ बिरादर फरजंद याजकडे अवलाद अफलाद चालऊ या वचनास जो आमचे वंशातील भाऊ व बाप फरजंद व बिरादर भाऊ नव बिगर हक बिरकत करील त्यास पुर्वजाची व श्री माहांकाळाची शफत असे त्याप्रमाणे ते वेळी इमान जाले ते आह्माकडून गोंदनाकास मिळावे तो गोंदनाक आमचे बाबती गुन्ह्यात येउनु दिवाणानी ठार मारला असा गोंदनाक आमचे वडिलाचे उपयोगी येउनु आमचे जिऊ वाचविले ते वचन आह्मी गोंदनाकाचे फरजंदाकडे चालविणे जरूर या बाबे किला येउनु अर्ज केला हा दिवाणानी आमचा अर्ज खातरेस अणुनु अर्जनाक गोंदनाक याचा फरजंद यास आमचे वडिलाचे व आमचे वचनाप्रमाणे गाऊ महाराकडुनु करुनु दिल्हे पाहिजे याजवरुनु तुमचा अर्ज खातरेस अणुनु तुमचे गुन्हे माफ

दिवाणातुनु तुह्मा मोकदमास माफ करुनु तुमचे अर्जदास्ताप्रमाणे धाकनाक वलद जाननाक माहार याजला पुरसीस केली जे हर दोजण मोकदम याचे बोलणे सदरहू तुजला कबूल असल्यास इमाने कबूल होणे त्याजवरुनु धाकनाक मजकूर बोलिला जे मोकदम पटेल त्याचे इमान गोंदनाकाजवळ जाले ते च माझे पुर्वजाचे व माझे व माझे फरजंद वंशासुधा जाले मोकदमाचे वचनाप्रमाणे अर्जनाक वलद गोंदनाक यास माझे वतनापैकी वतन अठवा हिसा व व घर यासुधा घ्यावे त्याजवरुनु तुजला पुरसीस केली जे तू कबूल जालास याचे इमान करणे त्याजवरुनु तू इमान केलेस जे माझे वौशी जो तरालाचे वतनास व मोकदमाचे वचनास हिलाहरकत करील त्यासपूर्वजाची शफत व माझे जातवले देवाची व पाहनीचे देवाची शफत आमचे भाऊ बिरादर फरजंद व वौशिक यास असे त्याजवरुनु तीन बिनादरा खातरेस आणुनु गोंदनाक याचा फरजंद अर्जनाक याजला तुमचे कबुलाती अर्जदास्तीवरुनु बहाल दिवाण करुनु दिल्हा जातो जे मोकदम याचे इनामपैकी रुके ८३८ तीन एक पैसा व खालिसापैकी वहाण कांबळ्याबदल वरकस रान व खाचर याप्रमाणे व गाऊ माहार याचे माहारकीपैकी इनाम रकम टका ।· बारा रुके हिसा आठवा व हडकी हडवला व मळ्यात व दाईल्यात वगैरे हिसा आठवा व दरोबस्त तरालकी व वेलीचा घर व घरटका व वण व पालक व मानापैकी माहाराचे वतनापैकी एक मान देऊनु चालवावे असे मोकदम व गाउमहार याचे अर्जावरुनु दिवाणातुनु बहाल करुनु दिल्हे असे तरी ही सनद अर्जनाक वलद गोदनाक याचे दुमाला करुनु चे फरजंदाचे फरजंद अवलाद अफलाद तरालकाचे वतन माहारपणाचे वगैरे बाबती माहारपणाच्या दरसाल ताज्या सनदेचा उजूर न करणे या सनदेची तालिक लिहून घेउनु मुख्य सनद अर्जनाक वलद गोंदनाक तराल याजपासी फिरोन देणे जाणिजे छ १ रमजान मोर्तब सुद ( शिक्का )

---

लेखांक २७२ श्री १५७५ मार्गशीर्ष शुद्ध ३

नकल

श्रीमंत राजश्री सीवाजी राजे महाराज साहेबाचे

सेवेसी

दाा बाा यजितपत्र बाबाजी सिवदेव सोनटके ग्ाास्ते दिमत दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी व गावकुलकर्णी ताा उत्रोली व ताा भोर ताा रोहिडखोरे सुाा सलास खमसैन अलफ हुजूर केदारजी बीन नरसोजी व खंडोजी बीन धर्माजी खोपडे देशमुख ताा उत्रोली याचा महजर गोत वगैरे माहाराजाचे समोर हाजरमजालसीत जाला कथला तुटून निमे निमे वतन उभयतानी खावे असे जाले त्यात मी लबाडी करून आपले बिकलम लिहिले की देशकुलकर्णी ह्मणोन घातले याची खबर खोपडे देशमुखानी हुजूर केली सबब मला आणोन राजगडी कैद करावेसे केले त्याजवर मी कबूल जालो की मी चाकर प्रभु देशकुलकर्णी याणी आपले घर भावाचे मुले आणून चौवा गोताचे व ठाणे सिरवळचे अमीनाचे मते नजराणा होनु देऊन घेतले आणि दोन्ही खोरीयाचे वतनास अधिकारी दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी व गावकुलकर्णी करून रोहिडखोरे व वेलवंडखोरेचे वतन चालवीत असता मी लबाडी केली असे गोताचे व जमेदाराचे सरकारचे पारखीस आले मी बिकलम आपले नावे लिहिले ते खोटाई करून लबाडीने लिहिले ही चुकी मजकडून जाली मी चाकर वतनदार न्व्हे हा गुन्हा मजकडून जाला याउपरी असी लबाडी केल्यास दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा खोटा छ ३ मोहरम हे लेहून दिल्हे सही हस्तक्षर खुद

गोही

इ. इ. इ.

( याप्रमाणे कागद हुजूर लिहून दिल्हा त्याची नकल पुढे कामा येईल सबब दादोपंत दिमत सरकार याणे दिल्हे सन माार )

**लेखांक २७४** **१५८४ श्रावण वद्य ७**

मसूरल अनाम राजश्री बाजी सर्जाराऊ जेधे देशमुख ताा भोर प्रति राजश्री सिवाजी राजे सुाा सलास सितैन अलफ तुह्मी बखैर पाठवली लिहिले जे आपण माणसे जाउलीकडे नेईन तरी निंबाजीस कागद दिधला पाहिजे ह्मणउनु लिाा तरी दाटून जाउलीकडे माणसे काशास नेऊ पाहता जैसी आहेत तैसी असो देणे व दताजी कंकास कौल पाठवणे ह्मणउनु लिाा तरी कौल पाठविला असे तरी त्यास देणे आणि त्यासीं हुजूर पाठवणे मोर्तब सुद

श्री शिव न
रपति हर्ष
निधान मह्य
देव मतिम
त प्रधान

मर्या
देयं विरा
जते

तेरीख २० माहे जिल्हेज
जिल्हेज सुरुसूद

---

**लेखांक २७५** **१५८४ आश्विन शुद्ध १२**


मसरल सर्जाराऊ जेधे प्रति सीवाजी राजे सुाा सलास सीतैन अलफ तुह्मास रजा फुरसदगी दिधली ऐसियासि फुरसदगी देउनु बहुत रोज जाले आणि तुह्मी आले नाहीत तरी हाली रोखा पावता च हुजूर येणे घोडी गावी ठेउनु तुह्मी च हुजूर येणे छ १० सफर मोर्तब सूद


श्री शिव न
रपति हर्ष
निधान मह्य
देव मतिम
त प्रधान

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरनिवीस


---





The Lakshmi Art Bombay.

शिवकालीन पत्रव्यवहार—लेखांक २७४.



शिवकालीन पत्रव्यवहार—लेखांक २७८.

The Lakshmi Art Bombay.

**लेखांक २७६** **१५८४ कार्तिक वद्य ७**

मा। अनाम सर्जाराऊ जेधे देसमुख ता। रोहिडखोरे राजश्री सीवाजि राजे सुा। सलास सितैन अलफ मोगल प्रस्तुत तुमच्या तपियात धावणीस येताती ह्मणौन जासुदानीं समाचार आणिला आहे तरी तुह्मास रोखा अहडता च तुह्मी तमाम आपले तपियात गावाचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेंबाळें समत तमाम रयेति लोकास घाटाखाले बांकाजागा असेल तेथे पाठवणे जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागीयासि त्यासि पाठवणे ये कामास हैगै न करणे रोखा अहडता च सदरहू लिहिलेप्रमाणे अमल करणे ऐसियासि तुह्मापासून अतर पडिलियावरि मोगल जे बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल ऐसे समजोन गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे या कामास एक घडिचा दिरंग न करणे तुह्मी आपले जागा हुशार असणे गावगना हि सडेकडिल सेतपोत जतन करावया जे असतील त्यास हि तुह्मी सागणे की डोगरवर असिरा कुबल जागा आसरे ऐस त्यासि सागणे व गनीम दुरून नजरेस पडता च त्याचे धावणीची वाट चुकउनु पलोन जाणे तुह्मी आपले जागा हुशार असणे

(मुद्रा: श्री शिव न रपति हर्ष निधान महा देव मांतम त प्रधान)

मोर्तब सूद

(मुद्रा: मर्या देयं विरा जते)

रुजु सुरनिवीस

सुरु सूद

तेरीख २० माहे रबिलोवल

रबिलावल

---

**लेखांक २७७** श्री **१५८९ माघ शुद्ध १**

नकल

राजश्री मोकदम पाटिल व कुलकर्णी मौजे वेलवंडी ता। वेलवंडखोरे प्रा। मावळ गोसावी यासि

श्री मोकदम पाटिल व कुलकर्णी मौजे पसुर रामराम विनंती विशेष सई आवा ढोर देशमुख यास जिवमान पावेतो मौजे जतपड येथील जमीन च्यार पैसे राजश्री भानजीबावा देशपांडे व गावकुलकर्णी यानी आपले इनामापैकी नेमून दिल्ही परंतु सई आवाचे सांभाल करण्यास तुमचे हवाली बावानी केली ती जमीन तुह्मी मेहनत मशागत करून बाईचा सांभाल करावा हे आमचे गुा ठराऊन तुह्मी कबूल केलेप्रमाणे चालावे व सिक्केकरी ढोर देशमुख यानी खातरी केल्याप्रमाणे चालावे मिा माघ शुा १ शके १५८९ हे विनंती

सुा तिसा सितैन अलफ साली आपाजीराऊ सुभेदार यानी माहाराजाचे आज्ञेवरून राजगड मुा पचाईत करून सई आवाची जमीन जतपडची प्रभु देशपाडे याची परत द्यावयाची ठरली छ १५ मोहरम मोर्तब असे

---

**लेखांक २७८** **१५९० ज्येष्ठ शुद्ध १०**

महजरातील उद्धार

राजश्री थोरले कैलासवासी याणी चिमणाजी बापूजी यांस पत्र सन समान सितैन अलफ छ ८ जिल्हेजचे दिल्हे त्यामध्यें मकसुद लिहिला आहे कीं मो सखोजी भिकाजी यामध्यें व तुह्मी व बाळाजी बापूजी यांमध्ये कस(बे) + + + + + + + + कुलकर्णाचा मिरासीचा कथला आहे याबदल सखोजी भिकाजी तुह्मास निवाडा करावयाबदल एका स्थलास बोलावितात तो तुह्मी जात नाही तेव्हां असे दिसते कीं तुमच्या बापाने व भावाने साहीबीच्या बले त्यापासून कुलकर्ण ह्मो + + + + + + + कुलकर्ण नव्हे असे दिसते तरी हाली सखोपंत व तुह्मी एका थळास जाऊन कुलकर्णाचा निवाडा करणे तुमचे जाले तरी तुह्मी खाणे सखोपंताचे जाले तरी सखोपंत खातील इतकियाउपरी निवाडा करावयास थळास नव जा तर मग साहेबहुकमी च कुलकर्ण + + + + + + + ल असे समजोन थळास

जाऊन हरहक निवा(डा) + + + + + + + + + + (कुल)कर्ण तुमचे नसोन उगे झोंड गला पडत असाल तर दाटून कथला करावयासी गरज नाही त्यांचे कुलकर्ण त्याचे आधीन करून तुह्मी निसूर राहाणे ऐसे असल पत्र सिकियानसी मोरो बलाळ यांजवळ होतें तें त्याणी दाखविले त्यास ते समई माहालीच्या + + + + + + + व मोकदम बलुते ता खेडेबारे याणी + + + + + + + + + + तेथें सिके दौलतराव कोंडे देशमुख यांचा एक व कानजी नाईक कोंडे देशमुख यांचा सिका एक असे दोन सिके आहेत व मोकदमाचे बिजागर आहेत व बलुत्यांची निशाणे आहेत त्याचा निवाडा करावयासी चोंडोजी बलाळ हुजराने सी + + + + + + + + + + कैलासवासी स्वामीनी पाठविले

---

लेखांक २७९ श्री १५९७

नकल

किले रोहिड्याचे मुकामी करीणा लेहून दिल्हा आहे करीना जेधे व खोपडे देशमुख ता रोहिडखोरे सुा सीत सबैन मया अलफ

| चिखलघोलगाऊ | नरघोलगाऊ |
|---|---|
| १ मौजे चिखलगाऊ | १ मौजे उत्रवली |
| १ मौजे करनवड | १ मौजे नेरे |
| १ मौजे अगसोल | १ मौजे पाले |
| १ मौजे न्हावी | १ मौजे खानापूर |
| १ मौजे वनवडी | १ मौजे वडगाव |
| १ मौजे सिरवली | १ मौजे पलसोसी |
| ६ | ६ |

एकूण देहे बारा पूर्वीपासून देशमुखी हांडे का जुनर प्रां याची मुतालकी जमिदारीचा बसला मौजे पलसोसी येथील मुा चालवीत होतें कलम १

हांडे याची कन्या रामाजी बिन हिरजी दगडे पाा मौजे करनवडे ताा मार यास दिल्ही त्यास सदरहू बारा गावची मुतालकी सांगोन वहिवाट करित आले दगडे पाा याणी देशमुखी अनभवली मग गोकाजी पाा जेधे मौजे नेरे प्रां बुधे मानदेस हे चारणीस मौजे उत्रवली येथे येऊन राहिले मग रामाजीराऊ दगडे पाा देशमुख याजकडे गोकाजी जेधे चाकरीस राहिले आणि देशमुखीचा कारभार मुतालकी सांगितली त्याप्रमाणे जमीदारीचा कारभार करीत होते त्याचे पुत्र दोघे खेलोजी नाईक जेधे व बाजीनाईक जेधे पुत्र दोघे कलम १

रामाजी नाईक दगडे याचे पोटी पुत्रसंतान नाही ह्मणौन दुसरी स्त्री मौजे पसवे येथील पाा याची कन्या मौजे खोपडे प्राा वाई येथील खोपडे यास दिल्ही होती तिचा नवरा मेला होता ती माहेरी होती ती रामाजी दगडे देशमुख यानी बायको केली तिचे मागे पहिले घरचे मूल खोपडे याचे होते त्याचे नाव आकोजी खोपडे रामजी दगडे याणी गंधर्वविवाह केला साा आकोजी आला काही दिवसी रामजी दगडे यास देवआज्ञा जाली मग कजिया जाला साा प्रभु देशकुलकर्णी भानजीबावा याचा पुत्र नरसप्रभु खानापुरी नांदत होता त्याजकडे येऊन हकिकत त्यास सांगितली व त्यास हि माहितगारी होती च तेव्हा त्याने उभयताने समजून चालावे मोगलाई ठाणे जवळ आहे कटकट करू नये त्याप्रमाणे काहीं दिवस एकविचारे चालले कलम १

पुढे पातशाई ठाण्यात आले त्याणी किल्यास खेळोजी जेधे यास नेले नंतर खेळोजी जेधे ठाणे सिरवळ येथे गेले तेथून ठाणेदार याने माघारा लाविला नंतर मतलब करून हिशेब द्यावयाकारिता बेदरीस गेले तेथे पातशाहास सर्व मजकूर मागील सांगितला बेवारसी वतन रोहिडखोरे येथील ह्मणोन सांगोन पातशाई फरमान खेळोजी नाईक जेधे याणी देशमुखी करून घेऊन सिरवळी ठाणेदार याजकडे आले तो आकोजी रविवार बाजार सिरवळी होता तेथे गेले तो हा कारभार कळला नंतर माघारा खोपीस येऊन आपले भाऊ आप्तास खोपडे आकोजी खोपडे

घेऊन मेडखिंडीत रानात दबा धरून बसले तो खेलोजी नाइक जेधे तेथे आले तो मारले आणि कागद पातशाई फरमान पागोट्यात होते ते इगच्या डोहात नेऊन बुडविले हे वर्तमान बाजी नाईक जेधे यास कळले नंतर गुंजणमावळ येथे वागणीत काकडेराव होते तिकडे गेले तो त्यानी या गोष्टीचा अभिमान धरून बाजी नाईक जेधे यास आपली कन्या दिली आणि वतन साध्य करून देतो करार केला

( पुढे खोपडे याचे लग्न मारिले व शेवटी वतन उभयतामध्यें वाटून दिलें वगैरे मजकूर दुसरीकडे आला आहे )

---

**लेखांक २८०** **श्री** **१६०७ ज्येष्ठ शुद्ध ७**
किंवा
**१६०८ ज्येष्ठ शुद्ध ७**

नकल

राजमान्य राजश्री कृष्णाजी दादाजी प्रभु देशपांडे सबनीस व जामनीस नि॥ लोक हशम दि॥ हुजरात मौजे कारी वडतुंबी कोरळ चौकी कोरळखिंड ता॥ रोहिडखोरे गोसावी यासि

श्नो शंकराजी नारायण आसिर्वाद उपरी मावळ प्रां॥ गनिमानी चाल केली आहे ह्मणोन समजले त्यास कोरळखिंड व ढवला घाट व मांडरदेवचा सडा येथील जागा जागा चौक्या घाळून गनीमाची खबर ठेऊन कमकसूर खास बातमी पावती करणे + + + + राजगडी कळविता च तुमची कुमक रोहिड वगैरे जागाहून होईल तुह्मी सिरवली मर्दमु चांगली केली हे खबर येथे समजली या वेळी गनीम नामोहरम सर्वानी करावा तुह्मी जमेदार व सरचाकर माहाराजाचे वेळचे + + + करोन दाखवतील हा भरवसा आहे रा॥ छ ५ रजब सु॥ सीत समानीन अलफ बहुत काय लिहिणे

**लेखांक २८१** **श्री** **१६०८ माघ वद्य १४**

( सिका ) नकल

कौलनामा अज स्वारी राजमान्य राजश्री निलकंठ मोरेश्वर ता सरज्याराऊ जेधा मुा सबा समानैन अलफ तुह्मी गनीमाकडे जाऊन सेवा करिता कोण्या भरास भरून गेलेत बरे जे जाले ते फिरोन न ये परंतु मुसलमानाची सेवा करिता तुमास कष्ट होतात साप्रत स्वामीचे सेवेसी येऊन कार्यभाग करावा कष्टाची मुजरा होईल सरफराजी करून घ्यावी ह्मणून कलो आले तरी तुह्मी कदीम लोक तुमचा भरवसा राजश्री स्वामीचे बहुत अन्न भक्षिले आहेत क्रिया धरनु आणि यावयाचे केले तरी बहुत उतम केले कदाचित गनिमाकडे गेले होतेस त्या गोष्टीकरिता यावयाचा अनमान कराल तर सरवथी न धरने बेशक येणे तुमचे बरे करणे सुभेहोऊन सर्फराजी करून बहुत चालऊन अतर न पडे समाधान असो देणे आणि येणे दरीं बाब कबूल असे छ २७ रावल आज्ञाप्रमाण मोर्तब

---

**लेखांक २८२** **श्री** **१६१२ चैत्र वद्य ८**

( सिका ) राजाराम छत्रपति यांचा नकल

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १६ प्रमोदनाम संवत्सरे चैत्र बहुल अष्टमी मदवासरे राजमान्य राजश्री बाजी सर्जाराऊ जेधे देशमुख यास राजाज्ञा अभय दिल्हे ऐसा जे तुह्मी मो रतनोजी सिदे व शकराजी ढगा याजबरोबर कितेक निष्टपणाच्या गोष्टी सांगोन पाठविल्या सांगितले प्रो विदित जाला ऐसियास हे मराष्टराज्य आहे तुह्मी या राज्याची पोटतिडिक धरता तरी ते प्रांते कितेक राजकारणे आहेत च्यालणा करून आपण जमाव करून सावधपणे राहून स्वामीकार्य जे दृष्टीस पडले ते मनास आणून हस्तगत करून ठेवणे हुजूर लेहून पाठवणे तेणेप्रमाणे हुजुरून विल्हे केले जाईल या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री छत्रपति स्वामी स्वारी करून कर्नाटक प्रांती गेलियावरी तिकडे

जमाव लस्कर चालीस हाजार व हाषम एक लाख पंचविस हाजार जमाव जाला आहे दुसरे हि आणखी जमाव होत च आहे प्रतिकूल पुड पालेकर तमाम येऊन भेटले आहेती जमेती पोख्त जाली आहे तूर्त स्वार पधरा हाजार व हाषम पंचवीस हाजार देऊन रवाना केले आहेती ते हि साखल प्रांत तुगभद्रेचा तिरास आले आहे खजाना हि एक लाख होण्याबरोबर आहे यास आणावयास राजश्री धनाजी जाधव व राजश्री संताजी घोरपडे सेना पंच्यसहश्री पाठविले आहेती ते हि आठा पंधरा दिवसी येतील ते आलियावरी तो जमाव व हुजूरचा जमाव ऐसे करून त्यास पाठऊन प्रांते स्वारी होईल तरी हे पत्र तुह्मास सादर केले असे तेणेप्रमाणे जमावानिसी सावध असणे त्या प्रांते आलियावरी तुमची हि सरंजामी मो। रतनाजी सिंदे व शंकराजी ढगे ये हि रदबदल केली त्याप्रमाणे चालऊ बि॥

| तैनात सालिना होण्या | गाव |
|---|---|
| ५०० खासा | ४ इजाती |
| ५०० मताजी जेधे | २ वेतनात गाव |
| १००० | |

सदरहूप्रो हाजार होनु तैनाती व इजाती व मुकासा मिळून साहा गाव यभाग जाली देऊ तरी तुह्मी आपली खातरनिशा राखने स्वामीच्या पायासी एकनिष्टता धरून स्वामिकार्य साध्य होय ते गोस्ट करणे गनिमाचा हिसाब काय आहे तुह्मी लोक जेव्हा मनावरी धरिता तेव्हा गनीम तो काय आहे गनीमसा तुह्मी लोकी केला आहे ते तुह्मी च लोक या राज्याची पोटतिडिक धरता तेव्हा आवरंगजेबाचा हिसाब धरीत नाही असे बरे समजोन लिहिण्याप्रमाणे वर्तणुक करणे अवरंगजेबाने ह्मराष्टलोक आहेती त्यास मुसलमान करावे असे केले आहे त्यापो मुसलमान केले मो नेतोजी राजे व साबाजी घाटगे व जानोजी राजे व कितेक ब्राह्मण हि या प्रांतीचे बाटविले दुसरे मतलब गेले आहेती तिकडून तमाम बाटले लोक होते ते आपले जमावानसी आ-

ह्याकडे येताती हाली हणमतराऊ निंबालकर व सटवोजी निंबालकर व बाजे सरदार आले आहेती दुसरे हि कितेक येताती ऐसे गनिमाचें लस्कर आटोन हुजूर जमाव होत आहे ईश्वर करीतो तरी फते च आहे लिहिलेप्रमाणे हिमती धरणे जाणिजे छ २० जमादिलाखर सुा तिसैन अलफ आज्ञाप्रमाण मोर्तब ( मर्यादेयं विराजते )

सदरहू मोर्तब सिका चौकटी

---

**लेखांक २८३** **श्री** **१६१२ वैशाख शुद्ध ९**

नकल

सिका राजाराम साहेब

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १६ प्रमोद संवत्सर वैशाख शुा ९ नवमी इंदुवासर माा बाजी सर्जाराव जेधे देशमुख व देशकुलकर्णी ताा भोर तपे रोहिडखोरे यासि राजाज्ञा केली ऐसिजे ( सिका प्रधान ) ( सिका प्रतिनिधी ) तुमचेविसी नाइकजी जेधे दिाा देसाई हुजूर येऊन विनती केली की आपला वतनाचा हकलाजिमा इनाम व इसाफति आपले गाव कारकीर्द आदिलशाईपावेतो चालत होते त्यावर काही साहेबाचे कारकिर्दीस बटाईचा तह जाला त्यामुळे आपले इसाफतीचे गावचा राजभाग गला दिवाणात पाउनु हाकाची मोईन दिवाणातून करून दिधली तेणेकरून आपली हैरानगी जाली अन्नवस्त्राची ते हि विती जाली औरंगजेब स्वामीच्या राज्यावरी चाल केली राजश्री छत्रपति स्वामी रायगडीहून कर्नाटक प्रांती गेले रायगड व वरकड हि किले कोट गनिमाने घेतले मुलकाची अवकात चालले नाहीत येगोष्टीनी गनिमासी सामील होऊन फिसाती केल्या त्याबरोबरी आपणासी हि + + दिल्हे वरतावे ऐसे जाले परंतु आपण स्वामीच्या पायासी एकनिष्टेने वरतावे हा चि निश्चय करून होतो स्वामी कर्नाटक प्राा गेलियावरी तिकडे विजयी लोक आपण वतनदार लोक एकनिष्ट सेवा करून दाखवावी

ह्मणून किले विचित्रगड गनिमापासून घेतला व देश हि सोडविला पुढें हि जमाव करून गड कोट व देस गनिमापासून घेतो परंतु स्वामीनी कृपाळू होऊन पेशजी आपला हक चालत होता तेणेप्रमाणे देखील इसाफतीचे गाव चालविले पाहिजे तर्फमजकूरची लावणीसंचणी करून स्वामिसेवा एकनिष्ठपणे करू ह्मणऊन विदित केले त्यावरून आमचा हक व इनाम व इसाफतीचे गाव तुह्मास देविले आहेत पेशजी कारकीर्द प्रो घेत जाणे तर्फमजकूरची लावणीसंचणी करून दस्त आकारून सदरहूप्रमाणे घेत जाणे तर्फमजकूरचे गाव लावणी करून दस्त आकार होत जाईल त्याप्रमाणे लागल्या दस्तावरी हकाची मोईन बैसउनु घेत जाणे छ ५ साबान सुा तिसैन अलफ आज्ञा प्रमाण मोर्तब असे

( सदरहू आज्ञापत्र किले विचित्रगडचे मुा आषाढ वा १३ स पावले असल पत्र देशमुख याजपासी देऊन नकल दाखल्यास घेऊन ठेविली आहे देसाई कारीस गेले ह्मणउनु काव्या व मानकर व नाइकजी जेधे याचे हाते पाठविले )*

---

**लेखांक २८४** **श्री** **१६१२ ज्येष्ट वद्य ८**

नकल

राजश्री माहादजी सामराज देशाधिकारी वर्दन लेखक प्रांत मावल गोसावी यांसि

(मोर्तब) अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक रामचंद्र निलकंठ नमस्कार सुा इहिदे तिसैन अलफ राजश्री सर्जाराऊ जेधे देशमुख ता भोर तर्फ रोहिडखोरे हे हुजूर भेटीस आले याणी विनंती केली की इदलशाहचे वेळेसी इसाफतीचे गाव इनाम चालत होते बितपसिल

* हें पत्र विश्वसनीय दिसत नाहीं; ५ चंद्राला नवमी कधीं येत नाहीं.

इसाफतीचे गाव

१ मौजे चिखलगाऊ

१ मौजे आबोडा

१ मौजे नांटिबी

१ मौजे कारी

४

मौजे इन्हवडीस इनाम

टके ६ साहा एकूण टके

एणेप्रमाणे इसाफतीचे गाव च्यारी व इनाम ठिकाण एक आहे याप्रा चालत होते तेणेप्रमाणे च राजश्री कैलासवासी छत्रपति स्वामीचे वेलेसी चालत होते त्याउपरी आपला भाऊ सिवाजी जेधा यात व आपणात वडिलधाकटेपणाचा कथला मौजे कारी निमित्य लागला या निमित्य उभयता राजश्री पावेतो भाडत गेलो याकरिता राजश्री कैलासवासी स्वामीने निवाडा होये तोवरी आदिकरून देशमुखी अमानत करून देशमुखीस मुतालिक ठेऊन त्याच्या हाते स्वामीकार्य घेत होते ऐसियासि सांप्रत सिवाजी जेधा मृत्यु पावालियावरी आपले बाप भाऊ व आपण समजलो आपला वडिलपणाचा मानास कारी गाव आपणास दिल्हा आहे तरी कृपाळु होऊन आपले इसाफतीचे गाव ठिकाण पहिले राजश्री कैलासवासी स्वामीचे वेलेसी चालत होते तेणेप्रमाणे चालविले पाहिजेत ह्मणून तपसील विदित केला त्यावरून मनास आणून सर्जाराऊ जेधे ह्मणजे कदीम विस्वासू बहुत दिवस कस्ट मशाखती केल्या आहेत व राजश्री कैलासवासीचे वेलेसी हि थोर थोरी काम करून दिल्हे आहेत हाली हि गनीमान कितेक किले कोट घेतले आहेत ते हस्तगत करून घ्यावे स्वामीकार्ये करावी यास्तव कृपाळु होऊन राजश्री कैलासवासी छत्रपतिस्वामीचे वेलेसी देविले इसाफतीचे गाव ठिकाण चालिले असतील तेणेप्रमाणे चालवावे ऐसा तह करून हे आज्ञापत्र तुह्मास सादर केले असे तरी राजश्री कैलासवासी स्वामीच्या सनदा असतील त्या मनास आगणे सनदाप्रमाणे भोगवठा जाला आहे किंवा नाही हे मनास आणून सनदा रुजू घालून जेणेप्रमाणे कैलास-

वासी स्वामीचे वेळेसी यास गाव व ठिकाण याचे चालिले असेल तेणे-प्रमाणे बिलाकुसूर याच्या दुमाला करणे तालिक घेऊन मुख्यपत्र परतून देणे जाणिजे छ २१ रमजान पाा हुजूर मोर्तब

जोडगिरीस मोर्तब २

बार सुरुसूद बार

---

लेखांक २८५ श्री १६१५ मार्गशीर्ष शुद्ध ७

नकल

राजश्री मलार येसाजी सुभेदार व कारकून ताा मावळ प्रांत राजगड गोसावी यासि

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य सेवक संकराजी नारायण नमस्कार सुाा अर्बा तिसैन अलफ मों बाजी सर्जाराव जेधे देशमुख ताा भोर ताा रोहिडखोरे याणी विदित केले की आपण राज्यामधी कष्ट मशागती केली तांबराची फिशात जाली त्या प्रसंगामधी आपण एकनिष्टपणे राहून सेवा केली आहे विलाइत खराब पडली होती त्यास रयतेस धीर भरवसा देऊन वसाहात केली आहे त्यास आपले ताा मारी इनाम गाव पुर्वीपासून चालले आहेत

मौजे अंबवडे १ मौजे नांटबी १

मौजे चिखलगाव १ मौजे कारी १

एणेप्रमाणे देहे च्यार पुर्वीपासून इनाम चालिले आहे त्यास आपण चंदीचे मुकामी जाऊन राजश्री छत्रपतिस्वामीसन्निध विनंती केली की आपले गाव इनाम आहेत ते दुमाला केले पाहिजेत त्यावरून राजश्री स्वामी कृपाळु होऊन ईनाम गाव सदरहू दुमाला करून पत्रे दिल्ही ऐशास सदरहू गाव आपणास दस्तमाफक दुमाला केले आहेत तरी तेणेकरून आपली अवकत चालत नाही तरी आपले गाव कुलबाब कुलकानु दुमाला केले पाहिजे तेथे कीर्द माहामुरी करून सुखरूप राहू ह्मणोन विदित केले त्यावरून मनास आणिता

याणी राज्यामधी कष्ट मशागत केली आहे राजश्री छत्रपतिस्वामी कर्नाटक प्रांतास गेले त्यासमई मोगलाची फिशात बहुत च जाली होती माारनिले एकनिष्ठेने राहून लोकाचा जमाव करून किले विचित्रगड गनिमापासून हस्तगत केला त्यावरी विलाइती कुल खराब पडली होती त्याची लावणी संचणी केली त्याउपरी चंदीस जाऊन राजश्री स्वामीसन्निध विनंती करून सदरहू गावची दुमालपत्रे आणिली देशमुख मजकूर स्वामिकार्याचे एकनिष्ठ याकरिता सदरहू याचे गाव कुलबाब कुलकानु याचे हवाला करण्याची तुह्मास आज्ञा केली आहे तरी सदरहू देह च्यार पुर्वीपासून चालले आहेत त्याप्रमाणे कुलबाब कुलकानु गाव दुमाला करणे दर साल ताजे सनदेचा उजूर न करणे सालमजकुरी दस्तमाफक चालवणे पेस्तर सालापासून गाव कुलबाब कुलकानु दुमाला करणे सनदेची तालिक लेहून घेऊन असल सनद देशमुखापासी परतोन देणे छ ५ रबिलाखर

( सिका )

निदेश समक्ष मोर्तब

पाा छ ११ जिल्हेज सन खमस

मुरुसुद बार

---

**लेखांक २८६ श्री १६१९ भाद्रपद वद्य ४**

नकलेची नकल

राजमान्य राजश्री शंकराजी नारायण पंडित यासि आज्ञा ऐसी जे राजश्री दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी व गावकुलकर्णी देहाये तर्फ रोहिडखोरे व वेलवंडखोरे याचे वतन तुह्मी जप्त केले त्यानी नजराण्याचा ऐवज रायगडी हुजूर कैलासवासी स्वामीपासी जामदारखान्याकडे दिल्हा त्याजवर वतनाची मोकळिक सर्वा जमेदाराबरोबर मावळप्रांताची मोकळिक जाली तेव्हा याची हि केली पुढे तुह्मी सर्जेराऊ जेधे देशमुख याचे तर्फेने आकसामुळे याचे वतन आपल्यास जेधे याजपासून करून घेतले येविसी खबर प्रभु देशपांडे याणी पना-

त्याचे मुकामी जाऊन राजश्री रामचंद्रपंत अमात्य यास सर्व वाका समजाऊन त्यानी त्याची तकरीद घेऊन हुजूर चंदीचे मुकामी तेव्हा रा केली नंतर याचे वृत्तीचा बंदोबस्त करावा तरी तुह्मी च अफलादीचा विशेष वतन बेवारसी आपल्यास द्यावे ह्मणोन विनंतीपत्र संक्राजी ढग्याबरोबर लिहिले तेव्हां स्वामीनी राजकारणावर नजर देऊन बेवारसी वतन असल्यास तुह्मास देसी आल्यावर चौकसी करून देता येईल असे लिहिले असता त्याचे पत्रावर तुह्मी प्रभूवर बलात्कार करून घरातून कागद नेले त्यास हाली दादाजी प्रभु हुजूर किले रांगण्याचे मुकामी चंदीस येण्याबद्दल आले तो स्वामी देसी येता भेट घेतली सर्व कैफियत कळविली त्यास ते च वेळी तुह्मास पत्र लिहिले की हे वतन घ्यावयाचे नाही व मावळप्रांतात पेशजी अभयपत्र पाठविले त्यात लिहिले की आदलशाई व निजामशाई कारकिर्दीस वतने ज्याची चालत आली त्याप्रमाणे चालवावी असा लेख जामदारास तेथून पाठविला असता तुह्मी गैरवाका हुजूर विनंती लिहिली ती चौकसी ध्यानी आणून पाहता गैरवाजबी तुह्मी केली आहे त्याचे वतन त्यास देवावे असे ठरून हे आज्ञापत्र तुह्मास सादर केले असे तरी देशकुलकर्णे व गावकुलकर्णे हर दु खोरी प्रां। मजकूरची तुह्मी व जेधे व लोहकर वगैरे मिळोन हे वतन नाहक घेतले याचे चिरंजीव कृष्णाजी प्रभु अशा अडचणीचे प्रसंगी स्वामीस संकटसमई बादशाहानी चिरंजीव व कबिले नेले त्यापासी चाकरीवर हजर असता मागे त्याचे वतन दरोबस्त घेता हे तुह्मास उचित एकंदर नाही तरी याउपरी याचे वतनाचे कागदपत्र नेले त्यासुधा परत देऊन याचे वतन याजकडे चालत असल्याप्रा। चालवणे आणि खासा स्वारी तिकडे येता च येऊन भेटणे यानी कैलासवासी थोरले राजश्री स्वामीपासी फार शर्तीची चाकरी हरवक्त हुजूर राहून धारकरीयात मर्दुची मोठे धाडसे जिवाची परवा न धरिता केली व स्वामी एहि विजापुरी बंद सोसिले त्या काली सर्जेराव व खंडोजी खोपडे व बांदल देशमुख याणी तुरुक लोकासी

मिळून फिसात केली आणि अडचण स्वामीस फार केली तेवेळी खंडु खोपडे व बांदल धरून मारिले सर्जाराव कैद केला त्या निमित्ती आकस धरून तुह्मास गैरवाका मजकूर समजाऊन त्याचा व याचा अकस असता ही वृत्ती तुह्मी जबरदस्त ह्मणोन करून देता आणि तुह्मी पत्रे करून घेऊन घेता त्यास याचे वतन तुह्मास देण्यास जेधे यास अधिकार नाही व तुह्मी करून घेण्यास अधिकार च नाही पेशजी व हाली या जातीने फार मर्दुम्या करून राज्य मेळविले स्वामीकरिता खराब जाले व मारले गेले असे यत्नेकरून हे दिवस पुर्वीपासून काढले असता तुह्मी सरकारची चार माणसे हाती घेऊन भलाई केली व करिता यानी चाकरी जमाव करून व जातीने हि प्रथमपासून केली व करीत आहेती एकीकडे जाऊन आपले मनी मोठेपणा वागविता व पाहिजे ( ते ) करिता परंतु तुह्मी याचे वृत्तीस लायनी गला पडण्याचा समंध एकंदर नाही सबब हे वतन परत देणे मावळमजकुरी स्वारी येण्याचे पुर्वी वतन दिल्याचा मजकूर लिहिणे याउपरी वतन न दिल्या हा बोभाट आल्यास तुमचे अबरूस व पदास धका येईल असे स्वामीस भासत आहे व पुढे नाना प्रकारच्या अडचणी तुह्मास अशा करणीच्या येतील कारण चिरंजीव कालेकरून तरी श्री देसी आणील तेव्हां संकटी जी माणसे उपयोगी पडली त्याच्या तसनसी आह्मी करविल्या हे इकडे यावे त्याचे चित्ती द्वेश यावा व राज्यकर्त्यास इनसाफ पाहणे जरूर त्यात हे तरी अविचाराचे कलम भलाई जाली ती सारी आमची एकीकडे जाऊन असी करणी तुह्मी केली यात स्वामीद्रोहाचे च करणे ते मुख्य सर्व राज्यास अधिकारी आह्मी करितो तरी त्याचे साठी च आहे प्रसंगास सर्व लोकास तिकडे च पाहणे येईल व वागतील हे कारण इश्वरी च नेमिले आहे उगी च भलते भरी न भरणे पुढे उर्जित होय ते करणे हे न केलिया केले कामाची फळे ज्याचे ते भरतील असी श्रीची इच्छा च असली तरी तुह्मीतरी का समजाल तरी नीट चालीने वागणे ह्मणजे पुढे सर्वोपरी उर्जीताचे च करण जा-

णजे जाणिजे निदेश समक्ष मो असे

तेरीख १७ सफर सुा समान        रुजु सुरनीस बार बार

तिसैन अलफ        बार सूद

( असल पत्र सचिवपंतास दिल्हे त्याची नकल ठेविली त्याची नकल )

---

**लेखांक २८७        श्री        १६२९ भाद्रपद वद्य २**

राजश्री येस प्रभु कुलकर्णी मो करंजिये

पानवहल व वांवघर ता भोर गोसावी यासि

श्नो यादव नारायण नामजाद किलेहाय आसिर्वाद सुा समान मया अलफ चार गावीचे कुलकर्ण तुह्मी घेतले त्यास तुह्मी दिवाणची सेरणी दिल्ही नाही याउपरी देखतपत्र किले विचित्रगडास येणे या कामास लोक हा स्वारी पाठविले आहेत यासी रुपये २ दोन देविले असेत आदा करणे छ १५ जमादिलावल

मोर्तब सुद

---

**लेखांक २८८        श्री        १६२९ मार्गशीर्ष शुद्ध ७**

नकल

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३४ सर्वजीत संवत्सरे मार्गषीर्ष शुा ७ सप्तमी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती याणी राजश्री शामजी हरी देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी सुभा प्रांत मावल ता राजगड यासि आज्ञा केली ऐसि जे प्रतापजी सिलीमकर याचे बाप संताजी सिलीमकर हे किले राजगडी नामजाद होते त्यास ताम्राचा वेढा राजगडास पडला ते समई हे स्वामिकार्यप्रसंगी जखम लागून भाडणी पडला त्याचे लेक प्रतापजी हाली स्वामीची सेवा करावी ऐसी उमेद धरून सेवा करीत आहे परंतु मुलामाणसाचे चाले ऐसा एक गाव इनाम करून दिल्हा पाहिजे ह्मणोन राजश्री शंकराजी पंडित सचिव मदारुलमाहाम याणी हुजूर विनंतीपत्र

पाठविलें त्यावरून स्वामी प्रतापजी सिलीमकर यावरी कृपाळु होऊन यासी नुतन इनाम मौजे ताभाड तर्फ गुंजनमावल हा गाव कुलबाब कुलकानु देखील हालीपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार व इनामदार करून देहे इनाम अजरामऱ्हामत करून दिल्हा असे तरी तुह्मी मौजे मजकूर पुर्वमर्यादेप्रमाणे याचे दुमाला करून इनाम यासी व याचे पुत्रपौत्रादिक वंशपरंपरेने चालवणे साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे या सनदेची तालिक लेहून घेऊन असल सनद भोगवटियासी परतोन देणे जाणिजे लेखनालंकार

असल पत्रावरी सिके दोन व मोर्तब आहे

रुजु सुरनिवीस सुरुसुद बार

तेरीख ५ रमजान सुा समान मया व अलफ बार

बार पाा छ १४ मिनहू

सदरहू असल पत्र बमोजिब नकल

---

**लेखांक २८९** **१६३० ज्येष्ठ वद्य ४**

सलाम राजे शाहु यास की तुह्मी कृष्णाजी दादाजी प्रभु देशपांडिया यासमागमे आपली अर्जदास्त पाा त्यातील मजमून आमची चुलती व सर्व नौकर लोक मिळोन फिसात करून आह्मावर फउजा रवाना केल्या आह्मा बुडवावे आपण राज्य करावे असी चिती द्वेशबुधी धरून असे केले त्यास बादशाही हुकमाने देसी राज्यावर आलो तो हा प्रसंग पडला त्यास श्रीवरे व शूरत्वेकरून लढाई केली तो बादशाईकृपेकरून फते पावलो व नौकरलोकास धरून नसेती केल्या बंदोबस्ती करण्याचा क्रम चालला आहे हुकूम की मनुश जरबेंत राखावे व रयतलोक याचे संरक्षण करावे व इनसाफ बराई खुद जातीने पाहावी बंडे बुडवावी ह्मणजे धका नाही त्याप्रमाणे हुकूम चिती दृढतर धरून राज्यपद्धतीने हिंदुशास्त्राप्रमाणे चालत आहो ही खबर कळावी सबब मुदाम कृष्णाजी अर्जी देऊन वकिलाकडे पाा त्यास वकील मज-

कूर याणी हुजूर अर्जदास्त रसिद करून तुह्माकडिल नौकराचे मुखे साकल्य मजकूर श्रुत केला त्यास पेशजी फर्मान तुह्मास जमेदारीबदल मिळाला आहे त्याप्रमाणे मुलकाचा वगैरे बंदोबस्त ठेऊन कायम जाला हा बहुत तुह्मास बादशाही कृपेने फायदा जाला हा संतोष मानीत आहो व मावळप्रांती शंक्राजी नारायण पंडत याणी जबरीने दादाजी नरस प्रभु देशपांडिया कुलकर्णी रोहिडखोरे व वेलवंडखोरे प्रां मावळ कृष्णाजी प्रभूचा बाप हा कदीम जमेदार असता त्याचे वतन घेतले व आणखी हि बहुत जमेदार व रयत लोकाच्या तसनसि केल्या ये बाबे पंडत यास तुह्मी आणविले आसता न आले हिरकणी खाऊन मेले त्याचे नारोपंडत नोकरीस ज्यारी त्यास तुह्मी तो इनसाफीत नजर व बंदोबस्तीविसी इरादा ठेविला आहे येविसी प्रभूनी अर्ज केल्यावरून त्यास ज्याची जमेदारी कदीमपासून असेल ती अवलाद अफलाद चालवावी व राज्यात जुलूम जाहाला तो न्याय करून रयतेस सुख द्यावे व प्रभूचे वतन प्रभूकडे चालवावे प्रभु आपणापासी जोत्याजी केशरकर याचे दिमतीने हुजूर तुह्मासाठी तुमचे समक्ष नोकरी केली आहे तुह्मी नेक चालीने चालून बादशाहीकृपेने दौलतीची बडती करून घ्यावी येविसी रायभान वकील याजवळ हुकूम पेशजी जाला तो एकंदर मजकूर लिहिला बादशाई लोभ विशेष जाणावा छ १७ रबिलावल सन ३ मुताबीक सन ११२०

( असल फरमान माहाराजापासी दिल्हा मराठी नकल बादशाहा मुनसीपासी केली ती हुजूर सातारमुकामी दाखऊन आपल्याजवळ नकल राहावी ह्मणून विनंती करून घेतली )

---


**लेखांक २९०** **श्री** **१६३१ श्रावण वद्य १**

साक्षपत्र हजीरमजालसी मुकाम मौजे आंबडे ता उत्रोली ता रोहिडखोरे बि हूजूर

राजमुद्रा

रोजश्री शामजी हरी नामजाद सुभा प्रांत मावळ

विष्णु रुद्र सभासद बराबरी स्वारी राजश्री पंतसचिव




भिकाजी कृष्ण चिटनीस सुभा मावळ

देवजी लिंगोजी खटपनीस सुभा मावळ

सकराजी ढगे मोकदम बा। स्वारी रा। पंतसचिव

गोविंद नरसिह हरकारा बा। स्वारी रा। पंतसचिव

गोत

सु॥ अशर मया अलफ कारणे जाले साक्षपत्र ऐसे जे मौजे माडरदेव प्रा। वाई व मौजे आबडे व बललु व गेरे ता। उत्रोली या गावात सिवेचा गरगशा होता ह्मणौन खोपडे देशमुख व माडरे मोकदम हुजूर राजश्री पंतसचिवस्वामीजवळी जाऊन राजश्री सुभेदारास व समस्त गोतास आज्ञापत्रे घेऊन आले कीं सिवेवरी जाऊन सीव नजर गुजार करून हरहक निवाडा हुजूर लिहिणे त्यावरून रा। सुभेदार व समस्त गोत सिवेवरी येऊन श्रावणमासी खोपडियाने दिव्य करावे ऐसा निर्वाह करून हुजूर लिहिले त्याउपर श्रावणमास निघता च हुजुरून संकराजी ढगे यास हा। आज्ञापत्र आले कीं सिवेवरी जाऊन दिव्य घेणे खरा कोण खोटा कोण हे वर्तमान लिहिणे ह्मणौन पत्र आले त्यावरून राजश्री सुभेदार व समस्त गोत मौजे आबडे येथे येऊन खोपडे व माडरे आणून खोपडियापासून दिव्य घ्यावे त्यास अनसोजी व

बयाजी माडरे याणी रदबदल करून दिव्य आपण करितो ह्मणौन मागोन घेऊन राजिनामा लेहोन दिल्हा त्यावरून श्रावण शुध द्वादसी सणवारी गोदनाक बिन भाननाक माहार मौजे माडरदेव याच्या हातास साबण लाऊन दोन्ही हात धुतले कृष्ण न्हावी मौजे खेडी बुा प्रा सिरवळ याजकडून नखे काढून हाताची निशाणे लिहिली मग दोही हाती पिसव्या घालून लाखाटा केला कैदेत राखिला दुसरे दिवसी आदितवारी त्रयोदसी पहिला प्रहरी घोडउडाणाखाले बोरपेढा आहे तेथे आपली सीव आहे आहद कलकदरा तहद चोरघोडीनजिक पालाणा ऐसे बोलोन बोरपेडा माडरे जाऊन उभे राहिले तेथे राजश्री शामजी हरी सुभेदार पहिल्या प्रहरात सिवेवरी जेथे माडरे जाऊन उभे राहिले तेथे रा सुभेदार व समस्त गोत बैसोन का सिरवळचा लोहार आणून त्याजकडून ऐरण ताविली माहार उभा करून हातीच्या पिसव्या काढून सात मंडळे काढिली पहिल्या मंडलात उभा करून हातावरी सेवल घालून त्यावरी सात पाने पिंपळाची ठेऊन त्यावरी लोणी घातले लोहाराने सांडसे ऐरण धरून माहाराच्या हातावरी ठेविली सात मंडले चालोन सिवेवरी वोल्या गवताचा भारा ठेविला होता त्यावरी टाकिली डोब जाला माहाराचे हाती पिसव्या घालून लाखाटा केला कैदेत ठेविला तीन रात्री होऊन चौथे दिवसी बुधवारी राजश्री सुभेदार व समस्त गोत बैसोन हातीच्या पिसव्या काढिल्या हात पाहाता माहार दिव्यास लागला

| | |
|---|---|
| उजव्या हातास आंगठ्यापासी मधले रेघेवरी फोड पावश्या प्रमाणे १ एक व त्या च बोटास पुढे लाहान फोड २ दोन जाले | डाव्या हातास मधल्या बोटापासी एक फोड व त्याचे सेजारी संधीस एक फोड आला |

सदरहूप्रमाणे दिव्यास लागला खोटा जाला हे साक्षपत्र सही छ १४ माहे जमादिलाखर

लेख
नावधी

---

**लेखांक २९१ श्री १६३१ कार्तिक शुद्ध १४**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी संवत्सरे कार्तिक शुध चतुर्दसी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपतिस्वामी याणी मोकदमानी + + + + + + + + + + + + + + + +

श्री
शिवनरपति ह
र्षनीधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

श्री शंकर श्री
शाहुछत्रपति कृ
पानिधि प्रल्हाद सु
त गदाधर प्रति
निधि

+ + + +

+ + + +

आज्ञा केली ऐसि जे मौजे मजकूर पेसजीच्या मुकासियाकडून दूर करून हाली किले व्याघ्रगडचे बेगमीस तनखियास मुकासा दिल्हा आहे तरी तुह्मी किलेमजकुरासी रुजू होऊन मौजेमजकूरचा मुकासबाब देखील बाबतीचा ऐवज किलेमजकुराकडे वसूल देणे मौजे मजकुरी किले सज्जनगडकरी यांची खासगत सेते असतील त्याचा ऐवज सालमजकूरनंतर सज्जनगडकरी याकडे देणे वरकड ऐवज किले व्याघ्रगडाकडे देत जाणे जाणिजे लेखनालंकार

तेरीख १२ रमजान
सुा अशर व मया अलफ

मर्या
देयं रा
जते

रुजू

बार सूद बार रुजु सूद बार

---

**लेखांक २९२** **श्री** **१६३४ भाद्रपद वद्य ५**

नकल

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३८ खरनाम संवत्सरे भाद्रपद बहुल पंचमी गुरुवासरे क्षत्रियकुलवतंस श्री राजा शाहु छत्रपतिस्वामी
( सिका ) याणी रा मताजी सर्जाराऊ जेधे देशमुख भोर तर्फ
( सिका ) रोहिडखोरे यासी आज्ञा केली ऐसि जे तुह्मी विनतीपत्र पाठविलेत प्रविष्ट जाले लिहिले वर्तमान विदित जाले हारामखोराचे लस्करानी धामधुम बहुत च केली मुलुक वैरान जाला हारामखोराचे लोकामधे आपणामधे जुझ जाले च्यार पाच आपणाकडील पडिले त्याकडिल च्यार पाच पडिले सात पाच जखमी स्वामींचे पुण्ये फते जाली आमची निष्ठा स्वामीचे पायापासीं आहे त्याचा हिसाब धरितो ऐसे नाही ह्मणोन लिहिले हारामखोरास नतीजा दिल्हा उतम जाले पुढे हि त्याचा हिसाब न धरिता वरचेवरी ठेचगा देत जाणे आपले निष्ठेचे वृत लिहिले तरी तुह्मी वतनदार एकनिष्ट सेवक आहा तुह्मास स्वामीचे पायावेगळे दुसरा अवलंब नाही हा स्वामीस व तुला भरवसा आहे असे असता स्वामिकार्यास अंतर करो नये कार्य घडो पाहते हारामखोराचे मही माहाडा करून आपले सेवेचा मजुरा करून घेणे स्वामी तुमची सर्फराजी करितील लेखनालंकार मोर्तब

सुरु सूद

---

**लेखांक २९३** **श्री** **१६३५ फाल्गुन शुद्ध १४**

राजश्री खंडोजी गायकवाड हवलदार व कारकून किले

यासि

।ऽ) अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री बाळाजी विश्वनाथ प्रधान आसिर्वाद व नमस्कार सुा अर्बा अशर मया अलफ किले मजकुरी कारखानिसी पाहिजे याकरिता येसाजी दादाजी हुजूर उमेदवार

होते त्यास कारखांनिसी सांगोन पाठविले असे तरी तुह्मी एकमते राहोन स्वामिकार्य करीत जाणे यास वतनदारानी माजी करार केले असेत वजावाटाव दंडकप्रमाणे वजा करून उरले वेतन सिरस्त्याप्रमाणे पावणे यास जमान रा रामजी बाजी देशपांडे पा हिरडसमावळ घेतले असेत छ १२ सफर आज्ञाप्रमाण

श्री
राजा शाहु नरपती हर्षनीधान बाळाजी वीश्वनाथ प्रधान

लेखन सीमा

बार सुरुसुद बार

---

**लेखांक २९४ श्री १६३६ माघ वद्य ३**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४१ जय संवत्सरे माघ बहुल त्रितीया भृगुवासर क्षत्रियकुळावतंस श्री राजा शाहु छत्रपतिस्वामी याणी मोकदम मौजे आंगसोले ता रोहिडखोरे यासि आज्ञा केली ऐसि जे रा कृष्णाजी दादाजी देशकुलकर्णी हे मौजे मजकुरी कुणबावियाने सेत करितील त्यांस करूं देणे सेत करितील त्याचा रास्ती महसूल घेणे जाजती उपसर्ग न देणे जाणिजे लेखनालंकार

श्री
राजा शाहु छत्रपति हर्षनीधान बाळाजी विश्वनाथ प्रधान

श्री आई
आदिपुरुष श्री राजा शाहु छत्रपति स्वामि कृपानिधि तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि

मर्यादेयं राजते

रुजू सुरनिवीस
सुरु सूद
बार

लेखांक २९५ श्रीनागनाथ १६४० फाल्गुन वद्य ६

नकल असल प्रो

राजश्री मताजी सर्ज्याराव जेधे देशमुख
ता भोर तपे रोहिडखोरे गोसावी यासि

॥ऽ॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री नारो शंकर व माहादाजी शंकर देशकुलकर्णी ता मजकूर आसिर्वाद सुा तिसा अशर मया अलफ शके १६४१ विकारी संवत्सरे वैशाख वद्य पंचमी इंदुवासरे पत्र लेहून दिल्हे ऐसे जे तुमचे बाप राजश्री सर्जाराव जेधे याणी आपले बाप तीर्थरूप राजश्री शंकराजी नारायण गांडेकर यासी पुर्वी तर्फ मजकूरचे देशकुलकर्णाचे वतन करून दिल्हे ते समई मौजे कारी तुमचा इनाम गाव तेथे देशकुलकर्णाचा घरठाणा व सेत दिल्हे त्याची याद दाखविली नव्हती आपले बाप पुर्वी कारीस आले होते ते समई राजश्री सर्ज्याराव यानी घरठाणा दाखविला होता परंतु घर बांधले नव्हते साप्रत आह्मी कारीस येऊन घराची व सेताची हद तुह्मास पुसिली त्यावरून तुह्मी आपले भाऊ

| | |
|---|---|
| कान्होजी जेधे | खंडोजी जेधे |
| १ | १ |
| हाणमंतराव जेधे | |
| १ | |

येणेप्रमाणे भाऊ व मुळवे व मोकदम मिळोन घराचा पाया दाखविला देखील खाचर व पायेटे व मोरी यास रुके ·॥· चोविस रुकियाचे सेत आमचे स्वाधीन केले असे याउपरी आह्मी सदरहू प्रो वंशपरंपरेने अनभऊन तुह्मी आह्मी भाऊपणे राहो ए गोष्टीस अंतर करणार नाही याखेरीज हकलाजिमा व किरकोल बाब कारीस काही घेणार नाही छ १९ जमादिलाखर हे पत्र सही

कारकून

२ नरसो एसाजी व
शामजी एसाजी
१ जानो सिवदेव
कारभारी ता। मा।र

१ व्यकाजी दादाजी
कारभारी

साक्ष

मुल्वे दि॥ देशमुख
मौजे कारी
१ वरवाजी घोलप
१ धुल माहाल
१ सुभानजी कोंढालकर
१ तुकोजी रणडावला
१ सुर्याजी जेधा
१ बकाजी सणस
१ सुबाजी तुपा
———
७

मोकदम
१ सीवाजी भडाक मोकदम
मौजे आंबवडे
२ चिखलगाव
१ बगाजी घोडा
१ बापु घोडा
———
२
१ साबाजी विलेकर मौजे
वडतुंबी
२ कोरल
१ अनाजी चिमणा
१ जिवाजी चिमणा
———
२
———
८

———

**लेखांक २९६ श्रीनागेश १६५० वैशाख वद्य ८**

॥ मा। अनाम कृष्णाजी बाबाजी व येसाजी बाबाजी कुलकर्णी देहाये तर्फ भोर ता। रोहिडखोरें बि॥

सर्ज्यारावाचा
सिका

मौजे करंजिये १ मौजे पानवाहल १ मौजे वांवेघर १ यासि मताजी सर्जाराव जेधे देसमुख व नारो शंकर व माहादाजी शंकर देसकुलकर्णी ता। मजकूर सु॥ तिसा असर मया

अलफ तुह्मास पुर्वी राजश्री सर्जाराव जेधे देसमुख ता। मा।र याणी नरस परभु पुर्वी देसकुलकर्णी होते त्याची अफलाद ह्मणौन सदरहू ती गांवीची गांवकुलकर्णे वतन दिल्हे ते तुमचे बाप बाबाजी परभु चालवीत होते त्यावरी अवरंगजेब पातशाहा या राज्यावरी चालोन आले धामधुम जाली याकरितां तुमचे बाप परागंदा होऊन गेले त्याउपर तुमचे बाप व तुह्मी कारीस येऊन दोन तीन साले राहिलेस आणि विनंती केली कीं सदरहू गावकुलकर्णाचे वतन आपल्या बापाने चालविले आहे ते आपले स्वाधीन केले पाहिजे ह्मणोन विनंती केली त्यावरून तुह्मास विचारिले कीं पुर्वील वतनाचे कागदपत्र तुह्मापासी असतील ते दखल करणे तरी आपणापासी काही कागदपत्र नाहीत गांव आपले हवाला करावे ह्मणोन त्यावरून सदरहू कुलकर्णे तुमचे हवाला केली असेत वंशपरंपरेने चालऊन या गावीचा हकलाजिमा व घरजागा पानवाहलेत पुरातन चालिला असेल तेणेप्रमाणे खाऊन वतनाची चाकरी करून सुखरूप राहाणे जाणिजे छ १९ जमादिलाखर

मोर्तब सुद

---

**लेखांक २९७ श्री १६४१ फाल्गुन शुद्ध ४**

राजमान्य राजश्री दताजी सिवदेव राजाज्ञा यासि आज्ञा केली ऐसि जे कृष्णाजी दादाजी व येसाजी दादाजी प्रभु देशपांडे व कुलकर्णी ता। वेलवंडखोरे ता। रोहिडखोरे याणी हुजूर येऊन विदित केले की ता। मजकूरचे देशकुलकर्णाचे व गावकुलकर्णाचे वतन पुरातन आपले आजे नरसो सास प्रभु यासि पुत्र नाही ह्मणोन त्यानी आपले तीर्थरूप दादाजी नरसिह यासी दत्तपुत्र चौघाचे साक्षीने घेऊन वतनास अधिकारी केले नरस प्रभु वारल्यावर दादाजी नरसीह वतनाचा भोगवटा करीत आले त्याजवर औरंगजेब पातशाहाची राजक्रांत जाली त्याजमुळे वतनावरून आपले वडिल दादाजी नरसिह परागंदा जाले ते समई कैलासवासी संकराजी नारायण सचिव याणी चंदीस कैला-

सवासी माहाराजास लेहून पाठविले जे हरदु तर्फेचे देशपांडियाचे नकल जाले बेवारीस वतन आपल्यास बाहाल करून द्यावे त्याजवरून माहाराजानी चंदीहून वतनाची पत्रे करून पाठविली त्यापासून आपले वतन पडित मशारनिले अनभवितात आमचे तीर्थरूप दादाजी नरसिह वतनावर आल्यावर आपणासि सचिवपंत जबरदस्तीने कजिया करू लागले येविसी मानसिंग मोरे सेनापति याजवळून माहाराजास विनंती केली तेव्हा माहाराजानी कागदपत्र मनास आणून दताजीपंत यासि आज्ञा केली त्याजवरून पंत मशारनिले याणी पंतसचिव यासि सांगून याचे वतन यास देवितो ह्मणून हुजूर करार करून आह्मास हाती धरून लेकराप्रमाणे वतन द्यावे ते न करिता तुह्मी नरस प्रभूचे दतक न ह्मणवावे अफलाद ह्मणवावे तुह्मास तीन गावचे कुलकर्ण व मौजे कारी तर्फ मजकूर येथे घरजागा व दोन टकियाचे सेत देतो ते खावून असावे ह्मणोन आपले तीर्थरूप दादाजी नरसिह व येसाजी दादाजी यासि राजश्री नारो पंडित व पंताजीपंत बोलू लागले ते याणी न ऐकिले ह्मणून उभयतास कोंडून जबरदस्तीने सदरहूप्रमाणे कागद लेहून घेऊन मागील कागदपत्र होते ते हिरून घेतले त्यास माझा वतनासी कज्या नाही तर मजला तीन गाव कुलकर्णाचे व घर सेत देतो ते घेऊन समजणे का ह्मणतात बेवारस वतन ह्मणून लेहून वतन करून घेतले ते समई चंदीस चौकसी काय जाली तरी माहाराजानी कृपाळु होऊन मनास आणून पडित मशारनिले यासि आज्ञा करून माझे वतन मजला बाहाल करून देविले पाहिजे ह्मणून त्याजवरून याचे कागदपत्र पेशजी मनास आणिता हे नरस प्रभू देशपांडियाचे दतक खरे राजक्रांतामुळे वतनावरून परागंदा जाले ते समई संक्राजीपंतानी चंदीस माहाराजास लिहिले तेथे चौकसी व्हावी तर दूर देश त्यात राजक्रांतीचे दिवस राज्यास उपयोगी जो जे लेहून पाठविल त्यास तसे करून द्यावे असे हि होत होते याजवरून पाहाता या गरिबाचे वृत्तीचा लोभ संक्राजीपंती धरून केले तुह्मास आज्ञा केली तेव्हा

तुह्मी याचे वतन याचे स्वाधीन करवितो ह्मणून बोलून हाती धरून घेऊन गेला आणि याजवरी जबरदस्ती करून कोंडून कागद लेहून घेऊन तीन गाव कुलकर्णाचे व मौजे कारीस सेत व घर देतो ते घेऊन खाऊन राहणे ह्मणून राजश्री नारोपंडित सचिव व तुह्मी ह्मणता हे उतम नाही पंडित मशारनिले याणी या गरिबाचे वृत्तीचा लोभ न धरावा येविसी तुह्मी त्यास सागणे ते सांगून याचे वतन सोडून याच्या स्वाधीन करीत ते करणे याचा बोभाट फिरून हुजूर येऊ न देणे पंडित मशारानिले याच्या भिडेने याच्या वतनास इस्किल न पडे ते करणे छ २ जमादिलावल सुा अशरैन मया अलफ वतन सोडून देवन सुदन आसा

---

**लेखांक २९८ श्री १६४१ वैशाख वद्य ८**

नकल

यादी वाटनी राजश्री नारो शंकर व माहादाजी शंकर गांडेकर सुहूर सन तिसा अशर मया अलफ कैलासवासी शंकराजी नारायण याणी माहादाजीपंत दत्तपुत्र घेतले पुढे औरस पुत्र नारोपंत जाले त्या उभयतामधे कथला पडू लागला सबब मातुश्री येसूबाई याणी चौघास बोलाऊन उभयताची समजूत करावी त्यावरून उभयतानी चालावयाची कलमे

सचिवपद दौलतीचा अधिकार नारो शंकर याणी करावा दौलतपैकी हिसा निमे ह्मादाजीपंत मागतात परंतु हे कलम सरकारी आज्ञेचे त्यास हुजूर ठरेल त्याप्रमाणे उभयतानी चालावे दरम्यान तंटा करू नये कलम १

रोहिडखोरे वेलवंड खोरे येथील देशकुलकर्ण नवीन संपादित आहे त्यास दोनी खोरियाचे वतन ह्मादाजी शंकर याणी खावे नारो शंकर याणी मागू नये कलम १

दादाजी नरस प्रभु याचा कथला देशकुलकर्णासी रोहिडखोरे वेलवं-

सावोत्रा वगैरे वतनी बात्र दौलत संमधे आहे ती नारो शंकर व माहादाजी शंकर याणी निमे निमे महाली खर्च वजा जाऊन घ्यावी कलम १

वडिलाचे वेळेचे दागीने जवाहीर व नख्त सोने रुपे कापड वगैरे एकंदर चीजवस्तमुधा निमेनिमे उभयतानी घ्यावी शामजी हरी सुभेदार याणी मातुश्री येसुबाई यास शफतपूर्वक पुसून वाटणी करावी त्याप्रमाणे उभयतानी चालावे कलम १

डखोरे याबद्दल हुजूर पडला आहे त्यास कृष्णाजी प्रभू हरहुनेर कबजेत आणून उभयतानी एकविचारे राहून बोलावे प्रभु न थकल्यास त्याचे त्यास द्यावे लागेल सबब हिसे केले नाही कलम १

दौलतीचा कारभार माहादाजीपंतानी कारकून व लोक हाताखाली घेऊन करावा हुजूरचाकरी वगैरे बंदोबस्त ठेवावा कलम १

उभयतानी एकविचारे चालून मातुश्रीचे आज्ञेत राहून लौकिक राखावा कलम १

एकूण कलमे सात सदरी लिा आहेत त्याप्रो निष्कपट चालून एकाएकाचे मर्जीनी वागावे दौलतीची वाटणी निमे निमे करून घ्यावी परंतु किले व मुलुक सरकारी मामलती समंधे आहे सचिवीस सरंजाम व इनाम वगैरे आहे त्यास हुजूर साताऱ्याहून माहाराज आज्ञा करितील त्याप्रमाणे चालावे वरकड कलमे सदर लिहिलेप्रमाणे निमे निमे घ्यावी उभयतानी तंटा न करिता एकविचारे चालावे छ २१ जमादिलाखर

नारो शंकर सदर लिाप्रो मान्य हस्ताक्षर खुद

माहादाजी शंकर सदर लिाप्रो मान्य हस्ताक्षर खुद

साक्ष

पंताजी सिवदेऊ राजाज्ञा १

यादव नारायण नामजाद १

मताजी सर्जाराऊ जेधे देशमुख

शामजी हरि नामजाद प्रांत मावळ १

गोविंद हरि दिमत जोत्याजी केशरकर अज्याहात सरदेशमुख १

| | | | |
|---|---|---|---|
| तर्फ भोर | १ | त्रिंबक सदाशिव मुतालिक | |
| हणगोजी जेधे | १ | दिा मुरुनिवीस | १ |
| शामजी येसाजी खासनीस | दिा | मोराजी प्रभु देशकुलकर्णी | |
| देशमुख | १ | ताा हिरडस मावळ | १ |

( हुजूर सातारियास याद समजाविली तिची नकल घेतली असे दफ्तरातून सरकार परवानगी राजाज्ञा व सुभेदार यास सरकारातून प्रभूचे वतन कसे दिल्हे ही अडती लाविली तेव्हा त्यास दाखविली )

---

लेखांक २९९ श्री १६४२ पौष शुद्ध ७

नकल

यादि राजश्री नारो शंकर सचिव मुा सन अशरैन मया अलफ कृष्णाजी दादाजी प्रभु देशपांडे याचे वतन सोडून देण्याविसी एक दोन ताकिदी जाल्या असता त्याचे वतनाचा कथला वारीत नाही त्यास हाली तुमची याद आणविली असे तरी पाठऊन देणे ह्मणजे ती याद मजकुरनिल्हेपासी देऊन वतन घेण्यास रवाना करता येईल त्याजवरून मजकुरनिल्हेचे पदरी वतन घालण्याचे ठरावाची याद पाठविली आहे देशपांडे याचे + + + + + + न घालण्याची वगैरे कलमे त्रिा

| | |
|---|---|
| देशकुलकर्णाचे व गावकुलकर्णाचे वतन ताा भोर ताा उत्रोली ताा रोहिडखोरे व वेलवंडखोरे येथील मारनिल्हेचे वतन आहे त्यापैकी आह्माकडे देशकुलकर्ण व गावकुलकर्ण आहेत ती त्याची त्याजला देऊ व त्याचे मुतालिक लोहकरे सोनटके चंदीस वगैरे याजकडे गावकुलकर्ण | मारनिल्हेचे बाप दादाजी नरस प्रभु याणी अवरंगजेब याचे धामधुमीत कागदपत्राचे रुमाल सर्ज्याराव देशमुख ताा भोर याजकडे ठेविले आहेत ते त्याचे त्याजला देऊ<br>कलम १<br>मारनिल्हेचे समजुतीस जेधे देशमुख व धोरपडे देशमुख व ढोर देश- |

आहेत ती त्याची त्याजला ताकीद करून देऊ कलम १

मौजे अंगसोले ता। भोर हा गाव मारनिल्हेस हाशम लोक कारी वडतुंबी कोरले याचे नि॥चे सबनिसी फडनिसीबदल आहे तो त्याचा त्याजला देऊ व किले रोहिडा येथील चाकरी मारनिल्हेपासून घेऊन सभासदेची आसामी त्याची त्याजकडे चालऊ कलम १

मुख पाठविले ह्मणजे ते समजूत करितील ह्मणोन आज्ञा त्याप्रो त्रिवर्ग पाठविले आहेत समजूत करितील कलम १

आह्मी सदरहू वतनाबदल महजर वगैरे कागदपत्र करून घेतले व मारनिल्हेपासून जबरीने कागद लिहून नरस प्रभूचे नव्हे वगैरे सबब लाऊन घेतला त्यासुधा एकंदर त्यास परत देऊ कलम १

येणेप्रमाणे दोन्ही महालचे वतन मारनिल्हेचे आहे हे खरे मधे सर्ज्याराव वगैरे याणी वतन बेवारीस आहे ह्मणोन समजाविल्यावरून कैलासवासी पंतानी चंदीस समजाऊन आपले नावे वतन करून घेतले परंतु दोन्ही महालचे वतनदार मारनिल्हेचे खरे नरस प्रभूचे भाऊबंद वेलवंडखोरेकर भास्करजी प्रभु खरे त्याचा पुत्र दाद प्रभु नरस प्रभूचा दत्तपुत्र खरा नरस प्रभूचे वडिल घर तेव्हा दोन्ही वतनाचा अधिकारी दादाजी नरस प्रभु खरा आहे सदरहू लिहिलेप्रमाणे मारनिल्हेचे वतन मारनिल्हेचे पदरी घाल्हू यात अंतर मजकडून होणार नाही करार छ ५ जमादिलावल + + + +

---

**लेखांक ३०० श्रीरामप्रसन १६४६ फाल्गुन शुद्ध ३**

राजश्री मताजीराव जेधे देसमुख ता। रोहिडखोरे गोसावी यासि

॥ (श्री) अखंडितलक्ष्मीआलंकृतराजमान्य श्नो। त्र्यंबकजी काकडे हवलदार किले मनमोहनगड रामराम सु॥ खमस असरीन अलफ मौजे कोरले व वडतोंबीचे रान हिरडसमावळचे सीवेचे अमानत आहे ते रान किलेमजकुरास सेते करावयासी राजश्री स्वामीनी दिल्हें आहे

येविसी तुह्मास हि पत्रे पाठविली आहेती कलले पाहिजे बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे छ १ जमादिलाखर हे विनती

मोर्त
ब सु·
द

श्री
सीवचरणी
दृढभाव बा
जीसुत त्र्यंबक
जी काकडे
+ +

---

**लेखांक ३०१** श्री

यादी कारकिर्दी

सीवाजीमाहाराज

संभाजी माहाराज याचे कारकीर्दीत जाला मजकूर

राजारामसाहेब मंचकारूढ जाले शके १६०२ वैशाख वद्य ३

संभाजीराजे यास राज्याभिषेक शके १६०२ दुर्मतीनाम संवत्सरे माघ शुा १०

भागानगर औरंगजेब याणी घेतले शके १६०५

औरंगजेब पातशाहानी संभाजी माहाराजास तुळापुरी मारले शके १६१० विभवनाम संवत्सरे

औरंगजेब याणी विजापूर घेतले शके १६११ शुक्लनाम संवत्सरे

शाहुमाहाराज याची कारकिर्दीत जन्म शके १६०२

माहाराजास औरंगजेब याजपासी नेले शके १६११

राजारामसाहेब सिंहगडी वारले शके १६२१

औरंगजेब नगर मुकामी वारला शके १६२८

राज्याभिषेक शके १६२९

आईसाहेबाचे पुत्र सीवाजीराजे वारले शके १६३३

रामराजे याचा जन्म शके १६३४

शंकराजी नारायण वारले शके १६३४

नंदननाम संवत्सरे सचिवीची वस्त्रे नारो शंकर यास जाली शके मजकुरी

परशराम प्रतिनिधि माहाराजानी कैद केले बेडी घातली शके १६३३

बाळाजी विश्वनाथ यास पद जाले प्रधान शके १६३५

माहाराजाची मातुश्री दिल्लीहून देसी आली शके १६४०

परशराम प्रतिनिधि वारले शके १६४०

खंडेराव दाभाडे वारले शके १६५०

प्रधान व सेनापति लढले शके १६५२

शाहू व संभाजीराजे यांच्या भेटी कराड मुकामी जाल्या शके १६५२

राजगड हपसी याजपासून परत घेतला शके १६५५

फिरंगी याची लढाई प्रधानासी जाली शके १६५८

वसई फिरंगी याजपासून घेतली शके १६६१

बाळाजी विश्वनाथ वारले शके १६६२

किलीजखान निजामलमुल्क वारले शके १६६९

जिवाजी खंडेराव चिटनीस वारले शके १६६४

धाकटी धनीन वारली १६७०

शाहूमहाराज वारले शके १६७१

लेखांक ३०२ श्रीशंकर

करीणा जेधे देसमुख ता। रोहिडखोरे सुा खमस + + + व अलफ करीणा लिहिला जे खेमजी नाईक व भानजी नाईक जेधे आपले वडील बेदरी पातशाहाजवळी नाइंकी करून होते त्यास खेलोजी नाईक पातशाहाजवळीं राहिला आणि भानजी नाईक आपले वडिल बेदरीहून निघोन नेरास आले नेरीहून कन्हेरी खिंडिनजीक येऊन राहिले त्यास ता। मजकुरी अगदी जंगल खराब होता जंगल होते याकारिता कन्हेरीचे खिंडीहून निघोन भानजी नाईक येऊन उत्रोलीस बाल प्रभु व बाबाजी प्रभु देसपांडे होते त्यास भेटोन राहिले खोपडे पसरणीहून चारणीस पळसोसीस येऊन राहिले होते माहालीची वसाहती जाली माहाली कोण्ही पूर्वीचा वतनदार देसमुख नव्हता त्यास आपले वडिल भानजी नाईक पातशाहाजवळी जाऊन माहालीचा करीना जाहीर केला त्यावरी पातशाहांनी मनास आणून वतनदार कोण्ही नव्हता याकारिता भानजी नाइकास देसमुखी देऊन परवाना करून दिल्हा तो परवाना घेऊन सिरवळी ठाणे होते तेथें दखल केला तेथून उत्रोलीस येत होते त्यास मार्गी गाडेखिंडीस खोपडियानी वाद धरून भानजी नाइकास दगा केला पाचजण मारिले आणि परवाना नेऊन वींगच्या डोहात बुडविला उत्रोलीस गुरढोरे माणस वस्तभाव होती ते खोपडियानी लुटली मुलेमाणसे उत्रोलीहून पळोन मौजे वांगणी ता। गुंजणमावळ येथे गेली त्यास ते जागा राहावयास अनकुल न पडे याकरितां तेथून निघोन धावडीबंदरीस जाऊन राहिले त्यास भानजी नाइकाचे पुत्र कान्होजी नाइक लाहान होते थोर जालियावर बाराजण लोक व कान्होजी जेधे ठेऊन जोगटेभीस आले त्यास खोपडियाचे वऱ्हाड मौजे करनवडे येथे होत होते तेथे जाऊन मारा केला त्यावरी तेथून निघोन मागती धावडीबंदरीस गेले त्यावरी हे वर्तमान दिवाणात दाखल जाहले दिवाणाने व गोताने आपले वडील कान्होजी नाईक यास व खोपडियास जमा केले त्यास सिरवळीच्या वडाखाले दिवाण व गोत बोलिले जे

पातशाहानी जेधियास देसमुखी दिल्ही हे गोष्टी परंतु खोपडियानी जेध्याचा मारा केला व जेध्यानी खोपडियाचे वऱ्हाड मारिले त्यामुळे खून दुतर्फा जाले आहेत याकरितां देसमुखी दो जागा वाटावी ऐसा निर्वाह करून दोनी तर्फाच्या दोनी वाटण्या करून चिठिया लेहून श्री देव मौजे अंबवडे येथे टाकिल्या त्यास वरले तर्फेची चिठी जेध्याच्या हातास आली उत्रौलि तर्फेची चिठी खोपडियाचे हातास आली वाटणी जालिया त्यापासून कान्होजी नाइकान देसमुखी केली त्याचे पोटी नाइकजी नाईक जाले त्याणे देसमुखी केली त्याचा सर्जाराऊ व चापजी जेधे व नाइकजी जेधे व रायाजी जेधे व सभाजी जेधे ऐसे साजण पुत्र जाले आपले वडील सर्जाराऊ याणी देसमुखी केली आपण हि करीत आहो देसमुखीचा करीणा या जातीचा आहे वतनाचा करीणा

राजश्री थोरले कैलासवासी स्वामी याणी पुर्वी च मनास आणून खोपडियांआधी पान आपले आजे कान्होजी जधे यास दिल्हे आपले बाप सर्जाराऊ जेधे यास हि पाने आधी दिल्ही आहेत खोपडियाआधी पाने आपले वडिली घेतली आहेत ये जातीचा करीणा पानाचा करीणा तरी आपले वडिल आधी पान घेत आले आहेत आपले आजे कान्होजी जेधे स्वारानसी माहाराज साहेबापासी चाकरी करीत होते ते समई राजश्री छत्रपति कैलासवासी स्वामीस माहाराजानी पुण्यास ठेविले त्याजवळी आपले आजे कान्होजी नाइक स्वारानसी राहिले त्यावरि राजश्री दादाजी कोंडदेऊ सिवापुरास आले ते समई बारा मावळामधे कृष्णाजी नाइक बादल देसमुख ताा हिरडसमावळ दाईत घेत होते त्यास कर आपले वडिल देत होते त्याणी दाईत दिले नाही दादाजी कोंडदेऊ कृष्णाजी बांदल यावरी गेले ते समई कृष्णाजी बांदलाने स्वारावरी चालोन घेतले स्वार पिटून काढिले घोडियाच्या दांड्या तोडिल्या दादाजी कोंडदेऊ नामोहर होऊन सिवापुरास आलियावरी कान्होजी नाइकास बोलिले की तुह्मी कृष्णाजी नाइकास भेटीस घेऊन येणे तुह्मी हे गोष्टी मनावर धरिता तेव्हां कृष्णाजी नाईक हि आणिता

आणि बारा मावळेचे देसमुख काही आले आहेत कांहीं राहिले आहेत ते हि भेटीस येतात ह्मणौन कितेक गोष्टी बोलिले त्यावरि कान्होजी नाइक कारीस आले तेथून कृष्णाजी बांदल यास च्यार गोष्टी सांगोन पाठविल्या त्यावरून कृष्णाजी नाईक भेटीस सिवापुरावरी आले त्यावरी अगदी देसमुख भेटले त्यावरी कुल मावळेलोक जमाव करून तीन हजार लोक खळदबेलसर येथे मैदानास झुझावयास पाठविले ते समई मोगलाने चालोन घेतले मावळच्या लोकानी शर्ति केली मोगल मारून लाविला त्यामधे आपले बाप बाजी नाईक लाहान होते त्यानी निशाणाचा भाला घेऊन जमावाबरोबर गेले तरवारेची शर्ती केली राजश्री छत्रपतिस्वामींनी मेहेरवान होऊन आपल्या बापास सर्जाराई दिल्हे ते समई मोगलाकडे त्रबई खोपडी पहिली च तिकडे गेली होती आपणाकडील लोक रणामधे जखमी होऊन राहिले होते ते दाखऊन त्यांच्या गर्दना मारविल्या त्यावरी अगदी मावळे जमा जाले राज्य वृद्धीते होत चालिले त्यावर अबजलखान वाईस राजश्री छत्रपतिस्वामी कैलासवासीवरी चालोन आले ते समई खंडोजी खोपडे पारखं होऊन अबजलखानास भेटले आणि राजश्री स्वामीस धरून देतो ह्मणऊन कबुलाती केली त्यावरी कान्होजी नाईक आपले आजे याणी आपली माणसे पळविली ती तळेगावी नेऊन ठेविली आणि आपण व सर्जाराऊ व चापजी नाईक व नाईकजी नाईक राजश्री स्वामीचे भेटीस गेले त्यास राजश्री स्वामी बोलिले की खंडोजी खोपडे अबजलखानास भेटले

( अपूर्ण )

---

लेखांक ३०३ श्रीराम

नकल

यादि स्मरणार्थ दादाजी नरसी प्रभु देशकुलकर्णी व गावकुलकर्णी ता। रोहिडखोरे हे आपले वतन अनभवित असतां अवरंगजेब

पातशाहा याची मसलत दक्षण प्रांती जाली विजापूर भागानगर हस्तगत करून राजश्री स्वामीच्या राज्यावरी चालून घेतले ते समई मुलकामधे राजिकाचा उपद्रव फार जाला मुलकास हि दहशत बहुत पडोन परागदा होऊन परमुलकास गेले मुलुक खराबा होऊन पडिला ते वख्ती दादाजी नरसी याणे आपले वतन सोडून मुले माणसे घेऊन परागंदा होऊन परमुलकास जाऊन वख्त गुजराण करित असता मोगलाची धामधुम फार जाली जुलपुकारखान रायगडास येऊन रायगड हस्तगत केला ते प्रसंगी राजश्री

स्वामी स्वार होऊन कर्नाटक प्रांतास गेले ये प्रांती राजश्री रामचंद्रपंत अमात्य व राजश्री शंकराजी नारायण सचिव यासि ठेविलें ऐसियासि राजश्री स्वामी चंदीचे मुकामी असतां राजश्री शंकराजी नारायण सचिव याणी विनंतीपत्र पाठविले जे ता। रोहिडखोरें येथील देशकुलकर्णी होता त्याचा निरवंश जाला वतन चालवावयासी कोण्ही नाही स्वामीनी कृपाळु होऊन सेवकास वतन मऱ्हामत केले पाहिजे त्याचे लिहिलियावरून मनास आणितां स्वामि कृपाळु होऊन वतनाचा कागद करून दिल्हा त्यापासोन राजश्री शंकराजी नारायण ता। रोहिडखोरे येथील देशकुलकर्णी चालवित आहेत ऐसियासि दादाजी नरसी प्रभु परागंदा होऊन परमुलकास कालक्षेप करित आहेत दादाजी प्रभुचे पुत्र कृष्णाजी व येसाजी प्रभु आहेत

---

लेखांक ३०४ श्री

यादी विजापुरी बादशाही जाहली शके १३२२ विक्रमनाम संवत्सरे सुा। इहिदे समान मया सालात जाली त्याचा तपसील

| | वर्षे वगैरे |
|---|---|
| इसुफशा | २२८५८३ शके १३२२ ताो शके १३४४ सुा सलास असरीन समान मया |
| इसमालशा | १८८३९ शके १३४४ ताो शके १३६२ सुा इहिदे अर्बैन समान मया |
| इब्राहीमशा | २८८६८४ शके १३६२ ताो शके १३९० |
| मलीशा | ८६८४ सुा तिसा सीतैन समान मया |
| आलीशा | २५११०८९ शके १३९० ते शके १४१५ सुा अर्बा तिसैन समान मया |
| इभ्राम जगद्गुरु | ४३८११८२ शके १४१५ ते शके १४५८ सुा सबा खमसैन तिसा मया |
| सुलतान महमदशा बादशाहा बाहदूर मोहर गोल मोर्तब 0 अष्टपदी असे | ३०८१८२ शके १४५८ ते शके १४८८ सन सबा सितैन तिसा मया |
| इदलशा आलिशा दुसरा मोहर मोर्तब अष्टपदी | १८८४८७ शके १४८८ ते शके १५०६ सन खमस समानीन तिसा मया |
| सिखंदरशा १ सुलतान महमद १ इसमाल | १३८६८५ शके १५०६ ते १५१९ सन समान तिसैन तिसा मया |

२०१८५११५

दिलीहून अवरंगजेब २० शके १५१९ ते शके १५३९
बादशाह दक्षण प्रांती सुा समान अशर अलफ
येऊन बादशाही केली

---

२२१८५८१५

नंतर सीवाजीराजे यानी हरतरेचे
यत्न करून बुडविली बादशाई शके

---

**लेखांक ३०५** श्री

राजश्री वाकाजी पवार गोसावी यासि

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री फतेसिंग भोसले राम राम सुा इसन्ने सलासीन मया अलफ तुह्मी पत्र पाठविले पावोन वर्तमान विदित जाले तरी तुह्मी स्वार व करोल घेऊन भेटीस येणे करोल स्वार पाहून विले केली जाईल जाणिजे छ ११ जमादिलाखर बहुत काय लिहिणे

लेखना
वधि मुद्रा

श्रीशिवशंभु
स्वामिनि शाहुभूपे
च पार्थिवोत्तंस ॥परि
णतचेतोवृत्तेः फते
सिंहस्य मुद्रेय

---

**लेखांक ३०६** श्री

यादी वंशावळ पेशजीच्या टिपणावरून एकंदर करून लिहिल्या शके १७५४ जयनाम संवत्सर सन सलास सलासीन मया तैन व अलफ

ता। पौडखोरे प्रा। मावळ

देशमुख ढमाले राउतराऊ

१ चंदराऊ शिवाजीमाहाराजांच्या कारकिर्दीत होते

१ हसाजीराव शाहुमाहाराजांच्या वेळेस

१ रामाजीराव

१ तुळाजीराव

१ देवराव हाली आहेत त्यांचे पुत्र तात्या

दिघे प्रभु देशपांडे कुलकर्णी

१ रुपाजी व दादाजी

१ येसाजी व रघुजी

१ रुपजी व विठोजी

१ जोत्याजी व चिमणाजी

१ महिपतराव व माणिकराव

१ अमृतराव व व्यंकटराव

१ हाली सीताराम व धोंडिबा

ता। कानदखोरे

मरळ देशमुख

१ नारायणजी बिन कान्होजी

१ बावाजीराव

१ आपाजीराव

१ प्रतापराव

१ भगवंतराव

प्रभु देशपांडे

१ सजणाजी नानाजी व विसाजी गोम व आपाजी त्रिमल

१ भानजी

१ आपाजी

आपाजी त्रिमळ देशकुलकर्णी

पो। सिरवळ प्रा। वाई

निगड देशमुख यशवंतराव

१ केदारजी नाईक मोगलाईत व सीवाजी महाराज कारकिर्दीत

१ मल्हारजी नाईक

१ माहादजी नाईक

१ रघुनाथराव नाईक हाली आहेत

दताजी केशवजी ना। पिसाळ देशमुख

अवधूत तिमाजी देशपांडे

देशपांडे

१ मोरो गंगाधर

१ गंगाधर यादव

१ जनार्दन गंगाधर

१ सखाराम जनार्दन

१ माधवराव सखाराम हाली आहेत

ता मुठेखोरे

देशमुख कारणे गंभिरराव

१ पद्माजी गंभीरराव

१ बापुजीराव

१ पांडुरंगराव हाली आहेत

प्रभु देशपांडे

१ रामाजी

१ जनाजीराव

१ माधवराव जनार्दन

१ जनार्दन माधवराव

१ भवानराव जनार्दन हाली आहेत

ता वेलवंडखोरे

ढोर अढळराव देशमुख

१ हैबजीराव देशमुख

गगाजी अनंत गुा

देशकुलकर्णी प्रभु

ता मोसेखोरे

देशमुख

१ साबाजी यशवंतराव पासलकर

गुंजणमावळ

सिलीमकर देशमुख

१ संताजी हैबतराऊ

देशपांडे

१ नारो त्रिमल

हिरडसमावळ

बांदल देशमुख

१ संक्राजी नाईक व मानाजी नाईक

प्रभु देशकुलकर्णी

१ विठल

१ हरबाजी निगवणे
देशपांडे कुलकर्णी प्रभु
१ विठल बापाजी व रुद्राजी
रघुनाथ

---

**लेखांक ३०७**

जाला महजर ऐसा जे दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी व गाउकुलकर्णी ताा भोर व ताा उत्रोली दुतर्फा किलेमजकूर व ताा वेलवंडखोरे याचा व बाबाजी सिवदेऊ सोनटके कारकून लिहिणार निाा दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी गाउकुलकर्णी ताा मजकूर या हरदोजणामधे गरगसा होऊन ताा मजकूरची विलायत खराब जाली हरदोजणाचा गरगसा होण्याचे कारण जे बाबाजी सिवदेऊ याणी मतलबानी खोटाई करून ताा उत्रोलीचे देशकुलकर्णाचे वतन आपल्यास असावे जेध्यानी देशमुखी पेशजी खोपडे यापासून निमे घेतली त्याप्रमाणे गरगसा आपण केला असता आपणास हि वतन मिळेल याजकरिता उत्रोली तर्फेचे देशकुलकर्ण आपले ह्मणून कोठे कोठे महजराबर खोटाईने बिकलम घालून गरगसा मांडला याजमुळे दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी गाउकुलकर्णी ताा मजकूर याणी फिर्याद वजारतमाह सीवाजीराजे फरजंद शाहाजीराजे व हमशाही देशमुख व माघळानिहाये या हुजूर उभा राहिला आणि बोलिला जे माझे वतन सदरहू माहालचे असता बाबाजी सिवदेऊ माझा चाकर खोटाईने आपले देशकुलकर्ण उत्रोली तर्फेचे ह्मणून कोठे कोठे बिकलम आपले घातले आहे त्यास त्याजला आणून चौकसी करून त्याजपासी खोटपत्र घेऊन माझे वतन मजला बाहाल करून दिल्हे पाहिजे त्याजवरून बाबाजी सिवदेव यास राजे मशारनिले यानी नेऊन चौकसी केली तो दाद प्रभुचे वतन असता बाबाजीने खोटाईने बिकलम घातले हे लागू जाल्यावरून त्याजपासून खोटपत्र राजे यानी लिहून घेऊन हरदुजणा दाद प्रभूस किले मजकुरी पाठविले जे दाद प्रभु हा नरस प्रभु याचा

फरजंद त्याचे गोत्र पुरुशगुप्त भानजी प्रभु धाकटे भाऊ याचा + + वेलवंडखोरियातून पेशजी सिरवलास नजराणा लाऊन दोन्ही वतनास आधिकारी करून नरस प्रभु हा भानजी देशपांडे चे भाउ सबब फरजंद देशकाचे वकील मजकूरचे साक्षीने पेशजी जाला त्याचे कागद दखल जाले दादाजी नरस प्रभु दोन्ही खोरियाचा वतनदार खरा बाबाजी सिवदेऊ खोटा जाला येविसीची चौकसी राजे याणी हि केली वकील मजकुरी हि देसक मेलऊन चौकसी पाहिली तो दादाजी नरस प्रभु देसकुलकर्णी गावकुलकर्णी दुतर्फा किलेमजकूर ताा वेलवंडखोरे येथील वतनदार मलिक + + + + + कारकिर्दीपासून व पेशजीपासून नरस प्रभूचा फरजंद ठरून वतन अनुभवी + + + + + जावे तेणेप्रमाणे मनास + + + + + + + + यास महजर करून दिल्हा असे + + + + + + + + + + + + + + + महजर तारीख २५ जिलकाद बिहुजूर हजीरमजालसी किले रोहिडा + + + + + सलास खमसैन अलफ

हवलदार व कारकून

| | |
|---|---|
| माा अनाम नरसो धोंडदेऊजी हवलदार | माा जानो त्रिमल मजमदार |

फारशी

| | |
|---|---|
| नरसो नारायण सरनोबत | कृष्णो अपाजी हेजिब |
| रावजी सावजी सबनीस | जानो विठल चिटनीस व कारखानीस |
| कृष्णाजी वामन अज्याहत सबनीस | |

सरगुरो बाजे नाईक नाइकवाडी

| | |
|---|---|
| नकलखान अतशखान सरगुरो | विस्वासराऊ धोंडजी नाईक सरगुरो |
| रामराऊ त्रिमलराऊ नाइकवाडी | |

साबाजी नाइक नाइकवाडी

जानजी नरसिंगराव नाइकवाडी

जानोजी गंभीरराऊ नाइकवाडी

देसकानी

कान्होजी नाईक जेधे देशमुख तर्फ भोर

१

बिरोजी पाा काा भोर

१

बापूजी व रामजी धाडे मोा मौजे चिखलगाऊ

१

येसजी खोपडा मोा मौजे अंबेघर

१

बापूजी व कृष्णाजी मोा मौजे पोमलवाडी

१

रावोजी व कोंडजी मोा मौजे चिखलवड

१

कान्होजी चव्हाण व सोनजी भोरपी मोा मौजे वनवडी

१

राघोजी पाा मौजे सिरवली

१

केदारजी बिन नरसोजी नाईक खोपडे देशमुख ताा उत्रोली

१

खंडोजी बिन धर्माजी नाा खोपडे देशमुख ताा उत्रोली

१

दाद पाा व दाउजी पाा कसबे उत्रोली

१

लखजी व अपाजी सावला मोा मौजे नेरे

१

तुळाजी पाा मौजे खानापूर

१

येसजी पाा व मावजी पाा मौजे वडगाऊ

१

पिलाजी व हसाजी झासला मोा मौजे पलसोरी

१

कृष्णाजी व सभाजी पाा मौजे बेलवडी

१

अर्जोजी पाा मौजे पानवहल

१

बालोजी व नाइकजी कुहाले
पाा मो मौजे करंजीये

१

जानोजी अंबवला मो मौजे
करनवडे

१

अपाजी सडबार मो मौजे
वावेघर

१

बाबाजी तुपा मो मौजे
ह्याकोसी

१

कान्होजी व रामोजी मो
मौजे वडतुंबी

१

तुळाजी पाा मौजे कोरले

१

येसजी माळुसरा मौजे तिटेघर

१

सेकोजी व कानोजी

१

+ + + + +

+ + + + +

१

रामजी पाा मौजे भांब्रवडी

१

बापूजी व जावजी मो
मौजे बतनोसी

१

कोंडजी व तुकाजी कासार
मो मौजे पाळे

१

कमाजी व बऱ्हाजी पाा
मौजे वरोडी बुाा

१

कानोजी भिलारा मो
मौजे डायेमुख

१

हिरोजी मो मौजे
वरोडी खुर्द

१

रायाजी पाा मौजे + +

१

बालोजी राऊत मो मौजे
वरोडी खुर्द

१

दादजी पाा मो मौजे गोळवडी

१

सेट्या व महाजन

.......................... ..........................

.......................... ..........................

बलुते

मल्हारभट बिन रुद्रभट ह्मसवड जोसी ता। उत्रोली

१

गोविंद जोसी का। उत्रोली

१

| | |
|---|---|
| ....धोबी ता। भोर | विठल महाला हजाम ता। उत्रोली |
| १ | १ |
| ....नाक बिन कमलनाक ता। भोर | काननाक बिन कमलनाक ता। उत्रोली |
| १ | १ |

---

**लेखांक ३०८** **श्री**

यादि बापूजी रामचंद्र कुळकर्णी देहाय ता। भोर तपे रोहिड-खोरे सुा। सलास सलासीन मया तैन व अलफ शके १७५४ नंदन-नाम संवत्सरे फाल्गुन वद्य ६

१ आमचे तीर्थरूप रामाजी कृष्ण व चुलते चिटको यशवंत हे पेशवे याजबराबर पाणपतास गेले तेथे तीर्थरूप गर्दीत गेले व चुलते तिकडे च होते मागे आह्मी लाहान आपले अजीचे माहेर मौजे मुगाव ता। मोसेखोरे येथे होतो गावी आमचा जानु सुर्वा व खंडु सिदा गुरेसुधा होता इनामाची व दुमाल्याची चाकरीसुधा वहिवाट करीत होता त्याजला गावकरी यानी दाबून इनामाचे व दुमाल्याचे बाद पडावले राहू दिल्हे नाहीत पुढे काही वर्षानी हिंदुस्तानातून चुलते परत घरी आले वगैर

---

**लेखांक ३०९** **श्री**

राजश्री त्रिंबकराव बांदल गोसावी यांसि

६) अखंडितलक्ष्मीआलंकृतराजमान्य श्रो फतेसिंग भोसले राम-

राम सुहूर सन इसन्ने सलासीन मया व अलफ राजश्री कृष्णाजी प्रभु हे मौजे कर्जे ताा रोहिडखोरे येथे राहातात त्यासि माारनिले घर बांधीत आहेत त्यास राजश्री राणोजी नाईक याणी हि माने केले आहे की याचे घराचे साहित्य करावे तरी तुह्मी हि यासि सांगोन वासे पाचसे देवऊन याचे घर होये ते करवणे याचे सर्वप्रकारे अगत्य आहे जाणिजे छ २६ रमजान बहुत काय लिहिणे

लेखना
वधि मुद्रा

श्री शिव शंभु
स्वामिनि शाहू भूपे
च पार्थिवोत्तंसे ॥ परि
णतचेतोवृत्तेः फते
सिंहस्य मुद्रेयं

---

लेखांक ३१०

श्रीशंकर

० श्री ~
शाहूभूपतिनि
छस्य पर्सोजी तनु
जन्मन कान्होजी
भोसलस्येयं भा
ति मुद्रा य
शस्करी

राजश्री जगोजी जाधव गोसावी यासि

अखंडितलक्ष्मीआलंकृतराजमान्य स्नेहांकित कान्होजी भोसले सेनासाहेब सुभा जोहार उपरी येथील क्षेम जाणून तुह्मी आपले क्षेम लिहित जाणे यानंतर बहुत दिवस तुमचे पत्र येऊन वर्तमान अवगत होत नाही तर सदैव पत्र पाठवित असले पाहिजे विशेष राजश्री फत्तेसिंग भोसले व राजश्री नीळ प्रभू याची पत्रे आह्मास आली होती त्याची उत्तरे जासूद देऊन पाठविली आहेत त्यावरून कळो येईल तुह्मी त्यास सांगोन फौजेसहवर्तमान या प्रांते येत ऐसे

करणे आपले हरघडी वर्तमान लिहित जाणे रा छ ७ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती

मोर्तब सुद

---

लेखांक ३११ श्री

वंशावळ देशकुलकर्णी ता रोहिडखोरे

मूळपुरुष

वडिल

१ वडिल भिक प्रभु

भिक प्रभूचा पुत्र

१ हर प्रभु हर प्रभूचा

१ पुत्र बाल प्रभु बाल

१ प्रभूचा पुत्र भान प्रभु

भान प्रभूचा पुत्र

१ जाऊ प्रभु जाव प्रभूचा

१ पुत्र साव प्रभु साव प्रभूचा पुत्र

१ नरस प्रभु नरस प्रभूचा पुत्र

१ दाद प्रभु दत्त पुरुष दादा प्रभूचे पुत्र कृष्णाजी

१ व एसाजी प्रभु

---

९

---

लेखांक ३१२ श्री

राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति गोसावी यांसि

ॐ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री हिंदुराऊ घोरपडे ममलमतमदार जोहार विनती येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे यानंतर कसबे कागलचे

तटापैकी खा दारूगोळी गुा कोनेरी कोमटी यास रुा ५०० पांच सें रास देविले असेती अगत्य जाणून प्रविष्ट केले पाहिजे विशेष काय लिहिणे छ जमादिलावल

| लेखन मर्यादा |
|---|

| श्रीराजारामचरणोत्पत्तेर्मालोजी घोर्पदेः॥सुतस्यध्वजे मुद्रा षण्मुखस्येव राजते |
|---|

---

**लेखांक ३१३ श्री १६३४ ज्येष्ट वद्य ३**

राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति गोसावी यांसि

॥ सकलगुणालकरणअखंडितलक्षमिअलकृत राजमान्य श्नो हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार जोहार विनती उपरी राजश्री पिराजी घाटगे देसाई पा मांगल याचे ऐवजी रुपये

| सरदेसमुखीकडे | घेणे रद कर्ज रा तिमाजी नाईक |
|---|---|
| ८००० | ८००० |

७००० एकंदर देणे

१००० तकसीम पैकी

| श्रीराजारामचरणोत्पत्तेर्मालोजी घोर्पदेः॥ सुतस्य ध्वजे मुद्रा षण्मुखस्येव राजते |
|---|

देविले आहेत त्यास सरदेसमुखी आठ हजार श्री स्वामीकडे पावते करविले पाहिजेत व कर्जाचे कर्जदारास दिजे सन सलास असर मया छ १७ जमादिलावल विशेष काय लिहिणे हे वीनती

| लेखन मर्यादा |
|---|

---

**लेखांक ३१४ श्रीगणेशायनमाः**

राजश्री खंडेराव बापूजी सुभेदार सरदेसमुखी सुभा सातारा गोसावी यांसि

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो केदारजी मसरकर

अजहत सरदेसमुख रामराम सुा सीत अर्बैन मया अलफ बदल देणे राजश्री बाबूराव दिवाण यास रुपये २५ पंचवीसाचा गला बार सेरी बारुले मापे दिवाण निर्खप्रमाणे देविला असे आदा करून पावलियाचे कबज घेणे छ २२ माहे सफर बहुत काय लिहिणें हे विनंती

| लेख नावधि | बार | स्वस्तिश्री सुखदा मुद्रा प्रतापोत्कर्ष वर्धिनी ॥ सरदेश मुखस्यैषा शाहु राजस्य राजते |
|---|---|---|

---

**लेखांक ३१५** **श्री** **१६०८**

नकल

(चिन्ह) मो आनाम दादाजी नरस प्रभु देशकुलकर्णी ताा भोर व ताा उत्रोली तपे रोहिडखोरे यासि शंकराजी नारायण सचिव सुा सबा समानीन अलफ राजश्री स्वामींची आज्ञा माहालोमाहालची जफ्ती हकलाजिमा व इनामती व इसाफतीची जाली तेणेप्रमाणे तुमचे वतनाची हरदू खोरियाचे गावगनाची जाली असता तर्फ मजकूरचा वसूल घेतला हे विदित जाले या कामास स्वार पाठविले आहेत यास मसाला रुपये २५ आदा करणे जाणिजे छ २५ मोर्तब* असे

रुजु सुद बार

---

**लेखांक ३१६** **श्री**

राजश्रियाविराजित राजश्री दादाजी नरसीह स्वामी गोसावी यासि

पोष्य खंडो बलाळ दंडवत प्रा उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे यानंतर तुह्मी पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कळो आले रा येसाजी प्रभु आले याणी साकल्य सांगितले ऐशास

---

* नकल गचाळ केलेली आहे. महिना दिला नाहीं. पत्र विश्वसनीय असेल किंवा नसेल. अस्सल मिळाल्याशिवाय खात्री होत नाहीं.

प्रस्तुत रा कृष्णाजी प्रभु स्वारीस गेले आहेत ते आल्याउपरी तुमच्या त्याच्या विचारे जो निर्वाह करणे तो केला जाईल आपले समाधान असो देणे बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनती

---

**लेखांक ३१७** श्री **१६३६ माघ शुद्ध ७**

राजश्री मताजी सर्जाराव जेधे गो॥

ᘒ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो॥ खंडो बलाळ रामराम सु॥ खमस अशर मया अलफ तुह्मी पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कळो आले रा दादाजी नरसी याचे कुलकर्णाचे वतनी गाव व सेत व घरठाव त्याचे स्वाधीन केले ह्मणून लिहिले त्यावरून समाधान जाले ऐसियास तुह्मी जे गोष्टी केली ते उचित केली आजिपर्यंत यास आह्मी जतन केले हाली तुमचे पदरी घातले आहेत सर्वप्रकारें चालवायास अंतर न करणे जाणिजे छ ७ सफर बहुत काय लिहिणे

बाळाजी प्रभु पु
त्रस्य खंडराजस्य धी
मतः॥ मुद्रा सर्व गुणो
पेता राजसन्मा
नवर्धिनी

राजते
लेखना
वधि

---

**लेखांक ३१८** श्री

राजश्री रायाजी जाधव गोसावी यासि

ᘒ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो॥ खंडो बलाळ रामराम उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे यानंतर रा सेनापतीनी आह्मास तुह्माकडे २५० अडीच से रुपयाची वरात दिल्ही प्रस्तुत स्वारीहून आले आहा याकरिता तुळाजी निकम पाठविला आहे तरी

तुह्मी सदरहू अडीच से रुपये याचे पदरी घालून पाठऊन देणे अनमान न करणे जाणिजे बहुत काय लिहिणे

बाळाजीप्रभुपुत्रस्य खंडराजस्य धीमतः ॥मुद्रा सर्वगुणोपेता राजसन्मानवर्धिनी

राजते लेखनावधि

---

लेखांक ३१९ श्री

यादि वंशावळ देशमुख जेधे का। भोर तर्फ रोहिडखोरे

१ वडिल खेलोजी जेधे
१ खेलोजीचा पुत्र भानजी
१ भानजीचा पुत्र कान्होजी
१ कान्होजीचा पुत्र नाइकजी
१ नाइकजीचा पुत्र कान्होजी
१ कान्होजीचा पुत्र बाजी
१ बाजीचा पुत्र मताजी
१ मताजीचा पुत्र नागोजी
१ नागोजीचा पुत्र बाजी
१ बाजीचा पुत्र आनंदराव
१ आनंदरावाचा पुत्र नागोजी व हरजी
१ नागोजीचा पुत्र कान्होजी

---

लेखांक ३२०

श्री

श्री
राजा शाहुचर
णी तत्पर सेनाप
ति मानसिंग मो
रे निरंतर

राजश्री मताजी सर्जाराऊ जेधे गोसावी यासि

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मानसिंग मोरे सेनापति रामराम विनती उपरी राजश्री कृष्णाजी दादाजी वतंदार वतनानिमित्य तुह्माजवळी आहेत ऐसियासि पोटानिमित्य सेवा आह्मापासि करिताती ऐसे असतां तुह्मी यांच्या वतनाचा हि कथळा वारीत नाहीत आणि घराचे हि विषई घसघस करितां तर हे गोस्टी उतम नाही सर्वस्वे यांचे साहित्य करणे आणि समाधानपूर्वक राहाणे नाहीतर दूरवर लांबे ते न करणे जाणिजे छ १४ रजब

मोर्तब
सुद

---

लेखांक ३२१

श्री

राजश्री मताजी सर्जाराऊ जेधे देसमुख ता।
रोहिडखोरे गोसावी यास

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मानसिंग मोरे सेनापति रामराम उपरी येथील क्षेम जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे यानंतर तुह्मी पत्र पाठविले ते पावले लिहिला अभिप्राय कलों आला रा। नागोजी जेधे आपणाजवळी चाकरी करीत असता येथे चौथाई व हकाची निजाईचा वसूल आपणाजवळून घेताती ऐसियास प्रसंगी रदबदल करून दोनी सनदा घेऊन पाठऊन दिल्या पाहिजेत ह्मणून कितेक विस्तारे लिहिले तरी राजश्री स्वामीची व आमची कालि बुधवारी भेटी जालियाउपरी त्या गोष्टीचा प्रसंग एक दोन दिव-

सात करून पाठऊन देऊन तोवरी तुह्मी वसूल एकंदर न देणे रा दादाजी प्रभु ह्मातारपणी तुह्माजवळी आले आहेत त्याच्या सांभा (ळा)-स अंतराये न करणे बहुत काय लिहिणे कृपा असो दिजे हे विनती

श्री
राजा शाहु चर
णी तत्पर सेनाप
ति मानसिंग मो
रे तत्पर

मोर्तब
सुद

---

**लेखांक ३२२** श्री

राजश्री दादाजी प्रभु गोसावी यासि

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मानसिंग मोरे सेनापति रामराम उपरी तुह्मी पत्र पाठविले प्रविष्ट होऊन वर्तमान कळो आले कृतीस आलेत उतम गोष्ट केली तुमचेविशी रा मताजी सर्जाराऊ यास हि लिहिले आहे कृष्णाजी प्रभु आह्मापासी आहेत राजश्रीचे दर्शन जाले याउपरी तुमचे साह्यतेचा जो विचार असेल तो केला जाईल आपले समाधान असो देणे जाणिजे छ १७ सवाल हे विनती

श्री
राजा शाहुचर
णी तत्पर सेनाप
ति मानसिंग मो
रे निरंतर

मोर्तब
सूद

---

**लेखांक ३२३** श्री

छत्रपति

अर्जी चरणरज रंगो बापूजी चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना ऐसी जेः- मजकडून चाकरी अवल इंग्रजींत राजकारणी झाली ती तपसीलवार विनंति माहाराजाचे चरणी श्रुत व्हावयास लिहिली आहे.

स्वामी माहाराजानीं मनन केली पाहिजे. शके १७३६ या सालांत श्रीस्वामी चाफळाहून बोरगांवास श्रीमंत राजश्री मल्हारराव दादासाहेब व बाळासाहेब चिटणीस यांचे भेटीस आले. नंतर विचार, केला कीं, श्रीमन्महाराज राजश्री स्वामी यांस बाजीराव रघुनाथ प्रधान याणी किले सातारा येथें ठेऊन बंदोबस्तास काशीपंत बापरे वगैरे ठेविले आहेत, तेथें अडचण फार आहे, परंतु कांहीं राजकारण इंग्रजबहादूर यांजकडून अलिपष्टन साहेब पुण्यांत वकीलीचे कामावर आहेत त्यांजकडे प्रवेश करून हा सविस्तर मजकूर कळवून कांहीं उपयोग होई आणि महाराजास मोकळे करून देऊन दौलत सर्व हातास येई ऐसी तजवीज करावी. मग श्रीस्वामीनीं श्रीदेवास प्रार्थना करून, मसलत करावी सिद्ध होईल असें ठरून, त्रिवर्गांनीं ( रंगोपंत, दादाजी ) विचार करून, मला पुण्यास पाठवावें असा विचार करून तीर्थरूप श्रीस्वामींनीं मला अनुग्रह देऊन, पायावर हात ठेऊन घेऊन, ही चाकरी सांगितली त्या काळीं मी विनंति केली कीं, माझें वतन ता। रोहिडखोरें एथील देशकुळकर्णाचे वगैरे पेशजी कैलासवासी राजाराम-साहेब महाराज यांचे कारकीर्दीस जबरदस्तीनें सचिवपंत याणीं घेतलें व गांवकुलकर्ण लोहकर वगैरे गुमस्ते याणीं घेतलें, त्याजबदल तंटा कैलास-वासी शाहूमहाराजाचे कारकीर्दीत जाहाला, ते वेळीचीं कागदपत्रें वगैरे साधनी कांहीं कागद मजजवळ आहेत ते पाहावे, माझे वडील दत्तक दादाजी प्रभु. नरसप्रभु देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी ता। मा। याणी गोत्रपुरुष ता। वेळवंडखोरें एथील दादाजी प्रभु आणून, चौघाचे साक्षीनें, दत्तक घेतला. पुढें दादाजी प्रभु वतनाचा भोगवटा करीत असतां सचिवपं-तानीं जबरीनें अफलादीचा वंश ह्मणोन कागद लेहून घेऊन वतन घेतलें. तरी या मसलतीस यश आल्यावर माझें वतन मज मिळावें. या वतनानिमित्य रामाजीबावा, माझे आजे, पेशवे यांजकडे फिर्याद गेले. ते वेळीं पाणपतावर जावयास निघाले. ते काळीं त्यानीं सांगितलें कीं, तुह्मी बराबर चलावें, ही मसलत जालियावर तुमचें वतन पंताकडून

देववूं. पुढें पाणपतावर तिकडे च गर्दीत मारले गेले. पुढें वाद तसा च राहिला. सचिवपंत जबरदस्त, विलाज चालत नाहीं. त्यास हालीं आपण मनावर घेऊन वतन देवावें. बरें बोलून वचन दिल्हें कीं, तुझें वतन माहाराज खालीं एऊन राज्य करूं लागल्यावर सोडून देऊं. तों इतक्यांत पुण्याहून चिंतोपंत देशमुख, पेशवे यांचे कारभारी, यांचें पत्र चिटणिसांस बोरगावीं आलें कीं वाडीकर सांवंत यांचें बोलणें इंग्रज याजपासीं पडलें आहे कीं, आह्मी चाकर पेशव्यांचे नव्हे, आमची दौलत निराळी, त्यास त्याचे साधनी कागद असतील ते घेऊन यावे, एविसी परवानगी श्रीमंत यांची आहे. त्यावरून दादासाहेब निघून पुण्यास गेले. बरोबर मला हि नेलें. तेथें जाऊन देशमुखाकडून श्रीमंतांची भेटी घेतली. वाडीकर सांवतांचा तहनामा दाखविला. नंतर श्रीमंतांनीं बडेसाहेबांस दाखविला. त्याणीं विचारिलें कीं, आजपावेतों हा कागद निघाला नाहीं, हालीं कोठून निघाला. मग त्याणीं सांगितलें कीं, माहाराजाकडील चिटणीस याजपासी होता तो त्याजकडून आणविला. नंतर हा मजकूर चिंतोपंत रावजी देशमुख याजपासी कळला तो सविस्तर चिटणीसापासीं सांगितला. नंतर साहेबाची भेट होऊन वोळख करावी ही तजवीज देशमुख याजपासी विचारिली. त्याणीं सांगितलें कीं, बाबाजी आंगरे याजकडील कारभारी यांचे येथें साहेबाचा येण्याचा पाठ आहे व बाळाजीपंत नातू हि त्यांजकडे च आहेत. नंतर बाबाजी आंगरे याजकडे च जाऊन त्यासी विचार करून साहेबाची भेट घेतली. तेथें मला बरोबर नेऊन, आंगरे याजकडील कारभारी यास न कळतां, साहेबाची रुजुवात करून दिल्ही. साहेबांनीं विचारिलें कीं, माहाराजसरकारांनीं पेशव्यांस दौलत कशी दिल्ही व कोण्ही कोण्ही दौलतदार वगैरे महाराजापासी राहून चाकरी कसी केली हें सविस्तर आह्मांस कसें कळेल ? नंतर चिटणिसांनीं सांगितलें कीं, साहेबानीं हा मजकूर श्रीमंतांस विचारावा, मग त्याणीं आह्मास सांगितल्यावर सविस्तर मजकूर कैलासवासी शिवाजी महाराज यांचे कारकीर्दीपासून प्रकर्णें लिहून

त्यांस देऊं. नंतर साहेब यानीं श्रीमंतांस हा मजकूर विचारून, बखर लिहून आणवावी, सांगितलें. त्याजवरून पुणे मुक्कामीं च दादासाहेब चिटणिसांनीं बखर तयार करून दिल्ही. त्या निमित्य त्यानीं मला गारपिरावर बंगल्यास पाठविले. निरोप सांगितला कीं पेशवे यांजकडून महाराजास किल्यावर फार अडचण होती, ते धणी व बाजीराव हे महाराजाचे चाकर असतां असें होतें. तों त्याणीं सांगितलें कीं, हें राजकारण तुह्मीं महाराजास कळवून करतां किंवा कसें ? मग परत मीं चिटणिसांस सांगितलें. त्यांनीं सांगून पाठविलें कीं, महाराजास किल्यावर फार अडचण, त्यांचें दर्शन होणें फार कठिण आहे. त्याजवर साहेबांनीं सांगितलें कीं, हर प्रयत्नें त्यांस कळवून करणें तें करावें. नंतर दादासाहेब चिटणीस जैतापुरीं एऊन, तीर्थरूप श्रीस्वामीस बोलावणे चाफळास पाठऊन, आणविलें. जाला मजकूर सांगितला. मग विचार करून राजश्री रंगोपंतदादा यांस पाठवून राजश्री विठलपंत बाबा व दाजीबा उपाध्ये व सेटिबा देवपूजे यांचा विचार घेऊन, किल्यावर जाणार येणार कोण याची माहिती पुसून, ताल्या नारोळकर वैद्य व कृष्णाबाई व नरसू काकडे व खंडेराव महाराजे शिर्के, असे जातात येतात कळलें. त्यासी बोलून सिद्धांत केला आणि एक निरोप सदरहू राजकारण इंग्रजाकडे करितो असा ताल्या नारोळकर याजबरोबर किल्यावर सरकाराकडे पाठविला आणि सदरहू सातार मुकामी मंडिळीची वोळख रंगो बापूजीस जाली पाहिजे ह्मणोन रंगोपंत दादास बरोबर घेऊन सदरहू मंडळीची रुजवात करून दिल्ही आणि दाजीबा उपाध्ये व ताल्या नारोळकर याजपासी सांगितले की रंगोबा उद्या पाठवितो तुह्मी आज संध्याकाळी किल्यावर जाऊन सदरहू मजकूराची सूचना माहाराजास करून ठेवावी आणि माहाराजाचे हतची चिठी रंगोबापासी साहेबास वोळख पटण्यास द्यावी अशी तजवीज करावी सांगून रंगोपंत परत गेले रंगोबास फार असे बोलले मला श्रीस्वामींनी आपली झोळी देऊन गोसावी करून चिठी द्यावी अशी चिठी लिहून दिल्ही ती चिठी मी सातारे-

यात येऊन श्री मंगलाईचे देवीचे दर्शनास जातो ह्मणून मजकुरी किल्या-
वर चौकीदारास सांगून गेलो तेथे चिठी तात्या उपाध्ये नारोळकर
याजपासी दिल्ही नंतर माहाराजापासून सरकार चिठी त्याणी आणून
मजपासी दिल्ही ती चिठी खाली येण्याबद्दल पायास कुतरे चावले
असा बाहाणा करून पायास भोक पाडून जखम करून रक्त न पुस-
ता व ता‍ा चुना लाऊन काही झाडपाल्याची पेंड पायावर बांधून ती
चिठी खाली आणीत असतां कासीपंत बेदरशहराहून किल्यावर येता
तो माझी दरवाज्यास गाठ पडली त्याणी दरवाजेवाले यास शिव्या-
गाळी देऊन हा गोसावी कोठून आला आणि कोठे जातो विचारून
झाडा घेऊ बोलला की हा फितुरी आहे गोसावी नव्हे बोलून पाहऱ्यात
ठेविले आणि वरत गेले तेथे जाऊन कारकून पाठऊन झाडा आणखी
आपले रुबरु घेतला आसतां पुन्हा घेऊन जरब लाऊन चौकसी केली
नंतर डोलच्या वाड्यात पाठविले तेथे हि चौकशी केली परंतु काही
ठिकाण लागले नाही सबब चिंचेच्या फोका आणून मारतो बोलून बेडी
हि आणू अशी जरब दिल्ही परंतु कोणाचे नाव न घेता काही कबूल
जाला नाही तो हे वर्तमान जैतापुरास राजश्री विठलपंत बाबाजीस
सांगून पाठविले वर्तमान कळता च श्री स्वामी व चिटणीस व रंगोपंत
दादा स्नान भोजन टाकून दोन दिवस एक जाग्यास विचार करीत
बसले तो येथे मी काहीच ठिकाण लागू न देता पाहऱ्यात होतो मग
दुसरे दिवशी गोसावी भिकारी याजपासी काही नाही वेडा आहे ह्मणोन
सोडून दिल्हे नंतर मी माहुलीहून जरांड्याचे डोंगराकडून संध्याकाळी
जैतापुरी रात्री जाऊन स्वामीस व चिटणीसास व रंगोपंतास भेटलो
नंतर स्वामीनी मला पोटासी धरून नेत्रातून पाणी आंगावर टाकिले
फार श्रमी सर्वत्र जाहले आणि बोलिले की आज कासीपंतानी चिंचे-
च्या फोका व बेडी वगैरे जरब देणे ती दिल्ही परंतु तू कोणाचे नाव
न घेता सर्वांचा बचाव केलास व माहाराजाची हातची चिठी पायाचे
मणगटास बांधून आपली ही गोष्ट श्रीनी मोठी केली बर माहाराजाचे

पायास तू मळ लाविला नाहीस मोठे संकटातून पार पाडिलेस नाही- पेक्षा प्राण चिटणीसानी व आह्मी व ज्याची नावे कळती त्याणी देणे आला होता विठलपंतबाबा इत्यादि तू आज बाचविलेस बोलून ये वेळेस बक्षिस तुला काय द्यावे बोलले मग मी उत्तर केले की मला वतन सचिवपंताकडून घेऊन देतो ह्मणोन पेशजी वचन दिल्हे ते सोडून देण्याचे वचन आपण व चिटणीस व बाबाजी दिल्हे त्याप्रमाणे कार्य सिद्धि जाहलीयावर द्यावे नंतर श्रीस्वामीनी श्रीरामाची पुजा करतेवेळी शफत वाहून तुळसी देवावरी दिल्या आणि सांगितले की हे वचन आज माहाराजानी च दिल्हे असे समज हे वचन माहाराज चालवितील तुझे वतन हरप्रयत्न घेऊन देऊ बोलले व चिटणीसाकडून व बाबाकडून हि वचन रंगोपंत दादाचे साक्षीने देविले नंतर पुण्यास बडे साहेबाकडे पाठविले बाळाजीपंत नातू याजकडे जाऊन भेटले तेथे चिठीचा मजकूर कळऊ नये साहेबास मात्र कळवावा असे सांगितले होते साहेबाचा चपराशी वोळखीचा पेशजीचा होता त्याजकडून आधी साहेबास सांगितले की नातू गेल्यावर मागे मला ठेवावे मला मात बोलावयाची आहे सांगून ठेऊन मग बाळाजीपंत दादाबरोबर जाऊन गारपिरावर भेटलो आणि निरोप सांगितला की माहाराजास फार आडचण केली आहे ती किती सांगू बोलले मग साहेबास सांगितले चिटणीसास आमचा सलाम सांगावा आणि नातूस बोलले की तुह्मी जावे उठतेवेळेस बोलले आणि कारकून आला आहे तो येथे असू देणे तुह्मी जावे आमच्या खान्याची वेळ आहे त्याजवरून मला तेथे ठेऊन नातू गेले मग मला विचारले की काय बोलावयाचे आहे ते सांग नंतर चिठी पायातील सोडून मी काढून दाखविली साहेब बहुत खुप होऊन आछया किया बोलून नंतर किल्याचे दरवाज्यास धरले वगैरे जाला मजकूर सांगितला हा ऐकून बुकावर माझे नाव लिहून घेतले मजकूर ऐकून पाच मोहरा बक्षिस दिल्या जाणे ह्मणोन सांगितले मग मी बोलिलो की मी येथे आल्याची

वोळख मजपासी द्यावी बोलले नंतर त्याणी इंग्रजी आक्षराची चिठी लिहून दिल्ही आणि मतलब सांगितला कीं माहाराजांची चिठी पावली आमची आता खातरी जाहली बोलले व माहाराजाची चिठी हि मागितली ती परत दिल्ही आणि नातूस चिठीचा मजकूर न सांगावा त्यास भेटून जावे साहेब बोलले मग मी बोलले की त्यास सांगतो की साहेबानी विचारले की स्वामी हे कोण त्यास मी सांगितले की माहाराजाचे गुरु त्याणी ऐकून पादरी मात्र बोलले आणि टोपी डोईची काढून सलाम सांगितला चिटणिसास हि सांगितला व विठलपंत कोण हे विचारले नंतर मी सांगितले की ते फडणीस असे बोलतो साहेबानी ही ओळख बाळाजीपंतास देणे जाहल्यास द्यावी नंतर बहुत खुष जाहला आणि बोलला की माहाराज सबका धणी आहेत नंतर निरोप घेऊन ॰ ालो चिठ्या तेलात भिजऊन लाखेची गोळी पोकळ युक्तीने करून ती गोळी चुनाळात घालून खाली वर चुना बसवून मग बाळा॰ जीपंत दादाकडे गेलो त्याणी एकीकडे नेऊन विचारिले की साहेबानी आणखी काय तुला पुसिले मग सदरहू मजकूर सांगितला नंतर निरोप घेऊन येत असता शिरवळचे नदीवर आलो तो तेथे शिपाई याणी आडविले वाटसरु लोकांचे झाड्याबरोबर माझा हि झाडा घेऊ लागले ते वेळेस बाळाजी नातू याणी चिठी दिल्ही ती बटव्यात होती झाडा देतेवेळेस आधी जलदी करून तोंडात घातली तंबाखू खाल्याचा बाहाणा करून चिठी खाऊन झाडा दिल्हा तेथून निघोन भिकारीयाचे सोंग दाखऊन श्री माहादेवाकडून चाफळास श्रीस्वामी व दादासाहेब चिटणीस व रंगोपंत दादास भेटलो आणि चिठ्या स्वामीपासी देऊन तेथे दोन दिवस राहिलो नंतर स्वामींनी व चिटणीसानी चिठ्या ठेऊन घेऊन मला सदरहू मजकूर कळावा याकरिता राजश्री विठलपंतबाबाकडे पाठविले साताारियास बाबाचे घरी संध्याकाळी येऊन भेटलो सविस्तर जाहाला मजकूर सांगितला ऐकून संतोषी होऊन मला पोटासी धरले फार मेहनत केली बोलून जाला मजकूर सर्व माहाराजास कळ-

बाबा मी बोललो नंतर तात्या नारोळकर व दाजीबा उपाध्ये यास बोलाऊन आणून कचा मजकूर सांगून किल्यावर सरकाराकडे पाठविले नंतर त्याचे बरोबर माहाराजाची आज्ञा निरोप आला की चिटणीस वगैरे पुरातन सरकारपदरचे या समई सेवा करून दाखवावी परंतु आपला बचाव करून करणे ते करावे व स्वामीस ही विनंती करावी की श्रीची प्रार्थना करावी याप्रमाणे श्रीमत मातुश्री माईसाहेब व माहाराज बोलले कोबाड यासी पडला हे पेशजी केले च आसेल हाली आह्मापासी राजकारण प्रकर्णी काही कागद साधनी वगैरे होते ते कागद आह्मास आंदेशा येऊन सारे खोलीत एकीकडे बसून जाळून पाणी करून टाकिले अशी अडचण आहे तरी जपून अंगावर न येता सावधगिरीने जे करणे ते करावे तूर्त तुह्मास पुरा आश्रय हि तेथे कोणाचा नाही व ही मसलत सेवटास न्यावी सर्व दौलत स्वामीची च आहे ते जे कारितील ते आमचे कल्याणाचे च करतील हा भरंसा मला आहे सदरहू निरोप बाबापासी आला त्याणी सांगितला नंतर विठलपंतबावानी मला बोलाऊन सदरहू आज्ञा आली ती सांगून पुन्हा चार साहा घटका गेलियावर मी काय सांगितले ते मला पुन्हा तुह्मी सांगावे मग मी बाबानी सांगितल्याप्रमाणे सांगून बाबास मी बोललो की आपण मला आणखी एकवार सांगावे नंतर त्याणी सांगितले की मी सांगितल्याप्रमाणे आहे बातमी फार नाजूक जिवावरील आहे बहुत तजविजेने राहावे आणि लाहान माणसाची संगत असल्यास करू नये कारण माणूस स्नेह्यापासी बोलते त्यात ही गोष्ट निघाली ह्मणजे घात होईल नंतर मी विनंती केली की येविसी आपण सहसा काळजी करू नये प्राण जरी गेला तरी बोलणार नाही हा भरवसा आपणास बोलून दाखऊ तो काय आपण काही काळजी करू नये नंतर आमची खातरी जाहाली आहे परंतु आपण मात्र जपून राहावे काशीपंताची बातमी फार आहे किल्यावरून येणाराची बातमी ठेवितात मग मला बोलले सर्व पार करणार स्वामीचे पाय आहेत माहाराज राज्य करू

लागल्यावर तुझे वतन सोडून बंदोबस्त करीन ह्मणोन शफत कुलस्वामीची दिल्ही नंतर निरोप दिल्हा की चाफळास जाऊन सदरहू मजकूर श्रीस्वामीस व चिटणीसास सांगितले ऐकून बहुत संतोष जाहला नंतर पुन्हा दोन महिन्यानी मला पुण्यास पाठविले आणि साहेबास सांगावे की किल्यावर पेशवे याणी माहाराजास फार अडचण कारितात मोठे संकटात आहेत याचा विचार काय करावा नंतर साहेबास जाऊन सदरहू माार सांगितला त्यानंतर त्याणी चिठ्या पावल्याचा माार विचारून बोलले की बाजीराव साहेब याचा बिघाड तहप्रकर्णी पेशव्याकडून जाल्यावर माहाराजासी दोस्ती पुरी करणे किंवा कसे सांगणे ते सांगू बोलले नंतर बोलणे निसरडे पाहून मी उत्तर केले की अशा सांगण्यानी बचाव कसा होईल बंदोबस्त करून देतील हा भरवसा आह्मास फार आहे नंतर सांगितले की बाजीराव साहेब यानी तहाचा बिवाड करण्याचा इरादा तूर्त केला आहे बिघाड लौकर च होईल सांगावे फिकीर न करणे बोलून निरोप दिल्हा सदरहू निरोप स्वामीस व चिटणिसास व विठलपंतबाबास कळविला नंतर किल्यावर कृष्णाबाई व नारोळकर याजपासी सांगून पाठविला त्याचा निरोप पुन्हा आला नाही साा उपाध्य व नरसू काकडे याजसमागमे सरकारास सदरहू बातमी पावती करण्यास बाबानी सांगून मला परत जावे सांगितले मी परत गेलो दादासाहेब बाळासाहेब व चिटणीस पुण्यात च होते तो पुढे वैशाखमासी साहेब याणी पुण्याभवता पलटणचा वेढा दिला किले वगैरे घेतात असे दादासाहेबास कळले नंतर मजबरोबर साहेबास सांगून पाठविले की हाली बाजीरावसाहेबाचा व आपला बिघाड आला पुढे कसे करता त्याणी सांगितले की आह्मी किले वगैरे घेतले त्याची मुाा त्याणी केली आहे तुह्मी माहाराजास कळवावे नंतर मी सातारियात येऊन विठलपंतबाबास सदरहू माार सांगून किल्यावर बातमी पोचविण्यास फार अडचण आहे बाबानी सांगितले दाजी नारोळकर व नरसू काकडे याजपासून युक्तीने कळवितो बोलले मी निघून पुण्यास चिट-

णीसाकडे स्वामीची भेटी घेऊन गेलो तो पुढे काही दिवसानी बाजीरावसाहेब याणी बिघाड करून लढाई होऊन बाजीराव साहेब सासवडास गेले त्या संधीत बाळासाहेब चिटणीस बोरगावी गेले होते त्यास पत्र पाठऊन आणविले ते येण्याचे पुर्वी पेशव्याचा मोड जाला पुणे घेतले तेव्हा तेथे राहावे तो गोखले याचा निरोप चिटणीसास आला की तुह्मी निघोन माहुलीस येणे कागदपत्र घेऊन दादासाहेब डोणज्याचे खिंडीने सिंहगडाखालून माझे वराकडून दम खाऊन निघोन जैतापुरास आले नंतर प्रधानपंत हि माहुलीस आले नंतर माहाराजास वासोट्याचे किल्यावर नेणार कळले स्वामीस जैतापुराहून दादासाहेब माहुलीस आले तो माहाराजास किल्यावरून पेशव्यानी माहुलीस आणिले ते वेळी माहाराजाचे हातची हिऱ्याची आंगठी वाहोन गमावली असे वर्तमान कळले नंतर स्वामीची व माहाराजाची भेट होऊन पुढे माहुली मुकामाहून विचार करावा तो प्रसंग आला नाही स्वामी जैतापुरी च होते तो चिटणीसानी मजबरोबर निरोप पुण्यास साहेबाकडे पाठविला की माहाराजास वासोट्यास नेहणार कसे करावे व हाली तह बिघाड जाहला ह्मणजे बंदोबस्त करून माहाराजास राज्य द्यावे असा करार आहे या प्रसंगी साहेबानी बच्याव करून माहाराजास राज्य द्यावे आज आपण कराल ते होईल बोललो ह्मणून सदरहू निरोप जैतापुरी स्वामीकडे कळवावयास मुकुंदा जमलेकर याजबरोबर पाठऊन मी मला पुण्यास पाठविले मी बाळाजीपंत नातुकडे गेलो सदरहू मार बाळाजीपंतास सांगितला परंतु त्याणी साहेबास कळवितो बोलले बंगल्यास नेहले नाही मग मी दुसरे दिवसी बडेसाहेबाकडे जाऊन परभारे भेटलो त्याणी निरोप ऐकूण खुष होऊन सांगितले की आह्मी पलटणेसुधा माहुलीस येणार थोडके दिवसात बंदोबस्त होईल माहाराजापासी काही सरमजामाची जमेत असली असता बहुत उपयोग होईल याची तजवीज चिटणीसास सांगावी बोलले मी पुण्याहून

निघून रस्त्यानी येतो तो बाळासाहेब चिटणीस माहाराज सरकारची खुणेची आंगठी घेऊन बोलण्यास गेले ते निंबाच्या पारावर भेटले त्यास सविस्तर मजकूर सांगितले नंतर मी जातो बोलले सविस्तर मजकूर दादासाहेबास स्वामीस सांगावा ह्मणजे माहाराजास कळवितील बोलले व साहेबानी विचारले की माहाराजास च नेणार किंवा आणखी कोण्हास नेणार विचारले नंतर मी सांगितले की माहाराजास मातुश्री माईसाहेब व आपासाहेब माहाराज व भाऊसाहेब माहाराज राणीसाहेबासुधा नेणार माहुलीस सर्वत्र आणली आहेत अशी बातमी आहे आज उद्या रात्रौ नेणार बोलून मला पाच मोहरा दिल्या त्या आणून स्वामी व चिटणीस विठलपंत बाबापासी देऊन सदरहू निरोप माहाराजास विठलपंत याकडून कळविला पुढे नंतर माहाराजसरकारास प्रधान पंत घेऊन पंढरीस गेले त्या संधीत माझी प्रकृती बिघडली संधीवायु होऊन पाय सुजले सा। घरास गेलो नंतर बाजीराव साहेब गेले माहाराजसरकारास इंग्रजबाहादूर घेऊन आले त्याकाली श्रीस्वामी व चिटणीसास विठलपंतबाबास विनंती केली तो स्वामीनी आज्ञा केली की हे राजकारण मोठे याजकरिता तू दाहा वर्षे फार कोणापासी बोलू नये ह्मणोन पेशजी शफत घेतली होती ती विसरलास की काय स्थिर जाहल्यावर बंदोबस्त होईल बोलले नंतर याजकरिता कसे करावे विचारले बंदोबस्त होईल बोलले माहाराजास मुखत्यारी येण्यास पाच वर्षे पाहिजेत सांगितले व पाच वर्षानंतर माहाराज पाच वर्षे मुखत्यारीने वागू लागतील ते वेळी तुझा बंदोबस्त होईल बोलले हे भविष्य सांगितले होते च तो बडे साहेब करंज्याचे बागेत आले ते काली सर्वांचे ह्मणणे पडले की आह्मी राजकारण केले तेव्हा मी पुण्यास विश्वनाथराव याजबरोबर गेलो होतो तेथून मला चिटणीसानी आणविले आणि बडे साहेबापासी भेटविले ते काळी विठलपंत बाबा व आमात्यपंत व चिटणीस व बाळाजीपंत नातू आसे होते साहेबानी विचारले की तू चाकर कोणाचा मग मी उत्तर केले की

चाकर चिटणीसाचा चाकरी सरकारची केली आहे ते वेळी मी विनंती केली की माझा बंदोबस्त साहेबानी करून द्यावा ग्राट साहेब यास सांगितले की याणी चाकरी फार केली आहे याजकरिता बंदोबस्त द्यावा बोलले ते वेळी कोण्हाचे पोटात काय वाकडे आले न कळे माझे बोलणे कोण्ही बोलले नाहीत नंतर चिटणीसानी मला आकलकोटास पाठविले तो इकडे ग्राटसाहेब गेले पुढे दादासाहेब स्वामी विठलपंतबाबा वारले नंतर माझा प्रवेश हि जाहला नाही व स्वामीनी नेम हि दाहा वर्षाचा सांगितला हा सा विनंती केली नाही पुढे चिटणीस पंडित सुमंत याणी अकलकोटास सरकारात विनंती करून पार तेथे (जाणे मुंबईस गेले त्याचे फितुराचे कागद मी सरकारआज्ञेवरून धरिले) हि बंड जाले ते वेळी कागद धरिले हुकूम सरकारचा आला त्याप्रमाणे चाकरी केली बंडवाले याणी धरून कैद करून बेडी इत्यादि संस्कार केले हे संस्कार पेशजीचे राजकारणात हपत्याची बाकी राहिली होती ती जप्ते याणी केली तेथे चीजवस्त लुटली गेली त्यानी इजा केली परंतु दम न सोडिता पेशजी आपण राजकारणात वागलो स्वामीचे चरणप्रतापे धैर्य न सोडिता बंडवाले यासी जबाब दिल्हे ते काळी जानराव शिर्के इकडे च होते असा प्रसंग गुजरला हे सर्व सरकारास माहीत आहे च आणि गवताचे लिलाव बेरोजगारी भावानी घेतला असता तो च गुन्हा सिद्ध होऊन मला बरतर्फी दिल्ही (व पेशजी सुद्धा या गुन्ह्यात ) असो माझे वतन सोडून देऊन मजपासून माहाराजानी प्रायापासी चाकरी घ्यावी मी संकटसमई सेवा केली परंतु माझा जिर्णोद्धार जाहला नाही आकलकोट मुकामी श्रीमंत राजश्री बाळासाहेब चिटणीस पंडित सुमंत याणी विनंती पेशजीचे राजकारणाची केली त्यावेळी आज्ञा सरकारची जाहली की दुसरे यादीस याचे नाव लिहून ठेवावे ह्मणजे इनाम वगैरे मिळेल हुकूम जाहला व दाजीबा नारोळकर व कृष्णाबाई व दाजीबा उपाध्ये याची रुजुवात हि सरकारानी बळवंतराव बक्षी याजकडून करून

घेतली नंतर चाफळ मुा तीर्थरूप मातुश्री ताईसाहेब व रंगोपंत दादा व चिटणीस पंडित सुमंत हि बोलले बंदोबस्त करून देतो आज्ञा जाहली परंतु मी देव हि जे काही देत नाही व कचा मजकूर हि सरकारात कळला नाही साा ही अर्जी सरकारानी मनन करून वतन सोडून देऊन मला चरणापासी जागा देऊन चाकरी घ्यावी अकलकोटी धाकटे भावाचे लग्न जाले त्याजबद्दल कर्ज चारसे सवा चारसे जाहले आहे त्यास माझी चीजवस्त येणे त्यापैकी तीनसे रुपये साहेबानी दिल्हे बाकी येणे ते देण्याचा हुकूम जाहला पाहिजे मला नित्य मुजऱ्यास येण्याची परवानगी जाहली ह्मणजे संधी पाहून वतनप्रकर्णी विनंती हि करील मी चाकर सरकारसेवा करण्यास मजकडून अंतर होणार नाही परंतु मला ही दशा प्राप्त जाहली त्यातून काढून माझे संरक्षण करणार माहाराज समर्थ आहेत ही जिकीर सरकारास वाटेल परंतु जाले राजकारण कळले पाहिजे सबब विनंती लिहिली आहे हे प्रकर्ण बहुत दिवसाचे लिहिण्यात कमजास्त असल्यास माहाराजानी कृपा करावी कारण वेळेचे स्मरण बहुता दिवसामुळे राहिले नाही हाली कोण्ही माझे बोलणे बोलून बंदोबस्त करून देवितील असा भरंसा वाटत नाही सरकारनी च कृपा करून बंदोबस्त करून दिल्यास बंदोबस्त होईल नाहीपेक्षा दारिद्र्यानी व्यापिले आहे तरी स्वामीनी सेवा घ्यावी सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना मिा कार्तिक शुा ९ रोज सोमवार शके १७५३

माझी सरकारात वोळख सुद्धा नाही असे जाहले आहे माझे बोलणे स्वामीपासी कोण्ही बोलून बंदोबस्त करून देविवतील असा भरंसा वाटत नाही ह्मणोन विनंती लिहिली सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ती

---

**लेखांक ३२४** श्री

वंशावळ मूळपुरुष गोपाळ प्रभूच्या पेशजी कायस्त गोत्र कृपाचार्य उपनाम दिघे पाली उर्फ आमीनाबाद येथील वतन देशमुखीचे आनाथसिद्ध करीत होते त्याची स्त्री आनाबाई होती तिजला पुत्र २

| वडिल पुत्र मीठ प्रभु त्याची | दुसरा पुत्र जागेद प्रभु त्याची |
|---|---|
| १ | १ |
| स्त्री लक्ष्मी पासोन संतान पुत्र | स्त्री गंगा पासोन संतान पुत्र |
| १ वडिल पुत्र गोज प्रभु | १ वडिल पुत्र भुत् प्रभु |
| १ द्वितीय पुत्र पिल प्रभु | १ द्वितीय पुत्र आंबर प्रभु |
| १ तृतिय पुत्र तान प्रभु | १ तृतिय पुत्र जैत प्रभु गर्भ आंध |
| १ चतुर्थ माहादेव प्रभु | १ चतुर्थ कुक प्रभु |
| ४ | ४ |

सदरहू आठ पुत्र पालीस वतन देशमुखी करीत आसतां वतनसमंधे नागवणी घेतल्या व खून खराबी बहुत जाली याजमुळे कुटुंबसुद्धा परागंदा होऊन मौजे उबरडी ता। निजामपूर येथे येऊन राहिले त्याउपरी

१ वडिल पुत्र मिठ प्रभु ता। मोसेखोरे यांत येऊन देशकुलकर्णाचे गाव कुलकर्णाचे देहे सुमार ८४ मेळऊन राहिले

१ द्वितीय जागेद प्रभु उबरडी ता। निजामपूर येथे मृत्य पावले त्याची स्त्री गंगा त्यास पुत्र चौघे विभक्त जाले आपले हिमतीने पोट भरू लागले त्याची नावनिसी पुत्र

| | |
|---|---|
| १ वडिल भुत प्रभु | १ तृतिय जैत प्रभु गर्भांध |
| १ द्वितीय आंबर प्रभु | १ चतुर्थ कुक प्रभु |
| २ | २ |

तपसिल

वडिल पुत्र भुत प्रभु याणी ता। पौडखोरे येथील वतन देशकुलकर्ण व गावकुलकर्ण मेळऊन जाऊन तेथे राहिले पुत्र १ द्वितीय आंबर प्रभु याणी ता। मुठेखोरे येथील वतन देशकुलकर्ण व

१ तिसरा पुत्र जैत प्रभु गर्भांध होता मागे उबरडीस होता त्यास निराश्रित जाणोन भुत प्रभु वडिल भाऊ याणी आपले जवळ आणून त्याचे लग्न कराबयास शरीरसमंधाची व वत-

गावकुलकर्ण मेळविले जाऊन राहिले पुत्र

ना करिता आंधास कोण्ही सोइरिक देईना याजकारिता जैत प्रभूस दोन गावची कुलकर्णे देऊन त्याचे लग्न करून ठेविले गावकुलकर्णाचे

१ लागपौड ता। पौडखोरे
१ मौजे नांदेड ता। पौडखोरे
२

एकूण दोन गाव जैत प्रभु गर्भांध होता त्यास दिल्हे

चौथा पुत्र कुक प्रभु मौजे उंबरडी येथे निजामपूर राहिला

वडिल मिठ प्रभु याणी ता। मोसेखोरे येथील देशपाडे व कुलकर्ण मेळऊन राहिले वतन यास विस्तार वंश बि॥

वडिल पुत्र गोज प्रभु यास स्त्री कमलापासून पुत्रसंतान

१ वडिल कावजी प्रभु
१ दुसरा पुत्र बहिराजी प्रभूस पुत्रसंतान नाही
१ तिसरा रामप्रभूस पुत्रसंतान नाही
३

१ काऊ प्रभूस स्त्री रखमाबाई पासोन पुत्र माल प्रभूस स्त्री

द्वितीय पुत्र पिल प्रभु यास स्त्री आबाईपासोन पुत्र सोम प्रभु १ यास स्त्री बाईजीपासोन पुत्र

१ पिलाजीस संतान नाही
१ गोज प्रभूस स्त्रिया २
 ३ वडिल भागिर्थीपासोन
  १ रामाजी प्रभु
  १ पिलाजी प्रभु
  १ येसाजी प्रभु
  ३
२ दुसरी तुकाई पासोन

आबाईस पुत्र

१ वडिल काउजी प्रभु

१ दुसरा बावाजी प्रभु

१ तिसरा कृष्णाजी प्रभु

१ चौथा बापूजी प्रभु

४

१ काउजी प्रभूस स्त्री दिपाई पासोन पुत्र

१ लिंबाजी प्रभूस रामाजी पुढें संतान नाही

१ रामाजी प्रभु

१ जनाजी प्रभु

२

१ रामाजी प्रभु जनाजी प्रभूस चापाई व भागाईपासोन दौलतराऊस पुत्र

१ सुंदर प्रभु

१ निळाजी प्रभु

१ बहिराजीस संतान नाही

१ कावजी प्रभु

४

१ कृष्णाजीस पुत्र रखमाईपासोन पुत्र

१ गोविंद प्रभु

१ मलार प्रभूस संतान नाही

२

५

१ आऊजीस संतान नाही

१ रामाजी प्रभूस स्त्रिया २

२ वडिल जानकी पासोन

१ बापूजी प्रभु

१ कृष्णाजी प्रभु

२

२ लक्ष्मीपासून

१ आकाजी प्रभु

१ चिमाजी प्रभु

२

४

१ पिलाजी प्रभूस स्त्री तुकाईपासोन नारायण प्रभु पुढे संतान नाहीं

१ येसाजी प्रभूस स्त्री कासाईपासून पुढे नारायणजी प्रभूस संतान पुत्र

१ आंबराजी प्रभु

१ चिमाजी प्रभु

२

१ गोविंद प्रभूस स्त्री आबाईपासून

१ त्रिंबक प्रभूस स्त्रीपासून पुत्र भास्करजी पुढे संतान नाही
१ हरी प्रभु
१ विठल प्रभूस पुत्रसंतान नाही
३

१ हरी प्रभूस स्त्रिया २
२ थोरली भवानीपासून पुत्र
१ चिमणाजी प्रभु
१ दादाजीस संतान नाही
२

२ दुसरी गौतमीपासोन
१ रघुनाथ प्रभु
१ मल्हारजी प्रभु
२

४

१ गोविंद प्रभूस पुत्र मुकुंद बावाजी प्रभूस स्त्री येसाई पासून पुत्र
१ सिवाजी उर्फ माहादाजी प्रभूस संतान नाही
१ सकराजी प्रभूस स्त्री उमाई-पासून बाळाजी प्रभु पुढे संतान नाही
१ वाल्हा प्रभु संतान नाही
१ नरसी प्रभु
५

खंड प्रभु पुढे संतान नाही दुसरी स्त्री राधाई पासून पुत्र
१ मुरारजी प्रभु
१ मारोजी प्रभु
१ रघूजी प्रभु
१ संभाजी प्रभु
४

तान प्रभु मिठ प्रभूचा तिसरा पुत्र त्याची स्त्री राधाबाईपासून वैज-प्रभु त्याची स्त्री येसाईपासोन पुत्र
१ वाल्हो प्रभूस पुत्रसंतान नाही
१ मलार प्रभु
१ तान प्रभूस संतान नाही
१ रुपाजी प्रभु
१ नानाजी प्रभु
५

१ मलार प्रभूस स्त्री राजाईपासून पुत्र
१ खंड प्रभु
१ तान्हाजीस पुत्रसंतती नाही
१ वाल्हो प्रभु
३

१ रुपाजी प्रभूस स्त्री सिताई-पासून पुत्र

नरसोबावाजीस स्त्रिया २

१ वडील लक्ष्मीपासून येसाजी प्रभु

२ धाकटी सगुणापासून पुत्र

१ भैराळजी प्रभु

१ मल्हारजी प्रभु

२

३

१ बापूजी प्रभूस स्त्री गिरजाई-पासून पुत्र

१ खंड प्रभु संतान नाहीं

१ विसाजी प्रभु

१ गोविंद प्रभु

१ विठल प्रभूस संतान नाहीं

४

१ विसाजी प्रभूस स्त्री कासीपासून

१ बापूजी प्रभु

१ रघोजी प्रभु

२

१ बाजी प्रभूस संतान नाही

१ निमजी प्रभूस संतान नाही

२

१ नानाजी प्रभूस स्त्री सावित्री पासून पुत्र

१ बाळाजी प्रभूस संतान नाही

१ येसाजी प्रभूस संतान नाही

१ गणेश प्रभूस संतान नाही

३

१ खंडोजी प्रभूस स्त्री निवाईपासून

१ रामाजी प्रभु

१ विठल प्रभु

२

१ वाल्हो प्रभूस स्त्री सईपासून पुत्र

१ त्रिंबकजी प्रभु

१ मोरोजी प्रभूस संतान नाही

२

१ त्रिंबक प्रभूस स्त्री × × पुत्र

१ महिपतराव प्रभूस स्त्री××× पुत्र

१ रघुनाथ प्रभु स्त्रिया २ यास पुत्र

१ अमृतराव प्रभु

१ + + + +

१ + + + +

१ + + + +

---

माहादेव प्रभु मिठ प्रभूचा चौथा पुत्र त्याची स्त्री भानाई पासून संतान पुत्रविस्तार

१ वडिल अनंत प्रभु
१ दुसरा कुक प्रभु संतान नाही

---

२

१ अनंत प्रभूस स्त्री गोजाईपासून पुत्र

१ वडिल पुत्र भानजी प्रभु संतान नाही
२ बयाजी प्रभु
३ विठल प्रभु
४ रघुनाथ प्रभु

---

४

१ बयाजी प्रभूस स्त्री रखमाईपासून पुत्र संभाजी प्रभूस स्त्री सावित्रीपासून पुत्र

१ कासी प्रभु
१ रखमाजी प्रभु
१ बाजी प्रभु
१ अताजी प्रभु
१ आपाजी प्रभु

---

५

१ विठल प्रभूस स्त्री माणकाईपासून पुत्र

१ आताजी प्रभु
१ मोरोजी प्रभु
१ काकाजी प्रभु

१ वडिल भास्कर मोरेश्वर प्रभु यास स्त्री रखमाबाईपासून पुत्र

१ वडिल बाबुराव प्रभु
१ दुसरा गणेश प्रभु
१ तिसरा रघुनाथ प्रभु
१ चौथा आबाजी प्रभु

---

४

१ बाबुराव प्रभूस स्त्री आकुपासून पुत्र

१ वडिल जनार्दन प्रभु स्त्री गोपिकाबाई पोटी संतान नाही
१ दुसरा यशवंत प्रभु स्त्री गंगाईपासून
१ मोरोबा प्रभु
१ शामराव प्रभु
स्त्रिया २ संतान नाही

१ तिसरा देवराव प्रभूस स्त्री भवानीबाईपासून पुत्र

१ वडिल विठल प्रभु
१ अमृतराव प्रभु
१ गोविंद प्रभु
१ सदाशिव प्रभु

---

४

---

१ निकजी प्रभु

---

४

१ आताजी प्रभूस स्त्रिया २ दोन थोरली पार्वतीबाई पासून ६

१ केशव प्रभु
२ कासी प्रभु
३ चिमण प्रभु
४ खंड प्रभु
५ दामजी प्रभु
६ सुदर प्रभु

---

६

लक्ष्मीपासून ५

१ संकराजी प्रभु
१ मरळ प्रभु
१ वासुदेव प्रभु
१ धोंड प्रभु
१ + + + +

---

५

---

११

सरकारानी वतनावरून घालविले ते

१ मोरोजी प्रभूस स्त्रिया २

२ वडिल गोतमाबाईपासून पुत्र

१ मोरो यशवंत यास स्त्री
+ + + + पुत्र
१ + + + +

१ विठलराव देवाजी यास संतान नाही तिसरे बंधु गोविंदराव याचा पुत्र कृष्णराव यास दत्तक घेतले

१ गणेश प्रभूस स्त्री मथुराईपासून पुत्र आनाजी प्रभु यास स्त्री हाळसाबाईपासून पुत्र केशवराव यास स्त्रिया २ त्यास पुत्र

१ भास्करजी प्रभु
१ त्रिंबक प्रभु

---

२
३ दुसरी स्त्री नानीपासून
१ गंगाधर प्रभु
१ सदाशीव प्रभु संतान नाही
१ निमजी प्रभु संतान नाही

---

३

---

५
१ काकाजी प्रभूस
१ मुरारजी प्रभु
१ आवजी प्रभु

---

देशावरावर गेले
१ निळाजी प्रभूस स्त्री तुळजाई यास पुत्रसंतान नाही तेव्हा श्री माहायात्रेस त्रिंबकजी तात्या याणी रवानगी करून यात्रा करून आल्यावर सिंद मुकामी होती सिंदास मृत्य पावली
१ त्रिंबक मोरेश्वर यास स्त्री राधाबाईपासून पुत्र
१ रामचंद्र प्रभु वहिवाटीस दाजीबा
१ मैराळ प्रभु
१ खंडेराव प्रभु

---

३
१ बाबुराव प्रभु
१ वामन प्रभु
१ सीताराम प्रभु
१ + + + + +

---

१ रघुनाथ प्रभु स्त्री जानकी पासून पुत्र
१ बाजीराव प्रभु यास स्त्रिया २ धारलीस पुत्र नागोबाप्रभूचे लग्न जाले नाही
१ बळवंतराव यास स्त्री आंत्रिकाबाई नाव राणुबाई तिजपासून पुत्र रघुनाथ त्याचे लग्न जाले नाही

---

१ आबाजी भास्कर यासि स्त्री रमाबाई पुत्र बाळकृष्ण प्रभु स्त्री भिमापासून पुत्र
१ भास्कर
१ त्रिंबक

---

१

१ रामचंद्र प्रभूस स्त्रिया २
सगुणाबाई पासून पुत्र ६
१ भास्कर प्रभु दफ्तरदार
पंतसचिव
१ सखाराम प्रभु
१ माधवराव प्रभु
१ लक्ष्मणराव प्रभु
१ पांडुरंग प्रभु
१ भगवंतराव प्रभु

---

१ अन्नपुर्णाबाईपासून
१ धोंडोबा प्रभु

---

---

७
१ भैराळ प्रभूस पुत्र
१ बाबाजी प्रभु स्त्री
भागिर्थीबाई पुत्र गोपाळराव
बाबाजी बडोद्यास आहेत
१ बळवंतराव प्रभूस
संतान नाहीं

---

१ खंडेराव प्रभु स्त्री कृष्णाबाई-
पासून पुत्र
१ नागोबा प्रभु
१ हैबत प्रभु
१ त्रिंबक प्रभु
१ सदाशिव प्रभु हल्लीं भोरचे
कारभारी

---

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

# रोहिडखोरें–जेधे देशमुख

लेखांक ३२५ श्री

रामराम

राजश्री कान्होजी राजे जेधे
देशमुख ता। रोहिड व भोर

.॥ ⁙ श्री मसुरल हजरती अखंडित लक्षुमी प्रसन परउपकारमूर्ति माहामेरु राजमान्य राजश्री गोसावी यासि स्नहअंकित राजश्री साबाजी मुधोजी नाईक प्रतिपूर्वक विनती येथील क्षेम जाणौनु अपले क्षेम लिहिती अनुज्ञा देणे विसई राउले कृपा करुनु पत्रिका पाठविली स्वरूपवाद मनास अली लिहिले की बहुत दिवस जाहाले साभालपत्र आले नाही तेणेकरुनु तुह्मास वाटते ह्मणौनु बहुत काही तपसिल लिहिले तरी ते तरफेहून माहानगरास आलो याकरिता पत्रास अतर पडले फरमन तुह्मापासी होते तुह्मा अह्मात इतका

| साबाजी मुधोजी नाइक |
|---|

उपचार काय लिहिणे आह्मी काही तुह्मावेगळे नाही व लिहिले की पंताजीपंत हेजिब पाठविले हरियेकविसी दिवाणात वाकिब होउनु काम सरजाम केले पाहिजे ह्मणौनु लिहिले तरी हे लेहाव लागत नाही हे फिकीर अह्मास पुर्वीपासून आहे आता समयानसार हरवत्क जेव्हा दिवाणात जातो तेव्हा तुमचे च कामाचे आह्मास स्मरण आहे देव बरे च करील तुमचे अकीन हरी आहे बाजे बाब अवघे हवाल पंडित मशारनुलस सांगितला आहे ते लिहितील त्यावरुनु कलो येईल कृपा अखंडित असो दीजे हे विनती अपण हि काही दौलतखोईस अतर पडो ने दीजे अह्मी खत खानसाहेबास माह्मम करुनु सरजाम करुनु देवऊ

मोर्तब सुद


---

लेखांक ३२६ श्री

रामराम

⁙ श्री सकलगुणसंपन्य सौजन्यसिधु परोपकारमाहामेरू राजमान्य राजश्री कान्होजी नाईक देसमुख ता। भोर गोसावी यांसि भालेराऊ हवालदार व नरसिंगराऊ ना। किले केळंजा

विनती येथील क्षेम जाणौनु राउळे आपले क्षेम लिहिणे विसेष्य कागद पाठविला मनास आला वेलंगीचे कौलाचे लिहिले तरी बहुत बरवे कौल दिल्हा असे कोण्हेविशई अन्यथा नव्हे जैसे किले ना मुकासा देह आहेती तैसे च वेलंग असे दुसरा भाव नाही वेहाली व माडी वाटून गोपाजी व पोसजी यापासी दिल्हा असे मुखता सांगता कळो येईल हे विनती मौजे वेलंग यास तो गाव आमचा असे यास अन सारिखे असे तरी श्री आण असे व तुह्मी हि आमचे हरएक चालउनु नेत जाणे परस्परे बरवे असेलिया बरवे च असे पोसजी व तान्हाजी सांगता कळो येईल



---

**लेखांक ३२७**


श्री

रामराम

| मुधोजी |
|---|
| वणगोजि |
| नाईक |

॥ मा अनाम कान्होजी राजे जेधे देसमुख ता॥ रोहिडा तरफ भोर यासि राजश्री मुधोजी वणगोजी नाईक विनाति एथील क्षेम जाणउनु तुह्मी आपले क्षेम लिहिणे उपेरी कागद पाठविला सकल अभिप्राय विदित जाहाला लिहिले कीं रजा जालिया इसावतीच्या कामाबदल हुजूर एउनु ह्मणउनु तरी बहुत बरवे कागद देखता च स्वार होउनु एणे एक घडीचे देर न करणे आह्मास हजरत अलमपन्हा साहेब रोहिड तरफेस नामजाद करिताती याकरिता स्वार होता वेळे जवळी असिलेस ह्मणिजे तुह्मास हाती धरून हजरतीचे बांदगीस अर्ज करून इसाबती व हकलाजिमा व इनामबाब अैसे तुमचे दुमाला करउनु


व आपणा बराबरी नामजादी घेउनु सकल अर्थ बरवा च होईल सत्वर एइजे कोणे बाबे काही फिकीर न कीजे तुमचे जैसे मनोगत आहे तैसी सरंजामी करून रा। छ ९ जिल्हेज



लेखांक ३२८

मुधोजी
वणगोजी
नाईक

॥ मा। आ। राजश्री कान्होजी जेधे राजश्री मुधोजी वणगोजी नाईक राम राम विनति उपरि हजरत साहेबी आह्मास मदती खा दिलावरखान व भोसले व बाजे वजीर असे वजारतपन्हाह मदती एताती गनीम हि स्वार होउनु पैलीकडे चालिले तरी तुह्मी मदतीसी कृष्णाजी राजे तुह्मी आह्मास मेळउनु घेणे दिरंग न करणे हे विनंति



लेखांक ३२९

*
श्रीशिवच
रणीं तत्पर
त्र्यंबक सु
त मोरेश्वर

* हा शिक्का जेध्यांच्या एथील एका फाटक्या तुकड्यावर आहे. पत्र शिवाजीचें आहे.


**लेखांक ३३०** **१५४१ आषाढ शुद्ध ३**

(शिक्का)

इ कौलनामा अज दिवाण ठाणे ता। रोहिडा ता। देसमुखाने व मोकदमानी व सेटे माहाजनानी व रयानी व बाजे खुमानी व बलुतानी ता। भोर ता। मा। सु॥ सन इसरन अलफ बादे कौलुनामा ऐसा जे तुह्मी हुजूर येउनु माळूम केले जे ता। मजकूर गावगणा नवी लावणी अबराई व चिचा व अनार निंबोणी लावणी नवी जालियास दाहा झाडासी एक झाड इनाम एक १ बाकी झाडे नव त्यास मुखापा राजवाटा एक १ प्रजवाटा दोनी २ उतार होईतो येणेप्रमाणे घेणे बराये मालुमाती खातिरेसी आणौनु आबराई व चिचा वा निंबोनी व अणार दाहा झाडास इनाम एक बाकी झाडास उतार होईल तो राजहिसा एक १ प्रजहिसा दोनी २ येणे च प्रमाणे कौलु असे व मौजे कारीस कान्होजी देसमुख त्याची मोकदमी असे त्याचे वडीलानी झाडझाडोरा लाविला असे तो देसमुख मजकूरासी इनाम असे कारी खेरीज ता। मजकूर सदरहू कौल असे कोण्हे बाबे तालुक अदेशा न करिता झाडझाडोरा किर्दी करुनु सुखे असी जे कौल असे व खेरीज इसापती मौजे आबोडे व त्या देसमुख मजकुराचे दुबाला असे बाकी गाव ता। मजकूर येणे च रीती कौल असे मोर्तब


तेरीख १ माहे रजब

रजबू



---

**लेखांक ३३१** **१५४६ कार्तिक शुद्ध १४**




अज रखतखाने खु॥ मा। शर्क मा। अबर खुलीदयामदौलतहू

बजानेबू कारकूनानी ता रोहिडा बिदानद सुा खमस इशरैन अलफ हेजिब देसमूख तरफ भोर ता मजकूर हुजूर मालूम केले जे तरफ मजकुरीच्या देसमुखास इसाहती मौजे अबोड व इनामती व हकलाजिमा व देसकुलकर्नी यासि इनाम व हकलाजिमा व मोकदमास इनाम व हकलाजिमा गहदम सालाबाद पिढी दर पिढी कारकिर्दी दर कारकिर्दी भोगवटा तसुरफाती चालिले आहे व पेसजी साहेबाचे कारकिर्दीस चालिले आहे खुा आहे हाली कारकुनु ताजे खुाचा उजूर कारिताती खुर्दखत होये ह्मणौनु तू मालूम केले तरी देसमुखासी इसाहती मौजे अबाडे व इनामती व हकलाजिमा व देसकुलकर्नी यासि इनामती व हकलाजिमा व मोकदम गावगना यासि इनामती व हकलाजिमा गहदम सालाबाद पिढी दर पिढी कारकिर्दी दरकारकिर्दी व पेसजी खुर्दखत रा इजानेबू ता इसने भोगवटा तसुरफाती जैसे चालिले असेली तैसे चालविजे तालिक घेउनु असली फिराउनु दीजे मो

रुजू सुरनिवीस

तेरीख १२ माहे मोहरम

मोहरमु सुरु सुद

---

**लेखांक ३३२** **१५४८ आश्विन शुद्ध १**

फारसी

फारसी मजकूर

(¶) देसमुखानी ता रोहिडा बिदानद सुा सन सबा इशरैन व अलफ हुजूरून आगा हैदर ते तरफेसी बदल मसलतीस पाठविले आहेती तरी तुह्मी त्याचे ताबैन असोनु मसलतीस मदती असणे

तेरीख २९ जिल्हेज ( मोर्तब )

---

**लेखांक ३३३** **१५५९ आश्विन शुद्ध ८**

फर्मान हुमायून शरफ सुदुर्याफ्त बजानेब कारकुनानी किले

रोहिडा की अज सुा समान सलासीन अलफ दर्रीविला बदरगाह वालाज्याह रोशन गरदीद के कान्होजी जेधा देसाई तरफ भोर किले मजकूर मशकत कराव्या तकसीर केली नाही व पुंडासी दफे केले त्यावरून अजरामराहीम पादशाहाना व फरत अवातीफ खुशरवाना मौजे चिखलगाऊ तपे मजकूर दरवज्ञ इनाम कान्होजी देसाई मजकूर मराहमत फर्मान देविले असे मेबायद के देहमजकूर माछुम बाद व कुल उलीह्मात दुंबाला करणे बाद ऊ अवलाद व अहफाद त्यासी रवा करणे तालिक लेहून घेऊन असल फर्मान फिराऊन देणे बरहुकूम दुंबाला करणे तेरीख ६ जमादिलोवल

परवाना हुजुरू अशरफ अकदस हुमान आला बा एकलासखान अलीशान सादतशान रफिअलकदर बंदमकान एखलासखान वजीर हुकुमत

---

**लेखांक ३३४** १५७१

फारसी

फारसी मजकूर

अज रख्तखाने खोदायेवंद खान आलीशान खाने अजम अफजलखान माहामदशाही खुलिदयाम दौलतहू ताहा काहानोजी जेधा बिदानद के सुा सन खमसैन अलफ तुमचे बाबे मशहुरुरु अनाम तिमाजी पंडित व त्रियंबक पंडित लिहिले होते यावरून माछुम जाले तरी तुह्मापासी जे जमायत असेल ते घेउनु येणे पनास घोडियाचे सरबारगी तुह्मासी दिधले असे बरलेख पाहुनु सरजामी करू देऊ याखेरीज पाईचे खलक जे आणाल त्यासी चाकर ठेउनु व दरसाली लोक आणाल त्यासी अडिसेरी देऊ पेशजी तुमची सरफराजी केली होती हाली सरफराजी बहुत करू तुह्मी सिताब स्वार होउनु पंडित मशारनुलेपासी जाणे कोण्ही बाबे शक अंदेशा न करणे कौल असे

फारसी

---

लेखांक ३३५ १५७१ भाद्रपद शुद्ध ११




फारसी मजकूर

अज रखतखाने खुदायवंद खान अलीशाह खा अफजल खा माहमदशाही खुलिदयामदौलतहू बजानेबू कारकुनानी प्रा वाई बिदानद सुा खमसैन अलफ जोहरखोरे हणमतराऊ काबीज आहेत हाली मा कान्होजी जेधे यास दिधले आहे ते खासा येऊन काबीज करितील करू देणे त्यास मुकासा मन्हामती केला आहे दुमाले करणे पाा हुजूर मोर्तब सु॰




तेरीख ९ रमजान

---

लेखांक ३३६ श्री

॥ सौजन्यं राजमान्य राजश्री कानोजी नाईक देसमुख तपे भोर किले रोहिडा गोसावियासि त्रिंबक कान्हो हवालदार पाा वाई हर्ची दाद उपरि हजरत खान अजम साहेबाचा कौल पाठविला असे तरी तुह्मी कोणे बाबे मुलाहिजा न करिता कागद देखता च बहुत सितावीने स्वार होऊन जमेत घेऊन एणे हे मसलत तुह्मी फते केलियां तुमचे सरफराजी असे ए विसी पहिले हि तुह्मास कागद लिहिला असे त्यावरून कळो आले असेल बहुत सितावीने स्वार होऊन एणें एथे माणसाचे खर्चाचे हि सरंजामी होईल मर्दाने खलक घेऊन एणे आह्मी

तायघाटाहून हि पुढे स्वार होऊन गेलो असो बहुत सिताबीने एणे हे किाा छ ३ रजबु रोटी आह्मापासी आहे ते एथे आलियावरी देऊन हे किाा

फारसी

शिक्का फारसी

---

**लेखांक ३३७**

ॐ सकलगुणंसौजेनीसींधु अखंडितलक्ष्मीप्रसन राजमानीं राजश्री कान्होजी नाईक देसाई ताा भोर ताा रोहिडा गोसावी यासि वेदाजी अनंत विनंति एथील क्षेम जाणौनु तुह्मी आपले क्षेम लिहिणे विशेखु तुह्मी एउनु आमची भेटी घेतली हजरती खानसाहेबासी एख्तरी धरिला आजीपासुनु तुमची आमंची एखलासी जाली तुह्मी हरएकविसी आमंचे कामास अंतर पडो नेदणें आह्मापासुनु हि कोणेंविसी हरएक तुमचे कार्यास अंतर न पडे हा पूर्ण भरवसा असे पुढें जे कार्य प्रयोजन ते आह्मास लिहीत जाणे लिहिले सारिखे सरंजाम होत जाईल कोणेविसी अनमान न धरणे तुमचा आमचा कौल इमान असे छ १३ माहे सफर सुाा सलासीन अलफ फारसी

शिक्का फारसी

---

**लेखांक ३३८** श्रीशंकर

॥ ॐ श्रीमत सकलगुणअलंकरणअखंडितलक्ष्मीअलक्रुत राजमान्यराजश्री कान्होजी जेधे देशमुख तपे भोर किले रोहिडा प्रति राजश्री सिवाजीराजे जोहार येथील क्षेम जाणौनु स्वकीय कुशल लिहि-

णे तुह्मी पत्रिका पाठविली त्यावरुनु सकल अभिप्राऊ कलो आला लिा कीं खान अलीशान खान अजम येही लिहिले आहे कीं जावलीवरी सुरू केले आहे तरी तुह्मी आपले जमेतीसी सीताब येणे ह्मणौनु लिहिले आहे तरी तुमचा व त्यांचा पहिलेपासून घरोबा आहे गेले तरी पाहिजे आमा खासा अगर पुत्र पाठवावयाचे जाले तरी त्याचा बोलभाक बरवे रिती घेउनु मग जाणे दगा होये ऐसे न करणे एक भले माणूस दरम्यान देउनु मग जाणे तुमचे नजरेसी पडत असिले की खासा च जावे जरी तुमचे मन बार देत नसिले तरी कौल बोल घेउनु पुत्राबराबरी लोक देउनु पाठविजे हरयेक बाहाणा करुनु तुह्मी राहाणे दोन्ही गोस्टी तुह्मास लिहिल्या आहेती यात तुह्मी स्याहाणे असा बहुत लिहिणे नलगे

मर्या
देयं विरा
जते

प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णु वि
श्ववंदिता ॥ शाहसू
नोःशिवस्येषा मुद्र
भद्राय राजते

पो छ २४ रजब

---

लेखांक ३२९ — १५८४ आश्विन वद्य ११

श्रीशिवन
रपति हर्ष
निदान मह्य
देव मतिम
त प्रधान

मसुरल अनाम बाजी सर्जाराऊ देसमुख ता। भोर ता। रोहिडखोरे प्रति राजश्री सिवाजी राजे सुा। सलास सितैन अलफ अर्दास छ १५ सफर रा छ १८ मिा। पहुचोन हकीकत माल्हम जाली लिहिले की साहेबाची रजा सादर जाली की दोघे भाऊ चाकरीस हुजूर येणे यावरी दोघे भाऊ स्वार होउनु येत होतो यावरी घरामध्ये दुखापती जाली आहे याबदल खोळंबेला असो ह्मणौन लिहिले तरी वेथा हाली बरी जाली असेल याउपरी स्वार होउनु येणे बहुत दिवस राहिलीयावरी सबनीस जागा धरितील येणेकरून तुमचा काय सरफा आहे याउपरी सत्वर स्वार होउनु येणे व

लिहिले की आपलीया माणसास जावली राहावयासी जागा देणे ह्मणौन लिहिले तरी तुमचे हि राहाण्याचा जागा बरा च आहे जावलीस माणसे न पाठवणे तुमचे च तरफेस कुबल जागा असेल तेथे ठेवणे व लिहिले की बालाजी गुजर गोविंदराऊ आटगावकर याकडे होता हाली साहेबाची चाकरी करावयासी उमेद धरितो ह्मणौन लिा तरी त्याची आह्मास चाकरीची गरज नाही मोर्तब सुद

मर्या
देयं विरा
जते


रुजू सुरुनिवीस
तेरीख २३ माहे सफर
सफर सुरु सुद

---

लेखांक ३४० श्री शक १६००

श्रीशिवचरणी
निरंतर दत्त
सुत अनाजि पं
त तत्पर

राजश्री अनाजी दतो ताा माा देशमुख व देशकुळकर्णी व मोकदम पाटेल व रयानि ताा रोहिडखोरे सुभा मावळ सुाा तिसा सबैन अलफ बादे कौलनामा तुह्मी हुजूर मोा लाखेवाडीस एउनु अ + + + की मुलुक वतनी साहेबाचा आ + त्यासि एक तह करून रयतचा दिलासा जमीनीस धारा देउनु कौल मरहमत केलि + + + + + उमेदवार होउनु सुख असौनु + + + कितेक वजा इलतिमास केली त्यावरून मनास आणुनु जमिनीस तह ऐसा दिल्हा असे सन समान पासून वटाई अर्धल + + + आहे त्यास साल गुदस्ता सन समानामधे बिघावणी जमीन मोजून निमताना वर रकम तह करविला परत जमिनीची पो + + + एका साला जे जागा पाहाणी पुरवल्या ते जागा निम-



शिवकालीन पत्रव्यवहार—लेखांक ३३९.

The Lakshmi Ari Bombay.

तोन उतरले व एक जागा अवल जमीन असोन कस्टहीन जाहाले त्यास ++ तर आले ऐसा एक तह रयतीची समजावीस होउनु आली नाही याकारिता तुमी धाऱ्याविसी अर्ज केला की एक तह मुशकस करूनु +++ दिला पाहिजे ह्मणउनु त्यावरून तुमच ++ ते एक तह केला आहे की साल मजकुरी तरी +++ होउनु आले एक महिना अखेर उरला +++ पेस्तर सन सबैना कारणे तह धारियाचा ++++ बैसउनु आकार करावा ऐसा तह केला अखेर कामास एक ब्राह्मण अगर परभु कारकून ठेवावा तर तो गैरआरामीब आणि त्याण काय करावे जमीनीचे पोट फोडी गावी पीक काय पिकले व काय धारा ध्यावा हे त्या गरिबास +++++ या बदल तुमचे महालीचे मस्तीदार तुह्मी +++ टाकिला आहे तरी तुह्मी आजीपासून + ++ आपले माहालीचा आकार करणे या बदल खासा देसमुख व देशकुलकर्णी व मोकदम व मोख्तसर + + + ४ च्यार रयता ऐस्या मेळउन एक विचाराने गावाचा गाव फिरोन ऐसे करणे की अमका गाव त्यासि रकम अमकी त्याची जमीम + अमकी त्यासि अवल दुम सीमच्या + + + ऐसी जाती निवडून त्यास पिकाचा अजमास करौनु कस्त केलियाने काय पिकल ते चौकस करुनु ते रकम त्या सेताचा सिरी बैसउनु त्यास + + न हि साक्षे पाहून आकार करणे ऐसे की एक ठिकाण मलिकअंबरी रकम अमकी जाहाली त्यासि अवल दुम सीम च्याहरम त्या मध्ये खरीफ एक पीक अमकी रबी दुपीक अमकी ऐसी जात निवडून त्या मध्ये अमके बिघे अमका गला ऐसा पिकाचा आकार करून ठिकाणचे ठिकाणात सात पाच कुळे असिली तरी + + असोत त्या सेता बरहुकूम गावखंडणी + + + सारा तपा आकार करण त्यासि सारा तपा आकार तुह्मास करावयासि आजीपासून फुरसत पुढील साल पावेतो दिली आहे इतक्यामध्य कुल तपा फिरौन गावाचे गाव व सेताचे सेत आकार करणे आणि आकार चौकसीने आह्मास लिहिणे आ-

ह्मी एउनु तुमचे तपामध्य तीन गाव ती प्रतीचे पाहुन एक + + डोंगर एक खाचर तळे जमीन एक काळी + + तीचे सरदेस असले ऐसा गाव चौकस कारकुनीचा हुनरे पाहोन आणि चौघाच + + + समजाउनु खरे करून आणि ते हे + + तुमची बेरीज जो काय एकी गावीचा आकार + + असाल त्यावरी रुजू घाळून जरी तु + + बजिनस सवाई दिडी दुणी बेरीज जाहाली तेणे प्रमाणे + + दिडी सवाई दुणी + + खरी जाली तरी तुह्मी त्याप्रमाणे उ + + करणे जरी + + कराल त्यास + रीस बराबरी जाली तरी बरी च गोस्ट + णे तह + नु तह करावया + + तह करा + + केला आहे एणे प्रमाणे + आह्मी कबूल + + करून कीर्दी माहाली + + देणे कौल असे रा + + + + पा हुजूर

लेख
नावधि रे
धते

---

**लेखांक ३४१** **श्री** **१६०७ ज्येष्ठ वद्य २**

राजश्री बाजी सर्जाराऊ देसमुख ता रोहिडखोरे गोसावी यासि

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो बाजी घोलप हवालदार व कारकून किले पुरंधर जोहार अनेक आसिर्वाद सुा सबा समानीन अलफ पत्र पाठविले पाऊन वर्तमान कलो आले लिहिले की आपल्यास बहुत च फार अटक केली होती त्यास हुनरे च बाहेर पडिले आता काय विचार करावा तो लिहिला पाहिजे ह्मणौनु लिहिले कळो आले उतम गोष्टी बरी च केली आता राजश्री छत्रपतिस्वामीचे भेटीस जाउनु आपले उर्जित करून घेतले पाहिजे राजश्री

चे दरशण होता च बरीच सरंजमी होईल जाणिजे
येविशई बहुत लिहिणे तरी विवेकी असा कृपा असो दिल्ही
पाहिजे रा। छ १५ रजबू हे विनती

---

**लेखांक ३४२ श्री १६०७ आश्विन वद्य ३**

स्वस्ति श्री राज्याभिषेकशक १२ क्रोधन नाम संवत्सरे आश्विन
बहुल त्रितीया इंदुवासरे क्षत्रियकुलावतंश सिंव्हासनाधीश्वर श्री राजा

श्री॥ शंभु
भजनोत्कठ मो-
रेश्वरसुत नी-
ळकंठ

शंभु छत्रपति स्वामी याणी सर्जाराऊ जेधे
यांसि आज्ञा केली ऐसी जे तुह्मी संताजी
निंबालकर मुद्राधारी विचित्रगड यासि पत्र
लेहून आपला मुद्दा सांगोन पाठविला की
आपला भाऊ शिवजी जेधा याणे हरामखोरी करून सिरवळास गेला
त्याणे आपली गुरे ढोरे वळुनु नेली पुढे आपणास बरें पाहाणार नाही
या बदल आपण हि उठोन सिरवळास आलों आहे ऐसियासि आपण
राजश्री स्वामीच्या पायाजवळी एकनिष्ट च आहे स्वामी कृपाळु होउनु
आपले वतन देसमुखी आपले स्वाधीन करतील आणि अभयपत्र
सादर होईल तरी आपण शेवेस एउनु एकनिष्ठ होउनु शेवा करीन
ह्मणून तरी तुमचा मुद्दा माइले हवालदार एही स्वामीचे शेवेसी हुजूर
लिहिला त्यावरून कळो आला त्यावरून हें आज्ञापत्र तुह्मास लिहिले
आहे तरी आधी तुह्मी च सरासरी हरामखोरी केली की वतनदार
होउनु इमाने इतबारें वर्तावे ते गोष्ट न करितां स्वामींचे अन्न बहुत
दिवस भक्षिले त्याचे सार्थक केलेत कीं स्वामीच्या पायासी दुर्बुद्धि
धरून दोन दिवसांचे मोगल त्यांकडे जाउनु राहिलेस तुमचा भाऊ

शिवजी गनीमाकडे गेला तो तुह्मास बरें पाहे ना ऐसें होते तरी तुह्मी स्वामिसन्निध हुजूर यावे होते ह्मणिजे तुमचे इतबारपण कळोन एकनिष्ठता कळो एती ते केले नाही तरी बरी च गोष्ट जाली या उपेरी हि गनीमाकडे राहाणे च असेली तरी सुखे च राहाणे तुमचा हिसाब तो काय आहे ए क्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनीमा देखिल तुह्मास कापून काढवीत च आहेत हें बरें समजणे दुसरी गोस्ट की तेथें राहाणे च नाही एकनिष्ठेने स्वामीच्या पायाजवळी वर्तावे ऐसे असेली तरी तुह्मी परभारे मुद्दे सांगोन गडकिलियाकडे राबिते काय ह्मणून करिता हे गोस्ट स्वामीस मानत नाही जो राबिता करणे तो स्वामीकडे च करून हुजूर वर्तमान लेहून पाठवावे स्वामी तुमचा मुद्दा मनास आणून आज्ञा करायाची ते करितील तरी ऐसी गोस्ट करावया प्रयोजन नाही उजराती खेरीज दुसरियाकडे एकंदर राबिता न करणे जे वर्तमान लिहिणे ते स्वामीस लिहीत जाणे तुमचे ठाइं एकनिष्ठता च आहे ऐसे स्वामीस कळलियावरी जे आज्ञा करणे ते करून आज्ञापत्र सादर होईल तेणे प्रमाणे वर्तणूक करणे लेखनालंकार

रुजू
रवाना छ ३ जिल्हेज
सुरू सूद

(लेख नावधि मुद्रा) (मर्या देयं विज यते)

---

**लेखांक ३४३** **श्री** **१६१२ ज्येष्ठ वद्य ८**

राजश्री माहादाजी सामराज देशाधिकारी
व देशलेखक प्रात मावळ गोसावी यांसि

(मोर्तब) अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य सेवक रामचंद्र निलकठ नमस्कार सुा इहिदे तिसैन अलफ राजश्री सर्जाराऊ जेधे

देशमुख ताा भोर तपे रोहिडखोरे बहुलीकर भेटीस आले याणी विनती केली की इदलशाहाचे वेळेसी इसाफतीचे गाव व इनाम चालत होते बितपसिल

| | |
|---|---|
| इसाफतीचे गाव | मौजे वेन्हवडीस इनाम टके |
| १ मौजे चिखलगाऊ | ६ साहा एकूण टका १ |
| १ मौजे अबवडे | |
| १ मौजे नाटिंबी | |
| १ मौजे कारी | |

---

४

एणे प्रमाणे इसाफतीचे गाव च्यारी व इनाम ठिकाण (आ)ला आहे याप्रमाणे चालत होते तेणेप्रमाणे च राजश्री कैलासवासी छत्रपतीस्वामीचे वेळेसी चालत होते त्याउपरी आपला भाऊ सिवाजी जेधा यात व आपणात वडील धाकटेपणाचा कथला मौजे कारी निमित्य लागला या निमित्य उभयता राजश्री पावेतो भांडत गेलो याकरिता राजश्री कैलासवासी स्वामीने निवाडा होये तोवरी आदिकरून देशमुखी अमानत करून देशमुखीस मुतालीक ठेऊन त्याच्या हाते स्वामीकार्य घेत होते ऐसियास साप्रत सिवाजी जेधा मृत्यु पावलियावरी आपले बाप भाऊ व आपण समजलो आपला वडिलपणाचा मान व कारी गाव आपणास दिल्हा आहे तरी कृपाळु होऊन आपले इनामतीचे गाव व ठिकाण पहिले राजश्री कैलासवासी स्वामीचे वेळेसी चालिले होते तेणेप्रमाणे चालविले पाहिजेत ह्मणून तपसिल विदित केले त्यावरून मनास आणून सर्जाराऊ जेधे ह्मणजे कदीम विस्वासू बहुत दिवस कस्ट मशाखती केल्या आहेत व राजश्री कैलासवासीचे वेळेसी हि थोरथोर कामे करून दिल्ही आहेत हाली हि गनिमाने कितेक गड कोट घेतले आहेत ते हस्तगत करून घ्यावे स्वामीकार्यें करावी यास्तव कृपाळु होऊन राजश्री कैलास

वासी स्वामीचे वेलेसी पहिले इसाफतीचे गाव व ठिकाण चालिले असतील तेणेप्रमाणे चालवावे ऐसा तह करून हे आज्ञापत्र तुह्मास सादर केले असे तरी राजश्री कैलासवासी स्वामीच्या सनदा असतील त्या मनास आणणे सनदाप्रमाणे भोगवटा जाला आहे की नाही हे मनास आणून सनदा रुजू घालून जेणेप्रमाणे कैलासवासी स्वामींचे वेलेसी यास गाव व ठिकाण याचे चालिले असेल तेणेप्रमाणे हिलाकुसूर याच्या दुमाला करणे तालीक घेऊन मुख्य पत्र परतून देणे जाणिजे छ २१ रमजान पा। हुजूर

बार सुरु सुद बार

---

**लेखांक ३४४** १६१०

पातशा

इजतीअसार बाजी सर्जाराऊ जेधे देसमुख ता रोहिडखोरे सुा सन १०९८ मालूम दानद की तुला हजूर सिवाजीपंत पाठविला होता त्याणे हकीकत जाहीर केली त्यावरून तुझे इसापतीचे गाव व हक तुझे दुमाले केले व तुझा गुमस्ता सिरोली चाकरीस

फारसी

देणे तुला हजूर येणे हजूर आलियावरी तुह्मास हजरती जादे याचा कौल आणून मग तुह्माबराबरी भले माणूस देऊन त्याची भेटी करून फर्मान करून देऊ जरी तू हजूर न येस तरी गाव दुमाले नाहीत दिगर बाजी घोलप व बकाजी नावडकर यासि कौल दिधले त्यास बराबरी घेऊन येणे कोणे बाबे शक न धरणे तुह्मी हजूर न या तरी जे सनद दिधली ते मजुर नाही तुह्मानजिक जमाव कितेक होईल ते लेहोनु घेऊन येणे

लेखांक ३४५ श्री १६१२

राजश्री सर्जाराव जेधे पंचसहस्त्री लस्कर गो॥

ऽ॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ रामचंद्र निलकंठ आसिर्वाद सु॥ इहिदे तिसैन अलफ तुह्मी कामाचे मर्दाने इतबारी एकनिष्ठा धरून + + आलेस यावरून तुह्मावरी संतोशी + + पंचसहस्त्रीचा कार्यभाग सांगितला राजश्री धनाजी जाधव याचे ताबैन केले असे तरी स्वामीकार्यविशी मशारनिलेचे आज्ञेत राहोन स्वामी-कार्य करीत जाणे तुह्मी आपले पंचसहस्त्रीचा जो जमाव कराल तो मशारनिलेसी गुजार करीत जाणे मशारनिले + दंडकप्रमाणे घोडि-यास रातीब व स्वारास रोजमुरा आणि त्याच्या हाते स्वामी + + तील जाणिजे + + +

लेखन
सीमा समु
ल्लसति

श्रीरामचं
द्रचरण नील
कंठ सोनदे
व शरण

सुरु सुद

लेखांक ३४६ श्री १६१२

राजश्री माहादाजी सामराज देशलेखक प्रात मावळ गो॥

ऽ॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ रामचंद्र निळकंठ सु॥ इहिदे तिसैन अलफ राजश्री सर्जाराव जेधे देशमुख तपे रोहिडखोरे प्रात मजकूर हे हुजूर आले याणी विनती केली + च्या देशमुखानी स्वामीच्या पायासी एकनिष्ठा धरिली आहे गडकोट गनि-माने घेतले आहेत ते हस्तगत करून घ्यावे स्वामी ++ निश्चय केला आहे तरी कृपाळु होऊन त्याचे इसाफतीचे गाव शाहाचे कारकिर्दी-

पासून चालत होते तेणेप्रमाणे चालविले पाहीजे + + नती केली ऐसीयासी तुह्मास प्रात मजकूरीचा देशाधिकार दिला + + ते समई तुह्मी ही विनती केली होती तेव्हा आज्ञा केली की जो एकनिष्ठा धरून स्वामीसेवेसी येईल गड कोट गनिमाने घेतले ते हस्तगत करून घेईल त्यास इसाफतीचे गाव व वतन असेल त्या + + स आणून तेणेप्रमाणे चालवणे ह्मणौन आज्ञा केली आहे हाली + + से तरी जो कोण्ही वतनदार एकनिष्ठा धरून येईल गडकोट + रून देईल या

श्रीरामच
रण नील
कंठ सोनदे
व शरण

राज्याचे ठाई दृढ निस्टा धरील आणि स्वामीकार्य करून देईल त्यास इसाफती व वतनभाग चालिला असेल तेणेप्रमाणे दुमाला करून लेहोन पाठ + + सनद सादर होईल तेणेप्रमाणे मजुरा असे छ २२ + पा हुजूर

लेखन
सीमा स
ह्मसति

बार सुरु सुद बार

---

**लेखांक ३४७ श्री १६१२ चैत्र वद्य ८**

श्री राजा
राम छ
त्रपति

स्वस्ति श्री राज्याभिशेकशके १६ प्रमोद नाम संवत्सरे चैत्र बहुल अष्टमी मंदवासरे राजमान्य राजश्री बाजी सर्जाराऊ जेधे देसमुख यासि राजा आज्ञा ( अभय दिल्हे ) ऐसी जे मा। रतनोजी सिंदे व शंकराजी ढगा याजबराबरी कितेक एकनिस्टपणाच्या गोस्टी सांगोन पाठविल्या सांगितल्या प्रमाणे विदित जाला ऐसियासि हे मऱ्हाट राज्य आहे तुह्मी लोक या राज्याची पोटतिडीक धारिता तरी ते प्रांते कितेक राजकारणे आहे ते चालणा करून + + ण जमाव करून सावधानपणे राहोन स्वामिकार्य जे दृष्टीस पडेल ते मनास आणून हस्तगत

करून ठेवणे हुजूर लेहोन पाठवणे तेणेप्रमाणे हुजरून विल्हे केली जाईल या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री छत्रपति स्वामी स्वारी करून कर्नाटकप्रांते गेलियावरी तिकडे जमाव लस्कर चाळीस हजार व हशम एक लाख पंचवीस हजार जमाव जाला आहे पुढे हि आणखी जमाव होत च आहे ते प्रांती कुल पुंड पाळेकर तमाम एऊन भेटले आहेती जमेती पोख्ती जाली आहे तुर्त पुढे राजश्री केसो त्रिमळ या प्रांते रवाना केले आहेती त्या बा। संगिनात स्वार पंधरा हजार व हशम पंचवीस हजार देऊन रवाना केले आहेती ते हि कादळ प्रांते तुंगभद्रेच्या तीरास आले आहे खजाना हि एक लाख होनु याबराबरी आहे त्यास आणावयास राजश्री धनाजी जाधव व संताजी घोरपडे सेनापंचसहस्री पाठविले आहेती ते हि आठा पंधरा दिवसी एतील ते आलियावरी तो जमाव व हुजूरचा जमाव ऐसे करून त्या प्रांते स्वारी होईल तरी हे पत्र तुह्मास सादर केले असे तेणेप्रमाणे जमावानसी सावध असणे त्या प्रांते आलियावरी तुमची हि सरंजामी एथे मा। रतनोजी सिंदे व शंकराजी ढगे एही रदबदल केली त्याप्रमाणे चालऊन बिता।

| तैनाती सालीना होनु | | गांव |
|---|---|---|
| ५००८० | खासा | ४ इसाती |
| ५०० | मताजी जेधे | २ वेतनात गाव |
| १००० | | ६ |

सदरहू प्रमाणे हजार होनु तैनाती व गाव इसाती व मुकासे मिळोन सा गाव कार्यभाग जाली देऊन तरी तुह्मी आपली खातरनिशा राखोन स्वामीच्या पायासी एकनिस्टता धरून स्वामिकार्य साध्य होए ते गोस्टी करणे गनीमाचा हिसाब काय आहे तुह्मी लोक जेंव्हा मनावरी धरितां तेंव्हा गनीम तो काय आहे गनीमसा तुह्मी लोकी केला आहे ते तुह्मी च लोक या राज्याची पोटतिडीक धरितां तेंव्हां अवरंगजे-

बाचा हिसाब धरीत नाही ऐसे बरे समजोन लिहिल्याप्रमाणे वर्तणुक करणे व अवरंगजेबानें मऱ्हाटे लोक आहेती त्यांस मुसलमान करावे ऐसे केले आहे त्यापैकी मुसलमान केले मा नेतोजी राजे व साबाजी घाटगे व जानोजी राजे व कितेक ब्राह्मण हि ए प्रांतीचे बाटविले पुढे हि तलबा गेला आहेती तिकडून तमाम मऱ्हाटे लोक होते ते आपला जमावानसी आह्माकडे एताती हाली रा हणवतराऊ निंबाळकर व सटवोजी निंबाळकर बाजे सरदार आले आहेती पुढे हि कितेक एताती ऐसे गनीमाचे लस्कर उठोन हुजूर जमाव होत आहे ईस्वर करितो तरी फते च आहे लिहिलेप्रमाणे हिमती धरणे जाणिजे छ २० जमादिलाखर सुा तिसैन अलफ आज्ञा प्रमाण

मर्या
देयं वि
राजते

---

**लेखांक ३४८ श्री १६१२ वैशाख शुद्ध ७**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १६ प्रमोद संवत्सर वैशाख शुध + + + बाजी सर्जाराव जेधे देशमुख व देसकुलकर्णी + + + तपे रोहिडखोरे यासि राजाज्ञा ऐसी जे × × चे विशी नाइकजी जेधा बिा देसाई हुजूर येउनु विदित केले की आपल्या वतनाचा हकलाजिमा इनाम व इसाफती चा गाव कारकिर्दी अदलशाहापावेतो चालत होते त्यावरी साहेबाचे कारकीर्दीस बटाईचा तह जाहला त्यामुळे आपले इसाफतीचा + + चा राजभाग गला दिवाणांत होउनु हकाची मोईन नव्हत व + + करून दिल्ही तेणेकरून आपला औकात चालिला नाही हकाची मोईन दिवाणातून करून दिधली तेणेकरून आपली हैरानगी च जाहली अनवस्ताची ते हि विपती जाहली औरगजेब स्वामीच्या राज्यावरी चाली केली राजश्री. छत्रपतिस्वामी रायगडीहून कर्नाटकप्रांते गेले

रायगड व वरकड हि किलेकोट गनिमासी सामील होउनु फिसाती केल्या त्याबराबरी आपणास हि च्यारी दिवस वर्तावे ऐसे जाहले परंतु आपण हि स्वामीच्या पायासी एकनिष्टेने वर्तावे हा च निश्चय करून होतो स्वामी करनाटक प्रांते गेलियावरी तिकडे विजय केला आपण वतनदारलोक एकनिष्ट सेवा करुनु दाखवावी ह्मणउनु किले विचित्रगड गनिमापासून घेतला व देश हि सोडविला पुढें हि जमाव करून गड कोट व देश गनिमापासुनु घेतो परंतु स्वामीने कृपाळु होउनु पेसजी आपला हक चालत होता तेणेप्रमाणे देखील इसाफतीचे गाव चालविले पाहिजेत ता मजकूरीची लावणी संचणी करून व स्वामीसेवा एकनिष्टपणे करून ह्मणउनु विदित केले त्यावरून + + चा हक व इनाम व इसाफतीचा गाव तुम्हास देविले असेत पेसजी कारकिर्दीप्रमाणे घेत जाणे ता मजकूरीची लावणी करून दस्त आकारून सदरहूप्रमाणे घेत जाणे ता मारीचे गाव लावणी करून दस्त आकार होत जाईल त्याप्रमाणे लागल्या दस्तावरी हकाची मोईन बैसउनु घेत जाणे छ ५ साबान सुा सन तिसैन अलफ आज्ञा प्रमाण

मर्या
देय वि
राजते

सुरु सुद बार

---

**लेखांक ३४९ श्री १६१३ भाद्रपद शुद्ध २**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १८ प्रजापतिनाम संवत्सरे भाद्र-

श्रीधर्मप्र
द्योतिता शेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
दिराजते

पद शुध द्वितीया मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्रीलक्ष्मि
नृहरि प्री.तेः
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

याणी मा सर्जाराव जेधे देशमुख व देशकुलकर्णी व गावकुलकर्णी मोकादम व चौगले व बाजे व सेटे माहाजन तपे रोहिडखोरे यासि दिल्हे अभयपत्र ऐसे जे तुह्मी स्वामीसनिध चंजीचे मुकामी येऊन विदित केले कीं तपे मजकूरचे वतनदार लोक व आपण रयत देखील स्वामीच्या पायासी एकनिस्ट आहेत तरी स्वामीने कृपाळु होऊन वतनदारास वतने पहिले निजामशाही व आदीलशाही याचे कारकिर्दीस चालत होती तेणेप्रमाणे चालवायाची आज्ञा करून अभयपत्र देविले पाहिजे ह्मणोन तरी तुह्मी स्वामीच्या पायासी एकनिष्ट आहा या गोष्टीवरून स्वामी तुह्मावरी संतोषी आहेत त्या प्रांतीच्या राज्याच्या कार्यभागास स्वामीने राजश्री रामचंद्रपंडित अमात्य व राजश्री शंकराजीपंत साचिव ठेविले आहेत त्यावरी मखत्यार आहे तेही तुमचे वर्तमान मनास आणून वतनाचा निर्वाह करून सनदा दिधल्या असतील त्या स्वामीच्या च आहेती तेणेप्रमाणे स्वामी चालवितील आपले समाधान असो देणे मावलप्रांनी राजश्री शंकराजीपंडित साचिव याचे दिमतीचे मुलकात आहे याकारिता तुह्मी त्याचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक कारित जाणे आणि स्वामीकार्य करून आपला मजुरा करून घेणे पुढे स्वामी त्या प्रांते येतील तेन्हा तुमचे उर्जित कारितील अभय असे जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू

सुरु सुद बार

---

लेखांक ३५० श्री १६१३ भाद्रपद शुद्ध २

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १८ प्रजापतिनाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध द्वितीया मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी येसजी मालुसरा यासि आज्ञा केली ऐसी जे रा सर्जाराऊ जेधे

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्रीलक्ष्मी
नृहरिप्रीतेः
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

देसमुख रोहिडखोरे याकडील लोकाची माणसे त्या प्रांते होती त्यावरी तू स्वारी करून कितेकाची वस्तभाव लुटून नेली व बापूजी खडकीया अफराद याची बाईल धरून नेली आहे मनास येसी धामधुम कारितोस ह्मणोन हे वर्तमान हुजूर कळों आले तरी ऐसे कराया तुजला काय गरज काये काही समध नसतां लोकाची घरे लुटावी बाइला धरून न्याव्या हे ढंग तुजला कां आठवले आहेत यावरून वरजोर नतीजा पाठवावा परंतु एक वेळ स्वामीने क्षमा करून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी याउपरी तऱ्ही ऐसी बदराबा वर्तणुक करीत नव जाणे सर्जाराऊ जेधियाकडील लोकांची वस्तभाव जे नेली असेल ते सारी परतोन देणे बापूजी खडकीयाकडील वस्तभाव व त्याची बाईल तू नेली आहेस ते त्याची त्यास देणे फिरोन ये गोस्टीचा बोभाट येऊ न देणे पुढे ऐसी बदराबा वर्तणुक करून बदनाम न होणे ताकीद असे जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू

सुरु सुद बार

**लेखांक ३५१** **श्री** **१६१३ भाद्रपद वद्य १०**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १८ प्रजापतिनाम संवत्सरे भाद्रपद बहुल दशमी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणि समस्त सेनाधुरंधर राजमान्यराजश्री संताजी घोरपडे सेनापति यांसि आज्ञा केली ऐसि जे मा। सर्जाराऊ जेधे देसमुख ता। रोहिडखोरे हे स्वामीसानिध येऊन मावलप्रांतीचे व पुरंधर व जुनर या प्रांतीचे कितेक वर्तमान विदित केले त्यावरून यांस त्या कार्यभागाची आज्ञा करून राजश्री शंकराजी पंतसचिव यांस पत्रे देऊन पाठविले आहेत हे जो कार्यभाग करायाचा तो करितील त्या प्रसंगी सेनेकडून साहेता पाहिजेसी होईल तेव्हां तुह्मास लेहून पाठवितील ते करणे आणि कार्यसिध होय ऐसें करणे येविशीं अंतर पडो न देणे जाणिजे बहुत लिहिणे तरी तुह्मी सूज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक ३५२** **१६१३ भाद्रपद वद्य १३**

स्वस्ति श्री राज्याभिषेकशक १८ प्रजापति नाम संवत्सरे भाद्रपद बहुल त्रयोदसी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचिव यांसी आज्ञा केली ऐसी जे बेरड व कोळी किले पुरंधर हस्तगत करून द्यावयाची उमेद धरिली आहे तरी स्वामीने त्यांस अभयपत्रें करून दिल्ही पाहिजेती ह्मणोन सर्जाराव जेधे देशमुख रोहिडखोरे याणी विदित केले त्यावरून स्वामीने बेरडास व कोळियास अभयपत्रें दिल्हीं आहेत तरी तुह्मी त्या कोळ्यांचे व बेरडांचे दिलासे करून

पुरंधरची हवी करवणे आणि जे अनुकूलता करावयाची ते करून देऊन गड हस्तगत होए ऐसे करणे कोळियाची व बेरडाची सरफराजी कार्य सिध जालियावरी जे करावयाची ते करणे यांचे चालवायास अंतर पडो न देणे जाणिजे बहुत लिहिणे तरी तुह्मी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक ३५३** **१६१३ भाद्रपद वद्य १३**

श्रीधर्मप्र
द्योतिता शेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववद्या
विराजते

स्वस्ति श्री राज्याभिषेकशक १८ प्रजापति नाम संवत्सरे भाद्रपद बहुल त्रयोदसी सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्रीलक्ष्मि
नृहरिप्रीतेः
मुद्रा नीराजि
जन्मनाः ॥ राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

याणी बेरड किले पुरंधर यासी दिल्हे

अभयपत्र ऐसे जे रा सर्जाराव जेधे देशमुख रोहिडखोरे हे हुजूर एऊन विनंति केली कीं पुरंधरचे बेरड किबलियानसी आपणाजवळ आहेत

जरी स्वामी कृपाळु होऊन बेरडास अभयपत्र देतील तरी पुरंधरचें राजकारण करून गड हस्तगत करून देतील ह्मणोन त्यावरून हे अभयपत्र दिल्हे असे तरी तुह्मी पुरंधरची हवी करून गड हस्तगत करून देणे कोण्हेविषी शक न धरणे स्वामी तुमचे चालवितील आपले दिलासे असो देऊन एकानिस्टेने स्वामिकार्य करणे तुमची अनकूलता करून चालवायाविसी राजश्री शंकराजी पंडित सचिव यास लिहिले आहे ते चालवितील कोण्हेविषी चिंता न करणे अभय असे जाणिजे तुह्मी पुरंधर हस्तगत करून दिल्हा ह्मणजे स्वामी तुमचे ऊर्जित करितील अभय असे जाणिजे निदेश समक्ष

रुजू




---

**लेखांक ३५४ श्री १६१३ भाद्रपद वद्य १३**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १८ प्रजापतिनाम संवत्सरे भाद्रपद बहुल त्रयोदसी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्यराजश्री शंकराजी पंडित सचिव यांसि आज्ञा केली ऐसि जे प्रयागजी दिनकरराऊ हतनोलीकर याचा कबिला तुह्मी दस्त करून आणिला त्याउपरि तो हि कौल घेऊन तुह्माकडे आला त्यास तुह्मी चालीस हजार रुपये दंड बांधिला कबिला अटकेमध्यें ठेविला हें वर्तमान पहिलें विदित जाले आहे ऐशास सांप्रत मा। सर्जाराऊ जेधे देसमुख ता। रोहिडखोरे हुजूर आले त्याणी त्याविशीं विनती केली की मिरासदार आहे त्याचे हाते स्वामीकार्य विशेश होणार तरी त्यास जमान घेऊन मोकले करावे आणि कार्यभाग सांगावा ह्मणौनु तरी दिनकरराऊ मिरासदार व कार्याचा आहे त्यास जमान मख्तसर मऱ्हाठे लोक व देसमुख घेऊन त्याचा कबिला आपले कबजात हरएक जागां ठेऊन त्यास सोडणे

पुणे मराठी ग्रंथालय
१३७ ब, नारायण पेठ, पुणे २

आणि त्याचे हातें स्वामीकार्य घेत जाणें जाणिजे बहुत लिहिणे तुर्मे तुह्मी सूज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

सुरु सुद

---

**लेखांक ३५५ श्री १६१६ श्रावण शुद्ध १३**

राजश्री विनाजीराम हवलदार व कारकून ता
रोहिडखोरे गोसावी यासि

॥ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक मल्हार येसाजी सुभेदार व कारकून सुभा मावळे प्रा राजगड नमस्कार सुा खमस तिसैन अलफ बदल देणे इनाम सेत मा बाजी सर्जाराव जेधे देशमुख ता भोर बा सनद राजश्री पंतसचिव छ १० रबिलाखर सन अर्बा पौ छ ११ जिल्हेज तेथें आज्ञा की देशमुख मा याणी विदित केले की आपणास पुर्वीपासून इनाम मौजे वेनवडी ता मजकूर येथे जमीन कास टके ६ साहा पुर्वीपासून चालिला आहे तेणेप्रमाणे चालवणे ह्मणौन विदित केले मौजे मजकुरी पुर्वीपासून याचा इनाम चालिले असेल त्याचा भोगवटा मनास आणून हाली चालवणे ह्मणौन आज्ञापत्र सादर आहे त्यावरून तुह्मास सनद सादर केली असे तरी मौजेमजकुरी भोगवटा मनास आणून सदरहू इनाम चालवणे साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे तालिक लेहोन घेऊन असल सनद फिराऊन देणे छ ११ जिल्हेज मोर्तब सुद सदरहू इनाम सेत कीर्दी करितील त्यासी मलिकंबराचे कारकिर्दीचा भोगवटा दाखवितील तो मनास आणून सेत इनामती दुमाले करणे प्रस्तुत सदरहू गावीचे इनाम यांचे दुमाले केला आहे किर्दी करू देणे जाणिजे मोर्तब सुद

---

लेखांक ३५६ श्री १६१८ आषाढ


राजश्री मा। एसाजी सुभेदार कारकून ता। मावले
प्रा + + + गोसावी यासि

ॐ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायण नमस्कार सु॥ सबा तिसैन अलफ मा। बाजी सर्जाराऊ जेधे देशमुख तरफ भोर ता। रोहिडखोरे याणी विदित केले की आपण राज्यामध्ये कीर्द मशागत केली ताम्राची फिसात जाली त्या प्रसंगामध्ये आपण एकनिष्टपणे राहोनु सेवा केली आहे विलायती खराब पडिली होती त्यास रयतास हर भरवसा देउनु वसाहत केली जाई त्यास आपले ता। मा। इनाम गाव पुर्वीपासून चालिले आहेती

| | | | |
|---|---|---|---|
| मौजे आबडे | १ | मौजे चिखलगाव | १ |
| मौजे नाटंबी | १ | मौजे कारी | १ |

एणे प्रमाणे देह च्यार पुर्वीपासून इनाम चालिला आहे त्यास आपण चंदीचे मुकामी जाउनु राजश्री छत्रपतिस्वामीसनिध विनती केली की आपले गाव इनाम आहेती ते दुमाले केले पाहिजे त्यावरून राजश्री स्वामी कृपाळु होउनु इनाम गाव दुमाले करून पत्रे दिल्ही ऐश्यास सदरहू गाव आपणास दस्त मा दुमाले केले आहेती तरी त्याणे आपला आवकात चालत नाही तरी आपले गाव कुलबाब कुलकानु दुमाले केले पाहिजे तेथे किर्दी मामुरी करून सुखरूप राहोनु ह्मणउनु विदित केले त्यावरून मनास आणिता याणी राज्यामध्ये बहुत च कस्ट मशागती केली आहे राजश्री छत्रपति स्वामी कर्नाटक प्रांतास गेले त्या समई मोगलाची फिसात बहुत च जाली होती मजकूरनिले एकनिष्ठेने राहोनु लोकाचा जमाव करून किले विचित्रगड गनिमापासून हस्तगत केला त्यावरी विलायती कुल खराब पडली होती त्याची लावणी संचणी केली त्याउपरी चंदीस जाउनु राजश्री स्वामीसनिध विनती करून सदरहू

ईनाम गावीचे दुमालेपत्र आणिले देशमुख मा। स्वामीकार्याचे एक-
निष्ठ यावरी याचे गाव कुलबाब कुलकानु याचे तुह्मास
आज्ञा केली आहे तरी सदरहू देह च्यार पुर्वीपासून चालिले आहेती
त्याप्रमाणे कुलबाब कुलकानु गाव दुमाल्ल करणे साल दर साल ताजे
सनदेचा उजूर न करणे साल मा। दस्त माल्लुम चालवणे पेस्तर साला-
पासून कुलबाब कुलकानु गाव दुमाले करणे सनदेची ता।लिक लेहोनु




घेउनु असल सनद देशमुखापासी परतोन देणे
छ + + +


पा। छ ११ जिल्हेज सन
बार

---

**लेखांक ३५७ श्री १६२४ चैत्र वद्य १२**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २८ चित्रभानु संवत्सरे चैत्र
बहुल द्वादसी रविवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति यांणी




मताजी स-
र्जाराव जेधे
देशमुख ता।
रोहिडखोरे
यासि आज्ञा
केली ऐसी जे + + विनतीपत्र छ १६ जिलकादचे पाठविलें तें छ
२३ रोजीं प्रविष्ट जालें आपणास इनाम गांव आहेत तेथील तीं वर्षी
इनामपटी दिवाणांत द्यावी ऐसा कैलासवासी राजश्री स्वामीनी
तह केला होता आणि हाली दर हर साल इनामतीची तिजाई वसूल
राजश्री रामचंद्रपंडित अमात्य घेतात तरी पारपत्य करावया आज्ञा
केली पाहिजे ह्मणून लिहिलें तें विदित जालें ऐसियास मावलप्रांती
सार्‍या वतनदारांस तह केला आहे त्याप्रमाणें तुमचा हि इनाम गांवा-

चा तह चालत आहे त्यांत नवें काहीं करितां येत नाहीं व मौजे आ-बवडे आपणास इनाम आहे तेथें बाजार भरतो त्याचा हासिल किले विचित्रगडकरी घेऊन जातात तरी येविशीं पारपत्य करावया आज्ञा केली पाहिजे ह्मणून लिहिलें त्यावरून विचित्रगडकरी यांस आज्ञापत्र सादर केलें आहे तयाउपरी बाजारच्या हासिलासीं कथला करणार नाहीं तुह्मी स्वामीचे पायांसी एकनिष्टे राहून तर्फ मजकूरची लावणी संचणी करून कीर्द मामुरी करणें निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू सुरुनिवीस
सुरु सुद

---

**लेखांक ३५८** **श्री** **१६२९ आषाढ वद्य ६**

स्वस्ति श्री माहाराज राजश्री शाहुजी राजेसाहेब याणी राजश्री मताजीराऊ जेधे देसमुख तो रोहिडखोरे यासि आज्ञा केली ऐसि जे स्वामीचा भाग्योदयप्रसंग होऊन दक्षणप्रांते येणे जाले सांप्रत स्वामीचा मुकाम मौजे चोरवड प्रा उतराण प्रा खानदेश येथे जाला पुढे कुच दर कुच येईजत आहे ऐसियास तुह्मी पुरातन स्वामीचे सेवक एक-निष्ट अहा या प्रसंगी स्वामीच्या दर्शनास येऊन आपले सेवेचा मजुरा करून घ्यावा ऐसे आहे तर स्वामीचे येणे समीप होता च आपले जमावानसी येऊन भेटी घेणे भेटीनंतर स्वामी तुमचे उर्जित विशेषा-कारे करितील + + खातीरजमा राखोन लिहिलेप्रमाणे वर्त-णूक करणे जाणिजे छ १९ रबिलाखर सुा समान मया अलफ

मर्या
देयं रा
जते

---

**लेखांक ३५९ श्री १६२१ भाद्रपद शुद्ध १०**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २६ प्रमादीनाम संवत्सरे भाद्रपद शुध दशमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा + + यांसि आज्ञा केली ऐसी जे सांप्रत सर्जाराऊ जेधे देशमुख ताा रोहिडखोरे याणी हुजूर विनतीपत्र पाठविलें तेथें आपला उबार काही उरला नाही तरी स्वामीने च्यार गाव कबिला ठेवायास दिल्हे पाहिजेत ह्मणौन लिहिले ऐसियास सर्जाराऊ या राज्यातील कदीम त्याचे चालवणें अगत्य यास्तव हें पत्र लिहिले असे तरी तुह्मी त्याकडील सरंजाम काय कैसा करून दिल्हा आहे तो हिला + + + + चालऊन ते सुखरूप राहात ऐसी गोष्टी करणें बहुत लिहिणे तरी तुह्मी सूज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

---

**लेखांक ३६० श्री १६२९ पौष शुद्ध ३**

(चिन्ह) मशहुरल अनाम मताजी जेधे देशमुख ताा रोहिडखोरे यांसि बहिरो मोरेस्वर प्रधान आसिर्वाद सुाा सन समान मया अलफ तुह्मी दोनी पत्रे पाठविली ती पावली राजश्री स्वामीचे दर्शन जालिया उपरि आपणास काय आज्ञा ह्मणुन लिहिले तरी तुह्मी ह्मणजे वतनदार लोक राजश्री स्वामी ए प्रांते आलेवरी हे प्रसंगी तुह्मी सर्व प्रकारे इमाने इतबारे वर्तोन स्वामीचे सेवेसी रुजू असावे हे विहित असे आह्मी हुजूर आहो तुह्मास समाधानपत्रे लेहोन पाठविली आहेती आणि हुजूर दर्शनास बोला-

श्री
शिव नरपति ह
र्षनिधान मोरेश्वर
सुत बहिरव मुख्य
प्रधान +

विले असे त्यासी सांप्रत राजश्री शंकराजीपंतास देवाज्ञा जाली ह्मणून तुह्मी हुजूर यावयाविसी अनमान कराल तरी + + + सा न करणे पत्र पावता च हुजूर एणे तुमचे चित्तानरूप सर्व हि तुमचे अनकूल करून चालऊन ए विसी समाधान असो देणे जाणिजे छ १ सौवाल आज्ञा प्रमाण

ले ख
सीमा समु
ल्लसति

---

**लेखांक ३९१** **श्री** **१६३३ भाद्रपद वद्य ५**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३८ खरनाम संवत्सरे भाद्रपद बहुल पंचमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति

॥ श्री ॰
शाहु नर
पति हर्षनि
धान मोरेश्व
रसुत भैरव
प्रधान

॥ ॰
श्री
आई आदिपुरुष
श्री राजा शाहु छत्रपति
स्वामि कृपानिधि तस्य
परशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

स्वामी याणी रा मताजी सर्जाराऊ जेधे देश- मुख भोर तपे रोहि-डखोरें यांसि आज्ञा केली ऐसी जे तुह्मीं विनतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें लिहिले वर्तमान विदित जालें हरामखोराचे लस्करानी धामधुम बहुत च केली मुलुक वैरान जाला हरामखोराचे लोकामधें आपणामधें जुंझ जालें च्यार पांच आपणाकडील पडिले त्याकडील च्यार पाच पडिले सात पाच जखमी जाले स्वामीचे पुण्ये फते जाली अमची निष्टा स्वामीच्या पायासीं आहे त्यांचा हिसाब धरितों असे नाहीं ह्मणोन लिहिलें हरामखोरास नतीजा दिल्हा उतम केले पुढें हि त्याचा हिसाब न धरितां वरचेवरी टेंचगा देत जाणें आपले निष्ठेचें वृत लिहिलें तरी तुह्मीं वतनदार एकनिष्ठसेवक आहा तुह्मांस स्वामीचे पायांवेगले दुसरा

अवलब नाही हा स्वामीस तुमचा भरवसा आहे ऐसें असतां स्वामीकार्यास अंतर कराल हें काय घडों पाहतें हरामखोराचें कहीकाबाड मारून आपले सेवेचा मजुरा करून घेणे स्वामी तुमची सर्फराजी करितील लेखनालंकार

मर्या देयं विरा जते

सुरु सुद

---

**लेखांक ३६२**

श्री सहश्राय चिरंजीव राजश्री सिउबास व सुभानजीस बाजी सर्जाराऊ देसमुख ता भोर किले रोहिडा आसिर्वाद उपरी मा हा साहेबास अर्ज लिा आहे तो पावता करुनी जाब घेउनी पाठविजे व माहाली होन दाहा कारकुनी मागितले आहे तरी ये बाबे रा

स लिहिले आहे त्याची भेटी घेउनी हुजूर अर्ज करुनी रोखा मागोन पाठविजे अमच्या हकात होन ४५ धरिले आहेती आणि मागती तगादा करितात तरी देसकुळकर्णी याचे इनामती खंडणीमधे मजुरा घेत ऐसा रोखा मागोनी पाठविजे बुबुचा समाचार पाठविजे हा आसिर्वाद

शिक्का मराठी

मोर्तब सुद

दायकोजी कृष्ण बाबाजी कृष्ण आसिर्वाद———साहेबाची आमची मुलाखती जाहाली सरजामी नाही कळले पाहिजे

---

---

लेखांक ३६३ श्री

जेधे बांदल याचे झुंज सिवेचे खटले व नदीबदल जाले त्याचा करीणा जेधे याणी चापजी नाईक बांदल याचा नांदगावाजवळ मोडून डोगरास लाविले त्यास कृष्णाजी नाईक याणी बाजी प्रभु देशपाडे ताा हिरडसमावळ यासी बोलावून विचार करून मग दिपाई आवाचे पाईची बेडी तोडून मग दिपाई आवा याणी स्नान करून कृष्णाजी नाईक यास व बाजी प्रभूस वोवाळून यशवंत होणे असे बोलून बाजी-बावास घोडा बसावयास दिल्हा राजश्री कृष्णाजी नाईक संभु प्रसाद घोड्यावर बसले मग कासारखिंडीस ठेऊन बाबाजी पोलास आज्ञा केली जे बाबाजी मामा पाड पाहाणे यात पाड पाहिला तो + + ते-चा निघाला तेव्हा चापजी नाईक यास जमावासुधा बोलाविले नांदगावाजवळ वड थोरला होता त्याखाली जेधे ठेऊन नदी पाठीसी घालून बैसले होते तेव्हा सर्व जमाव बांदलाकडील एकजागा होऊन जमावास कडवीच्या वऱ्या वाटून देऊन चालून घेतले झुज जाले तेव्हा जेधे मोडून कारीपावेतो नेले गाव लुटून पस्त केला राणीवसा मात्र राखिला तेव्हा माघारे मुरडून चालले तेव्हा कृष्णाजी नाईक याचे डोईचे मुंडासे आमलाच्या मदे झोटधरणीत पडले होते ते बाजी प्रभु याणी याद धरून घोडियावरून उचलून तोबरीयात घातले होते तेव्हा कृष्णाजी नाईक बोलिले जे बाजी प्रभु एक दोन लढाया जाल्या परंतु आज फते जाली जेधोजीने शीर मात्र नेले तेव्हा बाजी प्रभु याणी उतर दिल्हे जे तुह्मी बारा मावलात यशवंत आहा तुमचे इतर काम होईल असे ह्मणौन घोडीयावरून उतरून तोबरियातून मुंडासे काढून दिल्हे तेव्हा मुडासे बांधून मग बाजीबावास पोटासी धरून नाईक बोलिले जे बाजी प्रभु तुह्मी शर्थ केली

---

## लेखांक ३६४

माहाराज राजश्री साहेब कैलासवासी याजवळ स्वारानसी सेवा केली त्यास थोरले राजश्री कैलासवासी स्वामी पुणीयास पाठविले यासमागमे आपले आजे कान्होजी नाईक स्वारानसी दिल्हे याणी एकनिष्टेने सेवा करावयाची ते केली वतनामुळे हि रुजुवातीने राहिले त्यावरी राजश्री दादाजी कोंडदेव सिवापुरास आले ते समई कृष्णाजी नाईक बांदल देसमुख ता। हिरडसमावळ बारामावळामधे जोरावारीने बइते घेत होते ते समई आपले आजे कान्होजी नाईक याणी बांदलास बइते दिल्हे नाही जोरावारीने तरवारेच्या बळे आपल्या माहालात येऊ दिल्हे नाही यावरी राजश्री थोरले कैलासवासी स्वामी कारभार करू लागले ते समई गनीम चालोन आला याकारितां पाईच्या लोकाचा व लष्कराचा जमाव करू लागले आपले आजे कान्होजी नाईक यास बोलऊ पाठविले तेथे हि आपल्या जमावानिसी गेले त्यावरी मावळे लोकाचा जमाव व स्वाराचा जमाव करून मौजे खळदबेलसर येथे गनीम आला होता त्यावरी राजश्री थोरले कैलासवासी स्वामी गेले याबराबरी आपले बाप बाजी नाईक याणी निशाणाचा भाला घेऊन गेले आपल्या लोकाचे व गनीमाचे भाडण जाले तेथे तरवाराची शर्ती करावयाची ते केली गनीम मारून मोडिला त्यावरून राजश्री कैलासवासी स्वामी मेहरवान होऊन आपल्या बापास सर्जाराई दिल्ही त्याउपरी राजश्री स्वामीनी मातबर जमाव करून राज्ये हस्तगत करू लागले मावळप्रांतीचे गड किले घेतले राज्य वृधीते होत चालिले त्यावरी अफजलखान राजश्री स्वामीवरी चालोन आला तो वाईस येऊन राहिला ते प्रसंगी खंडोजी खोपडे पारखे होऊन अफजलखानास भेटले आणि राजश्री थोरले कैलासवासी स्वामीस धरून देतो ह्मणऊन कबुलाती केली ते प्रसंगी आपले आजे कान्होजी नाईक याणी आपली माणसे व वस्तभाव पळविली ती तळेगावी नेऊन ठेविली आणि

आपण व आपले बाप सर्जाराव जेधे व चुलते सिवाजी जेधे व चांदजी जेधे व नाइकजी जेधे व रायाजी जेधे राजश्री स्वामीचे भेटीस आले तेव्हा राजश्री बोलिले की खंडोजी खोपडे अफजलखानासी भेटले आपली देसमुखी यापासून मागोन घेतली तुह्मी याची भेटी घेऊन आपली देसमुखी जतन करणे ह्मणून बोलिले त्यावरी कान्होजी नाईक बोलिले की आपण देसमुखी साहेबाच्या पायावरी ठेविली आहे साहेबाच्या बऱ्याने आपले बरे हे च निष्ठा आपली आहे ऐसे बोलिले आणि इमान दिल्हा त्यावरी राजश्री स्वामीनें हि इमान देऊन डोईवरी हात ठेऊन बोलिले जे भोसल्याचे वंशी जो राज्य करील त्याने तुमचे वंशपरंपरेने चालवावे ऐसा इमान दिल्हा त्यावरी जमाव करून राजश्री समागमे प्रतापगडास गेले अफजलखानाचे भेटीचे समई आपले बाप व चुलते धारकारियामधे नेमून बा। घेतले अफजलखान जिवे मारिला कुल फौज लुटिली ते समई आपल्या वडीलानी बहुत शर्ती करावयाची ते केली ते प्रसंगी खंडोजी खोपडा पाडाव जाला त्यास राजश्री स्वामीनी शास्ती केली त्यावरी शास्तीखान पुणियास आला ते समई राजश्री स्वामी चालोन गेले तेव्हा हि आपले बाप व चुलते समागमे गेले होते तेथे हि शर्ती करणे ते केली त्यावरी राजश्री स्वामीनी हि बोलिल्या बोलाप्रमाणे चालविले पानमान आपला आपणास देत आले त्यावरी राजश्री स्वामी थोरले कैलासवासी दिलीस अवरंगजेब पातशाहाचे भेटीस गेले ते समई हि आपले बाप सर्जाराव समागमे गेले होते तिकडून आलियाउपरी राजश्री कैलासवासी स्वामींनी चंजीप्रांते मोहीम केली भागानगरास गेले तेथून पुढे कर्नाटक हस्तगत केले ते समई हि आपले बाप सर्जाराव समागमे गेले होते आपल्या वडिलानी कोण्हेविसी एकानिष्टेस अंतर केले नाही राजश्री स्वामीनी आपले सर्वस्व चालऊन खोपड्या अगोधर पानमान दिल्हा आहे त्यावरी अवरंगजेब पातशाहा तुळापुरास आला त्याचे पुत्र अजमशाह

सिरवळानजिक येऊन राहिले होते तेथे किले रोहिडा घ्यावयाचा प्रसंग पडिला की किलाची पाने घेणे ते समई आपले बाप सर्जाराव जेधे याणी पाने घेतली नाहीत खोपडीयाने पाने घेतली आणि बाळाजी नाईक खोपडे याने येऊन रोहिड्यास चौकी बैसविली ते समई गडास सिधोजी जाधव किलियास हवालदार होते त्याकडे सर्जाराव जेधे याणी माणसे पाठऊन सामान व गला रातोराती आपले तरफेचा पाठविला हे वर्तमान बालाजी खोपडे यास दखल जाले त्याणी वजीर-अली सैदमजली ठाणेदार होता त्यास सांगितले त्याची स्वारी मुलुकात आणिली त्याने मौजे करंजीये ता। मजकूर येथे येऊन मुकाम केला आणि मौजे नाटंबी व करंजीये व सांगवी तिन्ही गाव लुटून खराब केले बाळाजी खोपडे यास कारीस सर्जाराव यास आणावयास पाठविले त्यास सर्जाराव यास वेथा जाली होती याकरिता आपणास बाळाजी नाईकाचे हाती दिल्हे त्याणी सैदमजली जवळ आणिले त्यास सैदमजलीने ताकीद करावयाची ते केली आणि बोलिले याउपरी तुह्मी फितवा केलां ह्मणजे तुमचे बरे होणार नाही ऐसी ताकीद केली त्यास आपला मुदई बाळाजी नाईक जवळ आहे नस्ते तुफान करील याजकरितां त्या बा। आपणास गडाखाले चौकीस बैसावे लागले खोपड्यामुळे किला सी बंद जाला त्यावरी किलेकरी याने पातशाहाकडे राजकारण लाऊन किला नजर केला त्यावरी चंजीप्रांते राजश्री कैलासवासी स्वामी होते तेथे आपले बाप सर्जाराव जाऊन भेटी घेतली त्यावरी राजश्री इकडे आले तेव्हा हि तांबीचे मुकामी आपल्या वडीलानी खोपड्या अगोधर पाने घेतली आहेत हे ज्ञातीचा पानामानाचा करीणा आहे पानमान येणेप्रमाणे घेत आलो आहो त्यावरी प्रतापगड प्रसंग पडिला तेथे निर्वाह जाला नाही आपल्या वडीलानी सदरहूप्रमाणे पानमान घेत आले आहेत

---

लेखांक ३६५ श्री २६११ आषाढ शुद्ध द्वितीया

श्री
शंभोः शिव
जातस्य मुद्रा द्यौ
रीवराजते ॥ यदं
कसेविनो लेखा
वर्तते कस्य नो
परि

पत्र नियत पारतोसिक मा। येसजी कंक सरनोबत व कृष्णाजी येसजी कंक पदाती नायक शक १२ क्रोधननाम संवत्सरे आषाढ शुध द्वितीया भोमवासर सुा। सीत समानीन अलफ मा।निलेनी व कृष्णाजी

श्री ॥ शंभु नर
पति हर्षनिदान मोरे
श्वरसुत नीळकंठ
मुख्य प्रधान

कंक मा।निलेचे पुत्र यां दोघानी फोंडांचे स्वारीस फिरंगी यांसि गाठी पडिली तेव्हां बहुत कस्त केली आणि गनीम मारून काढिला ते वख्ती दोघाला हि जखमा लागोन चकचुर जाले. कठीण जखमा राजश्री स्वामीनी दृष्टीने पाहिल्या आणि घरासी जावया आज्ञा दिल्ही त्यावरी कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटोन घरी मयत जाला हालीं येसजी कंक हे हुजूर येऊन आपले वर्तमान विदित केले त्यावरून स्वामी कृपाळु होऊन हे कामाचे मर्दाने स्वामीकार्यावरी तत्पर आणि याचा पुत्र हि स्वामिकार्यावरी मयत जाला फोंडांचे बकसीस द्यावयाचे होते ह्मणौन छ मजकुरी पारितोषिकाची मोईन केली होन पादशाही बेरीज २०००

एा। दोनी सहस्र होन रास

खासा येसजी कंक सरनोबत हौन १०००ऽ

कृष्णाजी कंक मा।निलेचे पुत्र स्वामिकार्यावरी पडिले ह्मणौन दिल्हे होन पा। १०००ऽ

एणेप्रमाणे एक साला ये वर्षी पारितोसिक द्यावयाचा नियत केला असे
लेखनालंकार

मर्या
देयं विज
यते

तेरीख ३० रजब
सुा सीत
बार

सुरु सुद बार

---

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

# सातारा—राजोपाध्ये

**लेखांक ३६६** **१५१४ मार्गशीर्ष शुद्ध ९**

अज रखतखाने खुदायवंद खाने अजम फराबाद तुलीदयाम-दौलतहू बजानीब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी परगणे + + बिदानद सुा सलास तिसैन व तिसा मया बाो रामेस्वरभट बिन नारायणभट धर्माधिकरणी सो आरवी मुदगल हुजूर एउनु माळूम केलें कीं आपणास इनामे दर सवाद मौजे वडिगौ पाा मजकूर जमीन पोलीन रुके बारा -।· ची भोएड माहाद पाटिल बिन पील पाटील ठोंबरा मुजेरी मौजेमजकूर दाा कुलबाब कुलकानू व नख्तयाती आपणास इनाम आहे भोगवटा कारकीर्दी दर कारकीर्दी वजिराने ताा खाा दस्तुरखां चालिले आहे हाली परगणेमजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला माहाली कारकून खुर्दखताचा उजूर करिताती तरी मन्हामती फर्माउनु बदल खैर खुर्दखत दोये माळूमे जाले तर रामेस्वरभट बिन नारायणभट यास सदहू इनाम मौजेमजकुरी जमीन पोलीन रुके -।· बाराची माहाद पाटेल ठोंबरा इनामे आहे भोगवटा वजिराने कारकीर्दी दर कारकीर्दी ताा खाा दस्तुरखा चालिले आहे तुह्मी माहाली तसरुफाती करुनु भटाजी मस्यारुनुइलेचा इनाम दाा कुलबाब कुलकानू व नख्तयाती बाब महसुलेसी दुमाला कीजे दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे तालीक घेउनु असेली इनामदारासी दीजे

तेरीख ७ माहे

रबिलावल

फारसी

**लेखांक ३६७** **१५१९ मार्गशीर्ष वद्य १२**

अज रखतखाने राजश्री बाबाजी राजे भोसले दामदौलतहू ब्रिजानेबु कारकुनानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी कसबे पेडगौऊ पा। पाडेपेडगौऊ ब्रिदानद सु॥ समान तिसैन व तिसा मया दरवज इनाम बदल धर्मादाऊ बो।

रामेस्वरभट बिन नारायणभट चिंतामनीभट बिन बाळंभट

सेकिन आखी मुदगल हर्ची जमीन दर सवाद प्रज रामजी चिखलठाणा गज सरायनी चावर १। सवा एदमो नखतयाती वमहसुलु कुलबाब कुलकानू दिधले असे दुमाला कीजे अवलादी अफलादी चालो दीजे दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली खुर्दखत इनामदारमजकुरापासी दीजे मोर्तबु

तेरीख २५

माहे जमादिलोवलु माहे जमादिलोवलु

---

**लेखांक ३६८** **१५२८ श्रावण शुद्ध ३**

( फारसी मजकूर )

श्री कारकुनानी मामले अहमदाबाद व बाजे माहाल समत

जाफराबाद बिदानद देहाये बाजे कर्याती मामले अहमदाबाद बा। दर बाब आ की देहाये मामलेमजकूर सु॥ सबा अलफ दर वज मुकासा बदल मवेजिबू मालोजी व विठोजी सरगुऱ्हो यासि गुऱ्हो थल यास दिधलें असे लाहा माहासूले थल बामजरे मौजे गौडगौ कसबे महमदापुरु

फारसी

मोर्तब सूद

छ २ माहे रबिलाखर

---

**लेखांक ३६९** **१५२८ श्रावण शुद्ध ५**


॥ कारकुनानि समत दौलताबाद बिदानद मौजे कोरलें पा। खांडालें बा। * दर बाब आ की मौजे मजकूर सु॥ सबा अलफ दरवज मुकासा बदल मवेजिबु मालोजी व विठोजी भोसले सरगुऱ्होयाती गुऱ्होथल यास दिधले असे बाबा माहासुलेसीं दुमाला कीजे मोर्तब सुद

छ २ माहे रबिलाखर

---

* बाज आउर्द

**लेखांक ३७०** **१५२८ श्रावण शुद्ध ३**



( फारसी मजकूर )

ॐ कारकुनानि समत दौलताबाद बिदानद परगणे कनरड समत मजकूर बाा दर बाब्र आ की पाा मजकूर सुाा सबा अलफु दरवज मुकासा बदल मवेजिबु मालोजी व विठोजी भोसले सरगुर्‍हायाती गुर्‍होथल यास दिधले असे बाबा माहासूलेसि दुमाला कीजे देखील किले व कोट मुकासा नफती व जातेगौ व वाकडी


मोर्तब सुदु

छ २ माहे रबिलाखर

---

**लेखांक ३७१** **१५२८ श्रावण वद्य २**

माा मालोजी व विठोजी भोसले



ॐ कारकुनानी माहालहाय व देसमुखानी माहालहाय माा सर्क मादबर मुताले नुमाइन सुाा सबा अलफु बार नुमा + + + + + बानि + +


पा ३
पा एळूर
पा देऱ्हाडी
पा कन्नरड
देखील जातेगौ
वावले
खेरीज किलेकोट
इनाम

कसबे ६ खेरीज इनाम
कसबे लासूर
पा गांडापूर
कसबे आधारसूल
प्रा अहमदाबाद
मौजे पोरले
प्रा अहमदाबाद
मौजे पिंपळवाडी
पा पैठण
गौडगौ उरुफ अहमदाबाद

सदर्हूप्रमाणे दिधले असे बाबमहसुलेसी दुमाला कीजे मोर्तब सुद
तेरीख १५ माहे रबिलाखर
रबिलाखर

---

**लेखांक ३७२** **१५२९ श्रावण शुद्ध ९**



अज रख्तखाने खुदावंद मलीकाने मलीक अंबर मुखलिसान दामदौलतहू ब्रिजानेब कारकुनानी परगणे पांडियापेडगाऊ व हुदेदारानी अजहती मोकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमानी कसबे चांभारगोंदें पा मा बिदानद सुा समान अलफ

दामोधरभट बिन नारायणभट रामेस्वरभट बिन नारायणभट
सा आखी मुदगल हुजूर मालूम केले जे आपणासी इनाम जमीन

चावर एक १८ देखील नखतयाती व बाजे बाबा दर सवाद कसबेमजकुरीं देणें मारहम मालोजी व विठोजी भोसले बा हुजती भोगवटे तसरुफाती चालिले आहे साहेबाचे खुर्द खत होये मालूम जाले बराये मालूमाती खातिरेसी आणौनु दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट यासी इनाम जमीन चावर एक १८ दर सवाद का मा देखील नखूतयाती व बाजे बाबा देणें मारहम मालोजी व विठोजी भोसले भोगवटा तसरुफाती बा मुती चालत असेली तेणेप्रमाणे चालविजे दर हर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली फिराउनु दीजे मोर्तब सूद





तेरीख ७ माहे रबिलाखर रुजू सुरनीस

रबिलाखर सुरू सूद

रुजू बार सूद

---

**लेखांक ३७३** **१५३० पौष शुद्ध ७**



अज् रखतखाने मसुरल हजरती माहामेरू अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यराजश्री लखमोजी राजेसाहेबु ता हुदेदार व मोकदम मौजे बारडेगौ पा पांडियापेडिगौ सुा तिसा अलफ मकसूद दामोधरभट व रामेस्वरभट सो आरवी बदल धर्मा चावर एक यास इनाम दिधला असे प्रज याचे सेत सेराएणिनी गजें मोजुनु जमीन

चावर एक दीजे दामोधरभट व रामेस्वरभट यास गले इनाम दिधला असे हे मोर्तबु

तेरीख ५ माहे सवाल

---

**लेखांक ३७४**

कृस्णारपन


-॥ﷺ श्रीसकलतीर्थस्वरूप महामेरु वेदमूर्ति राजश्री दामोधरभट गोसावी यासि तथा चिंतामणभट गोसावी यासि तथा राजश्री रंगनाथभट गोसावी यासि तथा राजश्री विठलभट होसिंग तथा दिवाकरभट गोसावी यासी तथा पिलंभट गोसावी यासी व समस्त ब्रह्मपु+मौजे आरवी मुदगल गोसावी यासी चर्णरजे सेवके किमात्रे रामाजी एकदेऊ व विसाजी सायदेऊ श्रीसास्टांग नमस्कार विनंती विसेखु गोसावियांचे गावीं आमच्या वडिलाची मिरासी घर भुमी स्थल आहे ते भुमी आमचे वडिलीं रंगोपंत चुलते तेहीं राजश्री रामेस्वरभटास बुद्धिसंकल्प घालून दिधलें आहे वडिली दिधलें तें आह्मी दिधलें यास सरण्या अनु सारखे नाहीं ए विसईं काही संधेह नाहीं राउलास कळलें असावें यावरी आह्मी आइकतों जे चवडभट कोकने ते भुमीसाठी करकर कारितात तरी त्यांस काय समंध आहे जे लाइनी कचाट कारितात आमचे आह्मी दिधले त्यास गोसावी सांगने जे लाइनी करकर करुनु काम नाहीं गोसावियास परंपरा समाचार कळला आहे आमची मिरासी आह्मी दिधलियास करकर करावया काय कारन आहे त्यांस सांगनें लाइनी कचाट न करनें कृपा लोब असो देनें कळावे हे विनंती ए विसी समाचार राजश्री चिंतामणभट गोसावियापासी व सिदणभट पारगौकर त्यापासी सांगितलें असे हे विनंती

दा सेवके किमात्रे एबाजी रामे सास्टांग नमस्कार विनंती लिा परिसिजे कृपा असो दीजे हे विनंती

---

**लेखांक ३७५** **१५३३ आश्विन**

अल् मुल्क् उला




फर्मान् हुमायून् सर्फ् सुदुर्याफ्त् बजानीब मुतालिकान् व कारकुनान् कर्यात मालेवाडी के अज् जानिब अमदे दौलतखाहान बर जादा अखलास् मुस्तकीम व जुबदे मक बर दर देहाय इसदु दमान् कदीम् हाल् अल्शासिनी अल्मकान् हैबतखान् नसब् अंद् व देसायान् अंद् चूं मकदमल् इम् साल् विठोजी भोसले नजदीक् सिरस कोहे संभू नियत् बिना नमूदा सिंगनापूर नामीदा अस्त बिनाबरां बमराहीम बतदरगे खुशखाना व अताफ् दम्कारम् पादशाहाना मुकदमी + + स्ता कर्द् औलादी व अहफादी कुरसी दर मकदमल् इन साल मोमीनुलेह इनायत् नमूदा ईम् मीबायद् के मोमीनुलेरा मुकदम् मजकूर दानिस्ता मोकरर व बाद ऊ बऔलाद व अहफाद ऊ सालाबाद साल हाल नमीदारीद दरामियान के तालीक निविस्ता साबिक फर्मान करदह असल फर्मान बाज देहंद बरहुकूमे फर्मान

---

**लेखांक ३७६** **हिजरी १०२० साबान**
**शके १५३३ आश्विन**

अलमुल्कउल्ला



( फारसी मजकूर )


ॐ फर्मान हुमायून सरफ सुदुर याफ्त बजानिब मुतालिकानी

व कारकुनानी कर्याती मालेवाडी के अज जानिब आमदे दौलतखा-
हेनी बर + + + मुस्तकीम व जुबादे मक बर दर
देहाये इसरु दमान कदीम हाल अलशाहीनी अलमकान हैबतखान नसब
असे व देसाईयान असेत चूं मकदमल इमसाल विठोजी भोसले नज-
दीक व वज + + + + + नियत
बिना करउनु सिंगणापूर पाठविले असे बिनाबरां बमराहीम बतसरगे
खुशरवाना व अताफ दमकारम पादशाहाना मुकदमी मजकूर अवलादी
व अफलादी कुरसी दर + + मुकदमल इनसाल मशारनुले
अनायत फर्माविले असे जे मोमीनुलेसी मुकदमत इनायत मजकूर देउनु
मोकरर जाणणें + + + अवलाद अपरादरा रिकाप पाद-
साहाद हुबहू तालीक फर्मानी घेउनु असेली फर्मान फिराउनु दीजे
बरहुकूम फर्मान रवा छ माहे साबान पा ऊरू असरफान हमायून आ-
ला बा खान अलीशान रया अल कदरवल मकान खा मजालसीहू

---

**लेखांक ३७७** **१५३३ कार्तिक वद्य १०**

हुवलखलील



( फारसी मजकूर )


६) अज रखूतखाने खोदायवंद खाने अलिशान हैबतखान
तूलिदयादौवलतहू ता कारकुनानी व देसाईयानी का माल्लुम बाद सुा
इसने असर अलफ चूं दरीं वखूत फर्माने हुमायून सादीर जाहाले जे
पेठ सिंगणापुरीची मोकदमी मोकदमल बेनिसाल विठोजी भोसला बदा-
याद अफाद मरहामत करुनु दिल्हे आहे तुह्माकारणे ह्मणउनु तरी
बाफर्मान पेठ मजकुरीचे मोकदमी भोसले मशारनिलेचे दुंबाला केले

कीजे तालीक लिहून घेउनु असेली परतोंनु दीजे मोर्तब सूद

तेरीख २३ माहे रमजानु

---

**लेखांक ३७८** **१५३३ मार्गशीर्ष वद्य १**




श्री अज दिवाण + + + मामले + + + गोयाजी + + + चौगला वा सुलोबा कुलकरणी वा सेटिये वा माहाजन वा समस्त प्रजा पेठ सिंगणापूर कर्याती मजकूर सुा इसने असर वा अलफ दिल्ह + + दरीं वख्त खुर्द खत रख्तखाने मोक + + तेरीख २३ माहे रमजान सन असर व अलफ आह्मी + + विले जे पेठ मजकुरीचे मोकदम पूर्व कदीम इ + + विठोजी भोसला आहे याचा फरजंद बरहुकूम फर्मान हुमायून + + + + + तालीक लहौनु घेउनु असली परतौनु देणे ह्मणउनु तरी बरहुकूम खुर्द खत पाा मजकुरास पाटेलगी विठोजी मशारुनइलेचे दुंबाला केले असे + + + + + + + +

मोर्तब सुद

तेरीख छ २५ सौवाल


---

लेखांक ३७९ १५३४ श्रावण शुद्ध ३



अज रखतखाने खुदायवंद मा सर्क मा अंबर तुलीदयामे दौवलतहू बजानेबु कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी परगणे संगमनेर व हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मुजेरियानी व मोहतर्फारया कसबे वावी पा मजकूर बिदानद सु॥ सन सलास असर अलफ कसबे मजकुरी पेसजी बांउजी बिन मोकदम होता तेणें रावोजी ठोंबरा कसबे मजकूर यासि मारा करोन मारिला व तेरा खून केले + + + + + जे हरामखोर + + + परागंदा जाला त्यावरी हुजुरून बालसा घेऊन याची गर्दन मारिली व अवघे पोंगडे मारिले हालीं कसबे मजकूरची मोकदमी संभाजी बिन विठोजी भोसले यासि हुजुरून मर्‍हामती करून मिरासी करून दिधली असे औलाद व अफलाद चालवीजे पेस्तर बाउजी + + तेली वा दार व गोत्र व हरकती करून उभे राहातील त्यांची गर्दन मारिजे हालीं संभाजी बिन विठोजी भोसला यासि मोकदमीं मर्‍हामती केली असे या पासुनु मोकदमीचें काम घेत जाइजे औलाद व अफलाद चालवीत जाइजे दरी बाब फर्मान हजरती बसिके + + संभाजीपासी असे तेणेप्रमाणे यांची मोकदमी चालवीजे पा हुजूर मोर्तब सुद


रुजु सुरुनिवीस




तेरीख १ माहे जमादिलाखर

जमादिलाखर बार सुद बार सुद

**लेखांक ३८०** **१५३४ श्रावण वद्य २**



ॐ अज रखतखाने खोदायवंद खान अलीशान हैबतखान



दामदौलतहू ताा आतामलीक नायब गैबत वा कारकुनानि पाा वाई बिाा हर्ची सुाा सलास असर अलफ जमीन

चावर १॥ दर सवादहु मौजेन मजकूर


| | |
|---|---|
| मौजे बोरीखल | मौजे किणही |
| १ | -॥- |

बाा इनाम बोा गोपीनाथभट बिन रामेस्वरभट जुनारदार तवीब अवलाद राघो परसराम मरहूम बाद ऊ औवलियाद आफाद ऊ बमोजीब भोगवटा खुर्दखत रखतखान मोकरम दर सालगुाा मुतैन खा अस्त बायद की एशाबनोका तागायत सालगुाा चालिलेप्रमाणे भोगवटा वा तसरुफाती पाहून दुंबाला कीजे तालीक लिहून घेऊन असली परतोनु दीजे मोा

तेरीख १५ माहे जमादिलाखर

---


**लेखांक ३८१** **साक्षश्रीशंभु** **१५३७ फाल्गुन शुद्ध ४**



शके १५३७ राक्षसनामसंवत्सरे सीमगा सुध चतुर्थी वार शनिवार सुाा सीत असर अलफ तद्दिनीं राजश्री दसोजी बिन विठोजी

भोसले येही जानोजी बिन कनकोजी वेवगे मोकदम व चौगले मौजे कविंठे पाा पुणे यास लिहून दिधले ऐसे जे मौजे मजकुरीची मोकदमी व चौगलकी तुमची तुमचा बाप कनकोजी वेवगा चौगलकी खात होता व मोकदमीबदल रामोजी सीपारेकरासी भांडत होता जे मोकदमी आपली तुज आपले वडिलीं जेवणाईत करून ठेविले आहे तुझी मोकदमी नव्हे तू मोकदमीचे काम चालवू नको याबदल रामोजीन कनकोजीस व आकपाटेलास व वाघोजीस मारा करून मारिले तुझी वस्तभाव व गुरेढोरे नेली तू धाकुटा होतास तुझी पाठी राखे ऐसा कोण्ही नव्हता याकारिता रामोजी सीरजोरीन मोकदमी खातो ह्मणोन तुवा मोकदमीचे वादाची पाठीराखणाबदल आह्मास आपली चौगलकी निमे देखील हक्कलाजिमे व मान व पाने व लुगडी व सेत एकीदोरी व घर समुदे दिधले आहे आह्मी खाऊन तुझी पाठी दिवाणांत व हरएक बाब राखणे तुवा रामोजीसी मोकदमीचे गोता वाद सांगोन मोकदमी साधून आह्मास मोकदमी देखील हक्कलाजिमे व मान व पाने व लुगडी व सेते व घरे देणे मोकदमी आमचे हातास आलेयावरी तुवा आपली चौगलकी समुदी सुखे खाणे यास आनसारिखे कराल

तरी + + + + असे



गोही

रामेस्वरभट सेाा आरवी मुद्रल पत्रप्रमाण साक्ष कृष्णाजी मोकदम काा चांभारगोंदे

रूपाजी मोकदम मौजे आरवी पत्रप्रमाण ह्माकोजी वडितकर चौगला मौजे वडू पाा पांडियापेडगाऊं

**लेखांक ३८२** **१५३८ मार्गशीर्ष वद्य ४**

( फारसी मजकूर )

अज दिवाण पा। पुणा ताहा मोकदमानी मौजे वडगाऊ ना। पेडगाऊ का। पाटस पा। मजकूर दा। की हरची सु॥ सन सबा असर अलफ खुर्द खत रफूतखाने छ २६ माहे रमजान पैवस्तगी छ १७ माहे जिल्हेज सादीर असे जे रामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार सा। आरवी मुदगल माल्हूम केलें जे आपणासी इनाम जमीन वाहाती रुके ·।· प्रज माहामद पटेल ठोंबरा मुजेरी दर सवाद मौजे मजकूर सालाबाद चालिले असे तरी मोकासाई मौजे मजकूर आपुले इनाममधे बिघे वा गला घेउनु जात असे वा पेसजी घेउनु गेले असे आपुले बिघे वा गला मोकासाई नेले असे ते फिराउनु देवणे ह्मणउनु तरी मौजेमजकुरीचे मोकदमासी ताकीद करून मोकासाईयाचे बाकीमधे इनामदाराचे बिघे वा गला जे नेले असेल ते ताकिदी करून दीजे पेस्तर ऐसे आमल होऊ न दीजे वा सालाबादप्रमाणे इनामाचे सेतीचे हिसा एईल ते दुंबाला कीजे तालीक घेउनु असल फिराउनु दीजे ह्मणउनु तरी बा। रजा सदरहू इनाम दुंबाला केले असे सालाबादप्रमाणे इनामाचे सेतीचे हिसा एईल ते दुंबाला कीजे मोर्तब

तेरीख १७ माहे जिल्हेज


---

**लेखांक ३८३** **१५३९ माघ वद्य ११**

अज रखतखान खुदायवंद आगौ अजम आगौ मुमरास तूली-


दयामदौलतहू बिजानेबू हुदेदारानी व मोकदमानी हाल व इस्तकबाल मौजे देउलगाऊ ना॥ आलेगौऊ पा॥ पुणें सु॥ सन समान असर अलफ दामोधरभट बिन नारायणभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो॥ आरवी हुजूरु एउनु मालूम केले जे आपणास इनाम सेत कदीम बेव-जूरीज व दा॥ नख्तयाती व बाजे बाबा कुलबाब कुलकानू साल बाद-गहदम चालिले आहे व पेसजी हि तसरिफाती भोगवटे पाहौनु खाने अजमे हैबतखान इहीं दुमाले केले आहे हालीं साहेबास मुकासा अर्जानी जाला हुदेदार खुर्द खताचा उजूरु करिताती ह्मणौनु मालूम केले तरी दामोधरभट बिन नारायणभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो॥ आरवी यासी मौजे मजकुरीं इनाम जमीन कदीमे सेत खासा मिरासी दा॥ नख्तयाती व बाजे बाबा कुल बाब कुल कानू दोरी सवा १।· आहे हे भोगवटे व तसरफाती पाहौनु दुमाले कीजे दर हर साल खुर्द खताचा उजूरु न कीजे तालीक घेउनु असली फिराउनु दीजे अलादी व अफलादी चालवीजे

तेरीख २४ माहे सफर



---

**लेखांक ३८४** **१५२९ फाल्गुन शुद्ध ५**



अज रख्तखाने राजश्री सर्जाराऊ राजे दामदौलतहू ता॥ हुदे-दारानी व मोकदमानी हाल व इस्तकबाल मौजे वडिगौ ना॥ पेडिगौ कर्याती पाटस पा॥ पुणे ब्रिदानद सु॥ समान अशर अलफ रामेस्वर-


भट बिन नारायणभट सो। आरवी मुदगल हुजूर मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर वाहाती कास देखील मळऐ रुके -।- दर सवाद मौजे मजकूर प्रज माहाद पाटील ठोबरा सालाबाद तसरुफाती चालिले आहे हाली साहेबास साल मजकुरा कारणे मुकासा अर्जानी जाला आहे हुदेदार ताज्या खुर्द खताचा उजूर करितातो सरंजाम होय मालूम जाले रामेस्वरभट बिन नारायणभट सो आरवी यास सदरहू इनाम ता। तसरुफाती आहे तेणेप्रमाणे दुमाला कीजे दर हर साल ताज्या खुर्द खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असली खुर्द खत भटांपासी फिराउनु दीजे मोर्तब सुदु




तेरीख ३ रबिलोवल


---


**लेखांक ३८५** **१५४० आश्विन वद्य ७**



( फारसी मजकूर )







अज दिवाणि रखूतखाने रवास बजानेबु कारकुनानी व देसमु-

खानी सा। दौलताबाद व मुकासाईयानी व हुदेदारानी अजहती मुकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे चांभारवाडी पा। एळूर सा। मजकूर बिदानद सु।। सन तिसा असर अलफ नारायणभट बिन दामोधरभट व प्रभाकरभट बिन रामेस्वरभट सो। आरवी मुदगल बंदगी हजरती मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर एक गज सरायनी दर सवाद मौजे चांभारवाडी पा। एळूर सा। दौलताबाद देखील नखतयाती ता। देहाये व ता। ठाणे व पायपोसी व वेठीबेगारी कुलबाब व कुलकानू बाहुजती विठोजी राजे भोसले अर्बा असर व अलफ छ २० माहे सौवालु आहे फर्मान बसिके खास मऱ्हामती होय मालूम जाले बाइसरुफाती दिवाणआला बराये इलतमेस देवविले नारायणभट बिन दामोधरभट व प्रभाकरभट बिन रामेस्वरभट सो। आरवी मुदगल यासि इनाम जमीन चावर एक गज सरायनी दर सवाद मौजे हुजती सदहूप्रमाणे करार केले असे ता। समान असर अलफ जैसा भोगवटा व तसरुफाती चालू असेली ते चि दर निसबती दुमाला कीजे औलाद व अफलाद चालू दीजे दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे तालीक घेऊन असेली फिराऊन दीजे

मलिक अजम एकंदर इनामदारानी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालू जमीन चावर एक बा। सवाद दफता खास मोर्तब सुदु

शिक्का फारसी

तेरीख १७ माहे

पा। हुजुरु

सुप्र सूदु     सुप्र सूदु     सुप्र सूदु
मु श्रीफ     न्याबती     सुरूनवीस

बारूसूदु

बारूसूदु     बारूसूदु     बारूसूदु

बारूसूदु

तालीक सूदु     तालीक सूदु     तालीक सूदु     तालीक सूदु

---

**लेखांक २८६** **१५४० मार्गशीर्ष शुद्ध १०**

श्रीमुद्गलसत्य नकल

श्रीमुदगळ

श्रीशक १५४० काळयुक्त नाम संवत्सरे मार्गशीर्ष शुध १० वार आदितवार त्तदिवसि रामेस्वरभट गोसावियासि देउजी बिन रुपाजी व लुमाजी बिन कान्होजी मोकदम व समस्त मुख्य व बारा ही बळुते मौजे आरवि ळेहोन दिधळे ऐसें तुह्मास देवाचीया फुळझाडाकारणे तुमचीया घरामागे गावाचे उतरभागि नजीक गावकुंप जमिन खडसर सरगायरान पडि नेपतियाचि झाडे तेथे ऐसी आहेति ते जमीनिचा महसुळ अथवा नक्त बाब ताा ठाणे व ताा देहाये काहि येत नाही मुतळ खडसर गायरान आहे जमिन बिघे २० विस गज शरायणी हे भोये तुह्मास श्री र्पण दिधळे असे तुह्मी विहरि पाडुन देवाकारणे

फुळझाडे व ज्वो झाडझाडोरा व जे पिक होइल ते व उस व केळी व निंबोणिया हर जिनस जे ते भोईस पिकेळ ते तुह्मी देवार्पण दिधळे असे सुखे किर्दि करवेळ ते करुन सुखे घेणे आवलादि व अफळादि ळेकुराचा ळेकुरी दीधळे असे यासि अनसारिखे करु तरि श्रीअण असे व आमचे पुर्वज्जाचि आण व भाक आसे हे ळीहिळे सही

गोहि (नांगर)

विठळभट होसींग तिमणभट कोहकणे *

---

**लेखांक ३८७** **१५४० पौष शुद्ध १०**

अज रख्तखाने राजश्री कृष्णाजी राजे साहेब दामदौलतहू बजानेब हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे वडिगौ कर्याती पाटस पाा पुणे सुाा तिसा असर अलफ रामेस्वरभट बिन नारायणभट सो मौजे आरवी मुदगल हुजूर एउनु माळूम केले की आपणास इनाम जमीन चावर वाहातिकास देखील मळै रुके ·।· बारा देखील नख्तयाती व.बाजे पटिया व वेठी बेगारी दर सवाद मौजे मजकूर प्रज माहाद पाटील ठोंबरा बमा भोगवटे वजिरानी कारकीर्दी दर कारकीर्दी ताा सन समान चालिले आहे हाली मौजे मजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला असे माहाली कारकून ताजे खुर्द खताचा उजूर कारितातो ह्मणउनु माळूम केले माळूम जाले रामेस्वरभट बिन नारायणभट यास सदहू इनाम भोगवटे वजिरानी कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद ताा सन समान तसरुफाती चालिले आहे तेणेप्रमाणे दिधले असे दुमाला कीजे दर हर साल ताजे खुर्द खताचा उजूर न

---

* हा कागद बाळबोधलिपींत लिहिलेला आहे.

कीजे तालीक घेउनु असेली इनामदारास फिराउनु दीजे मोर्तबु

तेरीख ८ माहे मोहरम



---

**लेखांक ३८८** **१५४३ चैत्र शुद्ध १४**

थोरले राजे

( फारसी सिक्का )




अज रखतखाने राजश्री संभाजी राजे साहेबु दामदौलतहू बजानेबु कारकुनानी देहाये परगणे पांडियापेडगौ सुा इहिदे इसरीन अलफु बो रामेस्वरभट बिन नारायणभट व चिंतामणीभट बिन बाळंभट उपाध्ये रा॥ इा यासी मुकासा मौजे जातेगौ पा॥ मजकूर देह एक १ बिता॥

| | |
|---|---|
| पेसजी रवा आहे | बाजा वर्दे रुद्राजी फुज |
| देह निमे ·॥· | सरगुन्हे देह निमे ·॥· |

एकूनु सदर्हू देह १ कुलबाब कुलकानू दिधले असे व बा खुर्दखत राजश्री राजे दिधले आहे तेणप्रमाणे दुमाला कीजे अवलाद अफलाद चालवीत जाइजे दर हर साल ताजे खुर्दखताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली भटगोसावियापासी फिराउनु दीजे *




तेरीख १२ माहे जमादिलोवल


जमादिलोवल

---

* मथळयाचा व मोर्तबाचा असे दोन्ही शिक्के फारसी आहेत.


**लेखांक ३८९** **१५४३ माघ वद्य १०**

राया राऊ साहेबू



अज दिवाण पा॥ पुणा ता॥ हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी व रयानी मौजे वडिगौ निजीक पेडगौ पा॥ मा॥ दा॥ सु॥ इसने इसरैन अलफ दा॥ निसली राजश्री छ २४ रबिलोवल सादर जालें तेथे रजा जे रामेस्वरभट बिन नारायणभट सो॥ आरवी मुदगल हुजूर एउनु मालूम केले जे आपणासी इनाम जमीन चावर वाहातिकास देखील मलई रुके ·।· बारा दर सवाद मौजे वडिगौ ना॥ पेडगौ का॥ पाटस पा॥ मजकूर कारकीर्दी खा॥ हैबतखान व मलिक अजम चालिले आहे हालीं विलायती साहेबास अर्जानी जाली आहे माहाली कारकुनु खुर्द खताचा उजूर करिताती सरंजाम होय ह्मणौनु तरी रामेस्वरभट बिन नारायणभट सो॥ मा॥ यासी इनाम जमीन चावर दे॥ मलई वाहातिकास रुके ·।· प्रज माहाद पाटील ठोंबरा दर सवाद मौजे मजकूर सालाबाध कारकीर्दी व मलिक अजम व हैबतखान चालिले असेल तेणेप्रमाणे तसरुफाती व भोगवटा खातिरेसी आणौनु सदहूं इनाम इनामधाराचे दुमाला कीजे तालीक घेउनु असली फिराउनु दीजे ह्मणौनु रजा तरी बा॥ रजा सदहूंप्रमाणे भोगवटे व तसरुफाती कारकीर्दी हैबतखान व मलिक अजम सालाबाध ता॥ सालगुदस्ताप्रमाणे चालिली असेली तेणेप्रमाणे चालवीत जाइजे दर हर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तालीक घेउनु असेली फिराउनु दीजे मो॥

तेरीख २४
रबिलोवल



**लेखांक ३९०** **१५४४ वैशाख**

राजश्री कुमाजी पाटील अजहती विठोजी राजे भोसले मोकदम कसबे वावि पासंगमनेर यासि भुज मेहतरी व सोन मेहतरीया व समस्त तेली कसबे मजकूर सुा इसने असरीन अलफ लेहौनु दिधले ऐसें जे बाउजी मोकदम कसबे मजकूर माजी होता तो घानबुडी आपणापासूनु दर घानियासी टके ३८६ परमाने खात होता तरी त्याप्रमाने तुह्मी आपले घेणे खेरीज जिरातीं प्रजास नाही पेसजीचे आपणासी माफ करून सन सलासा कारणे घेणे हे लिहिले सही

निा पावार

गोही

वाब जिसधान मुजेरी

गोपाळ वणजारा

एमाजी घरबुडा मुजेरी

बाव्ह जगधणी मुजेरी


अत पाटील साकरपडी

मेउजी करानदेऊ

आपाजी सेटिया


---

**लेखांक ३९१** **१५४४ कार्तीक शुद्ध ९**



अज रखतखाने खुदायवंद खाने अजम आबा सिदी अबदूल नबी व सिदी महमद साहेबुलवली दामदौवलतहू तां हुदेदारानी व मोकदमानी हाल वा इस्तकबिला मौजे वडगऊ ना पेडगांऊ कर्याती पाटस पा पुणा बिदानंद सुा सलास इशरीन अलफ रामेस्वरभट बिन


नारायणभट सो आरवी मुदगल हुजुरा मालूम केले जे आपणासी इनाम जमीन चावर वाहातिकास देखील मळय रुके -।- बारा दर सवदा मौजे मजकूर प्रजा माहाद पटेला ठोंबरा सालाबाद तसरुफाती चालिले आहे हाली साहेबूस सालमा कारणे मुकासाई अर्जानी जाला आहे हुदेदार ताजे खताचा उजूर करताती खतर होये मालूम जाहले रामेस्वरभट बिन नारायण सो आरवी मुदगल यासी सदरहू इनामता तसरुफाती आहे तेणे प्रमाणे दुमाला कीजे दर हर साला ताजे खताचे उजूर ना कीजे तुह्मी तालीक घेउनु असली खुर्द खत भटंपासी फिराउनु दीजे मूर्तब



तेरीख ७ मोहरम

**लेखांक ३९२** **१५४४ मार्गशीर्ष शुद्ध १**

[1]




[2]

अज रखतखाने राजश्री संभाजी राजे साहेबू दामदौलतहू बजानेबू कारकुनानी हाल[3] इस्तकबाल व देसमुखानी देहाये परगणे पांडियापेडगौव तरफ करडे बिदानद सुाा सलास इसरीन अलफू बो मुदगलभट व क्रस्णभट बिन बाबदेऊभट सो। पुणे—चाकण यास बदल धर्मादाऊ इनाम अजरामऱ्हामती बदल दानें सूर्यग्रहण जमीन काळा कीर्दी चावर एक १८ गज सराइनी दर सवाद मौजे बेलवडी ताा मजकूर देखील नखतयाती व तालुक ठाणे व तालुक देहाये व बाजे

१ श्रीकार नाहीं. २ फारसी. ३ व नाहीं. ४ दान इ सूर्यग्रहण. फारसी इजाफत. ५ शक १५४४ कार्तिक अमावास्या गुरुवारीं सूर्यग्रहण होतें.


बाबा पायपोसी व खर्चपटी व वेठीबेगारी व बाजेपटी कुल बाब कुल कानू दिधले असे बादा महसुलेसी दुमाले कीजे सदर्हू जमीन मेजून हद्दमहदूद घालुनु प्रज नेमून देउनु हुजूर खबर लिहिणे अवलाद अफलाद चालवीत जाइजे दर हर साल ताज्ये खुर्द खता उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली फिराउनु दीजे मोर्तब सूद

तेरीख २९ माहे मोहरमू
मोहरमू




**लेखांक ३९३** **१५४४ मार्गशीर्ष वद्य १२**

रुजू निगाबान



अज दिवाण ठाणे देहाये पा। पांडियापेडिगौ व तरफ कर्डिई संमत जुनेर ता। हुदेदारांनी व मोकदमानी मौजे बेलवडी ता। कर्डिया संमत मजकूर सु॥ सलास इसरैन अलफ बा। खु॥ रा। छ २९ माहे मोहरम सादर जाले तेथे रजा जे बेस्मी मुदगलभट व कृष्णभट बिन बाबदेभट सेकीन पुणे-चाकण यास बदल धर्मादाऊ इनाम अजरामऱ्हामती बदल दान सूर्यग्रहण जमीन काळी कीर्द चावर १८ गज सरायनी दर सवाद मौजे बेलवडी ता। कर्डिई देखील नखतयाती ता। ठाणे व ता। देहाये व बाजे बाबा व पायपोसी व खर्चपटी व वेठीबेगारी व बाजेपटी कुल बाब कुल कानू दिधले असे बाब महसुलेसी दुमाले कीजे सदरहू जमीन नेमून हद्दमहदूद घाळून प्रज नेमून देऊन हुजुरु खबर लिहिणे अवलाद

अफलाद चालवीत जाइजे दर हर साल ताज्ये खुर्द खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेऊन असेली फिराऊन दीजे ह्मणौन रजा रजे बा। सदरहू प्रमाणे अमल कीजे तुह्मी तालीक घेऊन असेली इनामदार मजकूरापासी दीजे मोर्तबु




तेरीख २६ माहे सफर

सफर

---

**लेखांक ३९४** **१५४४ माघ वद्य ३०**



अज रखतखाने राजश्री संभाजी राजे साहेबू दामदौलतहू बजानेबू कारकुनानी देहाये परगणे पांडियापेडगौ व तरफ करडे बिदानद सुा सलाम इसरीन अलफु बो मुदगलभट बिन कृष्णभट सो पुणे हुजूर एउनु मालूम केले जे आपणास इनाम बदल धर्मादाऊ जमीन चावर एक गज सरायनी १८ दर सवाद मौजे बेलवडी ताा मजकूर पेसजी खुर्द खत सादर आहे जे जमीन मेजून हद्द महदूद घालनु देणे यावरी आपण माहालास गेलो माहालाचे कारकुनास साहेबाचे खुर्द खत दाखविले यावरी कारकून जमीन मेजून प्रज बाबाजी मुलाणा मुजेरी मौजे मजकूर प्रज नेमून दिधला आहे ए बाबे कारकुनीं आपणापासी अर्जदास लेहौनु दिधला आहे तरी स्वामी धर्मपरायण आहेती एणेप्रमाणे खुर्द खत दिधले पाहिजे दरी बाब सरंजाम होय मालूम जाहाले तरी भटगोसावियास इनाम बदल धर्मादाऊ जमीन चावर एक १८ गज सरानी यास प्रज बाा अर्जदास्त छ ४ माहे रबिलाखर बाबाजी मुलाणा मुजेरी मौजे मजकूर नेमून दिधला असे दुमाले

कीजे अवलाद अफलाद चालवीत जाइजे दर हर साल ताजे खुर्द खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली इनामदार मजकुरापासी फिराउनु दीजे तकरार फिर्यादी एऊं न दीजे मोर्तब सूद

रुजू सुरनीस

तेरीख २८ माहे रबिलाखरू

रबिलाखर

---

**लेखांक ३९९** **१५४४ फाल्गुन शुद्ध ८**


सके १५४४ दुंदभी नाम सवतछरे फालगुण सुध अस्टमी ८ वार गुरुवार सुा सलास इसरईन अलफ तेरीख ७ माहे जमादिलोवल ते दिवसी राजश्री रामेशभट व राजश्री चिंतामणीभट गोसावी यासि राजश्री खेलोजीराजे व राजश्री मंबाजीराजे व राजश्री नागोजीराजे व राजश्री परसोजीराजे व राजश्री त्रिंबकजीराजे व राजश्री ककाजीराजे लिहुनु दिधले ऐसें जे तुह्मापासी राजश्री ताबाई आवाने ठेवणे ठेविले होते बितपसील

| | |
|---|---|
| नख्त एकविससे होनु | सोने एकसे आठ तोळे |
| २१०० | १०८ |

हे तुह्मी आमचे आह्मासी खडकीस आणौनु दिधले पैकीं मालबा रायाचा वाटा मालबासी देउनु वाटे सा आमचे आह्मासी पावले बितपसील

| | |
|---|---|
| नख्त अठरासे १८०० | सोने तोळे नऊ ९०॥ |

एणें प्रमाणें आह्मासी पावले तुह्मासी व आपणासि अर्था अर्थ समंध नाही




गोही

एकोजी जैतजी भोसले — भिकाजी मोहिते

मकुंद गोपीनाथ पत्रप्रमाणें साक्ष — तिमाजी मोहिते

---

**लेखांक ३९६** **१५४४ फाल्गुन वद्य १३**



रुजू निगावान

श्री मा हुदेदारानि मौजे बेळवडी ता कर्डी यास मशहूरर प्रती नरसो दामोदर हवालदार व कारकून देहाय पा पांडियापेडगौ सुा सलास इशरैन अलफ बा खुा रा छ २८ माहे रबिलाखरु साधर जाले तेथे रजा जे बो मुदगलभट बिन कृस्णभट सो पुणे हुजूर येउनु माळूम केले जे आपणास इनाम बदल धर्मादाउ जमीन चावर एक गज सराइनी १८ दर सवाद मौजे बेलवडी ता मजकूर पेसजी खुर्दखत सादर आहे जे जमीन मेजून हद महदूद घालूण देण यावरी आपण माहालास गेलो माहाळीचे कारकुनास साहेबाचे खुर्दखत दाखविले यावरी कारकून जमीन मेजून प्रज बाबाजी मुलाना मुजेरी मौजे मजकूर प्रज नेमून दिधळी आहे ये बाबे कारकुनी आपणापासी अर्जदास लेहोनु दीधली आहे तरी स्वामी धर्मपरायण आहेती येणे-प्रमाणे खुर्दखत दीधले पाहिजे दरीबाब सरंजाम होय माळूम जाहाले तरी भट गोसावियास इनाम बदल धर्मादाउ जमीन चावर एक १८ गज सरानी यास प्रज बा अर्दास छ ४ माहे रबिलाखर बाबाजी मुलाना मुजेरी मौजे मजकूर नेमून दीधला असे दुमाले कीजे अवलाद

अफलाद चाळवीत जाइजे दर हर साल ताजे खुर्दखताचा उजूर नं कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली इनामदार मजकुरापासी फिराउनु दीजे तकरार फिर्यादी येऊन ने दीजे ह्मणौनु रजा रजेबरहु(कू)म अमल कीजे

तेरीख २६
जमादिलोवल

---


**लेखांक ३९७** **१५४५ फाल्गुन वद्य १२**

अज रखतखाने राजश्री विठोजी राजे बजानेबू कारकुनानी प्रगणे सिरवळ बिदानद सुा आर्बा इसरीन अलफ रामेश्वरभट व चिंतामणीभट उपाध्ये हुजूर मालूम केले जे आपणास संकल्पाची वरात जकाती पाा मावरी दिधली आहे बरोज आदा केली नाहीं ह्मणौनु मालुम केले तरी संकल्पाचे वरातेस दिरीग लावणे काय तुरूस आहे आता बाा वरात आदा कीजे मोर्तब

तेरीख २६ माहे जमादिलोवलु
जमादिलोवलु

---


**लेखांक ३९८** **१५४७ श्रावण शुद्ध ५**



अज् रखतखाने मेहरबान राजश्री स्याहाजी राजे सरलस्कर दामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पा। पुणे बिदानद सु।। सन सीत इसरीन अलफ बो। रामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार सो। आरवी हुजूर एउनु माळूम केलें जें आपणास इनाम जमीन कास रुके -।- दे।। मलै दर सवाद मौजे वडगौ नजीक पेडगौ कर्याती पाटस पा। मजकूर प्रज माहाद पाटील ठोंबरा मौजे मजकूर दे।। नख्तयाती व महसूल तालुक ठाणे व तालुक देहाये व खर्चपट्टी व पायपोसी कुलबाब कुलकानू सालाबाद चालत आहे हाली कारकून ताजा खुर्द खताचा उजूर कारितातिं दरीं बाब खत होए माळूम जाले तरी रामेस्वरभट जुनारदार यांसि इनाम जमीन कास रुके -।- दे।। मलै प्रज माहाद पाटील ठोंबरा दर सवाद मौजे मजकूर दे।। नख्तयाती व महसूल व तालुक ठाणे व तालुक देहाय खर्चपट्टी व पायपोसी कुलबाब कुलकानूसी दिधले असे दुमाले करणें दर हर साल खुर्द खताचा उजूर न करणें तुह्मी तालीक लेहौनु घेउनु असली खत परतौनु इनामदार मजकुरापासीं दीजे हाली सिस्त कर्याती मजकुरावरी जाली आहे ते व पेस्तर होईल ते तमाम दिधले असे इनाम मजकुरावरी जे तकसीम येईल ते दुमाले करणे मोर्तबु सुद (शिक्का षट्कोनी)

तेरिख ३ माहे जिलकादीं रुजू सुरुनिवीस
जिलकादी

**लेखांक ३९९** **१५४७ श्रावण शुद्ध ५**




अज् दिवाण ठाणे का। पाटस पा। पुणे ता। मोकदमानि मौजे वडिगौऊ नजीक पेडगौऊ बिदानद सु॥ सीत इशरैन अलफ बा। खुर्द खत रा। छ ३ जिलकादी सादर जालें तेथ रजा जे बो। रामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार सेकीन आरवी हुजूर येउनु मालूम केले जे आपणास इनाम जमीन कास रुके ·।· देखील मळै दर सवाद मौजे वडिगौऊ कर्याती पाटस पा। मजकूर प्रज माहाद पाटील ठोंबरा मौजे मजकूर देखील नख्तयाती व महसूल तालुक ठाणे तालुक देहाय व खर्चपट्टी व पायपोसी कुलबाब कुलकानू सालाबाद चालत असे हाली ताज्या खुर्द खताचा उजूर करिताती दरी बाब खुर्द खत होय मालूम जाले तरी रामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार यासि इनाम जमीन कास रुके ·।· बारा देखील मळै प्रज माहाद पाटील ठोंबरा दर सवाद मौजे मजकूर देखील नख्तयाती व महसूल तालुक ठाणे तालुक देहाये व खर्चपट्टी व पायपोसी कुलबाब कुलकानू दिधले असे दुमाले करणें दर हर साल खुर्द खताचा उजूर न करणे तुह्मी तालीक घेउनु असली फिराउनु देणें हाली सिस्ती कर्याती मजकुरावरी जाली असे ते पेस्तर होईल ते तमाम दिधले असे इनामदारमजकुरावरी जे तकसीम एईल ते दुमाले करणे ह्मणौउनु रजा रजे हुकूम इनामदार मजकुरास सदरहूप्रमाणें दिधले असे दुमाले कीजे दर हर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तालीक घेउनु असली इनामदारमजकुरास फिराउनु दीजे


( शिक्का षट्कोनी )

तेरीख माहे जिलकादी

जिलकादी

**लेखांक ४००** **१५४९ आश्विन वद्य ३**





( फारसी मजकूर )

अज् दिवाण रा। खास बजानेबु कारकुनांनि व देसमुखांनि पा। पांडियापेडिगौ व मुकासाईयांनि व हुदेदारांनि अजहती मुकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमांनी मौजे जलालपूर पा। मजकूर बिदानद सु॥ सन तिसा असर अलफ दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो। आरवी मुदगल बंदगी हजरती मालूम केलें जें आपणियासि इनाम जमीन चावर एक दर सवाद मौजे जलालपूर उ। पा। पांडियापेडिगौ देखील नखतयाती ता। ठाणे व ता। देहाये वेठीबेगारी फर्मासी आवाजेवा कुलबाब व कुलकानू बा। हुजती मालोजी व विठोजी भोसले असर अलफ आहे एणें प्रमाणें फर्मान करुनु देणे ह्मणौन मालुम केलें दरीं बाब रोखा मा। मा। मलिक अंबर एकदर इनामदारांनी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालु आहे फर्मान बसिके खास मऱ्हामती होए मालूम जाले बा। ईसरुफाती दिवाणआला बराये इलतिमेस देवविलें दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो। आरवी मुदगल यासि इनाम जमीन चावर एक दर सवाद मौजे जलालपुर पा। मजकूर देखील सदरहू बाबा बा।हुजती मालोजी व विठोजी भोसले असर अलफ दिधले आहे तेणें प्रमाणें करार केले असे ता। समान असर अलफ जैसा भोगवटा व तसरूफाती चालत असेली ते चि दर निसबती दुमालां कीजे दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे तालीक घेउन असेली फिराऊन दीजे बा। रोखा मा। मा। मलिक

अजम एकदर इनामदारानी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालु प्रज एमाजी व भोल पाटील चऱ्हावले चावर एक बाा सवाद दफता खास ( शिक्का षट्कोनी )

रुजू मुश्रीफ


मोर्तब सुदू रुजू रुजू सुरुनिवीस

तेरीख १७ माहे

पाा हुजुरु

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सुप्र सुदु | | | सुप्र सुदु | सुप्र सुदु |
| मुश्रीफ | | | न्या बती | सुरु निवीस |
| बारु सुदु | | | बार सुदु | |
| | बार सुदु | बारु सूदु | | बारु सुदु |
| तालीक सूद | तालीक सूद | | तालीक सूद | तालीक सूद |

लेखांक ४०१ १५४९ आश्विन वद्य १४



( फारसी मजकूर )

अज दिवाण रख्तखाने खास बजानेबु कारकुनांनी व देसमुखांनी पाा पुणे व मुकासाईयांनी व हुदेदारांनी अजहती मुकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे वडिगौ नाा पेडिगौ कर्याती पाटस पाा मजकूर बिदानद सुाा सन तिसा असर अलफ रामेस्वरभट बिन नारायणभट सेाा मौजे आरवी मुदगल बंदगी हजरती मालूम केले जे आपणांसि इनाम जमीन चावर वाहातिकास देाा मळई रुके बारा दर सवाद मौजे वडिगो नाा पेडिगौ कर्याती पाटस पाा पुणे बाा हुजती हैबतखान इहिदे असर अलफ आहे एणेप्रमाणे फर्मान करुनु देणें ह्मणऊन रोखा माा माा मलिक अंबर एकंदर इनामदारानी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालु आहे फर्मान मऱ्हामती होय मालूम जालें बाा ईसाती दिवाणआला बराए इलतिमस देवविलें रामेस्वरभट बिन नारायणभट सेाा मौजे आरवी मुदगल यासि इनाम जमीन चावर वाहातिकास देाा मळई रुके ।· बारा दर सवाद मौजे वडिगौ नाा पेडिगौ कर्याती पाटस पाा मजकूर बाा हुजती हैबतखांन इहिदे असर अलफ जैसा भोगवटा तसरुफाती चाल-

त असेली तेणेंप्रमाणे दुमालां कीजे दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे तालीक घेऊन असेली फिराऊन दीजे बा रोखा मा मा मलिक अंबर एकंदर इनामदारांनी तिसा असर व अलफ छ २० माहे सौवालु प्रज माहाद पाटील ठोबरा कास रुके बारा खास वा दफाता खास (शिक्का षट्कोनी) मोर्तब सुदु

रुजू सुद रुजू मुश्रीफ रुजू सुरुनिवीस


तेरीख २७ माहे सफर समान इसरैन अलफ

पाा हुजुरु


| | | | | |
|---|---|---|---|---|
| सुप्र सूद | सुप्र सूद | सुप्र सूद | सुप्र सूद | सुप्र सूद |
| मुश्रीफ | दफ्तर खास | मजमू | न्याबती | सुरुनिवीस |
| बारु सुदु | बार सुदु | बारु सुदु | बार सुदु | बारु सुदु |
| तालीक सूदु | तालीक सूदु | | तालीक सूदु | तालीक सूदु |


**लेखांक ४०२** **१५४९ आश्विन वद्य १४**





( फारसी मजकूर )





अज दिवाण रा खास बजानेबु कारकुनांनी व देसमुखांनी पा पुणे व मुकासाईयांनी व हुदेदारांनी अजहती मुकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे देउळगौ ना आलेगौ कर्याती पाटस पा मजकूर बिदानद सुा सन तिसा असर अलफ दामोधरभट बिन नारायणभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो आरवी मुदगल बंदगी हजरती माल्लम केले जे आपणियासि इनाम जमीन सेत खुद खासा दोरी सवा दर सवाद मौजे देउळगौ ना आलेगौ कर्याती पाटस पा मजकूर बा हुजती हैबतखांन सलास अलफ आहे एणेप्रमाणें फर्मान करुनु देणें ह्मणौन रोखा मा मा मलिक अंबर एकदर इनामदारांनी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालु आहे फर्मान मऱ्हामती होय माल्लम जालें बा इसाती दिवाणआला बराये इलि रुके ७ देवविले दामोधरभट बिन नारायणभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो आरवी मुदगल यासि इनाम जमीन सेत खुद खासा दोरी सवा दर सवाद मौजे देउळगौ ना आलेगौ कर्याती पाटस पा मजकूर बा हुजती हैबतखान सलास

अलफ दिधले आहे तेणेप्रमाणे करार केले असे ता सबा असर अलफ जैसा भोगवटा व तसरुफाती चालत असेली तेणेप्रमाणे दुमालां कीजे दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे तालीक घेऊन असेली फिराऊन दीजे बा रोखा मा मा मलिक अंबर एकदर इनामदारांनी तिसा असर अलफ छ २० सौवालु प्रज दामोधरभट व रामेस्वरभट सेत दोरी सवा बा सवाद दफता खास ( शिक्का षट्कोनी ) मोर्तब सुदु १।·

रुजु सुदु रुजु मुश्रीफ रुजु सुरुनिवीस

तेरीख २७ माहे सफर समान इसरैन अलफ

पा हुजूरु

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुप्र<br>मुश्रीफ | } सुदु | सुप्र<br>दफ्तर | } सुदु<br>खास | सुप्र<br>मज | } सुंदु<br>मू | सुप्र<br>न्या | } सुदु<br>बती | सुप्र<br>सुरु | } सुदु<br>निवीस |
| बारु | सुदु | बार | सुदु | बारु | सुदु | बार | सुदु | बारु | सुदु |
| तालीक सूदु | | तालीक सूदु | | | | तालीक सूदु | | तालीक सूदु | |

लेखांक ४०३ १५५० भाद्रपद शुद्ध १०




अज रखतखाने राजश्री कृष्णाजी राजे भोसले साहेबु दामदौलतहू बजानेबु हुदेदारानी मौजे वडिगाऊ पाा पुणा बिदानद सुाा तिसा इशरैन अलफ दाा रामेस्वरभट बिन नारायणभट मौजे आरवी मुदगल यासि इनाम मौजे मजकुरी चावर कास रुके ·।· आहे नखतयाती व बाजे पटिया ताा देहाये व ताा ठाणे कुल बाब व वेठबेगारी व फर्मासी नख्त व ऐन जिाा कुल बाब दुमाला केले असे दुमाला कीजे दर हर साल ताजे खुर्द खताचे उजूर न कीजे मोर्तब सुद (शिक्का षट्कोनी) याची चावराची उचापती आजी ताा जे जाहाली असल ते फिराउनु देणें पायपोसी माा पैकी उचापती देणें मोर्तबु (शिक्का षट्कोनी)


तेरीख ८ माहे मोहरम माहे मोहरम

---

लेखांक ४०४ १५५० श्रावण शुद्ध १४



अज् रखतखाने राजश्री शाहाजी राजे दामदौलतहू बजानेब



कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पाा पुणे व काा पाटस बिदानद सुाा तिसा इशरीन अलफ रामेस्वरभट बिन नारायणभट सेाा मौजे आरवी मुदगल हुजूर एऊन मालूम केलें जे आपणास इनाम जमीन चावर वाहाति कास बाा मलई रुके बारा दरसवाद मौजे वडगांव नाा पेडगौ कर्याती


मजकूर प्रज माहाद पाटील ठोंबरा बा। फर्मान बसिके खास व भोगवटे वजिरानि कारकीर्दी दर कारकीर्दी चालिलें आहे हाली पा। मा। साहेबांस मुकासा अर्जानी जाला असे माहाली कारकून खुर्द खताचा उजूर करिताति नजर अनायत फर्माउनु खुर्द खत मन्हामती होए ह्मणौन मालूम केले तरी रामेस्वरभट बिन नारायणभट यास सदरहू इनाम बा। फर्मान बसिके खास व भोगवटे वजिरानि कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद ता। सन समान इशरीन अलफ तसरुफाती चालिलें असेल तेणेंप्रमाणें चालविजे दर हर साल खताचा उजूर न कीजे तालीक लेहून घेऊन असली खत परतून दीजे (शिक्का षट्कोनी)

तेरीख १२ माहे जिल्हेज रुजू सुरुनवीस


जिल्हेज सुरू सुद

---

**लेखांक ४०५** **१५५० भाद्रपद शुद्ध १४**



अज दिवाण ठाणे का। पाटस पा। पुणे ता। हुद्देदारानी अजहती मुकासाई व मोकदमानी मौजे वडिगौ का। मा। सुा। तिसा इसरैन अलफ रामेस्वरभट बिन नारायणभट मौजे आरवी मुदगल यासी इनाम मौजे मजकूर चावर कास रुके ।· आहे नख्तयाती व बाजे पटिया ता। देहाये व ता। ता। ठाणे कुल बाब व वेठबेगारी व फर्मासी नख्त व ऐनजिनस कुल बाब कुल दुमाला केले असे दुमाला कीजे दर हर साल ताजे खुर्द खताचा उजूर न कीजे याची चावराची उचापती आजी ता। जाहाली असेल ते फिराउनु दीजे पायपोसी मा। पैकी उचापती देणे





तेरीख १२ माहे मोहरम

---

लेखांक ४०६ १५५१ आश्विन शुद्ध ६

रवा सूद





अज रखतखाने खुदायवंद खाने अजम सलाबतखान साहेबु तुलीदयामदौलतहू बजानेबु कारकुनानी व देसमुखानी व मोकदमानी पाा पांडियापेडगौऊ बिदानद सुाा सलासीन अलफ बेाा रामेस्वरभट व दामोदरभट बिन नारायणभट सोा आरवी मुदगल हुजूर एउनु मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर एक १८ गज सरायनी दर सवाद कसबे चांभारगोंदे पाा पांडियापेडगौऊ देखील नखतयाती ताा ठाणे व ताा देहाये व बाजे बाबा कुल बाब कुल कानू व वेठी बेगारी बाा खुर्द खत विठोजी भोसले बाा फर्मान बसिके खास सन तिसा असर अलफ ताा सालगुदस्ता सन तिसा इसरीन अलफ चालिले आहे हाली ताा मजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला कारकून खुर्द खताचा उजूर करितातीं खैर आहे नजर अनायती करून खुर्द खत होय मालूम जाले तरी रामेस्वरभट व दामोदरभट बिन नारायणभट यासि इनाम सदरहू जमीन चावर एक दर सवाद कसबे चांभारगोंदे देाा सदरहू बाबा ताा साल गुाा सन तिसा इसरीन अलफ भोगवटा रुजू पाहोनु दुमाला करणें औलाद अफलाद चालवणें दर हर साल खुर्द खताचा उजूर न करणें तुह्मी तालीक घेउनु असेली इनामदार मजकुरापासी देणें मोर्तब

रुजु सुद (शिका षट्कोनी)

तेरीख ४ माहे सफर

सफर

लेखांक ४०७ १५५१ आश्विन शुद्ध ६

रवा सूद


अज् रख्तखाने खुदायवंद खाने अजम सलाबतखान साहेब तुलीदयामदौलतहू बजानेबू कारकुनानि व देसमुखानि ता। चांभारगोंदे पा। पांडियापेडगौऊ बिदानद सु॥ सलासीन अलफ दामोदरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो॥ आरवी मुदगल हुजूर एउनु मालूम केलें जे आपणास इनाम जमीन चावर एक दर सवाद मौजे जलालपुर ता। मा। देखील नख्तयाती ता। ठाणे व ता। देहाये व वेठीबेगारी फर्मासी आवाजेवा कुलबाब कुलकानू बा। तु॥ मालोजी व विठोजी भोसले बा। बा। फर्मान बसिके खास छ १७ माहे सन तिसा असर ता। सालगुदस्ता सन तिसा इसरीन अलफ चालिले आहे हाली ता। मा। साहेबास मुकासा अर्जानी जाला ता। मजकुरीचे कारकून खुर्द खताचा उजूर करिताति खैर आहे नजर ऐनाती करुनु खत होए मालूम जालें तरी दामोदरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट यांस इनाम सदरहू जमीन चावर एक दर सवाद मौजे जलालपुर पा। मा। देखील सदरहू बाबा ता। सालगुदस्तां सन तिसा चालिलें असेल भोगवटा दुमाला रुजू पाहौनु दुमाला करणे औलाद अफलाद चालवणे दर हर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तुम्हीं तालीक घेउनु असली इनामदारमजकुरापासी देणे मोर्तबु ( शिक्का षट्कोनी )

रुजूसूद

तेरीख ४ माहे सफर

सफर

लेखांक ४०८ [१] १५५१ आश्विन वद्य २




अज माहाल तमाकू इजारती

| | | |
|---|---|---|
| नागोजी | कानजी | मोहनदास |
| सिवदेऊ | भिउजी | तापीदास |

खोत कलम रुता खोतानी ताा जुनर व बाजे माहाल बिदानद सुाा सलासीन अलफ त्रिंबकभट बिन नीळकंठभट सेाा त्रिंबक यास बदल धर्मादाऊ गादी कसबे नारायणगौ रुके ।• ताा सन तिसा तसरुफाती चालिली आहे हाली खोत ताजिया खुर्द खताचा उजूर कारिताती होय माछुम जाले ताा सन तिसा तसरुफाती चालिली असेल तेणेप्रमाणे चालविजे दर हर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तालीक घेउनु असेली फिराउनु दीजे मोर्तबु सुद (शिक्के षट्कोनी दोन)[६]

तेरीख १५ सफर

---

१ श्रीकार नाहीं. २ फारसी. ३ हस्ताक्षर कानजी भिउजीचें. ४ मोहनदासाचा मराठी शिक्का. ५ नागोजीचा फारसी शिक्का पुसट. ६ एकावर एक दोन मोर्तब फारसी आडवे.

**लेखांक ४०९** **१५५१ कार्तिक शुद्ध ४**

अज् दिवाण ठाणें ता चांभारगोंदे पा पांडया-पेडगौ ता हुदेदारानि व मोकदमानि मौजे जलालपुर पा मा सुा सन सलासीन अलफ मुा रा छ ४ सफर पैा छ १ रबिलोवल तेथे रजा जें दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायण सो आरवी मुदगल हुजूरु एउनु मालूम केलें जे आपणास इनाम चावर एक दर सवाद मौजे जलालपुर ता मा देखील नख्तयाती ता ठाणे व ता देहाये व वेठीबेगारी फर्मासी अवाजेवा कुलबाब कुलकानू बा ता मालोजी व विठोजी भोसले व बा फर्माने इ बसिके खास भोगवटा ता सन तिसा चालिले आहे हाली साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे माहाली हुदेदार उजूर करितातिखत होए तरि दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट यासी इनाम सदरहू चावर एक दो सदरहू बाबा ता सन तिसा चालिलें असेली तेणें प्रमाणें दुमाले कीजे ह्मणउनु रजा बा रजा दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट यांसी इनाम मौजे मजकुरीं जमीन चावर एक देखील सदरहू बाबा ता सन तिसा तसरुफाती भोगवटे चालिले असे तेणें प्रमाणें चालविजे दर दर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेऊनु असेली खुर्द खत इनामदारमजकुरासी दीजे मोर्तबू

तेरीख २ माहे रबिलोवलु (शिक्का षट्कोनी)

रबिलोवल

---


**लेखांक ४१०** **१५५१ कार्तिक शुद्ध ५**

अज दिवाण ठाणे ता। चांभारगोंदे पा। पाड्यापेडिगौऊ ता। हुदेदारानी व मोकदमानी का। चांभारगोंदे ता। मा। सु। सन सलासीन अलफ खुद रा। छ ४ सफर पौ। छ १ रबिलोवल सादर जाले तेथे रजा जे रामेस्वरभट व दामोधरभट बिन नारायणभट सो। आरवी मुदगल हुजुरु एउनु मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर एक गज शराइनी दर सवाद का। चांभारगोंदें पा। मा। दे। नख्तयाती ता। ठाणें ता। देह व बाजे बाबा कुल बाब कुल कानू व वेठी बेगारी बा। खत विठोजी भोसले व बा। फर्मान बावे सिके खास सन तिसा असर अलफ ता। सन तिसा इसैन अलफ चालिले आहे हालीं ता। मा। साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे माहाली खुर्द खताचा उजूरु करितातीं खुर्द खत होय माव्हम जाले तरी दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट यासी इनामे सदहू जमीने चावर एक सदहू प्रमाणे ता। तिसा भोगवटा तसरुफाती चालिले असेली तेणेप्रमाणे दुमाले कीजे ह्मणउनु रजा बा। रजा दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट यासी इनामे का। मा। जमीन चावर देखील सदहू बाबा ता। सने तिसा चालिले असेली तेणेप्रमाणे चालविजे दर हर साल खुर्द खताचा उजूरु न कीजे तुह्मी तालीक घेउनु असेली खत इनामदार मा। दीजे (शिक्का षट्कोनी)

तेरीख ३ माहे रबिलोवलु

रबिलोवल

**लेखांक ४११** **१५५१ पौष वद्य १०**



अज रख्तखानें राजश्री साहेबु बजानेबु हुदेदारानी मौजे खानवटे पा पुणा बिदानद सुा सन सलासीन अलफ दाा बाा धर्मादाऊ बेाा रामेस्वरभट व चिंतामणभट यांसि अजरामऱ्हामती इनामे जमीन जिराती चावर १ एक दर सवाद मौजे मजकूर दाा नख्तयाती ताा ठाणे व तालुक देहाये कुल बाब कुल कानू दिधले असे बाब महसुलेसी दुमाले कीजे अवलाद व अफलाद चालविजे दर हर साल खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असली इनामदारमजकुरापासी फिराउनु दीजे मोर्तब (शिक्का षट्कोनी)

तेरीख २३ जमादिलावल

---

**लेखांक ४१२** **१५५१ माघ वद्य ५**

सा

तखान साहेबू


अज रख्तखाने राजश्री रुद्राजी राम बजानेबू हुदेदारानी व मोकदमानी मौजे जलालपूर ताा चांभारगोंदे पाा पांडियेपेडगौ बिदानद सुा सलासैन अलफ बेाा दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सेाा आरवी मुदगल माा केलें जें आपणास इनाम जमीन चावर एक दर सवाद मौजे जलालपूर ताा माा देखील ताा ठाणें व ताा देहाये व वेठीबेगारी फर्मासी आवाजेवा कुल बाब कुल कानू बाा खुा खाने अजम छ ४ सफर बाा फर्मान बासिके खास छ १७ माहे सन तिसा असर ताा सालगुदस्ता सन तिसा इसरीन अलफ चालिलें आहे हालीं

मा हुदेदार ताजे खुर्द खताचा उजूर करिता खुर्द होय मा जालें तरी बा खुा खाने अजम सालाबाद चालिलें असेली तेणेप्रमाणें त्याचे दुमाले कीजे तालीक घेउनु असेली फिराऊनु इनामदारमजकुरापासी दीजे सालाबाद ताजे खुर्द खताचा उजूर न कीजे मोर्तबु

तेरीख १८ जमादिलाखर

---

**लेखांक ४१३** **१५५२ आश्विन शुद्ध १३**



( फारसी मजकूर )

महजर बतारीख ११ माहे रबिलोवल हाजीर मजालसी किले फतेमंगल

मसरुल अनाम राजश्री
दतो बाबाजी हवालदार
व कारकून किले मजकूर

अळा फतुला सर + बत
चाा राा खास

एमाजी व बाबाजी
देसमुख किले मजकूर

बिदस्तूर विसाजी रंगनाथ देसकुळ-
करणी किले मजकूर

(शिक्के षट्कोनी दोन)

सुाा इहिदे सलासीन अलफ कारणे महजर जाला ऐसा जे संभाजी तानदेऊ यांसि गोंदजी मोकदम व रामजी बिन राजजी मोकदम मौजे निरगुडे किले मजकूर लिहून दिधले ऐसे जें आफ्त व फितरती जाली याकरितां उपवासीं मरों लागलों भोई पडिलों घरबूड हों लागली मग आपण तुह्मास आपली मोकदमी निमे चावर ३१ निमे मोकदमी बिताा

बा गोंदजी मोकदम
१५ खासा चावर
१० एमाजी बा
एकून चावर २५
एकून किमती देखील
मान होन ३५८

रामजी बिन राजजी मोकदम
पैकी चावर ६ एकून किमती
होन १०८

एकून चावर ३१ मौजे मजकुरीची निमे मोकदमी एकून होन ४५८ पंचेतालीस धारण करून तुह्मी सदर्हू प्रमाणे पैके आपणास दिधले आपण तुह्मास निमे मोकदमी आपले खुसीने दिधली आधी मान तुमचा व नागर निशान तुमचे व हरएक मान आधीं तुमचा व बाजाराचा हक्कलाजिमा व काळीपांढरी व हरएक मान तुह्मास निमे मोकदमी लेंकरांचे लेंकरीं मिरासी करून दिधली आहे ते लेंकरांचे लेंकरीं खाऊन सुखे असिजे यास जो कोन्ही बिलाहरकती करील अगर आपला भाईबिरा जर कोन्ही उभा राहील त्यास आपण निवारीन सदरहू प्रमाणे निमे मोकदमी लेंकरांचे लेंकरीं मिरासी करून दिधली आहे ते खाऊन सुखे असिजे हा महजर सही

---

**लेखांक ४१४** **१५५३ आषाढ शुद्ध ७**


श्रीसके १५५३ प्रजापती नाम संवछरे आसाड सुध सतमी वार आदितवार + + + बिहुजूर एमाजी व बाबाजी देसमुख किले फतेमंगाल यां विदमाने संभाजी तानदेऊ यांस गोंदजी बिन माहादजी मोकदम मौजे निरगुडे किलेमजकूर आपण आपल्या आत्मसंतोसे लिहून दिधले ऐसे जे आपण दुकळाकारितां बहुत भोईस पडिलो खा-

वयास काही नाहीं दुकाळ मोठा काहार पडिला याकारितां आपणास कोण्ही वाणी वेव्हारा नव्हे मग आपले दुढीनें आपली मोकादिमी मौजे-मजकुरीचा निमेपैकी तकिसीम निमे तुह्मास किमती होन २२॥ साडे-बाविसांस तुह्मास विकत दिधली आहे तुह्मी सदहू पैके दिधले आपण आपली मोकदमी पैकी निमे मोकदमी तुह्मास लेकरांचे लेंकरी मिरासी करून दिधली आहे तुह्मी सुखे मोकदमी खाणें काळी व पांढरी व हक्कलाजिमा कुल बाब सारा गांव मोकदमी याची चौथी तकसीम तुह्मास मिरासी करून दिधली आहे यास कोन्ही आपला बापभाऊ व दाईज गोत्रज उभा राहील त्यास आपणे निवारावें मोकदमी देखील बाजार व कुल बाब हक्क खाणें हे लिहिले सही नागर व तश्रीफ व बाजे वडिलपणाचा मानमोहर कुल बाब तुह्मास दिधले हे लिहिले सही ( निशाणी नांगर )

गोही

| | |
|---|---|
| बिदस्तुर विसाजी रंगनाथ | नाईकवाडी चा किले मजकूर |
| देसकुलकरणी किलेमजकूर | दिनकरराऊ लखाजी नाईक |
| हमशाही मोकदम गावगन्ना | |
| ( नि. नांगर ) | मौजे निरगुडे |
| जानोजी मोकदम का कलस | रामाजी बिन राजजी निमे |
| ( नि. नांगर ) | मोकदम |
| बहीरजी मोकदम मौजे सेलगांव | |
| किले मजकूर ( निशाणी नांगर ) | हरि सोनेदऊ कुलकर्णी |
| माउजी व बाबाजी मोकदम | |
| मौजे काझड ( निशाणी नांगर ) | |
| बहीरजी मोकदम मौजे लाकडी | |
| ( नि. नांगर ) | |
| बालोजीं मोकदम मौजे निंबोड | |
| ( नि. नांगर ) | |

**लेखांक ४१५** **१५५२ आषाढ वद्य २**




अज् रखतखाने राजश्री शाहाजी राजे दाईमदौलतहु बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पा। पांडियापेडगांऊ व हुदेदारानि हाल व इस्तकबाल व मोकदमानि व रयां कसबे चांभारगोंदे पा। मा। बिदानद सु॥ इसन्ने सलासीन अलफ रामेश्वरभट व दामोदरभट बिन नारायणभट सो। आरवी मुदगल हुजूर एऊन मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर एक गज शरायनी दर सवाद का। चांभारगोंदे देखील नखतयाती ता। ठाणें व ता। देहाये व बाजेबाब कुलबाब कुलकानू व वेठीबेगारी बा। भोगवटे पेसजी कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद चालिलें आहे हालीं माहालीं कारकून साहेबांचे खुर्दखताचा उजूर करितातो दरीं बाब खुर्द खत मऱ्हामती होए ह्मणौन मालूम केले तरी भट मशारनइले यांस सदरहू इनाम बा। भोगवटे कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद ता। साल गु॥ जैसे तसरुफाती चालिले असेल तेणें प्रमाणें चालविजे दर हर साल खता उजूर न कीजे तालीक घेउन असली खत इनामदार मा। फिराउन दिजे

( शिक्का पट्कोनी )


तेरीख १६ माहे जिल्हेज रुजू सुरुनिवीस

जिल्हेज सुरू सूद

लेखांक ४१६ १५५३ आषाढ वद्य १



अज रखतखाने राजश्री शाहाजी राजे दामदौलतहू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी पाा पांडियापेडगौ व हुदेदारानी व मोकदमानी मौजे जलालपूर पाा माा बिदानद सुाा इसने सलासीन अलफ दामोधरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट साो आरवी मुदगल हुजूर येऊन मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर एक दर सवाद मौजे माा देखील नखतयाती ताा ठाणे व ताा देहाये व वेठी बेगारी फर्मासी अवाजेवा कुलबाब व कुलकानू व भोगवटे पेसजी कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद चालिले आहे हाली माहाली कारकून साहेबाचे खुर्द खताचा उजूर करिताती दरीं बाब खुर्द खत होए ह्मणौन तरी यांस सदरहू इनाम बाा भोगवटे पेसजी कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद ताा सालगुाा तसरुफाती चालिले असेल तेणेप्रमाणे चालवीजे दर हर साल खता उजूर न कीजे तालीक लेहून घेऊन असली खत फिराऊन दीजे



तेरीख १६ माहे जिल्हेज

जिल्हेज

रुजू सुरुनीवीस

सुरुसुद

**लेखांक ४१७** **१५५५ आश्विन शुद्ध १०**

श्री सके १५५५ श्रीमुख नाम संवतसर आस्वन सुद दसमी बुधवार त दिसीं बीहूजर एमाजी व मगाजी देसमुख किले फतेमंगल या हुजर जिवाजी बिन खेलोजी भोसले यास संभाजी तानदेऊ लिहून दिधले ऐसे जे मौजे निरगुडे तेथील मोकदमी काजलियापासून घेतली

| बीाताा | ताा |
|---|---|
| गोंदजी व माहादजी पासून निमे मोकदमी | की १ रामजी बिन राजजी मोकदम मौजे माा चावर ५ एकून किमती होनू दाहा १०८ |

२५ कि १ चावर १५
एाा होनू
१० कि १ चावर बाा
एमाजी बाा कीमती होनू चावर
१० दाहा
८॥= की १ चावर ५
एकून कीमती होनू

एकूण मोकदमी निमे व चावर ५ हे आपण घेतले यावरी तुमचा इलाखा मोकदमीस होता हा आपणास दखल नव्हता हाली गोत मिलोन मुनासिफी करितां तुमचा इलाखा साच जाला आपण मोकदमी घेतली होती ते गोते तुह्मास देवविली आपले पैके तुह्माकडून देवविले ते आपणास दिधले सदरहू मोकदमी तुह्मास दिधली असे तुह्मी लेकराचे लेकरी काळी व पांढरीचे लाजिमे मोकदमीचे तुह्मी खाणे आपणासी मोकदमीसी समंध नाहीं आपणापासी मोकदमीचे कागद होते ते तुह्मास दिले हा लिहिले सही

खत लिा

गोही

| | |
|---|---|
| एमाजी व मगाजी देसमूख कसबे बलवडे किले फतेमंगल ( शिक्का षट्कोनी ) | दिनपाटील मोकदम मौजे असुरणे |
| बाकोजी हिरोजी | मलजी मोकदम मौजे कुंभारगौ ( नि. नांगर ) |
| रामाजी गौंडी मोकदम मौजे सिरसोफल पा सुपे (निशाणी नांगर) | |

---

**लेखांक ४१८** **१५५५ आश्विन शुद्ध १२**

महजर बितेरीख रबिलाखर बिहुजूर हाजीर मजालसी

मोकदम हमशाही

| | |
|---|---|
| अंतोजी अटाले मोकदम मौजे लाझफल | बाकोजी व हिरोजी व रामोजी मोकदम मौजे सिरसाफल |

मोकदम देहाये का बायवडे ( नि. नांगर )

| | |
|---|---|
| राहुजी व उझरोजी मोकदम कसबे बायवडे | हिराजी व तुकोजी मोकदम मौजे लाहासुरणें |
| बान पाटील मोकदम मौजे असुरणें | मोकदम मौजें कलद |
| बहिरजी मोकदम मौजे लाकडी | गणोजी मोकदम मौजे झिकू |

सुा अर्बा सलासीन अलफ श्रीसके १५५५ श्रीमुखी नाम छवतछेरे आस्विन सुद बारसी दिवसी महजर जाहाला ऐसे जे जिवाजी बिन खेलोजी भोसले यास एमाजी व मगाजी देसमुख व रखमाजी कान्हो देसकुलकर्णी का बायवडे किले फतेमंगल महजर करुनु दिधला ऐसाजे मौजे निरगुडे का मा तेथील मोकदमी तुह्मी विकत घेतली बिता

निमे मोकदमी व चावर ५ हे सं-
भाजी तानदेऊ यानें घेतली होती
त्यानें सुखें राजी होउनु वेचले
पैके घेउनु दिधली बा लिहिले
संभाजी

निमे मोकदमी उणे चावर पांच ते
हालीं एमाजी बिन धाकोजी तो
सुजोन मरो लागला त्याणें आत्मसुखें
तुह्मास विकत दिधली किमत बा
लिहिले एमाजी

सदर्हूप्रमाणें आत्मसुखें मौजेमजकूरची मोकदमी तुह्मी विकत घेतली तेणेप्रमाणें सारी मोकदमी लेकराचे लेकरीं मोकदमी मान माननूक काळी व पांढरी तश्रीफ नागर कुल मोकदमीचा हक सेत घर मोकदमीचे सदर्हूप्रमाणें दिधले असे यास पेस्तर हर कोन्ही बिलाहरकती करील तो तो निवारणें हा महजर सही

निशान एमाजी देसमुख
का॥ बायवडे किले
फतेमंगल

मोर्तब
सूद

---

**लेखांक ४१९** **१५५५ आश्विन शुद्ध १२**

श्रीसके १५५५ श्रीमुखी नाम छवतछरे आस्विन सुद बारसी सु॥ अर्बा सलासीन व अलफ बिहुजूर देसमुख व मोकदम देहाये का॥ बायवडें किले फतेमंगल या हुजूर जिवाजी बिन खेलोजी भोसले यास एमाजी बिन धाकोजी काजले लेहूनु दिधलें ऐसें जे मौजे निरगुडे मोकदमी आपली मिरासी होती त्यापैकीं निमे मोकदमी व चावर पांच आपला तकसीमदार गोंदजी व अछतसभटजी तानदेऊ यास दिल्ही होती विकत दिधली होती हालीं मौजे मजकूर खराबसभटजीच्यानें व

आपलियानें लावणी नव्हे दुकाल थोर कारबार अवस खावया नाहीं बैल ढोर नाहीं आपण बहुत भोई पडिलों सुजों लागलो यावरी संभाजीनें हि तुह्मांस वेचले पैके घेउनु लेहून दिल्ही हाली निमे मोकदमी उचे पांच चावर राहेली होती ते आपण आत्मसुखें राजी होउनु तुह्मास विकत दिधली किमती होन ३० समस्त गोत मिलोनु किमती केली ते पैके तुह्मी आपणास दिधले आपण मोकदमी तुह्मास दिधली लेकराचे लेकरीं सारी मोकदमी काली व पांढरी मान माननुक तश्रीफ नागर कुल मोकदमी तुह्मास विकत दिधली असे सुखें पिढी दर पिढी लेकराचे लेकरी मिरासी खाणें हा लिहिले सही पेस्तर हर कोन्ही आपला वेलिस्तदार उभा राहेल तो हि आपण निवारणें हे लिहिलें सही

( निशाणी नांगर )

गोही

एमाजी व मगाजी
देसमुख किले फतेमंमल
( शिक्का षट्कोनी )

बीकोजी व हिरोजी
रामाजी बिन कान्होजी
मौजे सिरसाफल
( निशाणी नांगर )

बानपाटील मोकदम
मौजे आसुरणे
( निशाणी नांगर )

हिरोजी व कुमाजी
मोकदम मौजे लाहासुरणे
( निशाणी नांगर )

मुजेरी मौजे निरगुडे
जाउजी बिन मलजी
पाल्होजी चानगुडा
बालगुडा सेटियाजी
थोरवा

बहिरजी मोकदम मौजे
लाकडी
( निशाणी नांगर )

खंडोजी
बालगुडा
तान्होजी
चानगुडो

बलुते मौजे निरगुडे
बाळू चांभार जानू कुंभार
(निशाणी रापी) ▭|—
पिला बिन माउजी सटवा माहार
चांभार नि. रापी ७


तिमाजी मुा व सेखजी
दलजी मोकदम मौजे
उधड

बिदस्तूर रखमाजी
कान्हो देसकुलकर्णी
का बायवडे

गणोजी काठा मोकदम
मौजे भिउगौ

---

**लेखांक ४२०** **१५५५ आश्विन शुद्ध १४**



अज् रखतखाने राजश्री त्रिंबक बलाल बजानेबु हुदेदार व मोकदम मौजे वडिगौऊ नजीक देउळगौऊ परगणे पुणे बिदानंद सुा अर्बा सलासीन अलफ बोरामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार सो आरवी हुजूर येउनु मालूम केले जे आपणास इनाम जमीन कास रुके -।· देखील मलै दर सवाद मौजे मजकूर कर्याती पाटस परगणे मजकूर प्रज माहाद पाटील ठोंबरा मौजे मजकूर देखील नखतयाती व महसूल तालुक ठाणे व तालुक देहाय व खर्चपट्टी व पायपोसी कुलबाब कुलकानू सालाबाद चालत आहे हाली हुदेदार ताजा खुर्द खताचा उजूर करिताती दरीं बाब खुर्द खत होय मालूम जाले तरी रामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार यासी इनाम जमीन कास -।·


रुके देखील मलै प्रज माहाद पाटील ठोंबरा दर सवाद मौजे मजकूर देखील नख्तयाती व महसूल तालुक ठाणे तालुक देहाय खर्चपट्टी पायपोसी कुलबाब कुलकानूसीं दिधलें असे दुमाले करणें दर हर साल खुर्द खताचा उजूर न करणें तालीक घेउनु असेली इनामदारमजकुरास फिराउनु देणें इनाममजकुरावरी ता। जे एईल ते दुमाला करणे मोर्तबु

( शिक्का षट्कोनी )

तेरीख १२ माहे रबिलाखर

---

**लेखांक ४२१** **१५५५ आश्विन वद्य १**



अज रखूतखाने राजश्री त्रिंबक पंडित साहेबू दामदौलतहू बजानीबु हुदेदार व मोकदम मौजे वडिगौ ना। देउळगौ कर्याती पाटस पा। पुणे बिदानंद सु॥ अरबा सलासैन अलफ रामेस्वरभट बिन नारायणभट सो। आरवी हुजूर एउनु माल्हुम केले जे आपणास इनाम जमीन कास रुके-।- देखील मलै दर सवाद मौजे मजकूर प्रज माहाद पाटील ठोंबरा मुजेरी मौजे मजकूर देखील नख्तयाती ता। ठाणे व ता। देहाये व खर्चपट्टी पायपोसी कुल बाब कुल कानू सालाबाद चालत आहे हाली हुदेदार ताजे खर्द खताचा उजूर करिताती दरीं बाब सरंजाम होय माल्हुम जालें तरी रामेस्वरभट बिन नारायणभट सो। आरवी यासि इनाम जमीन कास रुके -।· देखील मलै प्रज माहाद पाटील ठोंबरा मुजेरी मौजे मजकूर देखील नख्तयाती ता। ठाणे व ता। देहाये खर्चपटी व पायपोसी कुल बाब कुल कानू दिधले असे दुमाले करणें

साल गुा इनाम भोगवटा नाहीं त्याचा उजूर न करणें साा गुा सदरहू इनाम जे दस्त असेलि ते साले हाली दिवाण अंबरपैकी देणें दर हर साल ताजे खुर्द खता उजूर न करणे तालीक घेउनु असेली इनामदार मजकुरापासी फिराउनु दीजे इनामदार मजकुरासी ताा एईल ते दुमाले करणे मोर्तब सुद ( शिक्का षट्कोनी )

तेरीख १४ रबिलाखर

---

**लेखांक ४२२** **१६०९ पौष शुद्ध ७ शुक्रवार**

अज रख्तखाने राजश्री कृष्णाजी राजे भोसले साहेबू तुलीदया-मदौलतहू बजानेबू कारकुनानी हाल व इस्तकबाल व नाटेवारानी व रयानी व कुलकर्णियानी साा मजकूर बिदानद सुा समान समानैन अलफ दर वज बदल इनाम वेदमूर्ति रामेस्वरभट वदल बालभट उपाध्ये आरवीकर यासि पुष्य शुध सप्तमी सुक्रवार मकरसकराती पर्वकालीं धारादत केलें भूदान सर्वमान्य नजीकाणी १८ एक दिधली असे तरी सदर्हू जमीन मौजे मलेनूर साा मजकूर बाा इनाम रतनतीमलालग पैकी कुलबाब कुलकानूची दुमाले करणें दर हर साल ताजा सनदेचा उजूर न करितां तालीक लेहोन घेऊन असल सनद इनामदारमज-कुरापासी फिराऊन देणें स्लोक दानपालनयोर्मध्ये दानात् स्वेयो नुपाल-नात् दानात् स्वर्गमवाप्नोती पालनादचुतं पदं ॥ १ ॥ स्वदत्ता द्विगुणं पुन्यं परदत्तानुपालनं परदत्तापहारेन स्वदत्तं निष्फळं भवेत् ॥ १ ॥ शके १६०९ प्रभव नाम सवछर पुष्ये शुध सप्तमी सुक्रवार मोर्तबु सूद

मोर्तब सुद

तेरीख ५ माहे रबिलोवल

---

**लेखांक ४२३** **१६१० आषाढ शुद्ध १३**

श्री

सकलतीर्थस्वरूप अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यराजश्री बालंभट गोसावी यासि

विनंती अपलें कृष्णाजी राजे दंडवत उपरी एथील कुशल जाणून स्वक्षेम-वैभवलेखनाज्ञा दिधली पाहिजे विशेष आह्मी सैन्यासि स्वार जालो ते छ १० रोजी पलीपटास पावलो पुढे मजली दर मजली स्वार होऊन जातो ऐसे कळले पाहिजे सैन्यामध्ये खर्चवेचास पाहिजे समयासि न पावे याबद्दल सांप्रत रुा ५०० पांचसेयाचे खत लेहोन पाठविले असे खतप्रमाणे पैके अबुलनबी महालदार पाठविला आहे यापासी देऊन पाठऊन देणें जे तेरिखेस पैके द्याल ते तेरीख खती घालोन आह्मास हि लेहोन पाठविजे वाटेतिटेचा विचार पुढे न पावे याकारिता जरूर जाणोन खत पाठविले असे तरी अगत्यारूप पैके पाठविले पाहिजेती विशेष त्याहावे नलगे त्याचा अभिमान तुह्मास आहे कृपा असो दीजे छ ११ रमजान

*हे वीनती

---

**लेखांक ४२४** **१६१० भाद्रपद वद्य ४**

श्रीमद्भो-
सलसंभूत गंगा
धरतनूभुवः ॥कृ
ष्णभूपस्य मुद्रे
यं सदा वितरतु
जयं ॥१॥

रवा सूद

शके १६१० विभवनाम सवछर भाद्रपद वद्य चतुर्थी सोमवार सुा तिसा समानैन अलफ तदिनि खतलिखिते धनको नाम रा राभे-

---

* हस्ताक्षर कृष्णाजीराजाचें

स्वरभट उपाध्ये आरवीकर रिणको नाम रा कृष्णाजी गंगाधर राजे भोसले आत्मकार्यपरवतसमंध्ये तुह्मापासून कर्ज घेतले मुदल उलदुरी नखुत रुा १००८ मा सेभरी चाा रास यासि मलातर दर माहे दर सदे रुा ३८ तिनी प्राा हिसेबी जे मलातर होईल ते व मुदल ऐसे देऊन यासि आन सारिखे नाही हे लिहिले सही

तेरीख १७ माहे जिलकाद मोर्तबु सुदु

मोर्तब सुद

---

**लेखांक ४२५** **१६११ मार्गशीर्ष शुद्ध ५**

श्रीमद्रो
सलसंभूतगंगा
धरतनूभुवः॥ कृ
ष्णभूपस्य मुद्रे
यं सदा वितरतु
जयं ॥ १ ॥

रवा सूद

शके १६११ शुक्लनाम संवछर मार्गेस्वर शुध पंचमी बुधवार सुाा तिसैन अलफ तदिनि खतलिखिते धनको नाम राजश्री रामेस्वरभट उपाध्ये आरवीकर रिणको नाम राा कृष्णाजी गंगाधर राजे भोसले आत्मकार्यपरवतसमंध्ये तुह्मापासोन कर्ज घेतले मुदल उलदुरी रु॥ ३००८ मोबलग तिनीसे रु॥ रास यासि मलातर दर माहे दर सदे रु॥ ३८ तिनी प्रमाणे हिसेबी जे मलातर होईल ते व मुदल ऐसे देऊन यासि आन सारिखे नाहीं हे लिहिले सही छ ३ माहे सफर मोर्तबू सुदु

मोर्तब सुद

---

लेखांक ४२१ १६४७ श्रावण वद्य ५

श्रीभवानीप्रसन्न

तालीक

स्वस्तिश्री राज्याभिषेकशके ५१ क्रोधी नाम संवछरे श्रावण बहुल पंचमी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी याणी वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण असामी १६ सोळा वास्तव्य-क्षेत्र करवीर यांसि दिल्हे इनामपत्र ऐसें जे तुमचे विशई राजश्री हरीराज पंडितराज व राजश्री रामचंद्र नाईक मंत्री याणी स्वामिसंनिध विनंति केली कीं सदरहू सोळा ब्राह्मण बहुत थोर विद्यासंपन्न श्रौतस्मार्तकर्मानुष्ठान-षट्कर्मनिरत आहेत या ब्राह्मणांस कऱ्हाडप्रांतें श्रीकृष्णातीरी एक गांव इनाम सर्वमान्य करून दिधलियानें तेथे उत्पन्न होईल तें अन्न भक्षून स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून राहातील ह्मणोन विदित केलें त्यावरून मनास आणितां तुह्मी करवीरक्षेत्रीं राहाता तुमचे योग-क्षेमाचे अनकूलतेस गांव इनाम दिधलियानें स्वामीस बहुत श्रेयस्कर यास्तव तुह्मांस नूतन इनाम कुल बाब कुल कानू हालीपट्टी व पेस्तर-पट्टी जलतरुतृणपाषाणनिधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौजे झुबी ता। हवेली सुभा प्रांत कऱ्हाड हा गांव देह १ एकरास इनाम सर्वमान्य करून दिल्हा असे तरी तुह्मी मौजे मजकूर पूर्व-मर्यादेप्रमाणे आपले स्वाधीन करून घेणें नावनिशी

| | |
|---|---|
| १ नीलकंठभट बलबडेकर गोत्र गार्ग्य | १ बापूभट बिन चिमणभट गोत्र प्रथमात्री धर्माधिकरणी |
| १ गोविंदभट बिन आपदेभट गोत्र गार्ग्य उपनाम लाटकर | १ पांडुरंगभट |
| | १ त्र्यंबकभट बिन सरस्वतीभट गोत्र गार्ग्य लाटकर |
| १ दासभट बिन रायभट घळसासी गोत्र जामदग्न | १ श्रीधरभट बिन माहादेवभट पळूसकर गोत्र हारीत |

१ बाळंभट बिन शंकरभट गोत्र भारद्वाज आपस्तंभ

१ आपदेभट बिन हरभट गोत्र गार्ग्य उपनाम लाटकर

१ माहादेवभट बिन रंगभट गोत्र जामदग्न्य सिंगणापूरकर

१ रामभट बिन मुद्गलभट गोत्र वशिष्ठ उंब्राणीकर

१ विश्वनाथभट गाडगीळ

१ शामभट उपनाम गुळवणी गोत्र वशिष्ठ

१ बाळकृष्णभट बिन पुरुषोत्तमभट गोत्र जामदग्न्य

१ यादवभट बिन नारायणभट वडणगेकर गोत्र गार्ग्य

एणेप्रमाणे आसामी सोळा तुह्मास मौजे मजकूर इनाम सर्वमान्य करून दिल्हें असे यथाविभागे इनाम तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें इनामगाव अनभऊन सुखरूप राहणें

---

**लेखांक ४२७** **श्रीशंकरप्रसन**

राजमान्य राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसी

सेवक गुडाजी नाईक नमस्कार विनंति उपरि तुह्मी सारवोरोजी बराबरी पत्र पाठविले ते पावले लिहिले की सालगुदस्ता बा। ११॥· यास रा गोविंदराऊ याकडे ५॥ व अह्माकडे ६८ चावर ह्मणौऊन लिहिता तरी आबाघरी बाइका जाऊन बसले आहे त्यास तुह्मी जाउनी वाटू (न) घेऊन टाकणे व तुह्माकडे जे लागल ते धान चोख व दाविले धारण जो पैका होईल तो व त्याजकडे जो होईल तो लिगाड निर्ग-

मून टाकणे वशगती बा। व्याज कोलगे ५०८० त्याचा पैका व षेपे-
जरीच धान १८॥२ बाकी राहिले आहे ते त्याचा लिगाड तुह्मी गोविं-
दरायापावेतो अपाजी बराबरी जाऊनि वाटूण घेण व धानाचे विशई
लिहिले तरी आधी आह्मास देऊन मग कोनास तरी देण आह्मास मे
देता आनखी कोनास द्याल तरी मग तुह्मासी बोलानार नाही धान
चोखड व पांढरे जितक असल तितक आह्मास देऊन मग आनी
कोनास देण गोविंदरायापावतो जाऊन येऊन हिसब न ठेवणे आलस
न करणे हे विनंती आवंदा तुह्मी जाऊन हे लिगाड लावले आलस
करून राहाविता तरी तुह्मास आह्मास निस्टूर होईल तुह्माकरिता
आह्मास व गोविंदराउयास काही निठूर करणे नाही तुह्मापासून हे
लिगाड घेऊन सोडने ह्मणौऊन गोविंदरायान सांगितल याउपरी आल-
स कराल तरीं किचाटास पात्र तुह्मी व स्नेहास अंतर तुह्माकडून पड-
लेस होईल यासत्वे तुह्मी गोविंदरायापावेतो जाऊन हे लिगाड वारून
माहागाचे धारनेने पैका जो होईल त्याच आताचे धारणेनें पैका आ-
गर धान जे द्याल ते घेऊन याउपरि आह्मी निठूरतेने लिहिले ह्मणौ-
ऊन राग न माननें तुमचे बरियासाठी सांगता देशकाल येक प्रकार
लिगाडच कामा येऊ नये यासत्वे[1] लिहिले आहे कृपा असो दीजे हे विनंती

---

१ 'यास्तव' बद्दल यासत्व लिहिलें आहे.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

# चाकण—ब्रह्मे

लेखांक ४२८

ब्रह्मे यांची वंशावळ

शक १५०९ : गंगाधरभट
|
असर अलफ : मुरारभट
|
कृष्णभट
|
मुरारभट — बाबदेभट

मुरारभट
|
केशवभट
|
शक १६४४ : मुरारभट

**लेखांक ४२९**

यादीदास्त जमीनजुमला काा इंदूरी प्राा चाकण बमोजिब मवजनामालअराजी जमीनजुमला चावर ३७९. माा बिघे ४४४०९.

| | |
|---|---|
| जिराती | बागाईत |
| ४२४०९. | २००९. |
| खालिसा बिघे | इनामती बिघे |
| ४०४०९. | ४००९. |
| जिराती बागाईत | मोकदम ८०९. |
| ३८४०९. २००९. | मसीद ८०९. |
| | मुरारभट १२०९. |
| | पाडेवार १२०९. |

---

**लेखांक ४३०** **१५२३ मार्गशीर्ष शुद्ध १३**

ताा

महजर श्री सके १५२३ पलव सवछरे मार्गीस्वर सुध त्रयोदसी सुक्रवार ते दसी चाकण-स्थल-सील-सभे विदमान महजर केला ऐसा जे १५२१ विकारी सवछरी तकरीर केली ऐसी जे मुद्गलभट पुंडले समस्त ब्राह्मणी समापत्र केले जे ब्रह्मियाचे उत्पन इतके बहुताचे पींडदान व नांदीसराद व चक्रेस्वरीची पुजा व आउलीची पुजा व तुलसीची पुजा व आंबिठियाचियाची पुजा व पीपलाची पुजा व स्त्रीपुरुसाची दोनी अनंतव्रते होतील तेथील हि एक वाण व रोठे व थालीपाक व हिरण्या अष्ट वर्ग इतुके बहुताचे ह्मणौनु तकरीर केली याउपरी आह्मी ब्रह्मी ह्मटिले हे सदरहू सकल हि आपले याउपरी सभा केली देवाळी मुख सभानायक देसमुख व साल पाटिल व आनाजी कुलकर्णी व देउजी तेली मुतालीक देसमुख व भिकू सुतार हे समस्त बैसोनु गावांती ग्रहस्थ + + + + गोपालबा सराफ व नरसावा खुताड व तिमाजी राम व आनाजी कुळकर्णी व नागोवा गाढवा हे


पाचारुनु याचेया माथिया वरी देवाचा पाला घालुनु घाल्ल म, ये तैस्या आणा घालुनु पूसिलेयाउपारि ते बोलिले जे पींडदानादी सकल कर्मे ब्रह्मियाची ब्रह्मे च खाताती यावरी सकल वादी खोटे जाले ते तकरीर नागोवा गाढवेयाने देउजीस नमस्कार करुनु तकरीर घेउनु फाडिलि-यावरी आजी तागाईत ब्रह्मियाचे ब्रह्मे खाताती दुसरियास समंधु नाही हा महजर सही

गोही

| | |
|---|---|
| सीवाजी व सूर्याजी देसमुख | चील सेटी सेटिया का। मा। |
| साल पाटिल खराबी का। मा। | दसम सेटी सेटिया तांबोली |
| बहिरसेटी माहाजन | आनाजीराम कुलकर्णी |
| बकाल | |
| जानभट ढेरे | जोगो पाटिल रातांधोली |
| पदमाजी आऊदेऊ | नरहरी मनाजी सराफ |
| जुनारदार | |
| गोविंद पाठक देउकुले | |

---

**लेखांक ४३१** **१५३१ आषाढ शुद्ध ७**




अज रखतखाने खुदायवंद मलिक सर्के मलिक अंबर खूलीद-

फारसी सिक्का

यामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व हुदेदारानि अजहती मुकासाई व मोकदमानि

कसबे चाकण पा मजकूर कसबे कडूस समत जुनर बिदानद सुा सन असर अलफ मुरारिभट बिन गंगाधरभट ब्रह्मे विद्वांस हुजूर मालूम केले जे आपणास इनाम दर सवाद देहाय मजकूर

| | | |
|---|---|---|
| कसबे चाकण पाा मजकूर | | कसबे कडूस समत जुनर |
| जमीन चावर | जकाती व | थल डावर सेत देखील बाग |
| एक गज स- | जराईब | चावर एक देखील नख्तयाती |
| रायनी देखील | पैकी दरोज | ताा देहाय व ताा ठाणे कुल |
| नख्तयाती कुल | रुके बारा | बाब कुल कानू व बाजे |
| बाब प्रजं आपाजी | ।· | पटिया हुजुराती गैबती |
| नाणेकराचे सेत | अंबराई | चावर एक |
| चावर वीर घेरू | दर बनास | १ |
| विहीर घेरू | पेंडी एक | |
| १ | | |

बाा हुजती बसिके खास भोगवटे वजिरानि कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद व हुजती खान दिलावरखान तसरुफाती चालत आहे साहेबाचे खुर्द खत होए मालूम जाले बराए मालुमाती खातिरेसि आणौनु मुरारिभट बिन गंगाधरभट यासि इनाम सदरहू बाा हुजती बसिके खास व भोगवटे कारकीर्दी दर कारकीर्दी व हुजती खान दिलावरखान सालाबाद तसरुफाती चालत असैल तेणेप्रमाणे चालवीजे दर हर साल खुर्द खताचा उजूर न कीजे तुह्मी तालीक घेउनु असली फिराउनु दीजे औलाद अफलाद चालवीजे मोर्तब सूद

तेरीख ४ माहे रबिलाखर

तेरीख ४ म हे रबिलाखर

रबिलाखर

रुजूसुदु बारसुदु सुरुसुदु

लेखांक ४३२ १५४१ ज्येष्ठ वद्य ५

श्रीराम प्रां

नकल

॥ शके १५४१ सिद्धार्थी संवछरी उदगयणे ग्रीष्मतौ ज्येष्ठ वद्य ५ पंचमी आदितवार ते दिवसी कडोसस्थळी मुरारिभटी गोसावी ब्रह्मे सेकीन चाकण उपाध्याय गोसावियांसि बरवायि बिन विठ पाठक सेकीन कल्हेट जोसी अष्टाधिकारी लेहोन दिधले जे आपलिया बापाची वृत्ति जोसीपण कल्हेट—निर्गुडेयाची पश्चिमभागी समीप आहे तेथील जोतिषवृत्ति अष्टाधिकार धर्माधिकरणपूर्वक वृत्ति पूर्वी राक्षस संवछरी वैद्यनाथदेवाळीं सिवरात्रीदिवसी संकल्पपुर्वक दिधली कागद लेहुण दिधला नवता आता ए स्थळी सकललोका समक्ष लेहुण दिधली ते तुह्मी लेकुराचे लेकुरी उत्तरोत्तर चालविजे हे लिहिले बरवायि तुकोबा नायक दाढे त्याचिये पत्नीचे लिहिले सत्य पुरुषोत्तमभंट परीक्षकाणां हस्ताक्षरामिदं

साक्षी

रायाजी मुकुंद का। कडूस

पुरुषोत्तम पारखी

बापभट कडे

पत्राप्रमाणे साक्ष धोंडभट पारखी का। कडूस

साक्ष भानभट पारखी

हरि कृष्ण कर्ते कुलकर्णी का। कडूस पत्राप्रमाणे साक्ष

विठूबा तानवडी

संकराव तानवडी

माहाजन का। कडूस

पत्राप्रमाणे साक्ष माहादेव भट कडे

नरहरि पाठक उपाध्ये

नराम पाठक

पत्राप्रमाणे साक्ष काशीबा तानवडे

नरहरि तुकदेव कर्ता कुलकर्णी का। कडूस

लेखांक ४३३ श्री १५४२ भाद्रपद शुद्ध ११

नकल

शके १५४२ रौद्र संवत्सरे भाद्रपद शुद्ध ११ सोमे तदिनी चाकणस्थली ब्रह्मसभे विद्यमान मुऱ्हारभट ब्रह्मे यास वासुदेवभट ब्रह्मे ईहि आत्मसुखे लिहुन दिले ऐसें जे तुह्मा अंह्मा मध्ये पुस्तकांचा कळहो होता तो निवडला ऐसा जे तुमचि व आमचि पुस्तके पहिलि तुमचि होति ते तुह्मि घेतलि व आमचि होति ते आंह्मि घेतलि आता तुह्मा आह्मां मध्ये आर्थाअर्थि समंधु नाहिं खंडलेयास अन्यथा करु तैं ब्रह्मसभे अन्याई बाबाजीपंत राजगुरु हस्ताक्षर

गोहि

| | |
|---|---|
| विठल जोसि | ब्रह्म वजेरि |
| गोविंद पाठक | वासुदेवभट ब्रह्मे |
| कृष्णराव निळकंठ | कृष्णभट पुंडले |

---

लेखांक ४३४ श्री १५४६ आश्विन शुद्ध ७

नकल

श्री सके १५४६ रक्ताक्षी नाम संवछरे आश्विन शुद्ध सप्तमी बुधवार ते दिवसी राजश्री मुरारभट बिन गंगाधरभट ब्रह्मे कसबे चाकण गोसावियासि सेवक

| | |
|---|---|
| शाहाजी व सूर्याजी देसमुख | बापूजी अनंत व चांदोजी |
| ( निशाणी नांगर ) | विश्वनाथ देशकुलकर्णी |
| दुलसेटी सेटिया व मेंगसेटी | दससेटी सेटिया व |
| चौधरी व बहिर सेटी माहाजन | दादसेटी केकण माहाजन |
| बकाल | तांबोली |
| ( निशाणी तराजू ) | ( निशाणी चाक ) |
| चांग मेहतरी मेहतरा | देऊ माली मेहतरा व |
| | हर माली चौधरा व |

ब्रावाजी तेली चौधरी बापू काडिंगा माली
( नि. पाहार ) ( निशाणी खुर्पें )

समस्त का। चाकण प्रां। मा। आत्मसंतोषे पत्र करून दिल्हे एसे जे सदर्हू संवत्सराकारणे पाऊस मुलखा गेला लोक परागंदा होऊ लागलेयावरी सदर्हू अवघे मिळून तुह्मापासी बोलिले जे रोजा १०।१२ मध्ये पाऊस पडेल की न पडेल हे सांगितले पाहिजे यावरी मुरारभट गोसांवी उतर दिधले जे दिवसा दाहा मध्ये पर्जन्य पडेल मग रोजा दाहा मध्यें पर्जन्य उदंड पडिला मग आह्मी समस्त संतोषी होऊन तुह्मासी नमस्कार व आ। पायां पडून तुह्मावर सासन धर्मादाव लेंकुराचे लेकुरी टके २५ पंचवीस करून दिधले असेती यास जो कोणी आनसारिखे करील त्यासी गाईची आण माहादेवाची आण असे सदर्हू धर्मादावकांच पटीस घाळून देणे हे लिहिले सही

---

**लेखांक ४२५** **१५५१ चैत्र शुद्ध ३**

श्री सकें १५५१ सुक्ल सवछरे चैत्र सुध त्रीतीया मंगळवार ते दीनी राजश्री मुऱ्हारीभट व वासुदेवभट गोसावी ब्रह्मे सा। कसबे चाकण यासि तिमाजी पुरुषोत्तमें आत्मसुखे लेहोन दिधले ऐसे जें पुराणिकाच्या वाडियाच्या निमोन्याच्या उत्तर भागे दे। कोपरा ते भूमी समस्त ब्रह्मियाचि ह्मणौन पूर्वि राजश्री गदाधरभट व राजश्री बाबदेभट व गंगाधरभट ब्रह्मे इही भूमी आह्मास राहावेयास दिधली ते भूमींवरी घर करून वरुसे पाचपन्नास नांदतो हाली कृस्णाजी नीळकंठराऊ ब्रह्मे तिहीं आह्मास हटकिले जे ब्रह्मियाची भूमी ते आपली आपणास द्या त्यावरी ते भूमी आह्मी त्यास दिधली ए विसी त्यास लेहोन दिधले आहे त्यावरून तुह्मी अर्धाविभागी ह्मणौन आह्मास + + + ची घालेतीने त्यास लेहोन दिधले आहे तैसे च आपणास द्या आपण अर्धविभागी आहो जरी नेदा तरी वेव्हार सांगा यावरी आह्मी म्हटले जे गोसावी आपली अर्ध भूमी घेणे भूमीस आम्हास समंधु नाही

गोही

पत्रप्रमाणे साक्षि अंतपंत
राजगुर धर्माधिकारणि
चांदो विस्वनाथ देसकुलकर्णी
पा चाकण
दुळत पतापरा ( व ) माना
भानावा षुताड साषा
गोविंद पाठक देवकुळे आपण
त्यांच्ये व तुमच्या पत्रावरि साक्षि
केले ते तरि तुमचि त्यांचि
भुमि कळल नाहि तीमाजी
पुरुषोत्तमाच्या साक्षि केले
पत्र प्रमाणे
पत्रप्रमाणे साक्षी नारायण-
भट पुराणिक का चाकण

पत्रप्रमाणे साक्षी कृष्णभट
पुंडले
नारायणभट ब्रह्मे पत्र-
प्रमाणे साक्ष
गोपाळ तुळो सोलापुरी
पत्रप्रमाण साक्षी
पत्रप्रमन साक्षी अंतोवा
खुताड माहाजन का चाकन

---

**लेखांक ४३६** **१५५९ चैत्र शुद्ध १**

फारसी
सिक्का

अज रख्तखाने खुदायवंद खाने अजम दिलावरखान खूलीद-
यामदौलतहू बजानेबु कारकुनानि पा चाकण बिदानद सुा सन सबा

रवा शुद | सलासीन अलफु कृसणभट बिन मुरारिभट ब्रह्मे प्रा
चाकण हुजूर एउनु मालूम केले जे आपणास बदल
धर्मादाऊ सालीन्या टके २५ पंचवीस बा पत्र देस-

मुख व देसकुलकर्णी व सेटे व माहाजन व मेहतरिया माली कसबे

मजकूर सके १५४६ रगताक्षी संवसर बा। कागद आहे ते सालाबाद कारकीर्दी बडेखानसाहेबु व कारकीर्दी अमानत व वजिरानि ता। सुा। सीत सलासीन अलफु चालत आले आहे हाली सालमजकुराकारणे माहाल साहेबास मुकासा अर्जानी जाला माहाली कारकुनु खुर्द खताचा उजूर करिताती खुर्द खत होए माहूम जाले तरी कृस्णभट बिन मुरारिभट सो। कसबे मा। यासि बदल धर्मादाऊ सालीन्या टके २५ देसमुख व बाजे रयती का। मा।र इही निसबती रयती कागद करुनु दिधला आहे तेणे प्रमाणे ता। सुा। सीत भोगवटे तसरुफाती चालत आले असेल तेणेप्रमाणे सालाबाद चालवणे दर हर साल ताज्या खुर्द खता उजूर न करणे तालीक घेउनु असेली इनामदारमजकुरापासी

फिराउनु दीजे मोर्तब सुद

तेरीख २९ माहे सौवालु

सवाल

---

**लेखांक ४३७** **१५६१ आश्विन शुद्ध ८**

प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता ॥ शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

अज रख्तखाने राजश्री सीवाजी राजे दामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि प्रा। चाकण बिदानद सुा। अरबैन अलफ बो। कृष्णभट बिन मुरारीभट ब्रह्मे सो। कसबे चाकण हुजूर एउनु माहूम केले जे आपणास इनाम व रोजमुरा व तेल बितपसील

| | | |
|---|---|---|
| दर सवाद कसबे चाकण बिनाम मुरारीभट जमीन चावर १ बाा थल नाणेकर खंडी नव ९८ पैकी खंडी ३८. एकूण चावर सदरहू देखील नख्तयाति व महसूल व सेलबैल व पायपोसी व खर्चपटी बाजे उटपटी व हुजराती व गैबती हून-पटिया होतील त्या पैकी या थलावरी एईल त्यास तीं खंडी· याची तकसीम एईल ते व वेठीबेगारी कुलबाब कुलकानु देखील विहीर हुडा थलावरी वांटून तीं खंडियास एईल ते देणे व इनामतीचे चावरामधे आंबे व चिंचा व झाडझाडोरा आपण व प्रजे करून लाउनु त्याचा राजभाग हाली व पेस्तर देणे | दर सवाद कसबे इदोरी इनाम मुरारीभट चावर थल मीलनाक एकूण खंडी तीन एाा चावर एक १८. देखील नख्तयाति व महसूल व पटिया कुलबाब कुलकानु देखील उटपटी व वेठीबेगारी व वेठिया हुजराती व गैबती | |
| | लग | ० |
| | लग | ० |

अंबराई दर बनास पेडी

१

जकाती व जिराईब पैकी

| | |
|---|---|
| जकाती काा माा | जराईब पैकी |
| पैकी रोजमुरा | सदखा तेल |
| धर्मादाऊ दरोज | दरोज८८१ |
| रुके ·।· | दाा वर्तोला |
| | अडका |

सदरहू प्रमाणे सालाबाद चालिले आहे हाली प। मजकूर साहेबा अ-

र्जानी जाला आहे त्यास हाली कारकून ताजे खुर्द खताचा उजूर करिताहेती दरीं बाब खुर्द खत होए ह्मणौन माह्रूम केले तरी बऱ्हाय माह्रुमाती खातिरेसि आणौन कृस्णभट बिन मुरारीभट ब्रम्हें सो चाकण पा॥ मा॥ यास इनाम व रोजमुरा व तेल व अंबराई बनास पेडी सदरहू प्रमाणे देविले असे ता॥ सन तिसा तश्रफाती व भोगवटा चालिले असेल तेणेप्रमाणे चालवणे दिधले असे दुगाला कीजे तजकरा उजूर न कीजे तुम्ही तालीक घेउनु असल खु॥ इनामदार मजकुरास देणे मोर्तब सूद

तेरीख ६
जमादिलाखर

मर्या
देयं विरा
जते

रुजू सुरु
निवीस
माहे जमादिलाखर
सुरु सूद *

**लेखांक ४३८** — **१५७५ श्रावण वद्य ३**

प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता ॥ शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते ॥

अज रख्तखाने राजश्री सीवाजी राजे साहेब दामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पा॥ चाकण बिदानद सु॥ अर्बा खमसैन बै॥ कृस्णभट बिन मुरारीभट ब्रम्हे सो॥

श्री शिव न
रपति हर्ष
निदान ॥ साम
राज मति म
त प्रधान

कसबे चाकण पा॥ मजकूर हुजूर एउनु माह्रूम केले जे आपणासि इनाम व रोजमुरा व तेल

बितपसील

---

* असें च एक पत्र ब्रह्मे यांच्या दफ्तरांत खमस अबैन सालचें शिवाजीचें आहे.

दर सवाद काा चाकण बिनाम मुरारीभट जमीन चावर १ बाा थल नाणेकर खंडी ९८ नव पैकी खंडी ३ एा चावर सदर्हू देखील नख्तयाति व महसूल व सेलबैल व पायपोसी व खर्चपटीया व बाजे तुटपटी व हुजराती व गैबतीहून पटिया होतील त्या पैकी या थला वरी एईल त्यासि तीं खंडियासि ताा एईल ते व वेठीबेगारी कुलबाब कुलकानू देखील विहीर हुडा आला वरी वाटून ती खंडीयासि एईल ते देणे व इनामतीचे चावरामध्ये आंबे व चिचा व झाडझा-डौरा आपण व प्रजे करुनु लाउनु त्याचा राजभाग हाली व पेस्तर देणे

| | | |
|---|---|---|
| अंबराई दर बनास पेडी | जकाती व जराईब पैकी | |
| १ | जकाती काा माा पैकी रोजमुरा धर्मादाऊ दरोज रुके बारा रास | जिराईब पैकी सदखा तेल दरोज वजन ८८१ दो वरताला अडका प्रमाणे सेर एक रास |

दर सवाद काा इंदोरी इनाम मुरारीभट चावर थल मील नाक एा खंडी ३ एा चावर १ एक देखील नख्तयाति व महसूल व पटिया कुलबाब कुळकानु देखील उटपटी व वेठीबेगारी व वेठिया हुजराती व गैबती

एणेप्रमाणे भोगवटे व तसरुफाती ताा साल गुाा चालत आले आहे हाली साल मजकुराकारणे माहाली कारकून ताजे खुर्द खताचा उजूर करिताति दरी बाब सरंजाम होए माल्हम जाले तरी कृस्णभट बिन मुरारीभट ब्रह्मे सो चाकण पाा माा यासि इनाम व रोजमुरा व तेल व अंबराई दर बनास पेडी १ एक सदरहूप्रमाणे देवविले असे ताा सन सलास भोगवटा व तसरुफाती जेणेप्रमाणे चालिले असेल तेणेप्रमाणे मनास आणौनु चालवणे दर हर साल ताजे खुर्द खताचा उजूर न करणे तालीक लेहुनु घेउनु खुर्द खत इनामदार मजकुरासि

फिराउनु देणे

मर्या
देयं विरा
जते

रजू सुरु
निवीस
माहे रमजान
सुरुसूद

तेरीख १६
रमजान

---

**लेखांक ४३९** **१५७५ आश्विन शुद्ध २**

तालीक

अज रख्तखाने राजश्री सीवाजी राजे साहेबु दामदौलतहू बजानेब्रु कारकुनानि पाा चाकण बिदानद सुाा अर्बा खमसैन अलफु बाबदेभट ब्रह्मे व त्रिंबकभट राजगुर काा माा यास आच्यार्याचे व्रुतीचे भांडण होते त्याबदल हरदोजण हुजूर आले त्रिंबकभट राजगुर एणे दिव्य केले तो खोटा जाला त्याचा भाऊ भोजभट राजगुर तो एथे होता तो एथून पळाला आहे तरी भोजभटास दस्त करुनु हुजूर पाठवणे व त्रिंबकभटाची व भोजभटाची माणसे काा मजकुरी आहेती त्यास मोकळ देणे त्यांची कुल वस्तभाव जे असेली ते कैद करुनु जाबिता हुजूर पाठवणे या कामाबदल राणू कमा माहालदार पाठविला असे यास मसाला टके ७॥ साडे सात रास आदा करणे
तेरीख ३० सौवाल


---

**लेखांक ४४०** **१५७८**

प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता ॥ शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

अज रख्तखाने राजश्री सीवाजी राजे साहेबु दामदौलतहू बजा-

नेबु कारकुनानि पा। चाकण बिदानद सु॥ सबा खमसैन अलफ क्रस्ण-




भट बिन मुरारीभट ब्रह्मे इनामदार सो॥ चाकण पा। मजकूर हुजूर एउनु मालूम केले जे आपणास इनाम व रोजमुरा व तेल दरोज सतका चालत आहे ऐसियासि ता। मजकूरचा मोहसबा हुजूर होता सुरनिसीहून निजा याणि बंदीकलम काहाडिले आहे की भटमजकुरास बा। तेल वजन ८८।। एकूण रुके ८२ प्रमाणे खर्च घातला आहे पैकी मजुरा ८१।। देउनु निजा दरोज अडका ८॥· अडका प्रमाणे बेतीज काहाडिली आहे ह्मणउनु माहालीचे कारकुन निज्याचे पैके आपणास मागताति व इनामास हि ताजे खुर्द खताचा उजूर करिताति तरी माहाराज धर्मपरायण पुण्यउदधि आहेती ( पुढें गहाळ )

---

**लेखांक ४४१** **१५८० कार्तिक वद्य ११**




अज दिवाण ठाणे पा। चाकण ता। मोकदमानि का। चाकण पा। मजकूर सु॥ तिसा खमसैन अलफ बा। क्रस्णभट बिन मुरारिभट ब्रह्मे सो॥ का। मजकूर ठाणा एउनु मालूम केले जे आपणास इनाम दर सवाद का। मजकूर रोजमुरा व तेल बिनाम मुरारभट जमीन चावर १८ बा। थल नाणेकर खंडी ९८ पैकी खंडी ३८ एा। चावर १८ सदरहू देखील नख्तयाती व मा। व सेलबैल व पायपोसी व खर्चपटी व बाजे तुटपटी व हुजराती व गैबतीहून पटिया होतील त्यापैकी या थलावरी एईल त्यासि तीं खंडियासि तकसीम एईल ते व वेठीबेगारी

कुलबाब देखील विहीर हुडा आला वरी वाटून ती खंडियास एईल ते देणे व इनामतीचे चावरामधे आंबे व चिंचा व झाडझाडोरा आपण प्रजे-करूनु लाउनु त्याचा राजभाग हाली व पेस्तर देणे

अंबराई दर बनास पेंडी १

जकाती व जराइबू पैकी
जकाती का॥ जराइबूपैकी
मा॥ पैकी सदका तेल
रोजमुरा सेर ८८१.
दरोज रुके
।·

एणेप्रमाणे आपणास इनाम भोगवटे व तसरुफाती· ता॥ साल गु॥ चालत आले आहे + + + + + +
साल मा॥ सादर आहे तेथे रजा जे सदर्हू प्रमाणे ई॥ मजकुरास इनाम आहे त्यासि साल गु॥ भोगवटा व तसरुफाती चालिले असेली तेणे-प्रमाणे साल मा॥ हि इ॥ अवल सालापासुनु इनामदारमजकुराचे दुमाले करणे यास हाली ताज्या खुर्द खताचा उजूर का॰ताती दरी बाब खु॥ होए मालूम जाले तरी बा॥ मुरारभट बिन कृस्णभट ब्रह्मे सो॥ का॥ मजकूर यासि इनाम

अंबराई दर बनास पेंडी १

जकाती व जिराइबू पैकी————————
जकाती का॥ जराइबूपैकी
मा॥ पैकी सदका तेल
रोजमुरादरोज सेर ८८१.
रुक ·।·

एणेप्रमाणे इनाम आहे यासि ता॥ साल गु॥ जेणे प्रमाणे भोगवटा व तसरुफाती चालिले असेली तेणे प्रमाणे साल मा॥ इ॥ मा॥चे दुमाले इ॥ अवल सालापासुनु करणे तालिक लिहून घेउनु असेली खु॥ इ॥

 पुणे मराठी ग्रंथालय
१९७ ब, नारायण पेठ

मा पासि फिराउनु देणे साल गुा सन समानामधे मोगलाचे फितरती-
करिता सारे आदा जाला नाही त्यावरी नव जाणे ताा सन सबा भोग-
वटा व ताा चालिले असेली तेणे प्रमाणे साल मा हि दुमाले करणे
मोर्तब सूद तेरीख २४ माहे सफर
सफर

---

**लेखांक ४४२** **१५८० पौष शुद्ध ४**

मशहुरल हजरती राजश्री गोजो बापूजी हुदेदार व मोकदम मौजे कल्हेट पाा चाकण सुाा समान खमसैन अलफ कृष्णभट ब्रह्मे काा चाकण ठाणा एउनु मालूम केले जे आपले जोतीस मौजेमजकुरीचे मिरासी ऐसीयास आपण खंडोबा ब्राह्मण मौजे माहाळुंगे पाा मा त्याचे सांभाळी केले होते त्याने बानुभट सेरखुंडीकर याचे हवाला केले ऐसीयास त्याने जोतीस व कुलकर्ण हि केले साल मजकुराकारणे आ-आपण चालवीन या कारणे गावास जाउनु बाबाजी नारायण गावी ठेऊन आलो त्यास बानुभट हरकती करितो ह्मणौनु तपसीलवार मालूम केले तरी कृष्णभट आपली मिरास आहे जो ब्राह्मण ठेवितील त्यापासुनु कुलकर्ण व जोतीस घेणे बानुभट हरकती करीकरील तरी ठाणेयास पाठविजे छ २ रबिलाखर व याचे घरवाव आहे पहिले ब्राह्मणी यास दिधला आहे तो यास दुमाले कीजे मोर्तब सुद ताा घेउनु असेली फिराउनु दीजे मोर्तब

---

**लेखांक ४४३**

वेदमूर्ति राजमानी राजश्री
बाबनभट काा इंदोरी
गोसावियासि

केरोजी पोवार विश्वासराऊ दंडवत विनति उपर लिहावया

कारण ऐसा जे का मारी तुमचे इनाम आजीतागाईत चालिला नाही आणि आता कुनबियाची सेते सरकारचा महसूल खात असाल तर देणे लागेल जर इनाम खाणे असेल तर मोगलाईमधून तनखियात पैके वजा करून एणे तेव्हा इनाम खाणे नाही तर हरगीज कुणबियाची आणोन खाणे जर खाल तर दुगुणीने पैके देणे लागितील कळले पाहिजे हे विनति अखेर साली पैसे देणे लागतील मग कस्टी व्हाल हे विनति

श्रीराजारा
मचरणी
दृढभाव
केरोजी पो
वार राव

मोर्तब
सुद

---

**लेखांक ४४४** **१६०० ज्येष्ठ वद्य ९**

फारसी सिक्का

फारसी सिक्का

दाा बो मोकदमानि व रयांनि मौजे सावरदरी पाा चाकण सुाा तिसा सन १०८८ साहेबाचे बांदगीस कतबा लेहौनु दिधला ऐसा जे साहेबी आपणास हजूर बोलाउनु रजा फर्माविली जे मौजेमजकुरीची महामुरी कारणे जमाबंदी मुशकश करणे यावरी देसमुख व देसपांडे पाा माा अर्ज करुनु जमाबंदी मुशकश केली कुलबाब्र कुलकानु साल तमाम बिल मख्ता मुशकश केला तो आपण कबूल असो उगवणी करुनु सीवाय सायर खुाा शाही टके १०१६

माा एकसे एक टका रास

गोही सताजी व विठोजी देसमुख

पाा मजकूर

गोही नारोजी चंदस व बाळाजी

बापूजी देसपांडिए पाा माा

---

**लेखांक ४४५** **१६०७ ज्येष्ठ शुद्ध ६**

श्री सीवश
रण वीठोजि दे
शमुष प्रगणे
चाकण
नि. नांगर

रोखा मोकदमानि का। इंदोरी पा। चाकण सु।। सीत सन १०९५ यासि देसमुख व देसपांडिए पा। मजकूर लेहावया कारण ऐसे जे रा। वेदमूर्ति केसवभट ब्रह्मे याचे सेत का। मा। इनाम आहे ते याचे सांभाळी करणे याचा बोभाट एऊ नेदीजे छ ४ माहे रजबू

---

**लेखांक ४४६** **श्री** **१६१४ आश्विन शुद्ध ७**

राजश्री माहाराज
साहेब राजश्री
छत्रपती स्वामी
कैलासवासी

दामाजी
नारयण

अज सुभा राजश्री दामाजी नारायण सुभेदार व कारकून सा। जुनर तां। मोकदमानि कसबे इंदोरी प्रा। चाकण सु।। सलास तिसैन अलफ वेदमूर्ति केशवभट बिन कृष्णभट ब्रह्मे सेकीन कसबे चाकण इ. इ. इ. छ ५ * सफर

मोर्तब
सुद

---

* रा। राघो बल्लाळ सुभेदार व रा। नारो त्रिमळ सुभेदार या दोघा सुभेदारांचा उल्लेख या पत्रांत आहे.

लेखांक ४४७ श्री १६१४ मार्गशीर्ष शुद्ध १४

राजश्री दामाजी नारायण सुभेदार
व कारकून प्रा जुनर गोसावियासि

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य

सेवक शंकराजी नारायण सचिव नमस्कार सुा सलास तिसैन अलफ वेदमूर्ति कृष्णभट बिन केशवभट ब्रह्मे वास्तव्य कसबे चाकण याणी हुजूर एउनु विदित केले की आपणास पूर्वीपासून इनाम व रोजमरा कसबे चाकण व कसबे इंदोरी चालिले आहे बित॥ कसबे चाकण जमीन चावर १ एक बाा थल नाणेकर खंडी ९ पैकी खंडी ३ एकूण चावर सदरहू देखील नख्तयाती व महसूल सेलबैल व पायपोसी व खर्चपटी बाजे तुटपटी हुजराती व गैबतीहून पटिया देखील त्यापैकी त्याथलावरी एईल त्याणीं खंडियाची तकसीम एईल ते व वेठीबेगारी कुलबाब कुलकानू देखील विहीर हुडा थलावरी वाटून तीं खंडियावरी एईल ते घेणे इनामतीच्या चावरामध्यें आंबे व चिंचा झाडझाडोरा आपण प्रजेकरून करुनु त्याचा राजभाग हाली व पेस्तर द्यावा

| | | |
|---|---|---|
| आंबराई बनास पेंडी | जकायती व | जराईब पैकी |
| १ | जकायती का | जराईब |
| | मा पैकी रोजमुरा | पैकी सदका |
| | व धर्मादाऊ दरोज | तेल दरोज |
| | रुके ।• | ५५१. |

कसबे इंदोरी इनाम चावर थल मीलनाक खंडी ३ एकूण चावर १ एक देखील नख्तयाती व महसूल व पटिया कुलबाब कुलकानू देखील तुटपटी व बेठीबेगारी

एणेप्रमाणे आपल्या वडिलवडिलापासून ता सालगुा चालिले आहे याची पत्रें राजश्री स्वामी व कैलासवासी स्वामी यांची आहेती तरी आपले इनाम चालविले पाहिजे म्हणउनु विदित केले त्यावरून भटगोसावियापासून राजश्री माहाराज स्वामी व राजश्री कैलास-

वासी स्वामी यांची पत्रे होती ते रुजू पाहोनु तुह्मास आज्ञा केली आहे तरी याचे राजश्री कैलासवासी स्वामीचे कारकीर्दीपासून ताा सालगुदस्त चालिले असेल तेणेप्रमाणे पेस्तर हि साल दर साल चालवणे ताजे सनदेचा उजूर करीत नव जाणे पत्राची तालीक लिहून घेउनु असल पत्र परतोन देणे छ १२ रबिलाखर पाा हुजूर

श्री
शंकराजी
नारायण

पत्रिका
वधिरियं
भाति

बार सुरू सूद बार

पौ छ १९ जमादिलोवल

सन सलास

---

**लेखांक ४४८** **१६१५ ज्येष्ठ शुद्ध १**

सके १६१५ श्रीमुख नाम संवत्सरे जेस्ट सुध प्रतिपदा तदिनी खत लिखिते धनको नाम केसोभट ब्रह्मे रिणको नाम मल्हारि नाणेकर काा चाकण आत्मसुखे तुह्मापासून कर्ज घेतले रुा १०८. दाहा रुपये यास कलांतर दर माहे दर रुपयास रुके ८६ प्रमाणे देऊन यास मुदती जोंधळियाचे रासी माथा देऊन हे लिहिले सही

( निा नांगर )

गोही

बापूजी त्रिंबक देसपांडे पाा माा

---

**लेखांक ४४९** **श्रीशंकर** **१६१७ माघ शुद्ध २**

दामाजी
नारायण

अज सरसुभा राजश्री दामाजी नारायण सेनापत्य हजारी व कारकून तां मोकदमानि व सेटिये माहाजन का चाकण सुा सीत तिसैन अलफ वेदमूर्ति बाबदेभट ब्रह्मे यांसि का मजकुरी इनाम आहे त्यास तुह्मी खलखल करिता ह्मणून विदित जाले तरी हुजरून वेदमूर्तीस इनाम दिल्हा असता तुह्मास खलखल करावयासि प्रयोजन काय आहे याउपरि वेदमूर्तीस इनामाचे बाबे खलखल केली होईल ह्मणजे तुमचा मुलाहिजा होणार नाही ऐसे समजोन जरा तोसीस न देणे जाणिजे रा छ १ रजबु मोर्तब सुद

मोर्त
बसुद

---

**लेखांक ४५०** **१६२२ आषाढ शुद्ध १३**

श्रीमार्तंड

नकल

पारसी मोहोर

पारसी काजीचे दस्तक

चकनामा दरवजे मदतमाश बो केशवभट वलद कृष्णभट ब्रह्मे जुनरदार सेकीन का चाकण प्रां मार सरकार जुनर सुबे खुदस्तेबुनियाद सुा हजार १११० बदल खैराती बमोजिब दरवजे अमीरअलउमराये मुताबिक दरवजे बमोहर उमदे वजराये रफीशान् उमदे सवनी

बुलंद मकान् जमदतुलमुल्क मदारलमहाम मवजी तीन खंडी ३ मजरू एकएक जिराती दर कसबे चाकण थल नाणेकर पैकी पाटिया ६ दर पाटीस मण ·।।· दाहा मा। खंडी तीन मोकरर करून चक बरहुकूम हदमहदूद करून दिल्हे असे सालाबाद पुस्त दर पुस्त खाऊन हमेशा हजरत जिलसुभानीयास दुवा करीत जाणे बिता। हाद

| | |
|---|---|
| पूर्वेस बाग फुलारा | पछमेस हाद निघोजे मार्ग व पाणद असे |
| उत्तरेस बाग करपा व बाग गाडपिला व बाग कुलकर्णी | दक्षणेस विहीर घेरू व नाणेकरवाडी नजीक पेडवला बाग फुलारा |

सदर्हू हादमहदूद व सेतामधे विहिरी २ नजीक नाणेकरवाडी विहीर १ व नजीक पिंपळाचे झाड विहीर १ एकूण विहिरी २ व आंबे दिरख्त ३ तीन आहेती याप्रमाणे खाणे हा चकनामा सही तेरीख ११ माहे मोहरम सके १६२२ विक्रम संवछरे आषाढ सुध १३ त्रयोदसी

---

**लेखांक ४५१** **१६२६ श्रावण शुद्ध ४**

श्री सके १६२६ तारण सवछरे श्रावन सुद ४ सोमवार तदिवसी मिरासपत्र करून दिधले ऐसे जे वेदमूर्ति जोतिसशास्त्रसंपन्न रामजोसी वलद मंकजोसी व गंगाधरजोसी वलद मंकजोसी कसबे च्याकन पा। मजकूर यासि जोसी व कुलकर्नी समस्त प्रा। मा।र बनाम बिता।

| | |
|---|---|
| राघो त्रिस्वनाथ जोसी कुलकर्नी कसबे इंदूरी व जांबेड व नानोली | रामाजी कासी व जानो सिवदेव जोसी व कुल-कर्नी मौजे कालोस |
| देह ३ | १ |
| | पत्रप्रमाने सही |

राघो त्रिमल जोसी व
कुलकर्णी मौजे कोइली
१
पत्रप्रमाने सही
मोरो त्रिमल जोसी व
कुलकर्णी व बयाजी रुद्र
मौजे निघोज व मौजे
मोंए देह २
पत्रप्रमाने सही
बाबदेव भट जोसी
मौजे कल्हेट
१
अंताजी मल्हार जोसी
कुलकर्णी मौजे मलकर
१
रामाजी माहादेव व
बावाजी शामराज
जोसी कुलकर्णी
देह ४
१ गालेगाव
१ पीपलगाव
१ धनारे
१ सोळू
४
गोपाल नरसिंह व
बाबाजी त्रिमल व

बाबाजी सिवदेव कुल-
कर्णी व जोसी मौजे
भोसे व सेलगाव देह
२ पत्रप्रमाने सही
कुसाजी गोविंद जोसी
कुलकर्णी मौजे आंबेठान
व वराल व भांबोली
व सेळू असखेड खुा
व असखेड बुा देह ६
सखो बनाजी जोसी
कुलकर्णी मौजे खरपुडी
१
कमळाजी केशव जोसी
कुलकर्णी मौजे पीपले
१
खंडो एसाजी जोसी
कुलकर्णी मौजे करदी
१
नानाजी अनंत जोसी
कुलकर्णी मौजे दावडी
१
यादव मोरेस्वर जोसी
कुलकर्णी मौजे पीपरी
व सिरोली देह २
राघो दतो मोड्जोसी
व कुलकर्णी

वीरेस्वर केशव
जोसी कुलकर्नी
मौजे चऱ्होली व
आलंदी
२

१ वेलेवाडी
१ खाल उमर
१ सागुर्डी
१ कान्होवडी
१ सुदलवडी
१ साद
१ सुद उंबर
७

विनायक त्रिंबक जोसी
कुलकर्नी
१ किवल
१ चांदज
१ कोरगाऊ खुा
१ कोरगाऊ बुा
४

मोरो त्रिंबक व खंडो जोसी
व कुलकर्नी मौजे वाकी
बुा व वासोली व
सावरदरी देह ३

माहादेवभट बिन बाबदेवभट
पारखले जोसी कुलकर्नी
मौजे कोएर व कुरकुंडी
२

राघो मुरार व माहादाजी
जोसी कुलकर्णी मौजे
तलेगाव व वराळे २
खंडो जोसी कुलकर्णी
मौजे आंब व कुंड देह
२

कोणकर रामजोशि बिन् मंकजोशि
व गंगाधर जोशि देह १०
१ माहाळुंगे १ सशे १ वाकि
१ कुरळि १ बिरदवाडी १ पिंपरी
१ चिवळि १ राहकल १०
१ केळगाव १ गोनवडि

सुा सन ११११४ मिरासपत्र करून दिधले ऐसे जे वेदशास्त्र-

संपन्न जोसी कसबे मजकूर यासि आपले घरी जोतिसवृती मिरास गणेसपुजा व ग्रहघटिकालग्न-मोहुर्तपत्रिका तुह्मास मिरास करून दिधली असे लेकराचे लेकरी वौशपरंपरेने खाने यासि आपले वौशिचा कोन्ही अनेथा करील त्यासि शपत्य पुर्वजाची आन असे व कुलस्वामीची आन असे याखेरीज पा मार धर्मादाऊ दानपूर्वक मिरास रा ५१ गाव-गना पाटिलानी तुह्मास दिल्हे आहेत व हे आपन हि चालऊन कोन्ही अनेथा करनार नाहीं तरीख छ ३ माहे जिल्हेज वली सुमार १३

गोही

बावाजीपंत राजगुरु
धर्माअधिकारी पत्रप्रमान
साक्ष

कृस्नभट पुरानीक
पत्रप्रमाने साक्ष
बाबदेवभट व
दादमभट सैव
रघुनाथभट गंधे
मोकदम मौजे कालोस

गोपालभट खेडकर
उपाधे सिरोलीकर
पत्रप्रमाने साक्ष
पत्रप्रमाणे

कोनेर पाठक दकले
मल्हारभट ब्रह्मे
त्रिंबकभट पुरकर
मोकदम मौजे कोईली

दा एसाजी वलद संताजी
व सिवाजी वलद विठोजी
कड्ड देसमुख प्रा मा

दा भागवत नारायण
व अनाजी बालाजी
देसपांडिए पा मार

श्री एसाजी
वलद संताजी
कड्ड देसमुष
मौजे चाकन
( निा नागर )

**लेखांक ४५२** **श्री** **१६४१ फाल्गुन वद्य ९**

˘ श्री ०
राजा शाहु न
रपती हर्ष नीधा
न बाळाजी वीश्व
नाथ मुख्य प्र
धान

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ताा मोकदम काा इंदुरी प्राा चाकण सुहुरसन असरीन मया अलफ काा मारी वेदमूर्ति मुरारभट ब्रह्मे यांस इनाम जमीन खंडी तीन आहे त्यापैकीं दीड खंडी तुह्मी हिरोन घेतली ह्मणऊन विदित जालें तरी यांचा इनाम यांचे दुमाला करणे फिरोन बोभाट एऊं न देणें जाणिजे छ २२ जमादिलोवल आज्ञाप्रमाण

लेखन
सीमा

---

**लेखांक ४५३** **१६६७ आश्विन वद्य ६**

**श्री**

˘ श्री ०
राजा शाहू चर
णि तत्पर सदाशी
व चिमणाजी
नीरंतर

आज्ञापत्र राजश्री सदाशिव चिमणाजी ताा मोकदम कसबा चाकण प्राा जुनर सुहुरसन सीत खमसैन मया व अलफ वेाा राजश्री कृष्णभट ब्रह्मे चाकणकर हाली वस्ती मौजे इंदुरी ताा चाकण याणी

सुभा पुण्याचे मुकामी एऊन विदित केले की कसबेमजकुरी नाणेकर थळ खंडी ९ पैकी खंडी ३ तीन एकूण चावर १ एक आपला पुरातन इनाम आहे वीस पंचवीस वर्षें भोगवटा नाही यापूर्वी आपणाकडे भोगवटा चालिला आहे इनामपत्रे व चकनामा आपणाजवळ आहे तो मनास आणून आपला इनाम आपले स्वाधिन करावयासि कसबेमजकुरास आज्ञा केली पाहिजे ह्मणौन तरी वेदमूर्तीचा इनाम चकनाम्याप्रमाणें चालता करून वेदमूर्तीच्या स्वाधिन करणे भटजीचा इनाम आजतागाईत कोण्ही वाहून खादला त्याची तहकीकात मनास आणावी लागते याकरिता तुह्मी कुलकर्णी घेऊन देखत आज्ञापत्र सुभा एणे दिरंग न करणे जाणिजे छ १९ माहे मोहरम

मोर्तब सुद

